दोन चारशें राहिलें. बाजार लुटला गेला. लमाण लुटलें गेलें. वीस हजार पेंढार, याखेरीज लष्करचें माणूस, म्हणतां कांहीं बाकी ठेविली नाहीं! दोन चार हजार उंट लुटला. बैल वगैरे यांस तंव संख्याच नाहीं; अद्यापि लुटीतच आहेत. नबाबाचे भोंवते फौजेचें वलय पडलें आहे. त्याच्या लष्करास रुपयास अदशेर देखील दाणा मिळत नाहीं. मोटी दौलत! समयानुसार श्रीमंतांचे प्रतापेंकरून पेंचांत आली! नबाबाकडील सरदार मंडळी पांच सहा असामी कामास आली, अशी बातमी आहे. कोणी जखमी जाले असेंही सांगतात. सारांश इतःपर श्रीमंतानीं कृपा करून नबाबाची दौलत राखिल्यास राहील. नाहींतर कांहीं बाकी दिसत नाहीं. आज आणखी लढाई होणार. गोटावर तोफा लागू करणार. पुढें काय होतें पहावें! वरकड मजकूर वडिलांनीं लिहिलें आहे त्यावरून कळेल. हेंच पत्र कुरुंदवाडास चिरंजीवांकडे रवाना करावें म्हणजे त्यांसही सर्व वर्तमान समजेल. विदित होय हे विज्ञापना. उभयतां वडिलांस वृद्धापकाळीं मोठे दुःखाचें पर्वत जाले! हे विज्ञापना.

नं. ३६१०. श्री. ( १२ मार्च. )

पै॥ छ० २८ सवाल. सन खमस तिसैन. वैशाख मास. मुक्काम अमदाबाद.

तीर्थस्वरूप मातुश्री साळूबाई आक्का वडिलांचे सेवेशीं—

अपत्यें गंगाधर गोविंद. साष्टांग नमस्कार विज्ञापना तागायत फाल्गुन व० ८ पावेतों यथास्थित असे. विशेष. अलीकडे आपणाकडून पत्रें येत नाहींत, वर्तमान कांहींच समजत नाहीं, यामुळें चित्तास प्रशस्त वाटत नाहीं. वरचेवर पत्रें येत असावीं. येथून पेशजी एक रोज रवानग्या पत्रें पाठविलीं आहेत. पावलीं असतील. एक रवानगी राजश्री विठ्ठलराव गोळे यांजकडे केली आहे. त्याणीं आपणास प्रविष्ट करविलीं असतील. द्वारकेस कधीं पावलां, व कोणत्या मार्गानें गेलां,

१ विठ्ठल धोंडदेव हे भास्कर हरीचे नातू व धोंडो भास्कर यांचे पुत्र, सबब त्या हुद्यास.

वाटेचा सुबत्ता कसकसा, अजनारसें आजपावेतों यात्रा संपादून माघारे फिरलांच असाल, मुक्काम कोठें आहे, हें सविस्तर ल्याहावें. इकडील वर्तमान तर सर्व यथास्थित आहे उदकाशिवाय. चिरंजीव राजश्री नारायणराव याची रवानगी तीर्थस्वरूप राजश्री भाऊसाहेब यांजकडे लष्करास केली हें पेशजी लिहिलेंच आहे. चिरंजीव वडिलांजवळ लष्करास पोंचले. तेथील मंडळी सुखरूप आहे. चिरंजीव राजश्री श्रीपतराव भाऊ मागाहून लष्करास गेले तेही पोहोंचले. लष्कराचा मुक्काम मिरजगांवाजवळ सिनेच्या पाण्यावर आहे. नबाबाच्या मुक्कामास पांच सहा गांवांची तफावत आहे. अद्याप लढाई नाहीं. श्रीमंतांची सेना बहुतच जमा जाली आहे. शिंदे यांची फौज हिंदुस्थानांतून यावयाची होती ती येऊन पोंचली. व भोंसले नागपूरकर हेही आपल्या सरंजामानिशीं येऊन मिळाले. तरतूद मोठी जाली आहे. नबाबाकडून तहाचें बोलणेंही चाललें आहे. कसें ठरतें पहावें. चिरंजीव राजश्री भाऊ दीक्षित मनोहर याची कन्या राजश्री भास्करपंत करमरकर यांच्या पुत्रास द्यावयाचा निश्चय होऊन लग्नाचा मुहूर्त फाल्गुन व० ४ चा नेमिला. परस्परें साहित्याची सिद्धता जाली. नवरा मुलगा सांगलीस जावयाकरितां तृतीयेस मुहूर्तानें घराहून निघून प्रस्थानास आला. इतक्यांत चिरंजीवाची स्त्री तेच दिवशीं अस्पर्श्य जाली म्हणोन चिरंजीवाचा निरोप आला. त्याजवरून चतुर्थीचा मुहूर्त राहिला. यापुढें आणखी एक मुहूर्त मध्यम होता; परंतु ते दिवशीं चिरंजीवाच्या स्त्रीस चतुर्थ दिवस पडला. यास्तव तोही मुहूर्त साधला नाहीं. याउपर वैशाख मासाशिवाय मुहूर्त नाहींत. ईश्वराची इच्छा प्रमाण ! चिरंजीव सौ॥ सखूबाई आंबेगांवास घरभरणीस गेली होती. समागमें काशीबाई गडबोली व नारायण भट खाडीलकर दिल्हे होते. गृहप्रवेश करून सौ॥ सह माघारे फिरून पुण्याचे मार्गें येतांना चिरंजीव सौ॥ रखमाबाई सून यांस घेऊन आज मिरजेस येणार. नांद्र्याच्या मुक्कामाहून पत्र आलें. चिरंजीव राजश्री जिऊबा अण्णा याची कन्या राजश्री निळकंठआपा पोंक्षे यांच्या पुत्रास दिल्ही. लग्न हरिपुरीं फाल्गुन शु० ९ स जालें. चिरंजीव राजश्री दाजीबा परचुरे याच्या

पुत्राचें लग्न माघ व० ८ स जालें हें पेशजी लिहिलेंच आहे. चिरंजीव सौ॥ मथाबाई हरिपुरीं कन्यासह तीर्थस्वरूप मातुश्री वहिनी यांजवळ आहे. गरोदर आहेत. तीं॥ राजश्री भास्करपंत आपा यांची प्रकृत व सौ॥ सावित्रीबाई काकी यांची प्रकृत व मातुश्री काशीबाई काकी यांची प्रकृत बरी आहे. इचलकरंजीकर यजमानांचें वर्तमान पेशजी लिहिलेंच आहे. ईश्वर इच्छेस उपाय नाहीं. होणार तें जालें. धाकटी स्त्री गरोदर आहे. तीन महिने सांगतात. ईश्वराची कृपा दिसते. चिरंजीव सौ॥ कुसाबाई पांडववाडीस सुखरूप आहे. रामचंद्रपंत नातू मंगळवेढेकर यांचे पुत्र चिरंजीव राजश्री पांडोबा यांचें लग्न हरिपुरीं फाल्गुन शु० ९ स जालें. वधू रा. अंताजीपंत तामनकर मंगळवेढेकर यांची कन्या. ते आपल्या पुत्राचे लग्नाकारितां हरिपुरास आले होते. तेथेंच हाही निश्चय होऊन कार्यसिद्धि जाली. चिरंजीव राजश्री अमृतराव टकले जुनी हुबळी येथें सुखरूप आहेत. सेवेशीं विदित होय हे विज्ञापना.

नं. ३६११ श्री. ( फाल्गुन व० ८–१४ मार्च. )

पै॥ छ० २९ साबान. सन खमस तिसैन.

सेवेशीं गणेश गोविंद. कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना. येथील वर्तमान ता॥ छ० २२ माहे साबान पावेतों मुकाम नजीक खर्डे. स्वामीचे कृपेंकरून वर्तमान यथास्थित असे. विशेष. इकडील सविस्तर नबाब निजामअल्लीखान यांची व श्रीमंतांची लढाई छ० १५ तारखेस एक व दुसरी छ० १९ तारखेस फाल्गुन वद्य पंचमीसह षष्ठी इंदुवारीं एक, ऐशा दोन लढाया जाहल्याचें सविस्तर तपशीलवार उभयतां यजमानांचे पत्रीं लिहिलें आहे त्याजवरून विदित होईल. मुख्य गोष्ट श्रीमंतांचे पुण्यप्रताप विशेष, याजमुळें—प्रथम लढाई विघडली होती—परंतु शिंदे यांजवर नबाबाकडील फौज चालून आली. शिंदे यांजकडील तोफांची मारगिरी बहुतच निकडीची जाहली, ते समयीं नबाबाकडील फौज माघारी सरकली. नंतर सरकारच्या फौजानीं मागती फिरून लढाई सुरू जाहली. प्रातःकाल दीड प्रहर दिवसा-

पासोन दोन घटका रात्रपर्यंत तोफांची मारागिरी दोनीकडील व लढाई होत होती. लढाई मातबर जाहली. तोफांच्या मारगिरीनें नबाबाची बहुत खराबी जाहली. नंतर नबाब माघारे फिरून दोन कोस खडर्यास रातोरात निघून गेले. जाते समयीं तोफा दहा पांच व दारू गोळी वगैरे जिन्नस बहुत जाग्यावर राहिला. आज दोन दिवस नबाबाकडील दारू मार्गानें रहात गेलेली लष्करचे लुगारे जाऊन उडवीत आहेत, तथापि झाडा होत नाहीं ! याप्र॥ बुणगेंही शिंदे होळकर यांजकडील पेंढारी वगैरे याणीं बहुत लुटलें. याप्र॥ वर्तमान जाहलें. दुसरे दिवशीं नबाबाचा मुक्काम खडर्याजवळ आहे तेथून एक कोसावर येऊन सरकारच्या फौजा उतरल्यानंतर छ० २१ तारखेस सकाळींच सरकारचा तोफखाना पायदळ व शिंदे यांजकडील पायदळ तोफांसुद्धां नबाबाचे गोटावर तोफा लावावयास चालले. तोफा सुरू व्हाव्या इतक्यांत नबाबानीं पत्र पाठविलें जे, ' याजउपरी तोफा सुरू करूं नये. श्रीमंतांच्या मर्जीप्रमाणें ठराव होणें तो होईल. ' त्याजवरून तोफा सुरू जाहल्या नाहींत. याजउपरीं तहाचा ठराव कसा काय ठरेल तो पहावें. श्रीमंत राजश्री भाऊसाहेब यांजवर फौज नबाबाकडील चालून आली. जाग्यावर श्रीमंतांसच जखम कराचलीची लागली. तथापि जागा सोडावयाचें त्यांचे चित्तांत नव्हतें. परंतु जवळ मंडळी होती त्याणीं बहुत प्रयासेंकरून निघावें म्हणोन सांगून काढिलें. श्रीमंत राजश्री चिंतामणराव आपाही श्रीमंतांजवळच होते. श्रीकृपेंकरून सर्व मंडळी निघोन आली. विठ्ठलराव धोंडदेव व चिंतामणभट खाडिलकर गोळी लागून ठार जाहले. विसाजीपंत वाडदेकर यांच्या जखमा भारी दोन आहेत. सेवेशीं श्रुत होय. पथकांतील जखमी व घोडीं व भले लोक जाहल्याची याद हल्लीं पाठविली आहे. मागाहून तपशीलवार पाठवूं. विदित होय हे विज्ञापना. नबाबाकडील सामान डेरे राहुट्या व छकडे व दाणा बाण दारू, गोळे वगैरे किरकोळ लढाईचे जाग्यावर पडलें आहे तें झाडून लष्करचे लोक आज दोन दिवस जाऊन आणितात. तथापि झाडून सामान यावयाचें नाहीं. दोनशेंपर्यंत छकडेच

पडले आहेत. याप्रमाणें बहुतच खराबी होऊन पेंचांत आला. असा समय त्याजवर कधींच पडला नाहीं म्हणतात. हे विज्ञापना.

नं. ३६१२. ( फाल्गु० वद्य१०–१६ मार्च. )

परशुरामभाऊंकडून बाळासाहेबांस पत्रः—

" छ० १९ साबानीं लढाई झाल्याचें वर्तमान पेशजी आपणास लिहिल्याचीं दोन पत्रें पावलींच असतील तेच दिवशीं मध्यरात्रीचे सुमारास नबाब खर्ड्याचे किल्याचे आसऱ्यास गेले. त्यांचे बुनग्यांत रात्रीस पेंढाऱ्यानीं शिरून मारामार केली. त्या दंग्यांत नबाबाकडील पंचवीसतीस तोफा व दारूगोळा मनस्वी राहिला. तोफाचे बैल लुटले गेले. घोडे चारपांच हजारपर्यंत पेंढारी वगैरे यांजकडे आले. माणूस तिकडील फार मारलें गेलें. दुसरे दिवशीं पहांटेस तोफा सरकारांत व शिंद्याकडे व होळकरांकडे ( पाडाव ) आल्या. बुनगें फार लुटलें. प्र खासा नबाब खर्ड्यास मुक्काम करून आहेत. श्रीमंतांचीही खासा स्वारी सिनेच्या मुक्कामाहून कूच होऊन विंचरा नदीच्या पाण्यावरी आली. आमचें बुनगें तेथें होतें, तें घोडगांवचे नजीक ओढ्यावरी आलें. आम्ही व फडके व शिंदे होळकर भोंसले या सड्या फौजा वांकीनजीक ओढ्यावरी आहों. आम्हांस व नबाबास एक कोसाची तफावत आहे. रा. गोविंदराव काळे नबाबाचे लष्करांतून २१ साबानीं येथें आम्हांकडे येऊन दुसरे दिवशीं छ० २२ रोजीं श्रीमंतांकडे गेले आहेत. याउपरी काय ठरतें तें पहावें. आपलेकडील पथकांतील घोडें माणूस जायां जखमी जाहलें त्याची याद अलाहिदा पाठविली आहे. तपशीलवार लिहिणें तें मागाहून लिहून पाठवूं. आमचे पथकापैकीं व्यंकटराव जाधव शिपुरकर ठार. व ब्राह्मणांपैकीं अंताजी गोपाळ फडके यांस कपाळावरी तरवारेची जखम लागली. खैर आहे. आणखी घोडें माणूस जायां जखमी जालें आहे त्याची याद मागाहून पाठवितों. सारांश श्रीमंतांचे ताले शिकंदर ! एके लढाईंत फडशा जाहला. सलुकाचें बोलणें लागलें आहे. बहुतकरून विल्हेस लागेल असें वाटतें. वाढल्यास आणखी चार दिवस. परंतु सरकारच्या विल्हेस लागावें असें आहे. माझी जखम फार

हलकी आहे. काडीमात्र चिंता न करावी. श्रीनें खैर केली. रवाना २४ साबान. खमस तिसैन. "

नं. ३६१३. श्रीगणपति. (फाल्गु० वद्य १३–१९ मार्च.)

पै॥ छ० २ रमजान सन खमस तिसैन.

चिरंजीव राजश्री बाळासाहेब यांसीं आशीर्वाद उपरी. नबाबाकडील बोलणें लागलें म्हणोन परवां लिहिलेंच आहे. परंतु सरकारचा दुसरा मुद्दा कारभारी हवालीं करावे, अथवा ( कारभारांतून ) नाहींसे व्हावे. तिसरा पक्ष सरकारच्या इतल्यानें कैदेंत असावें. दौलताबाद किल्ला व तीस लक्षांची जहागीर दोन कोट रुपये याप्रो. या शिवाय भोंसले व शिंदे वगैरे जाबसाल व्हावे असें आहे. बहुतकरून चार दिवस अधिकउणे, परंतु घडावें असेंच आहे. परंतु यास एक दुसरी आणखी झटपट व्हावी तेव्हां घडेल. रंगही तसाच आहे. श्रीगजाननाचे कृपेंकरून घडेल तें प्रमाण ! माझी जखम हलकीच आहे. बरी होईल. चिंता न करावी. चिरंजीव बापूचा समाचार घेत असावा. छ० २७ साबान. बहुत काय लिहिणें. लोभ असों दीजे हे आशीर्वाद.

अपत्यें श्रीपतीचे साष्टांग नमस्कार विज्ञापना. सविस्तर वृत्त वडिलीं लिहिलें आहे. अलीकडे वडिलांकडून पत्र येत नाहीं, त्यास पत्र पाठविण्यास आज्ञा जाहली पाहिजे. जखम शेजेस येऊं लागली आहे. श्रीगणपतीचे कृपेंकरून लवकरच बरी होईल. श्रीमंतांचें पुण्य विचित्र. फत्ते मोठी जाहली. चिरंजीव विठलराव गेला. अनुचित जाहलें. ईश्वरी सत्ता प्रमाण ! विदित होय हे विज्ञापना.

नं. ३६१४. श्री. ( चैत्र शु० ३–२३ मार्च. )

पै॥ छ० ३ रमजान खमस तिसैन. चैत्र मास.

सेवेशीं गणेश गोविंद. कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना. तागाईत छ० २ माहे रमजान मुकाम येथें कृपें-

---

१ पत्र परशुरामभाऊंचें. २ उपनांव सखदेव. याचें हें बाळासाहेबांस पत्र. यांत जेथें कोरी जागा सोडिली आहे तेथील अक्षरें कसरीनें भोकें पाडल्यामुळें नाहींशीं झालीं आहेत

करून वर्तमान यथास्थित असे. विशेष. स्वामींनीं छ० १६ साबानचें पत्र जासुदाबरोबर पाठविलें तें छ० २४ तारखेस पावलें. दुसरें पत्र लढाई जाहल्याचें वर्तमान कळोन छ० २५ साबानचे सांडणीस्वारांबरोबर पाठविलें तें छ० २८ तारखेस प्रात:काळींच पावलें. "श्रीमंतांची व नबाबाची लढाई जाहली, आणि नबाबाकडील फौजेचा मोड होऊन ( तो ) मोहरीचा घांट चढत आहे, त्याचे पिच्छावर फौजा गेल्या आहेत, त्यास कडील वर्तमान लिहावें;" म्हणोन आज्ञा, त्यास छ० १९ तारखेस लढाई जाहली आणि त्यांची फौज नामोहरम होऊन रातोरात खर्ड्याजवळ किल्ल्याचा व डोंगराचा आसरा धरून राहिले, पुढें जावें तर निभावणी होणार नाहीं म्हणोन तेथेंच राहिले आहेत, हें सविस्तर व फौज तीन पथकांपैकीं शिलेदार व बारगीर व ब्राह्मण मंडळींपैकीं जायां जखमी जाहले त्यांची नांवनिशीवार यादी लिहून पत्रें जासूदहस्तें स्वामींकडे छ० २३ तारखेसच रवाना केलीं आहेत तीं पत्रें पावोन त्याजवरून सविस्तर "लढाई छ० १९ तारखेस होऊन छ० २३ तारखेस पत्रें रवाना जाहलीं. चार दिवस अवकाश पडावयाचें कारण काय?" असें स्वामींचे चित्तांत येईल, त्यास छ० १९ तारखेस लढाई जाहली तो दिवस रात्र जीन ठेवून तसेच उभे होतों, दुसरे दिवशीं प्रहर दिवसास घोडगांवावर बुणगें होतें तेथें आलों. भोजनमात्र जाहलें, तों लागल्याच फौजा तयार होऊन पुढें आल्या त्या अस्तमानपर्यंत उभे राहून येथेंच मुक्काम जाहला. तिसरे दिवशीं नबाबाचे गोटावर तोफा सुरू कराव्या म्हणोन तयारी जाहली. इतक्यांत त्याजकडून बोलावयास आले. नंतर तोफा सुरू करावयाच्या राहिल्या. मग दुसरे दिवशीं पत्रें लिहून स्वामींकडे रवाना जाहलीं. याप्रों जाहलें. याजमुळेंच चार दिवस अवकाश पडला. जखम्यांची नांवनिशी पेशजी लिहिलीच आहे. हल्लीं तपशीलवार यादी पाठविली आहे त्याजवरून विदित होईल. लढाई प्रथम बिघडली होती ते समयीं म्हणोन पायचें माणूस वगैरे फार जखमी जाहलें. मुख्य गोष्ट श्रीमंत राजश्री भाऊसाहेब यांस जखम हलकी लागोन खैर जाहली; आणि मोठें यश

श्रीमंतांस आलें; थोर गोष्ट जाह्ली. श्रीमंत राजश्री नारायणरावजी लढाईचे समयीं निशाणाजवळच होते. आणि प्रसंगही ते समयीं कठीणच पडला होता. परंतु स्वामीचे कृपेंकरूनच गोष्ट अवघड पडली नाहीं. विदित होय हे विज्ञापना प्रस्तुतनबाब खडर्यावरच आहे. त्याचे लष्करांत वैरणीचा व पाण्याचा तोबा बहुत! दाणा तीन शेरांची धारण याप्रों बहुत हलाखी आहे. तहाचे बोलण्याचा प्रकार सरकारचे चौथाईचा ऐवज येणें व जहागीर सरकारची माधारी येणें ती सहजच येत आहे. नबाबाजवळ कारभारी आहेत ते कारभारांत नसावे, व त्यांस कैद करून ठेवणें, म्हणोन सरकारचें बोलणें होत आहे त्याचीच घालमेल पडली आहे. कसें काय ठरतें पहावें. हे विज्ञापना.

नं. ३६१५. श्री. (चैत्र शु० ३–२३ मार्च.)

पै॥ छ० ६ रमजान सन खमस तिसैन. चैत्र.

पु॥ विज्ञापना. श्रीमंत राजश्री भाऊसा॥ यांची जखम हलकी आहे. आणखी दहा पंधरा दिवसांत बरी होईल. राजश्री जनार्दनपंत सुभेदार यादवाडकर यांस हातास थोडीशी जखम लागली ती हलकी आहे. राजश्री गोपाळपंत सोवनी यांचे डोईस कराचलीची जखम आहे ती हलकी आहे. राजश्री अंताजीपंत फडके यांसही जखम कराचलीची कपाळावर लागली ती विशेष आहे. व राजश्री विसाजीपंत वाडदेकर यांच्या जखमा भारी दोन. कठीणच अवस्था होती, परंतु स्वामीचे कृपेंकरून बचाव जाहला आहे. राजश्री सदाशिवपंत जोशी उत्तूरकर यांसही हातावर कराचलीची जखम हलकी आहे. वरकड मंडळी स्वस्थ आहे. आम्हांकडील पेंढारी याणीं नबाबाचे लष्करांतून हत्ती एक पाण्यास आला होता तो घेऊन आले. हत्ती थोर. भुजंग हत्तीचे वयाचा व उंचीसही तेवढा आहे. बरा आहे. सरकारांत प्रतिपदेचेच दिवशीं आणिला. स्वामीस विदित व्हावयाकारितां विनंती लिहिली आहे. ऐवजाची रवानगी करितां

---

१ मागच्या नंबराचें पत्र सखदेव यांचें आहे त्याची ही पुरवणी.

म्हणून लिहिलें, उत्तम आहे. पेशजी मोहरा पाटविल्या त्या साडे-पंधराचे दराच्या, परंतु येथें सोळाचे दरानें खर्च करीत आहें. चंकेरी नाण्यास मात्र लोकांस बहुत तोटा. आजपर्यंत तेथील दराप्र॥च खर्च करीत आहों. पौर्णिमेचे सुमारें ऐवजाची रवानगी जाहली पाहिजे. तूर्त पंचवीसांचा सुमार ऐवज पाठवावा. पुढें सुमार पाहून आणखी ( आणवावयास ) येईल. विदित होय हे विज्ञापना.

सेवेशीं नीळकंठ गोविंद. कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना. स्वामीनीं वडिलांचे पत्रीं नमस्कार लिहिला तो पावोन संतोष जाहला. ऐसेच सदैव पत्रीं सांभाळ करावयासीं आज्ञा करावीं. इकडील सर्व वर्तमान श्रीमंत राजश्री नारायणरावसाहेब याणीं लिहिलें आहे त्यावरून सेवेशीं विदित होईल. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

नं. ३६१६. श्री. ( चैत्र शु० ८–२८ मार्च. )

तोटा फार नबाबास आहे. यासाठीं गोरगरीब व शिबंदीचे लोक उठोन येतात. तहाचीं बोलणीं नित्य होतच आहेत. राव रंभा वगैरे नबाबाकडील बोलणार दोन तीन वेळां आले गेले. त्यांच्या बोलण्यांतील आशय, दौला कारभारी यांसीं सरकारांत आणवूं नयेत, याशिवाय जे जाबसाल असतील ते बोलण्यांत आणावे, नबाब फडशा करून देतात, असें बोलत होते. परंतु सरकारांत ही गोष्ट सर्वथैव मान्य नाहीं. दौलास पाठवावें, नाहीं तर तह होत नाहीं, अशीं नेटाचींच उत्तरें इकडील होत गेलीं. तेव्हां दौलाकडील हरि नारायण दौलाचे मुखत्यार आहेत ते सरकारांत आले. राजश्री गोविंदराव पिंगळे यांचे विद्यमानें कारभाऱ्यांशीं बोलोन करार ठरला कीं, दौला सडे सरकारांत येतात, त्यांचें मान महत्व राखावें म्हणोन. त्याजवरून पेशजी रुकनुद्दौलाची भेट जाहली त्याप्रमाणें भेटीचा समारंभ करितों याप्रमाणें कारभारी लेखकानीं करार करून दौलानीं यावें म्हणोन सांगितलें. त्यावरून छ० ५ रमजानीं शुक्रवारीं दौला श्रीमंतांच्या लष्करास

१ हें खर्ड्यांच्या लढाईसंबंधाचें पत्र आहे. याच्या प्रारंभींचा मजकूर फाटून गेला आहे.

दाखल जाले. सात हत्ती, शंभर घोडे, पंधरा उंट इतका सरंजाम होता. नानानीं एक कोस सामोरे जाऊन भेट घेतली. श्रीमंतानीं बाजाराचे अघाडीस येऊन भेट घेतली. गोटांत उतरविलें. सरकारची स्वारी डेरेदाखल जाल्यानंतर दौलानीं नजर केली ती घेतली. त्यानंतर दौला गोटास गेले. पांच हजार रुपये सरकारांतून मेजवानगी पाठविली. इतका मात्र महत्वाचा समारंभ जाला. वरकड बंदोबस्त दौलाचा उत्तम प्रकारें केला. दोन तीन हजार फौज, हजार दीड हजार गाडदी, यांचा पहारा चौगिर्दा दिला आहे. वाण्यांचीं दुकानें आंतच दोन ठेविलीं आहेत. आंतलें माणूस बाहेर किंवा बाहेरचें आंत येणें तर परवानगीशिवाय जात येत नाहीं. याप्रमाणें दौलाचा बंदोबस्त जाहला. सरकारचें दैव व प्रताप मोठा त्या योगेंकरून या गोष्टी घडल्या. नाहीं तर दुसऱ्या दौलतवंताचे घरचे दिवाण जोरबेजोर कैदेंत येणें ही गोष्ट घडावयाची कीं, काय? परंतु दैवयोग पुण्यपराक्रम अनिर्वचनीय आहे. त्या योगेंकरून सहजांत गोष्टी घडल्या. तहाच्या बोलण्यांत मोठी अडीची गोष्ट हीच होती ती उरकली, त्या पक्षीं इतःपर लौकरच बोलण्याचा ठराव होईल. राजश्री गोविंदराव काळे काल नबाबाकडे गेले आहेत. आज माघारे येणार आहेत. आठ चार दिवसांत तहाचा ठराव होईल असें दिसतें. वरकड तहाच्या बोलण्यांतील भाव अद्यापि स्पष्टतेंत येत नाहींत. परंतु दौलताबादेचा किल्ला व जागीर पेशजी माघारी दिली ती घ्यावी इत्यादि कलमें आहेत, असें ऐकण्यांत आहे. ठराव होऊन निश्चयांत येईल तें मागाहून सेवेशीं लिहितों. वरकड सविस्तर श्रीमंत राजश्री दादासाहेब याणीं लिहिलें आहे त्याजवरून कळेल. राजश्री विसाजीपंत वाडदेकर यांसीं जखम भारी होती, परंतु बरी होत आली. वांचावयाच्या मार्गास लागले. कळावें सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

नं. ३६१७. ( चैत्र व० ६–१० एप्रील. )

लक्ष्मण आपाजी भिडे यांजकडून बाळासाहेबांस पत्रः—

"छ० १९ साबानीं नबाब निजामअलीखान याची लढाई दोन

र दिवसापासून सायंकाळपर्यंत मातबरच जाली. त्यांजकडील

सरदार मातबर ठार, कांहीं जखमी जाहले. इकडील सरदार जखमी व भले लोक जखमी, कांहीं ठार, फारच जाहले. ते दिवशीं सायंकाळपासून एक प्रहर रात्रपर्यंत शिंद्यांकडील जिउबादादा यानीं तोफांची मारागिरी भारी केली तेव्हां जेर जाला. नंतर पहाटेचे प्रहर रात्रीस कूच करून खड्र्याचे किल्ल्यांत पळून गेला. तळावर दारूगोळा, तोफा तशाच राहिल्या. सरकारांत झाडून आणल्या. बाजारबुनगें पेंढारी यानीं लुटून नेलें. त्यांजकडील तसनस बहुत जाहला. श्रीमंतांचा पुण्यप्रताप थोर. एक लढाई होतांच जेर होऊन सलूचावें बोलणें लाविलें ! प्रथम बोलावयासीं गोविंदराव काळे वकील एक दोन वेळां येऊन गेले. नंतर राव रंभा निंबाळकर येऊन बोलोन गेले. तिसरे खेपेस त्यांचे दिवाण मशीरउल्मुलूक आले ते अघाडीवर आले. श्री॥ रा॥ नानाफडणीस पाऊणकोस सामोरे गेले होते. दोन प्रहरीं भेटी जाल्या. श्रीमंत अघाडीस ढालेपुढें गेले. तेथें भेट जाली. त्यांस संगातें दोन अंबाऱ्या, तीन हौदे, शंभर दीडशें माणूस, पन्नास राऊत, तीस उंटें, येणेंप्रमाणें बरोबर सरंजाम आहे. राजश्री आपाबळवंत यांचे गोटाचे पलीकडे जागा उतरावयास दिली. रा. बजाबा शिराळेकर यांजकडील लोक व आणखी पायदळ चौकीस ठेविलें आहे. मशीराचा चेहरा अगदीं उतरला आहे. श्रीमंतांचे प्रतापें मशीर पादाक्रांत आहे. नबाब खड्र्याचे मुक्कामीं दाणावैरण पाण्यावांचून फार जेर आला होता. त्याचे लष्करांत धारण एक रुपयास दोन शेर धान्य; पाणी बारा रुपयानीं पखाल एक. वैरण अगदींच मिळत नव्हती. याच मुक्कामीं आपले पेंढारी यानीं सरकारांत हत्ती एक पाडाव करून आणून दिला. हल्लीं नबाबाचा मुक्काम पारगांव येथें आहे. वकील बोलावयास गेले आहेत. नबाबाची चिठी बाबा फडके यांस आली त्यांतील मजकूर कीं ' आपण कूच करून पुढें येऊं नये. तुमचे करारामप्रमाणें जाबसाल उरकोन पुढें जाईन. ' दाणावैरणीमुळें कूच करून दोन मजली अलीकडेस आला आहे. रवाना १९ रमजान खमस तिसैन. "

नं. ३६१८. ( वैशाख शु० १५–४ मे. )

नारायणराव गंगाधर यांचें बाळासाहेबांस पत्र पुण्याहून छ० १४ सवालचें—

" छ० ९ सवाल बुधवारीं श्रीमंतांचा मुक्काम थेउरास आला. छ० १० रोजीं मुक्कामच होता. छ० ११ सवाल भृगुवारीं थेउराहून कूच करून वानवडीचे मुक्कामास आले. तेथें दोन घटका रात्रपर्यंत राहून उपरांत स्वारी तयार जाहली. वडिलांकडे स्वारीबराबर यावयाकरितां अंबारी आली होती. वडील अंबारींत बसून राजश्री नानाफडणीस यांचे अंबारीबरोबर श्रीमंतांचे अंबारीचे पाठीमागें चालत होते. आणखी सरदार मुत्सद्दी अंबारींत बसून पाठीमागून चालत होते. आम्हीं फौज निशाणसुद्धां घेऊन पाठीमागें होतों. श्रीमंतांची स्वारी भवानीपेठेंतून कांहीं शुक्रवार बुधवारांतून वाडा उजवा घालून दिल्लीदरवाजानें आवशीच्या सहा घटका रात्रीस वाड्यांत दाखल जाली. पेठेंतून दुतर्फा रोषनाई केली होती. आतषबाजी मुबलख जाहली होती. नजराणा जाहला. तीर्थस्वरूप राजश्री भाऊसाहेब याणीं पांच मोहरा नजर केल्या. " •

नं. ३६१९. श्री. ( वैशाख-मे. )

विशेष. येथील वर्तमान–लष्करचा मुक्काम वैशाख शुद्ध ११ बुधवारीं थेउरास जाला. ते दिवशीं श्रीमंत राजश्री नाना यांचा मात्र मुक्काम पुढें वानवडीवर येऊन उतरले. गुरुवारचे पहांटेस मागील पांच घटका रात्र राहतां मुहूर्तेंकरून आपल्या वाड्यांत दाखल जाले. गुरुवारीं श्रीमंतांचा मुक्काम थेउरासच जाला. शुद्ध त्रयोदशी भृगुवारीं कूच करून वानवडीस येऊन मुक्काम जाहला. श्रीमंतांची स्वारी येतांच पर्वतीस जाऊन दर्शन करून माघारी वानवडीस डेऱ्यास जाऊन राहिले. श्रीमंत राजश्री भाऊसाहेब सर्व मंडळी समागमेंच होती. मागील संध्याकाळचा प्रहर दिवस राहतां नानांची स्वारी श्रीमंतांकडे डेऱ्यास गेली. तों शहरांत सरकारचे वाड्यापासून भवानीपेठेपर्यंत दो बाजूनें चिराखा तयार केल्या. दारूचीं झाडें जागां जागां नाक्यानीं लाविलीं. नंतर श्रीमंतांची स्वारी नाना, भाऊसाहेब, सर्व

मंडळी आदीकरून समारंभानें अंबाऱ्यांतून चवथे घटका रात्रीं डेऱ्यांतून निघाले ते शहरांत दाखल झाल्यावर तोफा सुरू जाल्या. ते वाड्यांत दाखल होतपर्यंत बार जाले. आठवे घटकां रात्रीस वाड्यांत दाखल जाले. थोरल्या चौकांत उजवेकडील चांफेखणांत बैठक होऊन नजर नजराणा जाहला. आधीं नाना यानीं नजर केली. नंतर भाऊसाहेबांनीं केली.

नं. ३६२०. (वैशा० व० २–६ मे.)

चिंतामणराव आप्पाचें बाळासाहेबांस पत्र. पै॥ छ० १६ सवालचें—

" पु॥ अपत्यें साष्टांग नमस्कार विज्ञापना. नबाब बंदे गानअलीकडील मिश्रीन्मुलूक श्रीमंतांची स्वांरी आली ते दिवशीं श्रीमंतांचे अंबारीचे पाठीमागें मुत्सद्दी व सरदार यांच्या अंबाऱ्या होत्या त्यांपाठीमागें त्याची अंबारी होती. आमचे वाड्याजवळून श्रीमंतांची स्वांरी दिलीदरवाजाकडे गेली. मिश्रीन्मुलूक यांस बंगल्याचे बागेंत जाण्याची आज्ञा जाहली. तेथून परभारें बागेंत गेले. वाड्यांत आणिले नाहींत. बागेंत कवाइती लोकांची व स्वांरांची चौकी आहे. घाशीमिय्या व राजश्री गोविंदराव काळे यांस सिद्धटेकच्या मुक्कामाहून निरोप जाला. सेवेशी विदित होय हे विज्ञापना. "

नं. ३६२१. श्री. (ज्येष्ठ–जून.)

विनंती विज्ञापना. नबाबाकडील वर्तमान —साहेबजादेकडील दहावीस हजार फौजा सरंजाम जाग जागां ठेवून बेदरानजीक आणविला होता. खासा नबाब यांजकडील अजमसाहेब व मुसा राहिमू फिरंगी वगैरे तीस चाळीस हजार फौज तोफा लांब पल्याच्या घेऊन आली. सदाशिव रेडी शहरांतच होता. तेव्हां त्यांचे व याचे फौजेशीं लढाई जाहली. साहेबजादे याचा मोड जाहला. ते समयीं कांहीं स्वांर व प्यादे साहेबजादे याजकडील फुटून गेले. बाकीचे कांहीं लोक होते ते व खासा साहेबजादे माघारे निघून शहरास गेले. अजमसाहेब

१ हें मेदरगीच्या कारकुनाचें रघुनाथराव कुरुंदवाडकर यांस पत्र.

यांचे चिरंजीव बंदेअली रा. तुको बाबूराव यांचे बंधु रा. जिवाजीपंत यांस घेऊन हुकमाबादेस होते त्यांस नबाबानीं बोलावून आणवून जिवाजीपंतांसमागमें कांहीं फौज स्वार प्यादे देऊन निलंग्याचे ठाण्यास रवाना केले.

नं. ३६२२. श्री. ( १२ जुलै. )

श्रीमंत राजश्री बाळकृष्णपंत भाऊ सुभेदार पा। हुकेरी साहेबांचे सेवेशीं—

कबज बेशमी महिपतराव निंबाळकर व जोतीबा मोहिते नि॥ बळवंतराव थोरात पागे दि॥ सरकार. सु॥ सीत तिसैन मय्या व अल्लफ. कारणें लिहून दिला कबज ऐसा जे, तुम्हांवर वरात सरकारची सन सलास सबैनांत त्र्यंबकराव विश्वनाथ यांचे कर्नाटकचे स्वारींत किल्ले गरुडगिरीपैकीं जनार्दन गणेश याजकडून आदा जाला त्यापैकीं बट्टयाबद्दल ऐवज गैरमजुरा काढिला तो तसलमातीस दप्तरीं बाकी वोढत आहे. त्यास आसाराम नाईक तुमचे तीर्थरूपांचे मार्फतीचे, सबब तो ऐवज तुम्हांकडून बा॥ ( ? ) देणें. ता॥ आबाजी बल्लाळ वोसार याजकडे बळवंतराव थोरात याजकडील पागेची नालबंदी व रोजमुरे यांचा वगैरे ऐवज देणें त्यापैकीं, व खास जिलबीकडील खिजमतगार व मराठे व गारदी यांचा नेबाद पैकीं देविले रुपये २६७॥. पैकीं आपण राजश्री नारायणराव लागू यांजकडून देविले रुपये १३३॥।. एकशें पावणे चवतीस बाकी रुपये १३३॥।. एकशें पावणेचवतीस बागेवाडीचे मोकामीं आपण दिले ते आम्हांस भरून पावले. वरात बा॥ सदरहू ऐवज पावला. हा लिहून दिला कबज सही. तारीख छ० २४ माहे जिल्हेज उर्फ आषाढ व॥११ शके १७१७ राक्षस नाम संवत्सर.

निशाण कट्यार

साक्ष.
रामचंद्र विरूपाक्ष नाडगौडा प्रां॥ हुकेरी.
सिदो अनंत देशपांडे क॥ कबूर.
बि॥ बापू मेलगिरी. कुलकर्णी मौजे बागेवाडी.

नं. ३६२३. श्रीगणराज. ( श्रावण शु. १०–२६ जुलई. )

चिरंजीव राजश्री दादा यांसीं आशीर्वाद उपरी. काल ती, भाऊसाहेबांचीं पत्रें छ ३ मोहरमचीं आलीं, त्यांतील अधिकोत्तर वर्तमान राजश्री दौलतराव शिंदे यांसीं हिंदुस्थानांत जावयास श्रावण शु॥ सप्तमीस निरोप होणार. तत्रापि चार महिने जांबगांवीं राहतील असें लिहिलें आहे. नबाबाचे ज्येष्ट पुत्र पांच हजार जमावानिशीं सदाशिव रेडी जमीदार मिळवून बाहेर पडले, अशीं पत्रें पूर्वींच आलीं होतीं. हल्लींचे पत्रीं बेदर येऊन घेतलें, पंचवीस लाख रुपये रोकड हातीं लागली, वीस हजारपर्यंत जमाव जाहला, अशीं पत्रें सरकारांत आलियाची बाजारबातमी बोलतात. ती॥ रा॥ बापूंचीं पत्रें मंगळवेढ्याहून आलीं त्यांतील मजकूर बेदराचा किल्लेदार जिवें मारिला. शिद्दी इब्राहीम म्हणून दोन हजार फौजेचा सरदार पाठविला होता त्यास अलीजहां-याणीं लढाई करून मोडिलें. फौज लुटली. त्यास जिवें मारिलें. नबाबास इतबार कोणाचा नाहीं. गोवळकोंडा किल्ल्यांत गेले. शहराचा बंदोबस्त केला. अशी गर्दी जाला आहे. तमाम ठाण्यांस व किल्ल्यांत अलीजाह यांचीं पत्रें गेलीं आहेत असें वर्तमान सोलापूरचे बातमीचें म्हणून[1] लिहिलें आहे. नबाबाचे दौलतींत हंगाम सुरू जाला. श्रीइच्छाप्रमाण ! ता. छ ९ मोहरम. लोभ कीजे. हे आशीर्वाद.

नं. ३६२४. श्री. ( भाद्रपद व. १–२९ सप्तं. )

पै॥ छ॰ १५ रबिलावल. भाद्रपद मास शीत तिसैन.

विनंती विज्ञापना. नबाबाकडील वर्तमान-साहेबजादे यांची फौज दहा पंधरा हजार जागा जागां टाण्यानीं परगण्यांत होती ती झाडून बेदराजवळ नेली. नबाबाकडील आजमसाहेब व मुसारेमू फिरंगी

---

१ हें पत्र कुरुंदवाडकरांचा मैंदरगी तालुका मोंगलाईच्या हद्दीवर आहे तेथील कमावीसदारानें लिहिलें आहे. निजामअलीचा मुलगा अलीजहा यानें १७९६ त बंड केलें.

वगैरे तीस चाळीस हजार फौजा व तोफा कोकमठाण बेदरानजीक येथें ठेवून उतरून लढाई दोन वेळां जाली, दोहींकडील खराबी फार जाली. साहेबजादे याजकडील कांहीं स्वार निघून गेले. खासा साहेबजादा बेदरांत आहे. काय होतें तें पहावें. साहेबजादे याजकडील सामान तालुक्यांतील गेलें, तालुका मोकळा पडला, हें जाणून बंदोबस्त साहेबजादे यांचे पुत्र बंदेअली हे करितात. याप्रमाणें वर्तमान आहे ...............स्वामीस कळावें. सेवेशी श्रुत होय, हे विज्ञापना.

नं. ३६२५. श्री. ( पौष शु० ४–२३ जाने. )

अखंडीत लक्ष्मी अलंकृत राजमान्य राजश्री बाळकृष्ण लक्ष्मण क॥ दार प्रां॥ हुकेरी. दि॥ परशुराम रामचंद्र गोसावी यांस.

सेवक माधवराव नारयण प्रधान. नमस्कार. सु॥ सीत तिसैन मय्या व अलफ आपाजी शामजी व आबाजी अनंत चिकोडीकर याणीं सरकार कामास खस्त मेहनत बहुतकरून कामकाजें केलीं सबब उभयतांस दोन गांव पांच हजार रुपयांचे नूतन इनाम सरकारांतून द्यावयाचा करार सन आर्बा समानीनांत जाहला आहे. त्या ऐवजीं सन आर्बा व खमस समानीन दुसाला साडेसात हजार रुपये इतलाख पावले. त्यास सन सीत समानीनापासून परगणें मजकूरपैकीं इनाम गांव दिले त्यांची बेरीज———————————रुपये.

३७५०. मौजे निडसोसी कर्यात मनोळी हा गांव तुम्हांकडे कमाविसीनें होता तो दूर करून दिला त्याची बेरीज.

रुपये.

२५४४॥।- बमोजीब आकार. सन खमस समानीन.
१२०५८≈ जाजती भरर्तास.
———
३७५०

१२५० मौजे गिरगांव का॥ लाट हा गांव आपाजी शामजी यांचें कर्ज करवीरकराकडे येणें त्याऐवजीं रदकर्जास गांव आहेत त्यापैकीं मौजे मजकूर दूर करून दिला त्याची बेरीज रुपये.

८४९८= ऐन तनखा होन नाणें ४२४॥- दर होनीं रुपये २ प्रमाणें. एकूण रुपये.

४००।।।= जाजती भरतीस.

१२५०

५०००

एकूण पांच हजार रुपयांचे कमाल आकाराचे दोन गांव खेरीजहकदार व कदीम इनामदार करोन दरोबस्त नूतन इनाम सरकारांतून करार करून देऊन हे सनद तुम्हांस सादर केली असे. तरी सदरहूप्रमाणें दोन गांव यांचे दुमाला गांवचा आकार मशारनिल्हेचे नांवें सन सीत समानीनापासोन परगणेमजकूरचे हिशेबीं इनाम खर्च लिहीत जाणें. या सनदेची प्रत लिहून घेऊन अस्सल सनद मशारनिल्हे जवळ भोगवटियास परतोन देणें. जाणिजे छ. १२ रज्जब.

# उर्वरित पत्रें.

नं. ३६२६ पासून नं. ३६४० पर्यंतचीं पंधरा पत्रें नुकतींच आमच्या हातीं आलीं. यांतलीं पहिलीं अकरा पत्रें " महादजी शिंद्यांचा पुण्यास मुक्काम " या प्रकरणापैकीं असून फारच महत्त्वाचीं आहेत. या पत्रांवरून पहातां शिंद्यानीं निजामअल्लीशीं संधान करून नानांस पेशवाईच्या कारभारांतून काढण्याच्या बाबतींत कसा यत्न केला हें डफ्साहेबांस कांहींच माहीत नव्हतें असें दिसतें. त्या प्रकरणाची प्रस्तावना आम्हीं लिहिली तेव्हां प्रस्तुतचीं पत्रें आम्हांस मिळालेलीं नसल्यामुळें त्या प्रस्तावनेंतला कांहीं मजकूर या पत्रांवरून दुरुस्त होण्यास पात्र आहे. नं ३६३७ व नं ३६३८ चीं पत्रें पेशवाईंतील प्रख्यात गाणारी व नाचणारी कळावंतीण व्यंकटनरसी हिजविषयींचीं आहेत ! नं ३६३९ च्या पत्रांत खड्यीची स्वारी सुरू होण्यापूर्वीं निजामअल्लीचा दिवाण मशीर उलमुल्क यानें नानांवर मारेकरी घातल्याचा उल्लेख आहे.

---

नं. ३६२६. श्रीगणपति. ( कार्तिक व० २ श. १७१४
३१ आक्टोबर १७९२. )

चिरंजीव राजश्री बाळासाहेब यांसीं आशीर्वाद; उपरी श्रीमंतांचें दर्शन कार्तिक शु० पौर्णिमेस इंदुवासरीं जाहलें त्याचा विस्तार अलाहिदा लिहिला आहे. दुसरे दिवशीं रा॥ नानांकडे व तात्यांकडे जावें तरी व्यतीपात, यास्तव कोठें गेलों नाहीं. रात्रीस विसाजीपंत वाडेकर रा॥ नानाकडून आले त्याणीं सांगितलें जे, " नानांचें काशीस जावयाचें महिना दोन महिने घाटत होतें. परंतु निश्चय ठरला नव्हता. आपल्या जवळ त्यांनीं काल सांगितलें जे, निश्चय ठरला. श्रीमंत निरोप देतात. शिंदे हिसके घेत होते, परंतु त्याणींही रुकार दिला. रा॥ तात्यांसीं बहुत प्रकारें बोलून त्यांचाही रुकार जाहला. रा॥ शिं-

यांचें व तात्यांचें नीट जाहलें. नाना गेल्यावर मागें तात्यांनीं सांभाळावें असें ठरलें. " याप्रों मजलाही कळवावें असें रा॥ नानानीं विसाजीपंताजवळ सांगितलें. तुम्हांस कळावें. आमची व नानांची भेट होऊन कांहीं अद्यापि बोलणें जाहलें नाहीं. छ० १४ रबिलावल बुधवार. बहुत काय लिहिणें लोभ कीजे हे आशीर्वाद.

पै॥ छ० १७ रबिलावल कार्तिकमास. सन सलास तिसैन.

नं. ३६२७. श्री. ( १ नोवेंबर स. १७९२. )

आशीर्वाद[१] उपरी. इकडील मजकूर भेटीचा वगैरे समारंभ जाहल्याचा मजकूर वडिलांचे पत्रावरून कळेल. नवलविशेष रा॥ नानानीं सरकारचा निरोप काशीयात्रेस जावयाचा घेतला. तयारीचे बेतांत आहेत. निश्चयांत आलें आहे. वडिलांचा विचार तर तुम्हांस ठाऊकच आहे. अघांडीस पुढें जाणार याजप्रों बोलणें होऊं लागलें ![२] असें संकट येऊन पडलें आहे. किती एक गोष्टी घडाव्या, लष्करें[३] करून ( वडील ) आले, सर्फराजी व्हावी, तों ईश्वरें हें पुढें आणिलें असें जाहलें आहे ! परिणाम लागणें कळतच आहे. तुम्हांस वर्तमान कळावें म्हणोन लिहिलें आहे. हें वर्तमान ( मिरजेस ) ती॥ रा॥ बाळासाहेबांस श्रुत करावें. आणि बुद्धिवाद पुसोन ल्याहावा. येथें ( वडिलांस ) सुचवावें असा अर्थ राहिला नाहा. बहुत काय लिहिणें. कार्तिक वै. ३ गुरुवासर. लोभ कीजे. उत्तर लवकर पाठवावें हे आशीर्वाद.

नं. ३६२८ श्रीगणपति. ( पौष व० १२ श० १७१४
९ जानेवारी सन १७९३. )

चिरंजीव राजश्री बाळासाहेब यांसीं आशीर्वाद उपरी. येथील वर्तमान तर अद्यापि राजश्री नानांचा यात्रेस जावयाचा नाद आहे

---

१ पत्र पुण्याहून रामचंद्र परशुराम यांचें हातें परशुराम यांस तासगांवास. २ परशुराम भाऊ म्हणतात कीं, नाना यात्रेस जाऊं लागतील तर अघाडीस आपण जाऊं ! ३ लष्कर संभाळून मोहीम करून. ४ श. १७१४.

याजमुळें कोणताही कारभार शेवटास जात नाहीं. शिंदे येथें स्वस्थ आहेत. नबाबाकडून कर्जादाखल पंचवीस लाख रुपये आणून येथें खादले असें लोक बोलतात. कांहीं लटकें नव्हे. यांत काय आहे ईश्वर जाणे ! आम्ही आल्या तागायत कांहीं जाबसाल नाहीं. फौजेस दुसरी नालबंदी देत नाहीं असें कारभारी म्हणतात. महाल सारे काढून राजश्री हरीपंततात्यांस सरसुभा सांगणार असें बोलणें आहे. आम्हीं स्पष्ट सांगितलें जे " आमचा स्वारीचा ऐवज, कर्ज व लोकांचें देणें, व फौजेच्या दुसऱ्या नालबंदीचा ऐवज द्यावा. सुखरूप मामलतीची घालमेल करावी. यांत आमचें कांहीं जात नाहीं ! " येथील प्रकार कांहीं पत्रांत बारीक मोठा लिहितां येत नाहीं. आम्हीं मुंजीस निरोप मागतों, त्यास शिंदे येथें आहेत तों निरोप देत नाहीं असें नाना म्हणतात. मीं सांगितलें, "मजला रहावयासी गांठ पडत नाहीं. मुलास आठवें वरीस लागलेनंतर मुंज केली पाहिजे. माघमासीं जाईन. " असें बोलत आहों. घडेल तें प्रमाण. मुंजीच्या मुहूर्ताचा शोध—त्यास फाल्गुनमासीं मुहूर्त आहे परंतु लाभत नाहीं. बारावा चंद्र होतो. चैत्रमासीं उत्तम मुहूर्त आहे त्यास माघमासानंतर निरोप घ्यावा असें मनांत आहे. श्रीसत्तेनुरूप घडेल तें प्रमाण. छ० २५ जमादिलावल बुधवार बहुत काय लिहिणें लोभ कीजे हे आशीर्वाद. रा॥ हरीपंततात्यांचें पोट पहिलें फार दुखत होतें. देवास जाऊन आल्यापासून थोडें थोडें दुखतें. फार दुखत नाहीं. आतां बरे आहेत. दरबारास जात असतात. हे आशीर्वाद.

पै॥ छ० २ जमादिलाखर. माघमास सन सलास तिसैन.

नं. ३६२९. श्रीगणपति. ( चैत्र व० ८ श० १७१५ ४ एप्रिल सन १७९३. )

चि॥ रा॥ बाळासाहेब यांसीं आशीर्वाद उपरी—" नबाब निजामअलीखान डेरेदाखल जाहले, बेदरास येणार, फौजबंदीही होत आहे, असें इकडे वर्तमान आहे. तेथें वर्तमान असेलच, तर ल्याहावें "मोकासबाबेचे अंमल नबाबानीं कांहीं उठविले होते त्यांचें कसें जाहलें तें

ल्याहावें. शिंदे छावणीस हुजूरच राहणार किंवा हिंदुस्थानात जाणार ! डौल कसा जाहला आहे ? होळकर कोठें आहेत ? अद्यापि शिंद्यांचें व त्यांच्या सलुकाचें सरकारांतून कसें जाहलें ? अलीबहादर कोठें आहेत ? हें सविस्तर ल्याहावें " म्हणोन लिहिलें तें कळलें. शिंदे बहुत दिवस हिंदुस्थानांत होते. प्रस्तुत आले आहेत. आणखी वरीस दोन वरसें तरी राहतील असा डौल आहे. होळकरांचें त्यांचें अद्यापि नीट जाहलें नाहीं. बांकूनच आहेत. होळकर चमेलीच्या कांठीं आहेत. शिंद्यांच्या त्यांच्या फौजेस तीस चाळीस कोसांचें अंतर होतें. शिंद्यांकडील कांहीं फौज होळकरांच्या रोखें चालून गेली. ते आपल्या जागींच आहेत. होळकराजवळ पंधरा वीस हजार फौज व दहा पंधरा हजार पायदळ आहे असें आहे. शिंद्याची वीस हजार फौज, पायदळ वीस हजार, शेंदीडशें तोफा, याप्रमाणें सरंजाम आहे. कहीकबाडावर नित्य खटपट आहे. लढाई होणार असें बहुत बोलतात. काय घडतें पहावें. उभयतांचें नीट करून द्यावयाच्या विचारांत आहेत. राजश्री देवराव हिंगणे होळकराकडे रवाना जाहले. लौकरच नाशीकास घर आहे तेथें येथून गेल्यावर जाऊन मग पुढें जातील. त्यांतील मुद्दे होळकरानीं लाहोरची मसलत शिखांवर करावी, अथवा गुजराथची मसलत अमदाबादेपलीकडे गिरासी मुलुख जाहला आहे तो सोडवावयाची करावी, नाहीं तर देशीं हुजूर यावें, असें आहे. यांत हे जाऊन पोहोंचल्यावर काय ठरतें पहावें. यांचें समजावयासीं कनिष्ठ पक्ष चार सहा महिने तरी पाहिजेत असा प्रकार आहे. अलीबहाद्दर मेवाडाकडेच आहेत. विशेष नाहीं. श्रीइच्छेनुरूप घडेल तें प्रमाण. छ० २२ साबान. बहुत काय लिहिणें हे आशीर्वाद. नबाब बेदरास येणार असें येथें बोलतात परंतु अद्यापि निघाले नाहींत. छ० २७ साबानीं निघणार आहेत. हे आशीर्वाद.

पै॥ छ० २७ साबान. चैत्रमास. सन सलास तिसैन.

नं. ३६३०. श्रीगणपति. ( चैत्र व० १३ श० १७१५
८ एप्रिल सन १७९३. )

पै॥ छ० २९ साबान. गुरुवार. अधिक वैशाख मास. सन सलास तिसैन.

विज्ञापना. शिंदे यांची वांकडी नजर. त्यांनीं पूर्वेच्या यवनापासून बत्तीस लक्ष कारभारी यांस समजून रुपये खर्चास आणिले. प्रस्तुत यवन बेदरास येणार. त्यांचीं पत्रें आलीं होतीं जे, " श्रीमंतांचें लग्न दुसरें करावें. समारंभास आम्ही येणार. चालते जालों. " ते पक्षीं परस्परें संदेह वाढून परवांचे दिवशीं वडिलांस कारभारी यांणीं बोलावून नेलें आणि हीं सर्व वर्तमानें सांगोन बहुतच भय पावून "फौज जमा करावी. आपण सरंजामी फौज लौकर मिरजेस जमा करावी. आम्हीही फौज जमा करितों. " ( असें बोलले. ) "फौज जमा करितां शिंद्यांस कळेल. त्याणीं कशासाठीं फौज जमा करितां म्हणोन पुसिलें तर काय सांगाल ? " असें वडील म्हणाले. त्यावर त्यांणीं " गाइकवाडाचे रवानगीबद्दल करितों म्हणूच सांगूं " ऐसें सांगितलें. नंतर वडिलींही सांगितलें जे, शिंदे म्हणतील, " प्रस्तुत अखेरचे दिवस आले. फौज जमा होऊन चालती होऊन जाण्यास पर्जन्य आला. तेव्हां फौज न जमा करावी." अगर त्यांचे मनांत एक प्रकारेंच करणें, ( त्यास तुमचा ) तूर्तच बंदोबस्त केला तर पुढें कसें कराल? आणि हीं वर्तमानें तुम्ही श्रीमंत यजमान स्वामींस सांगितलींच असतील. त्यांचे विचारें कसें आहे ! " त्याणीं सांगितलें जे, " कांहीं घातलीं. त्यांचा विचार कांहीं समजला नाहीं; " म्हणोन सांगितलें. वडिलीं आपणाकडील फौज जमा करण्याचा मजकूर तर बहुतकरून जमा आहेन. विशेष जमा करावी तर फौजेंत आमची पत राहिली नाहीं म्हणोन स्पष्ट सांगितलें. याजप्रमाणें वर्तमानें आहेत. त्यांचा पर्याय जो होईल तो वरचेवर लिहितों. तूर्त वर्तमान वडील व मुख्य कारभारी बसून जालें तें मला

---

१ रामचंद्र परशुराम यांचे मिरजेस बाळासाहेबांस पत्र. २ तिसरें. ३ पेशव्यांस.

मात्र समजलें, म्हणोन विनंती लिहिली आहे. वडिलींही आपणांस कांहीं लिहिलेंच असेल. कारभारी याणीं बहुतच अवसानें टाकलीं आहेत. अशीं वर्तमानें असतां निरोप कसा होतो पहावें. व्रतबंध येथें तर करीत नाहींत असें आहे. जें बरें वाईट होणें तें बाजतबरसात होईल असें दिसतें. मग पहावें. चिरंजीव राजश्री बाबांसही वर्तमान कळवावें. हे विज्ञापना.

नं. ३६३१. श्रीगणपति. (चैत्र व. १३ श. १७१५
८ एप्रिल स. १७९३.)

चि॥ राजश्री बाबा यांसीं आशीर्वाद उपरी. राजकी सर्व लिहिलें आहे, परंतु शिंदे यांजकडील वर्तमान लिहिलें नाहीं. यांणीं मनांत आणिलें जे, एकटे राहणें ठीक नव्हे. तर आहे हे व जेदीद मिळून दहा हजार पायदळ व दहा हजार फौज असावी. याचा उद्योग होत आहे. त्यास दरमहा सहा लक्ष रुपये पाहिजेत, तर वानवळे सावकार याणीं बारमाहीचे बेजमीस बहात्तर लक्ष रुपये द्यावे. त्यांस हिंदुस्थानचे महालांवर आज वरात लिहून देतात असें ठरलें. पुढें शिंद्यांचे घरीं खाशांच्या तोंडांतून वल्गना अनेक प्रकारें निघतात याजमुळें सरकारचे कारभारी बहुतच भयावह जाले आहेत. वडिलांचे विचारें घरचा प्रकार, असे समय प्राप्त होतात, ते पक्षीं जवळ (केवळ) घोडे सामानानिशीं राहणें उचित नव्हे. कोण समय कसा आहे नकळे. (कारभारी) फौज जमा करा म्हणतात. हेंच निमित्त करावें, आणि निकाल काढावा. मला (वडिलानीं) काल आज्ञा केली जे, "पुढें ओढ काढली पाहिजे. चि॥ बापूस घेऊन अधिक शु॥ प्रतिपदेस चालते होणें. पंचमी इंदुवारीं चि॥ चिंतामणराव आपा निघतील. आम्ही व चि॥ दादा ऐसे सप्तमी बुधवारीं

१ परशुरामभाऊंनीं. २ तासगांवीं हरि परशुराम यांस. ४ पुण्याहून रामचंद्र परशुराम यांचें तासगांवास हरि परशुराम यांस पत्र. ४ नानांनीं. ५ हंगामी. 'भयाकुल' म्हणावयाचें तें 'भयावह' म्हटलें आहे. ७ घरगुती भांडण.

निरोप घेतों; असा बेत केला. स्पष्ट कारभारी यांस सांगून पाठविलें. " मीं उत्तर केलें जे, " नाना प्रकारचे उपप्लव बोलतात आणि मीं कसें जावें ? व आपणास तरी निरोप कसा होईल ? ते पक्षीं मी जात नाहीं. उभयतां चिरंजीवांस व सर्वांस आज्ञा व्हावी. जातील. " त्यास वडिलीं आज्ञा केली; तुम्हींच जावें. एक दोन दिवसांचें अंतर आहे. लांब नाहीं. निरोप होत नाहीं, व ध्वनी आहेत या खऱ्या आहेत, तर बोलावून घेऊं. ऐसें आहे. अद्याप तीन दिवस अवकाश आहे. कसें ठरेल तें लिहूं. परंतु वडिलांस निरोप कसा होतो न कळे ! हें पत्र ती॥ रा॥ बाळासाहेबांकडे जावें. कोणास दाखवूं नये. रवाना छ. २६ साबान बहुत काय लिहिणें. सारांश श्रीमंत दैववान् व कारभारी आदिकरून सर्वत्र एकनिष्ठ आहेत. यांत परिणाम ईश्वर लावील ! लोभ कीजे हे आशीर्वाद.

पै॥ छ० २९ साबान. सन सल्लास तिसैन. अधिक वैशाख.

नं. ३६३२. श्रीगणपति. ( चैत्र वद्य. श. १७१५ एप्रिल स. १७९३. )

चिरंजीव राजश्री बाळासाहेब यांसीं आशीर्वाद[2] उपरी. नबाब भागानगराहून निघणार म्हणून लिहिलें, त्यास—चार दिवस जाहले.— राजश्री नानानीं बोलावून नेऊन सांगितलें जे, " नबाब भागानगराहून निघाले. बेदरास येणार. श्रीमंत सौभाग्यवती रमाबाई देवाज्ञा पावली. नंतर ( श्रीमंतांच्या दुसऱ्या ) लग्नाचा निश्चय जाहला. नबाबांस वर्तमान कळलें. तेव्हां नबाबानीं नानांस पत्र पाठविलें जे, "श्रीमंतांचा पहिला विवाह जाहला तेव्हांच आम्हीं यावें. परंतु जाबीतजंग याचे मसलतीवर निर्मळेस गेलों त्याजमुळें येणें घडलें नाहीं. यास्तव हल्लीं प्राप्त जाहलें आहे, तरी आह्मी बेदरास येतों. तुम्हीं रावसाहेबांस घेऊन यावें. येथें आम्ही समारंभ करितों. " त्याचें उत्तर याणीं पाठविलें जे; "आमचे जातींत दुसरा विवाह करणें त्याचा फारसा समारंभ करावयाचा दस्तूर नाहीं. यास्तव आपल्यासही इतला केला नाहीं.

१ पुण्याहून आयत्या वेळीं बोलावणें येईल ती नड सोसूं. २ पत्र परशुरामभाऊंचें.

## श. १७१५ महादजी शिंद्यांचा पुण्यास मुक्काम. इ. स. १७९३

नं. ३६३३. श्रीगणपति. (अ. वै. शु. १ श. १७१५ ११ एप्रिल सन १७९३.)

पै॥ छ० २९ साबान. अधिक वैशाख मास. सन सलास तिसैन.

विज्ञापना. अलीकडे पत्रें येत नाहींत तर ऐसे नसावें. सदैव आशीर्वादपत्रीं सांभाळावें. इकडील वर्तमान चिरंजीव राजश्री रामचंद्रपंत बाबा याणीं चिरंजीवांस पत्र लिहिलें होतें त्याजवरून श्रुत जालेंच असेल. त्यापुढें मजकूर—दुसरे दिवशीं श्रीमंत राजश्री आत्यापंत जेजुरीहून वानवडीस आले. विदुर पुढें गेले. श्रीमंतानीं सामोरे जावें न जावें याचा विचार होऊन तूर्त न जावें ऐसें होऊन शिंद्यांचे गोटास घेऊन गेले. ते दिवशीं संकटचतुर्थीचें उपोषण होतें. वडील श्रीचिंतामणीचे दर्शनास थेऊरास जाणार होते. स्वारी तयार होऊन उपाहार करून प्रहर दिवसापूर्वी चालते व्हावें इतक्यांत मुख्य लेखकांचा निरोप आला जे, "परिछिन्न जाऊं नये. यांची नजर ठीक दिसत नाहीं. वडिलीं विसोपंतांबरोबर सांगून पाठविलें जे, "हें चखोट नव्हे. स्वारी तयार जाली. सायंकाळास देवदर्शन घेऊन येतों. न गेलों असतां लौकिक वाईट दिसेल." ऐसे दोन तीन वेळ निरोप जाले. शेवट न जावें ऐसें जाहलें. आणि गेले नाहीं. मी जाऊन दुसरे दिवशीं आलों. आतां ज्याणीं सचिवपंतांवर सरकार परवांनगी अशी गोष्ट केली त्यांची चौकशी होत आहे. चौकशी सरकार पागेंत बसून राजश्री सखारामपंत पानशे व सदाशिवभट दात्ये करीत आहेत. ज्यांजकडे अन्याय होता त्यांचें पारिपत्य करीत आहेत. त्या कारभारांत प्रमुख बाजीराव मोरेश्वर म्हणून आहेत त्यांस कर्णभूषणें जालीं. ताडणही जालें. पुढें कोणाकोणावर येत आहे तें पहावें! सारांश शिंद्यानीं जरब बसविली याजमुळें चौकशी जाली. शिंद्यांचें जरबेमुळें अनेक प्रकारें सरकारचे

---

१ रामचंद्र परशुराम यांचें बाळासाहेबांस पत्र. २ रामचंद्र श्रीधर उर्फ बाबा काळे. ३ हरि परशुराम यांस तासगांवास. ४ आत्या हें पंतसचिवांचे टोपणनांव. ५ महादजी शिंदे. ६ परशुरामभाऊ. ७ नानांचा. ८ शिंद्यांची. ९ वाडदेकर वकील. १० असें करण्यास सरकार परवानगी आहे असें सांगून. ११ कानास चाप लावले.

कारभारी यांचे मनांत अंदेशे येत आहेत. शिंदे कांहीं फौज जमा करितात म्हणे. पक्के कळलें म्हणजे सेवेशीं लिहितों. विदित होय हे विज्ञापना.

नं. ३६३४. श्रीगणराज. ( अधि. वैशा. शु० ६ श० १७१५ १६ एप्रिल सन १७९३. )

पै॥ छ० ९ रमजान. रविवार सन सलास तिसैन. अधिक वैशाख मास.

विज्ञापना. विशेष वर्तमान—नबाब सत्ताविसावे तारखेस डेरेदाखल जाहले. चवथे रमजानीं अथवा नववे रमजानीं बेदरास यावें हा निश्चय जाहला आहे. नबाब बाहेर निघाल्याचें वर्तमान आल्याउपर श्रीमंतानीं विदुरांकडे सांगून पाठविलें. उपरांतिक छ० ४ रमजानीं विदुर श्रीमंतांकडे आले. खलबत जालें. श्रीमंत राजश्री नाना व तात्या, आपाबळवंत, विदुर, आबा चिटणीस, येणेंप्रमाणें होते. बोलण्यांतील भाव श्रीमंतानीं विदुरास आज्ञा केली, " नबाब बाहेर निघाले, पुढें सल्लामसलत काय ? " तेव्हां विदुरानीं उत्तर केलें, " मी सेवेंत हल्लीं हजर आहे तोंपावेतों स्वामींनीं चिंता करूं नये. नबाब आलिया काय चिंता आहे ? तोतयाचाही प्रसंग असाच सरकारांत पडला होता. ते समयींही सेवक हजर होता. फौज नसतां फौज मिळवून सरकार चाकरींत कसूर न केलीं. हल्लींही नबाब बाहेर निघाले, काय चिंता ! स्वामींनीं काळजी करूं नये." याप्रमाणें बोलणें होऊन सूर्यास्तीं गेले. सरकारांत याप्रमाणें बोलणें जालें. परंतु विदुर देशीं आल्यापासोन नबाबाशीं हेंच संधान चालविलें आहे जे, " बेदर सरकार चौथाई तुम्हांस श्रीमंतांकडून देवितों. तुम्ही आमच्या लक्षांत असावें. " यांतील आशय येथील कारभारी यांस स्वस्थानीं बसवून दिल्लीस आपण कारभार केला तसा येथें श्रीमंतांपाशीं आपण करावा, ही गरमी आहे. या संधानावर ही नबाबाची मसलत उपस्थित केली आहे. काय घडतें पहावें. ( गुदरतां ) पट्टणावर राजश्री तात्या असतां

---

१ रघुनाथराव कुरुंदवाडकर यांचें पुण्याहून बाळासाहेबास पत्र. २ शिंद्यांकडे.

"मैनुद्दौलाचें बोलणें पडलें होतें जे, बेदर सरकार दिल्हें असतां आम्ही तुमच्या लक्षांत असों. त्यास तीन महिन्यांची मुदत होती. परस्पर निरोप पट्टणच्या मार्गाहोन जाल्यानंतर मुदतीस दिनमेकता लागली. यामुळें तें संधान पक्कें जाहलें. फौज व गाडदी वगैरे ठेवावे असे ( कारभारी यांचे) बेत होत आहेत. दक्षिलांची स्वारी निघोन मुंजीस्तव येणार होती. नबाब डेरेदाखल जाल्यामुळें मंदता जनवार्तेप्रमाणें दिसते. छ. ५ रमजानीं सरकारच्या तोफखान्यापैकीं टिपूकडील तोफा सतरा व शिवमोघ्यापैकीं दोन थोरल्या, येणेंप्रमाणें एकोणीस तोफा गुलटेंकडीजवळ नेऊन निशाण प्लें लावून पाहिलें. चार ज़ंबुरे होते त्यांचे जलदबार ही[1]......

नं. ३६३५. श्रीगणपति. ( अ० वै० शु० ६ श. १७१५ १६ एप्रिल सन १७९३. )

चिरंजीव राजश्री बळवंतराव यांसीं आशीर्वाद उपरी. छ० २७ साबानीं नबाब डेरेदाखल जाले. छ० ४ रमजानीं बेदरास येणार ऐसी वकिलांची बातमी. आणखी एक बातमी छ. ९ रमजानीं येणार. ऐशा दोन बातम्या आहेत. तेथें एक दुसरा मुक्काम होऊन चालते होणार ऐशी बातमी आहे. येथें फौज जमा करावयाचे तजविजेंत नाना आहेत. सरंजामी यांस फौज जमा करावयास सांगितली आहे, आम्हांसही सरंजामी फौज लौकर जमा करवावी म्हणोन सांगितलें. त्यास तुम्हांकडील फौज सरंजामी लौकर आणवावी. पुण्यांत लोक असतील ते व कांहीं सावनुरास रवाना जाहले असतील ते नजा जाऊन बाकीचे लौकर जमा करावे. नबाबाजवळ सरंजाम पंचवीस हजार तीस हजार फौज, व गाडद तीस हजार, त्यांत तीन चार पलटणें इंग्रजी चाकरीचीं आहेत, म्हणोन बातमी आहे. नबाबाचा मजकूर परवांचे पत्रीं लिहिलाच होता. हलीं निघाल्याची बातमी आली आहे. सविस्तर राजश्री येसाजी गोविंद यांजबरोबर सांगून

---

१. पत्र इतकेंच अपूर्ण मिळालें. २ पत्र परशुरामभाऊंचें.

पाठविलें आहे. तरी फौजेची तरतूद लौकर व्हावी. लटकी रड कामाची नाहीं. दोन महिने दिवस राहिले आहेत. रोजमुरे दिले म्हणजे जाहलें. राजश्री गोविंदपंत मामास लौकर आणविणें आणि पाठवून द्यावें. मी निरोप घेऊन मुंजीसाठीं यावें असें होतें, त्यास हें वर्तमान आलें आहे. याचें पुरतें समजे तोंवर निरोपही मागतां नये, असा प्रसंग पडला. हुजरातीची अद्यापि कांहीं तरतूद नाहीं. कारभारी विवंचना करीत आहेत. छ० ४ रमजान. बहुत काय लिहिणें लोभ कीजे हे आशीर्वाद.

पै॥ छ० ६ रमजान. अधिक वैशाख मास सन सलास तिसैन. गुरुवार चौथा तास रात्र.

नं. ३६३६. श्रीगणपति. ( अ० वै० शु. १० श. १७१५ ता. २० एप्रिल स. १७९३.)

चिं॥ राजश्री बाळासाहेब यांसीं आशीर्वाद उपरी. " नबाब भागानगराहून निघाले. डेरेदाखल जाहले. लौकरच बेदरास येणार म्हणोन पत्रें आलीं सरंजामी फौज जमा करावी. राजश्री गोविंदपंत मामा तिकडे गेले आहेत त्यांस आणवावें; " म्हणून लिहिलें होतें. त्यास अलीकडील मजकूर रा॥ महादजी शिंदे यांस वर्तमान सांगावें, पुढें मनसबा पुसावा, याअर्थें सरकारच्या वाड्यांत श्रीमंतांजवळ बोलाविले. खासा श्रीमंत व उभयतां कारभारी व रा॥ आपा बळवंत व शिंद्यांकडील खासा व आबा चिटणीस व त्यांचे बंधु कृष्णराव व रामजी पाटील असे बोलत बैसले. त्यांतील सारांश खुलासा-" नबाब निघाले हें चांगलें नाहीं. आम्ही जवळ असतां ते निघाले तर चिंता काय ? सरकारची फौज जमा करावी. आम्हीही फौज जमा करितों. नबाबास स्पष्ट पत्रें ल्याहावीं जे, येण्याचें करूं नये. तथापि ते येऊंच लागले तर मला आज्ञा व्हावी. मी पुढें होतों. आम्हीही ( नबाबास ) कागद लिहितों." अशीं निष्ठेचींच बोलणीं ( शिंदे यांचीं ) जाहलीं.

---

१ पत्र परशुरामभाऊंचें. २ नाना व हरिपंत.

त्यांत कांहीं दिकतीचा प्रकार नाहीं. त्याजवर परवां रा॥ हरीपंत-तात्यांस राजश्री नानांनीं शिंद्यांचे डेऱ्यास पाठविलें होतें. बोलणें निखालस जाहलें. कोणेविशीं दिकत नाहीं असे होऊन माघारे आले. तात्यांस ( शिंद्यानीं ) दोन चार जिनसांचे पोषाख दिले. समाधानें-करून माघारे आले. सारांश कांहीं लढा नाहीं असें जाहलें. भागा-नगरचीं बातमीचीं पत्रें आलीं त्यांत छ० ४ रमजानपावेतों कूच होत नाहीं. पुढें ठरेल तें मागाहून लिहून पाठवूं. तेंही दोन चार दिव-सांत कळेल. येथूनही पत्रें ( नबाबानीं ) येऊं नये अशीं गेलीं आहेत ते पक्षीं भागानगराहून कूच करणार नाहींत असेंच वाटतें. कदाचित् केलें तरी बेदरापावेतों आल्यास फार आहे. असा प्रकार आहे. यास्तव तूर्त रा॥ गोविंदपंत मामांस आणवूं नये. गेले आहेत तसे जाऊं द्यावे. फौज मात्र जमा करावी. आम्हीं मुंजीस यावें म्हणतों. ते[1] निरोप देत नाहीं म्हणतात. कामाचा तरी कांहीं जाब-साल नाहीं. उठोन यावें तरी लौकिक एक प्रकारचा. वोढकें[2] म्हणवून घ्यावें असा प्रसंग पडला आहे. एक विचार चि॥ त्रिवर्गास ठेवून यावें असाही एक विचार आहे. खटखट करीत आहें. ऋणानुबंधेंकरून घडेल तें खरें. छ० ८ रमजान बहुत काय लिहिणें. सरदेसकत व नाडगौडी बेमीकट्टें येथील ऐवजीं हुंड्या पाठविल्या त्या पावल्या. मी येण्याविशीं बहुत खटपट करीत आहें. घडेल तें प्रमाण ! लोभ कीजे हे आशीर्वाद.

पै॥ छ० १२ रमजान. अधिक वैशाख मास. सन सलास तिसैन. बुधवार. दोन तास रात्र आवशीची.

तालीक.

नं. ३६३७. श्रीगणराज ( वैशाख व. ३० श. १७१५
८ जून स. १७९३. )

यादी. व्यंकटनरसा कलावंत यांचे दरमहांचा ठराव—स्वारी पुण्यांत आहे तों दरमहां दीडशे रुपये द्यावे. कलावंत मजकूर कुरुंद-

---

१ नाना. २ द्वाड, आमदी.

वाड व मैंदरगीस आली असतां दरमहां अडीचशें रुपये द्यावे. पुण्यास जावयास निरोप घेईल त्या समयीं पुण्यास पोहोंचावून द्यावी. सरकारांतून कृपा करून इनाम पावेल तें घ्यावें. दरमहां स्वारी पुण्यांत आहे तों चार नाच करावे. सु॥ आर्बा तिसैन मय्या व अल्लफ. येणेंप्रमाणें करार.

पै॥ छ० २९ सवाल. वैशाख मास.

नं. ३६३८. श्रीगणराज. ( वैशाख व. १३ श. १७१५ ६ जून स. १७९३. )

शिक्का. तालीक.

राजश्री रघुनाथराव नीलकंठ तहां व्यंकट नरसी कलावंत पुणेंकर सु॥ आर्बा तिसैन मय्या व अल्लफ. तुला दरमहां करार करून कुरुंदवाड व मैंदरगीस यावयाचा करार केला आहे. तर तूं चार महिने येऊन राहून जावें. तुला दरमहा आल्या दिवसांचा देऊन तुला पुण्यास पावती करून देऊं. तुला कोणे गोष्टीची आम्हांकडून तोसीस लागणार नाहीं. खातरजमेनें येऊन जावें. जाणिजे. छ० २६ माहे सवाल. मोर्तब.

---

१ यादीची नक्कल पुण्याहून आली तिच्या पैवस्तीची तारीख. या यादीची व पुढच्या नंबरच्या करारनाम्याची नक्कल मिरजेस येण्याचें कारण असें झालें कीं, पटवर्धनांचे पुण्यांतले कारकून व्यंकट नरसीकडे जात येत असतात व त्यांजकडून तिला कांहीं पैका पावला अशी मिरजेस बाळासाहेबांस बातमी कळली. त्यांचा पुतण्या चिंतामणराव आपा त्यांशीं नीट वागेनासा झाला होता व त्याला गाणें ऐकण्याचा फार नाद होता. त्यामुळें सदरहू कारकुनानीं आपास कलावंतिणींचा नाद लावला अशी बाळासाहेबांस शंका येऊन त्यांची त्यांवर इतराजी झाली. तिच्या निराकरणार्थ कारकुनानीं या नकला पाठविल्या.

१ पटवर्धन कुरुंदवाडकर.

नं. ३६३९. श्री. ( आषाढ व० ८ श० १७१६

२० जुलई स० १७९४.)

पै॥ छ० २२ जिल्हेज. रविवार सन खमस तिसैन. आषाढ.

विज्ञापना. नबाबाकडील दिवाण मौनतदौला याणें श्रीमंत राजश्री नानांवर मारेकरी घातले. बेदराहून रवाना जाले. पुण्यास येऊन पोहोंचले. याप्रमाणें नानांची बातमी पक्की आली. आम्हांजवळ वर्तमान सांगितलें असतां स्वामींस कळेल यास्तव सांगतों म्हणोन नाना बोलले. मीं विनंति केली, याप्रमाणें पक्की बातमी पुण्यास आल्याची लागली असल्यास मग आळस करूं नये. त्यांस धरावें. तेव्हां उत्तर जालें, " पक्केपणें मुद्यावरी धरले पाहिजेत. त्याच शोधांत आहों. मौनतदौला बरायखुद्द बंदेगानअली यांचा दिवाण. दौलतवंत. त्याणें मनसब्यानें अथवा फौजा ठेऊन आपल्या मनांत असेल तें करून दाखवावें. तें सोडून पाजीपणा करणें ही चाल थोरपणास चांगली नाहीं. असो. आम्हांस दगा फटका केला असतां श्रीमंतांची दौलत त्याचे हातीं लागत्ये असा अर्थ नाहीं." मीं विनंती केली. "तुर्कांची चालच! पेंकरून दौलत साधल्यास करावी. " याअन्वयें एकांतीं बोलणें जाहलें. स्वामींस कळावें या अर्थी लिहिलें आहे. हा मजकूर चित्तांतच असावा. नानाचे व मौनतदौला यांचें आंतून फारच वांकडें आलें आहे त्याचा विस्तार पत्रीं काय ल्याहावा! नानाच्या बोलण्यांत आल्या गोष्टी स्वामींस सविस्तर कळावें म्हणोन लिहिलें आहे. श्रुत होय हे विज्ञापना.

नं. ३६४०. श्रीगणपति ( श्रावण शु० १३ श० १७१६

९ आगस्ट स. १७९४. )

चिं॥ राजश्री बळवंतराव यांसीं प्रती परशुराम रामचंद्र आशीर्वाद उपरी. येथील कुशल ता. छ० १२ मोहरम पावेतों यथास्थित असे. विशेष. आपण पत्र पाठविलें तें पावलें. अननस एक पाठविला तो पावला. चिरंजीव राजश्री त्रिंबकराव आपा याचें पत्र आपणांस

---

१ विठ्ठाजी नारायण वाडदेकर वकील यांचें बाळासाहेबांस पत्र. २ तुम्हांस.

( ४७६६ )

## उर्वरित पत्रें.

आलेलें पहावयास पाठविलें तें पाहून माघारें पाठविलें आहे. गाजु-द्दीनखान याच्या नातवाचे भेटीचा मजकूर लिहिला, त्यास ते नबाबा-जवळ होते. पुण्यांत असतात. इकडे आल्याची गोष्ट ऐकण्यांत नाहीं. त्यांची वळखदेख कोणास विना दाखला खातरजमेचा पुरल्याशिवाय सन्मानेंकरून भेट घेणें हें ठीक नाहीं. ते आपल्या आपण वाड्यांत आल्यास कोण येत नाहीं ? समागमें सरंजाम काय काय आहे ? शान कशी दिसते ? खराच कारभार असल्यास इतमाम छपणार नाहीं. केवळ सांगण्यावरूनच मुदारत फलाण्याचा नातू म्हणोन करावयाची नाहीं. खूण पक्की पुरल्यास चिंता नाहीं. श्रीकृष्णेस पाण्याचा चढाव आहे म्हणोन लिहिलें तें कळलें. बहुत काय लिहिणें हे आशीर्वाद पै॥ छ. १२ मोहरम. सन खमस तिसैन. श्रावण.

१ गाजुद्दीन हा निजाम उल्मुल्क याचा थोरला मुलगा. त्याचा नातू मिरजेस कशाला आला होता न कळे !

# सवाई रावसाहेबांचा मृत्यु.

## आक्टोबर १७९५ ते फेब्रुवारी १७९६.

मागील प्रकरणांत वर्णिल्याप्रमाणें खर्ड्याची स्वारी संपवून पेशवे पुण्यास आल्यानंतर परशुरामभाऊंस तासगांवास परत जाण्याविषयीं निरोप झाला. त्या प्रसंगीं त्या स्वारींत चांगली कामगिरी केल्याबद्दल नारायणराव गंगाधर पटवर्धन मिरजकर यांस श्रीमंतानीं पालखी दिली व बाकीच्या पटवर्धन मंडळीसही जवाहीर वस्त्रें वगैरे देऊन त्यांचा बहुमान केला. सप्टेंबर महिन्यांत दौलतराव शिंदे यांस निरोप होऊन हिंदुस्थानांत जाण्याकरितां ते जांबगांवास निघून गेले. रघोजी भोंसले आणखी कांहीं दिवस पुण्यांत राहिले होते त्यांसही आक्टोबर महिना अर्धा होऊन गेल्यावर श्रीमंतानीं अत्यंत गौरवपूर्वक निरोप देऊन बिदा केलें. नर्मदेच्या उत्तरतीरचा कांहीं नवीन मुलूख भोंसल्यास द्यावयाचा करार होता त्याच्या सनदा याच प्रसंगीं श्रीमंतानीं त्यांस दिल्या. राहतां तुकोजी होळकर मात्र पुण्यांत अद्यापि राहिले होते.

सन १७७४ पासून आज २१।२२ वर्षे नाना फडनवीस यानीं पेशवाईचा राज्यकारभार चालविला. या अवधींत अनेक वेळां त्यांच्या जिवावरचे प्रसंग येऊन गेले. वेळोवेळीं भयंकर फितूर होऊन राज्यांत अंतःक्षोभही अनेक प्रसंगीं झाला. इंग्रज व टिपू यांशीं अनेक वर्षे युद्ध चालवावें लागलें. राजकारणाच्या उद्देशानें शत्रूससुद्धां मुलूख द्यावा लागला व शत्रूनीं कांहीं जबरदस्तीनेंही घेतला. अखेर अखेर मोंगलांशीं बिघाड उत्पन्न होऊन पुनः कित्येक वर्षे युद्धाची घनचक्कर सुरू होते कीं काय अशी भीति उत्पन्न झाली. परंतु केवळ आपल्या अकलेच्या जोरावर वरील सर्व संकटांचें निरसन करून पेशवाई-राज्य नानानीं आजपर्यंत निभावलें इतकेंच नाहीं, तर कालमानाप्रमाणें तें राज्य ऊर्जितावस्थेला आणलें असेंच म्हटलें पाहिजे. नारायण-राव पेशव्यांच्या मरणाच्या वेळीं जितका मुलूख पेशवाई-अमलाखालीं

होता तितकाच मुलूख हल्लीं सुद्धां पुन्हा सवाईराव रावसाहेब यांच्या अमलाखालीं आला होता. त्यावेळीं शिंदे, होळकर, भोंसले, गायकवाड वगैरे राज्यांतले सर्व सरदार जसे तत्कालीन पेशव्यांचे आज्ञानुसारी होते तसेच याही वेळीं झाले होते. शिवाय इंग्रज, टिपू वगैरे परकीय राजांशींही तहनामे होऊन परस्परांच्या राजकीय वर्तनाच्या मर्यादा ठरून गेल्या होत्या. इतकें सर्व सिद्ध झाल्यावर पेशवाईच्या पदाची भरभराट व्हावयाची ती आणखी कोणची राहिली होती ? आणि हें इतकें सारें नाना फडनवीस यांनीं घडवून आणिलें हें मनांत आलें म्हणजे त्यांच्या कर्तृत्वाची कीर्ति महाराष्ट्राच्या इतिहासांत खरोखरच चिर स्थाई होण्याच्या योग्यतेची आहे ही खात्री होते.

कालदशेनें कोणासही सोडिलें नाहीं! ती नाना फडनवीस झाले म्हणून त्यांना तरी कोठून सोडणार ? आजपर्यंत नाना जें जें म्हणत गेले तें तें सिद्ध होत गेलें. परंतु आतां यापुढें त्यांच्या वैभवास उतरती कळा लागली. तशाही स्थितींत राज्यरक्षणाकरितां आपल्या कर्तबगारीस साजेल असेंच वर्तन त्यांनीं केलें कीं नाहीं हें आतां इतिहासभक्तांस पहावयाचें आहे; व तें दाखविण्याकरितांच ऐतिहासिक-लेख-संग्रहाचा जो अवशेष राहिला आहे त्यापैकीं बऱ्याच अंशाचा विनियोग करण्यांत येईल.

यासंबंधें व कालक्रमाच्या ओघानें वर्णावयाची गोष्ट इतिहासकाराच्या डोळ्यांपुढें प्रथम उभी राहते ती बाजीरावसाहेबांच्या फितुरासंबंधाची होय. थोरले बाजीरावांच्या वेळीं त्यांचे कारभारी चिमाजी आप्पा होते. नानासाहेबांचे कारभारी भाऊसाहेब होते. माधवरावांचे कारभारी नारायणराव होते. या परंपरेप्रमाणें सवाई रावसाहेब यांच्या दौलतीचा कारभार करण्याचा हक्क बाजीराव साहेब यांचा होता. सवाई रावसाहेब यांच्या वयास २१ वर्षें होऊन गेलीं होतीं व त्यांपेक्षां बाजीरावसाहेब चारसहा महिन्यांनीं लहान होते. आजपर्यंत अडचणीच्या वेळीं नानानीं कारभार केला, चांगलें केलें; पण आतां बाजीरावसाहेब वयांत आले आहेत त्या अर्थीं त्यांच्या हातीं कारभार

सोंपवून सवाई रावसाहेबांची व त्यांची गांठ घालून देऊन नानांनीं आपली फडनिशी संभाळून स्वस्थ कां राहूं नये ? कारभाराची उठाठेव त्यांनीं आतां कशाला करावी ? असंतुष्ट व महत्वाकांक्षी लोकांच्या मनांत हा प्रश्न घोळत होता. रिकामटेकड्या खुशालचंद लोकांच्या गप्पांत हाच विषय वारंवार येत होता. राज्यांतले मोठे सरदार व जबाबदारीचीं कामें अंगावर घेऊन केलेले पक्क बुद्धीचे मुत्सद्दी यांच्या मनाला हा विचार शिवत सुद्धां नव्हता हें खरें, पण कारभाराची नवी कारकीर्द सुरू झाली म्हणजे आपणास कांहीं लाभ करून घेतां येईल, नवीन खटलीं उपस्थित करून पोट भरावयास व चंगळ करावयास सांपडेल, अशीच आशा करणारे समाजांत पुष्कळ असतात. नानाच्या निंदकांपैकीं हा सामान्य लोकांचा वर्ग झाला. दुसरा वर्ग राघोबा-दादांच्या प्राचीन अनुयायांचा. या वर्गांतल्या लोकांस बाजीरावाचा उत्कर्ष डोळ्यानीं पहाणें हें साहजिकच प्रिय होतें.

पौर्णिमेच्या दिवशीं चंद्र पूर्णावस्थेला पावला म्हणजेच त्यास ग्रहण लागत असतें. त्याच नियमास अनुसरून नानांचा पूर्ण उत्कर्ष झालेला पहातांच त्यांच्या महत्वाचा र्‍हास व्हावा म्हणून वर सांगितलेले त्यांचे दोन्ही वर्गांतले प्रतिपक्षी चोहोंकडे त्यांविरुद्ध गवगवा करूं लागले यांत आश्चर्य नाहीं ! नानांची निष्कारण निंदा आणि बाजीरावांची थोरवी या दोन गोष्टींचा फैलावा त्यांनीं सुरू केला. असला प्रकार यापूर्वी अनेक वेळां झाला होता इतकेंच नाहीं, तर आनंदीबाई जिवंत असतां तिच्या प्रोत्साहनावरून ही मंडळी याहीपलीकडे एकदां गेली होती, व त्यानीं सवाई रावसाहे-बांस गादीवरून काढून त्यांच्या जागीं बाजीरावाची स्थापना करण्याचा व्यूह रचिला होता ! नानांच्या दक्षतेमुळें या निंदकांचें त्या वेळीं कांहीं चाललें नाहीं, पण या खेपेस त्यांचा उद्योग कांहीं अंशीं सफळ झाला खरा !

हल्लींच्या प्रसंगीं कधींही न घडून येणारी एक गोष्ट घडून आली. ती गोष्ट ही कीं, बाजीरावसाहेबांच्या अनेक सद्गुणांविषयींची

तारीफ सवाई रावसाहेबांच्या कानांवर गेली असतां ती त्यांस रुचली इतकेंच नाहीं, तर अशा स्वकुलोत्पन्न सद्गुणसमुच्चयालंकृत पुरुषपुंगवाचा आपणास नेहमीं सहवास घडावा अशी त्या पेशव्यांस इच्छा उत्पन्न झाली ! मानवी अंतःकरण हें सृष्टींतलें फारच विलक्षण कोडें आहे व याची लीला अगम्य आहे असें म्हणत असतात, त्याचें हें ठळक उदाहरण होय ! गर्भवासापासून आपलें रक्षण करून नानानीं आपलें राज्य उजगारीला कसें आणिलें याची जाणीव सवाई रावसाहेबांस पूर्ण होती. ज्यानें आपल्या बापाचा खून केला त्याचा मुलगा बाजीराव किती गुणवान् असला तरी त्यास दूर बंदोबस्तांत ठेवणें हेंच सर्वथा उचित आहे; बाजीरावांच्या हातीं कारभार देणें म्हणजे नानाशीं कृतघ्न होऊन त्यानीं केलेल्या सर्व गोष्टींस हरताळ फांसणें व राज्यांत नवीन अनर्थांची परंपरा उत्पन्न करणें होय, या गोष्टी त्या पेशव्यांस समजत नव्हत्या असें वाटत नाहीं; इतकें असून बाजीरावांविषयीं त्यांचें मन स्निग्ध व दयार्द्र कां व्हावें याचा उलगडा करितां येणें अशक्य आहे !

बाजीरावसाहेबांचा स्वभाव फार उपद्यापी होता. सवाई रावसाहेबांचा ग्रह आपणाविषयीं फार अनुकूल असल्याचें त्यांच्या कानीं येतांच त्यांच्या बंदोबस्ताकरितां बळवंतराव नागनाथ वामोरीकर नांवाचा सरदार नानानीं नेमला होता त्यास त्यानीं प्रथम अनुकूल करून घेतलें व त्याच्या द्वारें सवाई रावसाहेबांशीं गुप्तरूपें पत्रव्यवहार सुरू केला. इकडून तिकडे व तिकडून इकडे एक दोन चिठ्या-चपाट्या गेल्या आल्या असतील नसतील तोंच ती गोष्ट नानांच्या कानांवर गेली. त्यानीं तत्काळ बळवंतराव यास पकडून कैदेंत ठेविलें व या मूर्खपणाच्या कृत्याबद्दल पेशव्यांचा फार निषेध केला. आणि असा फितूर पुन्हां होऊं नये म्हणून बाजीरावसाहेबांसंबंधानें जितका बंदोबस्त करतां येणें शक्य होतें तेवढा त्यानीं केला. आपण मालक असतां बाजीरावांच्या बाबतींत नानानीं आपणास स्वच्छंदानें वागूं दिलें नाहीं, ही गोष्ट श्रीमंतांच्या

मनांस फारच झोंबली; त्यामुळेंच त्यांस दुखणें आलें; असा लोकप्रवाद आहे.

निम्मा आक्टोबर होई तों म्हणजे आश्विन महिन्यास सुरुवात होई तों रघोजी भोंसले पुण्यास होते व त्या सुमारास ते पुण्याहून नागपुरास गेले हें मागें सांगितलेंच आहे. तेथपर्यंत श्रीमंतांच्या प्रकृतीस उत्तम प्रकारचें स्वास्थ्य असून सर्व गोष्टी यथास्थित चालल्या होत्या. नवरात्रांत श्रीमंतांस ज्वर येऊं लागला व त्या ज्वरांत कांहीं वातविकृति उत्पन्न झाली. वाताच्या लहरींत त्यांच्या हातून भलतेंच कांहीं न घडावें म्हणून रात्रंदिवस त्यांभोंवतीं पहारा असे. दसऱ्याचे दिवशीं शिलंगणास ते गेले होते तथापि त्यांची प्रकृति बिघडलेलीच होती. आश्विन शु० १२ ( २५ आक्टोबर ) रोजीं सकाळच्या प्रहरीं श्रीमंत शनवारवाड्यांत गणपतीच्या दिवाणखान्यांत एकटेच बसले होते. त्यांभोवतीं रात्रंदिवस माणसांचा घोळका रहात असतां त्या वेळीं दैववशात् तेथें एकही माणूस नव्हतें ! तशा स्थितींत श्रीमंतांस वायूचा झटका आला व त्या भरांत दिवाणखान्याच्या पूर्वेच्या अंगचें कवाड उघडून त्यांनीं खालीं उडी टाकली. खालीं हौद होता त्यांतील कारंजावर त्यांची उडी पडल्यामुळें मांडीस व इतर ठिकाणीं जबर दुखापत झाली. तशा स्थितींत ते दोन दिवसपर्यंत होते. त्यांच्या इजेवर पुष्कळ उपचार झाले परंतु त्यांचा कांहीं उपयोग झाला नाहीं. चतुर्दशीच्या दिवशीं सायंकाळीं त्यांचें प्राणोत्क्रमण झालें.

यासंबंधें या प्रकरणांतल्या पत्रांत उल्लेख आले आहेत ते—

" श्रीमंत रा॥ रावसाहेब यांजला शरीरीं समाधान नव्हतें. औषधी उपाय चालत होते. चित्ताची स्थिरता अलीकडे नव्हती. आश्विन शु॥ १२ रविवारीं दोन तीन घटका दिवस सुमारें श्रीगणपतीचे दिवाणखान्यावर माडीवर राव निजत होते तेथून पूर्वेच्या अंगचें कवाड उघडून खालीं उडी टाकिली. खालीं कारंजाचा हौद होता त्यांत पडले. दांतांस व हातास व गालास व पाय इतकें लागलें.

परंतु पाय भारी दुखावला. आंतील हाड मांडीजवळ मोडलें. कांबी लावून बांधिलें. फार पायाचें दुःख आहे. "

" कैलासवासी रावसाहेब आश्विन शु॥ १४ मंगळवारीं गजराचे वेळेस देवाज्ञा जाहले. चौकी पहारे बंदोबस्त पत्रीं काय लिहूं ? ...दुकानें बंद. रस्त्यांतून कार्याकारण मनुष्य फिरतें. "

परशुरामभाऊंच्या एका पत्रांत पुढील मजकूर आहे:—

" श्रीमंत आमरणांत बोलत होते. बोलून चालून राजश्री नानांस सांगितलें. ' आमची वेळ जवळ आली. आम्हांस राज्याची इच्छा नाहीं. तुम्ही आमचे नांवाचा दुसरा करणें. आपण सूर्यमंडळ भेद करून जातों. ' अशीं अनेक प्रकारचीं अन्यांजवळ भाषणें केलीं. ते समयीं कोणास खरीं वाटलीं नाहींत. आतां सर्वांस वाटतें. असो. त्यानीं आपला अवतार समाप्त केला. आतां पुढें हे विवंचना करितात !"

शिवाय दुसऱ्या एका पत्रांत:—

" श्रीमंतानीं माडीवरून पडावयाचे पूर्वी भाषण कोणाकोणाजवळ केलें तें, व माडीवरून पडल्यानंतर बोलिले तें कोणी कोणी येऊन सांगितलें तें अलाहिदा कलमवार लिहिलें आहे. त्यावरून कळेल.......गोष्ट चमत्कारिक आहे. कृष्णावतारसमाप्तीसारखें केलें ! परम आश्चर्य आहे ! "

एका कारकुनाच्या पत्रांत पुढील मजकूर आहे:—

" श्रीमंतानीं आपला काल समीप आला असें जाणून श्रीमंत बाईसाहेबांस कांहीं गोष्टी सांगितल्या व आणखी कित्येकांजवळ कित्येक भाषणें जाहलीं त्याची बखर ( तयार ) होत आहे....... किती लिहिलें असतां गोष्टी संपावयाच्या नाहींत ! "

वरच्या उताऱ्यांत जिचा उल्लेख आला आहे ती बखर मळा संस्थानाच्या दप्तरांत आम्हीं पुष्कळ धुंडाळली, परंतु ती आम्हांस मिळाली नाहीं. तथापि वर जे उतारे दिले आहेत व आजपर्यंत अन्यत्र जे लेख प्रसिद्ध झाले आहेत त्यांवरून पहातां या बाबतींत डफ्

साहेबांचें लिहिणें कांहीं अंशीं गैरसमजूत उत्पन्न करण्यासारखें आहे. असें दिसून येतें. कोठें फितूर अगर दगाफटका होईल या भयानें संशयाच्या जागीं नाना वाजवीपेक्षां अधिक कडक बंदोबस्त करीत असें डफसाहेब लिहितात. परंतु बारभाईच्या कारस्थानापासून नानांस पदोपदीं कसे फितूर आढळून आले व त्यामुळें केवढीं संकटें ओढवलीं हें ऐतिहासिक-लेख-संग्रहाच्या वाचकांस नवीन सांगावयास नको. राजकीय परिस्थिति जर इतकी बिघडलेली होती हें सिद्ध आहे तर कडक बंदोबस्ताबद्दल नानांस दोष कसा देतां येईल? बाजीरावसाहेब वगैरे मंडळी शिदनेरीवर कैदेंत ठेविली गेली होती त्यांस खडर्च्याची स्वारी आटोपल्यावर सुद्धां पूर्वीइतकी मोकळीक दिली गेली नाहीं, व सवाई रावसाहेबांशीं पत्रव्यवहार केल्याबद्दल नानानीं त्यांवर सक्तीचा बंदोबस्त ठेविला हें डफ्साहेबांचें लिहिणें वस्तुस्थितीस सोडून आहे. आधीं मुळीं बाजीरावसाहेब यांस शिवनेरी किल्यावर कैदेंत ठेविलें या वाक्याचा अर्थ किल्यावरच्या कैदखान्यांत त्यांस ठेविलें होतें असा नाहीं. त्यांचा मुक्काम शिवनेरीस नसून जुन्नरास होता. शत्रूची फौज जवळपास आली तर मात्र त्यानीं किल्यावर जावयाचें होतें. कैदी शब्दाचा अर्थ फौजदारी किंवा दिवाणी खात्याचा कैदी, अगर फार झालें तर राजकीय कैदी, असा अर्थ आपले ध्यानांत येतो. पण बाजीरावसाहेब व त्यांचे बंधु यांच्या बाबतींत हा अर्थ मुळींच लागू नाहीं. ते जुन्नरास होते ते हत्ती, घोडे, पालख्या, स्वार, शिपाई, दासदासी वगैरे शागिर्दपेशा, अशा सरंजामानिशीं होते; नानानीं त्यांच्या राजकीय वैभवांत कांहीं कमतरता ठेविली नव्हती; हें पुढच्या प्रकरणांतल्या पत्रांवरून दिसून येईल. नानानीं त्यांस नजरबंदींत ठेविलें होतें व तितका बंदोबस्त अवश्यकच होता.

अधिकाराचा हांवरेपणा नानानीं धरिल्यामुळें सवाई माधवरावांचा मृत्यु घडून आला, व नानानीं बाजीरावप्रकरणीं केलेली कानउघाडणी सवाई रावसाहेबांच्या जिवास झोंबल्यामुळें त्यानीं त्रासून प्राण दिला, असा डफ्साहेबांच्या लिहिण्यांतील अभिप्राय आहे त्यांत

तथ्यांश दिसत नाहीं. पटवर्धनांच्या दौलतींतील माणसें प्रसंग साधल्यास नानांची आंतून आंतून कुचेष्टा करणारीं होतीं. त्यांच्या पत्रांतून अगर परशुरामभाऊ वगैरेच्या लिहिण्यांतून या बाबतींत अवाक्षरही निघालेलें नाहीं. सवाई रावसाहेबानीं मरणसमयीं बाजीरावसाहेबांस गादीचे धनी करावें म्हणून बाबा फडक्यांस सांगितल्याचें डफ्साहेब लिहितात तें कोणत्या आधारावरून हें समजत नाहीं. पटवर्धनांच्या लिहिण्यांत तर याबद्दल मुळींच उल्लेख नाहीं. असो.

सवाई रावसाहेब वारल्यामुळें नानाफडनवीस ह्यांचे आजपर्यंतचे सर्व श्रम मातीच्या मोलाचे होऊन पुढें कसें वागावें ही त्यांस मोठी पंचाईत येऊन पडली. गादीचा वारसा रघुनाथराव दादासाहेबांच्या मुलांकडे वाजवी रीतीनें येत होता तथापि त्यांपैकीं कोणास गादीवर बसवावें तर मागच्या गोष्टींमुळें सरदार व मुत्सद्दी यांशीं त्यांचें बनणार नाहीं हें उघडच दिसत होतें. सवाई रावसाहेब यांचें कुटुंब यशोदाबाई यांच्या मांडीवर गोत्रजांपैकीं कोणी दत्तक देऊन त्यास गादीचा धनी करावें असा विचार नानांच्या मनांत आला. पण सरदार लोकांची या कामीं संमति घेतल्याखेरीज ही गोष्ट त्यांस करितां येईना. सबब पेशवे मरण पावल्याबरोबर पुढें काय करावयाचें हें ठरविण्याकरितां शिंदे, होळकर, भोंसले, पटवर्धन, रास्ते, वगैरे सरदारांस त्वरेनें पुण्यास येण्याविषयीं त्यांनीं पत्रें पाठविलीं. पेशव्यांच्या सुतकांतच परशुरामभाऊ पुण्यास दाखल झाले. होळकर पुण्याच्या आसपास होतेच. भोंसले यानीं आपला वकील पाठविला. शिंद्यांचा मुक्काम अद्यापि जांबगांवासच होता. त्यानीं आपले कारभारी बाळोबा तात्या पागनीस व जिउबा दादा बक्षी यांस पुण्यास पाठविलें.

नंतर या सर्व प्रमुख लोकांचें कौन्सिल भरून पुष्कळ भवति न भवति झाली. व शेवटीं बाजीराव साहेब व त्यांचे बंधु यांस गादीचे धनी न करितां यशोदाबाईस गोत्रजांपैकीं मुलगा दत्तक देऊन त्याच्या नांवें राज्याचा कारभार चालवावा हा नानांचा विचारच सर्वांच्या पसंतीस उतरला. व याप्रमाणेंच करावें अशा अभिप्रायाचीं यशोदाबाईच्या

नांवचीं पत्रें सर्व सरदारांनीं लिहून दिलीं. नानानीं या प्रकरणीं निजामअलीस सल्ला विचारिला होता त्यांचेंही मत दत्तक घेऊन राज्य चालवावें असेंच पडलें. नंतर नानाफडनवीस प्रथम भटांच्या घराण्यापैकीं व तसा न मिळेल तर गोत्रजांपैकीं दत्तक घेण्यास योग्य अशा मुलाची निवड करण्याच्या उद्योगास लागले.

पण यशोदाबाईच्या मांडीवर दत्तक देऊन त्याच्या नांवें राज्यकारभार चालविण्याची नानांची मसलत पुण्यांतील लोकांस अगदीं नापसंत होती. पुण्याबाहेर राहणाऱ्या व राज्यांतील प्रमुख लोकांस सुद्धां ती फारशी आवडत नव्हती. सरदार लोकांनीं नानांच्या भिडेमुळें त्यांनीं सांगितल्याप्रमाणें पत्रें लिहून दिलीं हें खरें, पण औरसांचा वाजवी हक्क बुडवून कुठला तरी दत्तक आणून त्याला गादीचा धनी करणें हें ठीक नाहीं असेंच ज्याला त्याला वाटत होतें. पटवर्धन, रास्ते व खुद्द नाना हे कैलासवासी दादासाहेबांचे पक्के द्वेषी असल्यामुळें त्यांना स्वतःच्या सुरक्षितपणासाठीं दत्तकाचीच उभारणी करण्याविषयीं खटपट करणें प्राप्त होतें; पण बाकीच्या लोकांचें त्यांस या कामांत मनापासून पाठबळ मिळण्याचा संभव जितक्यास तितकाच होता. तात्पर्य, मागें नानानीं बारभाईचें कारस्थान केलें त्यावेळीं लोकमताचा दुजोरा व साथीदारांमधला उत्साह व ऐकमत्य होतें तें या वेळीं नसल्यामुळें या दत्तक प्रकरणाची घडी प्रथमपासूनच नीट बसली नाहीं. पुण्यांत यावेळीं दररोज नव्या नव्या बाजारबातम्या पसरत होत्या व त्यांपैकीं कांहीं बातम्या आम्हीं या प्रकरणाच्या पत्रांत छापल्याही आहेत. त्यावरून वाचकांस असें दिसून येईल कीं, ही दत्तक घेण्याची मसलत ठरविल्याबद्दल नानांविषयीं सामान्य लोकांत तिरस्कार व कुचेष्टा करण्याची बुद्धिच उत्पन्न झाली होती. असो.

बाजीराव साहेब वयानें अजून एकवीस वर्षांचे सुद्धां झाले नव्हते तरी त्यांचा स्वभाव मोठा उपद्व्यापी होता. लोकमत दत्तकास सर्वथा प्रतिकूळ असल्याच्या बातम्या त्यांच्या कानावर येतांच त्यांस फार हर्ष झाला व नानाचा पाडाव करून राज्य मिळविण्यासाठीं कांहीं

तरी सत्वर मसलत करावी असें त्यांच्या मनांत आलें. सर्व राज्यांत शिंयांइतका जबरदस्त सरदार दुसरा कोणी नव्हता. त्यामुळें कसेंही करून शिंयांस अनुकूळ करून घ्यावें म्हणून त्यानीं कारस्थान केलें व त्यांत त्यांस पूर्ण यश आलें. अमृतराव साहेबांचा मेहुणा शिंयांच्या लष्करांत होता त्याच्या द्वारें शिंयांचे दिवाण सदाशिव मल्हार यांशीं बोलणें लावून त्या दिवाणास बाजीराव साहेबानीं टाकोटाक जुन्नराचे आसपास आणविलें व रात्रीं गुप्तपणें चार दोन वेळां त्याच्या भेटी घेऊन त्याशीं पक्का ठराव केला. तो असा कीं, शिंयांनीं बाजीराव साहेबांस पेशवाईचें पद मिळवून द्यावें व त्याबद्दल श्रीमंतानीं शिंयांस सव्वा कोट रुपये रोख द्यावे व पंचवीस लक्षांची जहागीर द्यावी. याप्रमाणें उभयपक्षीं करार होऊन इमानप्रमाण व बेलभंडार झाला.

हा करार ठरला तेव्हां शिंदे गोदावरीपलीकडे गेले होते व त्यांच्या पलटणांचे कंपू व तोफखाना ब्न्हाणपुरास पोंचला होता. जुन्नरची मसलत सिद्ध होतांच शिंयानीं जागच्या जागींच मुक्काम केला, व ब्न्हाणपुराहून तोफा व पलटणें परत बोलाविलीं, आणि पुण्यास बाळोबातात्या व जिउबा दादा होते त्यांस या मसलतीचा इशारा दिला.

दत्तक घेण्यास योग्य अशा मुलाची निवड करण्याकरितां नानानीं पांच सात मुलें पुण्यास आणविलीं होतीं व आणखी कांहीं यावयाचीं होतीं. दत्तक प्रकरणीं यद्यपि सर्व सरदारांनीं यशोदाबाईस संमतिपत्रें लिहून दिलीं होतीं, तथापि त्यांचा नानाशीं व नानांच त्यांशीं स्वतंत्र करार झाला नव्हता. ही परस्पर करारांची यादी तयार करून नानानीं सरदारांपुढें ठेविली तेव्हां त्या यादीवर शिंयांचे कारभारी बाळोबा तात्या व जिउबा दादा हे मान्यता घालण्याविषयीं टाळाटाळ करूं लागले. तेव्हां त्यांच्या वर्तनाचा खुलासा न झाल्यामुळें नाना वगैरे मंडळी बुचकळ्यांत पडली. बाजीराव साहेबांनीं शिंयांशीं कारस्थान केल्याची बातमी नानांस प्रथम कळली ती निजामअल्लीकडून !! त्यानें नानांस साफ लिहिलें कीं, तुमच्या घरांत असलीं कारस्थानें घाटतात व तुम्हीं जागे होत नाहीं ! मग आयत्यावेळीं

धांवाधांव करूं लागाल व आम्हांजवळ फौजेची कुमक मागाल तर त्यावेळीं आम्हीं फौज कोठली पाठवावी? काय तें आतांच सांगाल तर तरतूद करूं. निजामअल्लीकडून हा इशारा येतांच नाना खडबडून जागे झाले व त्यांनीं नबाबांस पत्र लिहून कळविलें कीं, आम्ही बोलावूं तेव्हां आमच्या कुमकेस तुम्हीं पंधरा हजार स्वार व पंधरा हजार कवायती पायदळ पाठवावें.

इतक्यांत शिंद्यांच्या हालचालींविषयींच्या बातम्या व त्यांच्या कारभाऱ्यांच्या वलगना कानावर येऊं लागल्या. किती तावडतोबीचें बोलावणें गेलें तरी नबाबाची फौज कुमकेस येण्यास अजून फार विलंब होता. नागपूरकर भोंसले अगर इंग्रज यांजकडूनही हांक मारिल्याबरोबर मदतीस फौज येण्याजोगी नव्हती. पुण्यास होळकरसुद्धां पंचवीस हजार फौज होती, पण तींत शिंद्यांच्या कारभाऱ्यांनीं जागोजाग फितूर केला असल्याचें त्याच वेळीं नानांच्या दृष्टोत्पत्तीस आलें. तेव्हां त्यांची छाती दडपून गेली व पुढें काय करावें हें त्यांस सुचेनासें झालें. शिंदे तर त्वरेनें पुण्याचा रोंख धरून चालून येत होते. आधीं जुन्नरास जाऊन बाजीराव वगैरे त्रिवर्ग बंधूंस बरोबर घेऊन पुण्यास येण्याची शिंद्यांची मसलत स्पष्ट दिसत होती. अशा स्थितींत रास्ते व पटवर्धन यांचा सल्ला घेऊन नानानीं अशी योजना ठरविली कीं, पूर्वी ठरल्याप्रमाणें यशोदाबाईनीं दत्तक हा घ्यावयाचाच, परंतु तो इतर कोणी न घेतां बाजीराव साहेबांचा धाकटा भाऊ चिमाजी आपा हाच दत्तक घ्यावा, म्हणजे तंटाच मिटला! असें केल्यानें पुण्यांतल्या लोकांची समजूत झाली, आपलाही हेतु तडीस गेला, आणि आम्हीं औरस असतां दत्तक घेऊन आमची दौलत त्याच्या घरांत कां घातली म्हणून बाजीराव साहेब यांस हांका मारावयासही जागा राहिली नाहीं. "पेशवाईच्या गादीवर दत्तकाची स्थापना न करण्याविषयीं आम्ही नानांस सांगतों, व ते आमचें ऐकत नाहींत म्हणून औरसाची स्थापना करण्यासाठीं आम्हीं पुण्यास जातों, असें शिंदे सर्व लोकांस सांगत आहेत; पण आतां आम्हीं आपण होऊन चिमाजी आपाचीच स्थापना करीत असल्यामुळें

वाजवी रीतीनें आम्हांशीं उघडपणें विरोध करण्यास त्यांस कांहींच सबब राहणार नाहीं.

चिमाजी आपा हा यशोदाबाईचा चुलत सासरा होत होता. कोणचेंही धर्मशास्त्र झालें तरी सासऱ्यास सुनेचा मुलगा करूं शकत नाहीं. या उघड उघड दिसणाऱ्या गोष्टीकडे डोळेझांक करून नाना व परशुरामभाऊ यानीं हा द्राविडीप्राणायाम कशाकरितां केला अशी कोणी शंका घेईल, तर त्यावर उत्तर असें आहे कीं, हें दत्तविधान बोलून चालून राजकीय स्वरूपाचें होतें. 'चिमणाजी माधवराव' यांच्या जागीं 'बाजीराव माधवराव' यांचें दत्तविधान करितां आलें असतें तर तेंही नानांस नकोसें होतें असें नाहीं. 'बाजीराव रघुनाथ' अगर 'चिमणाजी रघुनाथ' यानीं आपल्या जन्मसिद्ध हक्कानें स्वतंत्रपणें पेशवाईचे धनी होणें मात्र त्यांस अनिष्ट होतें. याचें कारण असें कीं, माधवराव नारायण यांच्या कारकीर्दींत त्यांच्या नांवावर सावकारांकडून कोट्यवधि रुपये नानानीं कर्ज काढलें होतें, व त्या पेशव्यांच्या नांवें सनदा लिहून पुष्कळांस जहागिरी, तैनाता, इनामें वगैरे दिलीं होतीं. एकट्या परशुरामभाऊंचेंच म्हैसूरच्या वगैरे स्वाऱ्यांसंबंधें पेशव्यांकडे चाळीस लक्ष रुपये कर्ज तुंबलें होतें ! पेशवाईच्या गादीवर बाजीराव रघुनाथ स्वयंसिद्ध हक्कानें बसले तर ते मागच्या पेशव्यांचे वेळीं झालेला कारभार आपण कांहीं एक जाणत नाहीं असें म्हणणार ! व पुढें पेशवाई मिळाल्यावर बाजीरावसाहेबानीं तसें म्हटलेंही ! ! ! तेच बाजीराव अगर चिमाजी आपा माधवरावांचे पुत्र या नात्यानें गादीवर बसल्यास माधवरावानी जें जें केलें तें तें सर्व कबूल करण्यावांचून त्यांस सुटकाच नव्हती. यशोदाबाईच्या मांडीवर चिमाजी आपांस देण्यांत असा हा राजकीय हेतु होता. चिमाजी आपांचें सरकारी कागदोपत्रीं मात्र चिमणाजी माधवराव असें नांव लागावयाचें होतें. एरवीं खासगी व्यवहारांत राघोबादादांचे पुत्र म्हणवून घेण्यास व आपल्या आईबापांचें श्राद्धपक्ष करण्यास त्यांस कोणचीच हरकत नव्हती ! या चमत्कारिक दत्तविधानाची कल्पना नाना वगैरेनीं प्रथमच

काढिली असेंही नाहीं. दत्तक घेणार तर चिमाजी आपासच कां घेऊं नये ही चर्चा त्यावेळीं पुण्यांत सर्वतोमुखीं होती.

आपण काय करणार हें कोणास समजलें नाहीं, व शिंदे अद्यापि जुन्नरापासून दूर आहेत तोंच तेथें जाऊन बाजीराव वगैरे त्रिवर्ग बंधूंस कुटुंबांतील माणसांसुद्धां ताब्यांत घेऊन पुण्यास आणावयाचें काम आतां प्रथम करावयाचें होतें. तें काम नानानीं परशुरामभाऊंकडे सोंपविलें. नानांचें भाऊंस असें सांगणें होतें कीं, "तुम्ही जुन्नरास जाऊन बाजीराव साहेबांजवळ मागणी करा कीं, यशोदाबाईंच्या मांडीवर दत्तक देऊन पेशवाईच्या पदावर स्थापना करण्याकरितां चिमाजी आपांस तुम्हीं आमच्या हवालीं करावें व तुम्हींही सर्वांनीं आम्हांबरोबर पुण्यासच चलावें. 'आम्हीच थोरले व योग्य वारसही आहों, सबब आमचीच स्थापना करा,' असें बाजीराव साहेब म्हणूं लागतील तर त्यांस साफ सांगा कीं, 'बाळाजी बाजीराव यांच्या वंशाकडे मात्र हें पेशवाईचें पद चालावयाचें आहे. रघुनाथ बाजीराव यानीं या पदावर आपला कांहीं वारसा नाहीं असें बेदावापत्र मागेंच लिहून दिलें असल्यामुळें तुमची स्थापना आतां व्हावयाची नाहीं.' याप्रमाणें स्पष्ट सांगितलें असतांही ते न ऐकतील तर कसेंही करून—खुषीनें अगर जबरीनें—सर्व मंडळीस पुण्यास आणावें. नानानीं सांगितल्याप्रमाणें अमलांत आणण्याचें कबूल करून परशुरामभाऊ ता. १४ फेब्रुवारी सन १७९६ रोजीं पुण्याहून जुन्नरास जावयास निघाले.

---

नं. ३६४१. श्रीगणराज. ( मार्ग. शु. २ श. १७१६ २४ नोवेंबर सन १७९४. )

पै॥ छ० ३० रबिलाखर सन खमस तिसैन.

श्री॥ राजश्री बाळासाहेब यांप्रती विश्वनाथ भट्ट भुसकुटे. नमस्कार विनंती. श्रीकृपेनें कारभारी यांना वासना ऐशी जाहली आहे जे, कैलासवासी दादासाहेब यांचे पुत्र श्री॥ रा॥ बाजीराव व चिमाजी

आपा यांस पुण्यांत आणून रावसाहेबांजवळ ठेवावें. ही गोष्ट त्वरितच घडणार. एका दोहों रोजीं येथून त्यांस बलावयास जाणार. ही गोष्ट घडलिया (श्रीमंताच्या) घरास व राज्यास श्रेयस्कर आहे. हें वर्तमान प्रामाणिकमुखें ऐकून लिहिलें आहे. हे विनंती.

नं. ३६४२. श्री.

यादी. आकार तालुके कित्तूरपैकीं महाल वगैरेबद्दल पत्रक पुणियाहून आलेलें. सुरू सन सीत तिसैन. मय्या व अल्लफ. बेरीज.

११२५० ऐन एकंदर बेरीज.

३८२९५ खेरीज एकंदर बेरीज.

४५०० दरबार खर्च.

६६५० जकात पैकीं.

८६१ भेट मसाले.

८३४२॥ महालमजकूर.

१७९३३॥ बट्टा.

३८२९५

१३७५४५

पैकीं बट्टा आकारणीस पत्रकीं कलम जमा केलें आहे, त्यास तें कलम नेमणुकी नव्हे. शहापुरीं टांकसाळ मना होती त्या वेळेस बट्टा चढला होता. हल्लीं टांकसाळ चालती जाली. बट्ट्याची आकारणी व्हावयाची नाहीं, नेमणुकी कलम नव्हे, सबब वजा १७९३३॥ बेरीज. बाकीबद्दल पत्रक. ११९६११॥ बेरीज

१ पण हें वर्तमान भांग्यामारुतीजवळच्या 'भटी' गप्पांपैकींच होतें हें वाचकांस सांगावयास नकोच ! नानाचा अधिकार निघून त्यांच्या जागीं बाजाराव साहेब यावे ही पुण्यांतल्या भटभिक्षुकांची प्रबळ इच्छा होती एवढेंच यावरून घ्यावयाचें !

यासीं शोध पाहतां महालीं वहिवाट अजमास बेरीज

| | अजमास बेरीज | अजबेरीज | हलीं आकार होईल. दहाबारा वर्षांचा कौल दिल्या साधेल. |
|---|---|---|---|
| कर्यात ककोली. | १७५०० | २५०० | १५००० |
| का॥ करलगें. | ८००० | ८००० | ० |
| का॥ ककिरें खेरीज. | २५०८॥। | ० | २५०८॥। |
| देसाई मवासांचा बंदोबस्त पक्केपणीं जाल्यास कांहीं वसूल होईल. तूर्त नाहीं. वहिवाटीस बेरीज आहे म्हणोन दखलबाद लिहिली. | | | |
| मौजे कित्तूर का॥ अमरगट्टें | १२००० | २५०० | ९५०० |
| का॥ गोळेहल्ली. | १३८७५। | २००० | ११८७५। |
| संपगांव. | १००० | १००० | ० |
| खानापूर सरदेशगत | ४०८६॥।-॥। | ४०८६॥।-॥। | ० |
| हणवरहट्टी होसकट्टें. | ७०० | ७०० | ० |
| कमत बेळगांव. | ४९५॥ | ४९५॥ | ० |
| सरदेशगत शहापूरखेरीज तीन गांव. | २५०० | २५०० | |
| का॥ हळशी नंदगड | २२००० | २५०० | १९५०० |
| खेरीज बाकेवाड (?) | | | |
| | ८४६६६।-॥। | २६२८२।-॥। | ५८३८४. |

बाकीपत्रकाचे बेरजेस कमी बेरीज. बट्ट्याची बेरीज वजा ३४९४५८=। केली आहे ती कमीकडे १७९३३॥ दहाबारा वर्षांचे कौलानें साधेल असा अजमास आहे. वहिवाट होईल तेव्हां समजेल. तूर्त अजमास आहे.

५२८७८॥=।

तपशील.

५२१७८॥=। ऐन कमी.

७०० कर्यात दोडवाड येथील रक्कम पत्रकीं सदरहू लिहिली आहे. परंतु पैकीं उत्पन्न रक्कम ७०० होईल असा अजमास आहे. परंतु दोडवाड इनाम गांव, देसाई यास हक्काचा ऐवज पोंचला नाहीं, सबब गांवास उपद्रव होईल. यास्तव रक्कम कमीकडे.

५२८७८॥=।

देसाई यांजकडून निवळ बेरीज सरंजामाकडे पावत होती. १४०००० बेरीज पत्रकाचे कमी वहिवाटीवरून काढली आहे. त्या आकारणीस महालमजकूर खर्चसुद्धां जमा आली आहे. सरंजामास बेरीज निखालस एक लाख चाळीस हजार पुरवणीस आहे त्यास खर्च नाहीं.

नं. ३६४३. श्री. ( आश्विन शु० ८—२१ आक्टो. )

राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री रघुनाथराव
नीलकंठ स्वामी गोसावी यांसः

पो॥ माधवराव नारायण प्रधान. नमस्कार. विनंती उपरी येथील कुशल जाणोन स्वकीय कुशल लिहित जाणें. विशेष. तुमचें प्रयोजन आहे. तरी तुम्हीं आपलेकडील सरंजामी फौजेची तयारी करून फौजेसुद्धां हुजूर निघून येणें. जाणिजे. छ० ७ रबिलाखर सु॥ सीत तिसैन मय्या व अल्लफ. बहुत काय लिहिणें हे विनंती.

नं. ३६४४. श्री. ( २६ आक्टो. )

श्रीमंत राजश्री बाळासाहेब स्वामीचे सेवेशीं.

विनंती सेवक धोंडो बापूजी जोशी. दोन्ही कर जोडून त्रिकाळ चरणांवर मस्तक ठेवून शिरसाष्टांग नमस्कार विज्ञापना तागायत आश्विन शु० १३ तिसरा प्रहरपावेतों सेवकाचें वर्तमान यथास्थित असे. विशेष. इकडील सविस्तर पेशजी चंदा सांडणीस्वार याजबरोबर लिहून पाठविलें होतें. दसऱ्याच्या सुमारें येऊन पावला असेल. श्रीमंत राजश्री रावसाहेब यांजला शरीरीं समाधान नव्हतें. औषधी उपाय चालत होते. चित्ताची स्थिरता अलीकडे नव्हती. आश्विन शु० १२ रविवारीं दोन तीन घटका दिवस सुमारें. श्रीगणपतीचे दिवाणखान्यावर माडीवर राव निजत होते तेथून पूर्वेचे अंगचें कवाड उघडून खालीं उडी टाकिली. खालीं कारंज्याचा हौद होता त्यांत पडले. दांतांस व हातास व गालास व पाय इतकें लागलें. परंतु पाय भारी दुखावला. आंतील हाड मांडीजवळ मोडलें. कांबी लावून बांधिलें. फार पायाचें दुःख आहे. हे सर्व मजकूर राजश्री बाळाजी विष्णु सहस्रबुद्धे व विसाजी नारायण वाडदेकर याणीं वाड्यांत जाऊन रुबरू राव यांजला पाहून वडिलांकडे वर्तमान कच्चें लिहून पाठविलें असेल. राव यांची प्रकृति ठीक नाहीं. दैवी मानवी उपाय बहुत होत आहेत. श्रीहरि आरोग्य करील. बहुत काय लिहिणें सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

नं. ३६४५. ( आश्विन. शु० १४–२७ आक्टो. )

परशुरामभाऊंकडून बाळासाहेबांस पत्र. रवाना छ० १५ रविलाखर सीत तिसैन.—

सरकारचें पत्र फौजेची तयारी करून जलदी निघून यावें म्हणून आलें आहे. आपलेही नांवें लखोटा आहे.

नं. ३६४६. ( २९ आक्टो. )

धोंडो बापूजी जोशी यांचें बाळासाहेबांस पत्र पुण्याहून आश्विन व॥ २ चें—

" आपण जिन्नस खरेदी करून पाठविण्याविषयीं लिहिलें,

त्यास कैलासवासी रावसाहेब आश्विन शु॥ १४ मंगळवारीं गजराचे वेळेस देवाज्ञा जाहले. चौकी पहारे बंदोबस्त पत्रीं काय लिहूं ? शेटी पवार व संताजी जासूद याणीं पाहिला आहे. दुकानें बंद. रस्त्यांतून कार्याकारण मनुष्य फिरतें. यास्तव जिन्नस घेण्याचें तूर्त राहिलें. "

नं. ३६४७. **श्रीगणपति.** ( आश्विन. व. ४-२१ आक्टो. )

पै॥ छ० १८ रबिलाखर सूर्योदय समय. आश्विनमास. सन सीत तिसैन.

चिरंजीव राजश्री बळवंतराव यांसीं प्रती परशुराम रामचंद्र. आशीर्वाद उपरी. येथील कुशल जाणोन स्वकीय कुशल लिहीत जावें. विशेष. तुम्हीं सांडणीस्वाराबरोबर पत्र पाठविलें तें पावलें. लिहिला मजकूर कळला. राजश्री नानाचीं पत्रें आलीं त्यांत 'बंदोबस्त आहेच. पुढील विचार जाहला पाहिजे, तर तुम्हीं यावें.' याजप्रमाणें लिहिलें आहे. व तुमचे लिहिण्यांत 'जावें असा समय आहे.' त्यास तेथें गेलियावर त्याचा विचार दोन प्रकारें पडेल. एक श्रीमंत राजश्री बाजीराव यांस आणावें. दुसरा ( विचार ) पोसणा मूल घ्यावा. तेव्हां याचे गुणदोष चित्तांत आणून सांगणें तें कसें सांगावें याचाही विचार जाहला पाहिजे. तर कसें करावें हें लिहून पाठवावें. आम्हीं येथें मुक्काम केल्यावर पत्रेंही गेलीं आहेत त्यांचीं उत्तरें येत आहेत. कांहीं फौज पाहिजे, तर तीही मिळती. तों तिकडील उत्तर येतें व आपलेकडील उत्तर येतें. त्यासारखें येथून कूच करूं. छ० १७ रबिलाखर. मंदवार. दहा घटका दिवस अस्तमानचा. चिरंजीव राजश्री दादाही येत आहेत. आम्हांस तर कांहीं सुचत नाहीं. आपली याउपरि आशाही नाहीं. श्रीइच्छेनुरूप घडेल तें प्रमाण ! लोभ कीजे हे आशीर्वाद.

नं. ३६४८. ( आश्विन व ४-२१ आक्टो. )

परशुरामभाऊंकडून बाळासाहेबांस पत्र. रवाना छ० १७ रबिलाखर सीत तिसैन.—

" रा. नानांचें पत्र व वकिलाचें पत्र अशीं दोन पत्रें आज आलीं

तीं आपणास पहावयास पाठविलीं आहेत. येण्याची जलदी करावी म्हणून (नानानीं) लिहिलें आहे. त्यास आम्हीं कळंबीच्या मुक्कामीं आल्यानंतर पुण्यास पत्रें पाठविलीं त्याचीं उत्तरें येण्याची वाट पहात आहों. व फौजही जमली पाहिजे. व आपणासही याविशींचे पर्याय लिहिलें आहेत त्यांचा जाब काय तो यावा. ''

नं. ३६४९. ( आश्विन—नोव्हेंबर. )

अपत्यें रामचंद्रानें शिरसाष्टांग नमस्कार विज्ञापना. वडिलीं स्वदस्तुरें आशीर्वादपत्र पाठविलें तें पावलें. त्याचा विस्तार काय ल्याहावा ? श्रीमंत सर्वांस टाकून गेले. श्रीकृष्णजी (ची) अवस्था केली ! दैवानुसार गोष्टी घडल्या. पतिव्रता स्त्री असती ती गतभर्तृका होती ती गत होऊन गेली ! निराश्रित आश्रित जन जाहलों ! एका गृहस्थानें कागद पुण्याहून पाठविला तोच पाहून माघारा पाठवावा. केसोपंत फडणीस, बाबा फडणीस, यांची गांठ पडल्यावर ते काय सांगतात तें लिहितों. विदित होय हे विज्ञापना.[1]

नं. ३६५०. श्री. (आश्विन व. ९—५ नोव्हेंबर.)

चिरंजीव राजश्री बळवंतराव यांसीं प्रती परशुराम रामचंद्र. आशीर्वाद. उपरी येथील कुशल तागायत छ० २२ रबिलाखरपावेतों यथास्थित असे. विशेष. हरलीच्या घाटानजीक मुक्कामाहून डांकेच्या सांडणीस्वाराबराबर पत्र पाठविलें आहे. पावलें असेल. तेथून मंगळवारीं चंद्रोदयीं कूच करून चालते जालों. ते बुधवारच्या सकाळच्या सहासात घटका दिवसास शिवऱ्याजवळ आलों. तेथें स्नानसंध्या करून अस्तमानीं शहरानजीक पोंचलों. आवशीच्या नऊ घटका रात्रीस सुवेळ होती त्या समयीं राजश्री नाना यांजकडे जाऊन मग आपल्या ठिकाणास वाड्यांत आलों. चिरंजीव राजश्री हरिपंत बाबा यांस लोकांसुद्धां वसंतबागेजवळ उतरविलें आहे. चिरंजीव राजश्री रघुनाथराव दादा अद्यापि आले नाहींत. येतील. श्रीमंत आमरणांत बोलत होते.

---

१ रामचंद्र परशुराम यांचें तासगांवाहून बाळासाहेबांस पत्र.

बोलून चालून राजश्री नानांस सांगितलें, "आमची वेळ जवळ आली. आम्हांस राज्याची इच्छा नाहीं. तुम्ही आमचे नांवाचा दुसरा करणें. आपण सूर्यमंडळ भेद करून जातों" अशीं अनेक प्रकारचीं अन्यांजवळ भाषणें केलीं. ते समयीं कोणास खरीं वाटलीं नाहींत. आतां सर्वांस वाटतें! असो. त्यानीं आपला अवतार समाप्त केला. आतां पुढें हे विवंचना करितात! आमचें दर्शन मात्र जाहलें. पुढें श्री-इच्छा प्रमाण! रवाना गुरुवार तिसरा प्रहर. बहुत काय लिहिणें लोभ कीजे हे आशीर्वाद

नं. ३६५१. श्री. (आश्वि. व. १०—६ नोव्हें.)

विज्ञापना. तागायत छ० २३ रबिलाखर शुक्रवार. आवशीची प्रहर रात्रपर्यंत यथास्थित असे. विशेष. श्रीमंत राजश्री भाऊसाहेब व॥ ८ बुधवारीं प्रहर रात्रीस पुण्यास आले. श्रीमंत राजश्री नानांची भेट होऊन आपले वाड्यांत आले. दुसरे दिवशीं सरकारचे वाड्यांत जाऊन नानाचे घरीं आले. राजश्री आनंदराव रास्तेही वांईहून आले. सारे मंडळीची बैठक चार घटका होऊन बोलणीं जाहलीं. अद्यापि पुढील विचाराचा सिद्धांत जाला नाहीं. श्रीमंतांचें उत्तरकार्य राजश्री रामराव राजमाचीकर करितात. आज अकरावे दिवशीं दानें वगैरे उत्तम प्रकारें हत्ती, पालखी, घोडा, रथ घोड्याचा, बैलाचा रथ, व गाडी, शय्या वगैरे दानें शेंदोनशें तीनशें जालीं. उत्तरकार्य उत्तम प्रकारें करीत आहेत. कळावें. श्रीमंत राजश्री रघुनाथराव दादा काल गुरुवारीं सायंकाळीं पुण्यास आले. आज नानांची भेट जाली. आणखी वर्तमान होईल तें मागाहून लिहितों. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

नं. ३६५२. श्रीगणपति. (आश्विन व० ११—७ नोव्हें.)

चिरंजीव राजश्री बळवंतराव यांसीं आशीर्वाद उपरी मजकूर त्रितपशील—

---

१ इतरांजवळ. हरिपंत फडक्यांचे पुत्र मोरोपंत यांचें 'ऊन्या' असें टोपण नांव होतें त्यांजवळ.' असाही अर्थ होऊं शकेल. २ दर्शन नानाचें. ३ विसाजी नारायण वाडदेकर यांचें पुण्याहून बाळासाहेबांस पत्र. ४ पत्र परशुरामभाऊंचें बाळासाहेबांस.

'नरसीपूरकर बावांस चौकी आली असें ऐकण्यांत आहे.' म्हणोन लिहिलें, त्यास त्यांजकडे कांहीं निमित्त नाहीं. श्रीमंत माडीवरून पडले तत्परिहारार्थ कांहीं विचारावयाकरितां सरकारांतून बाळाजीपंत भावे कवडीच्या पागेवर होते त्यांचे पुत्र रा॥ बापू यास निकडीनें त्यांजकडे पाठविलें होतें. मागाहून श्रीमंतानीं कैलासवास केला ही बातमी जातांच मशारनिल्हे तसेच माघारे आले. वरकड कांहीं नाहीं. एवढ्यावरूनच लोकानीं तर्क केला असेल.

कलम १.

मोतीबा कदम मंडळीसुद्धां रवाना केले आहेत म्हणोन व नवे लोक येऊं लागल्याचा व बंदोबस्ताचा वगैरे मजकूर लिहिला तो कळला. कदम मंडळी अद्यापि आली नाहीं. फौजेचा जथ लवकर पाडावा.

कलम १.

अकरावे दिवसाचें कर्म जालें. हत्ती व रथ दोन तीन प्रकारचे व शय्या इत्यादिक महादानें जालीं. दक्षिणा फारच चांगली जाली. दानाचीं साहित्यें खाशींच होतीं याची उपमा काय ल्याहावी ? दानधर्म बहुत कांहीं करीत आहेत.

कलम १.

पुढील विचाराची गोष्ट तर अद्यापि ठरावांत व बोलण्यांत नाहीं. सर्वत्र आपआपल्या जागीं योजना करितात व गुणदोष पहातात. श्रीइच्छेनें घडतां घडेल तें खरें. अद्यापि बोलणें जाहलें नाहीं. कलम १

एकूण चार कलमें लिहिलीं आहेत. त्याजवरून कळेल. रवाना छ० २४ रबिलाखर. अलीजहा बहादूर औरंगाबादेस आले. पाठोपाठ नबाबाकडील फौजा येऊन त्यांस शहरांत घेरिलें आहे. सदाशिव रड्डी अलीजहा बहादूर याजकडे मिळाला होता तो नबाबास येऊन भेटला अशी बातमी आली आहे. लोभ कीजे हे आशीर्वाद.

---

१ बावानीं सवाई रावसाहेबांस मृत्यु यावा म्हणून अनुष्ठान केलें अगर करविलें असावें या संशयावरून. बावा हे कोल्हापुरच्या महाराजांचे गुरु.

नं. ३६५३. (कार्तिक शु० २–१३ नोव्हें.)

परशुरामभाऊंकडून बाळासाहेबांस पत्र. रवाना छ. ३० रबिलाखर, सन सीत तिसैनः—

" पुढील विचाराची गोष्ट तर अद्याप निश्चयांत नाहीं, शिंदे यांजकडील बाळोबा पागनीस आले आहेत नित्य बोलणीं होतात. परंतु अद्याप ठरावांत येत नाहीं. सर्वांची एकवाक्यता जाली पाहिजे घाटत आहे. "

नं. ३६५४. (कार्तिक शु० ११–२२ नोव्हें.)

परशुरामभाऊंकडून बळवंतरावांस पत्र. रवाना ९ जमादिलावल सन सीत तिसैनः—

" पुढील विचाराची गोष्ट दत्त घ्यावा कीं औरसांपैकीं ज्येष्ठ कनिष्ठ आणावे याविशींची वाटाघाट आजपावेतों होत होती. दत्तकाविशीं नबाबाचीं व भोंसले यांचीं पत्रें आलीं व येथील अधिकारी यांच्या मतास तेंच आलें. त्याजवरून शिंदे व होळकर यांचाही सल्ला येथील मतानुरूप आला. आज रविवारीं एकादशी सोळा घटका दिवसास एकवाक्यता होऊन दत्तक घ्यावा असा निश्चय जाला. याउपर मुलाचा शोध करितील. स्थापनेचा दिवस कोणता, व मूल कोणाचा, याजबद्दल मागाहून लिहून पाठवूं. "

नं. ३६५५. **श्रीमार्तंड.** (२१ नोव्हेंबर.)

श्री ॥ मातुश्री +बाईसाहेबांचे सेवेसीं.

आज्ञाधारक तुकोजी होळकर साष्टांग दंडवत विज्ञापना. " श्री ॥ रावसाहेब कैलासवासी जाहले. पुढें दौलतीचा बंदोबस्त जाहला पाहिजे. त्याचा विचार आपले मतें कसा करावयाचा तो सबाह्याभ्यंतर सांगावा " म्हणोन आज्ञा जाहली, त्यास श्रीमंत कैलासवासी रावसाहेबांचें नांव चालवून श्री ॥ कैलासवासी नानासाहेब

---

१ अशाच मजकुराचें दौलतराव शिंदे यांचें पत्र पुढें नं. ३६५९ स छापलें आहे.
+ यशोदाबाई.

यांचा वंश चालावा; यास्तव कैलासवासी दादासाहेब यांचे पुत्रांपैकीं दत्त घ्यावा तरी ते मागील द्वेष मनांत आणून सरदारांसीं व मुत्सद्दी वगैरे यांसीं बनणार नाहीं. दौलतींत बखेडा पडेल. याजकरितां आपणास दत्तपुत्र देऊन दौलतीचा बंदोबस्त राजश्री बाळाजीपंत नाना याणीं करावा. यास आम्ही कायावाचामनःपूर्वक सर्वप्रकारें अनुकूल असों. हे गोष्ट आमचे विचारास आली. निःसंशय करावी. आम्हांकडून कोणेविशीं उणें पडणार नाहीं. मिति कार्तिक शु. ११ रविवार शके १७१७ राक्षसनाम संवत्सरे सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

नं. ३६५६. श्री. ( कार्तिक शु. १५–२६ नोवें. )

पै॥ छ० १३ जमादिलावल. सीत तिसैन. कार्तिक पौर्णिमा.

सेवेशीं नीलकंठ आपाजी. विज्ञापना. स्वामीनीं स्वदस्तूरचें पत्र पाठविलें तें पावलें. मजकूर समजला. पत्र माघारें पाठविलें आहे. पावल्याचें उत्तर यावें. "नबाबानीं सरकारांत तालुका दिला तेथील अंमल उठविला असें लोकवार्तेंत आहे हें खरें कीं काय ?" म्हणून लिहिलें, त्यास ती वार्ता बातल आहे. श्रीमंतानीं आपला काल समीप आला असें जाणून श्रीमंत बाईसाहेबांस काहीं गोष्टी सांगितल्या, व आणखी कित्येकांजवळ कित्येक भाषणें जहालीं, त्याची बखर होत आहे. एक दोन रोजांत स्वामींजवळ येईल. किती लिहिलें असतां गोष्टीं संपावयाच्या नाहींत. त्यांतील हांसील कलमवार तयार करण्याकरितां श्रीमंत राजश्री भाऊसाहेब यानीं आज्ञा केली आहे. लवकरच येईल. प्रस्तुतचा मजकूर दत्त आणावा अशी गोष्ट ठरली. येविशींचें परवां लिहिलें आहे त्याजवरून समजेल. विदित होय हे विज्ञापना.

नं. ३६५७ श्रीगणपति. ( कार्ति. शु. १५–२६ नोवें. )

पै॥ छ० १७ जमादिलावल. सन सीत तिसैन.

चिरंजीव राजश्री बळवंतराव [१] यांसीं प्रती परशुराम रामचंद्र. आशीर्वाद उपरी. पुढें कर्तव्यतेचा मजकूर ठरावांत आला तो परवां

---

१ पत्र बाळासाहेबांस

लिहिला आहे. मुलाचा शोध श्रीवर्धन व केळसी व वरसई व वसई येथें करविला. त्यास दहा मुलें तीन घराण्यांत आहेत, त्यांपैकीं सहा जणांच्या मुंजी जाहल्या आहेत, चौघांच्या मुंजी जाहल्या नाहींत, अशी बातमी आली आहे. मुलांस आणावयाकरितां पालख्या व घोडीं वगैरे सामान सरकारांतून रवाना जाहलें आहे. येथें आल्यावर त्यांतून कोणाचा निश्चय होतो पहावें. ठरेल तें लिहून पाठवितों. श्रीमंतांनीं माडीवरून पडावयाचे पूर्वी भाषण कोणाकोणाजवळ केलें तें व माडीवरून पडल्यानंतर बोलिले तें कोणीं कोणीं येऊन सांगितलें तें अलाहिदा कलमवार लिहिलें आहे. त्यावरून कळेल. त्याची नकल करून चिरंजीव राजश्री रामचंद्रपंत आपा यांजकडे पाठवावी. गोष्ट चमत्कारिक आहे. कृष्णावतारसमाप्तीसारखें केलें ! परम आश्चर्य आहे ! रवाना छ० १३ जमादिलावल. बहुत काय लिहिणें लोभ करावा हे विनंती.

नं. ३६५८. श्रीगणपति. ( कार्तिक व. २–२८ नोवें. )

पै॥ छ. १७ जमादिलावल. सन सीत तिसैन. कार्तिक. चार तास दिवस.

चिरंजीव राजश्री बळवंतराव यांसीं प्रती परशुराम रामचंद्र आशीर्वाद उपरी. आळंदी येथें श्रीच्या देवालयांत दुश्चिन्ह जाहलें तें एका कारकुनानें रा. त्रिंबकराव परचुरे यांस लिहिलें होतें त्याची नकल आपणांस पहावयाकरितां पाठविली आहे त्यावरून समजेल. रा॥ छ० १५ जमादिलावल. इंग्रजाच्या व फरांशीसाच्या चार पांच लढाया जाहल्या त्यांत दर लढाईस दोहींकडील तीस बत्तीस हजार माणूस याप्रमाणें लाखों माणूस खपलें; अशी बातमी विलायतेहून नबाबाकडे आली, तेथून इकडे फुटली, अशी बोलवा आहे. खरें लटकें देव जाणे ! आवई आली आहे. रा॥ छ० मजकूर. बहुत काय लिहिणें हे आशीर्वाद.

नं. ३६५९. श्री. ( २८ नोव्हेंबर. )

श्रीमंत मातोश्री यशोदाबाईसाहेबांचे सेवेशीं,

आज्ञाधारक दौलतराव शिंदे साष्टांग दंडवत. विज्ञापना. " श्रीमंत रावसाहेब कैलासवासी जाले, पुढें दौलतीचा बंदोबस्त झाला पाहिजे, याचा विचार आपले मतें कसा करावयाचा तो सबाह्यांतर सांगावा " म्हणोन आज्ञा जाली, त्यास श्रीमंत कैलासवासी दादासाहेबांचे पुत्रांपैकीं दत्तक घ्यावा, तर ते मागील द्वेष मनांत आणून त्यांचें सरदारांशीं व मुत्सद्दी वगैरे यांशीं बनणार नाहीं. दौलतींत बखेडा पडेल. याजकरितां आपणास दत्तक पुत्र देऊन दौलतीचा बंदोबस्त राजश्री बाळाजीपंतनाना यानीं करावा. यासीं आम्ही कायावाचामनःपूर्वक सर्व प्रकारें अनुकूळ असों. हे गोष्ट आमचे विचारास आली. निःसंशय करावी. आम्हांकडून कोणेविशीं उणें पडणार नाहीं. मिति कार्तिक वद्य २ शके १७१७ राक्षसनामसंवत्सरे सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

नं. ३६६०. ( कार्तिक व० ४–३० नोव्हें. )

विसाजी नारायण वाडदेकर यांचें पुण्याहून मिरजेस बाळासाहेबांस[1] छ० १७ जमादिलावलचें पत्रः–

" दत्तकाचा निश्चय जाला त्या प्रकरणीं सर्वांशीं संमतें होऊन पत्रें घेत आहेत. मूल आणावयास पाठविले आहेत. आज उद्यां येतील. आल्यावर करार होणें ते होतील. रा॥ रायोपंत भट हुबळीस गेले आहेत त्यांचा मूल आहे तोही आणण्याविसीं पत्र गेलें आहे. काय होतें पहावें. "

नं. ३६६१. श्री. ( १ दिसेंबर. )

पै॥ छ० २३ जमादिलावल. सन सीत. कार्तिक. कागद गड्या उंटावरून आल्या त्यांबराबर पत्र हें आलें.

सेवेशीं धोंडो बापूजी जोशी दोनी कर जोडून शिर सा॥ नमस्कार विज्ञापना ता॥ कार्तिक व॥ पंचमी पावेतों वर्तमान यथास्थित

---

[1] पत्र मिरजेस बाळासाहेबांस.

असे. विशेष. मांडीवरील प्रकार निश्चय जाला होता, परंतु शिंदे यांचा रुकार यादीस पडेना. " आमचा रुकार कशास पाहिजे ? तुम्ही करितां यांत आम्ही आहों. " असें ( त्यांचें ) बोलणें पडलें. त्याजवरून मूल आणावयास पालख्या व शंकर जोशी गेले होते त्यांजला ' जलदी करूं नये. दुसरें पत्र आमचें येईपर्यंत तेथून न यावें. ' ( असें नानांचें पत्र गेलें. ) मधें चार दिवस खलबत नव्हतें, दुग्धा होती, त्याजवरून काल रविवारीं सायंकाळीं ( खलबत झालें. ) शिंदेकडील ( कारभारी ) व रा॥ गोविंदराव पिंगळे व फडके व श्री॥ रा॥ भाऊसाहेब होते. सायंकाळपर्यंत बोलणें जालें तें कांहीं बाहेर बातमी बाजारांत आली नाहीं. बातमी ऐकिल्यावर मागाहून वडिलांस लिहितों. श्री॥ रा॥ भाऊसाहेबानीं वडिलांस मजकूर सविस्तर लिहिला डांकेबरोबर असेल. बहुत काय लिहिणें. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

नं. ३६६२. ( ४ दिसेंबर. )

धोंडो बापूजी जोशी यांचें कार्तिक व० ९ चें पुत्र पुण्याहून मिरजेस बाळासाहेबांस. पै॥ छ० २३ जमादिलावल. सीत तिसैन.

" कोंकणांतून मूल चार आणिले. निजसुरे यांचे घरीं आहेत. आणखी तीन यावयाचे आहेत. शिंदे व होळकर यांचा रुकार यादीवर पडत नाहीं. व॥ सप्तमी सायंकाळीं शिंदेकडील रामजी पाटील वकील व पागनीस मात्र दरबारास आले होते. जिऊबा आला नाहीं. शिंदे याणीं जिऊबास जांबगावांस बोलाविलें आहे. शिंदेकडील कंपू बराणपुरानजीक इकडून गेले होते. पुढें हिंदुस्थानांत जात होते. त्यांजला पत्र ( गेलें कीं, ) ' पुढें न जावें. ' बराणपुराजवळ येऊन रहावें. इकडे यावें, ' ऐशी बाजारबातमी आहे. होळकर शिंदे एक जाले. " चिमाजी आपास मांडीवर घ्यावें हा रुकार आमचा. दुसरा मूल आणिल्यास आमचा रुकार नाहीं. आम्ही हिंदु-

---

१ यशोदाबाईकडून मांडीवर दत्तक घेवविण्याचा.

स्थानांत जातों." असे उभयतां बोलतात म्हणून बाजारबातमी आहे. येथेंही तूर्त प्रकार जलदीचा दिसत नाहीं. सर्व मजकूर श्री॥ रा॥ भाऊसाहेबानीं वडिलांस लिहिलाच असेल."

नं. ३६६२. श्री. (मार्ग. शु० ११-२२ दिसेंबर.)

पै॥ छ० १० जमादिलाखर. सीत तिसैन. मार्गशीर्ष मास. विज्ञापना. बाजारी आवाया[2]—

१ कारभारी यांचें चित्त मार्ग॥ शु॥ १२ पावेतों स्थिर नाहीं. हवालदिलाचाच योग आहे. नंतर स्थिरता होईल. परंतु पौर्णिमेपासून कांहीं एक विघ्न उत्पन्न होईल, व चित्तांत परस्परें विक्षेप वाढतील, असें ज्योतिष्यानीं वर्तविलें आहे.

१ स्थापनेस[1] प्रतिमा आणिल्या त्यांत सुरतवान नाहींत यामुळें गोत्रजाचा मूल चांगला असल्यास ( यशोदाबाईनीं दत्तक ) घ्यावा असें (नानांच्या मनांत) आहे. त्यास गोत्रजांचीं मुलें नित्य पहावयास आणितात. अद्याप अमुक असा निश्चय नाहीं. मुख्य कारभारी यांचे शालक हल्लींचे, त्यांचें उपनाम सुतार. त्यांस मोडकही म्हणतात, परंतु रूढींत नाहीं. सुतार किंवा कृपावंतबहादर याचीच रूढ फार आहे. त्यास तो देखण्यांत बरा आहे. त्यास स्थापावा असा डौल दिसतो म्हणून बोलवा आहे.

१ दत्ताची स्थापना कदाचित् शु. १० स होईल. परंतु तो नौशात पावेल. फार करून स्थापनेची गोष्टच घडणार नाहीं. योग वाईट पडले आहेत. मुख्य कारभारी यांची मुदत थोडकीच आहे.

---

१ दत्तक घेण्याविषयीं जलदीचा. २ आवाया उठवणारे लोक फार धूर्त असावे असें दिसतें. यशोदाबाईच्या मांडीवर दत्तक देण्याचा नानाचा बेत पुण्यांतल्या लोकांस अगदीं नापसंत होता व ते नानांच्या अंतलास कंटाळले होते व बाजीराव कधीं गादीवर बसतो याची वाट पहात होते. असें या व पुढल्या प्रकरणांतील कांहीं पत्रांवरून दिसतें. पुढें होणार त्याचे हे डोहाळे। ३ किरवंत असा अर्थ ! ४ नाश.

पौषमास जाणार नाहीं. यदाकदाचित् उल्लंघिल्यास चैत्र परमावधि ! यांत लय किंवा प्रतिबंध असें बोलतात, राज्य औरसाशिवाय दुसऱ्यास नाहीं अशीं चिन्हें आहेत. त्यास औरसांस गणितमर्यादेनें आयुर्दाय व संतति बरी आहे. औरस दोघे, त्यांत हीं लक्षणें ज्येष्ठाचीं ( उत्तम ) कनिष्ठाचीं यापेक्षां कांहीं न्यून.

१ " औरस असतां अन्याची स्थापना कां होते ? येणेंकरून कल्याण नाहीं. बुद्धीस विपरीत जालें हेंच चिन्ह (नानांच्या) शेवटाचें" अशीं बोलणीं आबालवृद्ध बोलत होते. हें कारभारी यांच्या कानावर जातांच त्याणीं बातमीस ब्राह्मण व शूद्र ठेविले आहेत. गुप्तरूपें फिरतात. ज्याचे तोंडीं ही गोष्ट निघाली तो धरला जातो ! दोन चार असाम्या धरतांच प्रसिद्ध कोणी बोलत नाहीं इतकीच गोष्ट. दत्ताचा मसाला कोणासही बरा दिसत नाहीं ! बायका देखील श्रमी आहेत असें सांगतात. भिडे यांची सदर बुधवारांत खुली आहे त्यांत संध्याकाळीं ब्राह्मण जमा होऊन बसत होते. तेथें ही चर्चा आहे असें ( भिडयांस ) कळतांच तेथें कोणास बसूं देत नाहींत.

१ औरसास स्थापना नाहीं याचें कारण कोणाकोणाच्या बोलण्यांत मागील द्वेष मनांत आणतील, यामुळें बखेडे पडतील, यास्तव त्यांस आणीत नाहींत. असेंच स्पष्ट बोलावें तर लौकिकांत चांगलें दिसत नाहीं, सबब " त्यांस आयुष्य केवळ थोडें, दहा पांच महिन्यांचेच सोबती आहेत, त्यापक्षीं थोडक्यासाठीं कां गोंधळ करावा ? " अशी ध्वनि गणकांकरवीं (नानांनीं) काढविली आहे अशीं बोलणीं निघतात. गणकांच्या तर सांगण्यांत ( औरसांचे ) योग अपूर्व आहेत.

१ मुख्यांस आपलें वाईट समीप आहे असें लोक बोलतात हें समजलें आहे. यास्तव दत्तक घेत नाहींत, उगीच दिवस पाहणीखालीं घालवितात, अशीं बोलणीं कोठें कोठें निघतात.

---

१ नानांस.

१ मुख्यास स्वप्नें विपरीत पडतात यामुळें रात्रौ उसणतात, भयस्त आहेत, अशीं बोलणीं शिंदे यांच्या कारभारियांजवळ निघालीं होतीं याप्रों बहुतेक बोलत असतात.

१ दत्ताची स्थापना होते हें समजून येथील तमाम सावकार वगैरे पैकेकरी मोहोर व पुतळी व नाणें बारीक खरेदी करितात. आणियाचा भाव चढला आहे.

आवाया ऐकिल्या त्या लिहिल्या आहेत. यांतून खरें किती, खोटें किती असेल, कळत नाहीं. स्वामींचीं पत्रें येऊं लागलीं कीं, जनवार्ता अनेक आहे, ऐकवत नाहीं, काय तें कच्च लिहिणें; यास्तव ऐकिलें तें लिहिलें आहे. रा॥ विनोबा आबानीं सांगितलेंच असेल. ही बातमी खरी यो खोटी मीं येथून लिहिली अशी चर्चा निघों नये. हे विज्ञापना.

नं. ३६६४. ( ३० दिसेंबर. )

धोंडो बापूजी जोशी यांचें पुण्याहून बाळासाहेबांस मार्गशीर्ष व॥ ५ चें पत्र—

"राजश्री तुकोजी होळकर घोरपडीच्या शिवारामध्यें होते तेथून दोन कोस कूच करून गेले. निरोप वाफगांवास जाण्यास्तव घेतला. रा॥ जिउबा बक्षी याणीं काल तोफांची सरबत्ती दोन घटका करून वानवडीचे मुक्कामाहून बुनगें व सलतनत दोन कोशांवर उतरले. होळकर यांचे कहीचा उपद्रव भारी. सुड्या रचलेल्या भरून नेतात. फिर्याद कोठें नाहीं. एक दोन जागां गांवकरी यांची व कहीवाल्यांची कटकट जाली. गांवकरी यांजला कहीवाल्यानीं मारिलें, परंतु दाद नाहीं!"

नं. ३६६५. ( १ जानेवारी. )

धोंडो बापूजी जोशी यांचें पुण्याहून बाळासाहेबांस मिरजेस मार्गशीर्ष व॥ ७ चें पत्र—

---

१ लिहिणार पटवर्धनांचा कारकून नीलकंठ आपाजी पोंक्षे. त्यांचें हें मिरजेस बाळासाहेबांस पत्र. २ अथवा.

" मांडीवर मूल देण्याचा प्रकार तूर्त राहिला. दोन मूल मात्र ठेविले आहेत. कोणी गोष्ट बोलत नाहींत. वाड्यासभोंवतीं बंदोबस्ती मोठी भारी केली आहे. नित्य गारदी यांची बदली होती. स्तब्ध प्रकार जाला आहे ! "

नं. ३६६६. श्रीगणपति. ( पौष व. १०—३ जानेवारी. )

पै॥ छ० २७ रज्जब सन सीत तिसैन. पौष.

चिरंजीव राजश्री बळवंतराव यांसीं प्रती परशुराम रामचंद्र. आशीर्वाद उपरी. आपण पत्र पाठविलें तें पावलें. " सरकारांत इंग्रजी पलटणें चाकरीस ठेवून आणविलीं व शिंदे याणीं हिंदुस्थानांतून कंपू वगैरे सरंजाम आणविला. होळकराच्या फौजेंत बेकैदी फार. रानांतून खळीं भरून नेतात, असें ऐकण्यांत येतें. त्यास वर्तमान कसकसें आहे हें ल्याहावें. दिवस एका प्रकारचे. पुण्यांतील राहणें जमीयतशिवाय प्रशस्त नव्हे. कसा प्रसंग पडेल कळत नाहीं. यास्तव सरकारांत व आपणापाशीं फौजेचा भरणा मातबर असावा; येणेंकरून सर्व दबाव आहे. " म्हणोन विस्तारें लिहिलें तें कळलें. ऐसियास इंग्रजी पलटणें आणविलीं नाहींत व शिंदे याणीं कंपू वगैरे सरंजाम आणविला ऐसेंहीं नाहीं. उगीच आफवा आहे. शिंदे यांजकडील कित्येक गोष्टी येथें बहुतां मुखीं ऐकण्यांत येतात. परंतु त्यांच्या बोलण्यांत दिसत नाहीं. कारभारी यांजवळ त्यांचा संशय नाहीं. मग ईश्वराची इच्छा काय असेल तें असो ! शिंदे हिंदुस्थानांत जाण्याविषयीं आतुर; परंतु येथील मनोदय स्थापनेच्या समयीं सर्वांनीं असावें, एवढ्यासाठींच त्यांनीं जावयाची निकड न करितां दम खाल्ला आहे. तथापि ते तिकडे जाण्याच्या उद्देशें गंगातीरास जातात. फौजेचा जथ पडावा व पुढें येनात हा दबाव बसावयाचे मनसब्यांत आहेत. स्थापनेच्या समयीं सडे येथें येऊन माघारे जातील. वरकड विषय कांहीं नाहीं. होळकराच्या फौजेची बेकैदी नवीनच आहे असें नाहीं ! बोभाटे येतात.

१ शिंद्यांच्या.

ताकीदही होते. खळीं भरून नेलीं ही आवाई लटकी नव्हे. सरकारांत सर्वांचीं पाऊलें समजतात. हुशारीस कमी नाहीं. आज कमकसर होळकराशिवाय अठरा हजार फौजेचा भरणा सरंजामी आहे त्यांत थोडी बहुत हुजरात मुक्कामची. हल्लीं पागा चराईस गेल्या आहेत त्यांपैकीं दहावीस पागा आणविल्या आहेत. जमीयत बरीच आहे. आम्हांजवळ आमची फौज आहे व आपल्याकडील फौजही येत आहे. सरकारांतही कमती नाहीं. मग फिकीर कशास करावी? श्रीकृपेंकरून बरेंच आहे. चिरंजीव नारायणराव आजपावेतों निघालेच असतील. नसल्यास लौकर रवानगी करावी. चिरंजीव राजश्री महादाजीपंत दाजी यांसही आणविलें आहे. आपल्याकडील फौज पांचशें लोक मिरजेंत राहून बाकी झाडून यावी. दिवसगत होऊं नये. "टिपूची चाल ठीक नाहीं, याजकरितां धारवाडाजवळ कांहीं सरंजाम असावा," असें आपल्या लिहिण्यांत आलें, त्यास त्याजपासून वांकडें पाऊल पडणार नाहीं अशी येथें खातरजमा आहे. आपलें पत्र माघारें पाठविलें आहे. पावलियाचें लिहावें. रवाना छ० २३ रज्जब. बहुत काय लिहिणें लोभ असों द्यावा हे आशीर्वाद.

नं. ३६६७. श्रीगणपति. ( पौष व० ४-२८ जाने० )

+पै॥ छ० १७ रजब. सीत तिसैन. पौष.

अर्पत्यें रामचंद्रानें सा॥ नमस्कार विज्ञापना. वडिलीं पत्र पाठविलें तें पावलें. " लोक मनस्वी बोलतात. कोणी मातबरही तासगांवास आले म्हणोन कळलें. " ( असें लिहिलें. ) त्यास तीर्थस्वरूप रा. धोंडोपंत मामा आले त्याजवर कोणी आले नाहींत. ते तर भेटीसाठीं मिरजेस गेले होते. राज्यांत धणी नाहीं त्याजमुळें आवाया मनस्वी आहेत. शिंदे दूर गेले आहेत खरे, परंतु सामानें करून सिद्ध आहेत. जे दिवशीं मनांत आणितील ( ते दिवशीं ) तसें करितील. पुण्यांत काय आहे विदितच आहे! इतके दिवस श्रीमंतांचा प्रताप मोठा होता. हल्लीं

---

+ मिती व इंग्रजी तारीख पैवस्तीची.

१ रामचंद्र परशुराम यांचें तासगांवाहून मिरजेस बाळासाहेबांस पत्र.

ती गोष्ट ईश्वरार्पण झाली ! पुढें प्रतिमा दैववान् असावी म्हणजे बरें ! बारीक वर्तमान कोणीं लिहित नाहीं. परंतु पुणें गडबडलें आहे. (तेथें) वडी.ऽ सामानाशिवाय आहेत याजकरितां चिंता आहे. आपलें लिहिणें जातच असेल. बहुत काय लिहिणें हे विज्ञापना.

नं. ३६६८.   श्रीगणपति.   ( माघ शु. ५–१३ फेब्रु. )

चिरंजीव राजश्री नारायणराव यांसीं प्रती परशुराम रामचंद्र. आशीर्वाद उपरी. येथील मसलत ठरली होती जे, दत्तपुत्र घेऊन काम चालवावें. त्यास कांहीं कारणामुळें तो मनसबा राहून श्री॥ रा॥ बाजीराव यांसी आणावें, त्यांचे धाकटे बंधु श्री॥ रा॥ चिमाजी आपांस दत्तविधान करून पदावर स्थापना करावी, असें ठरलें. त्यांस आणावयासीं मी उद्यां रविवारीं कूच करून खेडाच्या सुमारें मुक्कामास जातों. परवां इंदुवारीं तेथें जाऊन पोहोंचतों. राजश्री आपाजी गोविंद जेउराजवळ होते त्यांस तुमची वाट न पहातां जलद येणें म्हणोन लिहिलें आहे. त्यास तुम्ही लौकर मोठ्या मजली करून येणें. हेंच पत्र मिरजेस चिरंजीवांकडे पाठवावें. छ० ३ साबान. बहुत काय लिहिणें हे आशीर्वाद.

नं. ३६६९.   श्रीगणपति.   (माघ शु० ६–१४ फेब्रु)

चि॥ रा॥ बळवंतराव व रामचंद्रपंत आपा यांसीं प्रती परशुराम रामचंद्र आशीर्वाद उपरी. नबाबाचें पत्र सरकारांत आलें कीं, "तुमच्या घरीं राजकारणें बहुत होतात, परंतु तुम्ही आम्हांस कळवीत नाहीं. आयत्या वक्तास म्हणाल कीं 'फौज जमा करावी.' त्यास तेव्हां कशी जमा होईल ! काय तें कळवावें. नाहीं तर जसें पाहूं तसें करूं." त्याजवरून ( कारभारी यांस ) त्याचा विचार पडला आहे. शिंदे याणीं श्री॥ कै॥ दादासाहेब यांच्या पुत्रांशीं राजकारण केलें हेंही प्रक-

---

१ पेशवाईच्या गादीवर ज्यास बसवावयाचें तो. २ परशुरामभाऊ. ३ बाळासाहेब-बाकंड. ४ फौज तर जमवितोंच. काय देता तें आतांच बोला. नाहीं तर पुढें शिंद्यांकडे मिळूं अगर तुम्हांकडे मिळूं हा नेम नाहीं.

टांत आलें. कोणा कोणापाशीं संधानें होतीं तीं फुटलीं. व जांब-गांवाहून पुढें जाण्याचा शिंद्यांचा मनसबा यापूर्वीं निराळा होता. आतांचें पाऊल वांकडेपणाचें आहे. फौज जमा करूं लागले व सडे होतात अशी बातमी आली. दत्ताविषयीं पहिला शिंद्यांचा रुकार होता. आतां तें लक्ष नाहीं. आंतून राजकारण तर त्यांचें सिद्ध जाहलें. यास्तव येथें ठराव जाला कीं, "कैलासवासी यांचे पुत्र कोठें आवाज निघाला नाहीं तों हाताखालीं घालावे. व त्यांपैकीं श्री॥ रा॥ चिमाजी आपा यांस पदावर बसवावें. म्हणजे त्यांचें राजकारण व्यर्थ जाहलें व बंदोबस्त आपला आपल्या हातीं राहतो. मग त्याणीं काय करावयाचें आहे ?" असा इत्यर्थ होऊन आम्ही आज षष्ठी रविवारीं दोन प्रहर दिवसास पुण्याहून निघोन जुन्नरास जावयाकरितां गेलों. समागमें रास्ते यांचें पथक व रा॥ गोविंदराव पिंगळे आहेत. चि॥ रा॥ महादाजी[2]-पंत दाजी काल कात्रजेजवळ आले. आज त्यांसही बराबर घेतलें. चि॥ रा॥ नारायणराव लष्करांत येऊन दाखल जाले असतील या अनुमानें त्यांच्या नांवें पत्र पाठविलें कीं, फौजसुद्धां निकडीनें यावें. त्यांत किंचित् मजकूरही दर्शविला आहे. कदाचित् ते आले नसल्यास रा॥ आपाजी गोविंद यांस लिहिलें आहे कीं, "तुम्हीं. चिरंजीवांची वाट न पाहतां यावें. चिरंजीवांचें पत्र मिरजेस पाठवावें." याप्रों दोन पत्रें परवां तेरवां सांडणीस्वाराबराबर पाठविलीं आहेत. ते आपल्यास इतल्ला देतील. गोष्ट निरुपाय, सत्वर जाणें प्राप्त. तेथें गेल्यावर ज्येष्ठांसीं[3] बोलावयाचें (कीं) "श्रीमंत कै॥ नाना साहेब यांचा वंश चालविणें दरकार. याजकरितां चिमाजी आपा यांस पदीं बसविणार. तुम्हीं जवळ असावें." या बोलण्यास ते कबूल न होतां तिकडील[4] राजकारणावर नजर ठेवून अथवा आपल्या स्वार्थासाठीं वोढ घेऊन बोलूं लागल्यास खडखडीत चार गोष्टी–नानासाहेबांशिवाय या दौलतीस दुसऱ्याचें नांव करावयाचें नाहीं. याजबद्दल कांहीं घडो.

---

१ पुण्यांतील फौजेंत फितूर करण्याविषयीं. २ भाऊंचे तृतीय पुत्र. ३ बाजीराव साहेबांशीं. ४ शिंद्यांकडील.

पर हेंच करणें जरूर–अशा तऱ्हेच्या सांगोन पहाव्या. ताळ्यावर न येत तर कसेंही ( करून ) त्यांस मंडळीसुद्धां हाताखालीं घालोन येथें आणोन पाहिजे तसें करावें, असा बेत जाला आहे. ईश्वराच्या इच्छेनें घडेल तें खरें ! हुजरात जमा करावयाचा निश्चय जाला. आज पांच सात रोज या कामाविशीं भारी घोळ पडला. या रंगास तर आलें आहे. बळवंतराव ! हें पत्र तुम्ही पाहून तासगांवास चिरंजीवांकडे पाठवून द्यावें. या प्रकरणीं बहुतएक बोलणीं आहेत तीं पत्रीं किती ल्याहावीं ! हांशील गोष्ट रंग समजला ! शेवटास जाईल तें खरें ! श्री इच्छा प्रमाण. मी निघोन गेलों. घडेल तें मागाहून वरचेवर लिहितों. आपाजी गोविंद यांजकडे जलद माणसें पाठविलीं आहेत येतील. छ० ४ साबान. बहुत काय लिहिणें लोभ कीजे हे आशीर्वाद.

पै॥ छ० ६ साबान. सन सीत तिसैन. माघ शु. ८ भौमवार. अस्तमान.

---

१ नानाचा व आमचा बेत.

# बाजीराव साहेब पुण्यास येतात.

' चिमणाजी माधवराव ' या भावी पेशव्यांची स्वारी जुन्नराहून पुण्यास यावयाची होती व ती आणण्याकरितां परशुरामभाऊ निघाले होते. अर्थात् त्यांजबरोबर फौज व सरंजाम बऱ्याच थाटमाटाचा देण्यांत आला होता. भाऊंबरोबर त्यांची स्वतःची फौज होतीच, पण त्याशिवाय रास्ते व प्रतिनिधि यांचीं पथकें व सात आठ पागा, तीन हजार गारदी, दोन लहान तोफा, व बाणांच्या कैच्या, असा लढाईचा आणखी सरंजामही होता. शिवाय स्वारीचा सरंजामही मुबलक होता. सदाशें उंट फरासखान्याचें सामान, बोथाटीबारदार, इटेकरी, पट्टेकरी, चोपदार, व भालदार, व सोन्याच्या काठीचे चोपदार, जरीलगी, खास बारदार अस्तमी शंभर, व हुद्देदार निर्कीबदार शंभर; तीन अंबाऱ्या, चार पालख्या, हुजूरपागांपैकीं सरंजामसुद्धां वीस कोतवाल घोडीं, याप्रमाणें सामान होतें.

तारीख १४ फेब्रुवारी रोजीं सायंकाळच्या अडीच प्रहर दिवसास वरील सरंजामानिशीं परशुरामभाऊ पुण्याहून निघाले ते त्याच दिवशीं इंद्रायणी नदीवर मोशीच्या मुक्कामास गेले. तेथें ते उतरतात तों पुण्याहून नानाची चिठ्ठी आली कीं, 'शिंद्यांचे लोक जुन्नरास लौकरच येणार आहेत, ते तेथें जाण्याच्या आधीं आपण पोंचलें पाहिजे. याकरितां रातोरात पुढें चालते व्हा,' त्यावरून भाऊ मध्यरात्रीच्या पूर्वीच कूच करून निघाले ते सूर्योदयास नऊ कोस जमीन चालून तसेच खेडावरून वडगावांस गेले. तेथून त्यानीं आपले पुत्र हरीपंत बाबा व महादाजीपंत दाजी यांबरोबर कांहीं फौज देऊन त्यांस तसेंच उपाशीं पुढें जुन्नरास पाठविलें व आपण घाईघाईनें बाकी मंडळीसह वडगांवास पूजा व भोजन आटपून सायंकाळीं जुन्नराजवळ येऊन कुकडी नदीवर मुक्काम केला. जुन्नराहून वीस पंचवीस कोसांवर

शिंद्याचे लोक आल्याची बातमी येते तोंच भाऊनीं याप्रमाणें अघाडी तर साधली ! बहिरोपंत मेहेंदळे व गोविंदराव पिंगळे पुण्याहून याव-याचे होते ते मागून त्याच रात्रीस आले. मग दुसऱ्या दिवशीं भाऊनीं त्यांस बरोबर घेऊन बाजीरावसाहेबांकडे जाऊन त्यांची भेट घेतली. तों तेथें शिंद्यांचे वकील रामजी पाटील आगाऊ येऊन बसलेच होते !

प्रथमतः सामोपचारानें बोलून बाजीरावसाहेबांकडून चिमाजी-अप्पास मागून घ्यावें, सामोपचारानें श्रीमंत न वळतील तर दपटशा देऊनसुद्धां आपला कार्यभाग साधावा, असें नानांचें व भाऊंचें पुण्यास ठरलें होतें. पण येथें जुन्नरास येऊन भाऊनीं सुमार पाहिला तों गोड बोलून अथवा भय दाखवूनसुद्धां बाजीरावसाहेब वळतील अशी आतां स्थिति राहिली नव्हती ! शिंद्यांशीं आपण करार ठरविला त्यामुळें घाबरून आतां हे पुणेकर मुत्सद्दी आपणाकडे बोलावयास आले आहेत, त्याअर्थीं यांस भिण्याचें कांहीं कारण नाहीं; उलट आतां यांसच आपण म्हणूं तें कबूल करणें भाग आहे, हें बाजीरावसाहेबांस कळून चुकलें होतें. भाऊनीं जें जें म्हणावें तें तें हरतऱ्हेनें मोडून काढून आपलाच हेतु तडीस नेण्याचा प्रयत्न त्यांच्या गोड पण मत-लबी भाषणांत पदोपदीं दिसत होता. चिमाजीआपांस आमच्या हवालीं करा असें भाऊनीं म्हणतांच श्रीमंत बोलले कीं, आपास मी देणार नाहीं. मलाच गादीवर बसवा. तुम्ही व नाना जसें सांगाल तसा वागेन. आपास दत्तक देण्याचें बोलूंच नका. आणि मला बाजूला ठेवून माझ्या धाकट्या भावाची स्थापना तुम्ही कशी करितां ? खुद्द मला मुख्य स्थानीं न्यावयाचें असल्यास न्यावें. नाहीं तर आज-पर्यंत बाहेरील दत्तक आणावयाची योजना करीत होतां त्याप्रमाणें करावें ! आम्ही आहों याप्रमाणेंच येथें राहूं. अथवा आणखी कांहीं तुमच्या चित्तांत असल्यास तसेंही करावें ! परंतु दत्तकविषय धाक-ट्यास व आम्हांस घडावयाचा नाहीं.

यशोदाबाईंच्या मांडीवर चिमाजीआपास दत्तक देऊन त्यांची पेशवाईच्या पदावर आम्ही स्थापना करितों व त्यांची दिवाणगिरी

तुम्हास देतों हें भाऊंचें म्हणणें बाजीरावसाहेब ऐकेनात, आणि तुम्हीच बाजीराव माधव होऊन गादीवर बसा असें भाऊनीं सांगितलें तर तेंही ऐकेनात ! त्यांचें एकच म्हणणें कीं, नानासाहेबांचा वंश खुंटला त्याला आम्हीं काय करावें ? आम्ही कांहीं दुसऱ्याचे ओट्यांत जावयाचे नाहीं. तुम्ही चिमणाजी रघुनाथ अशाच नांवानें आपाची स्थापना करणार असाल तर तेंही आपण करूं देणार नाहीं. आम्हीच गादीवर बसणार, व तेंही ' बाजीराव रघुनाथ प्रधान ' याच नांवानें बसणार ! तसें होत नसेल तर तुम्हांला काय वाटेल तें करा ! श्रीमंतांचीं अशीं बोलणीं पडूं लागलीं तेव्हां परशुरामभाऊ कुंठित जाहले.

याप्रमाणें आठ दहा दिवस श्रीमंतांनीं घोळ घातला. त्या अवधींत शिंद्यानीं येऊन पोंचावें व त्यानींच आपणास पुण्यास घेऊन जावें ही बाजीरासाहेबांची फार इच्छा होती. परंतु आठ दिवस शिंद्यांची वाट पाहूनसुद्धां ते येत नाहींत असें कळल्यादर श्रीमंतांस पंचाईत पडली. शिंद्यांच्या भरंवशावर आपण उड्या मारतों खऱ्या, पण परशुरामभाऊनीं बलात्कारानें आपणास नेल्यास कसें करावें ? तसें करून सुद्धां आपणास पुण्यास घेऊन येण्याविषयीं नानानीं भाऊंस सांगितलें आहे हें त्यांस कळलें होतें. त्यामुळें आतां भाऊंची पायधरणी करून त्यांचें मन वश करून घ्यावें असा श्रीमंतांनीं बेत केला ! आपलें हें पायधरणी करण्याचें ब्रह्मास्त्र केवळ अमोघ आहे असें श्रीमंत समजत होते ! या अस्त्राची योजना करून त्यानीं त्यावेळीं खरोखरच भाऊंस भुरळ घातली, कीं भुरळ पडल्याचें भाऊनीं सोंग केलें ? मागचे द्वेष व भाऊंचें पुढील वर्तन पाहिलें तर त्यांचा त्यावेळचा कळवळा वरपांगी होता अशी खात्री वाटते. भाऊंची पायधरणी बाजीरावसाहेबानीं कशी केली याचें वर्णन या प्रकरणांतल्या एका पत्रांत पुढें दिल्याप्रमाणें केलें आहे—

" राजश्री बाजीरावसाहेब यांची व भाऊसाहेब यांची बैठक एकान्तीं दोघांचीच जाली. त्या बैठकेंत भाऊसाहेब यांच्या पायांवरी डोकी ठेवून पदर पसरून अंजुळीपुट जोडून विनंती केली जे,

" मागील द्वेष तुम्ही मनांत आणूं नये. मी आणणार नाहीं. वडिलांच्या जागां आपण मला मान्य. हाच मनोदय माझा शपथ पुरस्कर आहे. धाकट्यास दौलतेवरी बसवावें आणि मी बंदींत रहावें हें आपल्या विचारास येतें कीं काय ? " या अन्वयें बहुत ग्लानतेचीं बोलणीं बोलून अश्रुपात गळूं लागले. तेव्हां त्याहींपेक्षां विशेषात्कारें भाऊसाहेबीं विनंती केली, जे " स्वामी म्हणतात त्यास कबूल आहों. परंतु या गोष्टीचा इतला नानांस देऊन स्वामींस घेऊन जातों."

वरील अवतरणांत दाखविल्याप्रमाणें बाजीरावसाहेबांनीं परशुरामभाऊंची प्रसन्नता करून घेतली याला प्रत्यंतर पुढें पांच चार वर्षांनीं खुद्द श्रीमंतांनींच एका प्रसंगीं काढलेले उद्गार एका पत्रांत दाखल केलेले आहेत. तेथें बाजीरावसाहेब म्हणतात—

" भाऊंस नानानीं मजकडे जुन्नरास पाठविलें तेव्हां मी भाऊंस पाहून बहुत संतोष पावलों. आधीं भाऊ वृद्ध, ( त्यांतून ) एकवचनी, जितेंद्रिय, कुटुंबवत्सल, आणि प्रसन्नवदन पाहोन भाऊंचे पायांवर मस्तक ठेविला आणि दादासाहेब भाऊंस म्हणोन भाऊंचे वचनावर मी आणि चिमण्या असे भाऊंबरोबर खडकीच्या मुकामास आलों." इ. इ. इ.

बाजीराव साहेबांचें बोलणें नानांस कळवावें व ते सांगतील तसेंच करावें असें परशुरामभाऊंनीं आपल्या मनाशीं ठरविल्यानंतर गोविंदराव पिंगळे यांजबरोबर पुण्यास नानाकडे निरोप पाठविला कीं, आपण पुण्यास ठरवून आलों त्यापैकीं कोणतीही गोष्ट बाजीराव कबूल करीत नाहींत व त्यांपुढें आमचें कांहीं चालत नाहीं. आम्हांसच पेशवाईच्या गादीवर बसवा असा त्यांचा हेका आहे, तेव्हां आतां पुढें कसें करावें ?

भाऊ पुण्याहून गेल्यापासून पिंगळे नानाकडे येत तोंपर्यंत दहा बारा दिवस लोटले होते. त्या अवधींत शिंद्यांच्या लष्करांत बऱ्याच महत्वाच्या गोष्टी घडल्या होत्या त्यांचें दिग्दर्शन येथें करणें जरूर आहे. शिंद्यानीं कबूल केल्याप्रमाणें तडकाफडकी जुन्नरास जाऊन बाजीराव साहेबांस घेऊन पुण्यास यावयाचें, परंतु तसें त्यांच्या हातून

न घडण्याचें कारण त्याचे बक्षी जिऊबादादा यांचा मृत्यु हें होय. बक्षीस जांबगांवच्या मुक्कामीं आकस्मिक मरण आल्यामुळें त्यांची विस्कळीत झालेली मसलत बाळोबा तात्यांनीं सावरून धरली. शिंद्यांचे ते मुख्य कारभारी झाले होते. सारें शेणवी मंडळ त्यांस अनुकूळ होतें हें सांगावयास नकोच. निदान या वेळीं तरी दौलतराव शिंदे बाळोबाच्या हातांतलें केवळ बाहुलें होतें असें म्हणण्यास हरकत नाहीं. याच सुमारास महादजी शिंद्यांच्या बायकांनीं दौलतरावावर मारेकरी घातल्याचा कट उघडकीस आला. परंतु बाळोबानीं न डगमगतां कटवाल्यांचें पारिपत्य करून व त्या बायांस बऱ्हाणपुरास पाठवून देऊन फितुराचा बींमोड केला व लष्कराचें अवजड सामान जांबगांवास ठेवून सडी फौज तयार करून पलटणांचे कंपू व शेंदीडशें तोफा यांसहवर्तमान पुण्याच्या रोखें येण्याची तयारी केली.

या बातम्या पुण्यास येतात तों भाऊंचा निरोप घेऊन पिंगळे नानाकडे आले. शिंद्यांच्या भयामुळें नानाच्या मनाची चलबिचल झालीच होती. पिंगळ्यांचा तोंडचा भाऊंचा निरोप ऐकतांच त्याणीं उलट निरोप घाई घाईनें पाठविला कीं आतां घासाघीस करण्याची वेळ राहिली नाहीं. बाजीराव जसें म्हणतील तसेंच कबूल करून त्यांस व चिमाजी आपांस सत्वर पुण्यास आणावें. हा निरोप जुन्नरास परशुरामभाऊंच्या कानीं पडतांच त्यानीं त्याप्रमाणें उभयतां श्रीमंताची स्वारी बाहेर काढण्याची तजवीज केली.

आपणास आणण्याकरितां नानानीं भाऊंस पुण्याहून पाठविलें व हे दोघेही आपल्या म्हणण्यास कबूल झाले ही गोष्ट बाजीरावसाहेबांच्या मतें मोठी सुदैवाची झाली. शिंद्यांशीं आपण करार केला आहे खरा, परंतु त्यांस सवाकोट रुपये व पंचवीस लाखांची जहागीर द्यावी लागणार; त्यापक्षीं नानाचें आमंत्रण पतकरावें हें फार चांगलें! यांत कोणास कांहीं द्यावें घ्यावें लागत नाहीं व कोणती जोखीमही शिरावर राहत नाहीं. कोणतीही अट न घालतां नाना व भाऊ मोठ्या गौरवानें आपणास राज्यावर नेऊन बसावितात. यांच्याशीं

आपलें नीट जमलें तर बरेंच झालें. तुम्ही वेळेवर आलां नाहीं, सबब आतां आम्हीं तुमचें कांहीं देणें लागत नाहीं, असा शिंद्यांस जबाब देतां येईल. नानाची कांहीं गडबड दिसून आल्यास शिंद्यांशीं झालेला करार आहेच. त्याजकडून नानाचा बंदोबस्त सहज करितां येईल. हे विचार या वेळीं बाजीरावांच्या मनांत घोळत होते. असो.

जुन्नरचे दक्षिणेस बाराबावडीजवळ पुण्याहून गेलेला पेशवे सरकारचा सरंजाम जाऊन उतरला होता व डेरेही दिले होते तेथें माघ व० तृतीया गुरुवार शके १७१७ ता० २५ फेब्रुवारी सन १७९६ या दिवशीं श्रीमंत बाजीरावसाहेब येऊन राहिले. चिमाजी-आपांच्या वयास बारावें वर्ष संपत आलें होतें. त्यांस मात्र बाजीराव-साहेबांनीं बरोबर घेतलें आणि आपली स्त्री व अमृतराव व त्यांचे पुत्र विनायकराव यांस जुन्नरासच ठेविलें. कैलासवासी दादासाहे-बांच्या वेळचे कारखाने, कापड, जवाहीर, नाटकशाळा, वगैरे सर्व सरंजाम तेथेंच राहिला. शागीर्दपेशापैकीं जुजबी माणसें व थोडे विश्वासू कारकून मात्र स्वारीबरोबर आले. श्रीमंत डेरेदाखल झाल्या-पासून खडकीच्या मुक्कामास येतपर्यंतचा सविस्तर तपशील एका पत्रांत दिलेला आहे. त्यांतले उतारे इंग्रजी तारखा घालून आम्ही येथें देतों.

" श्रीमंत राजश्री बाजीराव साहेब व चिमाजी आपा...... मुहूर्तेंकरून निघाले. दोघेही अंबारींत बसले होते. पुण्याहून कला-बतूची अंबारी आली होती त्या अंबारींत भाऊसाहेब बाजीरावसाहे-बांस बसावें म्हणत होते. तेव्हां उत्तर जाहलें जे, कलाबतूच्या अंबा-रींत बसविणार आपणच आहांत ! आज बसत नाहीं. स्वारीच्या पुढें सांबाची पालखी निघाली. मागाहून स्वारी चालती जाहली. दुसरे दिवशीं श्रीमंतांस चतुर्थीचें उपोषण होतें, सबब मुक्काम जाहला. त्या दिवशीं संध्याकाळीं स्वारी तयार होऊन घोड्यावरून शिवनेरी किल्ला उजवा घालून किल्ल्याच्या पश्चिमेस शिवाभवानी अर्ध्या डोंगरांत आहे तेथें जाण्यास निघाले. मार्गीं लांबदस्त मैदान पाहून श्रीमंत उभे

राहिले व पटवर्धन मंडळीस व आबा शेलूकर यांस आज्ञा केली जे, भरधांव घोडीं टाकणें. त्यावरून पटवर्धनांपैकीं रघुनाथराव नीलकंठ व हरि परशुराम व नारायणराव गंगाधर यांनीं घोडीं टाकलीं व आबा शेलूकर यानींही टाकिलीं. तेथून देवीचे दर्शनास गेले. दर्शन घेऊन किल्ल्याच्या उत्तरेस श्रीपंचलिंगेश्वर म्हणून स्वयंभू लिंग आहे तेथें गेले. दर्शन करून कुकडी नदीवर सायंसंध्येस गेले. संध्या करून दोन घटका रात्रीस गोटास स्वारी आली.

"ता. २७ फेब्रुवारी रोजीं जुन्नराहून श्रीमंतांचें कूच जालें. स्वारी घोड्यावरच होती. दोनप्रहरीं श्रीलेण्याद्रि म्हणोन गणपति अष्टविनायकांतील, त्याचे दर्शनास गेले. दर्शन करून जाते समयीं डोंगर चढोन जावयाचा होता. चढाव फार नीट होता. तेव्हां उभयतां श्रीमंत पायउतारा बरोबर रघुनाथराव व हरिपंत ( उभयतां पटवर्धन ) यांबरोबर चढोन गेले. चढोन जाण्याचा श्रीमंतांस बहुतसा आयास नाहीं. सहजांत आहे. श्रीगणपति डोंगर तासोन आंत आहे. मंडप उत्तर दक्षिण चाळीस हात व पूर्व पश्चिम पस्तीस हात येणेंप्रमाणें मध्यें खांब नसतां मंडप आहे. डोंगरच कोरलेला आहे. तेथून स्वारी उत्तुरास श्रीकपर्दीश्वर म्हणून लिंग आहे तेथें जाऊन दर्शन घेऊन वोसारास मुक्कामास आले. उत्तुरास मामलेदार याणीं फलाहाराचें केलें होतें."

"ता० २८ रोजीं कूच झालें. स्वारी घोड्यावरच होती. वोसारच्या गणपतीच्या दर्शनास गेले. अष्टविनायकांतील गणपति. त्याचें दर्शन करून स्वारी चालती जाली. मार्गीं नारायणगांवाजवळ आंबराईंत निद्रा केली होती. चिमाजी आपा यांचा फराळ जाला. नारायणगांवच्या मामलेदारानीं मिठाई व फळफळावळ आणिली होती. स्वारी चालती जाली. पुढें लांबदस्त मैदान पाहून भाले खेळावयास लागले. रघुनाथराव दादा व हरिपंत व नारायणराव यांस भाले खेळावयास बोलाविलें. भाले खेळून स्वारी मौजे वडगांव नजीक कळंब घोडनदीतीरीं मुक्कामास दाखल जाले.

ता० २९ रोजीं तेथून कूच जालें. अंबारींत स्वारी जाहली होती. खवाशींत भाऊसाहेब होते. चिमाजी आपांच्या खवाशींत रघुनाथराव दादा होते. पेठ म्हणून गांव आहे तेथील आंबराईंत दोनप्रहरीं स्वारी आली. तेथें निद्रा जाहली. आपासाहेबांनीं फराळ केला. सहा घटका दिवसास तेथून स्वारी घोड्यावर बसून चालती जाहली. मार्गी भाले खेळले. अस्तमानीं स्वारी खेडच्या मुक्कामास दाखल जाली. तेथें सिद्धेश्वर म्हणून स्वयंभू लिंग आहे त्याचें दर्शन घेऊन डेऱ्यास आले. ता० १ मार्च रोजीं गोविंदराव पिंगळे पुण्याहून यावयाचे होते, त्यांचे बोलण्यासाठीं मुक्काम जाला. उभयतां श्रीमंत प्रातःकाळीं भीमास्नानास गेले होते. माध्यान्ह स्नानास एकटे बाजीरावसाहेब गेले. माध्यान्हिक करून देवदर्शन घेऊन सोळा घटका दिवसास भोजनास गेले.

" ता० २ मार्च रोजीं कूच झालें. स्वारी घोड्यावरच होती. चाकणच्या गढीजवळ स्वारी आली तेव्हां गढीवरून पांच तोफांचे बार जाहले. सायंकाळीं मोशी येथें मुक्कामास आले. त्या दिवशीं पुण्याहून नानानीं श्रीमंतांकरितां वस्त्रें व जवाहीर कंठी, चौकडा, व शिरपेंच याप्रमाणें पृथक् पृथक् उभयतांस व दोन भरजरी अबदागिऱ्या येणेंप्रमाणें भाऊसाहेबांकडे पाठविलें. त्याणीं श्रीमंतांस प्रविष्ट केलें. परंतु श्रीमंतांनीं त्याचा उपयोग न करितां तें तसेंच ठेवून दिलें. "

" ता० ३ मार्च रोजीं मोशीहून चौदा पंधरा घटकांस कूच जालें. वाटेंत तीन कोसांवर बाग व आंबराई फार सुंदर होती तेथें निद्रा जाली, ते सायंकाळच्या सहा घटका दिवसास उठले उपरांतीक द्राक्षें, अंजीर भक्षून पोषाक घेऊन तयार जाले. तों भाऊसाहेबांनीं सांगून पाठविलें कीं, स्वारी अंबारींत व्हावी. तेव्हां उत्तर जाहलें जे, ' आज घोड्यावरच बसतों, उदईक अंबारींत बसूं ; याप्रमाणें भाऊंस सांगोन काय उत्तर होतें तें सांगावें, त्याप्रमाणें करूं. ' भाऊसाहेबानीं 'उत्तम' म्हणून सांगितलें नंतर घोड्यावर स्वार जाले. मार्गी चार पाव्या उभयतां खाशांनीं घोडीं फेरलीं. सायंकाळच्या चार घटका दिवसास पुण्याजवळ खडकी येथें मुक्कामास आले. दोनप्रहरीं निद्रा आंबराईंत

जाली होती तेव्हां मालीट दोन चार इंग्रजांसह घोड्यावर बसोन व एक हत्ती येणेप्रमाणें बागेभोंवते फिरोन सारी स्वारी पाहून आपले ठिकाणास गेले."

वाटेंत एके दिवशीं श्रीमंतांनीं नारायणराव गंगाधर यांस भोजनास बोलाविलें होतें. त्यांबरोबरच श्रीपतराव मोरेश्वर यांसही आमंत्रण होतें. त्यावेळीं नारायणरावांशीं श्रीमंतांचें संभाषण झालें त्याचा अनुवाद पुढें दिल्याप्रमाणें:—

श्रीमंत:—तुम्ही किती बंधु ?

नारा०:—चौघे बंधु.

श्रीमंत:—मातोश्री आहेत कीं ?

नारा०:—मातोश्री देवाधीन जाहली. सापत्न माता आहे.

श्रीमंत:—त्यांस काय मुलें आहेत ?

नारा०:—एक पुत्र आहे. आम्ही प्रत्यक्ष तिघे. सापत्न एक.

श्रीमंत:—तुम्हांस काय मुलें आहेत ?

या प्रश्नास उत्तर न देतां नारायणराव स्वस्थ राहिले. पण श्रीपतरावांनीं श्रीमंतांच्या प्रश्नास उत्तर दिलें.

श्रीपतराव:—अद्यापि मुलें नाहींत. बायकोस रजोदर्शन देखील नाहीं.

श्रीमंत:—यांस वर्षें किती आहेत ?

श्रीपतराव:—सतरा वर्षें.

श्रीमंत:—माझे मतें वीसबावीस वर्षें असतील ! तथापि या वयांतही मुलें होतात. गुदस्तां विठलराव खर्ड्याच्या लढाईंत कामास आले ते तुमचे कोण ?

नारा०:—आमचे चुलत चुलत बंधु.

श्रीमंत:—सारी पटवर्धन मंडळी किती होईल ?

नारा०:—तीस चाळीस असामी होईल.

श्रीमंतः—झाडून लहानथोर ?

नारा०:—चाळीस पन्नास पुरुष होतील.

श्रीमंतः—मोठें कुटुंब व सरदार मातबर ! असे सरदार शिंदे होळकर व हे आहेत म्हणोनच राज्य क्षेम आहे.

पंक्तींतला एकजणः—नानाचाही बंदोबस्त अधिक !

श्रीमंतः—नाना एकटे काय करितील ? असे मातबर सरदार असावे !

पुन्हां आणखी एका वेळीं श्रीमंतांनीं नारायणराव यांस भोजनास बोलाविलें त्या वेळेचा वृत्तांत स्वतः नारायणराव यानींच लिहिला आहे तो असा; " परवां गुरुवारीं मला श्रीमंतांनीं रात्रौ भोजनास बोलाविलें होतें. बोलवावयास कारकून चार घटका रात्रीस आला. पात्रें मांडिलीं होतीं तों सरकारचें बोलावणें आलें. ' तेव्हां आज्ञेप्रमाणें येतों ' म्हणून कारकुनापाशीं सांगितलें. ( मग भाऊसाहेबांची आज्ञा घेऊन ) सहा घटका रात्रीस श्रीमंतांच्या डेऱ्यास गेलों. तां श्रीमंत स्नान करून धोतरें नेसत होते. मला पहातांच ' नमस्कार करूं नका; कपाळीं कांहीं लाविलें नाहीं, ' म्हणोन आज्ञा जाली. धोतरें नेसून कुदळ्यांत जाऊन संध्येस बसले. मला राजश्री अपाजीराम सहस्रबुद्धे घेऊन सांबाचे दर्शनास राहुटींत गेले. पंचमुखी स्फटिकाचें लिंग बहुत अपूर्व आहे. उपरांतिक श्रीमंत बसले होते तेथें गेलों. नमस्कार जाला. पाट बसावयास खाशानीं आणून देविले; आणि मला पुसिलें, ' येथून कारकून गेला ते समयीं तुम्ही काय करीत होतां ? ' तेव्हां मी विनंति केली जे, ' संध्या करून भोजनास गेलों तों महाराजांची आज्ञा आली. त्याजवरून वरकड मंडळीस भोजन करावयास सांगून मीं आलों. ' तेव्हां श्रीमंत बोलले, ' पटवर्धनांच्या घराण्याची धन्य आहे ! भोजनास पात्रावर गेले असतां आज्ञा जातांच निघोन आले. घराण्याची रीत बहुत चांगली ! घराणें थोर. मातबर सरदार ! ' इतकें बोलले. उपरांतिक भोजनास

गेले. मीं सोंवळा होऊन गेलों. भोजनसमयीं भात वाढला तेव्हां दुसरे ( एका ) गृहस्थानें आचारी यास पुसलें; 'आज भात कोणते तांदळांचा ? वास येत नाहीं !' तेव्हां श्रीमंत बोलले, 'पुण्याचा क्षय व पापाचा उत्कर्ष जाला, याजमुळें धान्यांचें व वनस्पतींचें तेज गेलें.' उपरांतिक बोलले, 'गंगातीरीं वास असावा किंवा नानाचा तरी समागम असावा ! आमचे दौलतींत मनुष्य आहे; पैका नाहीं ! नानाचा समागम असल्यास सर्व गोष्टी घडतील. नबाबांनीं पैका जमा केला; ( पण त्यांजवळ ) मनुष्य नाहीं.' उपरांतिक मजकडे हात केला आणि बोलले, आमचे दौलतींत असले सरदार; त्याअर्थी नबाबाकडून पैका घ्यावयास काय अशक्य आहे ? पैका मिळेल; परंतु मनुष्य मिळणें दुर्लभ आहे !"

परशुरामभाऊंचे फडणीस बाबा काळे यांनीं बाजीरावसाहेबांविषयीं या प्रकरणांतल्या एका पत्रांत पुढील आशयाचा मजकूर लिहिला आहे:—

"श्रीमंतांचें शरीरसामर्थ्य चांगलें आहे. गोरे फार नाहींत. परंतु नाकडोळे चांगले आहेत. वित्पन्न आहेत. बोलणें फार पाहिजे. माणसाचा कंटाळा नाहीं. स्नानसंध्या फार आहे. अठरावे घटकेस भोजन होतें. रात्रौ बारावे घटकेस भोजन होतें. एकादशी केवळ निरशन करितात. तीन स्नानें करितात. धर्माविषयीं वासना बहुत आहे. कृपणपणा अगदीं नाहीं. देवब्राह्मण यांजवर निष्ठा फार आहे. कांहींशी वृत्ति (धर्म) भोळी आहेशी भासते. चिमाजीआपाही पाहिले. गोरे फार आहेत. चपळ व बुद्धिवान् आहेत. परंतु येथें क्रोध कांहीं जाजती आहेसा भासतो. तथापि श्री॥ राजश्री बाजीरावसाहेब यांची मर्जी बहुत राखतात....बाजीरावसाहेब आजपावेतों अज्ञातवासीं होते. त्यांस विना समजून सांगितल्याशिवाय आगत स्वागत कोणास कसें करावें हें अंमळसें अवघड पडतें. परंतु धूर्त आहेत. समजतात लौकर. कोणताही कारभार करणें तरी एक वर्ष पावेतों दुसऱ्याचें काम लागेल. मग स्वतः करितील यांत संदेह नाहीं."

इतके उतारे पुष्कळ झाले. यांवरून बाजीरावसाहेबांची मूर्ति, त्यांच्या बुद्धीची जाति, त्यांचें मतलबी व गोड भाषण, त्यांचा दांभिकपणा, दुसऱ्यावर छाप पाडण्याविषयींची त्यांची अक्कल, या सर्व गोष्टी दिसून येतील.

जुन्नराहून पुण्यास येईपर्यंत श्रीमंतांच्या मुखांतून पटवर्धन व नाना यांच्या स्तुतीखेरीज अक्षरच निघत नव्हतें! पटवर्धनांच्या गोटांत सामान्यतः जरी बाजीरावसाहेबांचें सौजन्य, बुद्धिमत्ता, व धार्मिकपणा याबद्दल जिकडे तिकडे वाहवा ऐकूं येत होती; तरी जे चाणक्ष व लोकव्यवहाराचे अनुभवी लोक होते त्यांस श्रीमंतानीं सर्वदा आपल्या भाषणांत साखर पेरण्याचा सपाटा लावलेला पाहून त्यांच्या मनाचा व वचनाचा कितपत मेळ आहे याविषयीं शंका आल्याखेरीज राहिली नसेल!

श्रीमंतांची स्वारी खडकीच्या मुक्कामीं आल्यावर ता० ५ मार्च दिवशीं पहांटेचे आठ नऊ घटका रात्रीस त्यांच्या भेटीकरितां पुण्याहून नाना फडणीस आले. श्रीमंतांनीं त्यांचा बहुत गौरव केला. पुनः त्याच दिवशीं मानकरी मंडळी बरोबर घेऊन नाना पुनः श्रीमंतांच्या भेटीस गेले. त्या प्रसंगींसुद्धां श्रीमंतांनीं त्यांशीं बहुत मर्यादेचें वर्तन केलें व मुद्दाम उठून फुलांचा तुरा नानाचे पागोट्यांत खोविला! याप्रमाणें भेटीचा समारंभ झाल्यावर नानांनीं श्रीमंतांस सांगून पाठविलें कीं आजच वाड्यांत जावयास मुहूर्त उत्तम आहे. त्यावर बाजीरावसाहेब म्हणाले कीं, आज आमची घाततिथि आहे, तेव्हां जाणें प्रशस्त नव्हे. त्यांत नाना सांगतील तो आमचा मुहूर्त! यावर नाना कशाला उत्तर देतात! ते स्वस्थ बसले. श्रीमंतांच्या मनाचा त्यांस अजमास पहावयाचा होता तो त्यांस वरील उत्तरांतच सांपडला! कारण कीं घाततिथीची सबब श्रीमंतांनीं सांगितली तो केवळ बहाणा होता! एकट्या नानावर सर्व भिस्त टाकून त्यांस राज्य मिळवावयाचें नव्हतें. अजून त्यांचे हात दोन्ही डगरींवर होते. जशी त्यांस नानाची मर्जी बिघडूं द्यावयाची नव्हती तसेंच शिंद्यांचेंही मन त्यांस दुखवावयाचें नव्हतें. नानाच्याच बुद्धीस लागून आपण शनवार वाड्यांत यजमान म्हणून

जाऊन राहिलों तर याणीं आपली जरूर ठेविली नाहीं असें शिंद्यांस वाटणार! याकरितां कांहीं तरी सबब सांगून श्रीमंतांनीं तो प्रसंग टाळला.

नानांनीं बाजीरावसाहेबांच्या मनाचा रोंख ओळखला व आपल्या सुरक्षितपणाबद्दल श्रीमंतांच्या भाषणावरून व वर्तनावरून त्यांस दिवसेंदिवस अधिक शंका येऊं लागली. सवाईरावसाहेबांभोंवतीं तुम्ही आपलीं माणसें ठेवीत होतां व वाटेल त्यांशीं वाटेल तें बोलूं देत नव्हतां, पण आपणास कांहीं तें सहन होणार नाहीं; हें श्रीमंतांनीं नानास प्रथमच बोलून दाखविलें! -मग नानांनीं परशुरामभाऊंच्या द्वारें श्रीमंतांशीं बोलणें घातलें कीं मजविषयीं आपल्या मनांत निखालस सरळ बुद्धि आहे हें जर खरें आहे, तर आपण तसें मला लिहून द्यावें व गंगाजळी म्हणजे गंगाजळाची शपथ करावी. म्हणजे मीही तसेंच करून आपली खातरजमा करीन. तें श्रीमंतांनीं मान्य केलें व नानांस शपथपूर्वक पत्र लिहून दिलें. त्या पत्राचा तर्जुमा डफ्साहेबानीं आपल्या इतिहासांत दिला आहे व त्याचें पुनः मराठी रूपांतर करून आम्ही नानाफडनविसांच्या चरित्रांत छापिलें आहे. तें असें,

" आम्ही परमेश्वरास स्मरून अंतःकरणपूर्वक गतगोष्टी विसरून गेलों आहों. यापुढें तुम्हीही सत्य स्मरून वागावें. आम्ही तुम्हांस किंवा तुमच्या पक्षाच्या मनुष्यास शब्दानें किंवा कृतीनें, अंतरिच्छेनें किंवा बाह्य कृतीनें, कधीं पीडा देणार नाहीं. किंवा कोणास तसें करूं देणार नाहीं. या कामीं आम्ही कोणाचें ऐकणार नाहीं. मनाचा निश्चय ढळूं देणार नाहीं. आम्ही तुमच्या कीर्तीस ज्या रीतीनें कलंक लागेल असें वर्तन करणार नाहीं. जर तसें करण्यास कोणी आम्हांस प्रवृत्त करूं लागेल तर त्याचें नांव आम्ही लागलेंच तुम्हांस सांगूं. तुमच्या संमतीशिवाय आम्ही कोणासही प्रतिबंधांतून सोडणार नाहीं. तुमच्या व आमच्या एकोप्यानें यापुढें राज्यकारभार चालविला जाईल. आजपासून तुम्ही जें जें कराल तें आम्हीं केलें असें समजावें. आम्ही मनांतून तुम्हांविषयींचा संदेह सर्वथा काढून टाकिला आहे. "

पुण्यास हीं वर्तमानें झालेलीं ऐकून बाळोबा तात्याच्या अंगाचा तिळपापड झाला. पूर्वी आपणाशीं करार केला असतांही आपली अपेक्षा न ठेवतां बाजीरावसाहेब नानांच्या बोलावण्यावरून पुण्यास गेले म्हणून त्यांवर बाळोबाचा मोठा घुस्सा झाला होता व आपणास न जुमानतां नानानीं श्रीमंतांस आणिलें म्हणून नानांवरही त्यांचा फारच घुस्सा झाला होता. बाजीरावसाहेबांनीं देऊं केलेले रुपये नानांकडून-नच काढले पाहिजेत व नानांस कारभारांतून काढिलें पाहिजे असें बाळोबानीं पक्कें ठरविलें होतें. त्यास अनुसरून त्यांच्या वल्गना सुरू झाल्या. " नानानींच जन्मभर कारभार करावा असें कोठें आहे? त्यानीं कारभार सोडून घरीं बसावें. पेशवाईच्या खजिन्यांतला पैका आजपर्यंत त्यांनीं दाबून ठेविला आहे तो आतां आम्हीं त्यांपासून फौजेच्या खर्चाकरितां घेणार. ते ऱ्या बोलानें न देतील तर त्यांस धरून आणून आम्ही भरपाई करून घेऊं. " याप्रमाणें ते व त्यांचे अनुयायी मुत्सद्दी व सरदार शिंद्यांच्या लष्करांत बडबड करीत ती प्रत्यहीं नानाच्या कानावर येऊं लागली.

आपल्या प्रतिपक्ष्यांवर कांहींतरी कुभांड रचून त्याचा चोहों-कडे पुकारा करावा व त्या खोट्या सबबीवर कलहास प्रवृत्त व्हावें हा कुटिल राजनीतीचा एक नेहमींचा प्रकार आहे. आबा चिटणीस म्हणून महादजी शिंद्यांचा एक विश्वासू कारभारी होता. त्याचें व बाळोबाचें वांकडें होतें. आबा चिटणीस हल्लीं पुण्यांत होता व नानांशीं त्याचें सख्य होतें. आबा व नाना व नानाचे धनवान् अनु-यायी या सर्वांस एकदम चोपतां यावें म्हणोन बाळोबांनीं शिंद्याच्या लष्करांत असा पुकारा केला कीं, आबा चिटणिसांनीं आपणावर मारेकरी घातले व आपल्या फौजेंत फितूर करण्यासाठीं चार दोन लाख रुपयेही वांटले. आबाच्या या दुष्ट कर्मांत बाबा फडके, दादा गद्रे, गोविंदराव पिंगळे, राघोपंत गोडबोले वगैरे नानांची सर्व मंडळी सा-मील असून खुद्द नानासही हा बेत कांहीं समजला होता. असा पुकारा बाळोबानीं करितांच त्याचा प्रतिध्वनि पुण्याच्या गटारयंत्रांतून नानाप-

कारें व जोरजोरानें होऊं लागला. इतकें झाल्यावर मग काय विचारावें ? शिंद्यांच्या लष्करांत शेणवी कारभाऱ्यांच्या अद्वातद्वा बकवा सुरू झाल्या कीं, असल्या नीच कर्मांत सामील होऊन आमचा घात करण्याचा ज्यांनीं यत्न केला ते कितीही मोठे असले तरी आम्ही त्यांचें पारिपत्य करूं. त्यांची बेअब्रू करूं आणि पुण्याच्या रस्त्यांतून त्यांची धिंड काढूं !

या बातम्यांवरून बाळोबा वगैरे मंडळीच्या मनांतील द्वेष व अतिप्रसंग करण्याविषयीं त्यांची उत्कंठा उघड दिसत होती व तीस अनुसरून शिंद्यांची फौजही पुण्याकडे येतच होती. ' सर्व फौज घेऊन येऊं नये. फक्त पांच हजार स्वार घेऊन यावें,' असें नानानीं श्रीमंतांकडून शिंद्यांस पत्र लिहविलें, पण तें शिंद्यांनीं जुमानिलें नाहीं. याच कामाकरितां गोविंदराव पिंगळे यांची रवानगी शिंद्यांकडे केली गेली होती. परंतु फौजेचें कूच थांबविण्याच्या बाबतींत पिंगळे यांचाही इलाज चालला नाहीं. तेव्हां पुढील अनर्थ लक्षांत आणून नानानीं स्वपक्षीय लोकांस आपलीं बायकामुलें व वित्तविषय पुण्यांतून काढून दूर पोंचविण्याविषयीं सूचना केली, व आपल्या स्त्रीची रायगडास रवानगी केली. नंतर त्यांनीं श्रीमंतांकडे जाऊन विनंती केली कीं, आपलें पत्र शिंद्यांनीं जुमानलें नाहीं. त्यांचें आमचें वांकडें पडलें आहे त्याअर्थी येथें राहून आमचा परिणाम नाहीं. आपण आज्ञा द्याल तर कांहीं दिवस मी साताऱ्यास जाऊन राहतों. श्रीमंतांच्या मनांत नानांस जाऊं द्यावयाचें नव्हतें, परंतु नानांचा आग्रह व परशुराम भाऊंची रदबदली पाहून त्यांच्या जाण्यास रुकार देणें श्रीमंतांस भाग पडलें. नाना स्थलांतर करितात ही बातमी बाळोबातात्यांस कळतांच त्यांनीं गोविंदराव पिंगळे यांस सांगितलें कीं, नाना स्थलांतर कां करितात ? नानांचा कारभार आम्ही काढीत नाहीं. आमचे कांहीं मुद्दे आहेत ते त्यांनीं कबूल केले म्हणजे तंटाच मिटला. ते मुद्दे असे ( १) आमच्या लष्करांत ज्यांनीं फितूर केला त्यांस हवालीं करावें अथवा त्यांपैकीं प्रत्येकाबद्दल आम्ही खंड घेण्याचें ठरवूं तो द्यावा. ( २ ) खर्ड्याच्या

स्वारींतली खंडणी नबाबाकडून यावयाची ती अद्यापि आली नाहीं; तथापि त्या खंडणींपैकीं एकोणतीस लक्ष रुपये आम्हांस देण्याचें ठरलें आहे ते तुम्हींच द्यावे. ( ३ ) आम्हांस फौजेची बळकटी करावी लागल्यामुळें खर्च पडला आहे तो भरून द्यावा. ( ४ ) मोरोबादादांस कैदेंतून सोडावें. ( ५ ) आपली मुक्तता करण्याबद्दल मोरोबानीं आम्हांस तुम्हांपासून पैका घ्यावयास सांगितलें आहे. सबब आजपर्यंत मोरोबाच्या कारकुनीचा ऐवज काय चाळीस पन्नास लाख रुपये तुम्हांजवळ जमला असेल तो आम्हांस द्यावा. ( ६ ) बीड व पाथरी हे दोन महाल सरकारांतून आम्हांस देववावे. ( ७ ) पेशवाईचा कारभार यापुढें गैरवाजवी रीतीनें करणार नाहीं असें आम्हांस लिहून द्यावें. ( ८ ) निजामअलीवर आम्ही स्वारी करणार आहों त्या स्वारींत सरकारच्या फौजा घेऊन तुम्हीं आम्हांस सामील व्हावें.

याप्रमाणें हे बाळोबाचे आठ मुद्दे होते व त्याचा निष्कर्ष नानांपासून जितकें निघेल तितकें द्रव्य काढून त्यांस गोगलगाय बनवावें असा होता. परंतु बाळोबांस वाटत होतें तितके नाना फडणवीस अद्यापि सामर्थ्यहीन झाले नव्हते हें पुढें दिसून येईलच. शिंद्यांचें सैन्य फार जवळ आल्यामुळें यापुढें पुण्यास राहणें सुरक्षित नाहीं हें समजून त्यानीं ता. २१ मार्च रोजीं आवशीस पुण्याहून कूच केलें. त्यांबरोबर त्यांचें स्वतःचें पथक व रास्ते व प्रतिनिधि यांची तीन हजार फौज व आणखी किरकोळ पागा मिळून एकंदर पांच सहा हजार स्वार होते. नानाबरोबर जावयास कोणी शिलेदार फारसे खुषी नव्हते. गारद्यानीं तर बरोबर जाण्याचें साफच नाकारलें. पांच सहा हजार फौज तरी नानाबरोबर गेली हें केवळ परशुरामभाऊंच्याच खटपटीचें फळ होय ! इतकीं वर्षे मुखत्यारीनें पेशवाईचा कारभार हांकणारे नाना फडनवीस आणि त्यांची ही दशा ! विपत्तीच्या काळांत कोणी कोणाचा नव्हे एवढें मात्र खरें !

नाना पुण्याहून निघाले ते दुसरे दिवशीं दोन प्रहरीं पुरंदरच्या माचीस दाखल झाले. भोजनोत्तर तेथून कूच करून

वस्तीस बंदनच्या किल्ल्याजवळ गेले. दुसरे दिवशीं तेथून निघून रात्रौ साताऱ्यास जाऊन पोंचले. त्या शहराजवळ करंजें म्हणून खेडें आहे तेथें त्यांचा मुक्काम होता व आपापल्या सोईप्रमाणें वेण्णेच्या कांठावर त्यांची फौज उतरली होती.

तुकोजी होळकर पुण्यास होते त्यांच्या शरीरीं अर्धांगवायूचा उपद्रव झाल्यामुळें ते हैराण होते. दत्तक घेण्याविषयीं यशोदाबाईस जरी त्यानीं पत्र लिहून दिलें होतें तरी पुढें ते शिंद्याच्या मसलतींत मिळाल्यामुळें नानांचें व त्यांचें फारसें रहस्य नव्हतें. तरी पुण्याहून जाण्यापूर्वी ता. १९ मार्च रोजीं बाजीरावसाहेबांची व तुकोजी होळकरांची त्यांनीं भेट करविली. त्या वेळीं श्रीमंतांजवळ स्वतः नाना व बाबा फडके व आपा बळवंत हे हजर होते.

श्रीमंत पुण्यास येण्यापूर्वीच त्यांच्या सद्गुणांची कीर्ति आबाल-वृद्धांच्या तोंडीं झाली होती. ते पुण्यास आल्यावर त्यांस पाहण्या-विषयीं लोक फार आतुर झाले होते. एके दिवशीं ते पर्वतीस जाणार व तेथून वाड्यांत येणार अशी बातमी पसरली होती त्यावरून " शहरां-तील हजारों लोक पर्वतीस स्वांरी पहावयास गेले. सर्वांस आनंद जाहला. चार महिन्यांत आज आनंदाचा दिवस उदय जाहला म्हणून परस्परें संतोषाच्या गोष्टी बोलत असत. मातबर गृहस्थ व बायका पर्वतीस गेल्या. शहरांतही लोक आपले माड्यांवर तमाशा पहावयास बसले होते. " परंतु श्रीमंत पर्वतीसही गेले नाहींत व वाड्यांतही आले नाहींत, त्यामुळें या लोकांची निराशा झाली. तथापि शिवरात्रीस बाजीरावसाहेब पाषाणास गेले तेव्हां त्यांचें दर्शन घेण्याची संधि बहुत लोकानीं साधली. त्यावेळीं " श्रीमंतांस पहा-वयाकरितां पुण्यांतील साहुकार व उदमी व गोरगरीब व कसबी लोक बहुत आले होते. गाड्या शेंपन्नास सावकारांच्या होत्या. फार दाटी जाली होती. मालीटही हत्तीवर बसून स्वांरी पहावयाकरितां आला होता. "

## श. १७१७ बाजीरावसाहेब पुण्यास येतात. इ. स. १७९६

ज्या दिवशीं नाना सातान्यास पोंचले त्याच दिवशीं पुण्यांत बाजीरावसाहेबांच्या नांवाची द्वाही फिरली व त्याच दिवशीं दौलतराव शिंद्यांचा मुकाम आळंदीस आला. आपण आल्याची गोष्ट चोहोंकडे जाहीर करण्याकरितां तेथें त्यानीं तोफांचे पंचवीस चाळीस बार केले. ता. २४ मार्च रोजीं श्रीमंतांच्या व शिंद्यांच्या भेटी झाल्या. " श्रीमंतांची मर्जी शिंद्यांवर बहुत संतुष्ट जाहली. यांच्या योगें कृतकृत्य जाहलों असा भाव दर्शविला. आपल्या गळ्यांतील मौक्तिकांची माळ शिंद्यांच्या गळ्यांत घातली. आपल्या पागोट्यांतील फुलांचा तुरा आपल्या हातें काढून शिंद्यांचे मस्तकीं लाविला. " " आपली श्री एतन्मूलक असा भाव दर्शविला. " ' मला पेशवाई शिंद्यांनीं दिली. त्यांची सर्फराजी सर्वात्मना करावयाची. त्यांस अंतर द्यावयाचें नाहीं. ' असें प्रसन्नतेनें बोलत असतात. ' याप्रमाणें भेटीचा समारंभ झाल्यानंतर शिंदे आपल्या गोटास गेले. शिंद्यांचा बहुमान करून त्यांस प्रसन्न करण्याविषयीं यद्यपि बाजीरावसाहेबांचा प्रयत्न अव्याहत सुरू होता, तथापि त्यांजवर शेणवी कारभारीमंडळ जें त्वेषानें जळफळत होतें त्याचें समाधान बिलकुल झालें नाहीं. नानास कारभारांतून काढावें ही बाजीरावसाहेबांचीही इच्छा होतीच. परंतु शिंद्यांच्या चढेल कारभाऱ्यांची गुर्मी उतरण्याकरितां तूर्त त्यानीं नानाकडेच आपला ओढा असल्याचा कल दाखविण्याची सुरुवात केली. पण त्यामुळें त्यांस कांहीं फायदा न होतां सात आठ महिनेपर्यंत पराकाष्ठेचा त्रास व काळजी मात्र सोसावी लागली.

शिंद्यांच्या भेटी झाल्यानंतर त्याच रात्रीस वीस घटकांनंतर श्रीमंतांची स्वारी समारंभानें पुण्यांत येऊन शनवारवाड्यांत राहिली. " खडकीवरून पुणें उजवें घेऊन भवानीपेठ रविवारांतून बुधवारच्या झेंड्याजवळ मोठ्या रस्त्यास मिळोन सरकारचा वाडा उजवा घेऊन दिल्ली दरवाजानें स्वारी वाड्यांत गेली. देवघरांत जाऊन देवांस नमस्कार करून बाईसाहेब यांजवळ पाव घटका बसून आले. थोरल्या पुढील चौकांत बैठक केली होती. " मसनदीजवळ येऊन श्रीमंतांनीं

मसनदीस नमस्कार केला व तिजवर बसले. परंतु कोणाचे नजराणे घेतले नाहींत. तोफखान्याच्या दरोग्यांस हुकूम झाला होता कीं, सवाई रावसाहेब पुरंदराहून पुण्यांत रहावयास आले त्यावेळीं तोफांचे जितके बार केले असतील तितके आजच्या प्रसंगीं करावे. त्यावरून दरोग्यांनीं पन्नास साठ बार केले. त्या दिवशीं या सुप्रसंगानिमित्त हजार बाराशें रुपये दानधर्मही करण्यांत आला.

ता. २५ मार्च दिवशीं श्रीमंतांचा बेत पर्वतीस जावयाचा होता. परंतु शिंदे भेटीस येणार असें कळल्यावरून तो बेत रहीत झाला. त्या दिवशीं श्रीमंतानीं खाजगीवाले व दप्तरदार वगैरे अंमलदार लोकांस बोलावून आणून आमचा हुकूम घेतल्याखेरीज कांहींएक करूं नये अशी ताकीद केली व इतर प्रकारांनींही आपला मालकीचा अधिकार लोकांच्या निदर्शनास स्पष्टपणें आणण्याचा उपक्रम केला.

त्या दिवशीं सायंकाळीं दौलतराव शिंदे भेटीस आले तेव्हां त्यांची कारभारी मंडळी त्यांबरोबर होती. भेटी झाल्यावर खलबत चार सहा घटका झालें. श्रीमंतांवर ओढवणाऱ्या संकटाचें व बाळोबाच्या भावी राजकारणाचें बीज याच खलबतांत उत्पन्न झालेलें असल्यामुळें हा प्रसंग महत्वाचा आहे. या प्रसंगीं शिंद्यानीं श्रीमंतांजवळ मागणी केली कीं, आपणास राज्यावर बसविण्याकरितां आपण आम्हांस सवाकोट रुपयांची रक्कम द्यावी असा आपला व आमचा करार झालेला आहे. त्या रकमेपैकीं पंचवीस लक्ष रुपये आज द्यावे. यावर श्रीमंत बोलले कीं, कराराप्रमाणें तुम्ही वागलां नाहीं सबब तो करार आतां रद्द झाला ! तुम्हीं जुन्नरास येऊन आम्हांस पुण्यास आणावें, तों तुम्हांआधीं परशुरामभाऊ येऊन पोंचले. तथापि आठ दिवस आम्हीं तुमची वाट तेथें पाहिली. तुम्ही आलां नाहीं. पुण्याजवळ येऊनही पंधरा दिवस होत आले तेव्हां आतां कोठें तुम्ही आलां आहां. सबब पूर्वींचा करार आतां राहिला नाहीं ! तथापि फौजेचा खर्च तुम्हांस पडला आहे हें खरें आहे, व त्याबद्दल तुम्हांस पैका देणेंही वाजवी आहे. पण नाना येथें नाहींत,

व जामदारखान्यांत तर एक पैसाही नाहीं, तेव्हां तुम्ही मागतां ही रक्कम आम्हीं कोठून द्यावी ? नानास कारभारांतून काढण्याविषयीं जो तुम्हीं हेका धरिला आहे तो सोडून द्यावा व त्यांशीं मिलाफ करून घ्यावा; म्हणजे मग द्रव्याला काय तोटा ? श्रीमंतानीं याप्रमाणें उड-वाउडवीचा जाबसाल सांगितला तो शिंदे व त्याचे कारभारी यानीं ऐकून घेतला. ते मनांत चपापले व रागावले; परंतु आपलें इंगित त्यानीं बाहेर दिसूं दिलें नाहीं. नानांशीं सख्यच केलें पाहिजे व त्यांच्या मनांतलें भय घालविलें पाहिजे, इत्यादि औपचारिक भाषणें करून ते निघून गेले.

सातान्यास जाऊन महाराजांकडून पेशवाईच्या अधिकाराचीं वस्त्रें घ्यावयाचें काम मात्र आतां राहिलें. त्या कामासाठीं श्रीमं-तांची स्वारी शनिवार तारीख २६ मार्च रोजीं वाड्यांतून निघून गारपिरावर येऊन राहिली. दुसऱ्या दिवशीं तेथेंच मुक्काम होता. शिंदे होळकर यांस बरोबर घेऊन पेशवाईचीं वस्त्रें घेण्याकरितां श्रीमंतानीं सातान्यास जावें असें ठरलें होतें. परंतु स्वारीबरोबर येण्याविशीं होळ-कर टाळाटाळ करूं लागले. त्यांची प्रकृति बरीच बिघडली होती व फौजेची तयारी चांगली नव्हती, तरी श्रीमंतांच्या मनांतून त्यांस बरो-बर घेतल्याशिवाय जावयाचें नव्हतें. सबब गारपीरच्या मुक्कामावर असतां बाजीराव साहेब मुद्दाम होळकरांकडे भेटावयास गेले. त्याणीं फार आग्रह केल्यावरून होळकरानीं येण्याचें कबूल केलें. तरी अखे-रीस ते आले नाहींतच. गारपिरावरून तळ हालवून २८ व्या तारखेस श्रीमंत खराडीवर राहिले. पांच मुक्काम तेथें झाले. शिंदे खडकीवर होते ते आपल्या फौजेसह याच मुक्कामीं लष्करास येऊन सामील झाले. नंतर ता. २ एप्रिल दिवशीं खराडीहून कूच करून थेऊरच्या मुक्कामास स्वारी आली. तेथून पुढें सातान्याकडे जाण्याचा श्रीमंतांचा मार्ग खुंटला ! थेऊरच्या मुक्कामावर बरेच दिवस लष्कर राहिलें होतें. त्या अवधींत तेथें अनेक किचाटें व कलागती निर्माण होऊन मोठी गडबड झाली. त्या गडबडींत शेणवी व पटवर्धन यांच्या राजकारणास निराळेंच वळण

लागून बाकीचे कोकण्ये त्यांतून वगळले गेले. त्याचें पर्यवसान बाजीराव साहेबांस प्रतिबंध होण्यांत व पेशवाईच्या पदावर चिमाजी आपांची स्थापना होण्यांत झालें ! तो प्रकार कसकसा झाला हें पुढील प्रकरणीं वर्णन करण्यांत येईल.

---

नं. ३६७०. ( माघ शु० ६–१४ फेब्रु. )

परशुरामभाऊंकडून बाळासाहेबांस पत्र.–रवाना ४ साबान. सन सीत तिसैन.

" जुन्नरास जाण्याचा मजकूर प्रातःकाळीं लिहिलाच आहे. रविवारीं मोशीचे मुक्कामास घोड्यांस दाणावैरण होऊन लागलेच कूच करून रातोरात्र गेलों. तुम्हीं जासुदांची डांक बसविली आहे ती उदईक राऊतांची बसवावी. "

नं. ३६७१. श्रीगणराज. ( माघ शु० ९–१७ फेब्रु. )

अपत्यें[1] विठोबानें दोन्ही कर जोडून सा॥ नमस्कार. विज्ञापना तागायत छ० ७ साबान पावेतों यथास्थित असे. विशेष. आम्ही पुण्याहून निघाल्याचें पत्र बाळाजी गणेश याणीं वडिलांस लिहिलेंच आहे. रविवारीं अडीच प्रहर अजमासें दिवस आल्यावर पुण्याहून निघालों. मोसीच्या पुढें इंद्रायणी नदीवर मुक्काम केला. इतक्यांत राजश्री नानांची चिठी आली जे, शिंदे जुन्नरानजीक येणार. रातोरात जावें. त्याजवरून वडिलानीं[2] अर्ध रात्रीच्या पूर्वीं कूच केलें. सारी रात्र चालोन सूर्योदयास नऊ कोस जमीन आलों. तेथून खेडावरून वडगांवास आलों. वडिलानीं तेथें शिवपूजा केली. सडे जेवण जाहलें. मीं वडिलांचे पंक्तीस भोजन केलें. तीर्थस्वरूप राजश्री बाबासाहेब[3] व चिरंजीव राजश्री महादाजीपंत दाजी यांजबरोबर फौज देऊन वडिलानीं जुन्नरास उपाशींच रवाना केलें. वडीलही अस्तमानीं आले. शिवनेर किल्ला जुन्नर शहर पिछाडीस टाकून कुकडी नदीवर उतरलों.

---

१ विठ्ठलराव पांडुरंग यांचें बाळासाहेबांस पत्र. २ परशुरामभाऊनीं. ३ उभयतांही परशुरामभाऊंचे पुत्र.

आहों. वडिलांबरोबर हुजूरपागा व रास्ते वगैरे आहेत. शागीर्दपेशा जासूद, चोपदार, बोथाटीबारदार, खिजमतगार, वगैरे व अंबाऱ्या जिलिबीसुद्धां आहेत. रा॥ आबाजीपंत सहस्रबुद्धे वगैरे वडिलांचे भेटीस आले होते. पुढें बेत कैसा ठरतो पहावा. शिंदे येथून पांच सहा गांवांवर आहेत. मुलखाची नासाडी बहुत होत आहे. शिंदे आपलें कुटुंब बऱ्हाणपुरास लावून देऊन कातवांर पिछाडीस ठेवून या रोखें यावें हा बेत होता. अत:पर कैसा बेत होतो पहावा. फौजही जमा येथें होत आहे. बाणांच्या कैच्या व जंबुरे दोन आहेत. वडील व तीर्थस्वरूप राजश्री दादासाहेब असे मंगळवारीं बारा घटका दिवसाचे आंत श्रीमंतांचे भेटीस गेले होते. भेट घेऊन माघारे आले. सेवेशीं विदित होय हे विज्ञापना.

नं. ३६७२. श्री. ( माघ शु० ९–१० फेब्रु. )

चिरंजीव राजश्री बळवंतराव[1] यांसीं प्रती परशुराम रामचंद्र. आशीर्वाद. उपरी छ० ४ साबानीं जुन्नरास यावयाकरितां पुण्याहून निघाल्यानंतर तेच दिवशीं सविस्तर मजकुराचीं पत्रें देवजी येवला खिजमतगार याजबराबर व डांकेवरून रवाना जाहलीं आहेत. पावलीं असतील. जुन्नरास छ० ५ साबान इंदुवारीं अस्तमानीं आलों. गांवच्या पश्चिमेस नदीच्या पाण्यावर मुक्काम आहे. राजश्री बहिरोपंत मेहेंदळे व गोविंदराव पिंगळे यावयाचे होते यामुळें इंदुवारीं श्रीमंताची भेट घेतली नाहीं. छ० ६ रोजीं उभयतां आले. मग त्यांसहवर्तमान तेरा घटका दिवसास भौमवारीं श्रीमंतांचें दर्शन मुहूर्ताच्या निकडीमुळें घेऊन आलों. शिंदे यांजकडील रा॥ रामजी पाटील येथें आले आहेत. याउपर बोलणीं होतील व ठरेल तें मागाहून लिहितों. चिरंजीव राजश्री नारायणराव यांची व रा॥ आपाजी गोविंद यांची गांठ पडल्याची खबर नाहीं. येथून आपाजी गोविंद यांस दोन तीन पत्रें निकडीनें येण्याकरितां पाठविलीं आहेत. त्यांतून एका पत्राचा जाब कूच केल्याचा आला. येथें येऊन पोंचल्यावर लिहून पाठवितों. रवाना छ० ७ साबान. चिरंजीव आपाजीपंत उद्यां अथवा परवां येतील. येथील काम अवघड

---

१ कुरुंदवाडकर.

आहे. लौकर उलगडेल असें वाटत नाहीं. कांहीं दिवस येथें लागतील असें वाटतें. सविस्तर बोलणें झाल्यावर लिहितों. छ० ७ साबान. बहुत काय लिहिणें लोभ करावा हे आशीर्वाद.

नं. ३६७३. ( १८ फेब्रुवारी. )

घोंडो बापूजी जोशी यांचे बाळासाहेबांस पत्र माघ शु ॥ १० चें पुण्याहून—

" वडील यजमानांस[1] जुन्नरास जाऊन आज चार रोज जाले. खाशांच्या व वडिलांच्या भेटी जाल्या. समागमें रास्ते फौज समेत व पंतप्रतिनिधीची फौज हजारपर्यंत व पागा सात आठ व गाडदी तीन हजारपर्यंत, फरासखान्याचें सामान लहान मोठे सवाशें उंट भरून गेलें. बोथाट्या, इटेकरी, व पट्टेकरी, चोपदार, व भालदार, सोन्याचे काठीचे चोपदार, जरीलगी, खासबारदार असामी शंभर, व हुद्देदार निकीबदार ( ? ) शंभर, अंबाऱ्या नव्या तीन, व पालख्या नव्या चार, हुजूपागांपैकीं घोडीं कोतवाल वीस सरंजामसुद्धां, शिवाय बारगीर सलनत झाडून पाठविलें. बळवंतराद नागनाथ पहिले कैदेंत होते त्यांजला काल रात्रीस कुरडू किल्ल्यावर नेलें अशी बाजार बातमी आहे. रा॥ बाळाजी विष्णु सहस्रबुद्धे येथें आहेत. विसाजीपंत वाडदेकर यजमानांबरोबर गेले आहेत. "

नं. ३६७४. श्री. ( माघ शु. ११–१९ फेब्रु. )

पै॥ छ० १० साबान. सन सीत तिसैन. माघ मास.

श्रीमंत राजश्री नारायणराव साहेब स्वामीचे सेवेशीं.

विनंती सेवक धोंडो बापूजी जोशी साष्टांग नमस्कार विज्ञापना. तागायत माघ शु० ११ पावेतों सुखरूप असों. विशेष. आपण पत्र[2] छ० ८ साबानचें पाठविलें तें पावलें. ती॥ रा॥ भाऊसाहेबांचा मुक्काम कोठें आहे वगैरे मजकूर लिहिणेविसीं लिहिलें, त्यास श्री॥ रा॥ भाऊसाहेबांचा मुक्काम जुन्नरावर आहे. श्रीमंतांच्या भेटी मंगळवारीं प्रहर दिवसास भेटी जाल्या. बुधवारीं भेटीस जाणार होते त्याचे

१ परशुरामभाऊंस. २ पत्र पुण्याहून.

पूर्वीच श्री॥ रा॥ बापूसाहेबांकडील भोई आला होता तो आजच जुन्नरास गेला. शिंदे अद्याप गंगेवरच आहेत. राजश्री आबा शेलूकर भागानगराहून काल पुण्यास आले. होळकर पुण्यानजीक खडकीचे पुलावर आहेत. पुढील प्रकार निश्चयांत आला नाहीं. श्री॥ रा॥ बाळासाहेब यांचीं पत्रें मिरजेचीं पाठविलीं तीं पावलीं. कळावें बहुत काय लिहिणें. जुन्नरास जावयाचे जासूद आतांच पुढें गेले. कळावें बहुत काय लिहिणें. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

नं. ३६७५. (माघ शु० १४–२१ फेब्रु.)

बाळाजी विष्णु सहस्रबुद्धे यांचें बाळासाहेबांस पत्र पुण्याहून ११ साबानचें—

" तूर्त जुन्नराकडील वर्तमान श्रीमंत राजश्री बाजीराऊ यांचें बोलणें आम्हांस दौलतीवरी बसवावें. भाऊ, नाना, सांगतील त्याप्रमाणें चालवूं. चिमाजी आपास देत नाहीं. याप्रमाणें आहे. येथील मर्जी चिमाजी आपास बसविणें अशी आहे. घडेल तें खरें. अस्त सरल्याखेरीज जुन्नर सुटत नाहीं. "

नं. ३६७६. **श्रीगणपति.** (माघ शु० १५–२२ फेब्रु.)

पै॥ छ० १८ साबान. सुरू सन सीत तिसैन.

चिरंजीव राजश्री बळवंतराव व रामचंद्रपंत आपा यांसी आशीर्वाद. उपरी जुन्नरास[1] आलों, बोलणीं जाहलीं, या मजकुराचीं पत्रें पेशजी पाठविलीं आहेत. पावलीं असतील. येथील बोलण्याचा ताळा बसत नाहीं. शिंदे यांच्या राजकारणावर व स्वार्थावर वोढ फार आहे. शिंदे याणीं आपला कंपू पुढें बराणपुरास रवाना केला होता तो त्याणीं माघारा आणविला. त्यांतून एक पलटण बाराशें माणसांचें व सहा तोफा व बाणांच्या कैच्या अडीचशें येणेंप्रमाणें सरंजाम येऊन त्यांचा मुक्काम टोकराच्या अलीकडे सात आठ कोसांवर आहे तेथें दाखल जाहला. बाकीचा येणार आहे. फौजही जमा करूं लागले. बोलण्यांतही हुशारीचे भाव स्पष्ट बोलतात. याप्रमाणें

---

१ पत्र जुन्नराहून.

सरकारांतून कारकून त्यांजपाशीं आहेत त्यांचें लिहिलें सरकारांत आलें व आम्ही एक दोन कारकून येथून मुजरद बातमीकारितां त्यांच्या लष्करांत पाठविले आहेत त्यांचेंही लिहिलें तसेंच आलें. होळकराकडे त्यांचा कारकून राजकारणास आला आहे व हुजुरातींतही राजकारण चाललें आहे. मुधोळकर घोरपडे यांचें लक्ष तिकडेच आहे. आणखी लहानमोठीं नांवें फार आहेत. त्यांजकडील बाळोबा पागे अंशेंकरून या प्रकरणीं हुशारी व तरतूद करूं लागल्याचा अन्वय सरकारच्या कारकुनाजवळ बोलोन दाखवितात व धमकही सांगतात. सरकारांतून हुजुरात जमा होत आहे. पागे वगैरे यांस लोक जमा करण्याची ताकीद व निकड चालली आहे. येथेंही कलमजारी आहे. सारांश खुळास प्रारंभ जाहला ! शेवट कसकसा होतो पहावें. रवाना छ० १२ साबान. हें पत्र तयार जाहल्यावर ठराव जाहला त्याची पुरवणी अलाहिदा लिहिली आहे त्याजवरून कळेल. रवाना छ० १२ साबान बहुत काय लिहिणें लोभ कीजे हे आशीर्वाद.

नं. ३६७७. ( माघ शु. १५–२२ फेब्रु. )

गणेश गोविंद सखदेव यांचें जुन्नराहून बाळासाहेबांस पत्र १२ साबानचें—

" पु॥ सेवेशीं विज्ञापना. इकडील सविस्तर श्रीमंत राजश्री भाऊसाहेब यांणीं लिहिलें आहे त्याजवरून विदित होईल. रा॥ बहिरोपंत मेहेंदळे व रा॥ गोविंदराव पिंगळे व श्रीमंत राजश्री भाऊसाहेब यांचीं बोलणीं नित्य होतात, आणि श्रीमंत राजश्री बाजीराव साहेब यांजकडे नित्य जातात. यांचे चित्तांत धाकटे यजमानाची स्थापना करावयाची असें बोलण्यांत दाखविलें. परंतु थोरल्यानीं उत्तर स्पष्ट सांगितलें जे, दत्तकविषय बोलूं नये. आणि धाकट्यांची स्थापना आपण असतां कशी होईल ? खुद्द आपणास मुख्य स्थानीं न्यावयाचें असल्यास न्यावें. नाहींतर तुमचे चित्तांत आजपर्यंत बाहेरील दत्तक आणावयाची योजना करीत होतां त्याप्रमाणें करावें. आम्हीं आहों

याप्रमाणेंच येथें राहूं. अथवा आणखी कांहीं तुमच्या चित्तांत असल्यास तसेंही करावें ! परंतु दत्तकविषय धाकट्यास व आम्हांस घडावयाचा नाहीं. चाललें आहे याजप्रमाणें चालावें असें असल्यास आम्हांस घेऊन जावें. अशीं त्यांचीं बोलणीं उत्तरें होतात, म्हणोन ऐकण्यांत आहे. हें वर्तमान रा॥ नाना फडणीस यांस सांगावयास रा॥ गोविंदराव पिंगळेच जाणार आहेत. काय ठरतें पहावें. काय तो निश्चय पंचमीचे सुमारें होईल. विदित होय हे विज्ञापना. "

नं. ३६७८. श्रीगणपति. ( माघ व. १–२३ फेब्रु. )

पै॥ छ० १६ साबान. भृगुवार. सन सीत. माघ मास प्रातःकाल.

चिरंजीव राजश्री बळवंतराव व रामचंद्रपंत आपा यांसी आशीर्वाद उपरी. जुन्नरास आलों, श्रीमंतांची भेट जाहली, या मजकुरांचें पत्र पाठविलें आहे. पावलें असेल. बैठका होऊन बोलणीं जाहलीं परंतु ताळा येत नाहीं. श्रीमंत राजश्री चिमाजी आपा यांस देत नाहीं म्हणतात. आपण खुद्द चलावें अशीं बोलणीं जाहलीं त्यास त्यांचें म्हणणें आपलें नांव बाजीराव रघुनाथ असें चालावें. दुसरें नांव करावयाचें नाहीं. त्याजवरून मागती बोलणें केलें कीं, बाजीराव माधव नांव कागदोपत्रीं चालावें. वरकड धर्म श्राद्धपक्षादिक चालतात तसें चालों द्यावें. उगीच नांव मात्र श्रीमंत कैलासवासी माधवरावसाहेब याचें लागावें. तत्राप त्यांच्या चित्तास येत नाहीं. घोळ पडला आहे. याच्या इत्यर्थाविशीं पुण्यास लिहिलें आहे. जाब आल्यानंतर कांय तो समजेल. लिहून पाठवूं. रवाना छ० १३ साबान. बहुत काय लिहिणें हे आशीर्वाद.

नं. ३६७९. ( २३ फेब्रुवारी. )

धोंडो बापूजी जोशी यांचें पत्र बाळासाहेबांस पुण्याहून माघ व॥ १ चें—

" गोविंदराव पिंगळे व रामजी पाटील काल सायंकाळीं जुन्नराहून येथें आले. खलबत होत आहे. राजश्री आबा

शेलूकर जुन्नरास गेले. शिंदे, होळकर, व भोंसले जागच्या जागींच आहेत. "

नं. ३६८०. ( २३ फेब्रु. )

धोंडो बापूजी जोशी यांचें पत्र माघ व॥ १ चें—

' रा॥ गोविंदाराव पिंगळे जुन्नरास जाणार. तोफा दहा रवाना होत आहेत. मुख्य डेरादाखल होणार असें बाजारवर्तमान आहे. "

नं. ३६८१ श्रीगणपति. माघ व. ३—२५ फेब्रु. )

पै॥ छ० १७ साबान. सन सीत तिसैन. माघ मास चार तास रात्र.

चिरंजीव राजश्री बळवंतराव व रामचंद्रपंत आपा यांसी आशीर्वाद उपरी. श्रीमंतांची स्वारी आज गुरुवारीं प्रातःकाळीं दोन घटका दिवसास कुंभ लग्नावर निघावयाचा बेत जाहला होता. परंतु तें लग्न प्रशस्त नाहीं यामुळें दोन प्रहर दिवसास मीन लग्नावर निघावें असा ठराव होऊन लष्करचें कूच जाहलें. जुन्नराच्या दक्षिणेस बाराबावडीजवळ मुक्काम नेमिला आहे. सरकारचा कारखाना उभा जाहला. स्वारी निघोन डेऱ्यास दाखल होतांच लिहून पाठवितों. श्रीकृपेंकरून मोटी गोष्ट जाली. सविस्तर मागाहून लिहितों. छ० १५ साबान. बहुत काय लिहिणें लोभ कीजे हे आशीर्वाद.

नं. ३६८२. श्रीगणपति. ( माघ व० ३—२५ फेब्रु. )

पै॥ छ० १८ साबान. रविवार दोन प्रहर सन सीत तिसैन. माघ मास.

चिरंजीव राजश्री बळवंतराव व रामचंद्रपंत आपा यांसीं आशीर्वाद उपरी. श्रीमंतांची स्वारी छ० १५ रोज गुरुवारीं दोन प्रहर दिवसास जुन्नराहून निघणार असा ठराव होऊन कूच जाहल्या

---

१ बाजीरावसाहेब.

च्या मजकुराचें पत्र छ० मजकुरींच सकाळीं डाकेवरून रवाना केलें आहे. पावेल. योजिल्या मुहूर्तें स्वारी डेऱ्यास दाखल जाहली. समागमें श्रीमंत राजश्री चिमाजी आपा आहेत. श्रीमंत सौभाग्यवती बाईसाहेब व राजश्री अमृतराव जुन्नरांत राहिले आहेत. याउपर दरकूच पुण्यास येत आहों. शिंदे यांजकडील बातमी परवां लिहिली आहे त्याजवर कांहीं विशेष आली नाहीं. रवाना छ० १५ साबान बहुत काय लिहिणें हे आशीर्वाद.

नं. ३६८३. श्री. (माघ वद्य ४–२६ फेब्रु.)

पै॥ छ० १६ साबान. माघ मास. सन सीत तिसैन. सात तास. शुक्रवार.

विज्ञापना. राजश्री बाजीरावसाहेब यांची व श्री॥ राजश्री भाऊसाहेब यांची बैठक एकांतीं दोघांचीच जाली. त्या बैठकेंत भाऊसाहेब यांच्या पायांवरी डोकी ठेऊन पदर पसरून अंजुळीपुट जोडून विनंती केली जे, " मागील द्वेष तुम्हीं मनांत आणूं नये. मी आणणार नाहीं. वडिलांच्या जागां मला आपण मान्य. हाच मनोदय माझा शपथपुरस्कर आहे. धाकट्यास दौलतेवरी बसवावें आणि मीं बंदींत रहावें हें आपल्या विचारास येतें कीं काय?" याअन्वयें बहुत ग्लानतेचीं बोलणीं बोलून अश्रुपात गळूं लागले. तेव्हां त्याहीपेक्षां विशेषात्कारें भाऊसाहेबीं विनंती केली जे, " स्वामी म्हणतात त्यास कबूल आहों. परंतु या गोष्टीचा इतला नानांस देऊन स्वामींस घेऊन जातों. " त्याजवरून गोविंदराव यांस पाठविलें होतें. पत्राचें मनन होऊन विसर्जन व्हावें. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

नं. ३६८४. श्रीगणपति. ( माघ व. ४–२६ फेब्रु. )

पै॥ छ० २५ साबान सन सीत तिसैन. माघ मास.

विज्ञापना. आज्ञापत्र पाठविलें तें पावलें. पत्रीं मी विनंतीपत्र लिहीत नाहीं याजविसीं विस्तारपूर्वक आज्ञा, त्यास वडिलांची आज्ञा घेऊन येऊन चार महिने जाहले. त्यांतील विस्तार पत्रीं लिहावयाचा नाहीं.

---

१ आपाजी गोविंद यांचें बाळासाहेबांस पत्र मिरजेस.

भेटी अंतीं विनंती करीन. हल्लीं पुण्याहून राजश्री नानानीं श्रीमंत उभयतां यांस आणावयाच्या निमित्यें पाठविलें. त्यास येथें येऊन परस्पर बोलणीं होऊन राजश्री गोविंदराव पिंगळे फिरोन पुण्यास जाऊन आल्याउपर श्रीमंतांस माघ वद्य तृतीया गुरुवारीं मिथुन लग्नीं मिथुनराशीस सुमुहूर्ते काढून डेरेदाखल केल्याउपर आजचा मुक्काम आहे. श्रीमंत राजश्री अमृतराव सपुत्र राहिले. श्रीमंत सौ. बाईसाहेबही राहिलीं. वरकड श्रीमंत कैलासवासी दादासाहेबांचे जुने कारखाने, जवाहीर, नाटकशाळा. कापड वगैरे आदिकरोन झाडोन राहिलें. शिंदेही येणार अशी जनवार्ता. उभयतां श्रीमंत योग्य आहेत. त्यांत थोरले श्रीमंत वय लहान होत्साते यश थोर. सहनशीलताही बहुतच. पत्रीं काय लिहावीं? पत्रें न पाठवितां असें लिहिलें, त्यास लाचार जाणोन न पाठविलीं. वडिलीं दरबार वर्तमानें लिहिलींच असतील. कळवावयाजोगे लिहावयाचे अर्थच नव्हते. काय लिहावें ? हल्लीं जाला अर्थ लिहिला आहे. रवाना छ० १६ साबान विदित होय हे विज्ञापना.

वेदमूर्ति राजश्री बाळंभट दाते व नारायणभटजींस साष्टांग नमस्कार विनंती. कृपाकरोन आशीर्वाद वडिलांचे पत्रीं लिहिलेवरोन संमत ( ? ) जाहला. हे विज्ञापना. चिरंजीव राजश्री जिऊबा अण्णा यांस आशीर्वाद.

रा. नागेश बल्लाळ फडके व रा. बाबाजीपंत यांस साष्टांग नमस्कार. सेवेशीं बळवंत लक्ष्मण कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना: सदैव पत्रीं सांभाळ केला पाहिजे. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

नं. ३६८५. ( माघ व. ४–२६ फेब्रु. )

जुन्नराहून बाळाजी हरि पटवर्धन याचें पत्र बाळासाहेबांस–( पै॥ १६ साबान )

विज्ञापना. बाजारी वर्तमान ऐकींव–

---

* पत्रांवर तारीख घातली आहे ती पैवस्तीची आहे.

## श. १७१७ बाजीरावसाहेब पुण्यास येतात. इ. स. १७९६

श्रीमंत राजश्री बाजीरावसाहेब यांस श्रीमंत रा॥ चिमाजी आपासाहेब यांस बाईसाहेबांचे ओट्यांत घालावयास यावें व आपण दिवाणगिरी करावी म्हणोन विनंती केली. परंतु श्रीमंतांचें म्हणणें हा शास्त्रार्थ पोथ्या सोडून पहावा. शास्त्र असल्यावर मग सांगूं. वडील श्रीमंतांचें भाषण ऐकून बहुत खुष जाले आहेत. रामजी पाटील व गोविंदराव पिंगळे रा. नानाकडे पुण्यास गेले आहेत. तेथील हुकूम येईल त्याप्रमाणें बोलणें येथें बोलणार. सर्व बळ शिंदे यांचें. त्यांचे बळाप्रमाणें गोष्टी ठरतील. तूर्त त्यांजकडे डांक बसविली आहे.

आबा शेलूकर सरदार साहेबनौबतसुद्धां येथें येणार. जागा पहावयास जासूद आले होतें; वडील साहेब पायदळ व फौज ठेवीत आहेत.

श्रीमंतांचें म्हणणें आम्हीं दुसऱ्याचे ओट्यांत जावयाचे नाहीं. धणीपण करणें तें मीच करीन. नाहींतर रा॥ नानांचा जीवमान आहे तों ते करितील तें प्रमाण. आमचें अनहित नानानीं केलें नाहीं, आमचें राज्य राखिलें, वगैरे मिष्ट भाषण बहुत करितात. निश्चय नाहीं. शिंदे वगैरे सर्व सरदार जमा व्हावे. पुढें निश्चय होणें तो होईल.

"बहिरोपंत मेहेंदळे व गोविंदराव पिंगळे हे काय आहेत ! आपण वडील. सरदार थोर. चार पिढ्या आपले वडिलांच्या व आमचे वडिलांच्या गुदरल्या. हें येण्यास कोण ?" असें बोलणें श्रीमंतांचें. आपण सांगाल तें मी ऐकणार असें आहे. वडिलांची व श्रीमंतांची एकांतीं गांठ दोन तीन वेळां उभयतांचीच अशी पडली आहे.

येणेंप्रमाणें आढळलें तें वर्तमान विनंती लिहिली आहे.

नं. ३६८६. श्रीगणपति. ( माघ व० ५–२८ फेब्रु. )

श्रियासह चिरंजीव राजश्री नारायणराव यांस प्रती गंगाधरराव गोविंद आशीर्वाद उपरी. येथील कुशल-ता. छ० १८ साबान वर्तमान यथास्थित जाणून स्वकीय लिहीत असावें. विशेष. तुम्ही छ० १५ साबानचीं पत्रें जुन्नरच्या मुक्कामचीं पाठविलीं तीं पावलीं. " श्रीमंत

राजश्री बाजीराव साहेब व श्रीमंत राजश्री चिमाजी आपा व अमृतराव यांचे चिरंजीवसह गुरुवारीं तृतीयेस दोनप्रहरीं डेरेदाखल जाहले. श्रीमंत सौ॥ मातोश्रीबाई व अमृतराव जुन्नरास राहिले. याउपर मजल दरमजल पांचचार दिवसीं पुण्यास स्वारी जाईल. जुन्नरनजीक बारावावडीच्या नजीक मुकाम जाहला आहे; " येविसीं विस्तारें लिहिलें तें कळलें. श्रीमंत डेरेदाखल जाहले ऐकोन परम संतोष जाहला. तुम्हीं खर्चाविशीं लिहिलें, त्यास परवांच तुम्हांस पत्रें पाठविलीं आहेत त्यांत राजश्री विठलराव गोळे यांजवर चिठी पाठविली आहे. पावेल. जासुदाबरोबर पत्रें पाठविलीं तीं अद्याप पावलीं नाहींत. डाक असतां जासुदाबरोबर पत्रें कशास पाठविली ? डाकेवरून पत्रें येत जावीं. चिरंजीव विठलराव बापूस पडशामुळें ज्वर येत असतो म्हणोन लिहिलें, त्यास आरोग्य जाहलेचें लिहावें. प्रतिदिवशीं त्याकडे जात जावें. श्रीमंतांची भेट डेरेस जाहली म्हणोन लिहिलें, उत्तम जाहलें. तेथून कूच जाहलेचें व पुण्यास जावयाचा मूहूर्त श्रीमंतांस कोणे दिवशीं योजिला आहे हें लिहिणें. तिकडील सविस्तर लिहीत जावें. चिरंजीव सौ॥ सखूबाईस ज्वर दोन दिवस फारच आला आहे. फोडचांची धाम आली आहे. उद्यां परवां फोडचांचा ज्वर असल्यास समजेल. बहुत काय लिहिणें हे आशीर्वाद.

पै॥ छ० २१ साबान. सन सीत तिसैन. माघ मास.

नं. ३६८७. ( फाल्गुन–मार्च ).

विठलराव पांडुरंग यांचें बाळासाहेबांस पत्र–

" शिंदे यांचे फितव्यांत दोन चार गृहस्थ आहेत त्यांचें पारिपत्य करावें हा ( बाळोबाचा ) मोठा इरादा आहे. रामजी पाटील येथें आहेत. शहर गडबडलें आहे. मुख्य कारभारी यांस कठिण आहे. कारभारी यांचा ग्रामांतर करावें हा बेत आहे. वडिलांचे मतें येथें रहावें हें वाटत आहे. श्रीमंतांजवळ आपले मंडळीशिवाय दुसऱ्याचा फैलावा नाहीं. पुढें असत्ता प्रमाण ! "

नं. ३६८८. ( फाल्गुन–मार्च. )

बाबूराव शिवाजी म्हैसकर यांचें बाळासाहेबांस पत्र–

पु॥ विज्ञापना. श्रीमंतांची स्वारी जुन्नराहून प्रथम निघाली ते समयीं शिवनेरीचे किल्ल्यावरील पांच तोफा जाहल्या. दुसरे दिवशीं शिवाभवानीस स्वारी गेली तेव्हां पांच तोफा जाल्या. जुन्नरास श्रीमंतांजवळ मंडळी होती त्यांपैकीं हल्लीं बराबर आली बितपशील–

१ गोविंदपंत गडबोले.
१ नागनाथ केशव पागे.
१ बाळाजी रघुनाथ पटवर्धन.
१ गोविंदपंत नामजोशी. हुजूरपागेकडील कारकून.
१ आपाजी राम सहस्रबुद्धे निसबत गाडदी.
१ धोंडो गोविंद गोडबोले. गोविंदपंताचे पुत्र.
१ राघोपंत गुरुजी ठोसर.
१ उपाध्ये.
१३ आश्रित, पुराणीक, ज्योतिषी वगैरे.

येणेंप्रमाणें बराबर आहेत. याशिवाय आचारी वगैरे मिळून पंगतीस पन्नास साठ पात्र होतें. पुण्याहून जुन्नरास फौज व पागा गाडद गेले होते बितपशील–

१ भाऊ साहेब.
१ नारायणराव साहेब.
१ रघुनाथराव दादा.
१ बळवंतराव थोरात यांची पागा.
१ भास्कर जगन्नाथ यांची पागा.
१ दारकोजी निंबाळकर यांची पागा.
१ बळवंतराव मुठे यांची पागा.
१ रास्ते यांजकडील फौज. खासे कोणी नाहींत.
१ काशीपंत मामाकडील गाडद १२०० व जंबुरे ४.
१ विनायकपंत परांजपे यांजकडील गाडद ८००.
१ बळवंतराव नागनाथ यांची पागा. खाशांशिवाय.
१ आबा शेलूकर थोडे सरंजामानिशीं आहेत.

येणेंप्रमाणें बरावर सरंजाम आहे. रोजीं स्वयंपाक तीन होतात. एक सांबाचा नैवेद्य. एक श्रीमंत राजश्री चिमाजी आपांचा. व एक

बाजीराव साहेबांचा थोरली पंगत समुदायासुद्धां, याप्रमाणें होतो. हलीं येथें धारण-जारी सवातीन पायली. हरभरे अडीच. गहूं अडीच पायली. तूप पावणे दोन शेर. गूळ चार शेर. तेल सवाचार शेर. काष्ठें आठनऊ रुपये खंडी. कडबा दरशेंकडा पांच सहा सात रुपये. येणेंप्रमाणें आहे. अमृतराव यांचे पुत्राचें नांव गणपतराव बापू (?) चार वर्षांचा मूल आहे. श्रीमंत राजश्री बाजीरावसाहेब व चिमाजी आपा यांसीं घोड्यावर-बसावयाचा इषक बहुत आहे. दरमजलीस घोडीं फेरावीं. पालखींत स्वारी जालीच नाहीं. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

नं. ३६८९. श्री. (माघ व. ७–१ मार्च.)

पै॥ छ० २३ साबान. सन सीत तिसैन.

सेवेशीं धोंडो बापूजी व मोरो आपाजी साष्टांग नमस्कार. विज्ञापना. तागायत छ० २० साबान. सेवकाचें वर्तमान यथास्थित असे विशेष. छ० १९ साबानचें पत्र कालचें सेवेशीं पाठविलें आहे. पत्र रवाना जाहलेनंतर सायंकाळीं खेडचे मुकामाहून राजश्री बहिरोपंत बाबा मेहेंदळे व रामजी पाटील व गोविंदराव पिंगळे पुण्यास श्रीमंत राजश्री नानांकडे आले. काल बोलणें रात्रौ जाहलें. आबा शेलूकर परवां छ० १९ साबानीं आले. श्रीमंत राजश्री बाजीरावसाहेब व चिमाजी आपा यांच्या व नानाच्या भेटी एकादशीस होणार ऐसें वर्तमान आहे. खडकीस दाणावैरण वगैरे साहित्याचें दास्तान मौजे खडकी येथें पुलानजीक नानानीं केलें आहे. कालचा मुक्काम खेडास श्रीमंतांचा जाहला. मातोश्री बाईसाहेब यांचें श्राद्ध होतें. आणखी एखादा मुक्काम होईल किंवा उदईक कूच होऊन मोशीस मुक्काम होणार असें आहे. उदईक सविस्तर सेवेशीं विनंती लिहितों. हे विज्ञापना.

---

१ गणपतराव याच्या जागीं विनायकराव असें नांव पाहिजे. २ पत्र मिरजेस बाळासाहेबांस. ३ आनंदीबाईचें.

नं. ३६९०. श्री. ( माघ व. ७–१ मार्च. )

पै॥ छ २६ साबान. सन सीत तिसैन. माघमास. इंदुवार. दोनप्रहर.

सेवेशीं बाबूराव शिवाजी व बाबाजी विश्वनाथ चांफेकर कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना. ता॥ छ० २० साबान मुक्काम खडकी नजीक पुणें दीड कोस. स्वामीचे कृपेंकरून सेवकाचें वर्तमान यथास्थित असे. विशेष. इकडील वर्तमान छ० १५ साबानीं गुरुवारीं सोळा घटकांनंतर श्रीमंत राजश्री बाजीराव साहेब व चिमाजी आपा व अमृतराव यांचे चिरंजीव असे त्रिवर्ग मुहूर्तेकरून निघाले. बाजीरावसाहेब अंबारींत बसले. खवाशींत श्रीमंत राजश्री रघुनाथराव दादा. चिमाजी आपांचे खवाशींत श्रीमंत राजश्री हरिपंत बाबा व राजश्री बहिरोपंत मेहेंदळे होते. पुण्याहून कलाबतूची अंबारी आली होती त्या अंबारींत श्री॥ रा॥ भाऊसाहेब बाजीराव-साहेबांस बसावें म्हणत होते. तेव्हां उत्तर जाहलें जे, कलाबतूचे अंबारींत बसविणार आपणच आहांत !! आज बसत नाहीं. तेव्हां ती अंबारी खुलीच राहिली. त्यांत अमृतराव यांचे चिरंजीव यांस बसविलें. स्वारीचे पुढें सांबाची पालखी निघाली. मागाहून स्वारी चालती जाहली. डावे बाजूस श्री. रा. नारायणरावसाहेब यांची फौज होती. उजवे बाजूस रास्ते यांची फौज होती. दुरस्ता कोरबंदीनें गाडदी उभे होते. शिवनेरचे किल्ल्यानजीक बाराबावडी म्हणोन विहीर व बाग आंबराई आहे तेथें मुक्कामास आले. झाडून फौजा तेथेंच आपले आपले विल्हे-वर उतराव्या असा बेत होता, परंतु पाणी फौजेस पुरे असें नाहीं याजकरितां जुन्नरानजीक मुक्काम होता तेथेंच पोहोंचवून माघाऱ्या गेल्या. श्री॥ रा॥ भाऊसाहेब मात्र श्रीमंतांचे डेऱ्यासमीप डेरे देऊन राहिले. झाडून गाडदही तेथेंच होते. ते दिवशीं संध्याकाळीं भाऊ-साहेबानीं नारायणराव साहेब यांजकडे सांगून पाठविलें जे, पांचशें राऊत छबिन्यास पाठवावे. त्याजवरून राजश्री बाबाजीपंत चांफेकर याजबरोबर पांचशे राऊत देऊन छबिन्यास पाठविले होते. रात्रीस

अमृतराव डेऱ्यास श्रीमंतांकडे आले होते. बारा घटका रात्रीस माघारे गेले तेव्हां बाबाजीपंतास आज्ञा जाहली जे, हुजुरास पोहोंचवून येणें. मागाहून अमृतराव यांची स्वारी आली होती ती गेली त्यांजबरोबर-ही राऊत जाणेविशीं आज्ञा जाहली. प्रातःकाळीं बाजीराव यांची स्वारी आली होती ती माघारी गेली तेव्हांही राऊत बरोबर जाण्या-विशीं आज्ञा जाहली होती. अमृतराव यांचे चिरंजीव आले होते ते अमृतराव यांजबरोबर माघारे गेले. दुसरे दिवशीं प्रातःकाळीं श्री॥ रा॥ भाऊसाहेबांची फौज छावणीस आली. उपरांतिक बाबाजीपंत फौज-सुद्धां गोटास गेले. छ० १६ भृगुवारीं तेथेंच मुक्काम जाहला. श्रीमं-तांस ते दिवशीं चतुर्थीचें उपोषण होतें. ते दिवशीं संध्याकाळची स्वारी तयार होऊन घोड्यावरून शिवनेरी किल्ला उजवा घालोन किल्ल्याचे पश्चिमेस शिवाभवानी अर्ध्या डोंगरांत आहे तेथें जावयास निघाले. मार्गीं लांबदस्त मैदान पाहून श्रीमंत उभे राहिले व आमचे यजमान मंडळीस व राजश्री आबा शेलूकर यांस आज्ञा केली जे, भरधांव घोडीं टाकणें. त्याजवरून श्री॥ रा॥ दादानीं व हरिपंत बाबानीं व नाराणरावसाहेब याणीं घोडीं टाकलीं व आबा शेलूकर याणींही टाकलीं. तेथून देवीचे दर्शनास गेले. दर्शन घेऊन किल्ल्याचे उत्तरेस श्रीपंचलिंगेश्वर म्हणोन स्वयंभू लिंग आहे तेथें गेले. दर्शन करून कुकडी नदीवर सायंसंध्येस गेले. संध्या करून दोन घटिका रात्रीस गोटास स्वारी आली व (त्यांबरोबरच) श्री॥ रा॥ नारायणरावसाहेबही डेऱ्यास गेले. तेव्हां श्रीमंतानीं पुसिलें जे, बाळोराव शरीरेंकरून बरे आहेत कीं? चिंता-मणराव तुमचे चुलत बंधु कीं काय? येणेंप्रों पुसिलें. त्यास प्रत्योत्तरही केलें उपरांतिक निरोप घेऊन गोटास आले. छ० १७ रोजीं मंदवारीं कूच जाहलें. स्वारी घोड्यावरच होती. दोनप्रहरीं श्रीलेण्याद्रि म्हणोन गणपति अष्ट विनायकांतील त्यांचे दर्शनास गेले. दर्शन करून जातेसमयीं डोंगर चढोन जावयाचा होता. चढाव फार नीट होता तेव्हां उभयतां श्रीमंत पायउतारा बरोबर दादा व हरीपंत बाबा येणेंप्र॥ चढोन गेले. चढोन जावयाचा श्रीमंतांस बहुतसा आयास नाहीं. सहजांत आहे. श्रीगणपति

डोंगर तासोन आंत आहे. मंडप उत्तर दक्षण चाळीस हात व पूर्व पश्चम पस्तीस हात येणेंप्र।। मध्यें खांब नसतां मंडप आहे. डोंगरच कोरलेला आहे. तेथून स्वारी उत्तुरास श्रीकपर्दीश्वर म्हणोन लिंग आहे तेथें जाऊन दर्शन घेऊन वोसारास मुक्कामास आले. मजल दहा कोसांची जाहली. उत्तुरास मामलेदार याणीं फलाहाराचें केलें होतें तेव्हां आमचे यजमानमंडळीसह फराळ केले. छ० १८ रोजीं रविवारीं कूच होऊन घोड्यावर स्वारी होती. वोसारचे श्रीगणपतीचे दर्शनास गेले. अष्ट विनायकांतील गणपति. त्याचें दर्शन करून स्वारी चालती जाहली. मार्गीं नारायणगांवाजवळ आंबराईंत निद्रा केली होती. चिमाजी आपा यांचा फराळ जाहला. नारायणगांवचे मामलेदारानीं मिठाई व फळफळावळ आणिली होती. आमचे यजमानमंडळीसह फराळ जाहला, आणि स्वारी चालती जाहली. पुढें लांबदस्त मैदान पाहून भाले खेळावयास लागले. श्री।। रा।। दादांस व हरिपंत बाबांस व नारायणरावसाहेब यांस भाले खेळावयास बोलाविलें. भाले खेळून स्वारी मौजे वडगांव नजीक कळंब घोडनदीतीरीं मुक्कामास दाखल जाहले. तेथून छ० १९ रोजीं इंदुवारीं कूच करून अंबारींत स्वारी जाहली होती. खवाशींत श्री।। रा।। भाऊसाहेब होते. श्री।। रा।। चिमाजी आपांचे खवाशींत श्री।। रा।। दादा होते. पेठ म्हणोन गांव आहे तेथील आंबराईंत दोनप्रहरीं स्वारी आली. तेथें निद्रा जाहली. आपासाहेबांनीं फराळ केला. सहा घटका दिवसास तेथून स्वारी चालती जाहली. घोड्यावर स्वारी होती. मार्गीं भाले खेळले. श्री।। रा।। दादा व बाबासाहेब भाले खेळावयास गेले होते. अस्तमानीं स्वारी खेडच्या मुक्कामास दाखल जाहली. खेडास श्रीसिद्धेश्वर म्हणोन स्वयंभू लिंग आहे त्याचें दर्शन घेऊन डेऱ्यास आले. छ० २० रोजीं भौमवारीं राजश्री गोविंदराव पिंगळे पुण्यास गेले होते ते आले. त्यांचे बोलण्याकरितां मुक्काम जाहला. श्री।। रा।। हरिपंत बाबा व नारायणराव साहेब पिंपळखरे यांचे घरीं भोजनास रात्रौ गेले होत. श्री।। रा।। भाऊसाहेब व दादा विडे घ्यावयास गेले होते. वस्त्रें दिलीं. श्री।। रा।। बाजी-

रावसाहेब व आपासाहेब प्रातःकाळीं भीमास्नानास गेले होते. मध्याह्नस्नानास एकटे बाजीराव साहेब गेले. माध्याह्निक करून देवदर्शन घेऊन सोळा घटका दिवसास भोजनास गेले. छ० २१ रोजीं कूच जाहलें. स्वारी घोड्यावरच जाहली होती. चाकणच्या गढीजवळ स्वारी आली तेव्हां गढीवरील पांच तोफांचे बार जाहले. तेथून पुढें येऊन आंबराईंत निद्रा केली. संध्याकाळच्या दोन घटका दिवसास मौजे मोशी येथें मुक्कामास दाखल जाहले. ते दिवशीं पुण्याहून श्री॥ रा॥ नानानीं श्रीमंतांकारितां वस्त्रें व जवाहीर कंठी चौकडा व शिरपेंच याप्र॥ प्रत्येक प्रत्येक उभयतांस व दोन भरजरी अबदागिऱ्या येणेंप्र॥ अस्तमानीं श्री॥ रा. भाऊसाहेबांकडे पाठविलीं. त्याणीं श्रीमंतांस प्रविष्ट केलें. परंतु पुण्याहून आलेल्याचा अद्यापि उपभोग केला नाहीं. छ० २२ रोजीं मोशीहून कूच जाहलें. चवदा पंधरा घटका दिवसास स्वारी चालती जाहली. घोड्यावरच स्वारी जाहली होती तेथून तीन कोसांवर आले. तेथें बाग व आंबराई बहुत शिरा होती त्यांत स्वारी दाखल जाहली. तेथें निद्रा जाहली. श्री॥ रा॥ आपासाहेब याणीं यजमान मंडळींस बोलावणें पाठविलें ती सारी मंडळी गेली. चार घटका बसले होते. उपरांतिक मंडळीसह फराळ जाहला. बाजीरावसाहेब निजले होते ते संध्याकाळचे सहा घटका दिवसास उठले. उपरांतिक द्राक्षें अंजीर भक्षून पोषाख घेऊन तयार जाहले. तों श्री॥ रा॥ भाऊसाहेबानीं विसाजीपंतांबरोबर सांगून पाठविलें जे, स्वारी अंबारींत व्हावी. तेव्हां उत्तर जाहलें जे, आज घोड्यावरच बसतों. उदईक अंबारींत बसूं. याप्रों भाऊंस सांगोन काय उत्तर होतें तें सांगावें त्याप्रों करूं; म्हणोन आज्ञा जाहली. त्याप्रों वाडदेकर याणीं भाऊसाहेबांस विनंती केली. भाऊसाहेबानीं उत्तम म्हणोन सांगितलें. हा निरोप पोहोचतांच घोड्यावर स्वार जाहले. मार्गीं चार पाळ्या उभयतां खाशानीं घोडीं फेरलीं. संध्याकाळच्या चार घटका दिवसास खडकी नजीक पुणें येथील मुक्कामास दाखल जाहले. दोनप्रहरीं निद्रा आंबराईंत जाहली होती तेव्हां मालीट दोन चार इंग्रजसह

घोड्यावर बसोन व एक हत्ती येणेंप्रों बागेभोंवते फिरोन सारी स्वारी पाहोन आपले ठिकाणास गेले. ही बातमी भाऊसाहेबांजवळ आली. संध्याकाळीं श्रीमंतानीं श्री॥ रा. नारायणरावसाहेब यांस भोजनास बोलाऊं कारकून पाठविला व श्रीपतरावभाऊंसही बोलाविलें होतें. सात घटका रात्रीस उभयतां श्रीमंतांचे डेऱ्यास गेले. तेव्हां श्रीमंत राउटींत बसले होते तेथेंच गेले. पाट बसावयास आणून देणेविशीं आज्ञा जाहली. उपरांतिक श्रीमंत राजश्री नारायणरावसाहेब यांस पुसिलें जे, तुम्ही किती बंधु ? तेव्हां यांणीं विनंती केली, चवघे बंधु. तेव्हां आणखी पुसिलें, मातुश्री आहेत कीं ? यांणीं उत्तर केलें, मातुश्री देवाधीन जाहली. सापत्न माता आहे. त्यांस काय मुलें आहेत म्हणोन पुसिलें. तेव्हां उत्तर केलें, एक पुत्र आहे. आम्ही प्रत्यक्ष तिघे. सापत्न एक. येणेंप्रों उत्तर केलें. तेव्हां आणखी पुसिलें, तुम्हांस काय मुलें आहेत ? तेव्हां बोलले नाहींत. मग श्रीपतरावभाऊनीं उत्तर केलें जे, अद्यापि मुलें नाहींत. बायकोस रजोदर्शन देखील नाहीं. तेव्हां श्रीमंत बोलले, यांस वर्षे किती आहेत ? तेव्हां सत्रा वर्षे म्हणून सांगितलें. तेव्हां श्रीमंत बोलले, माझे मतें वीस बावीस वर्षे असतील ! तथापि या वयांतही मुलें होतात असें बोलले उपरांतिक पुसलें, गुदस्तां विठ्ठलराव लढाईंत कामास आले ते तुमचे कोण ? तेव्हां यांणीं उत्तर केलें, आमचे चुलत चुलत बंधु. उपरांतिक पुसलें, सारी पटवर्धन मंडळी किती होईल ? यांणीं उत्तर केलें, तीस चाळीस असामी होईल. तेव्हां बोलले, झाडून लहान थोर ? तेव्हां उत्तर केलें, चाळीस पन्नास पुरुष होतील. तेव्हां बोलले मोठें कुटुंब ! व सरदार मातबर ! असे सरदार शिंदे होळकर, व हे आहेत म्हणोनच राज्य क्षेम आहे ! तेव्हां त्यांजवळील एकजण बोलला, नानांचाही बंदोबस्त अधिक. तेव्हां श्रीमंत बोलले, नाना एकटे काय करतील ? असे मातबर सरदार असावे. उपरांतिक श्रीमंतनीं नारायणरावसाहेब यांस पुसिलें, बाळाराव[1] येतील कीं नाहीं ? तेव्हां उत्तर केलें, आज्ञा जाहली म्हणजे

---

1 बहुतेक्षा असतील.

येतील. तदनंतर भोजनास उठले. भोजनसमयीं श्रीपतरावभाऊंस श्रीमंतानीं पुसलें, पट्टणांत पांडुरंगराव किती दिवस होते ? ते वारल्यानंतर तुम्ही किती दिवस ? मंडळी ब्राह्मण किती व भले लोक किती ? येणेंप्रों पुसिलें. तेव्हां भाऊनीं सारें सविस्तर सांगितलें. भोजन होऊन विडे कलद्रीचे डेऱ्यांत घ्यावयास बसले. उपरांतिक निरोप घेऊन आले. छ० २३ रोजीं श्रीमंतांची स्वारी पाषाणास गेली होती. अंबाऱ्यांत बसले होते. खवाशींत श्री॥ रा॥ भाऊसाहेब होते. येतेसमयीं घोड्यावर स्वारी जाहली होती. छ० २४ रोजीं मंदवारीं पहांटेचे नऊ घटका रात्रीस श्रीमंतांचे भेटीकरितां नाना आले तेव्हां श्री॥ रा॥ नारायणरावसाहेब यांस सरकारचें बोलावणें आलें होतें. गेले होते. भेटी जाहल्या राजश्री आपा बळवंत व पांडोबा बाबा बारामतीकर व भोंसले यांजकडील कारभारी वगैरे आले होते. श्रीमंतानीं लाल पोषाख व जवाहीर अंगावर घातलें होतें. नानास पुष्पांचा तुरा श्रीमंतांनीं दिला. नारायणरावसाहेब यांस श्रीमंत बोलले, फार उशीर यावयास लावलात ! तेव्हां यांणीं विनंती केली, बोलावणें येतांच निघालों. परंतु गोट अंमळ लांब आहे याजकरितां बोलावणें लौकर पावलें नाहीं. बोलावणें येतांच निघालों. उपरांतिक विडे ( श्रीमंतानीं ) आपणच दिले. नानाचीही भेट तेथेंच जाहली. उपरांतिक नाना, व भाऊसाहेब, आपा बळवंत, वगैरे मंडळी मंडपांत येऊन बसली. आणि श्रीमंतांनीं आजच गृहप्रवेश करावा असा ठराव करून श्रीमंतांकडे गोविंदपंत गडबोले यांजबरोबर सांगोन पाठविलें. तेव्हां ' एकादशी घाततिथि ' असें उत्तर जाहलें. मग सारे ज्योतिषी मिळून उदईक रविवारीं पहांटेचे दहा घटका रात्रीं वाड्यांत प्रवेश व्हावा असा निश्चय करून नाना शहरांत गेले. आज दोनप्रहरांनंतर होळकर वगैरे मानकरी यांच्या भेटी डेऱ्यांतच होणार. याउपरी होईल तें मागाहून सेवेशीं लिहितों. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना."

नं. ३६९१. ( २ मार्च. )

धोंडो बापूजी जोशी यांचें बाळासाहेबांस माघ व॥ ८ चें—

" श्रीमंत राजश्री बाजीरावसाहेब यांचा मुक्काम आज मोसीस येणार. काल खेडास भीमातीरीं होता. दास्तान मोसीस केलें आहे तेथें आज येणार. शिंदे याणीं तळ मात्र पहिल्या मुक्कामाहून ढाळाविला. दशमीस श्रीमंत राजश्री नानाच्या भेटी होणार. काल आबा शेलूकर पुण्यास आले आहेत. "

नं. ३६९२. ( माघ व० ८—२ मार्च. )

विठ्ठलराव पांडुरंग यांचें बाळासाहेबांस जुन्नराहून पत्र २१ साबानचें—

" छ० १५ साबानीं बाराबावडीवर मुक्काम जाहल्याचें लिहिलें होतें. छ० १६ रोजीं मुक्काम जाला. छ० १७ रोज मंदवारीं ओझरच्या मुक्कामास आलों छ० १८ रोजीं कळंबच्या मुक्कामास आलों. छ० १९ रोज इंदुवारीं खेडास भीमातीरीं दोन मुक्काम जाले. छ० २१ रोजीं नजीक मोसीवर इंद्रायणीचे पाण्यावर आलों. श्रीमंतांची स्वारी मार्गीं अंबारींत बसले म्हणजे ती॥ रा॥ दादासाहेब व बाबासाहेब खवाशींत बसतात. परवां वडील खवाशींत बसले होते. श्रीमंतांजवळ जुन्नराहून निघाल्यातागाईत सर्व बंदोबस्त चौकीपहाऱ्याचा वडिलांचाच आहे. वडिलांवर व मंडळीवर श्रीमंतांची मर्जी चांगली आहे. श्रीमंतांस पुण्याहून राजश्री नाना फडणीस याणीं भरजरी अबदागीर व उभयतांस पोषाख जवाहीर कंठी शिरपेंच जडाव चौकडा ऐशीं बुधवारीं इंद्रायणीचे मुक्कामीं पाठविलीं. येतांच वडिलानीं घेऊन जाऊन श्रीमंतांस नजर करून पांच घटका रात्रीस बुधवारीं देऊन ( ? ) आपले डेऱ्यास आले. छ० २२ साबानीं पुण्यानजीक मुळेमुठेवर मुक्काम जाहला आहे. आम्ही आपले वाड्यांत येऊन राहिलों आहों. "

नं. ३६९३. ( माघ व० ९–३ मार्च. )

बाळाजी विष्णूकडून बाळासाहेबांस पत्र–रवाना छ० २२ साबान सन सीत तिसैन.

" काल श्रीमंतांचा मुक्काम मोशीवरी जाला. आज खडकीवर मुक्कामास येणार. नानांची भेट मंगळारीं होणार. नंतर दिनशुद्ध चांगली पाहून वाड्यांत येणार असें आहे. परंतु पक्केपणांत नाहीं. भाऊसाहेब व नाना यांची भेट जाल्यावरी मग वाड्यांत यावयाचा ठराव होणार. शिंद्यानीं कूच केल्याची बातमी आली. राजुरी पिंपळगांवच्या मुक्कामास आल्याचें वर्तमान आहे. "

नं. ३६९४. ( ३ मार्च. )

परशुरामभाऊंचें बाळासाहेबांस पत्र–रवाना माघ व॥ ९

" बुधवारीं मुक्काम मोशी अथवा तुळापूर येथें येणार. श्रीमंत राजश्री नानांची भेट तेच दिवशीं होणार. चि॥ रा॥ रघुनाथराव दादा, श्री॥ रा॥ बाजीरावसाहेब यांचे मात्र खवासखान्यांत बसतात. श्री॥ रा॥ चिमाजीआपांचे मागें चि॥ रा॥ बाबा बसतात. शिंद्यानीं दोन टोळ्या केल्या. तेही खडें अथवा मोशी सुमारें येणार. "

नं. ३६९५. ( माघ व० ९–३ मार्च. )

बाबूराव शिवाजी म्हैसकर याचें बाळासाहेबांस पत्र २२ साबानचें मोशीहून—

" श्रीमंत राजश्री बाजीरावसाहेब व आपासाहेब यांचा मुक्काम आज पुण्यानजीक खडकीवर जाणार. श्रीमंतांचीं मर्जी बहुत चांगली आहे. श्रीमंत राजश्री भाऊसाहेबांची मर्यादा बहुत राखितात. स्वारींत दररोज घोडी फेरावयास श्रीमंत राजश्री दादांस व बाबासाहेबांस व नारायणराव साहेबांस बोलावीत असतात. मेहनती चांगले, शरीरेंकडून चांगले बळकट, असे आहेत. बोलणें बहुत समयोचित आहे. "

नं. ३६९६. श्रीगणपति. (माघ व० १०—४ मार्च.)

पै। छ० २६ साबान. सन सीत तिसैन.

चिरंजीव राजश्री बळवंतराव यांसीं प्रती परशुराम रामचंद्र. आशीर्वाद उपरी. आपण छ० १९ साबानचें पत्र स्वदस्तुरचें पाठविलें तें पाहून माघारें पाठविलें आहे. "श्रीमंतांची स्वारी आली, मोठी गोष्ट जाहली. निखालसतेचीं बोलणीं जाहलींच असतील. कसकसा ठराव जाहला हें ल्याहावें. व पेशजी मसुदे होऊन दत्तकप्रकरणीं पत्रें घेतलीं आहेत तीं माघारीं घ्यावीं;" म्हणोन लिहिलें, त्यास श्रीमंतांची स्वारी छ० २२ रोज गुरुवारीं खडकीजवळ नदीकिनाऱ्यास आली. आज भृगुवारीं बेवीस घटका रात्रीस राजश्री नानांची भेट याच तळावर होणार. नंतर वरकड सरदार इत्यादिक यांच्या भेटीचा बेत व पुढील कर्तव्यतेचा निश्चय होईल. जसजसें अमलांत येईल तसें तसें लिहून पाठवूं. निखालसीच्या बोलण्याचा मजकूर तर बोलण्यांत कोणत्या गोष्टीचा पडदा व गुबार राहिला नाहीं. बोलण्यांत व चालण्यांत सरळता बरी दिसते. चिरंजीव मंडळीस वरचेवर भोजनास बोलावीत असतात. काल चिरंजीव राजश्री नारायणराव व श्रीमंतराव भाऊ उभयतां गेले होते. परिणाम लागेल तो सुदिवस! माया चांगली दाखवितात. शिंदे यांच्या लष्करांतून बातमीवाल्याचें पत्र आलें त्याची नक्कल पहाणेकरितां पाठविली आहे त्याजवरून तिकडील रंग समजेल. सारांश त्याची नजर वांकडी आहे. लोकांच्या आणशफता जाहल्या व दारूगोळी वांटली व माघारें कूच होणार, तेव्हां मगरूरीचें दिसतें. श्रीकृपेकरून श्रीमंतांचें येणें येथपावेतों निर्विघ्नपणें जाहलें आहे. याउपर कसकसा प्रसंग पडतो पहावें. पत्रें माघारीं घेण्याची गोष्ट स्मरणांत आहे. रवाना छ० २३ साबान. बहुत काय लिहिणें लोभ असों द्यावा हे आशीर्वाद.

नं. ३६९७. श्रीगणराज. ( माघ व० १०–४ मार्च. )

+अपत्यें नारायणानें दोन्ही कर जोडून शिर सा॥ नमस्कार विज्ञापना. तागायत छ० २३ साबान मुक्काम खडकी नजीक पुणें दीड कोस. वडिलांचे आशीर्वादेंकरून सुखरूप असों. विशेष. काल मौजे मोसीहून पत्र पाठविलेंच आहे. तेथून श्रीमंतांची स्वारी चवदा पंधरा घटका दिवसास निघाले. उभयतां श्रीमंत घोड्यावर होते. तेथून तीन कोस एक बाग अंबराई चांगली होती तेथें आले. आणि तेथें निद्रा केली. श्रीमंत राजश्री चिमाजी आपानीं आम्हांस सर्व भाई मंडळीस बोलावणें पाठविलें. त्यांजपाशीं जाऊन बसलों. फराळ जाला. उपरांतिक स्वारी निघाली. दोन घटका दिवस अस्तमानचा होता तेव्हां स्वारी गोटास आली. काल रात्रीं मला भोजनास कारकून बोलावयास आला होता. व ती॥ राजश्री श्रीपतरावभाऊंसहा बोलाविलें होतें. सात घटका रात्रीस सरकारचे डेऱ्यास गेलों. श्रीमंत राहुटींत बसले होते तेथें गेलों. आम्हांस पाट बसावयास देविले. उपरांतीक पुसलें, "तुम्ही किती बंधु?" तेव्हां मीं उत्तर केलें कीं, " चवघे बंधु. " " मातोश्री आहेत कीं?" म्हणोन पुसलें, तेव्हां विनंती केली जे, " प्रत्यक्ष मातुश्री देवाधीन जाहल्या. सापत्न माता आहे. आम्ही तिघे बंधु" व एक सापत्न बंधु येणेंप्रमाणें विनंती केली. तेव्हां आणखी श्रीमंतानीं पुसलें, " गुदस्तां लढाईंत विठलराव धोंडदेव पडले ते तुमचे कोण? " तेव्हां मीं विनंती केली, " चुलत चुलत बंधु. " तेव्हां पुसलें, " तुमची पटवर्धन मंडळी सारी किती? " तेव्हां मी विनंती केली, " तीस चाळीस असामी. " तेव्हां पुसलें, " झाडून लहान थोर किती ? " मीं विनंती केली, " पन्नास होतील. " तेव्हां बोलले, " मोठें घराणें? मातबर सरदार! असे सरदार चार आहेत म्हणून राज्य क्षेम आहे " उपरांतिक भोजनास उठले भोजनसमयीं श्रीपतरावभाऊंस पुसलें, " तुम्ही किती दिवस कारागृहीं होतां? पांडुरंगराव किती दिवस होते?

---

+ पत्र बाळासाहेबांस.

मंडळी किती होती ? " तेव्हां भाऊनीं प्रत्योत्तरें केलीं. भोजनें होऊन विडे घ्यावयास कलर्द्रीचे ( ? ) डेऱ्यांत गेले. मला पुसलें, " तुम्हीं नेहमीं नेहमीं यावें ते कां येत नाहीं ? " तेव्हां मीं विनंती केली, " येत जाईन. " तेव्हां आणखी पुसलें, " बाळाराव[1] इकडे येतील कीं नाहीं ? " तेव्हां मीं विनंती केली, " आज्ञा जाली म्हणजे येतील. " उपरांतिक निरोप घेऊन गोटास आलों. आज स्वारी पाषाणास जाणार व आज रात्रीं नाना भेटीस येणार असें आहे. परंतु निश्चय नाहीं. सेवेशीं विदित होय हे विज्ञापना.

नं. ३६९८. श्रीगणराज. ( माघ व० ११–५ मार्च.)

×अपत्यें नारायणानें दोनी कर जोडून शिर सा।। नमस्कार विज्ञापना. तागायत छ० २४ साबान मुक्काम खडकीनजीक पुणें दीड कास. वडिलांचे आशीर्वादेंकरून सुखरूप असों. विशेष. काल श्रीमंतांची स्वारी पाषाणास गेली होती. जातांना अंबारींत स्वारी जाली होती. खवाशींत तीर्थस्वरूप राजश्री भाऊसाहेब होते. श्रीमंत राजश्री चिमाजी आपाचे खवाशींत तीर्थस्वरूप राजश्री हरिपंत बाबा होते. येतसमयीं स्वारी घोड्यावर जाली होती. एक घटका रात्रीस स्वारी गोटास आली. आज मंदवारीं पहाटेचे आठ नऊ घटका रात्रीस राजश्री नाना श्रीमंतांचे भेटीकरितां आले. मलाही सरकारचें बोलावणें आलें होतें. मी गेलों होतों. स्वारी कलद्रीचे डेऱ्यांत बैठक जाली होती. श्रीमंतानीं लाल पोशाख केला होता व जवाहीर कंठी, चौकडा, शिरपेंच व मोत्यांचा तुरा येणेंप्रमाणें उभयतां श्रीमंतांचे अंगावर होते. नानाबरोबर राजश्री आपा बळवंत व दादा गद्रे व राजश्री पांडुरंगराव बारामतीकर व भोंसले यांजकडील कारभारी वगैरे मंडळी होती. भेटी जाल्या. दीड घटका बसले होते. विडे घेऊन नाना मंडपांत येऊन बसले. माझी व नानाचीही भेट जाली. उपरांतिक नानानीं श्रीमंतांकडे रा।। गोविंदपंत गोडबोले म्हणोन फड-

---

१ बाळाराव म्हणजे बाळासाहेब ( गंगाधरराव गोविंद. )

× पत्र बाळासाहेबांस मिरजेस,

णिशीकडील जुन्नरास होते त्यांजबरोबर बिनंती सांगोन पाठविली जे, आजच वाड्यांत जावयास मुहूर्त उत्तम आहे. ही सूचना पूर्वी वडिलानीं केली होती व श्रीमंतानीं मान्य केलें होतें. एकादशीस घाततिथि हें ध्यानांत नव्हतें. तेव्हां श्रीमंतानीं गोविंदपंतांबरोबर सांगून पाठविलें जे, आज घाततिथि आहे, तेव्हां जाणें प्रशस्त नव्हे. त्यांत नाना सांगतील तो आमचा मुहूर्त ! ज्योतिषी बरोबरच आहेत, निश्चय करावा; म्हणोन सांगोन श्रीमंतानीं पाठविलें. त्याजवरून उद्ईक रविवारीं पहांटेच्या दहा घटका रात्रीस गृहप्रवेश करावा असा ठराव होऊन नाना शहरांत गेले. श्रीमंतांजवळ मीं जाऊन नमस्कार केला. तेव्हां श्रीमंत बोलले, फार उशीर केलात. तेव्हां मीं विनंती केली, बोलावणें येऊन पोंचतांच निघालों. परंतु गोट अमळसा लांब आहे याजकरितां थोडासा विलंब लागला. श्रीमंतांस बोलावयास फार पाहिजे. आज रा॥ तुकोजी होळकर वगैरे मानकरी यांच्या भेटी दोनप्रहरानंतर डेऱ्यांतच व्हाव्या असा बेत जाला आहे. उद्ईक स्वारी वाड्यांत दाखल जाले-नंतर सविस्तर लिहितों. राजश्री दौलतराव शिंदे यांस पांच हजार फौजेनिशीं येणेविशीं नानाचें पत्र गेलें आहे. तेही माघारे फिरले. परंतु मुलें माणसें अशेरीच्या किल्ल्यास पाठविलीं आणि सडे होऊन फौजेसहित येत आहेत. येविशींचें सविस्तर वडिलानीं लिहिलेंच असेल. सेवेशीं विदित होय हे विज्ञापना

नं. ३६९९. ( फाल्गुन-मार्च. )

यादी श्रीमंतांचे भेटीस नाना मंदवारीं पहांटेस गेले तेव्हां समागमें मंडळी गेली. त्यांची नांवनिशीसुद्धां. सीत तिसैन.

| | | |
|---|---|---|
| १ नाना. | १ दादा गद्रे. | १ आबा शेलूकर. |
| १ अन्याबा मेहंदळे. | १ आपा बळवंत. | १ पांडुरंग बाबुराव. |
| १ त्रिंबकराव परचुरे. | १ नारायणराव वैद्य. | १ त्रिंबकराव अमात्य पेठ्ये |
| १ तात्या जोशी. | १ वकील निसबत भोंसले | १ राघोपंत गाडबोले. |

एकूण. १२

नं. ३७००. ( माघ व. १२–६ मार्च. )

विठ्ठलराव पांडुरंग यांचें पत्र बाळासाहेबांस जुन्नराहून (+पै॥ २५ साबान )

" छ० १५ साबान गुरुवारीं सोळा घटका दिवसास उभयतां श्रीमंत सुमुहूर्तें डेरेदाखल जाले. डेरे शिवनेरी किल्ल्याच्या पूर्वेस जाहले आहेत. शहरानजीक गढीलगत आहे. गढींत साहेब होते तेथून डेऱ्यापावेतों दुरस्ता कोरबंदीनें पायदळ कवाइती व कवाइतीचे पाठीमागें फौजा या बेतानें उभ्या होत्या. श्रीमंत राजश्री बाजीरावसाहेब अंबारींत बसले त्या खवाशींत ती॥ रा॥ दादासाहेब, श्रीमंत राजश्री चिमाजी आपासाहेब अंबारींत होते त्या खवाशींत ती॥ राजश्री बाबासाहेब व बहिरोपंत मेहेंदळे असे होते. समारंभानें स्वारी डेऱ्यास दाखल जाली. वडील तळावरून फौज निशाणसुद्धां घेऊन गढींत जाऊन श्रीमंतांस अंबारींत बसवून अघाडीस आपली फौज हुजरात निशाणसुद्धां लाविले. अंबारीबराबर आपण घोड्यावर बसून चालत होते. वडिलांचें पथक चिरंजीव राजश्री दाजी घेऊन कोरबंदीस उभे हाते. स्वारी डेऱ्यास आल्यानंतर शिवनेरीच्या किल्ल्यावरील पांच तोफा जाहल्या. श्रीमंतांबरोबर थोरली नौबत नव्हती याजकरितां रा॥ गणेश गोविंद यांजबरोबरची उंटावरील नौबत हत्तीवर घालून वडिलानीं स्वारीबराबर देविली. सरकारचा कारखाना अद्यापि आला नाहीं याजकरितां चिरंजीव राजश्री नारायणराव दादा यांजकडील उंट ओझयास देविले आहेत. वडील प्रतापी, तेणेंकरून मोठें यश आलें. ही गोष्ट ईश्वरें केली ! "

नं. ३७०१. ( माघ व. १२–६ मार्च. )

धोंडो बापूजी जोशी यांचें बाळासाहेबांस पत्र– (पै॥ २९ साबान. )

सेवेशीं विज्ञापना ऐशी जे, काल मंदवारीं रात्रौ श्रीमंतांची स्वारी पर्वतीनें देवदर्शन घेऊन स्वारी सरकारचे वाड्यांत येणार

---

+ पत्रावर तारीख व मिति घातली आहे ती पैवस्तीची आहे.

याप्रमाणें काल प्रातःकाळीं बेत जाला होता. त्याजवरून शहरांतील लोक पर्वतीस हजारों स्वारी पहावयास गेले. सर्वांस आनंद जाहला. चार महिन्यांत आज आनंदाचा दिवस उदय जाहला म्हणोन परस्परें संतोषाच्या गोष्टी बोलत असत. मातबर गृहस्थ व बायका पर्वतीस गेल्या. शहरांतही लोक आपले माडच्यांवर तमाशा पहावयास बसले होते. स्वारी यावयाची राहिली. नंतर पर्वतीहून लोक अस्तमानीं घरीं आले. शहरांत आबालवृद्धांस आनंद जाला आहे तो पत्रीं विनंती काय ल्याहावी ! किंचित् विनंती लिहिली आहे. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

नं. ३७०२. श्रीगणराज. ( माघ व० १२–७ मार्च.)

पै॥ छ० २९ साबान. सन सीत तिसैन, फाल्गुन मास. प्रातः–काळचा प्रहर दिवस. मु॥ खडकी.

चिरंजीव राजश्री नारायणराव यांसीं आशीर्वाद. उपरी येथील कुशल जाणून स्वकीय लिहीत जावें. विशेष. तुम्हीं छ० २४ साबान दहा घटका दिवसाचें पत्र पाठविलें तें आज दोनप्रहरीं पावलें. श्रीमंतांची स्वारी पाषाणास जाऊन आल्याचें व रा॥ नानाची भेट होऊन स्वारी पुणियांत येण्याचें व होळकर व मानकरी यांची भेट होण्याचें व तुमचें व श्रीमंतांचें भाषण जाल्याचें व शिंदे येण्याचें वगैरे वर्तमान लिहिलें तें सविस्तर कळलें. ऐशियास श्रीमंतांची स्वारी पुणियास दाखल केव्हां जाली व समारंभ कसा जाहला हें सविस्तर लिहावें. रवाना छ० २६ साबान.

आढळेल तो मजकूर लिहिणें. श्रीमंत थोर आहेत. कृपा करितात, बोलिवतात, हें त्यांसच योग्य आहे. बहुत काय लिहिणें हे आशीर्वाद.

---

१ पत्र बाळासाहेबांचें मिरजेहून.

नं. ३७०३. ( माघ व० १४–८ मार्च. )

धोंडो बापूजी जोशी यांचें बाळासाहेबांस पत्र २७ साबानचें–

" नानाची भेट श्रीमंतानीं घेतली तेच दिवशीं श्रीमंत वाड्यांत जावयाचे म्हणून सर्व तयारी जाली होती. परंतु सायंकाळीं श्रीमंतानीं सांगून पाठविलें कीं, आजचा दिवस चांगला नाहीं. आणि शिंदे होळकर यांची भेट जाल्याशिवाय वाड्यांत जाणें ठीक नाहीं. शिंद्यांची भेट जाल्यावर मग काय विचार होणें तो यथास्थित होईल, याप्रमाणें बोलिले. नंतर बेत राहिला. फाल्गुन शु॥ २ स शिंद्यांच्या भेटी व्हावयाच्या होत्या परंतु सुमार दिसत नाहीं. पंचमीच्या सुमारें भेटी होतील. राजश्री दौलतराव शिंदे यांजवर मारेकरी महादजी शिंदे यांच्या बायकानीं दहाबारा असामी घातले होते. इतक्यांत बातमी कळली. मारेकरी बारा असामी सांपडले. त्यांपैकीं सात असामी लागलेच मेखसूं घालून मारून टाकिले. चारपांच असामींवर चौकी ठेविली आहे. चौकशी होत आहे. शिंदे जांबगांवास आहेत. डेरेदाखल जाले आहेत. इकडे लौकरच येतील. सामान समागमें पोक्त वीस हजार फौज, दोन कंपू, तोफा चाळीस आहेत. श्रीमंत राजश्री नानाचीं पत्रें शिंदे यांस सडे पांच हजार फौजेनिशीं लौकर यावें म्हणून गेलीं होतीं परंतु तो योग घडला नाहीं. सरंजामसुद्धां येतात. लष्करांत (बाजीरावसाहेबांच्या) आम्ही एक दोन वेळ गेलों होतों. राजश्री बळवंतराव लेले यांजपाशीं बोललों. त्याणीं सांगितलें कीं, श्रीमंतांचे बुद्धीची शर्त आहे! शरीरेंकरून दृढ, गोड भाषण, बोलण्यांत जरब, याप्रमाणें तारीफ आहे. मुख्य गोष्ट या समयीं यश राजश्री शिंदे याणीं घेतलें आहे. सरकारवाड्यांत स्वारी शिंद्यांची भेट जाल्याशिवाय येत नाहीं."

नं. ३७०४. ( माघ व० १४–८ मार्च. )

बाबूराव शिवाजीचें बाळासाहेबांस पत्र २७ साबानचें—

" पेशजी श्रीमंत शहरांत दाखल होणार म्हणोन लिहिलें होतें परंतु तो बेत राहिला. शिंदे याणीं यावें, भेट व्हावी, उपरांतिक

सुमुहूर्तें जावें, असें ठरलें. काल शिवरात्रीमुळें श्रीमंतांची स्वारी पाषाणास गेली होती. श्रीमंतांस पहावयाकरितां पुण्यांतील साहुकार व उदमी व गोरगरीब व कसबी लोक बहुत आले होते. गाड्या शेंपंनास सावकारांच्या होत्या. फार दाटी जाली होती. मालीटही हत्तीवर बसून स्वारी पहावयाकरितां आला होता. अर्ध घटका रात्रीस श्रीमंतांची स्वारी परत डेऱ्यास दाखल जाली. यजमान मंडळी सारी डेऱ्यास गेली. उपरांकित श्रीमंतानीं रघुनाथराव दादांस पुसलें, तुमचा संध्येचा समय जाला. तेव्हां दादा बोलले, स्वामीचे पाय हीच आमची संध्या! बाजीरावसाहेब किंचित् सांवळे वर्णाचे आहेत. चिमाजीआपा गोरे आहेत. शिवरात्रीचे दिवशीं मध्यरात्रीस सांबाची पूजा जाली ते समयीं पांच तोफा जाहल्या. "

नं. ३७०५. श्रीगजानन.( फाल्गुन शु० २-११ मार्च.)

पै॥ छ० १ रमजान. सन सीत तिसैन.

लष्करांतून वडिलांचा निरोप कारभारी यांस आला कीं, " तुम्हीं आपले बंदोबस्त पहावे. आमचे हातीं गांठोडें नाहीं. चौकी आमची आहे खरी, परंतु आमचे हातीं गांठोडें नाहींसें दिसतें. पल्ला लांब दिसतो. याची तरतूद पहावी. " ऐसा निरोप आला आहे. ही बाजारी आवई आहे. खरें लटकें न कळे. रा॥ विसाजीपंत तात्या व बाळाजीपंत दादा सहस्रबुद्धे उभयतां कारभारी यांजकडे बोलावयास आले. दोन घटका बोलून गेले. त्याजवर गोविंदराव व नाना ऐसे दीड प्रहर खलबत करीत होते. शहरांत बातमी कांहीं लागत नाहीं. कळावें हे विज्ञप्ति.

नं. ३७०६. श्रीगजानन. (फाल्गुन शु० २-११ मार्च.)

पै॥ छ० १ रमजान. सन सीत तिसैन.

राजश्री नाना सरकारचे डेऱ्यास जातात. गेलेवर मोठी मर्यादा श्रीमंत राखतात. श्रीमंत व नाना व वडील व गोविंदराव पिंगळे ऐसे

१ धोंडो बापूजी जोशी यांचें पुण्याहून मिरजेस बाळासाहेबांस पत्र. २ परशुराम भाऊचा. ३ बाडदेकर. ४ पिंगळे. ५ कारकून बाळाजी गणेश जोशी यांचें लष्करांतून बाळासाहेबांस पत्र. सदरहूप्रमाणें पुढच्या नंबरचें.

मिळोन चारचार घटका खलबत होतें. बूट बाहेर फुटत नाहीं. विदित होय हे विज्ञप्ति. पत्रें दुसरेनीं पाहूं नये. विसर्जन केलीं असावीं.

नं. ३७०७. श्रीगजानन. (फाल्गुन शु० २–११ मार्च.)

पै॥ छ० १ रमजान सन सीत तिसैन.

राजश्री नानाचे चित्तांत 'वडिलांचें व श्रीमंतांचें एकाचित्त जाहलें याजमुळें आम्हीं सांगितलें एक, ( आणि ) याणीं या प्रकारचा घाट उतरविला![1] तेव्हां तिकडे लक्ष लागलें.' ऐसें लोक बाजारीं बोलतात. परंतु वडिलानीं पक्केपणें यांचें संमत घेतलेविना कार्य केलें नाहीं. ऐसें आहे. श्रुत होय हे विज्ञप्ति.

नं. ३७०८. श्री. ( फाल्गुन शु० ३–१२ मार्च. )

पै॥ छ० ६ रमजान सन सीत तिसैन. फाल्गुन मास.

ती॥ राजश्री बाळासाहेब वडिलांचे सेवेशीं.–

अपत्यें रामचंद्र श्रीधर काळे शिरसाष्टांग नमस्कार विज्ञापना येथील क्षेम ता॥ छ० २ रमजान पावेतों वडिलांचे आशीर्वादेंकरून मु॥ खडकी येथें सुखरूप असे. विशेष. वडिलीं आशीर्वादपत्र पाठविलें तें पावलें. 'कळविल्याशिवाय पुण्यास गेलास' म्हणोन वडिलीं शब्द ठेविला तो पदरीं घेतला. मुहूर्त पाहिला तो केवळ समीप निघाला याजमुळें मिरजेस आलों नाहीं. परंतु चुकी पदरीं घेतली. वडिलीं आज्ञा निरोपिली कीं, सर्व वर्तमान कच्चें लिहून कळवावें; त्यास मी या मुक्कामावर माघ व॥ ११ शनवारीं दोनप्रहरीं आलों. मी यावयाचे पूर्वींच स्वारी गुरुवारीं मुक्काम मजकुरीं दोन दिवस आली. वडिलांस येथील वर्तमानेंही साद्यंत लिहून जात असतील. या मुक्कामीं स्वारी आलेवर रा॥ नाना फडणीस एकादशी शनवारीं पहाटेस येऊन भेटले. त्या दिवशीं कांहीं बोलणें जालें नाहीं. दोन घटका बसून नमस्कार करून गेले. नंतर बोलणीं लाविलीं कीं, " आम्हीं कलमबंदीच्या यादी करितों त्यांवर निखालस श्रीमंतानीं मखलाशी करावी. आणि शपथपुरस्कर गंगाजळी

---

1 आम्हांला सोडून बाजीरावास मिळाले.

करावी. म्हणजे निखालस होईल." ऐशीं बोलणीं ती॥ राजश्री भाऊसाहेबांचे विद्यमानें पडलीं होतीं. तेव्हां श्रीमंतांचें म्हणणें, " पाहिजे तर कलमबंदीप्रमाणें मखलाशी करितों. अथवा शपथ गंगाजळी तर[1] करितों. दोन्ही म्हटल्यास होणार नाहीं." ऐसी वाटावाट आज सहा दिवस होत होती. कलमबंदीवर मखलाशी करावयाची त्याचा मसुदा यजमानानीं केला त्यांत संशय फार दिसूं लागले. तेव्हां तो प्रकार लेखकाच्या मनास येईना. तेव्हां काल द्वितीयेस शपथेचें ठरून लेखकांचें व श्रीमंतांचें निखालस जाहलें आज आठ दिवस मला येथें येऊन जाहले. एका दिवसाआड रा॥ नानाची स्वारी पुण्याहून येती ती प्रथम आमच्या डेऱ्यास येतात. नंतर ती॥ राजश्री भाऊसाहेब आणि रा॥ नाना चार घटका येथें बसून मग श्रीमंतांच्या डेऱ्यास जातात. याप्रों काल द्वितीयेपावेतों होत होतें. आजच पुण्याहून लेखकाची स्वांरी आली ती परस्परें श्रीमंतांचे डेऱ्यास गेले. सहा घटका खलबत जाहलें तावत्पावेतों वडिलांस बोलावणें आलें नव्हतें. अस्तमानीं बोलावणें आलें तेव्हां आपले डेऱ्यांतून वडिलांची स्वारी गेली. ती॥ राजश्री भाऊसाहेबांस घेऊन गेल्याशिवाय जात नव्हते ते काल शपथ होतांच आज गरज नाहींशी जाहली ऐसे वाटतें! मग संकेत कैसा आहे समजत नाहीं. श्रीमंत पहावयासाठीं मी ती॥ राजश्री बाबा साहेबांबराबर चार पांच वेळां डेऱ्यास गेलों होतों. उभयतां श्रीमंतांची भेटी घेतली. थोरले श्रीमंत माझ्याइतके उंच आहेत आणि अंगानेही माझ्याइतके आहेत. परंतु माझें अंग वर्षे मला फार याजमुळें सुटलें आहे. त्यांचें वयाप्रमाणें आहे. परंतु सामर्थ्य अधिक आहेसें वाटतें. गोरेही फार नाहींत. माझ्याइतके गोर आहेत. परंतु नाक डोळे चांगले आहेत. वित्पन्न आहेत. बोलणें फार पाहिजे. माणसांचा कंटाळा नाहीं. स्नानसंध्या[2] फार आहे. अठरावे घटकेस भोजन होतें. रात्रौ बारावे घटकेस भोजन होतें. एकादशी केवळ निरशन करितात. तीन

---

१ बाजीरावानें कीं परशुरामभाऊनीं ? २ हरी परशुराम. लेखक पटवर्धनांचा कारकून असल्यामुळें सरसकट लहान मोठया सर्व यजमानांस ' तीर्थस्वरूप ' लिहितो.

स्नानें करितात. धर्माविषयीं वासना बहुत आहे. कृपणपणा अगदीं नाहीं. देव ब्राह्मण यांजवर निष्ठा फार आहे. परंतु कांहींशी वृत्ति भोळी आहेशी भासते. माझ्या दृष्टीस भासते. श्री॥ राजश्री चिमाजीआपाही पाहिले. गोरे फार आहेत. ती॥ राजश्री गोविंदराव नाना यांहून कांहीं थोर होतील. परंतु प्रकृत उभयतांची चपळतेविषयीं आणि बुद्धीविषयीं सारखीच आहे. परंतु येथें क्रोध कांहीं जाजती आहेसा भासतो. परंतु श्री॥ राजश्री बाजीरावसाहेब यांची मर्जी बहुत राखतात. उभयतांचें भोजन वेगळें होतें. पुण्याहून सारे कारखाने आले, परंतु जरीपटका व नगारखाना शिक्केकटार मात्र आली नाहीं. सातारियास गेल्यावर मग तिन्ही चिन्हें येतील. आज पांच सात दिवसांत पुण्यांतील फार करून गृहस्थ मंडळी भेटीस आली. हुजरातचे शिलेदार मानकरीही रोज येऊन भेटत असतात. कोणाचाही भेटी जाहली असतां ती॥ राजश्री रघुनाथराव दादा व बाबासाहेब अथवा वडील यांतून एक जणानीं जावें तेव्हां भेटी होतात. ऐसें आजपावेतों घडलें. यापुढें कसें होतें पहावें. श्रीमंत आजपावेतों अज्ञातवासीं होते, त्यास विना समजून सांगितल्याशिवाय आगतस्वागत कोणास कसें करावें हें अंमळसें अवघड पडतें. परंतु धूर्त आहेत. समजतात लवकर. कोणताही कारभार एक वर्ष पावेतों दुसऱ्याचें काम लागेल. मग स्वतः करितील यांत संदेह नाहीं. कैलासवासी श्रीमंतांचें नांव चालावें यासाटीं बहुत खटपट केली. परंतु यांचे म्हणणें पडलें कीं, कैलासवासी नानासाहेबांचा वंश दैवयोगेंकरून राहिला त्यास आम्हीं कसें करावें ? परंतु आम्हीं कांहीं वाटच्यांत पडावयाचे नाहीं. ऐसें साफ उत्तर केलें. तेव्हां निराशा जाहली. श्रीमंतांचे मुख्य दोन मुद्दे. एक 'बाजीराव रघुनाथ प्रधान' ऐसेंच व्हावें. दुसरें आम्हांस—कै॥ श्रीमंतांचा बंदोबस्त होता, दुसऱ्यानें कारभारी यांचे परवानगीशिवाय दर्शनास जाऊं नये आणि कोणीं बोलूं नये, ऐसे होतें. तें कांहीं मला पुरवणार नाहीं. ते दोन्हीही मुद्दे कारभारी याणीं व वडिलानीं कबूल केले. यांत सारें आहे ! वडिलांवर मर्जी

फार चांगली आहे. तेथील मंडळीही बोलत असती कीं, वडिलांस यजमान निरोप देणार नाहींत. ऐशी बोलवा आहे. तूर्त लेखकही एकाएकीं निरोप देणार नाहींतसें भासतें. मग पहावें ! वडिलानीं जाऊन जुन्नराहून उभयतां यजमानांस आणिलें याजमुळें शिंदे यांचे कारभारी यांस बहुत वाईट वाटलें आहे. त्यांच्या वल्गना बहुत आहेत. कंपूही त्यांचा गंगेवर आला. फौजही वीस हजार पावेतों जमा आहे. कूच जाहलें म्हणतात. परंतु अद्यापि त्यांची येण्याची त्वरा दिसत नाहीं. येथून रा. गोविंदराव पिंगळे शिंदे यांजकडे बोलावयास जात आहेत. मग त्यांचें आणि कारभारी येथील यांचें कसें पटतें पहावें. तो सर्व मजकूर मागाहून लिहितों. याहीपेक्षां वडिलांस लिहिलें जात असेल. परंतु ऐकलें वर्तमान लिहिलें आहे. हें वर्तमान वडिलांचे मुखचें नव्हे. यांत कांहीं लटकें असलेस राग न करावा. त्यांतून जें आढळेल तें मागाहून लिहितों. बहुत काय लिहिणें सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

नं. ३७०९. श्री. (फाल्गुन शु० ३–१२ मार्च.)

पै॥ छ० ६ रमजान सीत तिसैन.

विज्ञापना चार बंद लिहिले आहेत त्यावरून सर्व समजेल. यंदांचें खलबत बहुतकरून समजत नाहीं. आणि वडिलांच्या मुखें करूनही आवाज निघत नाहीं. मुख्य लेखकाची आणि वडिलांची आणि श्रीमंतांची निखालसता काल जाहली. याउपरी येखादे कारभारसमयीं तूट लागली तर लागो परंतु तूर्त त्रिवर्गांमध्यें विरोध होणार नाहींसें भासतें. कां, तर श्रीमंत अद्यापि गैरमाहित. सर्व दौलत या कारभारी यांचे स्वाधीन किल्ले कोट यांचे स्वाधीन. तेव्हां त्याणीं वोढून परिणाम नाहीं ! शिंदे यांचें आणि लेखकाचें बहुत विरुद्ध वाढलें आहे. यांत परिणाम कसा होतो पहावा. काल शपथ जाहल्यावर शिंदे यांजकडे कागद व राजश्री गोविंदराव पिंगळे रवाना

१ बाजीरावांभोंवतालची. २ शिंद्यांचें. ३ रामचंद्र श्रीधर काळे यांचें बाळासाहेबांस पत्र. ४ मागील नंबरचें पत्र.

जाहले, परंतु ते ऐकतां दिसत नाहींत. त्यांचे मुद्दे फार आहेत. जर श्रीमंत ( व ) कारभारी येक जाहले. आणि शिंदे यांशीं बदलून गोष्टी सांगितली, तर त्यांचें बोलणें पडणार कीं, " ( माझ्या ) दौलतीस कर्ज दहा कोट पावेतों जाहलें आहे त्याचा फडशा करून द्यावा आणि हिंदुस्थानांत जाजती मुलुख ( मीं ) सोडविला आहे तो सरकारांत घ्यावा. नाहीं तर जड जाईल ! आमच्या येोगेंकरून जुन्नराहून तुम्हांस आणिलें आणि आम्हांस सोडून कारभारी यांस मिळालां काय ? असो. तुम्ही धणी आम्ही चाकर. तेव्हां आम्हांस कर्जापासून मुक्त करा म्हणजे जाहलें. नाहीं तर बहुत जड पडेल. " हा एक मुद्दा. दुसरा—कारभारी यांस साफ म्हणतात कीं, " तुम्हीं जन्मभर कारभार करावा ऐसें कोठें आहे ? तुमचा दरक तुम्हीं करावा. सरकारचा कारभार श्रीमंतांचा श्रीमंतानीं करावा. अथवा तुम्हांशिवाय ज्यास आज्ञा होईल तो करील. " ऐसे मुद्दे शिंदे यांचे दोन मोठे आहेत. तमाम मुलुक वैरणीसाठीं लुटीत आहेत. शिंदे यांजपाशीं भावे ( सरकारचे ) वकील आहेत त्याणीं पुसल्यास उत्तर करितात कीं, " फौज थोर. इतके फौजेनें विकत कोठून आणावें ? आम्ही कांहीं वैरण सोडीत नाहीं. ज्या समयीं सर्व आमचें कर्ज सरकारांतून कारभारी देतील तेव्हां काय पायमल्ली दहा पांच लक्ष रुपये ( वजा ) घालणें ती घालावी ! " मुखेंकरूनही फार जाजती बोलतात. ऐशीं अनेक प्रकारचीं बाजारी वर्तमानें आहेत. यांत सत्य मिथ्या किती आहे समजत नाहीं. परंतु कारभारी दिलगीर आहेत खरे. जर शिंदे हातीं लागत नाहीं तर अवघड आहे. वडिलीं दोन पुरवण्या माझे नांवच्या पाठविल्या होत्या त्या ( वाचून ) परत पाठविल्या आहेत. शिंदे यांजकडे श्रीमंतांचेंही लक्ष आंतून आहे ऐसेंही बोलतात. कळावें. आढळलें वर्तमान लिहिलें आहे. याचा इशारा वडिलांस होऊं नेये. सेवेसीं श्रुत होय. रा। छ० ३ रमजान. हे विज्ञापना.

---

१ फडणिशींचा. २ येथें परशुरामभाऊंस.

नं. ३७१० (फाल्गुन शु० ३-१२ मार्च.)

नारायणराव गंगाधर यांचें बाळासाहेबांस पत्र छ० २ रमजान मंदवारचें खडकीच्या मुक्कामाहून—

" परवां गुरुवारीं मला श्रीमंतानीं रात्रौ भोजनास बोलाविलें होतें. बोलवावयास कारकून चार घटका रात्रीस आला. ते दिवशीं चिरंजीव राजश्री महादेवराव दाजी येथें संध्याकाळीं चार घटका दिवसास आले होते त्यांस भोजनास राहून घेतलें होतें. पात्रें मांडिलीं तों सरकारचें बोलावणें आलें. तेव्हां आज्ञेप्रमाणें येतों म्हणून कारकुनापाशीं सांगितलें. तो गेल्यानंतर रामाजी दामोदर यास वडिलांकडे विनंती करावयास पाठविला. वडिलांची आज्ञा जाली जे, जावें. त्याजवरून सहा घटका रात्रीस श्रीमंतांचे डेऱ्यास गेलों. तों श्रीमंत स्नान करून धोत्रें नेसत होते. मला पाहतांच ' नमस्कार करूं नका कपाळीं कांहीं लाविलें नाहीं ' म्हणोन आज्ञा जाली. धोत्रें नेसून कुदल्यांत (?) जाऊन संध्येस बसले. मला राजश्री आपाजी राम सहस्रबुद्धे घेऊन सांबाचे दर्शनास राहुटींत गेले. सांबाचें दर्शन जालें. पंचमुखी स्फटिकाचें लिंग बहुत अपूर्व आहे. गवई यांचें गाणें होत होतें. उपरांतीक श्रीमंत बसले होते तेथें गेलों. नमस्कार जाला. पाट बसावयास खाशानीं आणून देविले. आणि मला पुसलें, येथून कारकून गेला ते समयीं तुम्ही काय करीत होतां ? तेव्हां मी विनंती केली जे, संध्या करून भोजनास गेलों तों महाराजांची आज्ञा आली. त्याजवरून वरकड मंडळीस भोजनें करावयास सांगोन मी आलों. तेव्हां श्रीमंत बोलले, पटवर्धनांच्या घराण्याची धन्य आहे ! भोजनास पात्रावर गेले असतां आज्ञा जातांच निघोन आले. घराण्याची रीत बहुत चांगली ! घराणें थोर ! मातबर सरदार ! इतकें बोलले. आणि मला पुसलें जे. तुम्ही दररोज कां येत नाहीं ? निदान एक दिवसाआड तरी येत जावें. मी ' आज्ञा ' म्हणोन विनंती केली. उपरांतीक भोजनास गेले. मी सोंवळा होऊन गेलों. भोजनसमयीं भात वाढला तेव्हां दुसरे ( एका ) गृहस्थानें आचारी यांस पुसलें, आज भात कोणे [illegible]

येत नाहीं ? तेव्हां श्रीमंत बोलले, पुण्याचा क्षय व पापाचा उत्कर्ष जाला, याजमुळें धान्याचें व वनस्पतींचें तेज गेलें ! उपरांतीक बोलले, गंगातीरीं वास असावा किंवा नानाचा तरी समागम असावा ! आमचे दौलतींत मनुष्य आहे, पैका नाहीं ! नानाचा समागम असल्यास सर्व गोष्टी घडतील. नबाबानीं पैका जमा केला, मनुष्य नाहीं ! उपरांतीक मजकडे हात केला आणि बोलले, आमचे दौलतींत असले सरदार, त्या अर्थी नबाबाकडून पैका घ्यावयास काय अशक्य आहे ? पैका मिळेल. परंतु मनुष्य मिळणें दुर्लभ आहे. मी विनंती केली जे, सर्व प्रताप स्वामींच्या पायांचा आहे. भोजनसमयीं बहुत बोलले. भोजन जाले उपरांतीक निरोप घेऊन तीर्थरूप राजश्री भाऊसाहेबांचे डेऱ्यास आलों. श्रीमंत बोलल्याची सर्व विनंती केली. तेव्हां आज्ञा जाली जे दोन वेळ येत जाणें म्हणोन आज्ञा जाली आहे त्या अर्थी एक दोन दिवशीं जात जावें. परवां राजश्री नाना अडीच प्रहर दिवसास वडिलांचे डेऱ्यास आले. तेथून वडिलांस घेऊन श्रीमंतांचे डेऱ्यास गेले. चार घटका रात्रपावेतों एकांत जाला. त्याप्रमाणें कालही जालें. निखालसता जाली असें लौकिकांत आहे. ''

नं. ३७११. श्री. ( फाल्गुन शु० ९–१७ मार्च. )

पै॥ छ० ९ माहे रमजान. प्रहररात्र आवशीची. मंदवार.

अखंडितलक्ष्मी अलंकृत राजमान्य राजश्री परशुरामभाऊ गोसावी यांस.

स्नेहांकित दौलतराव शिंदे. दंडवत. विनंती उपरी. येथील कुशल जाणोन स्वकीय कुशल लिहीत जावें. विशेष. '' तुम्ही फौजेसुद्धां यावयाचें न करणें. जेथें मुक्काम असेल तेथेंच असावें. गोविंद भगवंत येथून पाठविले आहेत ते सविस्तर तुम्हासीं बोलतील. राजश्री बाळाजी जनार्दन यांची भेट होऊन परस्परें मनांतील किंतु[1] मागील आहेत ते सोडून पुढें सरळ रीतीनें चालावें या अन्वयें बोलणीं होऊन

---

१ पिंगळे.

शफता जाल्या. आतां किमपि दुसरा विचार परस्परें राहिला नाहीं. तुम्हाकडील कोणी विश्वासूक पाठवून देणें. त्यासीं बोलून सरळता त्यांसीं तुम्हासीं करून देविली जाईल. नंतर तुम्ही सडे भेटीस यावयाचें करणें; " म्हणोन आज्ञापत्रीं लिहिलें, ऐशीयास आपण पुण्याहून जुन्नरास जाऊन श्रीमंतांची खातरजमा शफतपूर्वक करून घेऊन आलों. खडकीवर मुक्काम आहेत. राजश्री बाळाजीपंत नाना यांच्या वगैरे भेटी होऊन नानांची व श्रीमंतांची परस्परें खातरजमा शफतपूर्वक जाल्या, मागील परस्परें मनांत किंतु न आणितां सरळ चालावें असें ठरलें, म्हणोन आज्ञापत्रीं लिहून आलें त्याजवरून बहुत संतोष जाहला. श्रीमंत धनी आहेत. मागील किंतु मनांत न आणावे हें योग्य आहे. दौलतींतील माणसें आहेत त्यांची सर्वांची खातरजमा करून ज्याचे त्याचे परी निभावलेंच पाहिजे. ते सर्वज्ञ आहेत. करितीलच. इकडून कोणी विश्वासूक पाठवून खातरजमा करून घ्यावी, नानाकडील स्वच्छता असावी, म्हणोन श्रीमंतांची आज्ञा; त्यास श्रीमंत स्वामी धनी आहेत. आम्ही सेवा करावी, त्याणीं कृपा करावी, असें पूर्वीपासून चालत आलें तसेंच पुढें आम्हाकडून सेवा घडेल, तेही कृपा करितील. नानांस सांगणारांनीं मनस्वी सांगून आम्हाविसीं मनांत किंतु घातला आहे त्यामुळें नानानीं फौजबंदी केली; त्यास इकडून कांहीं नानाविसीं वांकडें मनांत यावें असें नाहीं. नानाचा आमचा भाऊपणा आजचा आहे असें नाहीं. त्यांजकडून आमचें कांहीं वांकडें होईल हें घडावयाचें नाहीं. राज्याचें चांगलें, श्रीमंतांचा धनीपणा, नानांचा कारभार सरळ चालावा, हेंच आम्हांस पाहिजे तेंच जालें; त्या पक्षीं आम्हाकडून श्रीमंतांच्या सेवेस व नानाच्या भाऊपणांत दुसरा प्रकार नाहीं. येथील आमचे घरचा प्रकार लोकांचें देणें व सावकारी मनस्वी. पांच पांच सालांचे फडशे होणें, जांबगांवीं लोक फडशाकरितां येऊन जमा होऊं लागले. चारा पाणी याची सोय नाहीं. मातोश्री बाईची रवानगी केली. लोक जमा जाले. तोड कांहींच पडेना, देणें मनस्वी,

---

१ बाजीरावसाहेबानीं आम्हांस आज्ञापत्र पाठविलें त्यांत.

लोकांच्या चित्तांत निकड करून कांहीं मनांत विचार न आणीत, तेव्हां कंपू आणवून जरबेच्या पोटीं तोडजोड पाडावी हें योजिलें. तों श्रीमंतांची स्वारी पुण्यास दाखल जाहली. फौजेची तोडजोड विना रुपये दिल्हेखेरीज काय निघते? लोकांची आंच आपणास माहीत आहे. फौज ठेवून सडे श्रीमंतांचे भेटीस जावें हा विचार पाहिला तों फौज आम्हास सोडून राहीना! श्रीमंतांच्या भेटीविना जावें तेंही लौकिकांत चांगलें नाहीं, जाणोन दरकूच श्रीमंतांपाशीं जाऊन हकीकत विवेदन करावी, आज्ञा करतील ती मान्य करून आज्ञा घेऊन हिंदुस्थानांत जावें, तिकडेही राजेरजवाडे यांच्या नजरा ठिकाणीं नाहींत, स्वारी तिकडून आल्यास पांच वर्षें जाहलीं, तेव्हां लौकर गेलें पाहिजे; असे चोंहोंकडून पेच आहेत. असो. सारांश श्रीमंतांच्या आज्ञेखेरीज आम्हास दुसरा विचार किमपि कर्तव्य नाहीं तसेंच नानाचे भाऊपणांत अंतर व्हावयाचें नाहीं. आपण श्रीमंतांस विनंती करावी. राजश्री गोविंदराव भगवंत येथें येऊन पोंचले आहेत. यांसीं बोलून ज्यांत सरळ, राज्यास चांगलें, तेंच इकडून बोलण्यांत येईल. रवाना छ० ७ रमजान. बहुत काय लिहिणें लोभ करावा हे विनंती.

नं. ३७१२. (फाल्गुन शु० ९–१७ मार्च.)

बाबाजी विश्वनाथ चांफेकर यांचें बाळासाहेबांस पत्र ७ रमजानचें—

" शिंदे यांजकडील चिटणीस पुण्यांत आहेत त्यांचे विद्यमानें कांहीं फितूर करून शिंदे यांची फोडाफोड ( नानानीं ) मांडिली होती. दोन चार लाख द्रव्यही वांटिलें होतें. परंतु हा फितुराचा मजकूर शिंदे यांसी समजला. कारकून व माणसें धरलीं. माराहाण जाहली. आडनांवाचे तांबोळी म्हणोन शिंदे यांचे लष्करांत साहुकार आहेत त्यांचे दुकानीं चौकी बसली. कारकून साहुकाराचे धरिले.

---

१ मायावीपणाचें लिहिणें कसें असतें याचा हा एक उत्तम मासला आहे।

चिटणीस यांचे गुजारतीचे शिलेदार आहेत त्यांसही चौकी दिली आहे. या मजकुराविशीं शिंदे बहुतच खट्टे आहेत. आज गुरुवारीं कूच होऊन खडकीचे पुलाजवळ मुक्कामास श्रीमंत जाणार. श्रीमंतांचे वाड्याचें कोठींत दिवाभीत पक्षी गेला होता तो धरून मारिला. पुण्यांतील लोक बहुत सावध जाहले आहेत. मातबरही हुशारींनेंच आहेत. गोंवागुंता ठेविला नाहीं. श्रीमंतांची व नानाची परस्परें भृगुवारीं निखालसता जाली. नानाची स्वारी दररोज श्रीमंतांचे डेऱ्यास येते."

नं. ३७१३. ( फाल्गुन शु० ९-१७ मार्च. )

धोंडो बापूजी जोशी यांचें बाळासाहेबांस पत्र—

पु॥ सेवशीं विज्ञापना तागायत छ० ७ रमजान. विशेष. रा॥ नाना नित्य श्रीमंतांकडे जात असतात. अगोदर श्रीमंत रा[1] भाऊसाहेब यांचे डेऱ्यास स्वारी येऊन येथें बोलणें होऊन उभयतां मिळोन श्रीमंतांकडे जातात. एकादे दिवशीं परभारेंही श्रीमंतांकडे जातात. काल राजश्री रामजी पाटील शिंद्याकडील श्रीमंतांकडे एकटेच जाऊन बोलोन पुण्यास गेले. काय बोलणें जाहलें न कळे ! शिंदे जांबगांवाअलीकडे चार कोस आल्याचें वर्तमान आलें. त्यांजकडे रा॥ गोविंदराव पिंगळे गेले आहेत. जाऊन पोंचले. याउपर सडे येतात किंवा जमावसुद्धां येतात पहावें. येथें तर ते जमावसुद्धां येतात म्हणोन वर्तमान आहे. दुसरें वर्तमान अमदानगराकडे तेथील गृहस्थास काढावयास जाणार[2] असेंही बोलतात. आणि त्यांचे लष्करांत फितव्याची फारच गडबड जाहली होती, याजमुळें कसें होईल न कळे ! लोक नानाप्रकारें बोलतात. आवई बहुतच पडली आहे. येविशींचे सविस्तर अर्थ श्रीमंत राजश्री भाऊसाहेब लिहितच आहेत त्यांजवरून स्वामीस विदित होतच असेल. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

---

१ मोरोबादादास. २ शिंदे जाणार.

नं. ३७१४. ( फाल्गु० शु० १०–१८ मार्च. )

बाळाजी हरि पटवर्धन यांचें बाळासाहेबांस पत्र–( +पै॥ ८ रमजान. )

विज्ञापना. गुरुवारीं पुण्यास आल्याची विनंती लिहिली आहे. भृगुवारचे रात्रीं उजाडते शनवारीं राजश्री नाना फडणीस भेटीस गेले होते. भेट घेऊन सूर्योदयास माघारे आले. फिरोन नववे ताशीं सर्व मानकरी बरोबर घेऊन गेले. डेऱ्यांत भेट जाहली. रात्रौ नाना भेटीस गेले होते तेव्हां श्रीमंतानीं फुलांचा तुरा आपल्या हातें पागोट्यास नानांच्या लाविला. श्रीमंत साहेब शनिवारीं बेवीस घटका रात्रीस वाड्यांत येणार असा बेत होता, परंतु होळकराची भेट जाहली नाहीं, शिंदे जांबगांवास आले, तेथून दरमजल येथें येणार, येथें भेट जाल्यानंतर मग शहरांत यावयाचें; असा बेत आहे. शिंदे यांचें म्हणणें, मोरोबादादांस बाहेर काढावें हेंही बोलणें पडलें आहे. शनवारीं नाना नववे ताशीं डेऱ्यास गेले. श्रीमंतांची भेट घेऊन वडिलांचे डेऱ्यास आले. वडील व नाना व गोविंदराव पिंगळे व बहिरोपंत मेहंदळे असें चवघा जणांचें खलबत जालें. बूट बाहेर पडला नाहीं. उगाच अफवा आहे कीं, शिंदे यांजकडील रामजी पाटील आहेत त्यांचें बोलणें आहे कीं, अगोदर दत्तक पुत्र घ्यावा ऐसा करार होता तें अकस्मात् राहून यांस आणिलें यांतील अर्थ काय ? ऐसें बोलणें आहे. याप्रमाणें बाजारी वार्ता आहे. कळावें हे विज्ञापना.

नं. ३७१५. **श्रीगजानन.** (फाल्गु० शु० ११–१९ मार्च.)

पै॥ छ० ९ रमजान सन सीत तिसैन. फाल्गुन मास.

विज्ञापना बाजारी वर्तमान ऐकींव–

शिंदे चाळीस हजार फौज, दोन कंपू, दीडशें आरबा[1], येणेंप्रमाणें सरंजामानिशीं जांबगांवास आले. पुढें दरमजल इकडे येणार.

---

+ पत्रावर घातलेली तारीख व मिती पैवस्तीची आहे.

१ आरबा म्हणजे तोफा.

शहरांतील तत्पक्षी वगैरे निजसुरे वगैरे जरारा होत आहेत. शहर गडबडलें.

शिंदे पुढें दोन मजली आल्यावर मुठेवर (श्रीमंतांच्या) लष्कराचा मुकाम आहे तो अलीकडे मुळा नदीवर येणार. सर्व सलतनत खाशा डेऱ्याजवळ कायद्याबरहुकूम उतरणार. खासा आपण बाहेर निघणार. तोफखाना सुतरनाला वगैरे पोक्ती सामानाची करणार. श्रीनें ऐक्यता केली तर उत्तम. नाहीं तर सिद्धताच असावी. श्रीमंत मातोश्री पुरंदरास जाणार ऐसी वार्ता. १

पुण्यांतील लोक फार भितेरे !!! नाना प्रकारची बातमी वर्तमानें उठवितात ! श्री कृपा पूर्ण, त्यापक्षीं कांहीं होत नाहीं. होळकर अर्जुदा[3] आहे. " प्रथम पत्र आपणाजवळून घेतलें. हल्लीं हा योग केला. आपणास विचारलें नाहीं. नाना प्रथम भेटीस गेले तेव्हां आपणांस न विचारतां गेले. ( असें त्याचें म्हणणें. )

( शिंद्याच्या लष्करांतला ) फितवा उमगला आहे. कारकून माणसें सांपडलीं. खजीना कागदपत्र दस्तऐवजीं सांपडले. तेव्हां मदारुल् महावर गोष्टी आली. ' यादींत कोणाचें नांव असेल त्यास आणूं. हातीं न येईल तर फौज पाठवून आणवूं. या गडबडींत शहराची तसनस जाहली तर आम्हाकडे काय आहे ? ' असें भाषण ! वडिलांकडील कारकून शिंदे यांच्या लष्करांत होते त्यांस 'जाणें. लष्करांत आमच्या न राहणें.' म्हणोन सांगितलें. तो उठोन वडिलांकडे आला हें वर्तमान आहे. परंतु लटिकेंसें वाटतें.

मालीट याजकडे बहिरोपंत मेहेंदळे जातात. कां तें न कळे ! गोविंदराव पिंगळे (शिंद्यांकडे) गेले आहेत. समेटण्यांत आलें तर उत्तम. नाहींतर जलद उत्तर यावें ही आज्ञा आहे.

अमदानगर तालुक्यापैकीं दोन गांव जाळून लुटून फस्त. ( नानानीं ) फडणीसीचें काम मात्र करावें. कारभार वीस वर्षे (त्यानीं)

---

१ नानाच्या पक्षाचे. २ फरारी किंवा सडे. ३ रुसलेला. ४ नाना फडणीस यांजवर.

केला. पुढें आणखी श्रीमंतांचे पदरीं बहुत आहेत ! ( श्रीमंत ) आज्ञा करतील त्याप्रों करावा हें ( शिंद्यांचें ) म्हणणें !

श्रुत होय हे विज्ञप्ति.

नं. ३७१६. ( फाल्गु० व० ११–१९ मार्च. )

नारायणरावांकडून बाळासाहेबांस पत्र–( रवाना २५ रमजान सन सीत तिसैन. मुक्काम थेऊर. )

" कारभारी यांसंबंधें बोलणीं दोन तीन वेळां जालीं, परंतु शिंदे अद्यापि पल्ल्यावर येत नाहींत. शिंदे काल कूच करून येथें आले. त्यांजकडील कंपू खराडीच्या मुक्कामास आले. "

नं. ३७१७. ( फाल्गुन शु० ११–१९ मार्च. )

धोंडो बापूजी जोशी यांचें बाळासाहेबांस पत्र—( पै॥ × १ रमजान. )

विज्ञापना. मुख्य यजमान उभयतां जुन्नराहून येथें खडकीचे मुक्कामास आले. येथून पुण्यास वाड्यांत जावयाचें परंतु खातरजमा न होय यामुळें मुहूर्ताचें निमित्त करून शिंदे यांचा मार्ग पहात आहेत. शिंदे जमावसुद्धां येत आहेत. त्यांजबरोबर जमाव दोन कंपू, व वीस हजार फौज व पाउणशें तोफा येणेंप्रमाणें आहे. ते आलेनंतर शहरांत जाऊन तसेच साताऱ्यास जाणार. रा॥ नानानीं शिंदे यांच्या लष्करांत कांहीं द्रव्य पाठवून कृत्रिम उद्योगास प्रारंभ केला होता. नंतर त्यांस समजलें. मग कार्य साधलें नाहीं याजमुळें ते जमावानिशीं येत आहेत. यास्तव नानांस भय बहुत प्राप्त जालें आहे. भयामुळें नानानीं आपलें द्रव्य व सरकारचें जामदारखान्यांतील देखील काढून सडे होऊन सावध आहेत. आणि मसलतीस डौल एकप्रकारचा दिसतांच मुख्य श्रीमंतांकडे दोन दिवस नेहमीं येतात व बोलणें लाविलें आहे जे, आजपर्यंत सेवा श्रीमंतानीं कृपा करून घेतली याप्रमाणें आपणही कृपा करावी व आपल्या लक्षांत कितेक आहेत त्यांजविशीं

× पैवस्तीच्या तारखेवरून मिति व इंग्रजी तारीख दिली आहे.

कोणी कांहीं समजावील तर ऐकूं नये. त्यास श्रीमंतानीं उत्तर केलें जे, एकनिष्ठपणें सेवा करतील त्यांस कांहीं चिंता नाहीं. अंतर पडल्यास त्याचें पारिपत्य होईल. नानानीं कारभार करावा परंतु आपणास विचारल्याखेरीज कांहीं करूं नये. कृत्रिम विचार दृष्टीस पडल्यास कार्यास येणार नाहीं. अशीं उत्तरें जाहलीं. नानास व श्रीमंतांस परस्परें चित्तांत खातरजमा निःसंशय होत नाहीं असें आहे. काय घडतें पहावें. शिंदे जांबगांवाचे पलीकडे चार कोसांवर आल्याचें वर्तमान आहे. त्यांजकडे रा॥ गोविंदराव पिंगळे यांस रा॥ नानानीं पाठविलें. ते निघून गेले. श्रीमंतांचे लक्षांत नाना मिळाल्यास उत्तमच आहे. नाहीं तर नानास भयच आहे. असा डौल मसलतीचा दिसत आहे. सविस्तर सर्व श्रीमंत राजश्री भाऊसाहेब स्वामी लिहितच असतील. परंतु आइकलें वर्तमान लिहिलें आहे. खरें लटकें नकळे. हे विज्ञापना. श्रीमंतांचें व नानांचें बोलणें होऊन प्रसंगानुरूप खातरजमा परस्परें जाहली. शिंदे यांजकडे परभारें श्रीमंतांकडून निरोप सांगून पाठविला जे, भारी जमाव घेऊन न येणें म्हणोन व पिंगळेही गेले आहेत. आतां चिंता नाहीं. सेवेशीं विदित होय हे विज्ञापना.

नं. ३७१८. ( फाल्गुन शु० ११–१९ मार्च )

विठ्ठलराव पांडुरंग यांचें बाळासाहेबांस पत्र ९ रमजानचें—

" सायंकाळचे अर्ध घटका दिवसास होळकर यांच्या भेटी जाल्या. होळकरास पक्षवायु जाला आहे. याजमुळें श्रीमंतांपावेतों पालखींत बसून येऊन भेट जाली. नंतर पंवार मानकरी आहेत त्यांची भेट अर्ध घटका रात्रीस जाली. राजश्री नाना गुरुवारीं व शुक्रवारीं डेऱ्यास भोजनास राहिले होते. भोजन करून शहरांत गेले. शिं[illegible] येथून आठ कोसांवर आले आहेत. "

नं. ३७१९. (फाल्गु० शु० ११–१९ मार्च.)

बाबाजी विश्वनाथ चांफेकर यांचें बाळासा[illegible]बांस पत्र—

सेवशीं साष्टांग नमस्कार विज्ञापना. तागायत छ० ९ रमजान मंदवासर आवशीची प्रहर रात्र पावेतों मुक्काम येरवडें नजीक पुल [illegible]

स्थित असे. विशेष. गुरुवारीं कूच होऊन मुक्काम मजकुरास श्रीमंत आले. काल भृगुवारीं होळकरांच्या भेटी झाल्या. इकडील बाजारी वर्तमान तरी शिंदे यांजकडे रा॥ गोविंदराव गेले आहेत त्यांची व शिंदे याची भेट जाहली. कांहीं बोलणें आहे म्हणोन कारभारी यांजवळ बोलिले. तेव्हां शिंदे याणीं उत्तर केलें जे, येथें बोलणें काय आहे ? जें बोलणें तें पुण्यास आलियावर श्रीमंतांसंनिध होईल असें उत्तर जाहलें. व बाळोबा कारभारी याणीं बहुतच वांकडें बोलण्याची वल्गना केली. हा मजकूर येथें रा॥ नानांस समजलियावर चित्तास धीर न पुरे म्हणोन काल भृगुवारीं रात्रीस श्रीमंत राजश्री भाऊसाहेबांचे डेऱ्यास भोजन करून चौदा घटका रात्रीस श्रीमंतांकडे जाऊन शिंदे यांचा मजकूर सांगितला. तेव्हां श्रीमंत बोलिले जे, आमची आणशपथ बेलभंडार शिंदे यांजवळ गुंतले आहेत. तुम्ही शिंदे यांचे धास्तीनें दिलगीर होऊं नये. स्वस्थ रहावें. शिंदे काय करितात ? पोरखेळ लागले नाहींत ! असें आश्वासन दिलें. परंतु नानास धीर न पुरे सबब निरोप घेतला आणि पुण्यास गेले. घरीं जाऊन मुहूर्तेंकरून डेरेदाखल जाले. मार-पिरानजीक मुक्काम जाला. आज मंदवारीं कूच करून सातारियासी जावें अशी योजणूक होती त्यांस प्रातःकाळीं रा॥ गोविंदराव पिंगळे यांचें पत्र व भावे म्हणोन आडनांवाचे गृहस्थ शिंदे यांचे लष्करांत आहेत त्यांचें पत्र अशीं दोन आलीं. त्यांतील मजकूर जे, नाना बहुत घाबरे होऊन स्थलांतर करणार हा मजकूर त्यास समजलियावर गोविंद-राव यांसीं बाळोबा पागनीस याणीं बोलवून नेलें आणि सांगितलें जे, नाना घाबरे कां जाहले ? त्यांचा कारभार काढीत नाहीं. त्यांचे अब-रूस खत्ता होत नाहीं. नानाप्रमाणें कारभारी कोण आहे? आज बेवीस वर्षें श्रीमंतांचें राज्य रक्षिलें. येथील कारभार आम्हांस कर्तव्य नाहीं. आमचे सहा मुद्दे आहेत. यांची मखलाशी करून द्यावी. म्हणजे आम्ही श्रीमंतांचा निरोप घेऊन माघारे जाऊं. तुम्ही श्रीमंतांजवळ स्वस्थपणें कारभार करून राहावें. लहान माणसांचे मनसब्यानें गैररहा करूं लागल्यास आम्हांस पुसणें प्राप्त आहे. असें बोलोन सहा कल-

मांची यादी दिली. सहा कलमें करून दिलीयासीं आमचा गुंता नाहीं असें बोलणें ठरोन शिंदे यांजकडील गृहस्थ व गोविंदराव रविवारीं येथें यावे असें लिहिलें आलें व करार ठरला. त्याजवरून नानांचा मुक्काम जाहला व चित्त स्वस्थ जाहलें. आज मंदवारीं तृतीय प्रहरीं नानांची स्वारी श्रीमंतांकडे व भाऊसाहेबांकडे आली होती. दोन घटका रात्रीस स्वारी माघारी डेऱ्यास गेली. फडणिशीची तेरीख काल-पासून रा॥ त्रिंबकराव परचुरे यांजकडे नानानीं सांगितली. परचुरे लष्क-रांत येऊन उतरले. रा॥ बाबा फडके यांजकडे 'यावें' सांगितलें. याप्रमाणें मजकूर बोलतात. सहा कलमें लिहून दिलीं आहेत त्याचा तपशील मागाहून लिहितों. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना. रा॥ बहिरोपंत मेहंदळे व परचुरे व राघोपंत गोडबोले व निजसुरे इतके गृहस्थांचीं मुलेंमाणसें पुण्यांतून गेलीं. चीजवस्तही नेली. सडे राहिले आहेत. भृगुवारीं शहरांत मंदवार प्रहर दिवसपावेतों गडबड जाहली. शिंदे यांचें बोलणें पडोन मुक्काम घोडनदी तीरास जाला म्हणोन कारभारी व शहर स्वस्थ जाहलें. आणि लष्करचाही मुक्काम जाहला. सहा कलमांचा तपशील. ( १ ) शिंदे यांचे लष्करांत फितूर केला ते गृहस्थ हातीं द्यावे. ( २ ) रा॥ मोरोबा दादांस सोडावें. ( ३ ) मोंगलाची मसलत आम्ही करितों यासी आज्ञा तुमची असावी. ( ४ ) गुदस्तांचे एकोणतीस लक्ष रुपये द्यावे. (५) फितुराचे बंदोबस्तास फौज जमा केली त्या समयीं आम्हांस खर्च पडला आहे तो द्यावा[१]. सारांश द्रव्यहरणाचा कारभार दिसतो. हल्लीं येथें एकंदर फौज अजमासें वीस हजार होईल. गाडदसुद्धां शहरांत शिलेदार चाकरमाणूस राहिला नाहीं. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

नं. ३७२०. ( फाल्गु० शु० १२-२० मार्च. )

धोंडो बापूजी जोशी यांचें बाळासाहेबांस पत्र (पै॥ १२ रमजान)-

" दौलतराव शिंदे आज कोरेगांव भीमातीर येथें मुक्कामास

१ शिंद्यांच्या सहा कलमांपैकीं येथें पांचच लिहिलीं आहेत. सहावें पत्र लिहिणारास कळलें नव्हतें असें दिसतें.

येणार. ते येऊन भेट जाहलेवर वर्तमान आढळेल तें लिहून पाठवूं. शिंदे यांचे लष्करांत गोविंदराव पिंगळे यांस रा॥ नानानीं पाठविलें होतें. त्याजवळ शिंदे बहुतच दबावाचें बोलणें बोलले. आमचे लष्करांत फितवा करावयास कारण काय? कोणकोण या कामांत आहेत त्यांचें पारिपत्यच करावयाचें. याचें बोलणें होणें तें श्रीमंतांजवळ होईल. अशीं पत्रें पिंगळे यांचीं येतांच नानानीं आपले लगत्याची मंडळी होती त्या सर्वांस सावध होण्यास सांगितलें. त्याजवरून कुटुंबें सर्वांनीं पुण्यांतून लावून दिलीं. नानानीं देखील आपलें कुटुंब लावून दिलें. आणि नानाच साताऱ्यास जाणार होते. परवां भृगुवारीं तीन प्रहर रात्रीस मुहूर्तानें निघून गारपिरावर राहिले. पुण्यांत दोन दिवस बहुत गडबड जाली. सावकारानीं देखील ऐवज लांबविला. इतक्यांत हें वर्तमान शिंदे यांस समजल्यानंतर नानांस सांगून पाठविलें जे, गडबड करावयाचें कारण काय? तुम्हीं जाऊं नये. त्यावरून तूर्त नाना जावयाचे राहिले. श्रीमंतानीं नानांस जाऊं नये म्हणून आज्ञा केली. श्रीमंत खडकीचे पलीकडे होते तेथून छ० ७ तारखेस खडकीचे पुलाजवळ येऊन उतरले. होळकरसुद्धां एकंदर फौज पंचवीस हजार सुमार होईल. शिंदे यांजकडून यादी आली तींत मोरोबा फडणीस यांस सोडावयाविशीं पंनास लाख रुपये कोणी बोलेतात, त्याजपैकीं आजपर्यंत त्यांचे कारकुनीचा ऐवज जमा असेल तो नानानीं द्यावा. फितव्याचे राजकारणांत होते त्यांस आपले स्वाधीन करावें. नबाबावर मसलत करणार त्यास नका म्हणूं नये व गुदस्तांचे नबाबाचे खंडणीपैकीं ऐवज येणें तो द्यावा. याप्रमाणें कमलवार यादी नानांकडे पाठविली आहे. याप्रमाणें जाबसाल उरकून द्यावा नाहीं तर आम्ही जिकडील तिकडे पाहून घेतों, म्हणोन शिंदे बोलतात."

नं. ३७२१. ( फाल्गुन शु० १४–२२ मार्च. )

नारायणराव गंगाधर यांचें बाळासाहेबांस पत्र—( *पै॥ १२ रमजान. )

* पत्रावर घातलेली मिति व तारीख पैवस्तीची आहे.

" काल तृतीय प्रहरीं श्रीमंतांची स्वारी होळकर याचे भेटी-करितां निघून खडकीचा पूल उतरून अलीकडे स्वारी आली. होळकरही तयार होऊन भेटीकरितां आमचे गोटाचे आघाडीस आले. तों शहरांतून रा॥ नाना व आपा बळवंत व बाबा फडके श्रीमंतांजवळ आले. होळकराकडील मानकरी यांच्या भेटी होऊन अस्तमानीं मल्हारराव होळकर व बापू होळकर व तुकोजीबाबा यांच्या भेटी जाल्या. रात्रीस नाना फडणीस मुहूर्तेकरून डेरेदाखल जाले. गार-पिराजवळ उतरले आहेत. बाबा फडके श्रीमंतांजवळ रहावयास आले. शिंदे यांचा मुक्काम दहा बारा कोसांवर आले अशी बातमी आली आहे. सर्व सरदार विल्हेचे विल्हेवार ताकीद करून जिकडील तिकडे उतरविले. पुण्यांतून माणसें सरकारचीं पाटीस लावून लष्करांत जाण्याविशीं शिलेदार व पागे पथकें वगैरे यांस वारंवार ताकीद होत आहे. "

नं. ३७२२. ( फाल्गुन शु० १३–२१ मार्च. )

नारायणराव यांजकडून बाळासाहेबांस पत्र– ( रवाना ११ रमजान. इंदुवार. सीत तिसैन. )

" राजश्री नाना फडणीस सस्वर्दास गेले. येथील भोई बढिलानीं दहा पांच कारखान्याचे भोई जमा करून डांकेस पाठवून डांकेवरून गेले. शिंयाचें बोलणें मिटलें नाहींसें दिसतें. फितव्यामुळें शिंयांचा राग भारी दिसतो. "

नं. ३७२३. श्रीगणपति. ( फाल्गुन शु० १३–२१ मार्च. )

पै॥ छ० १२ रमजान सन सीत तिसैन फाल्गुन बुधवार.

चिरंजीव राजश्री बळवंतराव व रामचंद्र आपा यांसीं आशी-र्वाद उपरी. शिंदे यांचा मुक्काम कंपूसहित येळनदीच्या काठीं तुळापु-रानजीक छ० ११ रोजीं आल्याची बातमी आली. हळू हळू त्याणीं जवळ केलें यास्तव श्रीमंतानीं नाना यास आज्ञा केली जे शिंदे याज-कडील कारभार लांबला. लवकर आटपावयाचा नाहीं व परतुत सल्लाह-

ही मानावयाचे नाहींत. याजकरितां तुम्हीं साताऱ्यास जाऊन रहावें. शिंदे यांची गांठ पडल्यानंतर बोलणें होऊन ठरेल तसें करावयास येईल, म्हणोन. त्याजवरून राजश्री नाना याणीं आज इंदुवारीं श्रीमंतांचा निरोप साताऱ्याकडे जावयास घेतला आणि कूच करून गेले. बरोबर हुजूरच्या दोन चार पागा व खासगत पथक व प्रतिनिधि यांचें पथक आबा शेलूकर येणेंप्रों सात हजारांचा भरणा फौजेचा व पायदळ दोन हजार व चार तोफा राघोपंत गोडबोले यासुद्धां आहेत. रवाना छ० ११ रमजान. बहुत काय लिहिणें हे आशीर्वाद.

नं. ३७२४. श्रीगणराज. (फाल्गु० शु० १५–२३ मार्च.)

पै॥ छ० १४ रमजान. सन सीत तिसैन. फाल्गुन व० प्रतिपदा गुरुवार. आठ तास दिवस.

अपत्यें शिरसाष्टांग नमस्कार विज्ञापना. येथील बाजारी वर्तमान तर—श्रीमंत जुन्नरास होते तेव्हां शिंदे यांजकडील सदाशिव मल्हार जुन्नरापासोन चार कोसांवर एक गांव आहे तेथें पागा घेऊन होते. शिंदे यांच्या लष्करांत अमृतराव यांचा मेहुणा होता त्याजकडून शिंदे याणीं संधान केलें. त्यानें सदाशिव मल्हार यास जुन्नरास रात्रीचे नेऊन श्रीमंतांची चार वेळ गांठ घातली. तेथें बोलणीं होऊन इमान प्रमाणें जालीं. ही बातमी जिउबा बक्षी यांस पुण्यांत कळतांच कारभारी यांसीं बेरोरव होऊन गेले. त्याणीं मनसबा केला होता जे, फौज घेऊन जुन्नरास जावें आणि श्रीमंतांस आपल्यापाशीं न्यावें. मग करणें तें करावें; परंतु बक्षी गेले उपरांतिक मनसब्यावर पडलें. तेव्हां राजश्री आबा चिटणीस शिंदे यांचे लष्करचे माहीत. त्याणीं फितवा करावा आणि शिंदे याचे कारभारी यांस दगा करावा असें आरंभिलें. त्यांत पुण्यांतीलही फडके, गोडबोले व पिंगळे व सेलूकर व मुख्यांसही कांहीं समजलें होतें. तीन चार लाख द्रव्यही खर्चास पाठविलें होतें. परंतु फुटलें. तेव्हां शिंदे याणीं झाडून धरले आणि ( त्यांची जबानी ) लिहून घेतली. मुद्दे शाबूत केले. उपरांतिक बहुत वल्गना

---

१ नारायणराव गंगाधर यांचें लष्करांतून बाळासाहेबांस पत्र. २ नाबाद.

करूं लागले. हें समजतांच ( कारभारी याणीं जुन्नराहून ) श्रीमंतांस आणिलें, तथापि त्यांचें भाषण " आमचा नाश करावयास ज्याणीं पाठविलें त्यांचा नाश करूं. बेअब्रू करूं " अशा मनस्वी वल्गना होऊं लागल्या. हें येथें समजण्यांत येतांच पिंगळे यांस रवाना केलें. ते जाऊन भेटले. दोन दिवस भाषण केलेंच नाहीं. " जें होणें तें पुण्यास गेल्यावरच होईल. जे या कर्मांत आहेत त्यांची बेअब्रू करून रस्त्यांतून फिरवूं. " अशीं भाषणें जालीं. हीं बातमी येथें येतांच येथील गृहस्थांनीं आवाई खाली. आणि श्रीमंतांस विनंती केली तेव्हां आज्ञा जाली, " कांहीं चिंता नाहीं. " तेव्हां विनंती केली जे, आपलें आश्वासन असावें. तेव्हां श्रीमंत बोलले, " तुम्हांस जसें इमान प्रमाण दिलें तसेंच जुन्नरांत असतां शिंदे यांस इमान प्रमाण दिलें आहे. त्याजवरून तेरीख परचुरे यांस व ' देवावें ' फडके यांज-कडे ( नानानीं ) सांगितलें. आणि साताऱ्याकडे जावें असा मनसबा ठरविला. आणि दुसरा मनसबा श्रीमंतांसह थेऊराकडे जावें अशी योजना केली. आणि मंदवारीं पहांटेचे प्रहर रात्रीस मुहूर्तेकरून घराहून निघून गारपिराजवळ डेरे देऊन राहिले. कारभारी गडबडले ही बातमी शिंदे यांचे कारभारी यांस कळतांच त्याणीं पिंगळे यांस बोलावून नेलें आणि पुसलें, " कारभारी याणीं अवसान कां टाकलें ! स्थळ सोडून कां जातात ? जाऊं नये. आमचे पांच सात मुद्दे आहेत हे कबूल करावे म्हणजे ( झालें. ) श्रीमंतांची दौलत आज बावीस तेवीस वर्षें ( याणीं ) सांभाळिली. माहीत हे. असा मनुष्य दुसरा दौलतींत नाहीं. आम्हांस ( येथील ) कारभार करावयाचा नाहीं. आमचें आम्हांस बहुत आहे. त्यास त्याणीं घाबरे होऊं नये. आम्ही याद लिहून देतों त्याजवर मखलासी करावी. आम्हीं आज-पावेतों कामें केलीं हीं दाबाचेच पोटीं केलीं आहेत. " तेव्हां पिंगळे बोलले, आपले मुद्दे व एक मातबर माणूस मजबरोबर द्यावा. मी जाऊन बोलतों. तोंपावेतों मुक्काम चार दिवस करावा. याप्रमाणें बोलणें ठरून

मंदवारीं प्रातःकाळीं चिठ्ठी बातमीची बोलणें जाल्याची आली त्यांत मुद्दे—

१ फितव्यांत होत त्यांस हवालीं करावें. हवालीं करावयाचें नसल्यास आम्ही पैका दर असामी पाहून सांगतों त्याप्रमाणें देवावा. आणि पुढें आम्ही सांगूं त्याप्रमाणें तुम्हींच पारिपत्य करावें.

२ गुदस्तां नबाबाचे खंडणींपैकीं एकूणतीस लाख रुपये आम्हांस द्यावयाचे ठरले आहेत. सरकारचा ऐवज न आला, त्यास आमचा ऐवज तुम्हीं द्यावा.

३ फितवा झाला याजमुळें आम्हांस ( फौजेची ) बळकटी करावी लागली त्यास खर्च पडला तो द्यावा.

४ मोरोबादादास सोडावें.

५ मोरोबादादानीं सोडविणेंबद्दल आम्हास पन्नास लाख रुपये कबूल केले आहेत. त्यास त्यांचा आजपावेतों कारकुनीचा ऐवज हिशेबीं होईल तो आम्हांस तुम्हीं द्यावा. पन्नासाचे भरतीस कांहीं उणा आल्यास त्यांजपासून आम्ही घेऊं.

६ बीड व पाथरी दोन महाल द्यावे.

७ पुढें कारभार गैरवाजवी करणार नाहीं असें लिहिलें द्यावें.

८ नबाबाची मसलत आम्ही करणार. सातान्यास ( तुम्ही जातां तर ) जाऊन यावें. आणि नबाबावर आम्ही मसलत करतों ( तींत ) तुम्हींही यावें.

अशी याद आली त्याजवरून कारभारी राहिले. कांहीं लोकांचीं मुलें-माणसें व चीजवस्त शहरांतून परस्थळीं गेली. फितव्यांत होते त्यांचीं नांवें वर लिहिलीं आहेत त्याशिवाय खंडोपंत वर्तक व बजाबा शिराळेकर व राजाराम विठ्ठल येणेंप्रमाणें होते असें लोक बोलतात. काल

रविवारीं शिंद्यांकडील भाऊ फडणीस व एक खिजमतगार—परंतु कारभार करतो—व पिंगळे येणेप्रों येथून तीन कोसांवर आले. द्रव्य यावें आणि अब्रू वांचवावी हाच पक्ष ( कारभारी ) करणार. अतःपर बोलणीं होऊन ठरेल तें खरें. परंतु भृगुवारीं बहुतच घाबरले होते. हल्लीं शरीरेंकरूनही बहुत कृश जाले आहेत. एक दिवस आठ दिवसांमागें रात्रौ लौकरच भोजन करून नबाबाकडील दिवाण कैदेंत आहेत त्यांजकडे गेले आणि त्यांस हा मजकूर सांगितला. त्यांस विचार पुसला. त्याणीं सांगितलें, ' द्रव्य देऊन अब्रू वांचवावी. अथवा येथून कोठें तरी स्थळ पाहून जावें. ' असा सल्ला दिला म्हणून ऐकतों. तेज कमी पडलें. मोठी वाईट गोष्ट जाहली. कारभारी यांजपाशीं मशीर उल्मुलुक म्हणाले जे, ' मी नबाबाकडून गुदस्तां कां आलों हें पुसाल, तर याचें कारण मी एकटा आल्यानें नबाबाचे जिवास उपद्रव होणार नाहीं. अथवा जोरतलबी करून रहावें तर सर्वस्वी नबाबाची दौलत स्वामीस येते. यास्तव मी एकटा गेल्यानें नबाबाचा घात होत नाहीं, मी न आल्यास घात होतो, हें मी समजून आपणापाशीं आलों. ' मागाहून होईल तें लिहून पाठवितों. कागद बहुवाच्य होऊं नये. सेवेशीं विदित होय हे विज्ञापना.

नं.३७२५. श्रीगणपति. ( फाल्गुन शु० १५-२३ मार्च.)

चि॥ राजश्री बळवंतराव यांसीं आशीर्वाद उपरी. आपण पत्रें पाठविलीं तीं पावलीं. पाहून माघारीं पाठविलीं आहेत. " चि॥ राजश्री चिंतामणराव आपा यांजकडून अमर्यादेंत बाकी नाहीं. रोज उठून किती काळजी वागवावी ? याजकरितां तुटक व्हावें " म्हणोन, व " चि॥ राजश्री रामचंद्र श्रीधर काळे यांस कामगारीच्या निमित्तें पाठवून बोलण्याचा पैगाम लावावा " म्हणोन लिहिलें, त्यास त्यांजकडूनच मुजरद निरोप आला असतां जरबेचें उत्तर सांगोन ताळ्यावर आणावें त्यांत विशेष गुण. आपण होऊन विचारलें असतां ताळा नाहीं. तत्राप युक्त योजावी तर हा समय नाहीं. येथील प्रसंग येका तऱ्हेचा. शिंद्यानीं ( पुणें ) जवळ केलें. राजश्री नाना म्हणोन

गेले. राजश्री गोविंदराव पिंगळे शिंद्यांकडे पाठविले असतां बोलण्याची घडी बसली नाहीं. आतां शिंद्यांकडील दिवाण राजश्री सदाशिव मल्हार वगैरे दोन चार बोलावयास श्रीमंतांकडे आले आहेत. कसकसा ठराव होतो पहावें. हाशील गोष्ट, रंग ठीक नाहीं. उद्यां छ० १४ रमजानीं शिंद्यांच्या भेटी होऊन स्वारी वाड्यांत दाखल होणार, नंतर छ० १५ रोजीं भृगुवारीं सातार्‍यास जावयाकरितां निघणार, असा बेत आहे. घडेल तें लिहून पाठवितों. रवाना छ० १३ रमजान. शिंद्यांचा मुक्काम आज आळंदी व कळस यांच्या दरम्यान इंद्रायणीच्या पाण्यावर आला. येथून चार कोसांचा फांसला आहे. उद्यांचे भेटीविषयीं अद्याप शिंद्याकडील रुकार नाहीं. कारण कर आहे. ठरेल तें लिहून पाठवितों. मालिट—इंग्रजांचा वकील—याची व श्रीमंतांची भेट आज जाली. राजश्री नाना छ० १२ रमजानीं पुरंदरच्या माचीस होते. काल पुढें सातार्‍यास गेले अशी बातमी श्रीमंतांकडे आली. कळावें. रवाना छ० मजकूर. आज शिंद्यांचा मुक्काम सरकारच्या फौजेशेजारीं जाहला. भेटी व्हावयाच्या आहेत. छ० मजकूर गुरुवार. बहुत काय लिहिणें हे आशीर्वाद.

पै छ० १६ रमजान. तीन घटका रात्र, सन सीत तिसैन फाल्गुन मास.

नं. ३७२६. ( फाल्गु. शु० १५–२३ मार्च. )

विठलराव पांडुरंग यांचें बाळासाहेबांस पत्र १३ रमजानचें—

" राजश्री नाना फडणीस याणीं चतुर्दशी सोमवारीं आवशीच्या पांच सहा घटका रात्रीस प्रयाण केलें. मंगळवारीं दोन प्रहर दिवसास पुरंदरच्या माचीस दाखल जाल्याचें पत्र आलें. बुधवार सांयकाळपावेतों समर्थीस दाखल होतील. रा॥ नानास श्रीमंतानींच निरोप देऊन रवाना केलें. बरोबर सरंजाम रास्त्याची दोन हजार फौज व प्रतिनिधीचें पथक व खास पथक नानाचें व शिवाय चार पागा व राघोपंत गोडबोले यांजकडील रिसाला चार हजारांचा येणेंप्रमाणें सरंजाम देऊन रवाना केलें. परंतु प्रथम निघाले त्या वेळेस

शंभर स्वार बरोबर निघाले नाहींत. रिसाल्यापैकीं पंचवीस असामी देखील निघाली नाहीं. धोंडभट—राघोपंत यांचे पुतण्ये—व बळवंतराव यांची अब्रू गार्दी यानीं घेतली. राघोपंत मोठ्या प्रयासें निघोन गेले. राजश्री दौलतराव बाबा शिंदे आज बुधवारीं आळंदीस येऊन देवदर्शन घेतलें. पंचवीस तोफांची सरबत्ती केली. नजीक आले. उद्यां गुरुवारीं तिसरे प्रहरीं यांच्या भेटीचा मुकरर ठरला आहे. गुरुवारीं रात्रीं रुजु शुक्रवार पहांटेच्या पांच सहा घटका रात्रीस वाड्यांत सुमुहूर्तेकरून जाणार. शनवारीं उजाडतां फिरोन समरुषीकडे जाणेंचा इतला ठरला आहे. शिंदे पोक्त सामानानिशीं आले आहेत. हुताशनी मंगळवारीं रात्रीं जाली. पूजनाचे समयीं ती॥ रा॥ भाऊसाहेबांस व ती॥ रा॥ दादा व महादाजीपंत दाजी व चिरंजीव राजश्री नारायणराव दादा यांस बोलावणें आलें होतें. पूजनसमयीं गेले होते. बुधवारीं मंडळीस व मलाही बोलावणें आलें होतें. गेलों होतों. श्रमिंत राजश्री आपासाहेब कचेरीस येऊन एक प्रहर बैठक जाली होती, पहीलवानांची लढाई व दांडपट्टा चार सहा घटका खेळ जाहला. ''

नं. ३७२७. ( फाल्गु० व० १—२४ मार्च. )

नारायणराव गंगाधर यांचें बाळासाहेबांस पत्र १४ रमजानचें—

" राजश्री नाना मंगळवारीं पहांटेचे दोन घटका रात्रीस पुरंदरास गेले. तेथें दिवसाचे राहून रात्रीस वंदनचे किल्ल्यास गेले. तेथून काल रात्रीस सातान्यास जाणार होते. बरोबर फौज पांचसात हजार गेली. व राजश्री आपा बळवंत व गंगाधरपंत भानु व आबा शेलूकर व राघोपंत गोडबोले व बज्याबा शिराळेकर येणेंप्रमाणें ब्राह्मण मंडळी गेली. काल शिंदे लोहगांवास येथून तीन कोसांवर आले. काल आळंदीस गेले होते. पंचवीस तोफांचे बार जाहले व संध्याकाळीं पांच जाले. आज तृतीय प्रहरीं श्रीमंतांची व शिंदे यांची भेट व्हावयाचा ठराव जाला आहे. काल व परवां शिंदे यांजकडील बोलणार चार असामी आले आहेत त्यांचें व श्रीमंतांचें खलबत जालें परंतु श्रीमंतांचें

म्हणणें विना नाना आल्याशिवाय आम्हांस कोणतें करावयाचें नाहीं; असा खंबीर दिसतो. अतःपर शिंदे आल्यांवर बोलण्यांत काय ठरतें पहावें. शिंदे यांचें म्हणणें नानानीं कारभार करूं नये असाच आग्रह आहे. नानांची स्त्री रायगडास गेली. बराबर राजश्री दादा गद्रे गेले आहेत. नाना गेले तेच दिवशीं शहरांत बाजीराव साहेबांची द्वाही फिरली. बंदोबस्त जाला. काल तिसरे प्रहरीं मालीट सरकारचे डेऱ्यास आला होता. श्रीमंतांची भेट जाली. राजश्री नाना गेले ते समयीं नबाबाचे दिवाण मशीरुलमुलूख यांस नेऊन पुरंधरास ठेवणार होते. तयारी करविली तों श्रीमंतानीं दोन तीन पागा पाठवून बंदोबस्त करून आहेत. त्याच स्थळीं राहूं दिलें. ''

नं. ३७२८. ( फाल्गु० व० १–२४ मार्च. )

रामचंद्र परशुराम यांचें बाळासाहेबांस पत्रें–( पै॥ १४ रमजान.)

विज्ञापना. पुण्याचीं पत्रें पावलीं. लेखक साताऱ्याकडे आले येणेंकरून स्थळ सुटलेंसें दिसतें. त्यांणीं विचार करूनच केलें असेल. येणाऱ्याच्या बुद्धीस विपर्यास कां आला न कळे ! पुढें कसा डौल होतो पहावें. परंतु हजिमा आहे. चिरंजीव चिंतामणराव आपाचा लाखोटा चुकून इकडे आला तो पाठविला आहे. रवाना तीन घटका रात्र सूर्योदयास. विदित होय हे विज्ञापना.

नं. ३७२९. ( फाल्गु० व० १–२४ मार्च. )

गणेश गोविंदाकडून बाळासाहेबांस पत्र–(रवाना १४ रमजान सन सीत तिसैन. )

" शिंदे काल येथून तीन कोसांवर आळंदीचे मुक्कामास आले. आज सायंकाळीं श्रीमंतांची व त्यांची भेट होणार. नाना फडणीस ११ तारखेस श्रीमंतांची आज्ञा घेऊन पुरंदरास गेले. तेथून दुसरे दिवशीं वंदनास गेले. तेथून साताऱ्यास जाणार. पुढें कारण दृष्टीस पडेल तसें करितील. ''

---

१ पत्राच्या शिरावर " श्रीगणपति. " अशीं अक्षरें आहेत.

नं. ३७३०. ( फाल्गु० व० ३–२६ मार्च. )

जनार्दन रघुनाथ ( रहिमतपूरचा ठाणेदार ) याजकडून बाळा-साहेबांस पत्र १६ रमजानचें–

" श्रीमंत राजश्री नानांची स्वारी बुधवारीं रात्रौ सातान्यास आली. किल्यावर गेले नाहींत व बाजारबातमी कीं, किल्ल्यावर जात होते तों मागाहून सरकारचें पत्र आलें कीं किल्यावर घेऊं नये. म्हणोन, त्याजवरून घेतले नाहीं म्हणतात. सातारे शहरालगत करंजें आहे त्या गांवांत उतरले आहेत. थोडीबहुत फौज तेथें आहे. बाकीची पांच चार हजार फौज श्रीवेण्णेच्या पाण्यावर आहे म्हणोन बातमी आली. "

नं. ३७३१. श्री. ( २७ मार्च. )

ती॥ राजश्री बाळासाहेब

वडिलांचे सेवेशीं.

अपत्यें रामचंद्र श्रीधर काळे. शिरसाष्टांग नमस्कार विज्ञापना. येथील क्षेम तागायत फाल्गु० व० ४ पावेतों मुकाम खराडी पुण्याचे पूर्वेस अडीच कोस येथें वडिलांचे आशीर्वादेंकरून सुखरूप असों. विशेष...... इकडील राजकी वर्तमान तर खडकीच्या मुकामाहून थोडेंबहुत लिहिलें होतें. अलीकडील वर्तमान तर श्री॥ राजश्री बाजीरावसाहेबांची आणि राजश्री नानांची गंगाजळी फाल्गुन शु॥ २ स जाहली. नंतर शिंदे यांस श्रीमंतांचीं पत्रें घेऊन पाठविलीं कीं, " फौजसुद्धां येऊं नये. पांच हजार फौजेनिशीं यावें. " तें शिंदे याणीं न ऐकितां फौजसुद्धांच जांबगांवपर्यंत आले. पुढेंही तैसेच येतात ऐसें समजलें. श्रीमंतांच्या पत्रांचा उजूर न धरितां सारी फौज घेऊन येऊं लागले. आणि नानानीं राजश्री गोविंदराव पिंगळे यांस शिंदे यांजकडे पाठविलें होतें त्यांचें आणि यांचें बोलणेंही जाहलें, परंतु पटेनासें जाहलें. तेव्हां श्रीमंतांस नानानीं ती॥ राजश्री भाऊ-साहेबांकडून पुसविलें कीं, " शिंदे यांचें आमचें वांकडें. स्वामींचें पत्र गेलें त्याचाही मान शिंदे याणीं केला नाहीं. तेव्हां आमची गति

काय ? जर आज्ञा जाहली तर चार दिवस आम्ही स्थलांतर करितों. शिंदे स्वामीपाशीं येतील, त्यांचें आपलें बोलणें होईल, मग जशी आज्ञा होईल त्याप्रों वर्तणूक करीन. " तेव्हां श्रीमंतानीं नानांस सांगितलें कीं, " शिंदे पत्रानें ऐकत नाहींत तेव्हां त्यांची नजर एकप्रकारची दिसती. तर तुम्हीं तूर्त सातारियास जावें. मग आम्ही तुमचें व शिंदे यांचें ठीक करून देतों. " ऐसें श्रीमंत बोलले. नंतर नानानीं श्रीमंतांचा निरोप फाल्गुन शु॥ १३ सोमवारीं घेऊन तेच रात्रीस निघून गेले. समागमें पांच सात हजार फौजही नेली आहे. नंतर शिंदे फाल्गुन व॥ प्रतिपदेचे दिवशीं आले. भेटी श्रीमंतांची जाहली. नंतर श्रीमंत द्वितीयेस वाड्यांत मुहूर्तानें जाऊन काल तृतीयेस पहांटेस सातारियास जावयास मुक्काम मजकुरीं डेरेदाखल जाहले. बराबर ती॥ राजश्री भाऊसाहेब आहेत. जितकी हुजरात प्रस्तुत येथें आहे तितकी समागमें आहे. शिंदे यांचें अद्यापि खडकीहून कूच जाहलें नाहीं. याउपरी श्रीमंतांचें आणि शिंदे यांचें बोलणें होणार. परंतु शिंदे याणीं आजपावेतों जी मसलत केली ती फसलीशी भासते. पहिल्यानें, श्रीमंत हातीं लागले नाहींत. दुसऱ्यानें, सरंजामसुद्धां आले तों नाना निघोन स्थलांतर केलें. श्रीमंत मात्र आहेत. आतां जें बोलणें तें श्रीमंतांशीं बोलावें ऐसें जाहलें. श्रीमंत बोलण्यास माहीत किती आहेत हें समजतच आहे. ती॥ भाऊसाहेबानीं बोलावें तर यांचें म्हणणेंच आहे, ' आम्हीं आपलेस आणून सर्व दौलत स्वाधीन केली. याउपरी आपले विचारास येईल तैसें करावें. ' हेही श्रीमंत जसें बोलतील त्यासच अनुमोदन देतात ! याउपरी शिंदे यांचें आणि श्रीमंतांचें बोलणें काय होतें पहावें. परंतु रंग दिसतो कीं केवळ शिंदे जसें ऐका म्हणतील तैसेंच केवळ ऐकणार नाहींत; ऐसें भासतें. परंतु न ऐकिल्यास ऐवज काय ? श्रीमंतांसही अवघड पडलें आहेसें भासतें. शिंदे यांचे दबावावर आपण राज्यावर आलों. दुसरें राजश्री नानानीं व वडिलानीं जाऊन शिंदे यांचे अगोदर राज्यावर आणिलें. गंगाजळ्या जाहल्या. तेव्हां यांस धरावें किंवा त्यांस धरावें ऐसें (संकट) पडलें आहे. यांत कोणतें घडतें पहावें. सुचला

ऐकला प्रकार लिहिला आहे. माझें लिहिणें केवळ प्रमाण ऐसें मानूं नये. वडिलांस सर्वांकडून लिहिलीं जात असतील. व वडीलही लिहीत असतील. त्यावरून सर्व समजत असेल. वडिलीं कृपाकरून लिहून पाठवावें म्हणोन आज्ञा (केली) होती त्यावरून ऐकलें लिहितों. बहुत काय लिहिणें सेवेशीं श्रुत होय. हे विज्ञापना.

पै॥ छ० १९ रमजान. सब्बां तिसैन. फाल्गुन मास.

नं. ३७३२. श्री. (फाल्गुन व० ४–२७ मार्च.)

पै॥ छ० १९ रमजान. सब्बां तिसैन. फाल्गुन मास.

सेवेशीं साष्टांग नमस्कार विज्ञापना तागायत छ० १७ रमजान रविवासरपावेतों मु॥ मौजे खराडी नजीक पुणें यथास्थित असे. विशेष. इकडील वर्तमान तरी—

१ शिंदे यांच्या भेटी जाहल्याचा मजकूर येथून लिहिलाच आहे. भेटी श्रीमंतांच्या व शिंदे यांच्या जाहल्यानंतर शिंदे याणीं दीडशें बार तोफांचे केले व गाडदी यांची सलक जाहली.

१ श्रीमंत वाड्यांत आले ते दिवशींचा मजकूर येथून सेवेशीं लिहून गेला आहे.

१ खाजगीवाले यांचे कारभारी गणेशपंत जोशी यांसीं श्रीमंत वाड्यांत आले ते दिवशीं श्रीमंतांची आज्ञा जाहली जे, कारखाने यांचा दररोजिना खर्च काय आहे, तुमचे सरकारांत फाजील किती येणें आहे, हें आणोन समजाविणें.

१ पांडुरंगपंत ढमढेरे दप्तरदार यांसीं श्रीमंत वाड्यांत आले ते दिवशीं आज्ञा जाहली जे, किल्लोकिल्लीं बंदिवान किती आहेत, बंदिवानांच्या सनदा बार कशा जाहल्या आहेत, अन्याय कोणते, हें आणून समजावणें.

---

१ परशुरामभाऊ. २ कारकून बाबाजी विश्वनाथ चांफेकर याचें मिरजेस बाळासाहेबांस पत्र.

१ आबा शेलूकर याजकडे सरकार पागा होती, आबा श्रीमंत राजश्री नानासमागमें सातारयासीं गेले. पागा येथें राहिली. पागेचीं घोडीं आणून ( सरकारी ) पागेस वांटून दिलीं.

१ बापूजीपंत बापट याजकडे गुदस्तांचे स्वारींपैकीं पेंढारी यांचीं घोडीं होतीं तीं श्रीमंतानीं आणून पागेस वांटून दिलीं.

१ रायगड किल्ला गद्रे यांजकडे आहे तेथें श्री॥ राजश्री नाना जाणार अशी योजना आहे, म्हणोन गल्ला व दारू व अमीरी सामान व जकेरा किल्ल्यावर चढविला आहे.

१ श्री॥ राजश्री नानांचे स्वारीबरोबर गाडदी यांचे रिसाले गेले. बाकी नेमणुकेपैकीं राहिले ते स्वारीबरोबर घेणें-विशीं त्रिंबकराव परचुरे याणीं विनंती केली. तेव्हां श्रीमंतांचें उत्तर जाहलें जे, नानानीं इतके दिवस पैका देऊन ठेविले ते त्यांचे स्वारीबरोबर गेले नाहींत. ते आमचे उपयोगीं काय आहेत ?

१ श्रीमंत मागील माहितगिरीचे जाबसालाविशीं महादाजी-पंत गुरूजींस बोलावितात.

१ आपा बळवंत नानांचे स्वारीबरोबर गेले ते दिवशीं रात्रौ कात्रजेच्या घांटांत पालखीचे भोई पालखी टेवून पळून गेले.

१ श्रीमंतांचे वाड्यांतील शागीर्दपेशा व ब्राह्मण मंडळी पेशजीची आहे त्यांस श्रीमंतानीं आज्ञा केली जे, स्वारीबरो-बर बोलावूं त्याणीं यावें. बाकीच्यानीं पुण्यांत वाड्यांत असावें. दिनकरपंत भडभडे व बाळाजीपंत टोसर यांचे पुत्र स्वारीबरोबर येणार. आज्ञेविशीं विनंती होत आहे. शागीर्दपेशे

यांसीं पागेचें घोडें ( आम्हांस ) पुसोन द्यावें अशी आज्ञा जाहली.

येणेंप्रमाणें ऐकींव बाजारी वर्तमान लिहिलें आहे. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

नं. ३७३३. श्रीगणराज. (फाल्गु० व० ४–२७ मार्च.)

पै॥ छ० १९ रमजान. फाल्गुन. +सब्बां तिसैन.

पुरवणी. अपत्यें[१] शिरसाष्टांग नमस्कार विज्ञापना. येथील बाजारी वर्तमान तर श्री॥ बाजीरावसाहेब जुन्नरास होते तेव्हां शिंदे याणीं संधान करून श्रीमंतांपासोन लिहून घेतलें जे, " आम्हांस राज्यावर बसवावें. म्हणजे निम्में राज्य व पन्नास लाख रुपये ( आम्हीं तुम्हांस) द्यावे. त्यापैकीं पुण्यास जातांच पंचवीस व अखेर सालीं पंचवीस द्यावे. व मोरोबादादास सोडावें. " असें लिहोन घेतलें त्यांत " मोरोबादादास सहा महिन्यांनीं आमचे विचारास आल्यास सोडूं " येणेंप्रो॥ ( श्रीमंतानीं ) शेरा मारला. दोन कलमें कबूल केलीं. त्याजविशीं शिंदे वाड्यांत येऊन खलबत जाहलें. तेव्हां पंचवीस लक्ष रुपये देवावे म्हणोन पुसलें. त्याजवरून आज्ञा जाली जे, तुम्हांसी आम्हीं करार केला त्याप्रमाणें तुम्हीं येऊन पोंचावें ते आलां नाहीं. त्याजवरून भाऊनीं येऊन आम्हांसीं बोलोन जुन्नराहून बाहेर डेऱ्यास नेलें. तेव्हां-ही आठ दिवस आम्हीं वाट पाहिली. तथापि तुम्ही आलां नाहीं. त्याजवर पुण्यानजीकही येऊन दहाबारा दिवस वाट पाहिली. परंतु आलां नाहीं; त्यापेक्षां करार कोठें राहिले ? त्यांत राजश्री नाना गेले याजमुळें सरकारांतही खर्चाची वोढ जाली. जामदारखान्यांत म्हणावें तर पैसा नाहीं अशी अवस्था जाली आहे. त्यास नाना आलियाखेरीज कांहींएक समजत नाहीं. त्याजवरून शिंदे याणीं बोलणें घातलें, " आम्ही काय नानास करीत होतों ? ते गेले कां ? त्यास आम्हांकरितां गेले त्याअर्थीं आम्हींच जाऊन कोणास पाठवितों आणि

+सन चुकला. ' सीत ' असें पाहिजे.

१ लष्करांतून नारायणराव गंगाधर यांचें बाळासाहेबांस हें व पुढच्या नंबरचें पत्र.

नानांची समजून करितों." याप्रों बोलले. त्यास उदईक धोंडीबा शिंदे यांजकडील व गोविंदराव पिंगळे सातान्यास जाणार. परंतु तेथेंही (नानांचें) बालणें पडेल जे, "निमें राज्य व पन्नास लक्ष रुपये तुम्हांस देऊन पुढें कारभार आमच्या हातून होत नाहीं. ते धणी व तुम्ही सरदार आहां. माझें काय प्रयोजन ? आजपावेतों बरेंवाईट केलें. अत:पर स्नानसंध्या करून स्वस्थ रहाणार. नाहीं तर चिट्टी जुन्नरास (श्रीमंतांकडून) घेतली ती माघारी यावी. (आणि मग) पुढें बोलणें." येणेंप्रमाणें बोलणीं होणार. शिंदे धोंडीबास सरकारचे नेटावर पाठविणार. शिंदे यांचा बहुत चढ होता तो कालचे बैठकेपासोन कमी पडला. कां कीं, जुन्नरचें बोलणें येथें नाहीं व नाना गेले याजमुळें दौलतींत बखेडे होणार हें निमित्त येणार. याजकरितां आणावे. परंतु तेथें आणखी काय बोलणीं पडतील, पडतात, हा अंदेशा आहे. राजश्री नाना गेले ते समयीं गाडदी यांस राघोपंत गोडबोले याणीं ताकीद केली, 'स्वारीबरोबर येणें.' तेव्हां गाडदी बोलले, 'तुम्ही पळतां ! आम्ही बरोबर येणार नाहीं. आमचे तलबेचा फडशा करणें.' म्हणोन गोडबोले यांस घेरून बसले. तेव्हां आरबांचे जमातदारास (गोडबोले यानीं) पांच हजार रुपये देऊन त्यास फोडला. आणि दोनशें आरब स्वारीबरोबर तयार करून पाठविले. चार हजार गाडद गोडबोल्यांकडील त्यांत दोनशें गेले ! राघोपंतानीं तजवीजेनें निकाल काढोन (नानाच्या स्वारी) बरोबर गेले. मागें त्यांचे पुतणे धोंडभट व कारकून यांस गाडयानीं अडविलें. नानाप्रकारें शिव्यागाळी केली. संगीनानीं कारकुनास जखम केली. लत्ताप्रहार केला. घरांत कोंडून दारीं बसले. हें श्रीमंतांस कळतांच हुजरे पाठवून गाडयांस ताकीद जाली, 'तुम्हीं राघोपंताकडे जाणें. येथें त्यांचे कारकुनास व पुतण्यास तगादा केल्यास कार्यास येणार नाहीं. त्याजवरून मोकळीक जाली. असा समय पाहून लबाडी केली. सेवेशीं विदित होय हे विज्ञापना.

---

१ धोंडो रामचंद्र हा बाळोबा तात्याचा पुतण्या.

नं. ३७३४. श्रीगणराज.( फाल्गुन व० ४—२७ मार्च. )

पै॥ छ १९ रमजान. *सबा तिसैन. फाल्गुन मास.

पुरवणी अपत्यें शिरसाष्टांग नमस्कार विज्ञापना. छ० १४ रमजानीं आम्हांस शिमग्याचे खेळाकारितां बोलावणें आलें: आम्हीं प्रातःकाळींच भोजन करून गेलों तों श्रीमंत देवांची पूजा करीत होते. श्री॥ राजश्री चिमाजी आपा कचेरीचे डेऱ्यांत बसले होते तेथें गेलों. उपरांतिक आपासाहेब तेथून उठले. आम्हांस सांगितलें जे, ( आमच्या ) डेऱ्यांत येणें. त्याजवरून मी व ती॥ राजश्री बापूसाहेब[1] व चि॥ राजश्री माधवराव दाजी[2] येणेंप्रमाणें व आणखी आम्हांकडील कारकून मंडळी येणेंप्रमाणें डेऱ्यांत आपासाहेबांचे गेलों. सोंगटीं खेळत बसलों. आपासाहेबांनीं आज्ञा केल्यावरून दोन डाव जाले. तों श्रीमंत पूजा आटोपून होलिकेजवळ आले. तेथून नदीस स्नानास गेले. पंधरा सोळा घटका दिवस आला होता. उष्ण मोठें पडलें होतें. नदीतीरीं जाऊन बसले; आणि रा॥ पांडुरंगराव बारामतीकरांस बोलावणें पाठविलें. त्यांस यावयास उशीर लागला. तेव्हां आपासाहेब यांस व आम्हांस आज्ञा जाली जे, तुम्ही येथें बसावें. आम्ही स्नान करून भोजनास जातों. याप्रमाणें सांगोन भोजनास गेले. उपरांतिक बारामतीकर आले त्यांस घेऊन आपासाहेबांनीं स्नान केलें. उपरांतिक डेऱ्यांत जाऊन बसलों. श्रीमंत भोजन करून डेऱ्यांत आले. उपरांतिक विडे घेऊन निरोप घेऊन डेऱ्यास आलों. श्रीमंतांस भोजनास एकोणीस घटका दिवस आला. नित्यांतही सोळा सतरा घटका होतात. श्री॥ राजश्री चिमाजीआपांस दहा घटका अथवा आठ नऊ होतात. बाजीराव साहेबांस रात्रौ भोजनास बारा तेरा घटका रात्र नित्यांत होते. त्वरा केल्यास आठ नऊ तरी होते. श्रीमंत उभयतां स्नानास गेले ते वेळेस पटवर्धन मंडळी सारी होती.+—

---

*सन चुकला ' सीत ' असें पाहिजे. १ विठ्ठलराव पांडुरंग. २ महादाजी परशुराम.

+ हा पुरवणीचा एकच बंद मिळाला.

नं. ३७३५. श्रीगणराज. ( फाल्गुन व० ४–२७ मार्च. )

पै॥ छ० २२ रमजान. भृगुवार. तीन तास दिवस. सन सीत तिसैन.

अपत्यें रघुनाथरायानें साष्टांग नमस्कार विज्ञापना. तागायत छ० रमजान मु० खराडी येथें वर्तमान यथास्थित असे. विशेष. वडिलीं आज्ञापत्र पाठविलें तें पावलें. राजकीय वृत्तांत सविस्तर लिहावा म्हणोन आज्ञा. त्यास फाल्गुन व॥ प्रतिपदा गुरुवारीं खडकीवर श्रीमंतांच्या व शिंद्यांच्या भेटी जाहल्या. भेटी समयीं वडील-ही होते. श्रीमंतांची मर्जी शिंद्यांवर बहुत संतुष्ट जाहली. ' यांच्या योगें कृतकृत्य जाहलों, ' असा भाव दर्शविला. आपल्या गळ्यांतील मौक्तिकांची माळ शिंद्यांच्या गळ्यांत घातली. आपल्या पागोट्यांतील फुलांचा तुरा आपल्या हातें काढून शिंद्यांचे मस्तकीं लाविला. परस्पर गोटास गेले. तेच रात्रीं वीस घटकांनंतर पुण्यांतील वाड्यांत यावयाचा सिद्धांत ठरोन त्याप्रमाणें समारंभेंकरून वाड्यांत आले. खडकीवरून पुणें उजवें घेऊन भवानीपेठ रविवारांतून बुधवारच्या झेंड्याजवळ मोठ्या रस्त्यास मिळोन सरकारचा वाडा उजवा घेऊन दिल्ली-दरवाज्यानें स्वारी वाड्यांत गेली. देवघरांत जाऊन देवांस नमस्कार करून श्रीमंत मातुश्री रमाबाईसाहेब यांजवळ पाव घटका जाऊन बसोन आले. थोरल्या पुढील चौकांत बैठक केली होती. समारंभ वाड्यांत येण्याचा अपूर्व जाहला. दुसरे दिवशीं शिंदे वाड्यांत आले. शिंद्यांकडील दोघे तिघे कारभारीसहवर्तमान शिंदे यांसीं व उभयतां श्रीमंत यासींच खलबत चार घटकांपर्यंत जाहलें. शिंदे गोटास गेले. तेच रात्रीं डेरे दाखल व्हावयाचा मुहूर्त वीस घटकांचा पाहिला होता त्याप्रमाणें निघोन काल शनवारीं मुक्काममजकुरीं आले. आजचा मुक्काम आहे. स्नानास लौकरच जाऊन वस्त्रें घेणार. चैत्र शु॥ प्रतिपदा, पंचमी,

१ कुरुंदवाडकर. त्यांचें हें निरजेस बाळासाहेबांस पत्र. २ यशोदाबाईस तिच्या पहिल्या सवतीचें नांव येथें चुकून लावलें आहे, की तिचें तेंही नांव होतें हें समजत नाहीं.

वद्य पंचमी, असे दोन तीन मुहूर्त बोलण्यांत आहेत. प्रस्तुत लेखक साताऱ्यास निघोन गेले. त्यांचें व शिंद्यांचें ऐक्य करावें या विवंचनेंत व उद्योगांत ( श्रीमंत ) आहेत. शिंद्याचे लष्करांत फितूर करणाऱ्यांनीं केला अशी जनवार्ता उठली होती, परंतु मूळ शोधतां कोठें ठिकाण नाहीं ! अजून बैठका होऊन बूट निघाले नाहींत. कारभारी येऊन बोलणीं होतात. बहुत काय लिहिणें हे विज्ञापना.

नं. ३७३६. श्रीगणराज. ( फाल्गुन व० ४–२७ मार्च. )

पै॥ छ० २२ रमजान सन सीत तिसैन. भृगुवार. तीन तास दिवस.

विज्ञापना. श्रीमंत वाड्यांत दाखल जाल्याउपर झाडून कारखानदारांस आज्ञा जाली, ' हुजूरचे आज्ञेखेरीज कांहीं करूं नये. याप्रों खिजमतगार पाठवून साऱ्यांसताकीद केली. बाकी म्हणतां साताऱ्यास जाऊन वस्त्रें जाल्याउपर सारे बूट पडतील. परंतु स्वपक्षाचे आहेत त्यांच्या उभारणीचा रंग दिसतो. काय घडतें पहावें. आम्ही तो पक्षहीन[3] ईश्वराचे इच्छेनें जालोंच आहों ! घडतां घडेल तें खरें. रवाना छ १७ रमजान. विदित होय हे विज्ञापना.

नं. ३७३७. श्री. ( फाल्गुन व० ४–२७ मार्च. )

पै॥ छ० २२ रमजान. भृगुवार. तीन तास. सन सीत तिसैन.

सेवेसीं बळवंत लक्ष्मण. कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना तागायत. छ० १७ रमजान स्वामींचे कृपेंकरून वर्तमान यथास्थित असे.. विशेष इकडील वर्तमान—

१ फाल्गुन व॥ प्रतिपदा गुरुवारीं श्रीमंतांच्या व शिंद्यांच्या भेटी जाहल्या. समारंभ अपूर्व जाहला. मोत्यांची माळ व फुलांचा तुरा श्रीमंतानीं शिंद्यांस भेटीनंतर दिला. मर्जी बहुत

---

१ तऱ्हा. २ पत्र रघुनाथराव कुरुंदवाडकरांचें बाळासाहेबांस. ३ लेखकानें या शब्दांत श्लेष केला आहे. ४ उपनांव लेले, हा कुरुंदवाडकरांचा कारकून; त्याचें हें मिरजेस बाळासाहेबांस पत्र.

प्रसन्न जाहली. " आपली श्री एतन्मूलक, " असा भाव दर्शविला. व बोलण्यांतही समय विशेषीं येतें, " मला पेशवाई शिंद्यानीं दिली. त्यांची सर्फराजी सर्वात्मना करावयाची. त्यांस अंतर द्यावयाचें नाहीं. " असें प्रसन्नतेनें बोलत असतात. भेटी होऊन शिंदे गोटास गेले. दोन घटकांपर्यंत तोफांची सरबत्ती होत होती. श्रीमंत डेऱ्यास आले. रात्रौ अपररात्रीस वाड्यांत यावयाचा निश्चय होऊन समारंभेंकरून वाड्यांत आले. कलम.

१ वाड्यांत स्वारी गेली तेव्हां तोफखान्याकडील दरोग्यांस आज्ञा जाहली, " पुरंदरांहून रावसाहेब पुण्यांत ( रहावयास ) आले ते वेळेस तोफांचे आवाज केले तितके करावे " म्हणोन, त्यावरून पन्नास साठ तोफांचे बार केले. कलम.

१ भृगुवारीं अपररात्री श्रीमंतांची स्वारी डेरेदाखल जाहली. गारपिरावर मुक्काम जाहला. शनवारीं खराडीवर आले. रविवारचा आजचा मुक्काम आहे. कलम.

१ मुख्य चित्रगुप्त पुरंदरास जाऊन साताऱ्यास गेले. त्यांचें व शिंद्यांचें सख्यत्व करावें, अगोदर स्वच्छता करून मग साताऱ्यास स्वारी पोहोंचावी, असा आशय दिसतो. प्रस्तुत मनसबा उभयतांच्या सख्याचाच उपस्थित आहे. काय होतें पडावें. कलम.

१ शिंद्यांच्या लष्करांत करणारानीं फितूर केला, मारेकरी घातले, अशी जनवार्ता अनेकप्रकारची येथेंही उठली होती. परंतु सर्व निर्मूल आहे ! शिंद्यांच्या लष्करांत वाडीप्रांतचे गृहस्थ आहेत ते भेटले होते. त्यांस वर्तमान मी विचारलें. त्याणीं सांगितलें. कलम.

१ वाड्यांत स्वारी येतेवेळेस पुणें उजवें घेऊन भवानी पेठेंतून रविवारांतून बुधवारच्या रस्त्यास आले. तेथून वाडा

---

१ सवाईरावसाहेब. २ नाना. ३ दोणवी.

उजवा घेऊन दिल्लीदरवाजानें वाड्यांत प्रवेश केला. थोरल्या चौकांत बैठक केली होती. दोन तीन देवघरांत अगोदर जाऊन श्रींचें दर्शन घेऊन अनन्तर श्री॥ मातुश्री बाई-साहेब यांजवळ पाव घटका बसोन कचेरीस आले. वाड्यांत गेले ते वेळेस हजार बाराशें रुपये धर्म केला. कलम.

१ दुसरे दिवशीं शनवारीं पर्वतीस स्वांरी जावयाचा निश्चय जाहला. इतक्यांत शिंदे वाड्यांत येतात म्हणोन वर्तमान आलें. त्यावरून पर्वतीची स्वारी तहकूब जाहली. शिंदे वाड्यांत यावयाचे पूर्वी वडिलांची स्वारी वाड्यांत गेलीच होती. शिंदे वाड्यांत आल्यानंतर श्रीमंतांचे व शिंद्यांचें खलबत इतर निर-पेक्ष्य जाहलें. शिंद्यांकडील कारभारी मात्र खलबतांत होते. चार घटका बोलणें होऊन शिंदे माघारे गेले. कलम.

१ 'आपली राज्यावर स्थापना केली ही शिंद्यानी केली,' असें सबाह्यांतरीं यजमानांचे आहे. त्याप्रमाणें भाषणांतही समय विशेषीं येत असतें. आजच्या प्रसंगीं विदु-राप्रमाणें भक्त दुसरा नाहीं ! अग्रिम. हरएक कर्तव्यतेचा निश्चय विदुरवाक्यानुसारच होत असतो. काल शिंदे होळकर यांचें कूच जाहलें नाहीं. कारण समजलें नाहीं. कलम.

१ शिंद्यांबरोबर सरंजाम पंधरा वीस हजार फौज, या खेरीज कंपू व तोफखाना, इतका अजमास आहे. कलम.

१ श्रीमंतांची स्वारी गारपिरच्या मुक्कामाहून खराडीस आले ते दिवशीं पर्वतीस जाऊन पुणें उजवें घेऊन मुक्कामास आले. कलम.

येणेंप्रमाणें वर्तमान आहे. सारांश आजच्या प्रसंगीं शिंद्यांपेक्षां दुसरें कांहीं थोर श्रीमंतांस नाहीं असा लौकिक आहे. वरकड सविस्तर स्वामीस विदित होतच आहे. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

---

१ बाजीरावांच्या.

नं. ३७३८. श्री. ( फाल्गु. व० ४-२७ मार्च. )

राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री रामचंद्रपंत आपा स्वामीचे सेवेशीं.

पोष्य बाळाजी जनार्दन सा।। नमस्कार विनंती उपरी येथील कुशल जाणून स्वकीय लिहीत जावें. विशेष. आम्हीं श्रीमंतांचा निरोप घेऊन साताऱ्यास आलों. राजश्री भाऊ तेथें श्रीमंतांजवळ आहेत. तुम्हीं आम्हांजवळ असावें असें मनांत. त्याजवरून तुम्हांस लिहिलें आहे. तर पत्र पावतांच एक हजार फौज नवी चांगली ठेवून येथें जलदीनें येऊन पोंचावें. श्रीमंत एकादशीस कृष्णातीरास येणार. त्या अर्थी तुम्ही सडे पत्र पावतांच जितके लोक मिळतील तितके घेऊन एकादशी अगोदर येथें पोंचावें. विलंब लावूं नये. लोक मागाहून येतील. तुम्हीं पत्र पावतांच लांब मजलीनें येऊन पोहोंचावें. रवाना छ० १७ रमजान. बहुत काय लिहिणें लोभ असों दीजे हे विनंती.

नं. ३७३९. ( फाल्गु. व. ४–२७ मार्च. )

अपत्यें नारायणानें दोन्ही कर जोडून शिर सा।। नमस्कार विज्ञापना तागायत छ० १७ रमजान मुक्काम घोरपडी नजीक पुणें येथें वडिलांचे आशीर्वादेंकरून सुखरूप असे. विशेष. इकडील वर्तमान तर श्रीमंत वाड्यांत गेले ते दिवशीं वाडा सारा हिंडोन पाहिला. श्रीमंत कैलासवासी दादासाहेबांचे दिवाणखान्याकडे गेले तों कुलूप कवाडास होतें. तेव्हां आज्ञा केली जे, कुलूप काढून दिवाणखाना झाडून पडझड नीट करवून स्वारी येई तों तयार करणें म्हणोन आज्ञा जाली. श्रीमंत मातुश्री बाईसाहेबांकडे दोन वेळ गेले होते. एक वेळ तिसरे प्रहरीं वडिलांस घेऊन गेले. बाईसाहेबानीं पिस्ते वगैरे फराळाचे जिन्नस दिले ते भक्षून विडा घेऊन आले. प्रथम वाड्यांत आले तेव्हां देवांस नमस्कार करून मसनदीपाशीं येऊन तेथें नमस्कार करून मसनदीवर बसले. नजर घेतली नाहीं. त्या दिवशीं शहरांतील भेटीस यावयाजोगे गृहस्थांस येणेंविशीं आज्ञा जाली. भेटी बहुतकरून जाल्या. चिंतोपंत याचे व चिंतो विठ्ठल यांचे चिरंजीव व रा।। सदाशिवराव घोरपडे भेटीस

गेले होते. ते दिवशीं छ० १५ रोजीं शिंदे श्रीमंतांकडे सरकारच्या वाड्यांत संध्याकाळच्या तीन घटका दिवसास गेले. पूर्वी दोन प्रहरीं खासगीवाले वगैरे कारखाननीस यांस बोलावून श्रीमंतानीं ताकीद केली होती जे, ज्याप्रमाणें रावसाहेबांचे वेळेस बैठका वगैरे साहित्य करीत होतां त्याप्रमाणें त्या दिवशीं शिंदे येणार यास्तव करावें. व रा॥ बाबा फडके यांस बोलावून नेऊन सांगितलें जे, मानकरी व बारगीर वगैरे लोक रावसाहेबांचे वेळेस बसवीत होतां त्याप्रमाणें बंदोबस्त करणें. त्याजवरून दोनचार जागां बैठक करविली होती. शिंदे आले. श्रीमंत कैलासवासी बाजीरावसाहेबांचे दिवाणखान्यांत बैठक जाली होती. दोन घटका तेथें बसले. उपरांतीक खलबताकरितां गणपतीचे दिवाणखान्यांत गेले. बरोबर तीर्थस्वरूप राजश्री भाऊसाहेब व दादा व बाबा व शिंदे आपले कारभारीसुद्धां गेले होते. दोन घटका बोलणें जालें. उपरांतीक श्रीमंत उठोन दुसरे मजल्यास गेले. तेथें शिंदे यांस मात्र त्यांचे कारभारीसह बोलाविलें. तेथेंही दोन घटका बोलणें जालें. उपरांतीक विडे दिले. बोलण्यांतील पर्याय व उत्तरें जालीं तीं पुरवणी पत्रीं लिहिलीं आहेत. रा. महादजीपंत गुरुजीस श्रीमंतानीं बोलावून नेलें होतें. भेट जाली. ते दिवशीं रात्रौ निद्रा हजारी कारंजाजवळील दिवाणखान्यांत जाली होती. काल मंदवारीं पहांटेचे दहा घटका रात्रीस साताऱ्यास जावयाकरितां श्रीमंत निघाले. जरीपटका व नगारखाना घेतला. स्वारी दोन घटका बराबर रात्रीस गारपिराजवळ डेरे दिले होते तेथें आली. तेथेंच भोजन जालें. ती॥ रा॥ भाऊसाहेब पेठ्यांचे बागेंत भोजनास गेले. आम्ही गोटांतच भोजन करून डेऱ्यास आलों. होळकरांस श्रीमंतांची ताकीद जाली जे, तुमचा तीस हजार फौजेचा सरंजाम. ती फौज कोठें आहे ? हें ठीक नव्हे. याप्रमाणें ताकीद जाली. पागा व पीलखान्याचे दरोग्यांस व फडणिशीकडील त्रिंबकराव परचुरे यांस ताकीद जाली जे, सरकारांत पुसल्याशिवाय व सरकारचे आज्ञेशिवाय कोणतेंही होऊं नये. सेवेशीं विदित होय हे विज्ञापना.

नं. ३५४०. ( ३० मार्च. )

धोंडो बापूजी जोशी यांचें बाळासाहेबांस पत्र फाल्गुन व॥ ७ चें—

" श्रीमंत राजश्री नाना श्रीमंत यजमानसाहेबांचा निरोप घेऊन गेले तेव्हांच पुण्यांत कारभारी नेमून श्रीमंतांस सांगून ठेविले. राजश्री माधवराव रामचंद्र मुख्य दिवाण, राजश्री आत्या गुरुजीचे पुत्र कारभारी. तिसरे राजश्री विठ्ठलराव परचुरे त्रिंबकराव परचुरे यांचे धाकटे बंधु असे त्रिवर्ग ठेविले आहेत. पाण्याचा मोठा कडाड जाला आहे. नदीचें पाणी वर्षप्रतिपदेपावेतों होईल. तूर्त गुरें घोडीं नदीस पाणी पाजूं देत नाहींत. संगमावर न्यावीं लागतात. सरकारवाड्यांतही पाणी माफकच आहे. मधील थोरला हौद त्यांत पाणी गजभर उंचीचें असतें. "

# चिमाजीआपाची छोटी कारकीर्द.

थेऊरच्या मुक्कामावर श्रीमंत बाजीरावसाहेब ता० २ एप्रिल रोजीं आले हें मागें सांगितलेंच आहे. अद्यापि त्यांच्या गोटाचा चौकीपहाऱ्यासुद्धां सर्व बंदोबस्त परशुरामभाऊंकडे होता. पटवर्धनांची चार हजार फौज तेथें होती तीच तूर्त श्रीमंतांची फौज म्हणावयाची. स्वारीबरोबर हुजरातीचे मानकरी व सरदार हजर होते, तथापि जमीयत अशी म्हणण्याजोगी पटवर्धनांखेरीज कोणाचीच नव्हती. राघोबादादांच्या विश्वासांतली व त्यांच्या प्रेमास पात्र असलेलीं शेंदोनशें माणसें श्रीमंतांभोंवतीं जमलीं होतीं त्यांत मानाजी फांकडे, बाजीराव बर्वे व केसो कृष्ण यांखेरीज नांव घेण्याजोगें कोणी माणूस नव्हतें.

शिंदे व त्यांचे कारभारी प्रत्यहीं श्रीमंतांकडे येऊन खलबतें करीत त्यांत बोलण्याचे मुद्दे मुख्यत्वें तीन होते. मोंगलावर आम्ही स्वारी करून खर्ड्याच्या तहाप्रमाणें त्याजकडून मिळावयाचा मुलूख काबीज करितों व त्यानें देऊं केलेली दोन कोट रुपये खंडणी वसूल करितों; सरकारची फौज आमच्या मदतीस द्यावी; हा पहिला मुद्दा. नाना जेथें असतील तेथें जाऊन त्यांस पकडून आम्ही आमचा पैका घेतों; तसें करण्याची आम्हांस आज्ञा द्यावी; हा दुसरा मुद्दा. तुम्हांस राज्यावर बसविण्यासाठीं आम्ही फौज ठेवून फसलों आहों, आम्हांस खावयास अन्न नाहीं, याकरितां तूर्तच्या खर्चापुरते दहा वीस लाख रुपये तरी द्यावे, हा तिसरा मुद्दा! यांपैकीं मोंगलावर स्वारी करण्याची गोष्ट श्रीमंतांस पसंत होती. परंतु राज्यांतले बखेडे आधीं मोडल्याशिवाय मोंगलावर स्वारी कशी होणार? हे बखेडे द्रव्यमूलकअसल्यामुळें ते मोडणें नानांच्या हातीं होतें. कारण त्यांजवळ मुबलक पैका होता. तो देऊन शिंद्यांची समजूत त्यांस सहज करितां येण्याजोगी होती. परंतु नानांस उपद्रव करावा हें श्रीमंतांच्या मनास येईना व शिंद्यांजवळ परशुरामभाऊंचीही रदबदली नानांविषयीं चाललीच होती.

याप्रमाणें पहिल्या व दुसऱ्या मुद्याची वासलात लागली. तिसरा मुद्दा स्वतः श्रीमंतानीं शिंद्यांस पैका देण्याचा. त्या बाबतींत श्रीमंत स्वतः कफल्लक असल्यामुळें शिंद्यानीं किती टकळी लावली तरी तिचा कांहीं उपयोग होण्यासारखा नव्हता !

बाजीरावसाहेब पुण्यास येण्यापूर्वी त्यांच्या सद्गुणांचा लौकिक वाजवीपेक्षां अधिक झालेला होता व पुण्यास आल्यावर त्यांची मूर्ति पाहून व भाषण ऐकून लोक विस्मित झाले होते. परंतु मुत्सद्दी व सरदार मंडळी यांशीं दिवसेंदिवस श्रीमंतांचें जसजसें अधिकाधिक संघट्टन होऊं लागलें तसतशी त्यांच्या अंगावरची बेगड पडून नाहींशी झाली व त्यांचें खरें स्वरूप चाणक्ष लोकांच्या दृष्टोत्पत्तीस सहज येऊं लागलें ! बाळोबा वगैरे मुत्सद्यांनीं श्रीमंतांचें पाणी आतां जोखलें होतें. व या श्रीमंतांच्या भानगडींत पडणें सुरक्षित नाहीं ही परशुरामभाऊंचीही खात्री झाली होती. याकरितां नाना गेल्यापासून ते श्रीमंतांच्या कारभारांत फारसे बोलत नसत. पैका देण्याघेण्याविषयीं शिंद्यांचीं बोलणीं निघालीं म्हणजे भाऊंस बाजीरावसाहेब सल्ला विचारीत तेव्हां भाऊ त्यांस स्पष्ट सांगत कीं, जुन्नरमुक्कामीं कबूल केल्याप्रमाणें मीं तुम्हांस येथें आणून सर्व दौलत तुमचे हवालीं केली आहे. पाहिजे तें करण्यास तुम्ही मालक आहां. मी हुकमाचा नोकर आहें. कोठें स्वारी करण्याचा हुकूम द्याल तर आधीं पैका द्या म्हणजे फौज ठेवून लढाई मारून स्वारी फत्ते करितों. नाहीं तर शक्त्यनुसार जी सेवा पडेल ती करीतच आहें. माझें येथें काम नसेल तर निरोप द्या म्हणजे घरीं जातों !

शिंद्यांचें व नानांचें वांकडें येण्यांत आतां कांहीं बाकी राहिली नव्हती. नानांचें खास पथक दीड हजार स्वारांचें होतें त्याच्या सरंजामाचा मुलूख तर शिंद्यानीं जप्त केलाच; पण त्याशिवाय खर्ड्याच्या स्वारींत दरबारखर्चाऐवजीं नबाबाकडून त्यांस मिळालेली तीस हजारांची जहागीर व इनामगांवही जप्त केले ! बाजीरावसाहेब जर संमति देते तर सातान्यास नानांवर पलटणें पाठविण्यांतही बाळोबा-

त्यानीं मागें पुढें पाहिलें नसतें. कोणी म्हणेल कीं, नानाविषयीं प्रेम व आदर जर श्रीमंतांच्या मनांत मुळींच नव्हता, तर त्यांच्या तर्फेनें शिंद्यांशीं भांडण्यांत इतकें ओढून चंद्रबळ त्यानीं कशाकरितां आणिलें होतें ? यावर उत्तर असें आहे कीं, श्रीमंतांस या वेळीं पेशवाईचीं वस्त्रें मिळवावयाचीं होतीं. व नानांस यावेळीं दुखविलें असतां तीं त्यांच्या हातास लागलीं नसतीं ! सातारच्या किल्ल्याचा बंदोबस्त सर्वस्वी नानाकडे पूर्वीपासूनच सोंपविलेला असून तेथील महाराजांचें संस्थानही त्यांच्याच लगामीं होतें. पेशवाईचीं वस्त्रें नवीन द्यावयाचीं झालीं म्हणजे त्या नवीन पेशव्यास महाराजानीं कारभारी नेमून द्यावा असा शिरस्ता होता. या वेळेस बाजीरावसाहेबांस वस्त्रें देवविते वेळीं नाना आपणास कारभारी नेमून घेणार हें उघडच दिसत होतें. किंबहुना बाजीरावांच्या जागीं दुसरा कोणी पेशवा नेमण्याचें त्यानीं मनांत आणिलें असतें तर तसें घडणें अशक्य नव्हतें. मग पुढें त्या पेशव्याची पेशवाई टिकेल अगर न टिकेल ही गोष्ट निराळी !

सातान्यास गेल्यावर नानानीं महाराजांची भेट घेऊन ' तुम्हांस कोट रुपये खर्चास देतों, फौज जमा करा, व राज्यांत आपला अंमल बसवा, ' वगैरे त्यांस सांगितल्याचें बखरींत लिहिलें आहे त्या साऱ्या गप्पाच दिसतात ! राज्यांत बखेडे माजले होते तेच आंवरणें त्यांच्या शक्तीबाहेर होतें. असें असतां महाराजांचा दंगा नवीनच उपस्थित करून आणखी घोंटाळा माजविण्यांत त्यांस कांहींच फायदा नव्हता. महाराजांची मर्जी त्यांस यावेळीं प्रसन्न राखावयाची असल्यामुळें त्यांस त्यानीं कांहीं पैकारुका दिला असेल, कांहीं नडी दूर केल्या असतील, इतकेंच ! सातान्याचा किल्ला नानांच्या ताब्यांत होताच. तेथें गेल्यापासून आपल्या विश्वासाचें सात आठशें नवीन मनुष्य किल्ल्यावर घालून त्यानीं किल्ल्याचा पक्का बंदोबस्त केला होता. नानाशीं समेट न करितां शिंदे आपणाबरोबर सातान्यास येतील तर नाना तेथून पळून जातील, तसें झाल्यावर वस्त्रांसाठीं किल्ल्यास तोफा लावण्याचा

रोख दाखवून महाराजांस भयप्रदर्शन करावें लागेल, व त्या अनिष्ट प्रकाराचा परिणाम कदाचित् फारच अनिष्ट होईल, हें बाजीरावसाहेबांस भय होतें. पण शिंद्यांचे कारभारी नानाशीं समेट करण्यास बिलकुल कबूल होईनात. नानांस कारभारांतून काढावें, व तुम्हीं आम्हांस द्रव्य देऊं केलें आहे तें नानानीं द्यावें, हेंच आग्रहाचें बोलणें त्यानीं श्रीमंतांपाशीं सुरू टेविलें होतें.

शिंदे पुण्याच्या आसपास आल्यापासून दाणावैरणीसाटीं त्यानीं त्या प्रांतांत मनस्वी आवाडाव चालविली होती. हें स्वराज्य नसून शत्रूचाच मुलूख आहे असें ते समजत होते ! तसें बोलून मात्र दाखवीत नव्हते इतकेंच ! याबद्दल श्रीमंतानीं ताकीद केली असतां शिंद्यानीं म्हणावें कीं, एवढ्या मोटच्या फौजेस दाणावैरण विकत घेऊन आम्हीं कोठची पुरवावी ? तुमचा आमचा करार झाला आहे त्याप्रमाणें पैका देऊं लागाल तेव्हां मुलखाच्या पायमल्लीबद्दल काय दहा पांच लाख रुपये वजा घालावयाचे असतील ते खुशाल घाला. तूर्त आम्ही दाणावैरण जेथें दृष्टीस पडेल तेथून आणणारच. मग ती सरकारची असो, कीं रयतेची असो ! शेवटीं शिंद्यांच्या कहीनें गांव लुटले, रयत मारली, अन्नासाटीं शेंकडों बायकानीं जीव दिले, श्रीमंतांच्या राजधानीच्या शहराची म्हणजे पुण्याची सुद्धां शिंद्यानीं कांहीं प्रतिष्ठा टेविली नाहीं, इत्यादि अनन्वित प्रकार घडत असल्याचे बोभाटे श्रीमंतांच्या कानावर येऊं लागले; तेव्हां त्यांस फार क्रोध आला. व त्यानीं शिंद्यांस फार सक्तीची ताकीद करून त्यांची कही बिलकुल मना केली. आश्चर्य हें कीं, शिंद्यानीं निमूटपणें खालीं मान घालून ही ताकीद मान्य केली व आपल्या लष्कराभोंवतीं चौक्या बसवून दाणावैरण आणण्यासाटीं कोणासही आठ चार दिवस गोटाबाहेर सोडलें नाहीं ! आपल्या ताकिदीचा असा उत्तम परिणाम झालेला पाहून बाजीरावसाहेबांस फार संतोष झाला. एकंदरींत पाहिलें असतां जुन्नराहून निघाल्यापासून बाजीरावसाहेबांच्या चित्तास संतोषाचीच प्राप्ति होत आली होती. मोटमोठे सरदार व मुत्सद्दी व मान्य पुरुष त्यांशीं अदबीनें व नम्रतेनें वागत

होते. त्यानीं केलेल्या बहाली बडतर्फीचा अंमल बिनबोभाट होत होता. राज्याची पाहिजे तशी व्यवस्था करण्याचा अधिकार माझा आहे असें त्यानीं सर्वांस जाणविलें होतें व सर्वांनीं त्यांचा तो अधिकार शिरसामान्य केला होता. तात्पर्य आजपर्यंत बाजीरावसाहेबानीं दौलतवंतास प्राप्त होणारें दूध मात्र पाहिलें होतें. बडगा त्यांस अजून दिसावयाचा होता ! व तो बडगा लौकरच त्यांस दाखविण्याचा बाळोबातात्यानीं योग घडवून आणिला !

बाजीराव हा नादान व दुष्टबुद्धीचा मनुष्य असल्यामुळें यास पेशव्यांच्या गादीवर बसूं देऊं नये हा विचार बाळोबातात्यांच्या मनांत घोळत होता. परशुरामभाऊंच्याही मनांत अलीकडे तसेंच येत चाललें होतें. यामुळें या दोघांचा मिलाफ लष्कर थेऊरच्या तळावर आल्यानंतर चारआठ दिवसांतच जमून आला. परशुरामभाऊसारख्या प्रामाणिक लोकनायकानें बाजीरावसाहेबांस जुन्नरच्या मुक्कामीं दिलेलें वचन या वेळीं मोडलें याबद्दल कोणास आश्चर्य वाटेल, पण वस्तुतः त्यांत आश्चर्य वाटण्यासारखें कांहीं नाहीं ! गेलीं पसतीस वर्षें राघोबादादाचें पटवर्धनाशीं अव्याहत वैर सुरू होतें. इतक्या अवधींत परस्परांमध्यें कितीदां तरी आणाशपथा झाल्या असतील ! पण उभयपक्षांकडून त्यांपैकीं एकही पाळली गेली नाहीं ! अशी मागची परंपरा असतां ती सोडून भाऊनीं बाजीरावांस दिलेलें हें एकच वचन काय म्हणून पाळावें ? प्रसंग येईल तेव्हां पाहिजे तसली शपथ घ्यावी आणि मागून बेइमानी करावी, असा या उभय कुलांचा परस्परांसंबंधें वागणूक ठेवण्याचा शिरस्ताच पडला होता ! आणि त्या शिरस्त्यास अनुसरूनच आतां परशुरामभाऊ बाजीरावसाहेबांस सोडून बाळोबातात्यास मिळाले !

स्वतः दौलतराव शिंदे व त्याचे त्रिवर्ग कारभारी बाळोबातात्या पागनीस व सदाशिव मल्हार दिवाण व धोंडो रामचंद्र उर्फ धोंडीबा यानीं परशुरामभाऊंस थेऊरच्या गणपतीच्या देवालयांत एके दिवशीं एकाएकीं गांठलें. बाजीरावांचें पुढें काय करावयाचें याविषयीं त्यांचीं भाऊंशीं आधीं बोलणींचालणीं झालींच होतीं. या प्रसंगीं

देवालयांत तींच बोलणीं पुनः होऊन एका पक्षीं परशुरामभाऊ व दुसऱ्या पक्षीं शिंदे व त्यांचे कारभारी यानीं श्रीगणपतीसमोर शपथ केली कीं, इतउत्तर राज्यकारभारासंबंधें जी जी मसलत करावयाची ती ती एकमेकांस अंतर न देतां उभयपक्षीं एकमतानें करावी. हा प्रकार गुप्तरूपानें झालेला असल्यामुळें त्याची बातमी बाजीराव व त्यांचे फांकडे व बर्वे वगैरे अनुयायी व इतर सरदार यांस यत्किंचित्सुद्धां कळली नाहीं.

वर लिहिल्याप्रमाणें शपथ झाल्यानंतर भाऊ व शिंद्यांचे कारभारी यांचीं रात्रंदिवस खलबतें होऊं लागलीं. भाऊंचे कारकून लिहितात कीं, "थेऊरच्या तळावर आल्यापासून भाऊंस पळभर फुरसत मिळत नाहीं. दिवसास तर घटकाभर वामकुक्षि नाहींच, पण प्रत्यहीं रात्रीससुद्धां अठरा वीस घटका रात्र होईपर्यंत झोंप मिळत नाहीं! उठल्या बसल्या शिंद्यांच्या कारभाऱ्यांशीं खलबतें चाललीं आहेत!" हीं खलबतें होतां होतां शेवटीं असा निष्कर्ष ठरला कीं, बाजीरावसाहेबांस कैदेंत ठेवावें व चिमाजीआपास यशोदाबाईच्या मांडीवर दत्तक बसवून त्यासच पेशवाईच्या गादीवर स्थापावें. चिमाजीआपा अल्पवयी असल्यामुळें राज्याचा सर्व कारभार पूर्वींच्या कारकीर्दींत नाना करीत होते त्याप्रमाणें आतां परशुरामभाऊनीं करावा. शिंद्यानीं बाजीरावांस तूर्त आपल्या ताब्यांत ठेवावें. पण भाऊनीं पंचवीस लक्ष रुपये दिल्यावर त्यांस भाऊंच्या हवालीं करावें. शिंद्यानीं व भाऊनीं मिळून मोंगलावर मसलत करावी व खड्यांच्या तहांत ठरल्याप्रमाणें मुलूख व खंडणी मोंगलापासून घ्यावी. खंडणीपैकीं पाऊणकोट रुपये भाऊनीं शिंद्यांस द्यावे, म्हणजे बाजीरावानीं शिंद्यांस पूर्वीं देऊं केलेल्या रकमेचा फडशा झाला. आपल्या कारस्थानास जे जे विरोध करितील त्यांचीं पारिपत्यें करून भाऊंचा कारभार निष्कंटक करून देऊन मग शिंद्यानीं हिंदुस्थानांत परत जावें. याप्रमाणें पांचसात दिवसांत इतकें हें टाकटीक संविधानक जुळविल्यानंतर शिंद्यानीं या नाटकाचा पहिला

प्रवेश लागलाच शके १८१८ च्या वर्षप्रतिपदेच्या ( ८ एप्रिल ) मुहूर्तावर बाजीरावसाहेबांस करून दाखविला !

बाजीरावसाहेबांनीं आपल्या मनाशीं बेत ठरविला होता कीं, पेशवाईचीं वस्त्रें घेण्याकरितां आपण सातार्‍यास जाण्यास निघालों; पण परशुरामभाऊ ही गोष्ट मनावरच घेत नाहींत. व शिंदे तर बसल्या उठल्या आपला पैका देण्याबद्दल तगादा करितात. सातार्‍यास जावयाचें त्यांच्याही मनांत येत नाहीं. या कामांत घाई व कळकळ आपणाखेरीज कोणासच नाहीं. तर आतां शिंदे, पटवर्धन व इतर कोणी सरदार यानीं बरोबर येण्याची वाट न पाहतां काय दोनतीन हजार लोक बरोबर येतील तेवढ्यांनिशींच आपण उभयतां बंधूनीं सातार्‍यास जावें. एकदां पेशवाईच्या पदावर महाराजांकडून आपली स्थापना होऊन चुकली म्हणजे मग शिंद्यांचा मजकूर पाहून येतां येईल ! याप्रमाणें बाजीरावसाहेब मनोराज्यच करून थांबले नाहींत; तर त्यांनीं पाडव्याच्या दिवशीं निघून जाण्याची तयारीही केली ! तों त्या दिवशीं आयत्या वेळीं शिंदे व बाळोबातात्या वगैरे त्यांची मंडळी पाडव्याचा मुजरा करावयास म्हणून श्रीमंतांकडे आली, त्यांनीं खलबतासाठीं म्हणून श्रीमंतांस एकीकडे नेऊन सांगितलें कीं, आमच्या जाबसालांचा आजच्या आज फडशा करा आणि खुशाल सातार्‍यास चालते व्हा. तसें होत नसेल तर फडशा होईपर्यंत तुम्ही या तळावरून हालतां कामा नये. श्रीमंतानीं सांगितलें कीं, तुमचा निकाल केल्याखेरीज आपण येथून जाणार नाहीं. पण त्यावर शिंदे म्हणाले कीं, तुम्ही धनी. आम्हांस हुलकावणी देऊन तुम्ही निघून गेलांत तर आम्हीं सेवकानीं तुमचें काय करावयाचें ? याकरितां तुम्हांपासून जामीन घेतल्याशिवाय सोय नाहीं ! तो जामीन कोणी लुंगासुंगा असामी असेल तर आम्हांस नको. तुम्ही खुद्द परशुरामभाऊंसच जामीन दिलें पाहिजे ! याप्रमाणें दरडावणीचीं भाषणें शिंद्यांकडून होऊं लागलीं तेव्हां श्रीमंतानीं निरुपाय होऊन परशुरामभाऊंस जवळ बोलाविलें व त्यांस सर्व मजकूर कळविला. मग भाऊनींही मोठी छाती करून शिंदे

व त्यांचे कारभारी यांस जबाब दिला कीं, श्रीमंतानीं तुम्हांशीं पूर्वी जो करार केला आहे त्याच्या प्रत्येक कलमाचा निकाल झाल्याखेरीज श्रीमंतांस येथून न हालूं देण्याचें जोखीम मी आपल्या शिरावर घेतों !!! पूर्वी ठरलेल्या संकेताप्रमाणें इतका प्रकार घडून आल्यावर शिंदे व भाऊ आपापल्या स्थळास निघून गेले. या पाडव्याच्या मुहूर्तावरच श्रीमंत बाजीरावसाहेब शिंद्यांच्या कैदेंत सांपडले असें म्हणावयाचें ! कारण कीं, त्यांचें मतिस्वातंत्र्य त्या दिवसापासून नष्ट झालें व यापुढें शिंद्यांकडून जीं जीं बोलणीं येतील त्यांत आपल्या तर्फेनें भाऊनीं रदबदली केल्याशिवाय आपला परिणाम लागावयाचा नाहीं हें श्रीमंतांस कळून चुकलें.

ता० १७ एप्रिल रोजीं चिमाजीआपांचा वाढदिवस होता. त्या दिवशीं त्यांच्या वयास बारावें वर्ष संपून तेरावें लागलें. या वाढदिवसानिमित्त त्या दिवशीं बाजीरावसाहेबानीं आपल्या गोटांतील सरदार व मुत्सद्दी मंडळीस भोजनास बोलाविलें होतें. बहुतेक पटवर्धन मंडळी भोजनास गेली होती. परंतु परशुरामभाऊ व रघुनाथराव पोटांत दुखत असल्याचें निमित्त करून भोजनास गेले नाहींत. भोजनाचा समारंभ चालला असतां तीन हजार निवडक शिलेदार व चार पलटणें बरोबर घेऊन अकस्मात् दौलतराव शिंदे आले ते सरकारच्या कचेरीच्या डेऱ्यांत येऊन बसले. बाजीरावसाहेब कसेंबसें भोजन आटपून त्या डेऱ्यास लागूनच दुसरा डेरा होता तेथें विडे घ्यावयाकरितां येऊन बसले, तों शिंद्यांनीं फौजेच्या खर्चास पैका देण्याविषयीं त्यांस जिकीरीचा तगादा लाविला. " आम्हांस तीन उपोषणें झालीं. खर्चास एक क्रोड रुपये द्यावे; व पंचवीस लक्षांची जहागीर द्यावी; " याप्रमाणें शिंद्यानीं मागणें केलेंच. पण शिवाय नानांस कारभारांतून काढावें, त्यांनीं फडणिशीही करूं नये, सरकारचें कर्ज त्यांनीं वारावें, व सरकारांतून आम्हांस पैका घ्यावयाचा आहे तोही त्यांनींच द्यावा, इत्यादि मुद्यांचाही आजच निकाल झाला पाहिजे असा त्यांनीं आग्रह धरला ! बाजीराव बर्वे व हिंगोजी पाटणकर व मानाजी फांकडे हे

श्रीमंतांतर्फे मध्यस्थी करीत असतां त्यांचें बोलणें शिंदे ऐकेनात. ते धरणें देऊन बसले तेव्हां श्रीमंतांच्या गोटांतीलही मानकरी वगैरे हजार दीड हजार निवडक शिलेदार नागव्या तलवारींनिशीं श्रीमंतां-भोंवतीं गराडा देऊन बसले. असल्या या वेळा फार भयंकर असतात. चिडखोर, तर्कटी, आडमुठे शिलेदार एकमेकांशीं विरुद्ध भावनेनें प्रेरित होऊन नागव्या तलवारी घेऊन समोरासमोर येऊन पुष्कळ वेळ एकत्र राहिले म्हणजे कत्तलेची सुरवात न होणें दुरापास्त आहे! अशा समुदायांत एखाद्याच्या तोंडून वेडावांकडा शब्द निघणें व दारूच्या कोठारांत विस्तवाची ठिणगी पडणें हें सारखेंच भयंकर आहे! आणि या प्रसंगीं शिंद्यांचे बाजूनें तरी हें निव्वळ नाटक चाललेलें होतें म्हणून बरें! नाहीं तर या वेळीं मोठा अनर्थ होऊन मागें नारायणराव पेशवे मारले गेले त्याप्रमाणें यावेळीं बाजीरावसुद्धां मारले जावयाचे! कोणाच मध्यस्थाची डाळ शिजेना तेव्हां केवळ निकरावर गोष्ट आली असें समजून बाजीरावसाहेबांनीं परशुराम-भाऊंस बोलावणें पाठविलें. तेही नागव्या समशेरी हातीं घेतलेले हजार पांचशें विश्वासू शिलेदार घेऊन श्रीमंतांकडे आले. श्रीमंतानीं त्यांस शिंद्यांशीं बोलण्याची आज्ञा केली. त्याप्रमाणें भाऊनी शिंद्यांकडे जाऊन त्यांची परोपरीनें समजूत घालण्याची खटपट केली. पण शिंदे त्या दिवशीं भाऊंचेंही मुळींच ऐकेनात! उभयपक्षाची मंडळी सहा प्रहर समोरासमोर बसून राहिली होती. रात्रीं भाऊनीं शिंद्यांसाठीं मुद्दाम स्वयंपाक करवून भोजनास उठण्याविषयीं त्यांची विनवणी केली, परंतु ती त्यानीं जुमानिली नाहीं. आणि त्या दिवशीं त्यानीं श्रीमंतांस व भाऊंस संध्येस देखील उठूं दिलें नाहीं. मग जेवणाचें नांव कशाला? रात्रभर ही दोनी बाजूंची पांच सात हजार मंडळी तशीच उपाशीं बसली होती. अनेकानीं अनेकवार प्रार्थना करितां करितां दुसरे दिवशीं सकाळच्या सहा घटका दिवसास समजूत करून घेण्यास शिंदे तयार झाले. त्यानीं सात कलमांची याद लिहिली तिजवर श्रीमंतानीं कलमवारीनें मखलाशी केली व त्या कलमांचा उलगडा आठ दिवसांत

करितों म्हणून कबूल केलें व त्याबद्दल परशुरामभाऊ व श्रीमंतांचे मेहुणे पांडुरंगराव बारामतीकर यांस जामीन दिले. नंतर शिंदे श्रीमंतांस मुजरा करून विडे घेऊन निघून गेले!

या प्रसंगीं शिंद्यानीं ज्या सात कलमांवर बाजीरावसाहेबांची मखलाशी करून घेतली तीं कलमें व त्यावरची मखलाशी पुढें दिल्याप्रमाणें:—

| शिंद्यांची विनंती. | श्रीमंतांची मखलाशी. |
|---|---|
| १ नानानीं कारभारांत असों नये. टोंक्यास जाऊन रहावें. | १ मेणवलीस रहावें. त्यांस दगा फटका होऊं नये येविशीं ( तुम्हीं ) खातरजमा करावी. |
| २ नानानीं फंद फितूर केल्यास पारिपत्य करावें. | २ वाजवीच आहे. |
| ३ नानाचे आत्मिक कोणी ठेवूं नयेत. | ३ सरकार उपयोगी असतील ते ठेवून घेऊं. |
| ४ आमचे यादीचे जाबसाल लवकर उलगडून द्यावे. | ४ यादी समजोन ( आम्हीं ) आठ दिवसांत फडशा करावा. |
| ५ सातान्याचीं दस्तें नानाचे विद्यमानें आणों नयेत. | ५ सरकारचा कारकून पाठवून आणवूं. |
| ६ नानापासोन पैका घ्यावा. कर्ज सरकारचें फेडावें. | ६ विचारें विचारें केलें जाईल. |
| ७ कित्ता. | ७ ———— |

सात कलमें व त्यांचीं उत्तरें यांचे अभिप्राय वर दिल्याप्रमाणें आहेत. त्यावरून पाहतां असल्या विकट वेळीं सुद्धां श्रीमंतानीं स्वाभिमान व धैर्य बऱ्याच अंशीं दाखविलें असें म्हणावयास पाहिजे. तुमच्या यादीचा आठ दिवसांत फडशा करूं, असें लिहून देतांना तुम्हांस आठ दिवसांत पन्नास लाख रुपये देऊं असें श्रीमंतानीं निरुपायामुळें शिंद्यांस तोंडजबानी कबूल केलें होतें. तसें लिहून मात्र दिलें नाहीं. शेवटचें कलम श्रीमंतांस

अपमानास्पद असल्यामुळें त्यांतील विनंति ' किता ' या शब्दानें दर्शविली आहे; व त्या कलमाच्या मखलाशींत तर कोरीच जागा सोडली आहे; याचा अर्थ असा कीं, ' आपण वस्त्रें घेण्याकरितां आम्हांस चुकवून साताऱ्यास पळून जाणार आहां असें ऐकतों. तर असें आपण करणार नाहीं याबद्दल आमची खातरजमा करावी ! ' ' किता ' या शब्दांत इतका हा अर्थ भरलेला आहे ! श्रीमंतानीं तोंडजबानी खातरजमा काय केली असेल ती असो, परंतु लेखांत कांहीं एक केलें नाहीं हें मखलाशीची ओळ कोरी आहे त्यावरून दिसतेंच आहे !

आठ दिवसांत तुम्हांस पन्नास लाख रुपये देतों असें श्रीमंतानीं शिंद्यांस कबूल केलें खरें, परंतु श्रीमंतांस किमयेची विद्या साध्य नसल्यामुळें आठ दिवसानीं तरी एवढी ही प्रचंड रक्कम कोठून द्यावयाची, ही त्यांच्या जिवास काळजी लागून राहिली होती. त्यांस जामीन राहिलेले परशुरामभाऊ यांजवळून तरी शिंद्यांस या रकमेचा एक दशांश सुद्धां मिळण्याजोगा नव्हता. अर्थात् आठ दिवस होतांच शिंद्यांचे धरणें पुन्हां येऊन बसणार हें भय श्रीमंतांच्या डोळ्यांसमोर मूर्तिमंत उभेंच होतें. परंतु शिंद्यानीं श्रीमंतांची सबुरी केली व एका आठवड्याच्या जागीं तीन आठवडे दम खाल्ला. त्या अवधींत श्रीमंतांच्या हातून कांहींच झालें नाहीं. नानाच्या कारस्थानावर भिस्त ठेवून श्रीमंतानीं दम धरिला असेल असें समजून बाळोबातात्यानीं त्यांस भर दरबारांत सांगितलें कीं, " नाना साताऱ्यासीं गेले आहेत त्याणीं आम्हांवर इंग्रज अथवा मोंगल अगर टिपू यांसीं सामील करून मसलत करावी. आम्ही दोन महिन्यांची फुरसत देतों. असें जाहलें असतां लढाई मारून नानास धरूनच आणूं, तरच आम्ही स्वामींचे एकनिष्ठ सेवक ! " स्वामींच्या या एकनिष्ठ सेवकानीं तीन आठवडे वाट पाहिल्यासारखें करून स्वामी बाजीरावसाहेब यांच्या दाराशीं ता० ९ मे रोजीं पुनः धरणें आणिलें !!! या खेपेस शिंदे आले नव्हते, परंतु बाळोबा वगैरे त्रिवर्ग कारभारी होतेच. आणि त्यांबरो-

बर आठ हजार स्वार घेऊन नारायणराव जिवाजी बक्षी आले होते. शिवाय पलटणें व तोफाही होत्या. धरणेंवाल्यानीं मागच्याप्रमाणेंच बाजीरावसाहेबांस तगादा बसविला. या खेपेस त्यांच्या मनांत श्रीमंतांस कैद करावें असें होतें; परंतु श्रीमंतांभोंवतीं हत्यारबंद हजार बाराशें मानकरी व शिलेदार यांचा गराडा असल्यामुळें धरणेंवाल्यांचें साधलें नाहीं. विशेष रक्तपात अगर गडबड न होतां बाजीरावसाहेब हातीं सांपडावे अशी त्यांची इच्छा होती. तो योग जुळून येत नाहींसें पाहतांच अद्वातद्वा बडबड करून शिंद्यांचे त्रिवर्ग कारभारी फौज व पलटणें घेऊन रागारागानें आपल्या गोटास निघून गेले. त्यावेळीं कोणी पोक्त माणसानीं श्रीमंतांस समजून सांगितलें कीं, शिंद्यांचे कारभारी येथून संतोषानें गेले नाहींत, त्यांचा रुसवा कायमच राहिला, हें ठीक झालें नाहीं. सरदार रुसून गेले म्हणजे धन्यानीं त्यांच्या घरीं जाऊन त्यांची समजूत करावी असा परिपाठ आहे. याकरितां आपण आतां शिंद्यांच्या गोटांत जाऊन त्यांचें समाधान करावें. या योगानें त्यांस मोठा संतोष होईल व त्यांच्या रुसव्यापासून कांहीं अनर्थ होणार असला तर टळेल. हा सल्ला श्रीमंतांच्या मनास पटला व ते तत्काळ शिंद्यांच्या गोटास जावयाकरितां निघाले.

या वेळीं श्रीमंतांबरोबर पांडुरंगराव बारामतीकर, गोविंदराव व बाजीराव बर्वे, आबाजीपंत सहस्रबुद्धे, बाळाजीपंत पटवर्धन, मानाजी फांकडे, हिरोजीराव पाटणकर, मालोजी घोरपडे, व रघुनाथराव पटवर्धन कुरुंदवाडकर, इतकी मंडळी शिंद्यांच्या लष्करांत गेली होती. निघतांना श्रीमंतानीं परशुरामभाऊंसही बरोबर येण्याकरितां बोलाविलें, परंतु त्यानीं उत्तर केलें कीं, आज मला प्रदोष आहे. आतां सायंकाळ झाला. स्नान, पूजा व भोजन आटोपून मी मागून येतों. आपण पुढें चलावें. याप्रमाणें बोलून भाऊ गोटांतच राहिले. बाजीरावसाहेब शिंद्यांच्या लष्करांत पोंचतांच शिंद्यानीं सलामीकरितां तोफांची सरबत्ती केली व त्यांस मोठ्या आदरानें व समारंभानें आपल्या डेऱ्यास नेलें. नंतर चार घटका उभयपक्षीं प्रेमाच्या व ख्यालीखुशालीच्या गोष्टी

होऊन मुख्य कामास ह्मणजे मागच्या यादींतील कलमांच्या फडशा-संबंधानें बोलण्यास सुरुवात झाली. बाजीरावसाहेब फार बोलके होते. शिंद्यांकडील बाळोबा वगैरे मंडळीही बोलण्याच्या खूप रंगांत आली होती. बोलणीं होतां होतां प्रहर रात्र होऊन गेली. आतां श्रीमंतानीं परत जाण्यास निघावें, इतक्यांत एक घोडेस्वार दौडत दौडत डेऱ्याच्या दारापर्यंत आला व ' घात झाला ' ! ' घात झाला ' ! असें ओरडूं लागला ! ' अरे, काय झालें ? काय झालें ? ' असें सर्व मंडळी आश्चर्यचकित होऊन विचारतात तों त्यानें उत्तर दिलें कीं, ' परशुरामभाऊ चिमाजीआपास घेऊन पळून गेले ! ' ही बातमी ऐकतांच श्रीमंतांकडील व शिंद्यांकडील मंडळीही विस्मयानें व भीतीनें स्तब्ध झाली ! बाजीरावसाहेबांची कंबरच खचली ! त्यानीं दौलतराव शिंद्यांस मोठ्या आर्जवानें सांगितलें कीं, आतांच्या आत्तां फौज पाठवून परशुरामभाऊंचा पाठलाग करावा व त्यांस धरून आणावें. यावर शिंद्यानीं उत्तर दिलें कीं, " ही काळोखी रात्र. त्यांतून भाऊ कोणत्या रस्त्यानें कुठे गेले हें कोणासही माहीत नाहीं. आतां फौज पाठवून कांहीं उपयोग नाहीं. आपण गोटास चलावें. उद्यां सकाळीं हेंच काम प्रथम करूं ! " श्रीमंत म्हणाले कीं, " मला परत जाण्याची छाती होत नाहीं. भाऊनें मलाही कांहीं दगाफटका करण्याची तजवीज कशावरून केली नसेल ? मी येथेंच राहतों. " शिंदे म्हणाले कीं, "हा गोट काय, आणि तो गोट काय, कोठेंही राहिलां तरी आपण मालकच आहां ! खुशाल रहावें. " मग श्रीमंत तेथेंच राहिले. त्यांसाठीं चौकीपहाऱ्याचा बंदोबस्त शिंद्यानीं स्वतःच्या नजरेखालीं काळजीपूर्वक करविला. उजाडल्यावर श्रीमंतानीं परत जाण्याची गोष्ट काढतांच शिंद्यानीं सांगितलें कीं, आतां माझ्या गोटाबाहेर आपणास पाउलसुद्धां टाकण्याची सोय नाहीं ! गोटाबाहेर जाल तर तत्काळ दगा होईल. याकरितां मी आपणास जाऊं देणार नाहीं ! " इतकें झाल्यावर आपण कैदेंत सांपडलों हें श्रीमंतांस उमजलें ! त्यांबरोबर गेलेल्या मंडळींपैकीं फांकडे व पाटणकर व बाळाजीपंत पटवर्धन

या तीन असामींस मात्र शिंद्यानीं श्रीमंतांजवळ टेविलें व बाकीच्या मंडळीस परत लावून दिलें.

इकडे परशुरामभाऊनीं काय चमत्कार केला तेंही सांगितलें पाहिजे. बाजीरावसाहेब निघून गेल्यावर त्यानीं स्नान केलें व शिवपूजा केली. नंतर भोजनास बसावयाच्या पूर्वी ' शिंद्यांच्या गोटास भोजनोत्तर जावयाचें आहे, याकरितां पालखी आणा;' याप्रमाणें ताकीद दिली. नंतर भोजन झालें. तों पालखी तयारच होती. परंतु पालखींत बसून शिंद्यांच्या गोटास जावें ते न जातां " सरकारचा डेरा कचेरीचा, त्या डेऱ्यांत दोन तीनशें लोक घेऊन गेले. नंतर सव्वा प्रहर रात्रीस श्रीमंत राजश्री चिमाजीआपासाहेब आपले डेऱ्यांत होते तेथें जाऊन वडिलानीं (भाऊनीं) विनंती केली जे, ' राज्यास अधिकारी कोणी नाहीं. राज्य बुडतें. आपण कृपा करून पुण्यास यावें. ' याप्रमाणें विनंती केली. तेव्हां श्रीमंत बोलले जे, 'राज्य बुडलें तरी चिंता नाहीं. मी कांहीं यावयाचा नाहीं!' याप्रमाणें उत्तर जाहलें. मग वडिलानीं साष्टांग नमस्कार घातला आणि ' कृपा करून यावें ' ऐशी विनंती केली. तरी मान्य न होय, तेव्हां दोघांजणानीं मिळोन पालखींत बसविलें. तेव्हां श्रीमंतानीं शंखवाद्याचा प्रयोग केला ! नंतर वडिलानीं शिंद्यांचे लष्कराकडे शंख दाखवून पुण्याकडे घेऊन गेले.

वर वर्णिल्याप्रमाणें चिमाजीआपास घेऊन परशुरामभाऊ थेऊरच्या तळावरून निघाले ते मध्यरात्रीस पुण्यास पोंचले; व शनवारच्या वाड्यांत जाण्यास त्यावेळीं मुहूर्त नव्हता, सबब रास्त्याच्या नव्या वाड्यांत म्हणजे हल्लींच्या वाड्यांत राहिले. नंतर ता. १२ मे गुरुवार या दिवशीं चिमाजीआपांची स्वारी " वीस घटका रात्रीस भवानीपेठेंतून बुधवारांतून वाड्यास उजवी घालून सरकारवाड्यास दाखल जाली. जरीपटका, साहेबनौबत, चौघडा, अतसबाजी होऊन मोठ्या समारंभानें स्वारी आली. " श्रीमंतांच्या अंबारीमागें परशुरामभाऊ व बाबा फडके घोड्यावर बसून चाळले होते. त्यांच्यामागून सर्व सरदार चालत होते. श्रीमंत रुप्याचे अंबारींत होते. शिंद्यांकडील कांहीं लोक व

धोंडीबा समारंभास आले होते. चिमाजीआपा दोन दिवस रुसलेले व दुःखीष होते, परंतु पुढें पुढें त्यांस विसर पडत चालला. चिमाजी-आपा वाड्यांत गेल्यापासून भाऊंचे द्वितीय पुत्र हरीपंत बाबा व जनोबा सुभेदार यादवाडकर हे अष्टौप्रहर त्यांजवळ असत व चौकीपहाऱ्या-सुद्धां वाड्याचा सर्व बंदोबस्त पटवर्धन मंडळीकडेच होता. दररोज तिसरे प्रहरीं परशुरामभाऊ सरकारवाड्यांत कारभाराकरितां नेमानें येऊन बसत असत. असो.

या नवीन राजकारणांत दौलतराव शिंदे, बाळोबा तात्या वगैरे त्यांचे कारभारी, व परशुरामभाऊ, खुद्द चिमाजी आपा, व यशोदाबाई हीं सर्व प्रमुख माणसें असून या राजकारणांतला थोडाबहुत अंश प्रत्येकाच्या वांटणीस आलेला होता, अथवा यावयाचा होता. अर्थात् या सर्व मंडळींचा पूर्ण मिलाफ आहे, हें सर्व लोकांत जाहीर होणें राजकीय दृष्टीनें पूर्ण उपयोगी होतें. हाच हेतु मनांत धरून शिंदे व त्यांचे कारभारी ता. १६ मे रोजीं श्रीमंतांच्या व भाऊंच्या भेटीस आले त्याची हकीगत भाऊनींच पुढील शब्दांत दिलेली आहे.

" आज इंदुवारीं राजश्री दौलतराव बाबा शिंदे सरकारच्या वाड्यांत आले होते. श्रीमंत राजश्री चिमाजी आपा यांजवळ बैठक होऊन मग श्रीमंत मातुश्री ( यशोदा ) बाईसाहेबांकडे गेले आणि दुखवट्याचीं वस्त्रें पुढें ठेविलीं. नंतर सेवाधर्माचीं बोलणीं बहुत केलीं. त्यांतील इंशील 'केला कारभार शेवटास नेतों, यांत चलबिचल नाहीं.' असें खातर-जमेचें बोलोन बाईसाहेबांचे पायावर हात ठेविला. उपरांतिक विडे घेऊन निघाले ते आमच्या घरास आले. फराळ केला. दोन घटका बसले होते. खुद्दांस वस्त्रें व शिरपेंच व कंठी व हत्तीण एक नवी घेऊन दिली. राजश्री बाळोबा पागनीस यांस वस्त्रें व कंठी व नारायणराव बक्षी व सदाशिव मल्हार दिवाण व सदाशिव बापूजी फडणीस व धोंडो रामचंद्र या चौघांस चार शिरपेंच व वस्त्रें दिलीं. "

येथपर्यंत बाजीरावसाहेबांस कैदेंत ठेवून चिमाजी आपांस गादीवर बसविण्याचा बेत भाऊ व बाळोबा यांनीं ठरविला होता तो पार पडला.

आतां पुढें दत्तविधान व्हावयाचें, व पेशवाईचीं वस्त्रें सातान्याहून आणवावयाचीं हीं दोन कामें राहिलीं. त्यापैकीं पहिलें त्यांच्या हातांतलें होतें. दुसरें मात्र सातान्यास नानाचें वास्तव्य असल्यामुळें बऱ्याच अंशीं परतंत्र होतें. नानांचे विद्यमानें वस्त्रें आणावयाचीं नाहींत, या कामाशीं त्यांचा कांहीं एक संबंध असून उपयोगी नाहीं इतकेंच नव्हे, तर याउप्पर त्यांनीं सातान्यास महाराजांजवळ राहतांही उपयोगी नाहीं; याप्रमाणें बाळोबा तात्यानीं आग्रह धरिला व या सर्व गोष्टी परशुरामभाऊनीं कबूल केल्या. परंतु नानासंबंधाच्या इतर बाबतींत त्यांचें व बाळोबांचें ऐकमत्य होईना. जेव्हां जेव्हां भाऊनीं नानांबद्दल गोष्ट काढावी तेव्हां तेव्हां ' तेवढी एक गोष्ट बोलूं नका. बाकी काय तुम्ही सांगाल तें ऐकेन. ' असें बाळोबानीं उत्तर करावें ! भाऊंचें म्हणणें कीं, " नानांस तुम्ही राज्यकारभारांत घेत नाहीं तर घेऊं नका. परंतु फडनिशीचा दरक त्यांचा त्यांजकडे चालला पाहिजे. त्यांच्या अब्रूस अथवा पैक्यास तुम्ही धोका आणतां कामा नये. मनास येईल त्या ठिकाणीं ते स्नानसंध्या करून राहतील. ते जेथें राहतील तेथें त्यांस निर्वेधपणें राहूं द्यावें. " या प्रमाणें प्रत्यहीं रदबदली करितां करितां शेवटीं एकदांचे बाळोबा तात्या प्रसन्न झाले. आणि बोलले कीं, भाऊसाहेब, तुमच्या मोहबतीखातर नानांच्या अब्रूस किंवा पैक्यास काडीमात्र धक्का न लावण्याचें मी वचन देतों. पण याबद्दल माझ्या शर्ती आहेत त्या नानानीं पाळल्या पाहिजेत. त्या ते न पाळतील तर त्यांचा निग्रह करणें प्राप्त आहे. माझ्या शर्ती अशा आहेत कीं, नानानीं सातान्यास फौज जमविली आहे ती दूर करावी. टोकें, मेणवली, तासगांव, मिरज या चार स्थळांतून वाटेल तेथें स्नानसंध्या करून त्यानीं स्वस्थ रहावें. याउपर राज्यकारभारांत त्यानीं काडीमात्र ढवळाढवळ करूं नये; व मुख्य गोष्ट परकी राजेरजवाड्यांशीं व राज्यांतल्या भोंसले गाइकवाड वगैरे सरदारांशीं पत्रव्यवहार व राजकारणाचा शिकशिला त्यानीं ठेवूं नये. गड, कोट, किल्ले व सरंजामाचा मुलूख त्यांच्या ताब्यांत आहे त्याच्या सोडचिठ्या त्यानीं सरकारच्या हवालीं कराव्या !

बाळोबातात्यांच्या या शर्ती परशुरामभाऊनीं मान्य केल्या व याप्रमाणें नाना न वागतील तर आपण त्यांची तरफदारी करणार नाहीं व त्यांचें पारिपत्य करण्याचें काम तुम्हांप्रमाणेंच मनापासून करूं असें त्यानीं कबूल केलें !

बाजीरावसाहेब कैद होण्याच्या सुमारास भाऊ व बाळोबा यांमध्यें वर सांगितलेलीं बोलणीं होऊन गेलीं होतीं. भाऊनीं ज्या रात्रीस चिमाजी आपास पुण्यास पळवून आणिलें त्याच रात्रीस चिंतोपंत लिमये या नांवाच्या कारकुनास वरील बोलणीं नानास समजाऊन देण्याकरितां साताऱ्यास पाठविलें. मागें बावीस वर्षांपूर्वी बारभाईच्या कारस्थानाची घटना झाली तेव्हां नाना व पटवर्धन यांमधलीं सर्व बोलणीं चालणीं याच चिंतोपंताच्या हातून झालीं होतीं. हल्लीं त्याची या कामावर नेमणूक झाली होती. भाऊंचा निरोप साताऱ्यास जाऊन चिंतोपंतानीं नानास कळविला. तो ऐकून घेऊन नानानीं गरीबीचेंच बोलणें धरलें. परंतु त्यांत सातारा सोडण्याची त्यांची मनीषा दिसून आली नाहीं. सबब चिंतोपंत पुण्यास परत आला. बाळोबाचें प्रथम पासूनच म्हणणें होतें कीं, नाना गोडीगुलाबीनें वळावयाचा मनुष्य नव्हे ! फौज पाठवून आपणास धरून नेतात हें पक्कें कळल्याखेरीज तो कांहीं एक ऐकणार नाहीं. परंतु इतक्या निकरावर ही गोष्ट भाऊंस आणावयाची नव्हती. सबब त्यांनीं पुनः चिंतोपंतास नानाकडे पाठविलें. तथापि तीन चार दिवस झाले तरी त्याजकडून कांहीं उत्तर येईना. वस्त्रें घेण्याचें काम जलदीनें उरकून घ्यावयाचें असल्यामुळें आतां दिरंगाई करण्याची सोय राहिली नव्हती. साताऱ्यास फौज पाठविण्याविषयीं बाळोबाचा आग्रह होताच, त्याप्रमाणें त्यानीं दहा हजार स्वार व पांच पलटणें बरोबर देऊन नारायणराव जिवाजी बक्षी यांची कवडीच्या मुक्कामाहून रवानगी केली. ते यवतपर्यंत जाऊन पोंचले तों तेथेंच मुक्काम करून राहण्याविषयीं त्यांस परशुरामभाऊंची चिठी आली. भाऊनीं आतां आणखी अगत्याचा व शेवटचा निरोप सांगून बहिरोपंत मेहंदळे यांची साताऱ्यास रवानगी केली. मेहेंदळे साताऱ्यास पोंच-

त्यावर नाना तेथून न निघतील तर नारायणराव बक्षीनीं कूच करून जावें असें भाऊनीं ठरविलें होतें.

इतक्या पल्ल्यावर गोष्टी आल्या तेव्हां नानानीं सातारा सोडिला. भाऊंचा अदमास ते राहण्याकरितां मिरज अगर तासगांव हीं स्थळें पसंत करितील असा होता. परंतु पुढच्या बेतावर नजर ठेवून नानानीं मेणवलीच पसंत केली व अर्ध्या अधिक फौजेस निरोप देऊन ते मेच्या बेवीस तारखेच्या सुमारें मेणवलीस जाऊन राहिले. नंतर त्रिंबकराव अमृत पेठे यांस भाऊनीं साताऱ्यास पाठवून महाराजांकडून चिमाजीआपाकरितां पेशवाईचीं वस्त्रें आणविलीं. त्या कामांत नानानीं त्यांस कांहीं अडथळा केला नाहीं.

चिमाजीआपांचें दत्तविधान कधीं झालें ती नक्की तारीख समजली नाहीं, तथापि तें मे महिन्याच्या अखेरी अखेरीस झालें असावें असें ता. ३ जूनच्या एका पत्रांतील उल्लेखावरून दिसतें. तो उल्लेख असा—" बाळकृष्ण शास्त्री छत्रे ( दत्त ) विधानाचा सुलाह देईनात. विधान जाहलें हें अशास्त्र म्हणोन दोन तीन दिवस क्षेत्र करून तुळशीबागेंत बसला आहे. वडिलांस ( परशुरामभाऊंस ) राग आला म्हणजे शहर पार करून देतील तेव्हां समजेल ! " असो. ता. २ जून रोजीं चिमाजीआपास पेशवाईचीं वस्त्रें पुणें मुक्कामीं झालीं तो मोठाच समारंभ झाला. शिंदे, होळकर वगैरे सरदारानीं या नूतन पेशव्यांस नजराणा केला. शहरच्या लोकांस फार आनंद झाल्याचें पत्रांतून लिहिलें आहे. परंतु बाजीरावसाहेब पुण्यास आले तेव्हांही शहरच्या लोकांस असाच फार आनंद झाला होता ! यामुळें त्या लिहिण्याची कांहीं मातब्बरी दिसत नाहीं. या आनंदोत्सवाप्रीत्यर्थ चिमाजीआपानीं पुण्यांच्या गणपतीस चौघडा दिला.

दाणावैरणीच्या निमित्तानें रयतेस लुटण्याचा प्रकार शिंद्यांकडून यथापूर्व किंबहुना अधिकच चालला होता ! भाऊनीं तक्रार केली असतां शिंद्यानीं त्यांस सांगावें कीं, या पुणें प्रांतीचे लोक फार लुच्चे

आहेत ! तुम्ही नवीन कारभारी असल्यामुळें हे तुमचा दाब बसूं देणार नाहींत. याकरितां यांस चांगले नरम करितों ! या प्रकारावरून या नवीन कारकीर्दींत शिंदे होळकर वगैरे पुणें मुक्कामीं असतां परशुरामभाऊंच्या कारभाराचा बोज कितपत राहण्याजोगा होता हें दिसून येतें !

चिमाजीआपांस वस्त्रें झाल्यानंतर तिसऱ्याच दिवशीं मोंगलावर स्वारी करण्याकरितां श्रीमंतानीं शिंद्यांस दरबार भरून समारंभानें निरोप दिला. त्यावेळीं ते व त्यांचे बाळोबा वगैरे कारभारी व सरदार यांस श्रीमंतानीं वस्त्रें व जवाहीर देऊन त्यांचा बहुमान केला. नबाब निजामअलीवर पाऊण कोटीची वरात या वेळीं शिंद्याच्या हवालीं करण्यांत आली. शिंदे स्वारीस निघावयास अद्यापि अवकाश होता व ते निघतील तेव्हां सरकारची फौजही त्यांबरोबर जावी असें ठरलें होतें. आधींच हा समारंभ करण्याचें कारण या नवीन कारकीर्दीचें धोरण नबाब निजामअलीस विरुद्ध आहे असें जगजाहीर व्हावें व नानाच्या राजकारणांत नबाब मिळतील तर त्यांस दहशत बसावी !

नानाफडनवीस यांस उपद्रव न देण्याचें बाळोबातात्यानीं ज्या शर्तींवर कबूल केलें होतें, त्या शर्ती नानानीं पाळिल्या नाहींत. ते वांईस म्हणजे वाईनजीकच्या मेणवली गांवीं जाऊन राहिले होते हें खरें, तथापि पूर्वी ठरल्याप्रमाणें त्यानीं आपणाजवळची सर्व फौज दूर केली नव्हती; आणि सरंजामाच्या व किल्लेकोटांच्या सोडचिठ्याही अजून दिल्या नव्हत्या. याही गोष्टींकडे पुणें दरबारानें डोळेझांक करून नानास मर्जीप्रमाणें कांहीं दिवस वागूं दिलें असतें. परंतु भोंसले व निजामअल्ली यांशीं राजकारण ठेवण्याचा नाद नानानीं सोडावा, तें न करितां त्यांनीं तो प्रयत्न अधिकच जारीनें सुरू ठेविला. ही गोष्ट बाळोबा व परशुरामभाऊ यांस फारच असह्य झाली. त्यानीं असा ठराव केला कीं, याउपर नानानीं वांईस अगर मेणवलीस न राहतां तूर्त टोक्यांस जाऊन रहावें, व चातुर्मास्य झाल्यावर काशीस जाऊन रहावें ! असा ठराव करून त्याप्रमाणें वागण्याविषयीं नानास

बोध करण्याकरितां चिंतोपंत लिमये व विसाजीपंत वाडदेकर हे दोन असामी भाऊनीं त्यांजकडे पाठविले. नानाचें म्हणणें कीं, आपण राजकारण वगैरे कांहींएक करणार नाहीं, त्याबद्दल पाहिजे तसली शपथ घ्यावी, आपणास मेहेरबानी करून वांईस राहूं द्यावें. परंतु तें बोलणें भाऊ व बाळोबा ऐकेनात. भाऊंचें म्हणणें कीं, नाना टोक्यांस जाऊन राहिले असतां, शिंद्यांकडून त्यांस काडीमात्र तसदी पोंचणार नाहीं याबद्दल मी जामीन होतों. मग आतां नानानीं संशय कां धरावा ? भाऊंची जामीनगत प्रामाणिकपणाची असेल, पण नानास ती स्वार्थमूलक भासावी यांतही आश्चर्य नाहीं. नाना जों जों अधिक अधिक गरीबीचें बोलणें बोलूं लागले तों तों बाळोबा व भाऊ यांस त्यांचा अधिक अधिक संशय येऊं लागला. आतां नानानीं वांईस न राहतां टोक्यांस गेलेंच पाहिजे असा त्या दोघानीं हट्ट धरिला बाळो-बानीं वांईहून नानास आणण्यासाटीं तत्काळ पलटणें रवाना केलीं. नानांविषयीं अजूनही भाऊंच्या पोटांत दया होती. पलटणें वांईस गेल्यावर कांहीं अतिप्रसंग होईल हें त्यांस भय पडलें व त्यानीं नानास आणण्याचें काम आपणावर सोंपवून घेऊन आपले तृतीय पुत्र महादाजीपंत दाजी यांजबरोबर चार हजार फौज देऊन त्यांची नानाकडे रवानगी केली. शिंद्यांकडून तुम्हांस कांहींएक इजा पोंचणार नाहीं अशी दाजीनीं नानांची खात्री करावी, व ते टोक्यांस जातपर्यंत त्यांजबरोबर दाजीनीं असावें, किंबहुना टोक्यांस आपणाजवळ रहा असें नानानीं सांगितलें तरी सुद्धां तेथें रहावें, याप्रमाणें भाऊनीं बेत ठर-विला होता. हें सर्व जरी नानांच्या कल्याणाकरितां भाऊनीं केलें होतें तरी यांत नानांच्या नजरेस आपण कैदी होणार व दाजी आपले जेलर होणार असाच प्रकार दिसला ! फौजेसह महादाजीपंत दाजी खंडाळ्यापर्यंत येऊन पोंचले अशी नानांस बातमी समजतांच त्यानीं ता० ४ जूनच्या रात्रीस मेणवलीहून निघून रायगडाकडे पलायन केलें ! त्यांबरोबर दोन तीन हजार स्वार व हजार पंधराशें गारदी असा सरंजाम होता.

रायगडाकडे जातांना नानानीं वाटेंत जागोजाग चौक्या बस-वून बंदोबस्त केला होता, आणि रायगड व प्रतापगड येथें तर त्यांचा बंदोबस्त पूर्वीपासूनच चांगला होता. रायगडावरचा मुख्य अंमलदार दादा गद्रे हा त्यांचाच हस्तक होता. रायगडाखालीं पाचाण म्हणून गांव आहे तेथें नानांची स्वारी दोन तीन दिवस राहिली. नंतर रायगडावर जावें असें त्यांच्या मनांत आलें. तों दादा गद्रे याची बायको किल्ल्यावर होती तिजकडे शिंद्यांकडून फितुराचा प्रेष झालेला आहे व तिनें आपणास किल्ल्यांत न येऊं देण्याचा बेत केला आहे अशी बातमी नानांस समजली. दादा गद्रे त्यांच्या स्वारीबरो-बर होतेच. त्यांस त्यांनीं तत्काळ किल्ल्यावर पाठवून त्या बाईस खालीं उतरविलें व विश्वासाचें नवीन पांच सातशें माणूस किल्ल्यावर घालून मग आपण तेथें रहावयास गेले. परंतु पावसाची संतत धार व किल्ल्याची अतिशय सर्द हवा असल्यामुळें तेथेंही त्यांस बरें वाटेना. दोन दिवस किल्ल्यावर ते कसेबसे राहिले व नंतर तेथून महाडास गेले. तेथें मात्र त्यांचा चार महिने मुक्काम पडला होता. कोंकणच्या हवेमुळें पहिल्याच पंधरवड्यांत चाळीस पन्नास घोडीं व उंटें मेलीं, त्यामुळें पांच सातशें गारदी व शेंपन्नास शिलेदार इतका मात्र जमाव जवळ ठेवून घेऊन बाकी फौजेस त्यांनीं निरोप दिला. पावसाळा संपेपर्यंत पुण्याकडून त्यांवर फौज येण्याचें भय नव्हतें. कारण तिक-डून येण्याचे मढा, शेवता वगैरे पांच सहा घांट आहेत ते त्यानीं माणसें लावून खणून काढिले होते व मोठमोठे वृक्ष तोडून आडवे घालून वाटा बुजवून टाकिल्या होत्या.

दौलतराव शिंदे यानीं मोंगलांवर स्वारी करण्यासाठीं पेशव्यांची आज्ञा जाहीर रीतीनें घेतल्याचें मागें सांगितलेंच आहे. ती स्वारी मोठ्या प्रमाणावर व्हावयाची असल्यामुळें ती सुरू होण्यास अद्यापि बराच अवकाश होता. तथापि तूर्त मोंगलाई राज्यापैकीं परांड्याचा किल्ला काबीज करावा या उद्देशानें आपल्या पलटणांचा एक कंपू त्यानीं तिकडे रवाना केला. शिंद्यांप्रमाणेंच निजामअल्लीजवळ फ्रेंच

अंमलदारांनीं तयार केलेलीं पायदळाचीं पलटणें होतीं व तोफखान्याचा सरंजाम चांगला होता. परंतु खड्र्याच्या स्वारीपासून शिंद्यांच्या सामर्थ्याविषयीं निजामअल्लीच्या मनानें धास्ती घेतली होती. पुण्याच्या दरबारांत शिंद्यांचें प्राबल्य झालें आहे त्याअर्थी ते पुनः आपणावर स्वारी करितील व त्यांचा प्रतिकार करणें आपणास कठीण जाईल हें निजामअल्ली जाणून होते. सबब अलीकडे त्यांनीं फौज व कवाइती पायदळ चांगल्या स्थितींत आणून तें नेहमीं युद्धास तयार असावें अशी तजवीज ठेविली होती. सर्व प्रकारें नानाची कुमक करून शिंद्यांची त्यांवर सरशी होऊं द्यावयाची नाहीं हें तूर्त त्यांच्या कारस्थानाचें धोरण होतें. नबाबांनीं लढाईची तयारी केलेली पाहतांच शिंद्यानींही हिंदुस्थानांतून आणखी एक कंपू दक्षिणेंत बोलाविला होता. हल्लींच्या प्रसंगीं वर सांगितल्याप्रमाणें शिंद्यांचें पायदळ परांड्याजवळ येऊन पोंचतांच मुसा रेमू नांवाच्या फ्रेंच अंमलदाराच्या हाताखालीं मोंगलाई फौज व कवाइती पायदळ बेदराजवळ जमा होऊं लागलें व मोंगलाईनले जहागीरदार रावरंभा निंबाळकर यानीं स्वारी करून शिंद्याची कही मारून काढिली. आतां उभयपक्षीं लढाई जारीनें सुरू व्हावी तों इतक्यांत शिंद्यांनीं लढाईची मसलत तहकूब करून आपला कंपू पुण्यास परत आणिला व परशुरामभाऊंस सांगितलें कीं, तुम्हीं आम्हांस पाऊण कोटीची वरात मोंगलावर दिली आहे ही परत घेऊन हिचे रुपये आम्हांस येथेंच द्या! रुपये आतांच देतां येण्याजोगे नसतील तर सावकाशीनें द्या, परंतु ही वरात आम्हांस नको!

अशा रीतीनें निजामअल्लीविषयीं शिंद्यानीं आपलें राजकीय धोरण अकस्मात् व अजीबात बदललें याचें कारण नानाच्या कारस्थानीचा पहिला धक्का इंग्रजांच्या द्वारें त्यांस बसला हें होय. " नानांचें व इंग्रजांचें सख्य उत्तम रीतीनें झालें आहे व त्यांचा कवार घेऊन इंग्रज पंधरा पलटणानिशीं पुण्यावर स्वारी करणार, " " इंग्रजानीं शिंद्यांशीं बोलणें घातलें आहे कीं, तुम्हीं नानास उपद्रव

करणार नाहीं याबद्दल आमची कशी खातरी करणार ती करा, म्हणजे कारभारांत ढवळाढवळ न करितां नाना स्वस्थ राहतील, याबद्दल हमी आम्ही घेतों." "दोन तीन हजार स्वार व हजार पंधराशें पायदळ इतक्या फौजेच्या खर्चापुरता सरंजामाचा मुलूख व दोन किल्ले अशी नानास पेशवे सरकारांतून जहागीर मिळावी असें इंग्रज शिंद्यांस म्हणत आहेत." "इंग्रजाच्या मनांतून दिल्लीवर मोहीम करावयाची आहे व त्याकरितां लखनौस पलटणें जमा होत आहेत." "नानास रहावयाकरितां इंग्रजानीं साष्टीचा किल्ला रिकामा केला आहे." अशा बातम्या पुण्याच्या बाजारांत एक सारख्या चार महिने पसरत होत्या. अर्थात् कमी ज्यास्त मानानें तसल्याच बातम्या हिंदुस्थानांतल्या इतर शहरांतूनही पसरल्याच असतील. हल्लीं बाजारी गप्पांचा परिणाम सरकारच्या राजकीय धोरणावर कांहीं एक होत नाहीं. परंतु पूर्वीच्या स्वदेशीय राज्यव्यवस्थेवर बाजारी अफवांचासुद्धां परिणाम होत असे हें निर्विवाद आहे. आम्ही म्हणतों याला प्रत्यंतर पाहणें वाचकांच्या हातीं आहे. या व मागच्या प्रकरणांत आम्हीं त्या वेळच्या पुष्कळ बाजारबातम्या छापल्या आहेत. त्यांचा परिणाम तत्कालीन मुत्सद्यांच्या वर्तनावर झालेला आहे कीं नाहीं, हें वाचकांनीं सूक्ष्म रीतीनें अवलोकन करून ठरवावें म्हणजे झालें! वर लिहिलेल्या बाजारी गप्पांत कांहीं तथ्य नाहीं, इंग्रजांचा कल नानाकडेही नाहीं व आम्हाकडेही नाहीं, ते केवळ तटस्थ राहिले आहेत, असें परशुरामभाऊंचें लिहिणें आहे. पण यांत इंग्रज वकिलानें सरकारी रीतीनें जें त्यांस सांगितलें त्याचाच त्यांनीं अनुवाद केला एवढेंच दिसून येतें. खरोखरीच त्यांचें अगर शिंद्यांचें तसें प्रामाणिक मत असावें असें वाटत नाहीं. सरकारी रीतीनें आपणांस गुंतवून न घेतां अनेक खाजगी प्रकारानीं आपलें धोरण व इच्छा प्रदर्शित करण्याचा प्रत्येक सरकारचा परिपाठ आहे. त्यास अनुसरून इंग्रजानीं पुण्यांतील अधिकाऱ्यांजवळ खाजगी प्रकारानीं आपला हेतु प्रदर्शित केला नसेलच असें म्हणवत नाहीं. एरवीं वर सांगितलेल्या बातम्या पुण्यांत चार

महिने एकसारख्या कां पसरत होत्या याची उपपत्तिच लागत नाहीं ! कांहीं असो. नानास इंग्रजाचें ' नैतिक पाठबळ ' होतें ही गोष्ट जगजाहीर आहे. इंग्रज इतिहासकारसुद्धां हें नाकबूल करीत नाहींत. दिल्लीच्या कारभारांतून शिंद्यास हुसकून लावावें ही इंग्रजांची आज कित्येक वर्षें प्रबळ इच्छा होती व शिंद्यांस ती माहीत होती. नाना महाडास गेल्यावर त्यांचे कारकून मुंबईस गेले व त्यानंतर इंग्रजानीं साष्टीचा किल्ला आपला माल काढून घेऊन मोकळा केला. त्यानंतर इंग्रजी पलटणें मुंबई, कलकत्ता व लखनौ येथें जमा झालीं, इंग्रजांची दिल्लीवर स्वारी होणार ही बातमी ऐकून शिंद्यांचा सरदार जनरल डी बॉइन दिल्लीस गेला, या गोष्टी कांहीं खोट्या नाहींत. व यांचा निष्कर्ष नानाच्या तर्फेनें इंग्रज आपणावर स्वारी करणार असा दौलतराव शिंद्यानीं काढावा हें अगदीं साहजिक आहे.

शिंद्यांच्या दरबारांत तूर्त शेणवी कारभाऱ्यांचें वर्चस्व झालें होतें त्यामुळें दुसरे कारभारी आबा चिटणीस, रायाजी पाटील व रामजी पाटील हे फिके पडले होते. आबा तर महाडास नानांजवळच होता आणि बाकीचे दोघे शिंद्यांच्या लष्करांत होते. शिंद्यांच्या दौलतीवर इंग्रजांची वांकडी नजर झालेली पहातांच रायाजी व रामजी पाटील यांनीं आपल्या धन्याशीं बोलण्याचा उपक्रम केला कीं, " शेणव्यांचा कारभार वाहुटीला लागतां लागतां कोणच्या पल्ल्यास पोंचला आहे याचा विचार करा. नानास मोंगल, इंग्रज, भोसले यांचें पाठबळ आहे. एकीकडून मोंगल, दुसरीकडून इंग्रज, आणि तिसरीकडून नाना असा तिहेरी शह लागल्यास तो सोसण्याचें आपल्या सरदारीस सामर्थ्य नाहीं. याकरितां आतां शेणव्यांचा नाद सोडून देऊन नाना व बाजीरावसाहेब यांशीं मिलाफ करून घ्यावा. " महादजी शिंद्यांची राख केशरी म्हणून होती ती उज्जनीस राहत असे. नानानीं तिजकडे प्रेष केल्यावरून तिनेंही दौलतरावास नानाशीं सख्य करण्याविषयींच बोध केला होता. पाटील कारभारी व केशरी यांचा सल्ला दौलतरावास पटला व रायाजी पाटलाच्या द्वारें नानाशीं शिंद्यांचा सलोख्याचा पत्र-

व्यवहार होऊं लागला. चिमाजीआपास गादीवर बसविण्यांत आल्याबरोबर अमृतराव व बाजीराव यांची कुटुंबासह ब्हाणपुरास रवानगी करावी व त्यांच्या खर्चाकरितां गुजराथेंत पांच लक्षांचे महाल लावून द्यावे असा भाऊ व बाळोबा यांनीं ठराव केला होता. परंतु आतां बाजीरावसाहेबांचें तिकडे जाणें शिंद्यानीं तहकूब केलें, इतकेंच नाहीं, तर श्रीमंतांचीं व त्यांचीं मसलतीविषयीं खलबतेंही होऊं लागलीं. बाळोबातात्या वगैरे त्रिवर्ग कारभाऱ्यांस शिंदे म्हणूं लागले कीं, तुम्ही आम्हांस कोट दोन कोट रुपये मिळवून देतों असें बोललांत तो पैका अद्यापि दृष्टीस पडत नाहीं व पुढें ही पडण्याचा संभव दिसत नाहीं. तुम्ही नानाशीं बिघाड केलात, पण तेच नाना आतां इंग्रजांच्या बळावर आम्हावर शिरजोर होऊं पहात आहेत. बाजीरावसाहेबांस कैदेंत ठेवल्यामुळें आमचा दुर्लौकिकही फार झाला आहे. तर आतां पुढें कसें करावयाचें याचा विचार करून मला उत्तर कळवा.

शिंद्यांजवळ आतां आपलें वजन कमी पडत चाललें व त्यांचें मत आपणाविषयीं प्रसन्न नाहीं हें बाळोबांस कळलें होतें. परंतु शिंद्यांच्या सैन्यावर त्यांचा ताबा चांगला होता व भाऊंशीं त्यांचा उत्तम स्नेह जमला होता, यामुळें त्यानीं धीराधीरानें राज्यकारभार चालू ठेवलाच होता. सरकारी कामकाजांत नानाची मित्रमंडळी होती ती काढून टाकण्याचा उपक्रम बाळोबाच्या सल्ल्यावरून भाऊनीं प्रथम केला. त्यांत त्यांनीं आपले जोडीदार बाबा फडके यांस घरीं बसविलें व फडक्यांचे दिवाण नारोपंत चक्रदेव यांजकडून हुजरातीचा कारभार काढिला. कांहीं हुजरात महादजीपंत बेहरे याच्या दिमतीस होती ती त्याजकडून दूर केली. करवीरच्या महाराजांकडे नानांचें राजकारण सुरू असल्याची वार्ता ऐकून भाऊ व बाळोबा यानीं त्या महाराजांस सांगून पाठविलें कीं, तुम्ही नानाशीं सख्य ठेवूं नये. ठवाल तर आम्हीं तुमचें पारिपत्य करूं! परंतु महाराजांनीं त्यांच्या दपटशाहास जुमानिलें नाहीं.

इंग्रजांशीं बिघाड झाल्यास नबाबाशीं सख्य होण्याचें द्वार खुलें असावें, अशा हेतूनें मशीरुल् मुलुक याची कांहीं शर्तीवर मुकता करण्याचें पुणें दरबारानें मनांत आणिलें. गोविंदराव पिंगळे यांच्या मार्फत मशीराचें बोलणें पुणें दरबाराशीं असें होतें कीं, आपण सरकारांत कांहीं नजराणा देतों, मुतसद्दी मंडळीस व खुद्द शिंद्यांसही दरबारखर्चाबद्दल कांहीं पैका देतों, आपणास कैदेतून सोडावें. नबाबाकडे खंडणी येणें आहे व दुसरेही कित्येक लढे आहेत त्यांचा फडशा आपली सुटका झाल्याशिवाय कसा होईल? खंडणीच्या फेडीबद्दल नबाबाकडून आश्वासन मिळेल तर तुमची सुटका होईल. असें पुणें दरबाराचें म्हणणें पडल्यावरून नबाब निजामअल्ली यांनीं रघूत्तमराव या नांवाचा वकील पाठवून तसें आश्वासन दिलें व मशीरुल् मुलुक नजरकैदेतून मोकळा झाला.

मशीर यास मुक्त करून आपण निजामअल्लीची मर्जी खूष केली, व त्याशीं नानाचें राजकारण घाटत होतें तें बंद पाडिलें, असें परशुरामभाऊ व बाळोबातात्या मानीत होते. पण ती त्यांची चूक होती! पुण्यास जें शिराळशेटीचें राज्य अस्तित्वांत आलें होतें त्यावर निजामअल्लीचा बिलकुल विश्वास नव्हता. शिंद्यांचाही त्यास विश्वास येत नव्हता. परिणाम लावील तर नानाच लावील ही त्यांची पक्की खात्री होती.

चिमाजीआपा गादीवर बसल्यास महिना दीड महिना लोटला नाहीं, तों वर वर्णन केलेल्या गोष्टी घडून आल्या, आणि नानाचें शिंद्यांशीं व शिंद्यांच्या द्वारें बाजीरावसाहेबाशीं एकमत होऊन परस्पर करारमदार ठरले. त्यांत असें ठरलें कीं, शिंद्यानीं बाळोबा तात्या वगैरे त्रिवर्ग कारभाऱ्यांस कैदेंत ठेवावें आणि परशुरामभाऊंचेंही पारिपत्य करावें. इतकें करून शिवाय बाजीरावसाहेबांस गादीवर बसविण्याविषयीं व नानाच्या हातीं पूर्वीप्रमाणें राज्यकारभार सोंपविला जाण्याविषयीं जितका प्रयत्न करतां येईल तितका झटून करावा. बाजीरावसाहेब गादीवर बसले व नाना कारभार करूं लागले म्हणजे शिंद्यानीं पुण्याहून कूच

करून हिंदुस्थानांत जावें. ते जांबगावास पोंचल्यावर नानानीं त्यांस पन्नास लक्ष रुपये द्यावे व गोदावरी उतरून गेल्यावर आणखी पन्नास लक्ष रुपये द्यावे. शिवाय नानानीं श्रीमंतांकडून शिंद्यांस अहंमदनगरचा किल्ला व दहा लक्षांची जहागीर देवावी. बाजीरावसाहेबानीं नानांस पत्र लिहून दिलें कीं, तुम्ही आम्हांस गादीवर बसवाल तर तुम्ही शिंद्यांस देणार ती रक्कम आम्ही मंजूर करूं आणि शिंद्यांस अहंमदनगरचा किल्ला व दहा लक्षांची जहागीर देऊं; एवढेंच नव्हे, तर नबाब व भोंसले यांजशींसुद्धां या कामीं तुम्ही जे जे करार कराल ते ते सर्व पुरे करून देऊं. याप्रमाणें या मसलती गुप्तपणानें झाल्या तरी त्यांच्या बातम्या पुण्याच्या बाजारांत आल्याशिवाय राहिल्या नाहींत ! ' नाना व शिंदे व बाजीरावसाहेब व इंग्रज हा ग्रंथ एक झाला ' असा बोभाटा जुलै महिन्यांतच जिकडे तिकडे झाला होता तो बाळोबा व परशुरामभाऊ यांच्या कानावर गेला नसेलसें नाहीं, परंतु अजूनही बाळोबाचा स्वतःच्या सामर्थ्यावर विश्वास होता व त्याच्या बळावर भाऊही स्वस्थ होते !

राजकीय स्थितींत याप्रमाणें क्रांति घडून आल्यामुळें बाजीरावसाहेबांस सक्तीनें प्रतिबंधांत ठेवण्याचें शिंद्यांस कारण राहिलें नाहीं. त्यामुळें अर्थात् श्रीमंतांस गतिस्वातंत्र्य प्राप्त झालें नसलें तरी कृतिस्वातंत्र्य बऱ्याच अंशानें मिळालें; व आगष्ट महिन्यांतच त्याचा उपयोग त्यानीं करून घेतला ! मानाजी फांकडे त्यांजवळ होते त्यांचें महाराष्ट्रांतील शिलेदारांवर पराकाष्ठेचें वजन होतें. श्रीमंतांच्या सांगण्यावरून फाकड्यानीं नानाकडून पैका आणवून शिलेदारांस नालबंदी वांटली. व शिंद्याच्या गोटांतच पांच सहा हजार फौज चाकरीस ठेविली. ती फौज फाकड्यानें शिंद्यांस कळल्याखेरीज ठेविली असेलसें नाहीं ! याप्रमाणें फौज तयार केल्यावर बाजीरावसाहेबानीं ती फौज घेऊन पळून जाण्याची मसलत ठरविली ! पण बाळोबातात्यांस ती बातमी लागल्यावरून त्यानीं ती फौज घालवून लाविली. तेव्हां त्या फौजेंतील शिलेदारांशीं फांकड्यानीं गुप्त संकेत केला कीं,

आतां तुम्ही घरोघर जा, व पुढें मी सांगेन त्या ठिकाणीं मला भेटा ! याप्रमाणें होऊन ती फौज निघून गेल्यावर बाळोबानीं बाजीरावसाहेबांचा प्रतिबंध सक्तीचा केला.

ही फिसाद मोडते तों श्रावण व० अष्टमीस म्हणजे ता० २६ आगष्ट रोजीं दुसरा एक गुप्त कट उघडकीस आला. हा कट होण्यासही नानाचा पैकाच कारण झाला. बाबा फडके व नारोपंत चक्रदेव यानीं नानाकडून ऐवज आणून हुजरातीच्या लोकांस वांटला व कांहीं होळकरासही दिला; आणि हुजरात व होळकर यांचा एकोपा करून असें ठरविलें कीं, परशुरामभाऊंस कैद करून व चिमाजीआपांस पदच्युत करून त्या जागीं बाजीरावसाहेबांस बसवावें. परंतु हाही कट लौकरच उघडकीस आल्यामुळें बाळोबा व भाऊ यांनीं फडके वगैरे फितुरी लोकांचें पारिपत्य करण्याचा निश्चय केला. त्यांचा बाबा फडक्यावरचा विश्वास यापूर्वींच उडाला होता; व त्याचें कारण असें झालें होतें कीं, बापूजीपंत लेले या नांवाच्या एका मुत्सद्यानें एके दिवशीं बाळोबातात्या यांजकडे जाऊन त्यांस सांगितलें कीं, तुम्ही परशुरामभाऊंकडून कारभार काढा व बाजीरावांस गादीवर बसवा; म्हणजे मी तुम्हांस पन्नास लक्ष रुपये देतों ! बाळोबानीं तें बोलणें ऐकून घेऊन सदरहू रकमेची निशाचिट्टी मागितली. तेव्हां लेले व भोकरे या आडनावांचा एक सावकार यानीं बेधडक लिहून दिलें कीं, याप्रमाणें होत असेल तर पन्नास लक्ष रुपयांस आपण जबाबदार आहों ! ! बाळोबानीं मुकाट्यानें त्या चिठ्या घेऊन परशुरामभाऊंकडे पाठविल्या व त्यांस तपास करण्याविषयीं सांगितलें. भाऊनीं तपास केला तेव्हां त्यांस असें आढळून आलें कीं, या मसलतींत बाबा फडके मुख्य असून त्यांस नानांचें व बाजीरावसाहेबांचें पूर्ण पाठबळ आहे ! फडके हे भाऊंचे फार दिवसांचे ऋणानुबंधी व आप्तविषयी असल्यामुळें त्यानीं त्यांची त्यावेळीं सबुरी केली. परंतु पुनः फडक्यानीं वर सांगितल्याप्रमाणें हुजरातींत व होळकरांकडे फितूर केलेला आढळतांच भाऊंनीं त्यांस त्यांच्याच वाड्यांत कैदेंत ठेविलें.

## श. १७१८ नानाचा नबाब व भोसले यांशीं करार. इ.स. १७९६

नानाचें बंड मोडण्यास नबाबानीं मदत करावी या शर्तीवर मशीरुल् मुलुक याची सुटका करण्यांत आलेली होती. बाळोबातात्या व भाऊ यानीं मशीरास सोडल्यावर नानाचें बंड मोडण्याकरितां आतां तूं फौज चाकरीस ठेव असें त्यानीं त्यास सांगितलें व त्यानें तें कबूल करून फौज ठेवण्याचा उद्योग सुरू केला ! परंतु मशीर हा स्वतंत्र नव्हता. निजामअलीच्या आज्ञेप्रमाणें वागणें त्यास भाग होतें आणि सर्व प्रकारानीं नानास मदत करण्याविषयीं निजामअलीचा नानाशीं करार ठरूनसुद्धां गेला होता ! अर्थात् मी तुम्हांस अनुकूळ आहें असें बाळोबा व भाऊ यांस मशीर जें दाखवीत होता तें केवळ बाह्यात्कारी होतें ! हुजरातीचा कट उघडकीस आल्यामुळें बाबा फडके कैदेंत पडले त्या दिवशीं त्या फडक्यांचा दिवाण नारोपंत चक्रदेव पुण्यांतून पळून गुलटेकडीजवळ मशीराचा गोट उतरला होता तेथें गेला. तेव्हां मशीरानें त्यास पकडून पहाऱ्यांत बसविलें व आपण पुणें दरबाराचें काम किती कळकळीनें करीत आहों याचा मासला बाळोबा व भाऊ यांच्या नजरेस आणून दिला !

निजामअलीशीं नानाचा करार ठरल्याचें वर लिहिलें आहे तो करार असा होता कीं, बाजीरावांस पेशवाईचा अधिकार मिळावा व नानाची पूर्वीप्रमाणें कारभारावर स्थापना व्हावी या दोन गोष्टी घडवून आणण्याकरितां नबाब निजामअली यानीं सैन्याची लागेल तसतशी नानास कुमक करावी व त्याबद्दल नानानीं बाजीरावसाहेबांकडून त्यांस खर्ड्याच्या तहांत ठरलेली खंडणी व बत्तीस लक्षांचा मुलूख माफ करवावा. भोसल्यांशींही नानानीं याच शर्तीवर करार ठरविला होता; त्यांत त्यांस बाजीरावसाहेबांकडून पंधरा लक्ष रुपये व गढामंडळप्रांत देवविण्याचें ठरविलें होतें. " बाजीरावांस गादीवर बसविण्याच्या कामीं शिंद्यांची समजूत केली, बाळोबा व परशुरामभाऊ यांचें पारिपत्य केलें, म्हणजे झालें. त्या कामासाठीं भोसले व नबाब यास एवढाल्या देणग्या देऊन त्यांची अनुकूलता संपादन करण्याचें काय कारण होतें " ? अशी कोणी शंका घेईल, तर त्यावर उत्तर असें

आहे कीं, असल्या बाबतींत राजेरजवाड्यांशीं करार होतात ते दोन हेतूनीं होत असतात. एक हेतु त्यानीं आपणास मदत करावी हा असतो व तो प्रधानहेतु असतो हें खरेंच; पण त्यानीं आपली कुमक न केली तरी चालेल, परंतु आपल्या प्रतिस्पर्ध्यास तरी त्यानीं मिळूं नये; असा गौण हेतुही असल्या करारांत असूं शकतो. शिंदे व बाजीराव यांचें आपण किती कल्याण करूं गेलों तरी ते आपणाशीं बरेपणानेंच वागतील असा भरंवसा नानास येईना. सबब वरील दोन्ही हेतु लक्षांत घेऊन त्यानीं नबाब व भोंसले यांशीं वर सांगितल्याप्रमाणें करार ठरविला होता. इंग्रजांस त्यानीं कांहीं देऊं घेऊं केलें नाहीं. पण ' बाजीरावांस गादीवर बसविण्याच्या कामीं तुमची कांहीं हरकत आहे कीं काय ? ' असा प्रश्न करून त्यांकडून अनुकूल उत्तर त्यानीं मिळवून ठेविलें होतें.

परशुरामभाऊंचें मन व्यग्र करण्याकरितां व त्यांस भय उत्पन्न करण्याकरितां नानानीं करवीरच्या महाराजांशीं राजकारण करून त्यांस सांगितलें कीं, तुमचे चिकोडी व मनोळी हे तालुके परशुरामभाऊंकडे रदकर्जात गुंतले आहेत ते तुम्ही ताब्यांत घेऊन आपला अंमल बसवा. भाऊ कर्जाचा पैका परत मागतील तर त्यांस पैकाही देऊं नका व तालुकेही देऊं नका ! मात्र या दोन तालुक्यांखेरीज पेशवाई मुलुखांत तुम्ही अन्यत्र कोठें उपद्रव देऊं नये. यावर महाराज म्हणाले कीं, आज भाऊंत व तुम्हांत वांकडें आलें आहे म्हणून तुम्ही आम्हांस असें करावयास सांगतां, पण उद्यां तुम्ही व भाऊ एक झालांत आणि भाऊनीं आम्हांवर स्वारी केली तर कसें करावें ? यावर नानानीं त्यांस आश्वासन दिलें कीं, भाऊंची तुम्हांवर स्वारी होऊन आणीबाणीचा प्रसंग आल्यास आम्ही तुमचा बचाव करूं. फौज ठेवण्याकरितां महाराजांनीं या प्रसंगीं नानाजवळ दोन लाख रुपये उसनवार मागितले तेही नानानीं त्यांस तत्काळ दिले.

सन १७९६ च्या पावसाळ्यांत वर सांगितलेल्या नानाच्या सर्व मसलती पक्क्या ठरून गेल्या होत्या. पावसाळ्यांत फौजाच्या

हालचाली होण्यास अडथळा असतो, सबब नबाब व भोसले व व करवीरकर आपल्या जागीं तयार होऊन पावसाळा संपण्याची वाट पहात बसले होते. पण इतकें झालें तरी बाळोबातात्या व परशुरामभाऊ अद्यापि जागे झाले नाहींत ! वास्तविक पाहिलें तर आतां त्यानीं जागें होऊनही कांहीं विशेषसा उपयोग नव्हता ! हुजरातींत बंडाचा प्रादुर्भाव दिसूं लागतांच त्या दोघानीं असा कयास ठरविला कीं, बाजीरावसाहेब येथें असल्यामुळेंच हे सारे बखेडे उत्पन्न होतात. याकरितां यांस येथून काढून कोठें तरी दूर नेऊन ठेविलें पाहिजे. त्यानीं अमृतरावास सहकुटुंब जुन्नराहून जांबगांवास नेऊन ठेवलेंच होतें. बाजीरावसाहेबांस पुण्याहून जांबगावास न्यावें व तेथून अमृतरावांसह त्यांची रवानगी हिंदुस्थानांत करावी असा बाळोबांचा बेत ठरला होता. परंतु बाजीरावसाहेब कांहीं केल्या जागा सोडीनात व शिंदेही त्यांस जाण्याविषयीं निकड करीनात ! मग मोठ्या युक्तिप्रयुक्तीनें श्रीमंतांचें मन वळवून बाळोबातात्यानीं त्यांस एकदांचें पुण्यांतून काढून जांबगांवाकडे पाठवून दिलें. जागा सोडण्यापूर्वीं बाजीरावसाहेबानीं बाळोबातात्या व परशुरामभाऊ यांपासून असा करार करून घेतला होता कीं, त्यानीं आपल्या खर्चाकरितां झांशी— अकरा लक्ष व अरुण वगैरे महाल—चार लक्ष, एकूण पंधरा लक्षांची जहागीर द्यावी. त्या जहागीरीच्या सनदा बाजीरावसाहेब जांबगांवास जातात तों त्यांच्या हातीं याव्या व नंतर त्यानीं नर्मदातीरीं बडवें येथें जाऊन रहावें. श्रीमंतांबरोबर शिंद्यांचीं तीन पलटणें व दोन अडीच हजार स्वार, शिवाय विंचूरकर व राजेबहादर यांची पथकें, असा सरंजाम देण्यांत आला होता. यांपैकीं शिंद्यांच्या फौजेवर हुकमत सखाराम घाडगे सर्जाराव कागलकर यांची होती. श्रीमंत जांबगांवाअलीकडे पारनेरच्या मुक्कामास पोंचले ते तेथेंच दहा पंधरा दिवस मुक्काम करून राहिले ! जहागिरीच्या सनदा हातीं आल्याखेरीज आपण पुढें जात नाहीं अशी त्यांची तक्रार होती. पण पुण्याहून सनदा त्यांजकडे गेल्या तेव्हां राहण्यास निमित्त नाहींसें होऊन ते तेथून

निघून जांबगांवास गेले. त्या अवधींत बाजीरासाहेबानीं सर्जेराव घाडग्याशीं व त्याच्या द्वारें शिंद्यांशीं जो एक गुप्त करार केला त्याचा परिणाम एकट्या नानासच नव्हे, तर सर्व मराठी राज्यास भोवला ! घाडग्याची मुलगी बायजाबाई ही फार सुंदर असून उपवर होती. दौलतराव शिंद्यांच्या मनांतून तिजशीं लग्न करावयाचें होतें. परंतु शिंद्यांची जातकुळी हीन असल्याभुळें आपण त्यांस मुलगी देणार नाहीं असें सर्जाराव घाटगे म्हणत होते. हें त्याचें म्हणणें बाह्यात्कारी होतें व आंतून इच्छा अशी होती कीं, पुष्कळ दौलत व अधिकार मिळाल्यास शिंद्यांस मुलगी द्यावयाची ! हा त्यांचा मनोदय बाजीरावसाहेबांस माहीत असल्यामुळें त्यानीं सर्जाराव घाटग्याशीं गुप्तरूपें करार ठरविला. तो असा कीं, सर्जेरावानें शिंद्यांस मुलगी द्यावी; व तसें त्यानें केल्यावर श्रीमंतानीं शिंद्यांची दिवाणगिरी सर्जेरावास द्यावी; व त्याच्या द्वारें शिंद्यांस दोन कोट रुपये द्यावे ! या देणगीबद्दल शिंद्यानीं बाजीरावसाहेबांस गादीवर बसविण्याविषयीं नानास मदत करावी, इतकेंच नाहीं, तर पुढें ते नानाच्या कह्यांत न सांपडतील व नानापासून त्यांचें रक्षण होईल असा बंदोबस्तही करावा ! ! हा गुप्तरूपें झालेला करार नानास कळला नाहीं हें सांगावयास नकोच.

शिंद्यांच्या गोटांतून बाजीरावसाहेब निघून गेल्यावर मानाजी फांकड्याचें पुढें काय करावयाचें ही बाळोबातात्यांस पंचाईत पडली. बाजीरावसाहेबांची मर्जी प्रसन्न राखावयाची असल्यामुळें फांकड्यांस कैदेंत ठेवण्याची अगर कोणत्याही प्रकारें इजा देण्याची सोय नव्हती. अशा स्थितींत मी निजामअलीकडे जातों असें फांकडे आपण होऊन म्हणूं लागला तेव्हां बाळोबानीं त्यास जाऊं दिलें. पण फांकड्याचा कावा निराळाच होता ! तो चांभारगोंद्यापर्यंत जाऊन पूर्व संकेताप्रमाणें तेथें फौज गोळा करूं लागला. ती बातमी पुण्यास येतांच फांकड्याच्या पारिपत्याकरितां कोणास पाठवावें या विवंचनेंत बाळोबा व भाऊ पडले. कारण होळकर व हुजरातीचे पथके पूर्वींच बिथरलेले असल्यामुळें त्यांस पाठवावें तर ते फांकड्यासच मिळण्याचा संभव

होता. मशीरावर मात्र त्यांचा विश्वास असल्यामुळें त्यानीं त्याचीच फौज फांकड्यावर पाठविली. मशीरसुद्धां नानाच्याच मसलतींत मिळाला होता हें त्यांस शेवटपर्यंत कळलें नाहीं ! मशीराची मोगलाई फौज पाठीवर आली असें पहातांच मानाजी फांकडे लांब लांब मजली करीत इंदापुर व बारामती या मार्गानें वांईस आला. पुण्यांत हुजरातीचा फितूर ज्या दिवशीं उघकीस आला व धरपकड सुरू झाली त्याच दिवशीं मालोजी घोरपडे व नीळकंठराव परभू मारामार करीत वांईकडे निघून गेलेच होते. त्यांची व फांकड्याची गांठ पडल्यावर नानाकडून पैका आणून त्यानीं सात आठ हजार फौज गोळा केली. या नव्या फौजेंत नानांच्या तर्फेनें बजाबा शिराळेकर हा मुख्य अंमलदार नेमला गेला होता.

त्यावर्षीं दसऱ्याच्या मिरवणुकीचा समारंभ फार मोठा झाला. दसऱ्याच्या दिवशीं परशुरामभाऊंस देण्याकरितां पांढरा पोषाख काढलेला होता. परंतु चिमाजीआपास तें पसंत पडलें नाहीं. इतरांप्रमाणें भाऊंसही रंगाचा पोषाख द्यावयाचा असें ते म्हणूं लागले. तेव्हां पोतनिशीकडील कारकुनानें सांगितलें कीं, परशुरामभाऊंची स्त्री वारल्यापासून रंगाचें कापड वापरावयाचें त्यानीं सोडून दिलें आहे. त्यांस रंगी पोषाख कसा देतां येईल ? हें उत्तर ऐकून भडक रंगाचा पोषाख न देतां श्रीमंतानीं भाऊंस त्या दिवशीं " पांढरा बराणपुरी पोषाक भरमी काम वर केलेला व ताडतोडीचा झगा व किनखाब " अशीं वस्त्रें दिलीं. शिवाय घोडा एक व निळी घोडी एक दिली. त्याच दिवशीं श्रीमंतानीं त्यांच्या दिमतीस आणखी दोन पागा नेमून दिल्या व अनुक्रमें मिरज व कुरुंदवाड येथील घराण्यांतले सरदार विठ्ठलराव पांडुरंग व त्र्यंबकराव रघुनाथ यांस पालख्या दिल्या. दसऱ्याची स्वारी निघाली तेव्हां श्रीमंतांच्या अंबारींत आपा बळवंत व हरीपंत बाबा पटवर्धन हे पाठीमागें बसले होते. श्रीमंतांच्या अंबारीमागें परशुरामभाऊ व त्यामागें अन्याबा मेहेंदळे यांच्या अंबाऱ्या होत्या. एकंदर मिरवणुकींत पंधरा अंबाऱ्या असून "जरी पटका, माहीमरातब, नालकी,

दोन चौघडे, पागा, फौज, समेत मोठ्या समारंभानें स्वारी निघाली. शमीपूजन जाहलें तेथेंच होळकरानीं व शिंद्यानीं नजराणा केला. सरबत्ती दोहींकडील बेमोताद जाहली. " आपलें हें सर्व वैभव पंधरा वीस दिवसांतच नष्ट होणार आहे हें त्यावेळीं चिमाजीआपा, परशुरामभाऊ, व बाळोबातात्या यांच्या स्वप्नांतसुद्धां आलें नसेल !

बाळोबातात्या व परशुरामभाऊ यांस नानाच्या कारस्थानानीं बाहेरून घेरलें होतें, आणि आंतून सुद्धां ते आपोआपच दुर्बळ होत चालले होते ! परशुरामभाऊंच्या सान्या उड्या फौजेच्या बळावर होत्या. पण त्या फौजेस नाना पुण्यांतून गेल्या दिवसापासून सरकारांतून एक पैसाही मिळाला नव्हता. त्यामुळें हुजरात वगैरे फौजेंतले लोक भाऊंवर कसे बिथरले होते हें मागें सांगितलेंच आहे. बाबा फडक्यांस भाऊनीं पुण्यांतून काढून चाकणेस पाठविलें तरी हुजरातीचा दंगा शांत झाला नव्हता. होळकराचें लक्ष नानाकडे होतें ही गोष्ट प्रसिद्धच होती. मशीर तर बोलून चालून परका. येऊन जाऊन शिंद्यांच्या म्हणजे बाळोबातात्यांच्या फौजेवर भिस्त. पण ती फौज तरी आतां बाळोबाच्या कह्यांत कोठें होती ? दौलतरावास डोईजड होऊन आजपर्यंत त्यानें वाटेल तसें फौजेच्या व पलटणांच्या बळावर केलें. शिंद्यांवर त्याचा वचक असल्यामुळें त्यानीं उघडपणें त्याशीं विरुद्ध वर्तन केलें नाहीं. परंतु शिंद्यांच्या फौजेंतले लोक बाळोबाकडून पैका मिळेल म्हणून वाट पहातां पहातां आतां कंटाळले होते. चार पांच महिन्यांपूर्वी नबाबावर स्वारी करण्याची मसलत घाटत होती तेव्हां शिंद्यानीं हिंदुस्थानांतून पलटणांचा आणखी एक कंपू दक्षिणेंत बोलाविला होता तो आतां पुण्याजवळ येऊन पोंचला होता. त्या कंपूवर डू प्रॅट नांवाचा फ्रेंच अंमलदार होता त्याची हुकमत दक्षिणेंत आतां शिंद्यांचीं जेवढीं पलटणें होतीं तितक्या सर्वांवर चालावयाची होती. अर्थात् तो अंमलदार बाळोबातात्यांस न जुमानणारा व फक्त शिंद्यांचा हुकूम मानणारा होता.

दसरा झाल्याबरोबर नबाब निजामअलीनीं नानांच्या प्रेरणेवरून फौजेचें कूच करविलें. ती फौज मोंगलाई सरहद्दीवर जागो-

जाग येऊन राहिली, व तिजपैकीं एक टोळी घेऊन इसामिय्या नांवाचा सरदार पुण्याकडे येऊं लागला. नागपूरकर रघोजी भोंसले नागपूर सोडून वऱ्हाडांत आले. शिंद्यांच्या पलटणांवर बाळोबातात्याचें वर्चस्व होतें तें नवीन कंपू आल्यामुळें नाहींसें झालें. होळकर व हुजरात व इतर सरदार नानांच्या हुकुमाप्रमाणें वागण्यास तयार. झाले. मशीरुल्‌मुलुक तर नानाचाच हस्तक होता. पुण्यावर चालून येण्याकरितां वांईस मानाजी फांकडे आतुर झाले होते. येऊन जाऊन भाऊंची स्वतःची तीन चार हजार फौज व शेणवी कारभाऱ्यांची काय पांच चार हजार फौज असेल ती मात्र नानाच्या विरुद्ध लढणारी होती. पण तेवढ्या फौजेनें नानांच्या मसलतीस धक्का बसण्याचा कांहींच संभव नव्हता.

याप्रमाणें नानांचं राजकारण रंगास आल्यावर ता० २६ अक्टोबर रोजीं रात्रीस दौलतराव शिंद्यानीं बाळोबातात्या व सदाशिव मल्हार व धोंडो रामचंद्र या त्रिवर्ग कारभाऱ्यांस कैद केलें. अरुणोदय होतांच मशीरुल्‌मुलुक व होळकर आपापल्या फौजा तयार करून शनवारच्या वाड्यावर चालून आले. बाबा फडक्यांचे खासगी कारभारी परशुरामपंत वैद्य म्हणून होते त्यांस मशीराच्या गोटांतून नारोपंत चक्रदेव याची चिट्टी गेली होती कीं, आपण उजाडण्यापूर्वींच परशुरामभाऊ पटवर्धन यांस धरण्याकरितां येत आहों. ती चिट्टी +परशुरामपंत वैद्य यांच्या हातीं न जातां जासुदाच्या गफलतीमुळें परशुरामभाऊ पटवर्धन यांच्या हातीं गेली! भाऊनीं तत्काळ सावध होऊन कुचाचा नगारा केला व वेळेवर हजार पांचशें स्वार गोळा झाले तेवढेच बरोबर घेऊन ते शनवारच्या वाड्यांत गेले व तेथून चिमाजीआपास काढून आपल्या घोड्यावर पुढें घेऊन निघाले. तों हुजरात

---

+ हे अंजनवेल जि० रत्नागिरी येथील राहणारे होते. त्यांचे पुत्र भाऊ महाजन अंजनवेलीस फार वृद्ध होऊन वारले. अगदीं लहानपणीं आम्ही भाऊ महाजन यांस पाहिलेलें आहे व त्यांच्या तोंडच्या बाजीरावीतल्या गोष्टी ऐकिलेल्या आहेत.

व होळकर व मशीर यांची फौज वर सांगितल्याप्रमाणें येऊन पोंचली. तेव्हां मिरजेकडे जाऊं लागलों असतां परिणाम लागणार नाहीं असें समजून परशुरामभाऊ जुन्नराकडे पळून गेले. त्या ठिकाणीं ते जाऊन पोंचतात तों पाठलागास आलेल्या फौजा तेथेंही येऊन दाखल झाल्या. मग चिमाजीआपांस किल्ल्यावर ठेवून पांचसातशें स्वारांनिशीं परशुरामभाऊ माचीस राहिले व प्रतिपक्षाशीं त्यांचीं तडजोडीचीं बोलणीं सुरू झालीं. त्यांस किल्ल्यावर कैदेंत ठेवावें असा सर्व सरदारांचा अभिप्राय पडला तेव्हां माधवराव रास्ते यानीं त्यांस आपणाकडे मागून घेऊन आपल्या ताब्यांत असलेल्या मांडवगणाच्या किल्ल्या-वर कैदेंत ठेवलें. चिमाजीआपा जुन्नरच्या किल्ल्यावर होते ते तूर्त तेथेंच राहिले.

परशुरामभाऊंच्या पाठलागास फौज गेली असतां इकडे मशी-रानें त्यांचा गोट कात्रजेवर होता तो लुटून फस्त केला व पुणें शह-राची नाकेबंदी करून जागोजाग चौक्या ठेवून बंदोबस्त केला.

शिंद्यानीं बाळोबा वगैरे कारभाऱ्यांस कैद केलें त्याच वेळीं बाजीरावसाहेबांस जांबगांवाहून परत आणण्याविषयीं सर्जेराव घाटग्यास पत्र लिहिलें, आणि त्याच वेळीं नानांसही पत्र लिहिलें कीं, तुमचें आमचें अकृत्रिम सख्य असतां आमच्या कारभाऱ्यानीं वांकडी नजर धरून भलभलत्या गोष्टी केल्या; सबब त्या कारभाऱ्यांस कैद करून आम्ही तुम्हांस हें पत्र लिहित आहों. तुम्ही कांहींएक संशय न बाळगतां सत्वर पुण्यास येऊन राज्यकारभार पूर्वीप्रमाणें हातीं घ्यावा व पेशवा-ईच्या गादीवर बाजीरावसाहेबांची स्थापना करावी.

वर सांगितल्याप्रमाणें शिंद्यांचें पत्र व पुण्यास घडलेल्या गोष्टींच्या बातम्या नाना फडनवीस यांस पोचतांच ते महाडाहून निघून मेणव-लीस आले. तेथें थोडे दिवस राहून ते सासवडास आले. तों भोसले व इसामिय्या यांच्या फौजा पुण्याजवळ येऊन पोचल्या. नंतर नानाही सासवडाहून निघून पुण्यास आले व आपल्याच बागेंत मुक्काम करून राहिले.

नं. ३७४१. ( फाल्गुन. व ८–१ एप्रिल. )

नारायणराव गंगाधर यांचें बाळासाहेबांस पत्र १२ रमजानचें—

" होळकर यांचे भेटीस श्रीमंत बाजीरावसाहेब व चिमाजी-आपासाहेब गेले होते. श्रीमंत बाजीवसाहेबांस ( झगा ? ) हिरवा बऱ्हाणपुरी बुट्टेदार आसवली किनारा व पकडी पट्ट्यांस ( ? ) येणें-प्रमाणें व महमुद्या व किनखाप व कंठी मोत्यांची व शिरपेंच येणेंप्रमाणें दिलें. श्रीमंत राजश्री चिमाजीआपांस गुल अनारी रंगाचा जैनाबादी पोषाक व महमुद्या व किनखाप व कंठी शिरपेंच येणेंप्रमाणें दिलें. उपरांतिक विडे गुलाब अत्तर देऊन एक हत्ती व दोन घोडीं नजर श्रीमंतांस केलीं. उपरांतीक स्वारी निघून दोन घटका रात्रीस डेऱ्यास आली. भेटीचे समयीं तुकोजी होळकर याणीं श्रीमंतांस विनंती केली जे, ' राहुटी वेगळी दिली आहे; तेथें ब्राह्मणांकडून पाणी वगैरे फराळाचें सामान केलें आहे. कृपा करून यावें. ' म्हणोन विनंती केली. त्यावरून श्रीमंतानीं राजश्री बाबा फडके व गोविंदराव पिंगळे यांस विचारून त्यांस उत्तर केलें जे, ' फराळाचें कारण काय ? अस्तमानाचा समय जाहला. त्यावरून ती मसलत राहिली. तुकोजी होळकर बहुत जैफ जाले. शरीरांत ताकद नाहीं. तुकोजी होळकर याणीं आपले डेरेपुढें महतापीचा मंडप उभा केला होता त्यांतच बैठक जाहली. मल्हारजी होळकर याणीं सर्वांस आपले हस्तेंकरून विडे अत्तरगुलाब तुरे व गजरे दिले. "

नं. ३७४२. ( चैत्र व॰ १–२ एप्रिल. )

बाबाजी विश्वनाथ चांफेकर यांचें बाळासाहेबांस पत्र २२ सवालचें—

" छ० २० सवालीं श्रीमंतानीं झाडून कारखान्याचे हत्ती डेऱ्याजवळ आणून पाहिले. मन्याबा बापू भोंसले यांस पुत्र जाहला म्हणोन भोंसले यांजकडील वकील येथें आहेत त्याणीं हत्तीवरून साखर वांटली. ती॥ भाऊसाहेबांचे डेऱ्यास साखर घेऊन आले होते त्यांस वस्त्रें दिलीं. अद्यापि साखर वांटीत आहेत. मानाजी शिंदे व

केसो कृष्ण वगैरे पहिले मंडळीस श्रीमंतानीं फौज ठेवावयास सांगितलें म्हणोन वर्तमान आहे. शिंदे यांचे डेऱ्यास श्रीमंत जाणार आहेत. बोलणें अद्यापि शेवटास गेलें नाहीं. वडिलीं परवांचे दिवशीं कहींबराबर पांचशें स्वार पाठवावे म्हणून आज्ञा केली, त्याजवरून पांचशें स्वार पाठविले होते. कहींस तीन दिवस लागले. तळेगांवचे पुढें बोरघाटाचे नजीक गेले होते. "

नं ३७४३. ( फाल्गु० व० १०—३ एप्रिल )

गणेश गोविंद यांजकडून बाळासाहेबांस पत्र— ( पै॥+ २४ रमजान. सन सीत तिसैन. )

बाजारी वर्तमान ऐकींव—

" शिंदे यांचें बोलणें असें पडलें आहे कीं, रा॥ नानास आमचे स्वाधीन करावें, नाहींतर जेथें नाना असतील तेथें जाऊन आम्हीं आणूं. नबाबाकडील ऐवज व मुलूख आम्हीं काबीज करितों. आपण राज्य करून स्वस्थ असावें. होळकर समर्थांस यावयास अनमान करीत होते त्यांजकडे बाजीरावसाहेबानीं जाऊन त्यांची समजाविशी केली. शिंद्यांचें बोलणें भारी पडलें आहे. समेटांत येत नाहीं. "

नं. ३७४४. श्रीगणराज. ( फाल्गु० व० १०—३ एप्रिल. )

पुरवणी. अपत्यें शिरसा॥ नमस्कार. विज्ञापना. छ० २० रमजानीं राजश्री चिंतोपंत लिमये यांस वडिलानीं साताऱ्यास पाठविलें व रा॥ बाबा फडणीस यांस तासगांवास जलद पाठविलें. कोणते कारणाकरितां पाठविलें हें समजण्यांत आलें नाहीं. तेथें फडणीस आलेच असतील. सविस्तर कळेल. शिंदे यांजकडील कारभारी काल वडिलांचे डेऱ्यास आले होते. बोलणीं जालीं, परंतु सुद्रामत भाषण अद्यापि

---

+ पत्रावरील तारीख व मिति पैवस्तीची आहे.

१ नारायण व गंगाधर यांचें बाळासाहेबांस पत्र. यावर इंग्रजी तारीख व मिति पैवस्तीची.

नाहीं. सरकारांतून ताकीद होत असतां कही करितात ! काल पुण्यासच कही गेली होती. राजश्री नानानीं नवी पेठ केली त्यांत वैरण होती ती भरली. सरकारच्या पागा येथून ताकिदीस गेल्या. नंतर विठलवाडीकडील व कात्रजेकडील कही भरून कडबा आणिला. नानांचा कडबा त्यांचे बागेंत होता तो भरून आणिला. परवां थेउरावर कही केली. तेथें ब्राह्मणांची बेअब्रू जाली. एक ब्राह्मण मेला. कहीचा उपसर्ग तर बहुतच होतो. गरोदर बायको प्रसूत होऊन तीन चार दिवस जाले होते, बाहेर ओढून काढिली ! असा अनर्थ जाला. कही आठ दहा हजार जाते. उंटें बहुतच आहेत. त्यांच्या फौजेबरोबर सरकारच्या फौजेंतीलही कही जात्ये. वरचेवर सरकारांतून शिंदे यांस ताकीद कही करूं नये येविशींची होत्ये. परंतु त्यांचें म्हणणें जे, ' आम्हांस खर्चास नाहीं. आम्हांस कडबा मिळत नाहीं. खरेदी करून पुरवत नाहीं. खर्चाची ओढ ! ' काल नानाची पेठ झाबडली.

पै॥ छ० २४ रमजान.

नं. ३७४५. श्रीगणपति. ( फाल्गु० व० ११–४ एप्रिल. )

पै॥ छ०२७ रमजान. सीत तिसैन. फाल्गुन मास. बुधवार. आवशीची तास १ रात्र.

चिरंजीव राजश्री बळवंतराव व रामचंद्रपंत आपा यांसीं आशीर्वाद उपरी. छ० २३ रोज मंदवारीं श्रीमंतांच्या स्वारीचें कूच जाहलें. थेऊरच्या मुक्कामास आले. शिंदे खराडीजवळ आहेत ते आज या मुक्कामीं येणार. होळकर पुण्याजवळ पहिले मकाणींच आहेत तेही स्वारीबरोबर येतात असा बेत दिसतो. आम्हीं मंदवारीं मजलीस येतां येतां शिंदे यांच्या डेऱ्यास गेलों होतों. आगतस्वागत बोलणीं बहुत जाहलीं त्यांतील रंग पाहतां मजा नाहीं. कारभारी यांजविशीं फार आग्रह आहे. श्रीमंतांचीं बोलणीं याजविशीं बरींच पड-

१ पत्र परशुरामभाऊंचें.

तात. कसकसें ठरतें पहावें. शिंदे याणीं आम्हांस वस्त्रें व कंठी व शिरपेंच दिला. कळावें. थेऊराहून पुढें कूच होण्याचा मनसबा होत आहे. ठरेल तसें लिहून पाठवूं. रवाना छ० २५ रमजान. बहुत काय लिहिणें लोभ कीजे हे आशीर्वाद.

नं. ३७४६. श्रीगणराज. ( फाल्गु० व० १२—५ एप्रिल. )

चिरंजीव राजश्री नारायणराव यांसीं प्रती गंगाधरराव गोविंद. आशीर्वाद उपरी. येथील कुशल ता छ० २६ रमजान जाणोन स्वकीय लिहीत जावें. विशेष. श्रीमंतांचा मुक्काम थेऊरास आल्याचें तीर्थस्वरूप राजश्री भाऊसाहेब यानीं लिहिलें त्यावरून कळलें. येथून कापड व ऐवज राा गोविंद शामराव यांजकडे रवाना केलें आहे त्यास सालपे घाटानें.........बोरघाटाचे ( ? ) सुमारें जाणेविशीं माानिल्हेस सांगितलें आहे. त्यास पन्नासपर्यंत स्वांर माानिल्हेकडे आडवे पाठवून द्यावें. खांबटकीचे घांटें रवाना केले असें काल सायंकाळीं लिहिलें आहे, त्यास वडिलांचें पत्र थेऊरावर लष्कर गेलें म्हणून पत्र आलेवरून आज सांडणीस्वाराबरोबर गोविंदराव यास सालपेचे घांटें जेजुरीवरून जावें असें लिहिलें आहे. तुम्ही वडिलांस विनंती करून पन्नास स्वांर आडवे पुलापावेतों पाठवून गोविंदराव यास पत्र लिहून संभाळून घेऊन त्यास नेवावें. बहुत काय लिहिणें हे आशीर्वाद.

नं. ३७४७. श्री. ( चैत्र शु० २—९ एप्रि० )

छ० ३० रमजान. सनसीत. विज्ञापना. राजश्री गंगाधरपंत सुभेदार यांचे आप्त बापूजीपंत जोशी नवलगुंदच्या मामलतीवर असतात. पुणेहून आले. नवलगुंदास जातात. मिरजेवरून गेले. भेटोन गेले नाहींत. येहुराहून माझ्या नांवाचें पत्र त्यानीं पाठविलें तेंच पाठविलें आहे. पुण्याकडील बातमी मोठी मोठी डाकचौकीची समजली म्हणजे त्याप्रमाणें लेहून देईन. जासूद आला आहे. हे विज्ञापना.

---

१ मिरजेंतल्या मिरजेंत दिवाण नारो बाबाजी दामले यांची बाळासाहेबांस चिठी.

नं. ३७४८. श्रीगणराज. ( चैत्र शु० २–७ एप्रि. )

विनंती उपरी. पत्र पाहिलें. राजश्री नाना सातारेस आहेत. श्रीमंतांचा मुक्काम थेउरानजीक आहे. परशुरामपंत भाऊ व शिंदे वगैरे फौजा एकत्रच आहेत. थेउराहून कूच करून सातारेस येणार. अमुक दिवशीं कूच होणार असें लिहिलें नाहीं. पत्रें नित्यानीं येतात. छ० २७ रमजान दोन प्रहरचीं पत्रें थेऊरचे मुक्कामाहून आलीं असें लिहावें. हे विनंती. छ० ३० रमजान.

नं. ३७४९. श्री. ( ७ एप्रिल. )

सेवेशीं धोंडो बापूजी जोशी. दोनी कर जोडून त्रिकाळ चरणांवर मस्तक ठेवून शिरसां॥ नमस्कार. विज्ञापना तागायत फाल्गुनच्या व॥ ३० सायंकाळपावेतों बालकाचें यथास्थित असे. विशेष. शिंदे यांजकडील कंपूची कही निराळी चाकणेवर गेली तेव्हां चाकणच्या किल्लेदारानें किल्ल्यावरून गोळ्या मारिल्या. मग कही पेठेची भरली नाहीं. दुसरेकडे भरून आली. दुसरे तिसरे दिवशीं तीन पलटणें व दहा तोफा कंपूंतील चाकणेस गेल्या. किल्ल्यावर दहावीस गोळे मारिले. तसे मग किल्लेदारानें आंतून गृहस्थ पलटणांमध्यें पाठविला कीं, सरकारचे किल्ल्यावर गोळे भारावयाचें कारण काय ? तो बोलला कीं, कही पेठेची भरून दिली नाहींत. किल्ल्यावरून तुम्हीं गोळ्या कशा मारिल्यात ? यास्तव किल्लेदारानें पारिपत्य करावयाचें. मग त्या गृहस्थानें रदबदली करून हजार रुपये देऊन पेठेची कही भरावयास सांगितली. वैरण मात्र न्यावी असें बोलोन गांवांत कही शिरली. वैरण, भांडें, वस्त्र वगैरे झाडून लुटिलें. बायकांची अबरू राहिली नाहीं. कांहीं जणींनीं जीव दिला. असें जालें. फिर्याद कोठें चालत नाहीं. कोणाचा जोडा कोणाचे पायांत नाहीं. श्रीमंत राजश्री नाना फौज सातान्यास ठेवीत आहेत. दहा हजार जमाव जाला असें वर्तमान

---

१ हें मागच्या नंबरच्या चिठीचें उत्तर. २ पत्र बाळासाहेबांस.

बोलतात. नदीचें पाणी अगदीं आटलें. संगमचें पाणी लोक आणितात. चिखलासारखें पाणी डबक्यामध्यें थोडेंसें आहे. दोनचार रोज होईल. बहुत काय लिहिणें सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

नं. ३७५०. श्रीगणराज. ( चैत्र शु० १–८ एप्रिल. )

पै॥ छ० ३ सवाल. सीत तिसैन. चैत्र. दोन प्रहर दिवस. मंगळवार.

अपत्यें रघुनाथरावानें कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना तागायत छ० २९ रमजान मु॥ थेऊर येथें वडिलांचे आशीर्वादेंकरून वर्तमान यथास्थित असे. विशेष. इकडील वर्तमान विदुरांची व लेखकाची स्वच्छता नाहीं यामुळें कोणता कारभार सिद्धीस जात नाहीं. साताऱ्यास जावें, तेव्हां शिंदे बरोबर असलेच पाहिजेत. शिंदे आले असतां लेखक स्थलांतर न करीत असें होऊन कूच व्हावें याविशीं नित्य वडिलांचीं वगैरे खलबतें चाललीं आहेत. वडिलांची व शिंद्यांची परस्पर स्वच्छता चांगली जाहली. वडिलांची स्वारी शिंद्यांचे डेऱ्यास गेली होती. लेखकाच्या सख्यास्तव वडीलही खटपट करितात. परंतु शिंद्यांकडील कारभाऱ्यांचें बोलणे पडतें जे, " लेखक कारभारांत इत:पर आले असतां आमचा परिणाम नाहीं. यास्तव त्याणीं कारभारांत येऊं नये. याशिवाय आपण जें म्हणाल तें मान्य करूं. " असा गर्गशा पडल्यामुळें कूच होत नाहीं. श्रीमंतांची मर्जी शिंद्यांचे ठायीं प्रसन्न. त्यांचा मनोदय राखोनच जें करणें तें करावें असा डौल दिसतो. मुक्काम पुण्याचे समीप जाहल्यामुळें कहीकवाडाची मर्यादा कांहीं राहिली नाहीं. तालुका मारला जातो ! अद्यापि दोनचार मुक्कामांची संभावना आहे. इतक्यांत काय होतें नकळे. पुण्यांतील लोक संशयाविष्ट आहेत. काय घडतें पहावें. पैट्टणापेक्षां प्रसंग दुर्घट दिसतो.......विदित होय हे विज्ञापना.

---

१ कुरुंदवाडकर. यांचें हें बाळासाहेबास पत्र. २ शिंद्यांची व नानांची. ३ श्रीरंगपट्टणापेक्षां.

नं. ३७५१. श्री. ( चैत्र शु० १--८ एप्रिल. )

पै॥ छ० ३ सवाल. सन सीत तिसैन. चैत्रमास.

सेवेसीं बळवंत लक्ष्मण. कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना तागायत छ० २९ रमजान. स्वामीचे कृपेंकरून वर्तमान यथास्थित असे. विशेष. इकडील वर्तमान—

१ श्रीमंतांचा मुक्काम थेऊरावर आहे. सातान्यास वस्त्रें घ्यावयासीं स्वारी लवकर जावी अशी योजना आहे, परंतु मोठे लढे पडले आहेत. मुख्य लेखकाचें व विदुराचें अंत:करण परस्पर शुद्ध नाहीं. तें जाहल्याविना गेल्यास सातान्यास लेखक रहाणार नाहींत. स्थलांतर करितील. मग फारच वाईट, याजकरितां येथेंच स्वच्छता होऊन पुढें कूच होणार. प्रस्तुत दोन तीन मुक्कामच होतीलसें वाटतें. कलम.

१ वस्त्रें घ्यावयाचा मुहूर्त चैत्र शुद्ध व वद्य पंचमी योजिली आहे. परंतु कोणता घडतो पहावें. शुद्ध पंचमी तर केवळ समीप राहिली, तेव्हां कसें होतें पहावें. कलम.

१ शिंद्याकडील कहींचा उपद्रव प्रांतास बहुत जाहला आहे. अघाडीस लष्करच्या चौकी पहारा ठेऊन बंदोबस्त नित्य होतो. परंतु शिंद्याकडील कही अनिवार जातच असती. काल पुण्यांत सरकारच्या गंजीजवळ दुसऱ्या गंजी होत्या त्या व भवानी पेठेंतील वैरण कहीनें आणिली; यामुळें पुण्यांतील लोक सांशंकित आहेत. बंदोबस्तही चाललाच आहे. कलम.

१ लेखकांचा व विदुराचा द्वेष उघड जाहला. लेखकांची जहागिरी गुंदस्तां नबाबानीं दरबारखर्चाचे ऐवजीं तीस हजारांची दिली ती वगैरे इनामगांव विदुरास लगत होते ते विदुरानीं जप्त केले. उघड विरोधांत बाकी राहिली नाहीं. कलम.

---

१ मुत्सद्दी नि॥ कुरुंदवाडकर. टपनांव लेले. त्यांचें हें बाळासाहेबांस पत्र. २ नानांचें व शिंद्यांचें. ३ खर्ड्याच्या स्वारीनंतर तह ठरला तेव्हां.

१ श्री॥ राजश्री भाऊसाहेब यांची व शिंद्यांची परस्पर स्वच्छता चांगली जाहली. बाळोबा पागे वगैरे कारभारी भाऊंच्या डेऱ्यास येतात. भाऊसाहेबही शिंद्यांचे डेऱ्यास गेले होते. परस्पर रहस्य चांगलें आहे. परंतु लेखकाविषयींचा मजकूर काढिला असतां 'तेवढी गोष्ट मात्र बोलों नये, लेखक कारभारांत इतःपर सर्वात्मना नसावे,' अशीं उत्तरें विदुराकडील कारभारी करितात यामुळें घोळ पडला आहे. काय होतें पहावें. कलम.

१ श्रीमंतांचा व शिंद्यांचा पूर्वसंकेत जाहला त्या समयीं शिंद्यांस कोटीवर दहावीस ( लाख ) पर्यंत द्रव्य, वीस पंचवीस (लाख) पर्यंत स्वदेशीं जहागीर, दोन किल्ले मातबर, द्यावे याप्रों बोलण्यांत आहे. त्याप्रमाणें प्राप्त जाहल्याविना ( वस्त्रें घेण्याची वगैरे ) कोणतीच गोष्ट घडत नाहीं. इतका पैका द्यावा हा विचार लेखकांवांचून होणें कळतच आहे ! लेखकांस आणावे तर विदुरांचा त्यांविशीं दुराग्रह. अशा अडचणी पडल्यामुळें कूच होत नाहीं. वैरणीचा मोठा तोटा. दुसरें पैट्टणच म्हणविलें आहे ! यांत श्री काय करितो पहावें. कलम.

येणेंप्रमाणें वर्तमान आहे. विशेष होईल तें मागाहून सेवेशीं लिहितों. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

नं. ३७५२. श्रीगजानन. ( चैत्र शु० २—९ एप्रिल. )

पै॥ छ० ३ सवाल. सन सीत तिसैन.

सेवसीं विज्ञापना—बाजारी वर्तमान—

१ शिंदे यांस ऐवज वगैरे सरकारांतून देणें त्याजपैकीं तूर्त पन्नास लक्ष रुपये द्यावे, वस्त्रें घ्यावीं.

१ ऐवज सरकारांत नाहीं त्याजपक्षीं मला ऐवज जिकडे मिळेल तिकडून घेईन; परंतु आज्ञा द्यावी.

१ जुन्नरच्या मुक्कामीं. २ श्रीरंगपट्टणच्या स्वारींत वैरणीचा दुष्काळ पडला होता, तशी स्थिति. ३ बाळाजी गणेश जोशी याचें बाळासाहेबांस पत्र.

१ तिसरा जाबसाल मला स्वामींची दिवाणगिरीच सांगावी. मला कळेल त्या रीतीनें दौलतीचा बंदोबस्त करितों. धण्यानीं फिकीर करूं नये !

१ चौथा जाबसाल. आमची विल्हे पडल्याशिवाय स्वामींनीं सातान्यास जाऊं नये. वस्त्रें घेऊं नये. आम्ही कूच करूं देणार नाहीं.

१ श्रीमंतांचें मानस कैसें तरी गोष्टी बोलून सप्तऋषींस जाऊन वस्त्रें घेऊन मग कळेल त्या रीतीनें जाबसाल सांगितल्यास चिंता नाहीं. काय मनसबा आहे, कैसा साधतो, पहावा ! शिंदे यांचे भरीं पडले.

१ सप्तऋषीस गृहस्थ गेले आहेत त्याणीं दहा बारा हजार फौज जमा केली. सात आठशें मनुष्य आपलें किल्यावर घातलें हें ऐकण्यांत तेथें असेलच.

१ येऊरच्या मुक्कामास आल्यातागायत वडिलांस एक अर्धी घटका अवकाश नाहीं. खलबताखालीं पुरे केलें ! रात्रौ अठरा वीस घटकांनंतर निद्रा ! व दिवसास निद्रा नाहीं. ऐसा प्रकार आहे.

१ महाराजांचें वस्त्रास जाणें तर सडे जावें, फौज नेऊं नये, हें घाटत आहे. परंतु शिंदे होळकर सडे येत नाहींत ऐसें म्हणतात.

सेवेशीं विदित होय हे विज्ञापना. छ० ३० रमजान मंदवासर.

नं. ३७५३. श्रीगजानन. (चैत्र शु० २–९ एप्रिल.)

पै॥ छ० २ सवाल सन सीत तिसैन.

शिंदे[3] काल येऊन खलबत केलें. परंतु आवाज बाहेर फुटला नाहीं. उगाच धूर निघाला आहे. बितपशील—

१ लेखक समर्षीस गेले आहेत त्याणीं तेथें राहूं नये.

---

१ पहिल्या चार कलमांतलें म्हणणें शिंद्यांचें. २ बाजीराव यांचें. ३ कारकून बाळाजी गणेश जोशी यांचें बाळासाहेबांस पत्र. ४ सातान्यास.

१ खाशानीं जरारे होऊन समर्पीस जाऊन वस्त्रें घ्यावीं.

१ श्री॥ राजश्री अमृतरावसाहेब यांस सात लक्षांचा तालुका द्यावा व दोन किल्ले द्यावे हें एक. दुसरें मशार्रानिल्हेस येथें आणावे, कैलासवासी साहेबांचा दिवाणखाना त्यांस द्यावा, त्याणीं राजश्री बाबा फडके कारभार फौजेचा करितात हा करावा, हें एक वर्तमान.

१ शिंदे यांचें व सरकारचें बोलणें मिटलें हें एक वर्तमान.

---

ऐशी वार्ता आहे, विदित होय. हे विज्ञप्ति.

नं. ३७५४. ( १० एप्रिल. )

धोंडो बापूजी जोशी याचें बाळासाहेबांस पत्र चैत्र शु॥ २ चें—

" शिंद्यानीं पर्वतीची कही करून चिंधीचोळा केला. व चाकणेचा मजकूर पेशजी लिहिलाच आहे. खासगीवाले मजमदार व उदमी धरून नेल्याचा मजकूर पेशजी पत्रीं लिहिला आहे. परंतु काल मागती कही आली. भवानी पेठेंतील वैरणी नेल्या. यजमानांजवळ बोभाट बहुत गेला परंतु बंदोबस्त होत नाहीं. शिंदे यांची कही मना होत नाहीं. पुण्यांतील वैरण झाडून घरांतून लोकानीं गुरांसाठीं भरून ठेविली आहे ती भरून नेणार. घरांतून .कही शिरली म्हणजे मग बाकीची स्थित राहतां दिसतच आहे! कही गांवांत शिरली म्हणजे गांवांतील सांदे व होळकर नजीक आहेतच! सर्व लुटलें जाईल. कागदपत्र येथें आहेत. चिंता वाटत्ये. शिवाय दाणा गल्ला बारवईचे तांब्रूळ भांडें वगैरे आहे. परंतु कागदांचीच काळजी मोटी आहे. यास्तव मांडणी स्वार पाठवून द्यावा म्हणजे त्याजबरोबर पाठवून देईन. सरकारचे फौजेंतील लोक उठोन सातान्याकडे जात आहेत. "

१ सडे. २ दादासाहेबाचा.

नं. ३७५५. श्रीगजानन.( चैत्र शु० ३–१० एप्रिल. )

पै॥ छ० ४ सवाल. सन सीत तिसैन. चैत्रमास

विज्ञापना. छ० १ सवाल बाजारी वार्ता—

१ छ० २९ रमजानीं शिंदे सरकारचे डेऱ्यास आले तेव्हां बोलणें जाहलें जे आमचा जाबसाल उलगडेस येत नाहीं त्यापक्षीं कूच करूं नये.

१ 'आपण सप्तर्षीस जाणार, परंतु तेथें गेलेवर वस्त्रें देण्याचा जिमा कोण करतो त्याणीं करावा, ( म्हणजे ) स्वारीबरोबर येतों.' असें शिंदे बोलले. परंतु जिमा कोणाचे हातून जाला नाहीं.

१ बोलेणें धराचें नाहीं असें लोक म्हणतात.

१ छ० ३० रमजानीं श्री॥ राजश्री रघुनाथराव दादा व विठलराव बापू व नारायणराव दादा यांस ( श्रीमंतानीं ) भोजनास बोलाविलें होतें.

१ छ० मजकुरीं श्री॥ राजश्री आपासाहेब याणीं बाबासाहेब यांस भोजनास बोलाविलें होतें.

१ चतुर्थीचा मुहूर्त राहिला. जाबसाल कठीण दिसत आहे.

येणेंप्रमाणें वर्तमान. सेवेशीं विदित होय. वैडील साहेबांचीं खलबतें होतात परंतु ठरावाचा जाबसाल नाहीं. आज रविवारीं नववा दिवस म्हणोन मुक्काम आहे. इंदुवारचें नकळे. रविवार प्रातःकाळ. हे विज्ञप्ति.

नं. ३७५६. श्री. ( १० एप्रिल. )

धोंडो बापूजी जोशी यांजकडून पुण्याहून मिरजेस बाळासाहेबांस पत्र. चैत्र शु० तृतीयेचें. पै॥ छ० ६ सवाल. सीत तिसैन.

" राजश्री गंगाधरपंत भानु सुभेदार सातान्यास आहेत त्यांचे

१ कारकून बाळाजी गणेश जोशी याचें बाळासाहेबांस पत्र. २ बाजीरावसाहेबांचें बोलणें. ३ परशुरामभाऊंचे द्वितीय पुत्र हरिपंत. ४ बाजीरावांनीं पेशवाईचीं वस्त्रें घेण्याचा. ५ बाजीरावाचीं व शिंद्यांचीं.

चिरंजीव राजश्री रामकृष्णराव[1] वाईस आहेत पर्वती व भवानीपेठेंतील गवतें शिंद्यांच्या कहीनें नेल्याचा मजकूर पेशजी लिहिला आहे. त्यास आज दोन दिवस शिंदे यांजकडील पागा शहरचे चौकीस आल्या. रायाजी पाटील यांजकडील पागा आल्या. दोन रोज कही गांवांत येत नाहीं. शिंदे यांचा व नानांचा तह सत्वर टरावा, दीड कोट रुपये शिंदे यांजला सरकारांतून यावे. शिंद्यांच्या लष्करांत फितूर ज्या गृहस्थानीं नानाचे मार्फतीनें केला त्यांची मग शिंदे याणीं बोलों नये, असें ठरत आहे; अशी आजच बाजार आवई ऐकिली. श्रीमंत सत्वर साताऱ्यास जात नाहींत. शिंदे यांचा हरएक बंदोबस्त होऊन नानांची आणि शिंदे यांची येखलासता[2] जाली म्हणजे जाणार असें बोलतात."

नं. ३७५७. श्रीगणराज. ( चैत्र शु० ४—११ एप्रिल. )

अपत्यें[3] नारायणानें दोनी कर जोडून शिरसा॥ नमस्कार. विज्ञापना तागायत छ० २ सवाल मुक्काम नजीक थेऊर येथें वडिलांचे आशीर्वादेंकरून सुखरूप असे. विशेष. वर्षप्रतिपदेस शिंदे सरकारचे डेऱ्यास आले होते ते दिवशीं आपला जाबसाल जाल्याशिवाय कूच करूं नये याप्रमाणें टराव करून गेले. आज दोन दिवस कही बंद जाली. सरकारच्या गोटाभंवत्या चौक्या आहेत व शिंदे याणींही आपले गोटाबाहेर चवक्या बसविल्या आहेत. कही जाऊं देत नाहींत. काल संध्याकाळीं मला व तीर्थस्वरूप राजश्री दादांस व बापूसाहेबांस श्रीमंतानीं भोजनास बोलाविलें होतें. सहा घटका रात्रीस सरकारच्या डेऱ्यास गेलों तोंपावेतों बाबा फडके व वडील श्रीमंतांशीं बोलत बसले होते. उपरांतीक श्रीमंत स्नानास उठले. वडील व फडके आपले डेऱ्यास गेले. श्रीमंत व राजश्री बाजीराव बर्वे अर्ध घटका बोलत होते. उपरांतीक स्नान होऊन संध्या करून देवावर फुलें घालोन भोजनास

---

१ रामकृष्ण गंगाधर भानु हे गंगाधरराव गोविंद पटवर्धन यांचे जांवई. २ मैत्री. ३ पत्र मिरजेस बाळासाहेबांस.

आले. भोजन जालें. उपरांतीक निजावयाचे राहुटींत बैठक जाली. श्रीमंतानीं सातारेकर महाराज यांस व राजश्री नानास स्वदस्तुरें पत्र लिहून लखोटा करून नानाकडील खिजमतगार आले होते त्यांस रुबरू आणविलें आणि पुसलें, 'तुम्हीं जेवलां कीं नाहीं ?' त्याणीं विनंती केली, 'जेवलों.' त्याजवरून लखोटा त्यांचे हवालीं केला आणि रवाना केले. दादांस पुसलें, तुमचें अक्षर कसें? दादानीं विनंती केली, आम्हीं शिलेदार लोक, सामान्य अक्षर. मग दादांस पुसलें, या उभयतांचीं अक्षरें कशीं आहेत ? दादानीं उत्तर केलें, सामान्य आहेत. उपरांतीक निरोप घेऊन गोटास आलों. सेवेशीं विदित होय हे विज्ञापना.

नं. ३७५८. **श्रीगजानन.** ( चैत्र शु० ५-१२ एप्रिल. )

पै॥ छ० ६ सवाल. सन सीत तिसैन. चैत्र.

विज्ञापना[1] तागायत छ० ३ सवाल. बाजारी वर्तमान ऐकींव—

१ सप्तर्षीस[2] लेखक गेले आहेत त्यांचें पत्र श्रीमंतांस आलें कीं, शिंदे काय करितात ते करोत ! आपण कोणत्याही जाबसालाची त्वरा न करावी. त्याजवरून येथेंच मुक्काम जाहले.

१ शिंदे डेन्यास आले दिवशीं उभयतां श्रीमंत सडे होऊन सप्तर्षीस जावे हा बेत होता. परंतु शिंद्यानीं वडिलांसी बोलून वडिलानीं आपले जिमा करून घेतला आहे कीं, उभयतां साहेबांस तुमचा जाबसाल उरके तोंपावेतों कोठें जाऊं देत नाहीं. ऐसा जिमा दिला आहे.

१ राजश्री कारभारी यांस आणोन गोष्ट तहांत आणोन देणें-घेणेंचा लढा उरकोन हिंदुस्थानांत जावें हा ( शिंद्यांचा ) मनसबा ठरत आहे.

---

१ कारकून बाळाजी गणेश जोशी याचें बाळासाहेबांस पत्र. २ साताऱ्यास नाना गेले.

१ खाशानीं स्वदस्तुरें दोन तीन बंद कागद लेखक यांस लिहून 'कैलासवासी साहेबांचे जागां तुम्ही' म्हणोन बहुत मायेचें पत्र गेलें आहे. डांकेवरून रोजबरोज पत्रें येतात.

१ वडील साहेब ( यांची ) अद्याप कलमजारी फौजेची व पायदळाची आहे. होळकर फारच जेर जाहले. श्रीइच्छा ! सरकारांतून कारकून समाचारास गेले होते. कठीण आहे.

१ राजश्री चिंतोपंत लिमये समर्थीस आणखी गेले. वरकड बाबा फडणिसानीं सांगितलें असेल.

१ छ० ३ सकाळीं शिंदे वगैरे सर्वांची मिळोन कही गेली. पाषाण उजवा टाकोन मावळांत गेली आहे. दहा पांच खेडीं उध्वस्त जाहलीं. लुटलीं गेलीं. श्रीइच्छा ! हें ठीक नाहीं म्हणतात. अपाय ( दिसतो. ) श्रुत होय हे विज्ञापि.

नं. ३७५९. ( चैत्र शु० ८–१५ एप्रिल. )

धोंडो बापूजी जोशी याचें बाळासाहेबांस पत्र– (पै॥[1] ६ सवाल.

" पुण्यांत कहींचे उपद्रवामुळें लोक फार जरारे जाहले. पाणी मुळा नदींचें नेतात. वांईस जाण्यास भाडें पंधरा वीस रुपये तट्टास, व डोलीस पस्तीस. राजापूर वगैरे कोकणांत डोलीस साठ रुपये, तट्टास पंचवीस तीस, असें जाहलें. भाडेकरी मिळतच नाहीं. पुणें फार गडबडलें. महर्गता फार. दाणा जोरी तीन पायली. हरभरे दोन पायली. कडबा एक एक दिवशीं दहा बारा रुपये शेंकडा, परंतु फार करून आठ सात, ऐसा प्रकार आहे. "

नं. ३७६०. श्री. (चैत्र शु० १०–१७ एप्रिल.)

यादी.[2] ———————————————— कलम.

१ बाळाजीपंत नाना यांसीं पत्र सरकारचें जावें आणि त्याणीं सरकारची फौज लाजिमा सरकारांत पाठवून द्यावा. मेणवलीस

१ पत्रावर घातलेली मिति व तारीख पैवस्तीची आहे. २ धेऊरच्या मुक्कामीं शिंद्यानीं बाजीरावसाहेबांकडून लिहून घेतलेली ही आणखी एक यादी.

स्नानसंध्येस कारभार सोडून जाऊन पोहोंचले म्हणजे नानांचें पत्र सरकारांत आणवावें. हें आठा दिवसाआंत घडावें.

१ सरकारचे सरदार कृष्णराव बळवंत व रास्ते व पागा व पथकें वगैरे खास पथक म॥निल्हेजवळ आहेत त्यांस सरकारचीं पत्रें द्यावीं कीं, कारभार म॥निल्हेकडून काढला. तुम्हीं हुजूर येणें म्हणोन पत्रें व हुजरे द्यावे.

१ महाराज छत्रपति यांसीं पत्र कीं, बाळाजी जनार्दन यांसीं स्नानसंध्येस जावयाकरितां निरोप द्यावा. कारभारसंबंधें ते कांहीं विनंती करितील ते मान्य होऊं नये. जे विनंती लिहिणें ती येथून आम्ही लिहीत जाऊं.

१ बाबूराव कृष्ण व हवालदार इतबारी सरकारचा जो कोणी किल्ले सातारा येथें असेल त्यास पत्र कीं, बाळाजी जनार्दन याणीं किल्ल्यावर नवे लोक चढविले असतील ते उतरोन कदीम भरणा इतबारी लोक असतील त्यांचा राखून किल्ले मजकूरचा व महाराजांकडील पूर्ववत्प्रमाणें सरकारलक्षानें बंदोबस्त यथास्थित राखणें. याउपर बाळाजी जनार्दन यांच्या इतल्यानें वर्तणूक न करणें.

१ किल्ले कोट वगैरे येथील तालुकदार व कमावीसदार यांसीं पत्रें कीं, बाळाजी जनार्दन याणीं कारभार करूं नये असें ठरलें असे. तर तुम्हीं म॥निल्हे यांचे लक्षानें वर्तणूक न करणें. सरकारलक्ष राखून किल्ले कोट वगैरे यांचा बंदोबस्त करणें म्हणोन पत्र.

१ " माधवराव साहेब कैलासवासी जाहले. मागें बाळाजी जनार्दन दौलतीचा कारभार करीत होते. त्यास हल्लीं त्यांजकडील कारभार महकूब केला असे. तर याउपर राजकारण शिलशिला वगैरे कोणताही म॥निल्हेसीं न राखावा. " म्हणोन पत्रें—

१ राजे कोल्हापूरकर.
२ इंग्रज कलकत्तेकर मुंबईकर.
१ नबाव निजामअलीखां.
१ टिपू.
१ रघोजी भोसले. सेनासाहेब सुभा.
१ गोविंदराव गायकवाड.
१ फिरंगी गोवेंकर.
१ प्रतिनिधि यांस सदरहू अन्वयें. व 'फौज तुमची बाळाजी जनार्दन यांजबराबर आहे ती हुजूर पाठवून देणें' ( म्हणोन पत्र. )

---

१

१ " आबाजी रघुनाथ मंडळीसुद्धां व राजाराम विठ्ठल तुम्हांजवळ आहेत ते राजश्री दौलतराव शिंदे यांजकडील कोणी पत्र घेऊन येईल त्याचे स्वाधीन करणें " म्हणोन बाळाजी जनार्दन यांचे नांवें पत्र.

नं. ३७६१. श्री. ( चैत्र शु० ११-१८ एप्रिल. )

यादी शिंदे याणीं कलमें लिहून दिलीं त्याचा मजकूर व मखलाशी ( त्यावर श्रीमंतांची ) जाली ते—

| ( शिंद्यांची विनंती. ) | ( श्रीमंतांची मखलाशी. ) |
| --- | --- |
| १ नानांनीं कारभारांत असों नये. टोक्यांस जाऊन रहावें. | १ मेणवलीस रहावें. त्यांस दगाफटका होऊं नये येविशीं (तुम्हीं) खातरजमा करावी. |
| २ नानानीं फंदफितूर केल्यास पारिपत्य करावें. | २ वाजवीच आहे. |

---

१ हा यादीचा गोषवारा असून पुढच्या नंबरास नक्कल छापिली आहे तींतलीं कलमें मात्र मूळ यादीवरून जशीच्या तशीं उतरलीं आहेत.

| | |
|---|---|
| ३ नानाचे आत्मिक कोणी ठेवूं नयेत. | ३ सरकार उपयोगीं असतील ते ठेवून घेऊं. |
| ४ आमचे यादीचे जाबसाल लवकर उलगडून द्यावे. | ४ यादी समजोन ( आम्हीं ) आठ दिवसांत फडशा करावा. |
| ५ साताऱ्याचीं वस्त्रें नानाचे विद्यमानें आणों नयेत. | ५ सरकारचा कारकून पाठ-वून आणवूं. |
| ६ नानापासून पैका घ्यावा. कर्ज सरकारचें फेडावें. | ६ विचारें विचारें केलें जाईल. |
| ७ किता. | ७ ———————— |

जाबसाल किता म्हणोन कलम लिहिलें आहे याजवर मख-लाशी नाहीं. याचा अर्थ श्रीमंत पळून जाणार असें ऐकितों येविशींची खातरजमा करावी ( असें शिंद्यांचें म्हणणें. )

नं. ३७६२. श्री. ( चैत्र शु॰ ११–१८ एप्रिल. )

नक्कल.

यादी. शिंद्यानीं यादीवर ' करार ' करून घेतलें. छ० ९ सवाल इंदुवासर. सु॥ सीत तिसैन मय्या व अल्लफ.

| कलम. | मखलासी. |
|---|---|
| १ नानानीं कारभार करूं नये. | १ कारभार करूं नये. |
| २ फंदफितूर करूं नये. केल्यास पारिपत्य करावें. | २ फंदफितूर करणार नाहींत. केल्यास पारिपत्य करूं. |
| ३ नानाचे आप्त असतील ते सरकारांत ठेवूं नयेत. त्यांचे हातें कामकाज घेऊं नये. | ३ सरकारकामाचे उपयोगीं असतील त्यांस ठेवून कामकाज घेऊं. त्यांज-विशीं तुम्हीं बोलूं नये. |

| | |
|---|---|
| | सरकारकामाचे उपयोगीं नसतील त्यांस तुम्हीं कामांत घ्या म्हटलें असतां घेणार नाहीं. |
| ४ ( नानानीं ) टोंक्यास गंगातीरीं रहावें. | ४ खातरजमा केली असतां कोठेंही राहोत. |
| ५ सावकारांचें त्यांचे कारकीर्दीचें कर्ज ( त्यानीं ) वारावें आम्हांसुद्धां. | ५ कर्ज देणें सरकारांतून. याचा विचार सरकारांतून करणें तो करूं. |
| ६ नानाजवळ फौज आहे ती आणवावी. | ६ तुमची फौज दूर जाहलियावर त्यांजकडील आणून घेऊं. |
| ७ वस्त्रें नानाचे विद्यमानें आणूं नयेत. आम्ही आपला एक व सरकारांतून भाऊ[1] अथवा बाबा यांतून येका जणानीं जाऊन आणावीं. | ७ सदरहूप्रमाणें होईल. |
| ८ कारभारी दुसरा करावा. | ८ चित्तास येईल तो केला जाईल. तुम्हीं त्याजविशीं बोलूं नये. |

नानास जामीन भाऊ व पांडुरंगराव बारामतीकर जाहले. शिंद्यानीं अतःपर त्यांचा द्वेष करूं नये असा जामीन द्यावा असें बोलणें मात्र आहे.

नं. ३७६३. **श्रीगणपति** ( चैत्र शु० ११–१८ एप्रिल. )

चि॥ राजश्री बळवंतराव यांसीं आशीर्वाद उपरी आपण छ० ५ सवालचें पत्र पाठविलें तें छ० ७ मिनहूस पावलें. ' स्वारी

---

१ परशुरामभाऊ अगर बाबा फडके.

सातान्यास कधीं येणार ? नबाबाकडील जमीयत कलबर्ग्याजवळ आली अशी आवई आहे, त्यास सरकारांत काय बातमी आहे, हें ल्याहावें ' म्हणोन लिहिलें तें कळलें. ऐशियास स्वारीचा मुक्काम थेऊराजवळ आहे. येथून कूच लौकर होतां दिसत नाहीं. कारण बहुतेक खलष[1] आहेत यांचें मुद्देहाशील[2] जालें पाहिजे, याबाबें बोलणीं चालली आहेत. काय शेवट होतो पहावें. नबाबाकडील जमीयतीचा मजकूर पेशजी शिंदे यांचें राजकारण जुन्नरस्थांशीं लागलें, आंतून सिद्ध जालें, हें नबाबाकडून अवल लिहिलें आलें. त्याजवरून नबाबास लिहिलें गेलें कीं, जमीयत सरंजामाची तरतूद असावी. तेव्हां त्याणीं पंधरा हजार फौजेची व पंधरा पलटणांची तयारी करविली. पलटणांत मुसा रेमू म्हणोन फरांशिसी सरदार मुखत्यार आहे त्यास नबाबानीं तोफखान्याचा कुलअखत्यार दिला आहे. फौजेंतील[3] सरदाराचें नांव समजण्यांत आलें नाहीं. कांहीं जमीयत बेदराजवळ आली, कांहीं भागानगरापासोन दोन चार कोसांवर पोहोंचली, कांहीं निघत आहे, ऐशी बातमी आली. आजपावेतों कलबर्ग्यासही आली असेल. येथील प्रसंग एका तऱ्हेचा. कसा वक्त पडतो कळत नाहीं. यामुळें नबाबांस तयारीविशीं इशारा जाला. कदाचित् येथील प्रसंग मिटल्यास शिंदे नबाबावर गालेब[4] आहेत हें नबाबांस पुरतें समजलें आहे. समयास तरतूद होणार नाहीं व फुरसत पडों देणार नाहींत हें समजोन नबाबानीं इकडे अनुकूलता दाखवून पुढें आपले बेतावर नजर दिली आहे. नबाबाची प्रकृत ताळ्यावर नव्हती, आतां बरी आहे, याप्रमाणें लिहिलें येतें हें पत्र चि॥ राजश्री रामचंद्रपंत आपा यांस दाखवून आणवावें. रवाना छ० ९ सवाल. बहुत काय लिहिणें लोभ असों दीजे हे आशीर्वाद.

पै॥ छ० ११ सवाल बुधवार. सीत तिसैन. सतरा घटका रात्र. चैत्रमास.

---

१ संशय. २ निकाल. ३ घोडेस्वारांच्या फौजेंतील. ४ शिरजोर.

नं. ३७६४. श्रीगणपति. ( चैत्र शु० ११-१८ एप्रिल. )

चिं॥ राजश्री बळवंतराव व रामचंद्रपंतआपा यांसीं आशीर्वाद उपरी. काल छ० ८ सवाल रविवारीं दोन प्रहर दिवसास शिंदे कारभारियांसहवर्तन सरकारच्या कचेरीच्या डेऱ्यांत येऊन बसले. समागमें फौज व पलटणें आणिलीं होतीं. श्रीमंतानीं शिंदे यांस आंतील बैठकेंत बोलाविलें परंतु ते आले नाहींत मध्यस्थद्वारा बोलणीं चाललीं होतीं कोणताही जाबसाल ठरावांत येईना. हिरोजीराव पाटणकर–आपाजीराव पाटणकर यांचे पुत्र–व मालोजी घोरपडे मुधोळकर व मानाजी फांकडे व बाजीराव बर्वे दहा पांच वेळां ( श्रीमंतांकडून शिंद्यांसी ) बोलावयास गेले. दोन तीन वेळां आम्हांस पाठविलें. त्यांची बोलणीं बहुत प्रकारचीं कडेविकडीचीं जाहलीं. शेवट ठरावांत आलें कीं, राजश्री नाना यांणीं कारभारांत नसावें; व आणखी जाबसाल ( शिंद्यांचे ) आहेत ते ( श्रीमंतानीं ) उलगडून द्यावे; याप्रमाणें शिंदे यांजकडील कारभारी यांणीं याद लिहून त्याजवर श्रीमंतानीं लिहून दिलें. मग दरम्यान द्यावा असें त्याचें बोलणें पडलें. त्याजवरून आठ रोजांत लिहिल्याप्रमाणें फडशा करून देऊं म्हणोन सरकारांतून आम्हांस दरम्यान दिलें. नानानीं टोक्यांस रहावें येविषयीं शिंदे यांचा आग्रह बहुत होता. निदान मेणवलीस रहावें. कारभारांत असूं नये. यास जामीन द्यावा असें ठरोन छ० ९ रोज सोमवारीं सकाळच्या चार घटका दिवसास उठोन गेले. जाते समयीं श्रीमंतांचा मुजरा होऊन विडे घेऊन गेले. कंपू तुळापुराजवळ होता तो काल कवडीस येऊन उतरला. रवाना छ० ९ सवाल. अलाहिदा बोलण्याचीं उत्तरें व प्रत्युत्तरें जालीं त्यांची अखबार पाठविली आहे त्याजवरून समजेल. रवाना छ० मजकूर. बहुत काय लिहिणें हे आशीर्वाद.

पा॥ छ० ११ सवाल. सन सीत तिसैन. चैत्र. सतरा घटका रात्र.

---

१ पत्र परशुरामभाऊंचें. २ जामीन. ३ याच प्रसंगीं नानास खुद्द परशुरामभाऊ व पांडुरंगराव बारामतीकर राहिले.

नं. ३७६५ श्रीगणराज. ( चैत्र शु० ११-१८ एप्रिल.)

+अपत्यें नारायणानें दोनी कर जोडून शिरसा॥ नमस्कार. विज्ञापना तागायत छ० ९ सवाल इंदुवार दोनप्रहर दिवस मुक्काम थेऊर येथें वडिलांचे आशीर्वादेंकरून सुखरूप असों विशेष. काल रविवारीं श्रीमंत राजश्री चिमाजी आपांचा वाढवीस, बारा वर्षे होऊन तेरावें वर्ष लागलें, याजकरितां मला भोजनास बोलाविलें होतें. तीर्थस्वरूप राजश्री भाऊसाहेबांस व दादांसही बोलाविलें होतें परंतु आले नाहींत. पोटांत दुखत होतें सबब. वरकड ती॥ रा॥ बापूसाहेब व रा॥ बाबा फडके, बाजीराव बर्वे व गोविंदराव बाजी व गोविंदराव खासगीवाले वगैरे मंडळी होती. आम्हीं भोजनास बसलों तों राजश्री दौलतराव शिंदे सरकारच्या डेऱ्यास आले. तेव्हां वडिलांस श्रीमंतानीं बोलावून आणविलें. कचेरीचे डेऱ्यांत बैठक शिंदे यांची जाली होती तेथें वडीलही गेले. भोजन करून श्रीमंत उठून कलर्द्राचे डेऱ्यापुढें येऊन बसले. विडे घेतले. श्रीमंतानीं आज्ञा केली जे, तुम्हीं येथेंच बसावें. आणि आपण पाणी प्यावयाकरितां उठले. पाणी पिवोन कलद्रीचे डेऱ्यांत जाऊन बसले. उपरांतीक बाजीराव बर्वे व हिरोजी पाटणकर व मानाजी शिंदे मध्यस्तगिरी करीत होते. शिंदे यांजबरोबर तीन हजार खासा व चार पलटणें होतीं. सरकारचेही हजार दीड हजार खासा डेऱ्यांत वगैरे तयार होऊन बसले होते, काल दीड प्रहर दिवसास आले. बोलण्यांत " आम्हांस तीन उपोषणें जालीं. खर्चास एक करोड रुपये द्यावे व पंचवीस लक्षांची जहागीर द्यावी " याप्रमाणें व आणखी कांहीं बोलणीं होतीं. अस्तमान जाला. शिंदे याणीं बिचोबा कचेरीचे डेऱ्याजवळ देविला. त्याजवर चांदणी दिली. वडिलानीं रात्रीस भोजनास बोलाविलें. स्वयंपाकही करविला. परंतु भोजनास आले नाहींत. श्रीमंत व वडील संध्येस देखील गेले नाहींत. चारी प्रहर रात्रीं बसले होते. दरम्यान वडिलानीं मध्यस्ती[1] केली तेव्हां

---

+ हें पत्र बाळासाहेबांस लिहिलें आहे.

१ मूळ पत्रांतील येथलीं अक्षरें फाटलीं आहेत. धोरणानें ' मध्यस्ती केली ' अशीं अक्षरें लिहिलीं आहेत.

आठ दिवशीं जाबसाल करावासें ठरलें व शिंदे यांचें म्हणणें कारभारी याणीं मेणवलीस राहावें. कारभार करूं नये. फंदफितूर करूं नये. अशीं बोलणीं आहेत. आठ दिवसांत जाबसाल व्हावे असें ठरावून दरम्यान वडिलांस घेतलें आणि आज प्रातःकाळच्या तीन चार घटका दिवसास शिंदे आपले गोटास गेले. मागील साहुकारांचें देणें तें कारभारी याणीं यावें आणि स्वस्थ मेणवलीस राहावें असें ठरावांत आलें म्हणोन ऐकिलें. सेवेशीं विदित होय हे विज्ञापना.

नं ३७६६. (चैत्र शु० ११–१८ एप्रिल.)

विठ्ठलराव पांडुरंग यांचें बाळासाहेबांस पत्र १ सवालचें—

" राजश्री दौलतराव बाबा शिंदे आडून बैसले होते. प्रातःकाळचा चार घटका दिवस आल्यावर तोड निघाली. श्रीमंतानीं लिहून दिलें दस्तांऐवजीं कीं, " तुमचे जाबसालाची तोड आठ दिवसानीं आजपासून पाडितों. राजश्री नाना फडणीस याणीं कारभार करूं नये. महायात्रेस जावें. नाहींतर मेणवलीस राहावें. सरकारांत कर्ज जाहलें आहे तें नानानीं वारावें. कारभारांत अगदीं पडूं नये. फंदफितूर आढळल्यास बरे वजेनें पारिपत्य होईल. " ऐसा ठराव वडील दरम्यान राहून मुदत बांधून गेले. आजचा प्रसंग आठा दिवसांवर गेला. पुढें कोणत्या थरास जातें पहावें ! "

नं. ३७६७. श्रीगजानन. (चैत्र शु० १३–२० एप्रिल.)

पै॥ छ० १७ सवाल. सीत तिसैन.

विज्ञापना छ० ११ सवाल. बाजारी वर्तमान ऐकींव. खचित नव्हे.

१ बीड पाथरी वगैरे पांच महालांस ठाणीं बसलीं शिंद्याचीं. आबा शेलूकराकडील अंमल होता. गोष्टी न वाजवितां ठाणीं सोडून पळाले.

१ शिंदे याणीं निकड करून बसले ते दिवशीं अर्धरात्रीनंतर श्रीमंतांसही क्रोध आला. परंतु वडिलानीं श्रीमंतांस विवेकाची

---

१ कारकून बाळाजी गणेश जोशी याचें बाळासाहेबांस पत्र.

गोष्ट सांगून राहविला. वडिलानीं बहुत प्रकारें श्रीमंतांस विनंति केली. 'गोष्ट आपण बोलतां ही खरी, परंतु श्रीइच्छा!' म्हणाले. श्रीमंतांचें अंग तिकडे ( शिंदे यांजकडे ) पुरतेपणें आहे.

१ नानानीं कारभार करूं नये वगैरे लिहिलेंच आहे नानाचें मोठें दैव कीं ते दिवशीं येथें नव्हते! असते तर मशारीनमुलुक यास ( नबाबानीं ) हातीं दिला तैसा यावा लागता. एक वेळ वहिवाटली. पुढें दैवानुरूप घडेल तें खरें!

१ श्री॥ साहेब सप्तर्षीस जावयाचा योग दिसत नाहीं. वस्त्रें येथेंच यावीं. वस्त्रें आणावयास बाबा फडके अगर वडील जाणार ऐसी आवई आहे.

१ वस्त्रें जाहल्यानंतर पुढें काय बुद्धि ठरती पहावी! एकंदरींत परिणाम यथास्थित दिसत नाहीं.

१ एक वरीषपावेतों शिंदे हिंदुस्थानांत जावयाचा बेत दिसत नाहीं.

१ श्री॥ राजश्री अमृतराव साहेब यांस सरकारचा कारभार होणार ही आवई आहे हें पेशजी लिहिलेंच आहे. फडके यानीं कारभार करूं नये ऐसें आहे त्यापक्षीं बहुधा तेंच घडेलसें दिसतें.

१ कारभारी खात्रेस येईल तो करूं म्हणून स्पष्ट आज्ञा[1] जाहली आहे.

श्रुत होय हे विनंती.

नं. ३७६८. ( २० एप्रिल. )

धोंडो बापूजी जोशी याचें बाळासाहेबांस पत्र चैत्र शु॥ १३ बुधवारचें—

" शिंदि रविवारीं येऊन सरकारांत अडोन सहा प्रहर बसले. पन्नास लक्ष रुपयांचा हवाला श्रीमंत राजश्री भाऊसाहेबानीं व बाबा

[1] आज्ञा बाजीरावसाहेबांची.

फडके व बारामतीकर याणीं घेतला. नानानीं फडणिशी करूं नये, कारभारही करूं नये, फंदफितूर करूं नये, मेणवलीस स्नानसंध्या करून असावें, आजपर्यंत पैका मिळविला तो त्याणीं सरकारांत द्यावा, राज्याचीं वस्त्रें श्रीमंतांस सत्वर यावीं, ऐशीं कलमें—आठ कलमें—ठरावामध्यें आणून वडिलांचें त्यांचें बोलणें होऊन मग शिंदे उठोन गेले. रा॥ बाळाजीपंत सहस्रबुद्धे नानाकडे सोमवारीं गेले. शिंदे अडोन सरकारांत बसले तेव्हां पुण्यामध्यें नाना प्रकारचे तर्क, ते पत्रीं लिहितां ठीक नाहीं वडिलांकडेही आवई गेली असेल. इतकें वर्तमान ऐकींव लिहिलें आहे. पाणी संगमाचें आजपर्यंत आणिलें. तेंही पाणी नासत आलें. आतां पुढें खडकीचे पुलावर जावें लागेल."

नं. ३७६९. श्रीगणपति. (चैत्र शु० १४–२१ एप्रिल.)

पै॥ छ० १२ सवाल. सन सीत तिसैन चैत्र.

विज्ञापना. रात्रौ एक पत्र चिरंजीवानीं पाठविलें त्याचा मजकूर लिहिला तें वडिलांचीं पत्रें आलेलीं पाहून पाठविलीं आहेत. श्रीमंत गैरमाहीत. वडिलांस मध्यस्थ दिलें. आणखी दुसरें मुदत आठ रोजांची आहे! यांत कसे दौलतीचे जाबसाल होतील पहावें. सारांश गोष्ट कठीण. ईश्वर परिणाम लावील तेव्हां खरा! लेखक कारभारांत नाहींत तेव्हां जाबसालाचा शेवट होणें दुर्घट आहे. विदित होय हे विज्ञापना. माझे पत्रीं राजकी (मजकूर) नाहीं. वडिलांचे नांवें व माझे नांवें एकच पत्र होतें. हे विज्ञापना.

नं. ३७७०. श्री. (चैत्र व० १–२३ एप्रिल.)

पै॥ छ० १७ सवाल सीत तिसैन.

सेवेशीं सा॥ नमस्कार विज्ञापना तागायत छ० १४ सवाल मंदवासर पावेतों मु॥ थेऊर. यथास्थित असे. विशेष. इकडील वर्तमान तरी—

---

१ रामचंद्र परशुराम यांचें तासगांवाहून मिरजेस जेव्हां बाळासाहेबांस पत्र.

२ शिलेदार कारकून बाबाजी विश्वनाथ चांफेकर याचें बाळासाहेबांस पत्र.

१ शिंदे छ० ८ सवालीं श्रीमंतांचे डेऱ्यास आले ते दुसरे दिवशीं प्रातःकाळीं तास दिवसास माघारे गोटास गेले. ते दिवशीं कराराची यादी ठरली ते यादीची नकल पाठविली आहे त्याजवरून श्रुत होईल.

१ शिंदे यांजकडील कारभारी यांचे चढाचें बोलणें जे, नाना साताऱ्यासी गेले आहेत त्याणी आम्हांवर इंग्रज अथवा मोंगल अगर टिपू यांसीं सामील करून मसलत करावी. आम्ही दोन महिन्यांची फुरसत देतों. असें जाहलें असतां लढाई मारून नानास धरूनच आणूं, तरच स्वामीचे एकनिष्ठ सेवक ! असे बोलणेचे आवाज निघतात.

१ सदाशिव माणकेश्वर नि॥ गोविंदराव पिंगळे याजकडे सरकारचे सरंजामी जाधव शिलेदार आहेत त्यांचा कारभार आहे. त्यास जाधव शिलेदार चाकरीस श्री॥ राजश्री बाजीरावसाहेब यांजवळ इकडून नेमणुकेंत दहा पंधरा वर्षे होते. हल्लीं जाधव यांणीं श्रीमंतांस विनंती केली जे, " सदाशिव माणकेश्वर आमचे सरंजामाचा कारभार करितो. आणि आमची शिक्के कटार ही त्याजवळ आहे. कारभाराची माहितगारी आम्हांस नाहीं. " तेव्हां एक वेळ ताकीद सरकारांतून जाहली. परंतु शिक्केकटार जाधव यांचे हातास आली नाहीं. म्हणोन काल दोघे हुजरे श्रीमंतांचे गोविंदराव यांचे बिऱ्हाडीं थेऊरांत जाऊन सदाशिव माणकेश्वर यासीं निकड करून शिक्केकटार मागितली. तेव्हां तो बोलिला जे, पुण्यास आहे. तेव्हां पायउतारा पुण्यास घेऊन गेले ! गृहस्थ प्रतिष्ठित आहे.

१ शिंदे यांचे डेऱ्यास राजश्री बाबा फडके गेले होते. दोन रोज जाहले, असें बोलतात. सत्य मिथ्या न कळे. मागाहून लिहितों.

---

१ हेच सदाशिव माणकेश्वर पुढें बाजीरावसाहेबांचे दिवाण म्हणून प्रसिद्धीस आले.

१ राजश्री भिकाजी केशव पाडळीकर साताऱ्याहून श्री॥ राजश्री भाऊसाहेबांकडे आले. तीन रोज जाहले.

१ पुण्यांत मातबर साहुकारांवर श्रीमंतानीं कर्जपट्टी घातली आहे. साहुकारांचे गुमास्ते लष्करांत आले आहेत. ठराव जाहला नाहीं.

---

येणेंप्रमाणें ऐकींव वर्तमान लिहिलें आहे. लष्करची कही दोन दिवसांचें सुमारें लांब जाते. गुरुवारीं थोडासा पर्जन्य पडला. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

नं. २७७१. ( चैत्र शु० १३-२० एप्रिल. )

रघुनाथराव निळकंठ यांचें बाळासाहेबांस पत्र—( पै॥ ११ सवाल. )

विज्ञापना. आज्ञापत्र पाठविलें तें पावलें. उद्योगपर्वांतील संज्ञा लिहूं नये म्हणोन आज्ञा, त्यास आज्ञेप्रमाणें लिहीत नाहीं. श्रीमंत सप्तऋषीस कधीं जाणार म्हणून लिहिलें, त्यास हल्लीं अनेक विकृति चालल्या आहेत त्या पत्रीं लिहितां येत नाहींत. पंचरात्र ( ? ) देव-ब्राह्मणांचें राज्य सुखी असावें या यशाच्या विभागाचे विभागी रा॥ दौलतराव शिंदे यांस श्रीनें केलें ! याच गोष्टी पूर्वी जाल्या असत्या तर कीर्तीस जोडा नव्हता. हल्लीं सामादिक ( ? ) मंडळी येथें आहेत त्यांच्या सर्वांच्या हातोट्या लेखकाचे संधानाविषयीं चालल्या आहेत. मुख्यत्वें पहातां रा॥ नानांचे सख्यत्वाचे अंतीं कांहीं तोडजोडी निघालिया निर्मळ होईल. नाहीं तर विभावना पहातां राज्याची स्थित यथास्थित दिसत नाहीं. श्रीमंत वयेंकडून लहान, सिद्ध पुरुष केलेला ममतेचा कोणीच हाताखालीं नाहीं, त्याजमुळें बोलण्याचे वगैरे प्रकार विलग दिसतात. रा॥ दौलतराव शिंदे यांची तोड पडून तोडजोड जाल्याशिवाय कांहीं नाहीं. नाहीं तर ' द्रव्याचें कुळ तिकडून द्रव्य उत्पन्न करोन घेणें आम्हांस प्राप्त ' असें स्पष्ट बोलतात. कहीचा विचार म्हटलिया रा॥ पाटीलबावा आले ते समयीं उत्तरेकडे तृणाचा अभाव.

हलीं पूर्वेकडे फलटण, दक्षिणेकडे शिरवळापावेतों, पश्चिमेस घाटमाथा येथपावेतों कही छ० मजकुरीं जाऊन आली. पुढें काय होतें पहावें ! लष्करचे आसपास क्रोशचतुष्टयपावेतों भूमीस वृक्षछायेचा अभाव असें जालें. रवाना छ० ९ सवाल. विदित होय हे विज्ञापना.

नं. ३७७२. ( चैत्र—एप्रिल. )

परशुरामभाऊंचें बाळासाहेबांस पत्र—

" तुम्हीं १२ सवालचें पत्र पाठविलें तें १४ मिनहूस पावलें. शिंदे यांच्या जाबसालाचा शेवट कसा जाला हें ल्याहावें व हुशारीस कमती नसावी म्हणून लिहिलें तें कळलें. ऐशियास अद्याप जाबसालाचा शेवट कोणताही नाहीं. हुशारीचा मजकूर लिहिला, त्यास येविशीं कोंताई नाहीं. श्रीकृपेंकरून घडेल तें खरें ! "

नं. ३७७३. ( चैत्र व० १–२३ एप्रिल. )

त्रिंबकपंत आपाकडून बाळासाहेबांस पत्र–(रवाना १४ सवाल. सन सीत तिसैन )

" नबाबाकडील वर्तमान लिहिणेविशीं आज्ञा, त्यास मैंदर्गीहून रा॥ रामचंद्र शिवाजीकडून पत्र आलें त्यांत लिहिलें होतें कीं, खासा नबाब यांस स्वस्थ नव्हतें. मोठी कठिण अवस्था होती. आतां शरीरास आरोग्य जालें. नबाबाकडील फौज बेदरावर चार हजार सुमार आली आहे. तालुक्यांत पागा आहेत त्यांस एक जागां जमा होणेंविशीं आज्ञा जाली आहे. याप्रमाणें राजश्रीनीं वर्तमान लिहिलें आहे. "

नं. ३७७४. ( चैत्र व० ४–२६ एप्रिल. )

चिंतो रामचंद्र ( लिमये ) यांचें बाळासाहेबांस पत्र साताऱ्याहून १७ सवालचें—

" मी तूर्त एक दोन वेळां येथें आलों. एक दोन दिवसानीं फिरोन लष्करास जाईन. तूर्त श्रीमंत राजश्री नाना येथेंच आहेत. बोलणें लागलें आहे. शिंद्याचे विचारें कारभारी आमच्या व आपल्या ( पेशव्यांच्या ) कारभारांत अगदीं नसावे म्हणून वगैरे सात कलमें या

---

१ पत्र कुरुंदवाडाहून मिरजेस बाळासाहेबांस.

अन्वयाचीं लिहून सरकारांतून घेतलीं आहेत. कारभारी यानीं स्वस्थ कांहीं खटपट न करितां आपली मंडळीसुद्धां खातरजमा देऊन राहावें म्हणजे त्यांस आम्हांकडूनही उपसर्ग होणार नाहीं. ( असें शिंदे यांचें बोलणें त्यास ) येथील कांहीं वेढ नाहीं. परंतु बोलल्याप्रमाणें खातरजमा मातबर व्हावी म्हणजे कोणेविशीं लढे नाहींत. येविशीं श्रीमंत राजश्री भाऊ यजमानांशीं व शिंदे याशीं बोलत आहेत. ठरतां ठरतां काय ठरेल तें पहावें. शिंद्यांचे सारे कारभारी यांचे मतें यांची (नानाची) व सरकारची जमीयत यांजपाशीं आहे ती नसावी. हेही नाना प्रकारचीं स्वास्थेचीं बोलणीं बोलतात. भाऊ यांचे विचाराविशीं बहुत खटपट करीत आहेत. शिंद्यांचे कारभारी यांचीं व भाऊंचीं बोलणीं पांच सात वेळां जाहलीं. परंतु सारे शेणवी यांचा आग्रह यांजविशीं ( नानाविषयीं ) फारच आहे. त्यासारखें सरकारांतून यादीवरही त्यानीं लिहून घेतलें आहे. "

नं. ३७७५. ( चैत्र व० ६–२८ एप्रिल. )

परशुरामभाऊंकडून बाळासाहेबांस पत्र–( रवाना १९ सवाल. सन सीत तिसैन. )

" श्रीमंत राजश्री रावसाहेब व श्रीमंत राजश्री चिमाजीआपा यांची स्वारी काल छ० १८ रोजीं बुधवारीं इशारा न होतां अकस्मात् ( आमच्या ) डेऱ्यास आली होती. दोन घटका बैठक होऊन गेली. रावसाहेबांस वस्त्रें व आमच्या गळ्यांत नवरत्नांची कंठी होती ती नजर केली. व आपासाहेबांस वस्त्रें व शिंद्यांकडून आम्हांस कंठी आली होती ती दिली. वरकड मजकूर अद्यापि कोणताही ठराव नाहीं. मुक्काम थेऊराजवळच आहे. "

नं. ३७७६. श्री. ( चैत्र व० ६–२८ एप्रिल. )

सेवेशीं सा॥ नमस्कार विज्ञापना तागायत छ० १९ सवाल पावेतों मुक्काम थेऊर. यथास्थित असे. विशेष. इकडील वर्तमान सरी–

१ कारकून शिलेदार बाबाजी विश्वनाथ फाटकर यांचें बाळासाहेबांस पत्र.

१. राजश्री त्रिंबकराव परचुरे हल्लीं फडणिशीची तेरीख घालितात. रा॥ नानानीं कारभार करूं नये असें शिंदे यांचें बोलणें पडलें तेव्हां परचुरे यांसीं अंदेशा पडला जे, आपण नानाचे निसबतीचे, आपली अबरू कशी राहील ? निरोप मागितलियासीं श्रीमंत निरोप देत नाहींत, शिंदे याणीं हरएकविशीं निकड लावलियासीं आपला त्राता कोणी नाहीं, हें चित्तांत आणून छ० १४ सवालीं मंदवारीं सर्वस्व दान करून संन्यास घ्यावा असा निश्चय केला. हा मजकूर श्रीमंतांस व श्रीमंत राजश्री भाऊहेबांस समजलियावर रा॥ विसाजीपंत यांसीं पाठवून सरकारचे डेन्यास घेऊन आले. श्रीमंतानीं व भाऊसाहेबानीं चार गोष्टी धीराच्या सांगितल्या. आणि भोजनास श्रीमंतानीं राहविलें. मग पुढें स्वस्थ जाले. याप्रमाणें मजकूर जाहला.

१. जुनरास रा॥ अमृतराव आहेत त्यास परगणेंतील दादफिर्यादी वगैरे फिरकोळी मजकूर रावच मनास आणितात. जुनरकर कमाविसदार याणीं प्रांतांतील वसूल मात्र करावा असें होऊं लागलें आहे. म्हणोन वर्तमान बोलतात.

१. श्रीकाशीक्षेत्राहून सावकारी एक महिन्याचीं लिहिलीं आलीं जे, काशींत सावकार लोक आहेत त्यांस इंग्रज कर्ज मागतात व कांहीं जमाव फलकत्ते येथें जाहला व दोन चार पलटणें लखनौस आलीं. सुजातदौला याचा लेंक मिर्जा मानी (?) यासीं सामील करून दिल्लीची मसलत करावी अशी योजना इंग्रजानीं केली आहे म्हणोन बोलतात.

१. गोविंदपंत गोडबोले शिंदे यांजकडे गेले होते तेव्हां शिंदे यांचे कारभारी याणीं विचारिलें जे, कोणीकडे आलां ? तेव्हां गोडबोले बोलले जे, श्रीमंतांकडून आलों. नानाविशींचें कांहीं बोलणें आहे. तेव्हां कारभारी याणीं उत्तर केलें जे, तुम्हीं नानाचे कारकून. तुम्हांजवळ आमचें बोलणें काय आहे ? तुम्हीं जावें. असें बोलले असतां गोडबोले चेंगटपणानें बोलों लागले म्हणोन

चोपदारांकरवीं निकड करवून उठविले. तेव्हां माघारे आले.

१. रा॥ बाबा फडके शिंदे यांजकडे गेले होते त्याचें कारण आपले अबरूस खत्ता होऊं नये याप्रकरणीं बोलले आणि वचन मागत होते. परंतु वचन दिलें नाहीं.

१. श्रीमंत राजश्री अमृतराव यांजकडे जुनरास श्रीमंतानीं छ० १७ सवारीं एक अंबारीचा हत्ती व एक छावा व पांच घोडीं हुजूर-पागेपैकीं खाशा घोड्यांतील येणेंप्रमाणें रुबरू पाहोन रवाना जाहले.

१. श्रीमंत राजश्री रघुनाथ-राव दादा व सखारामपंत पानसे उभयतांस श्रीमंतानीं रात्रीं बोलावून नेलें होतें. चार घटका खलबत जाहलें. या तऱ्हावर दोन चार दिवसा आड खलबत होत असतें म्हणोन बोलतात.

१. शिंदे यांचे बोलण्याचा ठराव अद्यापि जाला नाहीं. रा॥ बाबा चिटणीस यांजकडे आमचे लढे आहेत त्यांस आणवावें. तुमचे गुजारतीनें हिशेबाचे फडशे करून घ्यावे. कारभारी दुसरा करावा. नानानीं मेणवलीस राहावें असें शिंदे यांचे कारभारी बोलतात. परंतु ठरावांत गोष्ट आली नाहीं.

येणेंप्रमाणें मजकूर बाजारी ऐकिलें तें लिहिलें आहे. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

नं. ३७७७. (चैत्र व० ७–२९ एप्रिल.)

सेवेशीं नीळकंठ आपाजी सा॥ नमस्कार विज्ञापना तागायत छ० २० साबानपावेतों स्वामींचे कृपेंकरून वर्तमान यथास्थित असे. विशेष. स्वामींनीं आज्ञापत्र पाठविलें तें पावलें. " शिंदे यांजकडील जाबसाल श्रीमंत राजश्री भाऊसाहेब[1] दरम्यान जाले आहेत. याची परवी कशी योजिली आहे व चवकी पहाऱ्याचा बंदोबस्त कसा आहे हें ल्याहावें " म्हणोन आज्ञा, ऐशीयास शिंदे येऊन बसले, निर्वाह पडेना, सबब श्रीमंत भाऊसाहेबांनीं पतकर घेतला. आठ दिवसांची

१ फत्र पाळ्यासाहेब न.

मुदत होती ते जाली. शिंद्यांकडील पागे व दिवाण वगैरे मंडळी नित्य श्रीमंतांजवळ ( भाऊसाहेबांजवळ ) येत आहेत. व बोलणीं होतात. अद्याप अमुक कलमाचा उलगडा जाला असें नाहीं. खलबताचा हजुमा भारी आहे. सारांश शिंदे जमीयतशीर, बोलणीं तशींच पडतात. या प्रसंगीं पहातां भाऊसाहेबांशिवाय रगडून जाबसाल सांगणार दुसरा कोणी नाहीं. जे दिवशीं शिंदे याणीं जाबसालाचे फडशे जालेच पाहिजेत म्हणोन बैठक मारिली ते दिवशीं भाऊसाहेब या कामांत न पडते तरी बहुत कांहीं खराबी होती हें सर्वांच्या प्रत्ययास आलें. शेवटही यांच्याच हातून, असें शिंदे यांच्या समजण्यांत आलें. यांच्या इतल्याशिवाय बोलणें नाहीं. चवकीपहाऱ्याचा बंदोबस्त चांगला आहे. छबिना घोडेस्वारांचा नेहमीं असतो. डेऱ्यांत व निजाबयाचे राहुटीचे आसपासीं शिलेदार व बारगीर पायउतारा होऊन असतात व प्यादेही आहेत. हुशारीस कमी नाहीं. सेवेशीं विदित होय हे विज्ञापना.

नं. ३७७८. श्री. ( चैत्र व० १०—२ मे. )

पै॥ छ० २५ सवाल सीत तिसैन

विज्ञापना. बाजारी वर्तमान ऐकींव—

१ कै॥ श्रीमंत दादासाहेबांच्या वेळचीं मनुष्यें दोनशेंपावेतों होतीं तीं सर्व आलीं. हजिरी होऊन खर्चास पावलें.

१ जुनरास श्री॥ राजश्री अमृतराव साहेबांकडे दोन अंबाऱ्या निशाणें हत्ती व पांच घोडे बहुत शिरें ऐसे रवाना केले.

१ राजश्री मानाजी फांकडे व केसो कृष्ण व आणखी एक गृहस्थास मिळोन पांच सहा हजार फौज ठेवण्याची आज्ञा जाहली. फांकडे बाजीराव बरें ऐसे खलबतांत नेहमीं.

---

१ कारकून बाळाजी गणेश जोशी याचें बाळासाहेबास पत्र. २ ज्यांवर बसलें असतां अंगास हाल येत नाहीं असे. ३ उत्तम,

१ बळवंतराव नागनाथ यांस सुटका जाहली. मशार-निल्हेचे पागेचे फडणीस राव यांस आणावयास गेले. दोन रोजांत येतील.

१ के॥ रावसाहेबांचें बाळेबंदी शिरपेंच वगैरे सर्व जवाहीर आणोन (बाजीरावसाहेबानीं) रुबरू पाहिलें. सुवर्णाचीं उपकरणीं वगैरे पाहिलें. वडिलांस विचारून आणवावीं तें न घडलें.

१ छ० १९ रोज बुधवारीं श्रीमंतांची स्वारी श्री चिंतामणीस जाऊन अकस्मात् वडिलांचे डेऱ्यास आली. वडिलानीं श्री॥ राजश्री बाबासाहेबांस आपले गळ्यांतील नवरत्नाची माळ व आपासाहेबांस शिंदे याणीं दिलेली कंठी व दोन पोषाख दिले. येक घटका स्वारी बसली होती.

१ हिंदुस्थानांत इंग्रजानीं व अली गोहर यांचे चिरंजीव याणीं मसलत करावी हा उद्योग केला. त्याजमुळें शिंदेकडील डभई व फौज दिलीस गेली. डभई याचा फितवा ऐसेही आवई आहे. एकंदरींत हें खरें असेल तर पायबंद भारी बसला. बहुतकरून खरें आहे.

१ शिंदे यांचें म्हणणें राजश्री नाना कारभार करीत नाहींत ही गोष्ट सिद्ध जाहली. परंतु टिपू, नबाब, इंग्रज वगैरे रजवाडे यांस पत्रें लिहून आम्हांजवळ यावीं कीं, 'बाळाजी जनार्दन यांचा कारभार काढिला. त्यांचें पत्र आलें असतां मंजूर नाहीं.' ऐशीं पत्रें लिहून द्यावीं.

१ सरकारांतून बोलणें पडलें आहे कीं, (नानानीं) कारभार सोडिला, परंतु फडणिशी त्यांजकडेच असावी. तेव्हां (शिंद्यांचें) उत्तर आलें कीं, गुमास्ता ठेवावा. खाशानीं परिच्छिन्न येऊं नये.

१ राजश्री नाना फौज पायदळ रुकसत करीत आहेत.

येणेंप्रमाणें बाजारी वार्ता. हे विज्ञप्ति.

---

१ बाजीरावसाहेबांस. २ फ्रेंच सरदार जनरल डीबाइन.

नं. ३७७९. श्रीगणराज. ( वैशाख शु० ३-१० मे. )

पै॥ छ० ४ जिल्काद. गुरुवार. प्रातःकाळ. आठ घटका दिवस. अपत्यें नारायणानें दोनी कर जोडून शिरसाष्टांग नमस्कार विज्ञापना तागायत छ० २ जिल्कादपावेतों मु॥ आंबराईनजीक कात्रज येथें वडिलांचे आशीर्वादेंकरून सुखरूप असों. विशेष. काल इंदुवारीं दोन प्रहर दिवसा फौज आठ हजार, पलटणें, व कंपू, व तोफा येणेंप्रमाणें आविर्भाव मागें एकदां केला तसाच सारे गोटाभोवता केला[३]. सरकारचे डेऱ्यांत ती॥ राजश्री बाबासाहेब पांच चारशें लोक घेऊन खास चौकीस गेले. नंतर वडिलांसही बोलावणें आलें होतें. वडील भोजन केल्याशिवायच स्नान मात्र करून गेले होते. शिंदे कांहीं खासा आले नव्हते. बाळोबा पागनीस व सदाशिव मल्हार व धोंडीबा हे बोलावयाकरितां काल तिसरे प्रहरीं आले होते. आपले डेऱ्यांतून संकेत करून निघाले जे, आजच काय फडशा करून घेणें तो घ्यावा. वारंवार येणें जाणें ठीक नाहीं. त्रिवर्ग ( येथें श्रीमंतांशीं ) बोलोन आपले डेऱ्यास गेले. सरकारांतूनही मानाजी फांकडे व मालोजी घोरपडे व आपाजीराव पाटणकर यांचे पुत्र हिरोजीराव पाटणकर हे व आणखी एक दोघे ऐसे बोलावयास गेले तों इतक्यांत शिंदे यांजकडील फौजा व कंपू पलटणें व तोफा माघाऱ्या गेल्या. तों संध्याकाळचा चार घटका दिवस बाकी राहिला. नंतर श्री॥ राजश्री बाजीरावसाहेब यांची स्वारी शिंदे यांचे डेऱ्यास गेली. वडील भोजन करावयास म्हणोन राहिले. श्रीमंतांबरोबर कांहीं शिंदे यांचे डेऱ्यास गेले नाहींत. भोजन करून शिंदे यांचे डेऱ्यास जावयाचें म्हणोन ( वडिलानीं ) पालखी आणविली आणि सरकारचा डेरा कचेरीचा त्या डेऱ्यांत दोन तिनिशें लोक घेऊन गेले. नंतर सव्वा प्रहर रात्रीस श्री॥ राजश्री चिमाजी आपासाहेब आपले डेऱ्यांत होते तेथें जाऊन वडिलानीं विनंती केली जे, ' राज्यास अधिकारी कोणी नाहीं. राज्य बुडतें. आपण कृपा

---

१ पत्र बाळासाहेबांस. २ तीन आठवड्यांपूर्वी. ३ शिंद्यानीं केला. ४ हरि परशुराम. ५ परशुरामभाऊ.

करून पुण्यास यावें. ' याप्रमाणें विनंती केली. तेव्हां श्रीमंत बोलले जे, ' राज्य बुडलें तरी चिंता नाहीं. मी कांहीं यावयाचा नाहीं. ' याप्रमाणें उत्तर जाहलें. मग वडिलानीं साष्टांग नमस्कार घातला. आणि ' कृपा करून यावें ' ऐशी विनंती केली; तरी मान्य न होय. तेव्हां दोघां जणानीं मिळोन पालखींत बसविलें. तेव्हां श्रीमंतानीं शंखवाद्याचा प्रयोग केला ! नंतर वडिलानीं शिंद्यांच्या लष्कराकडे रोंख दाखवून पुण्याकडे घेऊन गेले. बाजीरावसाहेब तेथेंच आहेत. काय होतें पहावें. सेवेशीं विदित होय हे विज्ञापना.

नं. ३७८०. श्रीगणपति. ( वैशाख शु० ६–१२ मे. )

चि॥ राजश्री बळवंतराव व रामचंद्रपंत आपा यांसीं प्रती परशुराम रामचंद्र. आशीर्वाद उपरी. इकडील वर्तमान तर श्रीमंत कैलासवासी नानासाहेब यांचा वंश चालवावा या प्रकरणीं घाटाघाट होत होती व शिंदे यांचाही रुकार पडला. उद्योग साधावा, याचा बेत होतां होतां काल छ० १ जिल्काद इंदुवारीं शिंदे यांजकडील कारभारी सरकारचे डेऱ्यास आले. बोलणें चालविलें ते अस्तमानास चार घटका दिवस राहिला. तेथपावेतों राजश्री नारायणराव जिवाजी व आणखी सरदार दहा पांच हजार फौज व सहा पलटणें व तोफा घेऊन अघाडीस व गिर्दनवाईस उभे होते. परंतु बेत बनला नाहीं. यामुळें जमीयत व सरंजाम कांहीं एक तोडीचा बहाना करून माघारा गेला. नंतर श्री॥ राजश्री बाजीरावसाहेब यांची स्वारी शिंदे यांच्या डेऱ्यास अस्तमानीं गेली. तेथे त्यांचा बंदोबस्त जाला. उपरांतिक श्रीमंत राजश्री चिमाजीआपा यांस घेऊन आम्ही थेऊरच्या मुकामाहून आवशीच्या दहा घटका रात्रीस चालते जालों. ते मध्यरात्रीस पुण्यांत दाखल जालों. रास्ते यांच्या नव्या वाड्यांत श्रीमंत सहवर्तमान आहों. तूर्तच वाड्यांत जावें तर दिनशुद्धि नाहीं व चहूंकडील रागरंग समजला पाहिजे. थेऊराहून लष्करचें कूच करविलें आहे. अद्याप मुक्काम येथें

---

१ शिंद्यांच्या गोटांत. २ बाजीरावांस कैद करण्याचा बेत.

आला नाहीं. याउपर जें घडेल तें लिहून पाठवूं. चौकीपहाऱ्याचा वगैरे बंदोबस्त चांगला आहे. रवाना छ० २ जिल्काद भौमवार. सर्व उद्यां मागाहून लिहितों. बहुत काय लिहिणें लोभ कीजे हे आशीर्वाद.

पै॥ छ० ४ जिल्काद. सन सीत तिसैन. वैशाखमास. पांच तास दिवस. प्रातःकाळ.

नं. ३७८१. श्रीगणराज. (वैशाख शु० ६–१२ मे.)

छ० ९ जिल्काद. सन सीत तिसैन. वैशाख.

अपत्यें विठोबानें दोन्ही कर जोडून साष्टांग नमस्कार विज्ञापना येथील क्षेम तागायत छ० ४ जिल्कादपावेतों मुक्काम पुणें येथें सुखरूप असों. विशेष. वडिलीं दोन वेळां पत्रें पाठविलीं तीं पावलीं. छ० १ जिल्काद इंदुवासरीं प्रातःकाळच्या चार घटका दिवसास शिंदेचेकडील पांचचार पलटणें व तोफा व सदाशिव मल्हार व धोंडोबा असे आले. पलटणें व तोफा अघाडीस उभ्या राहिल्या. जिऊबा दादा बक्षी यांजकडील फौजेचा गराडा गोटास पडला होता. तीर्थस्वरूप राजश्री भाऊसाहेब मंडळीसुद्धां सरकारचे डेऱ्यास जमेतसुद्धां गेले. आपल्या डेऱ्यासही पांचचारशें खासा बसविला होता. वडिलांस वगैरे अस्तमानपावेतों भोजन नाहीं. बोलणें ठरेना. तेव्हां मानाजी शिंदे व हिरोजीराव पाटणकर व बाजीबा बर्वे आणखी एक दोन गृहस्थ शिंदे यांजकडे बोलण्यास पाठविले. सायंकाळच्या चार घटका दिवसास असें ठरलें कीं, श्रीमंतानीं शिंदे यांच्या डेऱ्यास जाऊन जाबसाल उरकावे असें ठरलें. नंतर पलटणें व फौज ऐसा सरंजाम माघारा गेला. नंतर श्रीमंत दोन तीन घटका दिवसास शिंद्यांचे डेऱ्यास गेले. वडील शिवपूजेस स्नान केले. पूजा होऊन भोजन होईपावेतों अस्तमान जाहला. श्रीमंत शिंदेचे डेऱ्यास गेल्यावर तोफा जाहल्या. बोलणें पडलें. आवशीचे सात घटका रात्रीस श्रीमंत राजश्री चिमाजीआपासाहेब यांस पालखींत बसवून पुण्यास घेऊन वडील बरोबर फौजसुद्धां आले. तिकडे शिंद्यांनीं त्यांस कैद केलें. हा संकेत पूर्वींच होतासा सुमार

१ सरदार विठ्ठलराव पांडुरंग यांचें बाबासाहेबांस पत्र.

दिसतो. त्याजप्रमाणें घडलें. मला अगोदरच चार रोज आमांश जाहला होता, ज्वर किंचित् येत होता, म्हणोन आम्हीं वडिलांजवळ नव्हतों. प्रस्तुत ज्वर व हगवण राहिली आहे. चिंता न करावी. आम्ही रात्रीं स्वारीबरोबर आलों. श्रीमंत वडीलसुद्धां रास्त्यांच्या वाड्यांत राहिले आहेत. चिरंजीव राजश्री नारायणराव दादा व दाजी संगमाजवळ उतरले आहेत. ती॥ राजश्री रघुनाथराव दादा श्रीमंतांचे बरोबर शिंद्यांचे डेऱ्यास गेले होते ते मंगळवारीं आले. येणें-प्रमाणें वर्तमान लवकर लिहून पाठवावें, परंतु डांक जेजुरीकडे राहिली, आम्ही इकडे आलों, म्हणोन पत्रें रवाना जाहलीं नाहींत. वडिलां-कडून रवाना जाहलींच असतील. कळावें. इटेकरी व पट्टेकरी व कामाठी पाठविला तो पावला. छ० ३ जिल्कादीं शिंद्यानीं थेऊरची कही केली. ब्राह्मणांचे घरोघर शिरोन कडबा व लांकडें नेलीं. आमचीं कडबा व कांहीं लांकडें ठेवून आलों तींही गेलीं. श्रीमंतां-जवळ खास चौकी पटवर्धन मंडळींचीच आहे. चौकीपहाऱ्याचा बंदोबस्त बहुतच आहे. कळावें. सेवेशीं श्रुत होय विज्ञापना.

सेवेशीं बाळाजी गणेश जोशी व बजाजी हरि पटवर्धन, साष्टांग नमस्कार विज्ञापना. सदैव पत्रीं सेवकाचा सांभाळ केला पाहिजे हे विज्ञापना.

नं. ३७८२. श्रीगणपति. ( वैशा० शु० ६-१२ मे. )

पे॥ छ० ६ जिल्काद. सन सीत तिसैन. वैशाख शु० ८ शनि-वार सहा घटका दिवस प्रातःकाळचा.

चिरंजीव राजश्री बळवंतराव व रामचंद्रपंत आपा यांसीं आशीर्वाद उपरी. श्री॥ रा॥ चिमाजीआपा यांस घेऊन पुण्यास आलों व रास्ते यांच्या मध्या वाड्यांत राहिलों या मजकुराचें पत्र छ० २ जिल्कादीं रवाना केलें आहे, पावलें असेल. वाड्यांत स्वारी दाखल व्हावयाची, त्यास मुहूर्ताचा निश्चय होत आहे. उद्यां गुरुवारीं वीस

---

१ पत्र परशुरामभाऊंचें.

घटका रात्रीस एक मुहूर्त आहे. निश्चयांत येईल तो लिहून पाठवूं. श्रीमंतांजवळ नेहमीं चिरंजीव राजश्री हरिपंत बाबा मंडळीसुद्धां असतात. श्री॥ रा॥ बाजीरावसाहेब शिंदे यांच्या लष्करांत लोणीनजीक आहेत त्यांचें कूच अद्याप जाहलें नाहीं. सरकारची फौज व कारखाने थेउरानजीक मुक्कामाहून पुण्यानजीक संगमाच्या पुढें येऊन उतरले. राजश्री बाबा फडके गोटांत आहेत. आम्ही श्रीमंतांजवळ आहों. रवाना छ० ४ जिल्काद. जुन्नरांत राहिले आहेत त्यांच्या बंदोबस्तास सरकारांतून स्वार व पायदळ रवाना जाहलें आहे. पंढरपूरकर येथें आले आहेत. मागती उद्यां जातात. रवाना छ० मजकूर. आज सातारियास जातील. बहुत काय लिहिणें हे आशीर्वाद.

नं. ३७८३. श्रीगणपति. ( वैशा. शु० ७–१३ मे. )

पै॥ छ० ७ जिल्काद सन सीत तिसैन. वैशाख मास.

चिरंजीव राजश्री बळवंतराव व रामचंद्रपंत आपा यांसी प्रती परशुराम रामचंद्र. आशीर्वाद. उपरी. श्रीमंत राजश्री चिमाजीआपा यांची स्वारी काल गुरुवारीं वीस घटका रात्रीस मुहूर्तेंकरून वाड्यांत दाखल जाहली. शिंदे यांस स्वारीबरोबर यावें म्हणोन सांगोन पाठविलें होतें. परंतु त्यांच्या गटां एक काम आहे त्याजमुळें खुद्द आले नाहींत, त्यांत रात्रीचा विषय होता. सबब त्यांजकडून राजश्री धोंडीबा आले ते अद्याप शहरांत आहेत. याउपर दत्तविधान सोमवारीं होणार. तीन चार रोजांचा अवकाश आहे. होतांच लिहून पाठवितों. जुन्नरच्या बंदोबस्तास स्वार व पायदळ रवाना जाहलें हें काल लिहिलेंच आहे. वाड्यांत चिरंजीव राजश्री हरिपंत बाबा यांस ठेविले आहेत. आम्ही स्वारी वाड्यांत पोंहचवून आपल्या घरास आलों. चिरंजीव राजश्री रघुनाथराव दादा काल मध्यरात्रीं परभारें गोटांतून न विचारतां कुरुंदवाडास जाण्याकरितां गेले असें आज सकाळीं समजण्यांत आलें. स्वारीबरोबर आले नाहींत. काय अंदेशा

---

१ अमृतराव. २ चिंतोपंत लिमये. ३ रात्र्याच्या नानांकडे. ४ बाजीरावास सांभाळण्याचें.

आगला कळत नाहीं ! ही गोष्ट त्याणीं चांगली केली नाहीं. पूर्वी चिरंजीव राजश्री विनोबा आबा व वेदशास्त्रसंपन्न राजश्री बाळंभट वाटवे यांस पाठवून चार गोष्टी सांगविल्या व बळवंतराव लक्ष्मण लेले यांसही याच्या पूर्वी इशारा केला होता. परंतु त्याणीं असें केलें त्यास उपाय काय ! आपली गांठ पडेलच. रीतीचें सांगोन त्यांची मर्जी आम्हांवर होय असें करावें. रवाना छ० ५ जिल्काद. बहुत काय लिहिणें लोभ कीजे हे आशीर्वाद.

नं. ३७८४. (वैशा० शु० ७–१३ मे.)

बाळाजीपंत पटवर्धन यांचें पत्र बाळासाहेबांस ५ जिल्कादचें–

" श्रीमंत राजश्री चिमाजीआपासाहेब रास्त्यांच्या वाड्यांतून निघोन ४ जिल्कादीं गुरुवारीं वीस घटका रात्रीस भवानी पेठेंतून बुधवारांतून स्वारी वाड्यास उजवी घालून सरकारवाड्यांत दाखल जाली. समारंभें जरीपटका, साहेब नौबत, चौवडा, अतसबाजी होऊन मोठ्या समारंभानें स्वारी आली. वडील, पाटीमागें सरदार, वगैरे सर्व अंबारीमागें होते. श्रीमंत रुप्याचे अंबारींत होते. शिंद्यां-कडील कांहीं लोक व धोंडीबा असे आले होते. वैशाख शु॥ १० स वस्त्रें होणार. रा॥ चिंतोपंत दादा समरुपीस कालच गेले. राजश्री नानांचे येण्याचें अद्यापि निश्चय नाहीं. श्रीमंत राजश्री बाजीराव-साहेब शिंद्यांजवळ सुखरूप आहेत. श्रीमंत राजश्री चिमाजीआपा-साहेब दोन रोज फार अर्जुदा होते. दिवसें दिवस विसरतील. येथें घाट बराच उतरला. श्रीमंतांजवळ नेहमीं श्रीमंत राजश्री बाबा-साहेब व जनोबा सुभेदार वाड्यांत आहेत. वडील आपले वाड्यांत आहेत. "

नं. ३७८५. श्रीगणराज. (वैशा० शु० ८–१४ मे.)

विज्ञापना. तागायत छ० ६ जिल्कादपावेतों सुखरूप असों. विशेष. श्रीमंत राजश्री बाजीरावसाहेब शिंदे यांचे डेऱ्यास छ० १

---

१ विठ्ठल पांडुरंग यांचें बाळासाहेबांस पत्र.

जिल्कादीं इंदुवारीं स्वारी गेली ते समयीं बरोबर मंडळी रा॥ पांडुरंगराव बारामतीकर व गोविंदराव बर्वे व बाजीराव बर्वे व आपाजीपंत सहस्रबुद्धे व बाळाजीपंत पटवर्धन व मानाजी फांकडे व हिरोजीराव पाटणकर व मालोजी घोरपडे व ती॥ रा॥ रघुनाथराव दादा इतकी मंडळी होती. त्यांपैकीं तेथें श्रीमंतांजवळ शिंद्यांचे गोटांत बाळाजीपंत पटवर्धन एक असामी जवळ आहेत. पृथक असामी— मानाजी फांकडे व हिरोजीराव पाटणकर—दोन असामी पृथक् ठेविले आहेत म्हणोन सांगतात. पांडुरंगराव बारामतीकर व गोविंदराव बर्वे व बाजीराव बर्वे व ती॥ रा॥ रघुनाथराव दादा वगैरे मंडळी झाडून इकडे आली. श्रीमंत राजश्री चिमाजीआपा छ० ४ जिल्कादीं गुरुवारीं वीस घटका रात्रीं रास्ते यांचे वाड्यांतून ऐन्याचे अंबारींत बसून सरकारचे वाड्यांत गेले. खवाशींत ती॥ रा॥ हरिपंत बाबा व राघोपंत ठोसर व एक अंबारी खुली होती. ती॥ रा॥ भाऊसाहेब व रा॥ बाबा फडके घोड्यावरच होते. स्वारी वाड्यांत पोंचल्यावर पन्नास साठ तोफांची सरबत्ती जाली. ती॥ रा॥ रघुनाथराव दादा छ० ४ जिल्कादीं वीस घटका रात्रौ वडिलांस न पुसतां कुरुंदवाडास निघून गेले. सेवेशीं विदित होय हे विज्ञापना.

## नं. ३७८६. श्रीगणराज. ( वैशा० शु० ९–१५ मे. )

चिरंजीव राजश्री नारायणराव यांसीं आशीर्वाद. उपरी. "श्री॥ रा॥ चिमाजीआपा रास्ते यांचे वाड्यांत आहेत. जवळ वडील असतात. आमचा मुक्काम येरवड्यानजीक वडिलांचे आज्ञेप्रमाणें केला आहे. सरकारचे डेरे संगमावर आहेत. श्री॥ रा॥ बाजीरावसाहेब शिंदे याचे लष्करांत आहेत. मागाहून सविस्तर लिहून पाठवितों." म्हणून लिहिलें तें कळलें. ऐशियास श्रीमंतांची स्वारी वाड्यांत दाखल जाल्याचें व शिंदे यांचें कूच होऊन कोठें आले तिकडील तपशीलवार लिहोन पाठवावें. आकर्दी चिठी रा॥ आपाजी गोविंद याचे अक्षराची

१ पत्र मिरजेहून बाळासाहेबांचें.

होती त्यांतील भावही कळला. वडिलांचें पत्र आज अस्त- मानीं श्री॥ रा॥ चिमाजीआपासाहेबांची स्वारी गुरुवारीं वीस घटका रात्री वाड्यांत दाखल जाहली म्हणोन आलें. तुम्ही सविस्तर लिहिणें. छ० ७ जिल्काद. चार तास रात्र. हे आशीर्वाद.

पै॥ छ० १० माहे जिल्काद. सुरू सन सीत तिसेन. वैशाख मास.

नं. २७८७. श्रीगणपति. ( वैशाख शु० ११-१७ मे. )

चिरंजीव राजश्री बळवंतराव व रामचंद्रपंत आपा यांसीं प्रति परशुराम रामचंद्र. आशीर्वाद उपरी. छ० ७ जिल्काद रविवारीं होळकराचे डेऱ्यास गेलों होतों. राजश्री बाळोबा पागनीस आले होते. बोलणीं निखालसतेचीं जाहलीं त्यांचीं उत्तरें तशींच केलीं. निरोप- समयीं त्याणीं आम्हांस शिरपेंच व कंठी वस्त्रें दिलीं. ठिकाणास आलों. आज इंदुवारीं राजश्री दौलतरावबाबा शिंदे सरकारच्या वाड्यांत आले होते. श्री॥ राजश्री चिमाजीआपा यांजवळ बैठक होऊन मग श्रीमंत मातुश्री बाईसाहेबांकडे गेले आणि दुखवट्याचीं वस्त्रें पुढें ठेवलीं. नंतर सेवाधर्माचीं बोलणीं बहुत केलीं. त्यांतील हांशील 'केला कारभार शेवटास नेतों. यांत चलनिचल नाहीं.' असें खातरजमेचें बोलोन बाईसाहेबांचे पायावर हात ठेविला. उपरां- तिक विडे घेऊन निघाले ते आमच्या घरास आले. फराळ केला. दोन घटका बसले होते. खुद्दांस वस्त्रें व शिरपेंच व कंठी व हत्तीण एक नवी घेऊन दिली. राजश्री बाळोबा पागनीस यांस वस्त्रें व कंठी व नारायणराव बक्षी व सदाशिव मल्हार दिवाण व सदाशिव बापूजी फडणीस व धोंडो रामचंद्र या चौघांस चार शिरपेंच व वस्त्रें दिलीं. शिंदे यांचा मुक्काम थेऊरानजीक मुक्कामाहून खराडीस आज इंदुवारीं आला. श्री॥ राजश्री बाजीरावसाहेब त्यांच्याच गोटांत आहेत. दत्त- विधानाचा मुहूर्त सोमवारचा योजनेंत होता. परंतु राहिला. याउपर निश्चयांत येईल तो लेहून पाठवूं. रवाना छ० ९ जिल्काद. चि॥ राजश्री

हरिपंत बाबा व जनार्दनपंत सुभेदार असे वाड्यांत श्रीमंतांजवळ नेहमीं असतात. लोक चौकीस आपल्याकडील आहेत. याउपर दत्तविधान व वस्त्रें व्हावयाचीं त्याचा मुहूर्त वद्य पंचमीचा गुरुवारीं नेमिला आहे. सिद्धीस जाईल तें खरें. वस्त्रांस लढा राजश्री नाना तेथें आहेत ते निघोन मेणवलीस अथवा त्यांची खातरदास्त पुरेल तेथें ( त्यानीं ) जावें, नंतर वस्त्रें यावीं, असें आहे. यास्तव राजश्री नानाकडे येथून बहिरोपंत मेहेंदळे पाठवावे असें आहे. रवानगी जाहल्यावर लिहितों. बहुत काय लिहिणें हे आशीर्वाद.

पै॥ छ० ११ जिल्काद. सन सीत तिसैन. वैशाख मास. नऊ तास रात्र.

नं. ३७८८. श्री. (वै० शु० ११–१७ मे.)

पै॥ छ० १३ जिल्काद. सन सीत तिसैन. वैशाख.

सेवेशीं गणेश गोविंद.[1]

कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना ता॥ छ० ९ माहे जिल्काद मु॥ पुणें येथें वर्तमान यथास्थित असे. विशेष. स्वामीनीं यजमानांचे पत्रीं नमस्कार लिहिला व इकडील सविस्तर लिहिणेंविशीं आज्ञा (केली,) ऐशीयास थोरले यजमान शिंदे यांजवळ राहिले, धाकटे यजमान पुण्यास आले, हें सविस्तर स्वामींस विदित जाहलेंच आहे. प्रथम दिवशीं पुण्यांत आले तेव्हां दोन दिवस रास्ते यांचे वाड्यांत होते. नंतर सप्तमी भृगुवारीं सरकारचे वाड्यांत श्रीमंत आले. काल दशमी इंदुवारीं दत्तविधान होणार होतें, परंतु तूर्त राहिलें. वस्त्रें मात्र सध्यां घ्यावीं. मग सावकाश दत्तविधान होईल, असें आहे. साताऱ्याहून वस्त्रें आणावयाचीं, त्यास रा॥ नाना तेथें आहेत त्याणीं मेणवलीस जावें, नंतर वस्त्रें आणावीं, ते तेथें असतां वस्त्रें आणावयाचीं नाहींत, येविशीं राजश्री चिंतोपंत लिमये साताऱ्यास गेले आहेत. चार दिवस जाहले. परंतु उत्तर आलें नाहीं. नानानीं मेणवलीस रहावें एक, अथवा महायात्रेस

---

१ शिलेदार कारकून. उपनांव सखदेव. यांचें हें बाळासाहेबांस पत्र.

जावें, असा बहुतच शिंदे यांजकडील आग्रह आहे. ते तर जागा सोडीनात ! याजकरितां शिंदे यांजकडील जिऊबा बक्षी यांचे चिरंजीव नारायणराव बक्षी दहा हजार फौज व पांच पलटणें घेऊन साताऱ्यास जात आहेत. काय घडतें पहावें. शिंदे व त्यांचे कारभारी सुद्धां काल छ० ८ तारखेस सरकारचे वाड्यांत येऊन धाकटे श्रीमंतांचें दर्शन घेऊन घटकाभर बसोन नंतर श्री॥ राजश्री भाऊसाहेब यांचे वाड्यांत मंडळीसह आले. खुद्द शिंदे व पंचवीसपर्यंत शिलेदार यांस फराळास घातलें. नंतर निरोपाचे समयीं दौलतराव शिंदे यांस पोषाख व कंठी शिरपेंच व हत्ती एक दिला. बाळोबा पागनीस मुख्य कारभारी यांस वस्त्रें दोन व कंठी शिरपेंच. वरकड सदाशिव मल्हार व धोंडीबा व नारायणराव जिवाजी बक्षी यांस वस्त्रें व शिरपेंच दिले. नंतर आपले गोटास गेले. नानानीं परिच्छिन्न कारभारांत येऊं नये असें ठरलें. तूर्त सर्व कारभार आमचे यजमानांकडेच आहे. शिंदे यांजवळ थोरले यजमान आहेत त्यांस शिंदे यांस पैका द्यावयाचा करार ठरला आहे त्याप्रमाणें ऐवजाचा फडशा करून दिल्यावर थोरले यजमानांस सरकारांत स्वाधीन करावें, सरकारांतून कोठें ठेवणें ते ठेवावे, याप्रमाणें करारांत आहे. परंतु कराराप्रमाणें वर्तणूक जाहल्यास उत्तम आहे. सर्वही तूर्त कांहीं दिवस चालेल. कराराप्रमाणें वर्तणूक न घडल्यास गोष्ट अवघड पडावयाची आहे ! श्री॥ राजश्री रघुनाथराव दादा येथून सप्तमी भृगुवारीं तीन प्रहर रात्रीस सरकारचे वाड्यांत आले तेच समयीं निघोन जेजुरीवरून कुरुंदवाडास जावयास गेले. स्वामींजवळ आलेच असतील. सर्व सविस्तर विदित होईल. श्री॥ राजश्री भाऊसाहेब यांणीं राजश्री विनोबा आबा व वेदमूर्ति रा॥ बाळंभट वाटवे यांस दादाकडे आपण जाऊं नये म्हणोन सांगोन पाठविलें, परंतु राहिले नाहींत. लौकिकांत ही गोष्ट वाईट जाहली. याप्रमाणें वर्तमान आहे. सेवेशीं श्रुत होय हे

१ परशुरामभाऊंकडे, २ बाजीराव, ३ कुरुंदवाडकर, ४ विनायक भास्कर पटवर्धन.

विज्ञापना. गारपिराकडे मुक्काम होता तेथें पाणी वाईट याजमुळें पर्वतीच्या पश्चिमेस रमण्यांत काल मुक्काम जाला आहे. हे विज्ञापना.

नं. ३७८९. श्रीगणपति. ( वैशाख शु० १२–१८ मे. )

चि॥ राजश्री बळवंतराव यांसीं प्रति परशुराम रामचंद्र. आशीर्वाद उपरी. इकडील वर्तमानाचीं पत्रें काल रवाना केलीं आहेत. पावतील. राजश्री बाहिरोपंत यांची रवानगी सातान्यास केली. शिंदे यांची निकड राजश्री नाना याणीं सातान्याहून निघावें येविशीं भारी आहे. त्यांच्या रोखावर कंपूपैकीं पांच सहा पलटणें व जमीयत कवडीच्या मुकामाहून रवाना केली ते यवत म्हणोन गांव घांटाचे सुमारें आहे तेथें मुक्कामास गेली ! पुढें जाऊं नये असें केलें आहे. कसें शेवटास जातें पहावें ! सान्या फौजेचा मुक्काम संगमाचे सुमारें होता त्यास चि॥ राजश्री नारायणराव व महादाजीपंत दाजी यांचें कूच करवून पर्वतीनजीक नदीच्या किनान्यास मुक्काम करविला. सरकारची फौज संगमाच्या खालीं आहे. शिंदे यांचा मुक्काम श्रीमंतांसह खराडीजवळ आहे. चि॥ राजश्री रामचंद्रपंतआपा यांस लखोटा पाठविला आहे. त्यांजकडे लावून द्यावा. रवाना छ० १० जिल्काद. बहुत काय लिहिणें लोभ कीजे हे आशीर्वाद.

पै॥ छ० १३ जिल्काद. सन सीत तिसैन. वैशाख शु॥ १५ शनवार.

नं. ३७९०. श्रीगणपति. ( वैशाख शु० १३–१९ मे. )

चि॥ राजश्री बळवंतराव यांसी प्रति परशुराम रामचंद्र. आशीर्वाद. उपरी. राजश्री नाना मिरजेस कदाचित् आलिया चि॥ राजश्री श्रीपतराव यांचा वाडा रिकामा करवून द्यावा. अथवा त्यांच्या मर्जीस येईल ती जागा द्यावी. येविशींचें परवां आपल्यास लिहिलेंच आहे. त्यास फार करून मिरजेस अथवा तासगांवास लौकरच येतील असें आहे. यास्तव रहावयास जाग्याची सोय शिरा[1] जाली पाहिजे. तास-

---

1 उत्तम.

गांवींच आल्यास सारा वाडा रिकामा करून त्यांच्या हवाली करावया-विशीं चि॥ राजश्री रामचंद्रपंत आपा यांस लिहिलें आहे. बातमी राखोन आपण पुढें एक मजल जाऊन बहुत कांहीं मुदारत करून गांवांत आणावे. आणि वाडा चौकीपहाऱ्यासुद्धां दरोबस्त रिकामा करवून देवावा. मिरजेस आलिया श्रीपतराव यांचा वाडा द्यावा. किंवा त्यांच्या मर्जीस जी जागा येईल ती रिकामी करून द्यावी. अगोदर ते येत नाहीं म्हणतील ( तर ) बहुत आग्रह करून किल्ल्यांत न्यावे. त्यांच्या मनाजोगी तरतूद करून द्यावी. सामानसुमान लागेल तें द्यावें. या बंदोबस्ताविशीं आपणास ल्याहावें असें नाहीं. तास-गांवीं व मिरजेंत जेथें रहातों म्हणतील तेथें तरतूद करावी. याउपर साताऱ्याहून निघावयास अवकाश नाहीं. जलदीनेंच तिकडे येतात. आगाव सूचना आपणास कळली पाहिजे यास्तव लिहिलें आहे. पत्र पावतांच बातमी राखावी. सामोरें जावें. कोणेविशीं बेतरतूद जाली असें होऊं नये. चिरंजीवांस लखोटा पाठविला आहे ( हा ) त्यांज-कडे रवाना करावा. रवाना छ० ११ जिल्काद. बहुत काय लिहिणें हे आशीर्वाद.

पे॥ छ० १२ जिल्काद. सन सीत तिसैन. वैशाख शु॥ १५ शनवार.

नं. ३७११. श्रीगणराज. ( वैशाख व० ६—२८ मे. )

चिरंजीव राजश्री नारायणराव यांसीं प्रती गंगाधरराव गोविंद आशीर्वाद उपरी. येथील कुशल ता॥ छ० २० जिल्काद जाणोन स्वकीय लिहीत जावें विशेष. साताऱ्याहून वर्ले गेल्यावर दत्तविधानाचा व वस्त्रांचा समारंभ नेमिल्या मुहूर्तास जाल्याचें सविस्तर लिहोन पाठवावें. राजश्री बाबूराव शिवाजी म्हैसकर आपले पुत्राचे लग्नास आजेरेस गेले. लग्नसमुदाय परभारें येडुरास पाठवून काल मा॥निल्हे येथें येऊन रात्रीं निरोप घेऊन गेले. बहुत काय लिहिणें हे आशीर्वाद.

---

१ गौरव.

नं. ३७९२. श्रीगजानन. ( वैशाख ब० १३–३ जून. )

पै[1]॥ छ० २६ जिल्काद. सन सीत तिसैन.

विज्ञापना. अलीकडे शिंद्यांचें बोलणें पडलें आहे कीं, राजश्री नाना फडनवीस याणीं फौज अगदीं बाळगूं नये. फंदफितूर करूं नये. भोंसल्याचे वकील वगैरे लोकांचे कागदपत्र जाणें येण्याचें कारण नाहीं. भोजन करून स्वस्थ रहावें. फौजेचा सरंजाम आहे हा सरकारांत जप्त करणार. फडणिसीची तैनात व दरक मात्र चालवावें. एक ( सुद्धां ) राऊत ठेवूं नये. येविसीं बोलण्यास राजश्री चिंतोपंत दादा व विसाजीपंत तात्या ऐसे वांईस गेले आहेत. त्यांची गोष्ट ऐकतील न ऐकतील, यांचा दाब बसावा, याकरितां कंपू रवाना केला. आज सहा कोसांचें कूच जाहलें. त्याणीं स्वबुद्धीनें फौज अगदीं न ठेवितां सरंजामाच्या चिठ्या दिल्या असतां लढा पडणार नाहीं. तें न घडे पक्षीं मोठा खटला दिसत आहे. अब्रूवर येणार ही बाजारआवाई आहे. राजश्री बाबा फडके ‘ देवावें ’ करीत होते त्याणीं ‘ देवावें ’ करूं नये, हुजुरातेच्या फौजेचा कारभार अगदीं करूं नये. तैनात घेऊन घरीं स्वस्थ असावें. नारोपंत चक्रदेव याणीं कांहीं मखलाशी करूं नये, हें बोलणें पडलें असे; हेंही ऐकतों. येणेंप्रमाणें प्रबलता शिंद्याची भारी जाहली. राजश्री पांडुरंगराव बाबा बारामतीकर यांस निरोप श्रीमंतांचा व वडिलांचा घरास जाण्याविसीं दिल्हा असतां नीळकंठराव बापू बारामतीकर याणीं शिंद्यांस चार गोष्टी हिरण्यद्वारें सांगून दोन पागा नेमून घेतल्या कीं, बाबा गेले असतां मागाहून धरून आणावे. ऐसी ताकीद करून बापू वडिलांचे वाड्यांत आले. बाबांचा व बापूंचा मुबलक खटला जंग व्हावयाजोगता जाहला. मग वडिलांनीं चार गोष्टी सांगून राहविलें. शेवट पांडुरंगराव बाबांस जाऊं दिल्हें नाहीं बापूनीं ! ऐशा गोष्टी आहेत. शिंद्यानीं फलटण व ओतूर जुन्नरानजीकचे ऐसे ऐसे गांव कहीखालीं लुटले. चिंचचोळा कार्याकारण गेला. माणसें दोन्हीकडील जखमी जाहलीं. तोंडानीं कही

---

१ कारकून बाळाजी गणेश जोशी याचें बाळासाहेबांस पत्र.

मना म्हणतात. शिंदे आपण आणतात, आम्हांस मात्र मना आहे! खरेदीस गेलें असतां आमचीं तट्टें उंटें वैरणीचीं पाडावीं ऐसा प्रळय आहे! शिंदे वडिलांशीं बोलतांना ऐसें बोलतात कीं, 'येथील लोक लुचे, आपला दाव बसूं देणार नाहीं, म्हणून हलके करून सोडतों!' म्हणोन बोलतात. काय आहे हें न कळे. शिंद्यांचे वकील बाळोबा वगैरे यांचे डेऱ्यास वडील, श्रीपतराव, गणपतराव कोन्हेर, मुत्सद्दी, ऐसे गेले. जवाहीर वस्त्रें घेऊन आले, हें वर्तमान मार्गेच लिहावें खरें, परंतु अंतर पडलें. बाळकृष्णशास्त्री छत्रे (दत्त) विधानाचा सुलाह देईनात. विधान जाहलें हें अशास्त्र म्हणोन दोनतीन दिवस क्षेत्र करून तुळशीबागेंत बसला आहे. वडिलांस राग आला म्हणजे शहर पार करून देतील तेव्हां समजेल!

नं. ३७९३. श्रीगणपति. (वैशा० व० १४–४ जून.)

चिरंजीव राजश्री नारायणराव यांसीं आशीर्वाद. उपरी. तुम्हांकडील लोक सरकारचे वाड्यापुढें छबिन्यास रात्रीस पांचशें स्वारांची नेमणूक करून पाठवून द्यावे. अडीचशें तीनशें चांगले येऊन उभे राहत अशी ताकीद करून पाठवून देणें. छ० २७ जिल्काद. बहुत काय लिहिणें हे आशीर्वाद.

पै॥ छ० २७ जिल्काद सबा तिसैन.

नं. ३७९४. (वैशाख व० १४–४ जून.)

सरदार नारायणराव गंगाधर पटवर्धन यांजकडून सौ॥ मातुश्री उमाबाई यांस पत्र. छ० २७ जिल्कादचें—

"श्रीमंतांस वस्त्रें चतुर्थीयुक्त पंचमी गुरुवारीं आठ घटका दिवसास जाहलीं. शहरचे लोकांस बहुत आनंद जाहला. तोफांची सरबत्ती जाहली. श्री पुळ्यांच्या गणपतीस चौघडा दिला."

---

१ चिटो परशुरामभाऊंची. २ ता० २६ मे सन १७९६ दिवशीं चिमाजीआपास पेशवाईचीं वस्त्रें मिळालीं.

नं. ३७१५. ( वै. व० १४–४ जून. )

सरदार नारायणराव गंगाधर पटवर्धन यांचें माधवराव गंगाधर यांस पत्र रवाना छ० २७ जिल्काद.

" श्रीमंतांस वस्त्रें श्रीमंत महाराजांकडून आणावयाकरितां राजश्री त्रिंबकराव पेठे गेले होते. वस्त्रें श्रीमंतांस चतुर्थीयुक्त पंचमी आठ घटका दिवस जाहल्यानंतर जाहलीं. "

नं. ३७१६. श्रीगणपति. ( वैशाख व० ३०–५ जून. )

पै॥ छ० २ जिल्हेज सन सबा तिसैन. ज्येष्ठ मास.

चिरंजीव राजश्री बळवंतराव व रामचंद्रपंत आपा यांसी प्रती परशुराम रामचंद्र आशीर्वाद. उपरी राजश्री नाना वांईस आले हें पेशजी लिहिलेंच आहे. त्यास त्याणीं तेथें राहूं नये, टोक्यास जावें, तेथें चातुर्मास रहावें; मग त्यापुढें उत्तरपंथाची वाट धरावी; अशीं बोलणीं शिंदे यांजकडून पडलीं आहेत. याजविसीं त्यांची निकड फार, यास्तव नानांकडे राजश्री चिंतोपंत लिमये व विसाजीपंत वाड-देकर यांजबरोबर सारे पर्याय सांगोन पाठविले. त्याप्रमाणें त्यांचा मनोदय कीं, मेणवली अथवा वांई इतक्यांत राहूं द्यावें. कोणेविसीं बखेडा करणार नाहीं. जशी पाहिजे तशी शफत घ्यावी. परंतु शिंदे यांचे बोलणें एकच कीं, टोक्यांशिवाय दुसरें स्थान नाहीं. आपल्या सोईनें निघाल्यास बरेंच जाहलें. नाहींतर याची तजवीज करणें प्राप्त आहे. टोक्यास राहिलें असतां कोणेविसीं वांकडें व्हावयाचें नाहीं. खातरजमेनें रहावें. माया जबर. ( ? ) हीं बोलणीं नानास कळविलीं. तत्राप त्याणीं चित्तांत अंदेशा आणून चिरंजीव राजश्री कृष्णराव[1] आपा यांस येथें पाठविलें होतें. त्यास तेथील भाव समजून माघारे गेले नाहींत. शिंदे यांहीं आग्रह केला कीं, ' नाना जलदी करून निघत नाहीं, याउपर त्यांजकडे कंपूची रवानगी करितां. मग नड

---

१ आपा बळवंत मेहेंदळे.

पडेल याचा विचार पहावा. ' म्हणोन. ऐसियास आतां वोढीवर कोणत्या रंगास जाईल कळेना, याजकरितां नानाची खातरजमा करावयाकरितां चिरंजीव राजश्री महादाजीपंत दाजी यांस छ० २७ रोजीं (१पथ.) क सुद्धां वांईस रवाना केलें. बरोबर राजश्री गोविंदराव पिंगळे व बाळाजीपंत सहस्रबुद्धे यांस दिल्हे आहेत. टोंक्यांत स्वस्थ वांकडी नजर न करितां राहिलें असतां शिंदे यांजकडून भय नाहीं, याची खातरजमा असों द्यावी, याप्रमाणें दाजींनीं नानांजवळ बोलावें. कदाचित् नानांनीं दाजींस आपल्याजवळ टोंक्यास रहावें असें म्हटल्यास दाजींनीं त्यांजबरोबर तसेंच तिकडे जावें, ऐसें केलें आहे. दाजी वांईस पोंहोंचून काय ठरेल तें मागाहून लिहून पाठवितों. शिंदे यांणीं नबाबावर मसलतीस सरकारचा निरोप घेतला आहे. त्यास पुढें कूच करून जाण्यास कांहीं अवकाश आहे. जाऊं लागतील तेव्हां सरकारची फौज ( त्यांबरोबर ) पाठवावी असा बेत आहे. रवाना छ० २८ जिल्काद. बहुत काय लिहिणें हे आशीर्वाद.

नं. ३७१७. श्रीगणपति. ( वैशा० व० ३०–५ जून. )

चिरंजीव राजश्री नारायणराव यांसीं आशीर्वाद. उपरी. छबिन्यास सरकारच्या वाड्यापुढें पांचशें लोक आज अस्तमानास तुम्हांकडील पाठवून द्यावे. रवाना छ० २८ जिल्काद. हे आशीर्वाद.

पै॥ छ० २८ जिल्काद. सन सब्बां तिसैन. वैशाख मास.

नं. ३७१८. श्रीगजानन. ( ज्येष्ठ शु० १–६ जून. )

पै॥ छ० २९ जिल्काद. सन सब्बां तिसैन.

विज्ञापना. काल शिंदे यांस कंठी, शिरपेंच, वस्त्रें; बाळोबातात्या यांस वस्त्रें, कंठी; सदाशिव मल्हार, नारायणराव जिवाजी व धोंडीबा यांस शिरपेंच, वस्त्रें असें दिल्हें. पाऊण कोट रुपयेची वरात मोंगलावर

---

१ चिठी परशुरामभाऊंची. २ कारकून बाळाजी गणेश जोशी याचें बाळाबादेवास पत्र.

दिल्ही. शिंयास निरोप जाहला. श्रीमंतांस कंठी उंच किमतीची व बाबासाहेबांस शिरपेंच उंच व धवकडा ( सरकारांतून दिला. ) बाबा फडके यांणीं ' देवावें ' करावें, वडिलानीं ' घावे ' करावें असें ठरलें, हें वर्तमान कळलेंच असेल. विदित होय हे विज्ञापना. फणस मातुश्रीनीं दिला तो पाठविला आहे. हे विज्ञापना.

नं. ३७९९. श्रीगणपति. ( वैशाख व० ३०—५ जून. )

पै॥ छ० २ जिल्हेज सबा तिसैन. ज्येष्ठ मास.

चिरंजीव राजश्री बळवंतराव व रामचंद्रपंत आपा यांसी प्रती परशुराम रामचंद्र. आशीर्वाद. उपरी. राजश्री नाना यांनीं टोंक्यास रहावें येविसीं शिंदे यांचा आग्रह फार, या मजकुराचें पत्र आज सकाळीं आपणास पाठविलें आहे. पावेल. आतांच बातमी आली कीं, नाना छ० २७ रोज मंदवारीं रात्रीस वांईहून रायगडाकडे गेले ! काय अंदेशा आला कळत नाहीं, राजश्री चिंतोपंत व विसाजीपंत वांईस आहेत त्यांसही कळूं दिलें नाहीं. गेलियावर समजलें, असें त्यांचें लिहिलें आलें आहे. बरोबर मंडळी कोणकोण गेली व कोणकोण राहिली याची वगैरे बातमी उद्यां येईल. आपणास लिहून पाठवूं. याउपर श्रीइच्छेनें घडेल तें खरें. मनसब्यास प्रारंभ जाहला ! रवाना छ० २८ जिल्काद. रविवार दहा घटका रात्र आवशीची. तपशीलवार वर्तमान मागाहून लिहितों. बहुत काय लिहिणें हे आशीर्वाद.

नं. ३८००. श्रीगणपति. ( ज्येष्ठ शु० १—६ जून. )

चिरंजीव राजश्री बळवंतराव यांसी परशुराम रामचंद्र. आशीर्वाद उपरी. राजश्री नाना वाईहून अकस्मात् रायगडाकडे गेले. काय मानस आहे कळत नाहीं ! असो. श्रीइच्छेनें काय घडतें पहावें. या मजकुराचें पत्र काल रात्रौ आपल्यास व चिरंजीव राजश्री रामचंद्रपंत आपा यांस मिळोन एकच पत्र पाठविलें आहे. पावेल. अद्याप तिकडील बातमी आली नाहीं. चिरंजीव राजश्री माधवराव दाजी

---

१ हरि परशुराम यांस.

खंडयाळाचे मुक्कामीं गेले. चिरंजीव राजश्री रामचंद्रपंत आपा यांस लाखोटा पाठविला आहे. त्यांजकडे लाऊन द्यावा. रा॥ छ० २९ जिल्काद. बहुतकाय लिहिणें हे आशीर्वाद.

पै॥ छ० २ जिल्हेज सन सबा तिसैन. ज्येष्ठमास. ९ तास दिवस.

नं. ३८०१. श्री. ( ज्येष्ठ शु० १–६ जून. )

छ०[1] २९ जिल्काद. सन सबा तिसैन. काल हबेरकर ब्राह्मण असामी २ दोन अटकेंत ठेविले आहेत, त्यांची आज भोजनाची आज्ञा ? कानडें माणूस उपासास घट्ट आहे. एकाएकीं ताळेवर याव-याचें नाहीं. आज्ञेप्रमाणें करूं.

उ० भोजन करून यावें असा[2] पेणी कोण होतो ! लिहिणें.

नं. ३८०२. ( ज्येष्ठ शु० १–६ जून. )

चिरंजीव राजश्री नारायणराव यांसीं आशीर्वाद. उपरी. उद्यां भौमवारीं प्रातःकाळींच तुम्हांकडील पांचशें स्वार छबिन्यास- पाठवून द्यावे. रवाना छ० २९ जिल्काद. इंदुवार. हे आशीर्वाद.

पै॥ छ० २९ माहे जिल्काद. सुरू सन सबा तिसैन. ज्येष्ठ मास.

नं. ३८०३. श्रीगणपति. ( ज्येष्ठ शु० २–७ जून. )

पै॥ छ० ३ जिल्हेज सन सबा तिसैन. ज्येष्ठ मास आवशीची तीन घटका रात्र.

चिरंजीव[3] राजश्री बळवंतराव व रामचंद्रपंत आपा यांसी आशी-र्वाद उपरी. राजश्री नाना वाईहून निघोन गेले हें परवां लिहिलेंच आहे. अद्याप अमुक ठिकाणास गेले हें लिहिलें आलें नाहीं. राजश्री त्रिंबकराव परचुरे येथें होते ते छ० २८ जिल्कादीं अस्तमानच्या

१ मिरजेच्या किल्ल्यांतल्या किल्ल्यांतच चिटी व तिचें उत्तर. चिटी दिवाण नारोपंत दामले यांची. उत्तर बाळासाहेबांचें. २ जेवणार कोण पतकरतो. ३ पत्र परशुरामभाऊंचें.

सुमारें पळोन गेले. त्यांचा पत्ता नाहीं. तासगांवचे लखोटे पाठविले आहेत. रवाना करावे. रा. चिंतोपंत व विसाजीपंत वाईस गेले होते ते काल येथें आले. रा॥ छ० १ जिल्हेज. बहुत काय लिहिणें हे आशीर्वाद.

नं. ३८०४. श्रीगणपति. ( ज्येष्ठ शु० ५–१० जून. )

पै॥ छ० ७ जिल्हेज आवशीचीं सहा तास रात्र.

चिरंजीव राजश्री बळवंतराव व रामचंद्रपंत आपा यांसी आशीर्वाद उपरी. राजश्री नाना वाईहून निघोन गेल्याचें पेशजी लिहिलेंच आहे. तेव्हां अमुक ठिकाणीं पोहोंचले ही बातमी नव्हती. हल्लीं रायगडानजीक पांच कोसांच्या अंतरावर महाड म्हणोन गांव आहे तेथें आहेत अशी बातमी आहे. रा॥ छ० ५ जिल्हेज बहुत काय लिहिणें हे आशीर्वाद.

नं. ३८०५. श्रीगणपति. ( ज्येष्ठ शु० ८–१३ जून. )

चि॥[२] राजश्री बळवंतराव व रामचंद्रपंत आपा यांसीं आशीर्वाद उपरी. राजश्री नाना रायगडानजीक महाडास आहेत. तेथून रायगड पांच सहा कोस आहे. त्यांजवळ तीनसाडेतीन हजार फौज होती त्यांतून बहुतेकांनीं निकाल काढिला. प्रस्तुत पांच सातशें लोक आहेत अशी बातमी व कोणी कोणी निकाल काढून आले ते आढळतात त्यांच्या सांगण्यांत आहे. शिंदे यांजकडील फौज व पलटणें त्यांजवर जावयाची तयारी होत आहे व सरकारची फौज जावी असा बेत आहे. शिंद्यांकडीलही लोक घांटास चौकीकरितां पोंचले आहेत. श्रीइच्छेनें घडेल तें प्रमाण ! चि॥ राजश्री त्रिंबकरावआपा येथें येऊन पोंचले. तासगांवचे लखोटे पाठविले आहेत ते रवाना करावे. रवाना छ० ७ जिल्हेज बहुत काय लिहिणें हे आशीर्वाद.

---

१ पत्र परशुरामभाऊंचें. २ पत्र परशुरामभाऊंचें.

नं. ३८०६. श्रीगजानन. ( ज्येष्ठ शु० ८–१३ जून. )

विज्ञापना. छ० ७ जिल्हेज. बाजारी वार्ता—

१ श्री॥ राजश्री बाजीराव बाबासाहेब यांस व अमृतराव जुन्नरास आहेत त्यांस सहकुटुंब बऱ्हाणपुरास ठेवावें. उभयतांस एकी जागां पाच सात लक्षांची जहागीर द्यावी. बाबासाहेब याणीं दौलतीस राज्यास अधिकार नाहीं ऐसें पत्र श्री॥ राजश्री आपासाहेब प्रधान यांचे नावें लिहून द्यावें. ( असें ठरलें. )

१ दौलतराव बाबा शिंदे अलिजाबहादूर याणीं वानवडीवर छावणीस येऊन रहावें, ( हा बेत केला. ) बारामतीची कही जाहली. चिंधीचोळा गेला.

१ राजश्री नानाकडील कारकून टिपूकडे गेला आहे.

१ श्री॥ राजश्री बापूसाहेब यांचें लग्न शु० पंचमी भृगुवारीं चोवीस घटका दिवसास जाहलें. चार रोज समारंभ बराच जाहला. आज साडे होणार.

१ मीर जुमला नबाबाकडील येथें येऊन गुदस्तां राहिले. त्यांस शिंद्यांनीं धरून नेलें. पांच सातशें करोल येऊन घेऊन गेले.

१ रायगडच्या रोखें चार पलटणें रवाना जाहलीं. घाटमाथां रहावें ऐसा हुकूम आहे.

---

श्रुत होय. पत्र दुसऱ्यांनीं पाहूं नये. हे विज्ञापना.

नं. ३८०७. श्रीगणपति. ( ज्ये० शु० १२–१७ जून. )

चि॥ राजश्री बळवंतराव यांसीं प्रति परशुराम रामचंद्र. आशीर्वाद उपरि. शिंद्यांची नजर परांड्याच्या किल्ल्यावर, सबब त्याणीं त्या उद्देशें कंपूची रवानगी केली व फौजही ( रवाना केली ) आहे.

---

१ कारकून बाळाजी गणेश जोशी यांचें बाळासाहेबांस पत्र. २ विठ्ठलराव पांडुरंग.

तरडगांवाजवळ पोहोंचल्याची बातमी आली. आजपावेतों परांड्या-+......जवळ केली असेल. तेथून करकंब परगणा लगता आहे. याजकरितां राजश्री बाळाजी केशव यांस येथून पत्र पाठविलें आहे. आपणही त्यांस लिहून कंपूंतील व फौजेंतील सरदारांस चार रुपये कबूल करवून परगण्याचा ...... बाळाजी केशव यास हा इशारा लिहिला आहे. ... कंपूची बेकैदी यास्तव जलदीनें करवावें. रवाना छ० ११ जिल्हेज. बहुत काय लिहिणें हे आशीर्वाद.

पै॥ छ० १३ जिल्हेज. सन सबा तिसैन. ज्येष्ठ शु० चतुर्दशी. रविवार. पहांटेची रात्र चार घटका.

नं. ३८०८. श्रीगजानन. ( ज्येष्ठ शु० १२–१७ जून )

सेवेशीं विज्ञापना. ता॥ छ० ११ जिल्हेज. बाजारी वर्तमान ऐकींव. खरें नव्हे.

१ नबाब बंदेगानअलीची फौज व पलटणें इंग्रजी ऐशीं बेदरास आलीं. मुसा मुत्रीम खासा पलटणांबरोबर आहे.

१. टिपूकडे संधान करावयास कारकून नानानीं पाठविला

१. बाणकोटास आहेत तेथून बाजत बरसात मसलत भारी ज़ाहली तर ( इंग्रजानीं ) साष्टीचा किल्ला रिकामा करून द्यावा. लोक झाडून नानानीं ठेवावे. ( साष्टीची ) हवा चांगली. तेथें रहावें. पंधरा पलटणें जदीद सही करून मसलत करावी. एवंच आपण मुख्यत्वें राज्य करावें.

१. श्री॥ राजश्री बाजीराव बाबासाहेब यांस अशेरीचे किल्लेवर सहकुटुंब अमृतराव सुद्धां ठेवावें. ( असें ठरलें. ) बऱ्हाणपुरा-नजीक आहे.

---

+ टिंबें दिलेल्या ठिकाणीं पत्र कसरीनें खाल्ल्यामुळें अक्षरें गेलीं आहेत.

१ कारकून बाळाजी गणेश जोशी याचें बाळासाहेबांस पत्र. २ नाना बाणकोटास आहेत ही लेखकाची बातमी अगदींच चुकली, त्यानें हवेबद्दल साष्टीची ( ठाण्याची ! ) शिफारस केली आहे ती वाचून वाचकास आश्चर्य वाटेल !

१. राजश्री नानाचें व पुणेंकर हुजरात पागा कार्याकारण मुत्सद्दी यांची झाडून ऐक्यता जाहली.

१. महादाजीपंत बेहेरे यांजकडील फौज झाडून दूर केली.

१. परांड्याचा किल्ला घ्यावयाविशीं शिंद्यानीं पलटणें रवानगी केलीं. परांड्यानजीक गेले.

येणेंप्रमाणें बाजारी वार्ता आहे. सत्य मिथ्या ईश्वर जाणे. विदित होय हे विज्ञापि.

नं. ३८०९. श्री. ( ज्येष्ठ शु॰ १३–१८ जून. )

पै॥ छ॰ १६ जिल्हेज सन सबा तिसैन.

सेवेशीं सा॥ नमस्कार विज्ञापना. तागायत छ॰ १२ जिल्हेज पावेतों यथास्थित असे. विशेष इकडील वर्तमान तरी—

१. श्री॥ राजश्री बाजीराव व अमृतराव कुटुंबसह वर्तमान बरानपुरास ठेवणेंचा सिद्धांत जाहला. खर्चास गुजरातपैकीं पांचलक्षांचे महाल लाऊन द्यावे ( असें ठरलें. ) राजश्री अमृतराव यांसीं आणावयासीं शिंदे यांजकडील फौज गेली. शिंदे यांचे लष्करांत उभयतां एकत्र करून बरानपुरास घेऊन जाणार. अथवा परभारेंच अमृतराव यांसीं न्यावें असेंही बोलतात. अमृतराव यांचे रखवालीस काशीपंत मामा यांजकडील गारद आहे. त्याचे कारभारियासीं सरकारची सनद शिंदे यांचे हवालीं करणेंविशीं गेली. पुढें काय होतें पहावें.

१. राजश्री अन्याबा फडके नानांबरोबर रायगडास गेले. आठ चार दिवस तेथें राहून लग्न करावयासीं म्हणोन निरोप घेऊन सुवर्णदुर्गास आले. पहिली बायको अशक्त याजमुळें दुसरें लग्नही केलें असें बोलतात.

१. राजश्री बाळोबा प.गनीस व सदाशिव मल्हार व धोंडीबा ऐसे त्रिवर्ग फडके यांचे बागेंत गुलटेकडीजवळ राहिले होते ते

---

१ कारकून शिलेदार बाबाजी विश्वनाथ वाकेकर यांचें हें बाळासाहेबांस पत्र.
२ [illegible]

लष्करास शिंदे यांजकडे गेले. बरानपुरचा सिद्धांत जाहलिया-
वर गेले.

१. शिंदे यांसीं पाउणकोटीची वरात मोगलावर दिली होती
त्यास हल्लीं वरातेचें बोलणें माघारी देणेंचे घातलें आहे!
वरातबाबत ऐवज आम्हास येथेंच द्यावा असे आवाज बोलणेचे
निघतात! शिंदे यांचे लष्करांत खर्चाची ओढ बहुत आहे.
शिंदे याणीं आपले फौजेची गणती घेतली. दोन चार दिवस
जाहले.

१ राजश्री रामाजी अनंत व सखोरुद्र यांसीं बीडचे मामलतीचीं
वस्त्रें सरकारचीं छ० ७ जिल्हेजीं इंदुवारीं आवशीचे सात
घटका रात्रीस जाहलीं. ठाणीं बसवावयासीं सरकारच्या पांच
पागा व बारामतीकरांच्या पागा नेमिल्या आहेत. सखोरुद्र पुढें
जाणार. रामाजी अनंत येथें राहणार. दोन लक्ष रुपये रस-
देचे दिले.

१ राजश्री नाना फडणीस हल्लीं महाडास आहेत. पर्जन्यकाळीं
किल्ल्याची हवा चांगली नाहीं म्हणोन तूर्त खालींच आहेत.
फौजेस निरोप दिला. घाटाघाटानीं चौक्या बसविल्या आहेत.

१ राजश्री चिंतोपंत लिमये यांसीं पुण्यातील नाकेबंदीची चौकशी
व बाहेरील चौक्यांची बंदोबस्ती सांगितली आहे. हाताखालीं
राजश्री जयराम बाबाजी जोशी आहेत. राघोपंत गोडबोले
यांजकडे पाउणशें प्यादे होते तेच प्यादे जयराम बाबाजी-
कडे दिले. जमी वगैरे चौकशी सांगितली आहे.

१ राजश्री हरी विष्णु याजकडे राघोपंत गोडबोले यांजकडील
तोफखाना सांगणार असें बोलतात. हल्ली तोफेचे प्यादे त्याज-
कडे आहेत.

१ राजश्री श्रीपतराव भाऊ अमदाबादेचा सुभा करणार असें दाट
बोलतात. खटपटींत आहेत. दोन लक्षांचा भरणा करावा लागतो.

येणेंप्रमाणें ऐकींव कळला मजकूर लिहिला आहे. बिडाकडे टाणीं बसवावयासीं राजश्री नारायणराव भिकाजी यांची पागा वगैरे नेमिली आहे. सेवेशीं श्रुत हे विज्ञापना.

नं. ३८१०. श्री. ( ज्येष्ठ शु० १५–२० जून. )

पै॥ छ० १६ जिल्हेज. सन सबा तिसैन. सात तास रात्र.

सेवेशीं सा॥ नमस्कार विज्ञापना तागायत छ० १४ जिल्हेज पावेतों यथास्थित असे. विशेष. इकडील मजकूर तरी—

१ मीर जुमला मोंगलाकडील पेशजी औरंगाबाद येथील सुभा करीत होता. मोंगलाचें कांहीं वांकडें पडलें सबब राजश्री नाना फडणीस यांचा आश्रय करून पुण्यांत राहिला होता. त्यास शिंदे याणीं राऊत पांचशें पाठवून धरून नेलें. हल्लीं शिंदे यांचे लष्करांत चौकींत आहे. आठ दहा दिवस होत आले.

१ राजश्री बापूजी बल्लाळ लेले यांचे घरीं शिंदे यांची चौकी बसली आहे. पांच सहा दिवस जाहले.

१ राजश्री बाजी नारायण सोवनी राजश्री नाना फडणीस यांचे खासगत सरंजामाचे महाल आहेत तेथील कमावीसदार-त्यांस शिंदे याणीं धरून नेलें. चार दिवस जाहले.

१ नाना फडणीस यांचा सावकारींत पैका आहे. त्यास सरकारांतून थोडीबहुत निकड सावकारांस होते असें बोलतात.

१ राजश्री अमृतराव यांसीं जुनराहून आणावयासी शिंदे यांची फौज गेली आहे. त्यास अमृतराव येत नाहीं. अतिशयास आले आहेत. कसें होईल तें पहावें.

१ मोंगलांची फौज कांहीं बेदरास आली. मुसा रेमू फिरंगी पंधरा पलटणें घेऊन आला व कांहीं फौज आहे.

---

१ कारकून शिलेदार बाबाजी विश्वनाथ यांचे बाळासाहेबांस पत्र.

१ शिंदे यांचा कंपू परांडे नजीक छावणीस जात आहे. भीमा-पार जाहला. सणसरचे मुकामास गेल्याची बातमी आली होती.

१ मोंगलाचा जमाव बेदरास आला हें वर्तमान शिंदे यांसी समजलियावर हिंदुस्थानांतून एक कंपू व वीस हजार पेंढार देशीं आणविलें आहे.

१ मुंबईस आठ नऊ पलटणें जमा जाहलीं. पंधरा पलटणें जमा करीत आहेत म्हणोन बोलतात.

१ शिंदे यांचा कारकून करवीराकडे गेला आहे जे, " तुम्हीं नानांचे लक्षांत न लागणें. लागलियासीं पारिपत्य होईल. " या विचारास गेला आहे.

१ शिंदे यांचे कारभारी बोलतात जे, " मोंगलाची व इंग्रजांची दोनी मसलती आम्हांस जाहलेल्या समजल्या. काय चिंता आहे ! दोघांचें पारिपत्यच करूं. टिपूची फौज आलियासीं त्याचा बंदोबस्त श्री॥ राजश्री भाऊसाहेबानीं करावा. श्रीमंतानीं व भाऊसाहेबानीं पुण्यांत स्वस्थ रहावें. इंग्रज व मोगल पाहून घेतों. इतकें असोन मसलत न संभाळे तरी श्रीमंतांस घेऊन फिरों ! राज्याची आस्था कोणास आहे ? " असे बोलणेंचे आवाज निघतात.

---

येणेंप्रमाणें बाजारी वर्तमान ऐकींव लिहिलें आहे. पुण्यांत उदमी लोकांचे कडबे विकाऊ आहेत; त्यास सरकारचे पागेवाले गंजीचा अजमास करून निमे पैका देतात. आणि गंजी भरून नेतात ! बाकी निमे पैका पुढें देऊं म्हणोन सांगतात ! ऐसा प्रकार आहे. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

नं. ३८११. श्रीगजानन. ( ज्येष्ठ व० ३–२३ जून. )

पै॥ छ० २३ जिल्हेज. सन सबा तिसैन.

विज्ञापना. बाजारी वर्तमान ऐकीव. छ० १७ जिल्हेज.—

१. राजश्री नानाविशीं इंग्रजानीं शिंद्यांस पत्र प्रथम पाठविलें व नजराणा गोमांतकी आंबे पाठविले. त्यास अलिजाबहादूर याणीं उत्तर दिलें, 'आपले विचारें कैसें करावें हें लिहून पाठवावें. आपलें उत्तर येईल त्याप्रमाणें ( विचार ) होईल.

१. ( इंग्रजांचें ) दुसरें पत्र आलें जे, " राजश्री नाना कारभारास असों नयेत, उत्तम आहे. परंतु मेणवलीस अथवा मर्जीस येईल तेथें रहावें. सरकारचा फंद फितूर हिल्ला हरकत करूं नये ऐसें ( ठरलें ) असतां तुम्ही पागा फौज नानाकडे रवाना करावयाचें कारण काय ? बरें. असो. आतां नानास दोन अडीच हजार फौज व पांच हजार पायदळ याचा सरंजाम, शिवाय दोन किल्ले द्यावे. स्वस्थ स्नान संध्या करून राहतील. फंद फितुराविशीं आपली खातरजमा आम्ही करितों. आपण त्यांचे अन्नविशीं आमची करावी. ते कारभार अगदीं करीत नाहींत. ऐसें म्हटलेनीं तें न होय, पक्षीं नाना मसलत करितील " म्हणोन सुचविलें आहे. अलिजाबहादूर यांजकडील कारभारी यांचा आग्रह नानानीं कारभारांत अगदीं असूं नये ऐसें आहे. काय ठरतें पहावें.

१. सर्व गोटी न ऐकिल्यास नाना मसलत करणार. इंग्रज सामील.

१ गोविंदराव पिंगळे याणीं नबाबाकडील ऐवज शिंद्यांस पावता करून पोहोची आणून देतों म्हणोन बोलणें ठरावांत आणिलें आहे.

१ मशरनमुल्ख यांस सोडावें, पांच रुपये सरकारांत देतां, दोन रुपये दरबारखर्चाचे ऐवजीं देतों, हें बोलणें गोविंदराव पिंगळे

---

१ कारकून बाळाजी गणेश जोशी याचें बाळासाहेबांस पत्र.

बोलतात. परंतु अद्याप जाबसाल सरकारांतून निश्चय नाहीं. उगाच नाद लाविला आहे. कदाचित् जळचराची मसलत पडली तर मशीर यास सोडून नबाब बंदेगान अली याचा सुलाह आपल्याकडे करून घ्यावा, दोन शह पुरणार नाहींत, म्हणोन संधान आहे.

१. राजश्री बापू लेले यांचे घरीं चौकी बसली आहे शिंद्यांकडील, त्या विशींचे बोलणें हरभट नि॥ गोळे बोलत होते. त्यांजवळ वडील यजमानांची आज्ञा जाहली, ' ज्याची चौकी आहे त्याजकडेच संधान करावें. आम्ही बोललों असतां ठीक पडणार नाहीं. ' ऐसें म्हणणें वडिलांचें आहे. लेले याजकडे अंतर भारी ऐशी बोलवा आहे. काय अंतर आहे न कळे. नानावर तजकरा लेहून दिला लेल्याचे कारकुनानें, तो रूजू करून देणेंविशीं चौकी बसली आहे म्हणोन लोक बोलतात.

१. शिंद्याकडील पलटणें व तोफा रवाना होणार. नानाकडे ही बातमी गेल्यावर रायगडास नवें दोन तीन हजार माणूस किल्लेवर ठेऊन किल्याचा पक्का बंदोबस्त केला आणि आपण खासा ( नाना ) किल्यावर गेले.

१. परभू चिटणीस यांचे घरीं लग्न कार्य जाहलें. तेव्हां वडिलांजवळ येऊन विनंती केली, ' लग्न कार्य करणार. तेव्हां आज्ञा जाहली जे, श्री॥ कैलासवासी रावसाहेबांचे वेळेस ठर जाहला आहे त्याप्रमाणें कार्य करावें. जाजती मंत्र वगैरे कांहीं कर्मे केल्यास श्री॥ राजश्री आपासाहेब यांचे जाहिराण्यांत आल्यास पारिपत्य करितील. तें ठीक नव्हे. करार ठरला आहे त्याजप्रमाणें करावें. ऐशी आज्ञा होतांच लाजाहोम वगैरे कृत्य कांहीं केलें नाहीं. शूद्रवत् लग्न कार्य केलें.

---

१ परशुरामभाऊ.

१. मृगाचा पर्जन्य थोडासा पडला. पेरे होत नाहींत. दाणे ८८२।. बाजरी ८८२ कडबा शेकडा ८॥।१।१० ऐशी महर्घता जाहली आहे.

श्रीइच्छा !

---

येणेंप्रमाणें बाजारी वर्तमान ऐकींव. विदित होय हे विज्ञप्ति.

नं. ३८१२. श्रीगजानन. ( ज्येष्ठ व० ५–२५ जून. )

पै० छ० २३ जिल्हेज सबा तिसैन.

विज्ञापना बाजारी वर्तमान छ० १९ जिल्हेज—

साष्टीचा किल्ला इंग्रजानीं आपला माल काढून रिकामा केला. राजश्री नाना फडणीसांस रहावयासीं देणार. व हबशी याणींही नानास आसरा दिला आहे. राजश्री राघोपंत गोडबोले यांचा ऐवज तोरण्याच्या किल्यावर सचिवांच्या तर्फेनें होता त्याची बातमी अलिजाबहाद्दर यांस लागली. तेव्हां सचिवांकडे सांगोन पाठवून जोरतलबेनें ऐवज शिंदे याणीं आणिला म्हणून वार्ता आहे. राजश्री त्रिंबकराव व बापू परचुरे पळोन पुरंदरास गेले होते. येथून सरकारचें आज्ञापत्र किल्लेकरांस नेऊन उभयतां बंधु यांस शिंदे याणीं आपले गोटांत आणिलें. शिंदे यांस ईश्वर कोणीकडून हरतऱ्हेनें चार रुपये देतो ! शिंदे यांचा कंपू परांड्याकडे गेला होता. रावरंभाचे परगण्यांत कहीकबाडाचा उपद्रव होऊं लागला तेव्हां रावरंभा याणीं स्वारी करून कंपूची कही मारली म्हणोन वर्तमान आहे. मालिटाचा व नानाचा संकेत खचित जाहला. राजश्री नारायणराव भिकाजी जुन्नराकडे गेले नाहीं. दुसरेकडे कामगिरीस गेले. कामगारी कोठील, काय वर्तमान, हें ठीक लागलें नाहीं. कळावें सेवेशीं विदित होय हे विज्ञप्ति.

---

१ कारकून बाळाजी गणेश जोशी यांचें हें बाळासाहेबांस पत्र.

नं. ३८१३. श्री. ( २६ जून. )

पै॥ छ० २३ जिल्हेज. सन सबां तिसैन.

सेवेशीं धोंडो बापूजी व मोरो आपाजी. चरणांवर मस्तक ठेवून शिरसा॥ नमस्कार विज्ञापना. तागायत ज्येष्ठ व॥ ६ भानुवासर मु॥ पुणें सेवकांचें वर्तमान यथास्थित असे. विशेष राजकी वर्तमान तर श्री॥ राजश्री नाना फडणीस महाडास गेल्यानंतर शिलेदार व पागा होत्या त्यांस सर्वांस निरोप दिला. पंधरा दिवस लोक तेथें होते. कोंकणातील पर्जन्यानें शें दीडशें घोडे व चाळीस पन्नास उंट मेले. हल्लीं नानांजवळ सरकारनिसबत कोणी एक नाहीं. खास पथकांपैकीं शें दीडशें स्वार व आणखी चाळीस पन्नास भले माणूस व पांचशें गाडदी याप्रमाणें तेथें आहेत. रायरीखालीं मौजे पाचाण म्हणोन गांव आहे तेथें आठ चार दिवस होते. किल्यावर एक दोन दिवस होते. हवा बहुत सर्द. तेथें मानत नाहीं. हल्लीं रायगडास आहेत ऐसेंही म्हणतात. कोणी महाडास आहेत ऐसें बोलणें बोलतात. साष्टी किल्ला इंग्रज रहावयासीं देणार. किल्ल्यांतील सरंजाम काढून इंग्रज मुंबईस नेत आहे. पांच सात घांट नानानी माणसें लाऊन खणोन खालीं उतरावयाचा उपाय नाहीं याप्रमाणें केलें. मोठे मोठे वृक्ष तोडून घांट बुजवून टाकिले ! कोंकणांत फौजा रवाना होणार. राजश्री बाळाजी भिवराव-शिंदे यांजकडील गृहस्थ-यांची नेमणूक होऊन पुलानजीक मुहूर्त करून राहिले पांच पलटणें व पागा व शिलेदार समागमें देऊन कोकणांत रवानगी होणार. मढा घांट अथवा शेवता याच घांटानें खालीं जावें याप्रमाणें योजना आहे. घांट तो खंटले आहेत. तेच नीट करून तिकडूनच जावें याप्रमाणें मसलत होत आहे. कोकणांत पर्जन्य बहुत. कसें होतें पहावें. राजश्री त्रिंबकराव परचुरे पुण्यांतून पळाले होते ते पुरंदर किल्यावर गेले. तेथूनही निघून जावें तों सरकारांत कळलें. किल्लेकरी यांस पत्र सरकारचें गेलें कीं, परचुरे

---

१ उभयतांही कारकून पटवर्धनांचे. आडनांवें अनुक्रमें जोशी व परांजपे. त्यांचें हें बाळासाहेबांस पत्र. २ खणिले.

यांस जाऊं न देणें. मागाहून पागा पाठवून उभयतां बंधूंस पुण्यास आणिलें. बागांत राहिले आहेत. पुण्यांतील वाड्यांत मुलें माणसें आहेत, तेथें चौकी आहे. सेवेशीं आढळलें वर्तमान विनंती लिहिली आहे. मागाहून सविस्तर विनंती लिहितों. श्रुत होय हे विज्ञाप्ति.

नं. ३८१४. श्री. ( ज्येष्ठ व० ७–२७ जून. )

पै॥ छ० २३ जिल्हेज. सन सबा तिसैन.

सेवेशीं सा॥ नमस्कार विज्ञापना तागायत छ० ११ जिल्हेज-पावेतों यथास्थित असे. विशेष. इकडील मजकूर तरी—

१ राजश्री नाना फडणीस याणीं इंग्रजांजवळ साष्टीचें बोलणें लाविलें. तेव्हां त्याणीं उत्तर सहा[3] आणेचा कागद मागें दादा-साहेबानीं लिहून दिला आहे त्याप्रमाणें तुम्ही द्यावा. तेव्हां नानानीं उत्तर केलें जे, त्याणीं कागद दिला तो कोठें प्रमाण जाहला ? आम्ही पेशवेचे पदरचे कारकून. आमचा कागद काय प्रमाण ? आम्हीं कागद लिहून देत नाहीं. तेव्हां इंग्रजानीं दुसरें बोलणें लाविलें जे, दादासाहेब याणीं कर्ज सत्तावन लक्ष घेऊन खत लिहून दिलें आहे हा ऐवज द्यावा. तेव्हां नानाचें उत्तर जाहलें जे, आम्ही कारभार करूं लागलियासीं कर्जाचा ऐवज देऊं. पंधरा पलटणें इंग्रजानीं द्यावी, त्यांस रोजमरा नानानीं द्यावा, साष्टी रहावयासीं द्यावी, मोबदला विजयदुर्गचा किल्ला द्यावा, असा करार ठरला म्हणून बोलतात.

१ राजश्री दादा गद्रे याजकडे रायगड किल्ला आहे. त्यास राजश्री नाना फडणीस महाडास गेले तेव्हां गद्रे यांचे बायकोनें किल्यावर होती तेथें मनसबा केला जे, नानास किल्यावर घेऊं नये. कांहीं शिंदे यांजकडील फितूर होता. हा मजकूर नानास समज-लियावर दादा गद्रे किल्यावर जाऊन बंदोबस्त केला. बाइ-

---

१ कारकून शिलेदार बाबाजी विश्वनाथ चाफेकर याचें बाळासाहेबांस पत्र. २ साष्टी रहावयास द्यावी म्हणून. ३ पेशवाईपैकीं दहा आणे पेशव्यांचे व सहा आणे इंग्रजांचे.

कोस किल्लयाखालीं घेऊन आले. नाना फडणीस मुहूर्तेंकरून किल्लयावर पूर्वीं लोक घालून गेले होते. किल्ला पाहून महाडास आले.

१ श्री॥ राजश्री बाजीरावसाहेब व दौलतराव शिंदे यांचीं खलबतें होतात. तेरावे नांवाचे ( ? ) कोणी नसतात. खलबतामध्यें कांहीं मनसबा दिसतो. काय होईल तें पहावें.

१ राजश्री त्रिंबकराव परचुरे यांचे बोलणें शिंदे यांजकडे लागोन पुरंदराहून आले. पांच लक्ष ऐन, सव्वा लक्ष दरबार खर्च, याप्रों ऐवज पडला म्हणोन बोलतात. हल्लीं शिंदे यांचे लष्करांत परचुरे आहेत.

१ मशुरुल्‌मुलुख हल्लीं पुण्यांत चौकींत आहे त्यास सुटोन जाण्याचें बोलणें शिंदे यांजकडे लागलें आहे. पैका अमुक असा ठरला नाहीं.

१ राजश्री नारायणराव भिकाजी यांची पागा वगैरे दोन पागा ऐसे आठ दिवसांचे कामगारीस गेले आहेत. काम कोणतें हें समजलें नाहीं. कुणी म्हणतात मोरोबा दादास आणावयासीं नगरास गेले. कोणी म्हणतात रावोपंत गोडबोले याचा पैका साडेचार लक्ष तोरणा किल्लयावर आहे तो ऐवज आणावयासीं गेले असें म्हणतात. प्रमाण लागत नाहीं.

---

येणेंप्रमाणें मजकूर ऐकींव लिहिला आहे. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

नं. ३८१५. श्री. ( ज्येष्ट व० ७–२७ जून. )

पै॥ छ० २२ जिल्हेज. सबा तिसैन.

विज्ञापना. राजश्री अमृतराव जुन्नराहून लौकरच येणार असें बोलतात. शिंदे यांचें व ( त्यांचे ) कारभारी यांचें कांहीं वांकडें आलें

१ कारकून शिलेदार बाबाजी विश्वनाथ चाकेकर यांचें हें बाळासाहेबांस पत्र.

असेंही बोलतात. हल्लीं शिंदे यांचे त्रिवर्ग कारभारी गुलटेकडीजवळ बागेंत आले आहेत. मालीट इंग्रजाचें व शिंदे यांचें व नानाफडणीस व श्री॥ राजश्री बाजीराव साहेब हा ग्रंथ एक जाहला आहे असें बोलतात. यांमध्यें शिंदे यांचे कारभारी नाहींत. पुढें कसें होईल तें पहावें. शिंदे यांची कही पाडळी पावेतों गेली. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

नं. ३८१६. श्री. ( ज्येष्ठ व० ७–२७ जून. )

पै॥ छ० २३ जिल्हेज सबा तिसैन.

पु॥ विज्ञापना शिंदे यांजकडे थोरले गृहस्थ आहेत त्यांस व जुन्नरच्यांस कुटुंबसह अशेरीस रवानगी होणार असें आहे. कधीं रवानगी होते पहावें. लेखक गृहस्थ रायगडास आहेत. त्याणीं चहूंकडे संधानें लाविलीं आहेत. ( इंग्रजाकडून ) साष्टीचा किल्ला रिकामा करविला. इकडील कांहीं निकडच कदाचित् दृष्टीस पडल्यास साष्टीस जाणार असें वर्तमान ऐकण्यांत आहे. राजश्री बाबाजीपंत जोशी सविस्तर सेवेशीं लिहीतच आहेत. विदित होय हे विज्ञापना.

नं. ३८१७ ( ज्येष्ठ व० ७–२७ जून. )

बाळाजी गणेश जोशी याजकडून मिरजेस बाळासाहेबांस पत्र पै॥ छ० २३ जिल्हेज. सबा तिसैन.

" श्री॥ राजश्री बाजीराव यांजवळ मानाजी फांकडे व पाटणकर व जाधव वगैरे आणखी दोन असामी होती त्याप्रमाणें आहेत. पुढें रवानगीचे समयीं काय टरतें पहावें. श्रीमंतांची स्वारी पर्वतीस पौर्णिमेचे दिवशीं गेली. बरोबर वडील व सर्व सरदार यांस बोलाविलें. किंचित् रमण्यांत घोडीं फेरलीं. "

---

१ मुत्सद्दी कारकून बापूराव शिवाजी म्हैसरकर याचें बाळासाहेबांस पत्र. २ असीरगडनजीक बऱ्हाणपुर. ३ चिमाजीआपाची. ४ परशुरामभाऊ.

नं. ३८१८. **श्रीगणराज.** ( ज्येष्ठ व० १०–३० जून. )

चि॥ राजश्री नारायणराव यांसीं प्रति गंगाधरराव गोविंद आशीर्वाद उपरी. येथील कुशल जाणोन स्वकीय लिहिणें. विशेष. शिलेदार गु॥ विश्वासराव सर्जाराव घाटगे यांचे तैनात जाबते लष्करांत सन सीत तिसैनचे आहेत त्यांच्या नकला करून पाठवून देणें. रवाना छ० २४ जिल्हेज सु॥ सबा तिसैन मय्या व अल्लफ हे आशीर्वाद.

नं. ३८१९. **श्रीगणपति.** ( ज्येष्ठ व० ११–१ जुलै. )

चिरंजीव नारायणराव यासी प्रती परशुराम रामचंद्र. आशीर्वाद उपरी. श्रीमंतांची स्वारी आज पर्वतीस जाणार याजकरितां तुम्ही पांचशें लोकांनिशीं तयार होऊन तोफखान्याच्या पुढें रस्त्यावर फन्यानें उभें रहावें. रा॥ छ० २५ जिल्हेज. हे आशीर्वाद.

पै॥ छ० २५ माहे जिल्हेज, सु॥ सबा तिसैन.

नं. ३८२०. **श्रीगजानन.** ( आषाढ शु० १–५ जुलई. )

पै॥ छ० मोहोरम. सातवा तास रात्र. सन सबा तिसैन.

विज्ञापना तागायत छ० २९ जिल्हेज. क्षेम असे. बाजारी वर्तमान ऐकींव. खरें अगदीं नव्हे.—

१. राजश्री नारायणराव भिकाजी दोन तीन पागा व शिलेदार ऐसे घेऊन गेले ते कोणीकडे गेले हें ठिकाण नाहीं. कोणी बोलतात, " राजश्री यशवंतराव नगरकर यांजकडे अमदानगर व दौलताबाद व त्रिंबकहर्ष वगैरे किल्ले आहेत. ( सदरहू नगकर यांस ) नगराहून दौलताबादेस जातानां मार्गांतून धरून आणावयासाठीं गेले " ऐसें वर्तमान आहे.

१. दुसरें—राजश्री मोरोबादादा फडणीस यांस आणावयास गेले आहेत हेही लोकवार्ता.

१. शिंद्याकडील बोलणें पडलें आहे कीं, राजश्री बाबा फडके 'देवावें' करीत होते तें राहिलें, त्याणीं करूं नये ऐसें टरलें,

१ कारकून बाळाजी गणेश जोशी याचें बाळासाहेबांस पत्र.

त्या पक्षीं ' यावें ' आपण करावें. आम्ही ' देवावें ' करूं. दोहींतील येक आपण करावें. येक आम्ही करूं. ऐसें बोलणें पडलें आहे.

१ श्री॥ राजश्री अमृतराव यांस आणावयास गेले आहेत. त्यांस परभारें कुटुंबसह जांबगावास घेऊन जावें ( असें ठरलें. ) येथून श्री॥ राजश्री बाजीरावसाहेबांस घेऊन जांबगावास जाणार. तिकडून दसरा जाहल्यावर बऱ्हाणपुरास जावें ऐसा बेत आहे.

१ शिंद्यांकडील बोलणें आहे ( कीं ) राजश्री नानाचा सरंजाम आपण जप्त केलाच आहे. फडणिशीची जप्ती आहे ती आपण जप्ती करणार. मोरोबादादाचें कोणी नाहीं, त्यांचे चिरंजीव ( आहेत परंतु ) दादा बंदीस त्याजपक्षीं चिरंजीव फडणिशी करीत नाहींत. दादांचे हवालीं फडणिसी करावी ( तर तुम्ही[1] कैदेंतून ) त्यांस काढीत नाहीं. त्यापक्षीं जप्ती आपणास सांगावी हें बोलणें आहे.

१ हें वर्तमान मागेंच विनंती लिहावी, परंतु पेशजी कांहीं विनंती लिहिली त्या गुंत्यामुळें लिहिलें नाहीं. तो मजकूर सविस्तर लिहून पाठवीन.

१ रायगडाकडे येथील पायदळ जात आहे. एका ज्योतिष्यानें भाकीत केलें आहे जे, भाद्रपद तागायत मार्गशीर्षपावेतों मोठीं मोठीं किचाटें आहेत ऐसें म्हणे म्हणोन वार्ता आहे.

१ वडील साहेब यांचें म्हणणें कीं, हा थोर कारभार. ओझें उचलत नाहीं. यास्तव मोरोबादादांस आणावें. त्यांचे हवालीं सारें करावें. आपण मोकळे व्हावें.

१ राजश्री रंगराव राजेबहादूर यांचे बंधु रघुपतराव राजेबहादूर होते ते वारले. त्यांस धर्मपुत्र दुसऱ्याचा द्यावा तें राजश्री नाना असतांच राहिलें. हल्लीं अलिजाबहादूर यांजकडे संधान करून

---

१ तुम्ही परशुरामभाऊनीं. २ परशुरामभाऊ.

रंगराव यांचे बंधु रघुपतराव यांचे स्त्रीचे ओट्यांत विधानपूर्वक घातले. वडीलपण रघुपतराव याजकडे होतें, नगारखाना व जरीपटका, त्याचप्रमाणें त्यांचें त्यांजकडेस असावें. सरकारांत तीन लक्ष रुपये नजर, शिंद्यांस पन्नास हजार पाउण लक्ष पावेतों, शिवाय दरबार खर्च निराळा, याजप्रों करार होऊन शिंद्यांकडील संकर साप ( ? ) येऊन सरकारांतून वस्त्रें जवाहीर दिलें.

१ श्रीमंतांचे राशीस पंचग्रही आली याजमुळें हत्ती दान दिला. पांच हजार रुपये दक्षणा साहित्यसुद्धां एकंदर दिलें.

---

येणेप्रों बाजारी वर्तमान आहे. विदित होय हे विज्ञापि.

नं. ३८२१. श्री. ( आषाढ शु० ३–७ जुलई. )

पै॥ छ० ७ मोहोरम सन सबा तिसैन आषाढ.

सेवेशीं धोंडो बापूजी व मोरो आपाजी चरणावरी मस्तक ठेऊन सा॥ नमस्कार विज्ञापना तागायत छ० १ मोहरम मु॥ पुणें सेवकाचें वर्तमान यस्थास्थित असे. विशेष. इकडील राजकीय वर्तमान तरी कोंकणांत फौजा जाण्याची योजना आहे. श्री॥ राजश्री अमृतराव यांस आणावयाकारितां सरकारच्या व राजश्री शिंदे यांजकडील पागा गेल्या आहेत, त्यास कालचा मुहूर्त जुनराहून निघावयाचा होता. काल निघाले असले तरी दोन चार दिवसांत येतील. श्री॥ राजश्री बाजीरावसाहेब यांचें कुटुंब व अमृतराव यांचें कुटुंब व पुत्र याप्रों सर्वांस आणावयास गेले त्याप्रमाणें येत आहेत. पुढें विचार काय होतो न कळे. बरानपुरास श्रीमंतानीं रहावें ( असें ठरलें ) याप्रमाणें लोक बोलतात. जांबगांवासही ( रहाणार असें ) कांहीं लोक बोलतात. मागाहून सेवेशीं विनंती लिहून पाठवितों. कोकणांत श्रीमंत राजश्री नाना गाडदी ठेवीत आहेत. श्री॥ राजश्री नाना गेल्या-

---

१ चिमाजीआपाच्या. २ उभयतांही कारकून पटवर्धनांचे. त्यांचें हें बाळासाहेबांस पत्र.

पासून पैसा कोणास फौजेमध्यें पावत नाहीं. पुण्यामध्यें दोन पायलींची धारण. कडब्याच्या दहा पुल्या ! शिलेदार वगैरे बेजार जाले. कोणी-एक न पुसतां उठोनही जात आहेत. लोहगड, इसापूर हे दोन किल्ले नानांकडे आहेत, त्यास शिंदे यांजकडील पांचशें लोक व एक दोन पागा रवाना जाल्या. मौजे शिवनें येथें जाऊन राहिले आहेत. घेऱ्यांतील गांव बेचिराख वोस किल्लेकरी याणीं केले. जिकडे तिकडे फौजेचे उपद्रवामुळें मुलखांत स्थीत राहिली नाहीं. अद्यापवत् इकडे पर्जन्य नाहीं. याउपर ईश्वर कृपा करील तें प्रमाण. मामलतीच्या घालमेली जाहल्या. फार करून विल्हेस लागल्या. आणखीही फडशे होत आहेत. मागील फाजील पैकीं पैसा कोणास मजुरा देत नाहींत. येथून नवा कारभार जाहला. शिंदे यांजकडील राजश्री बाळोबा पागनीस यांस आठ दिवस किंचित् समाधान नाहीं. राजश्री धोंडीबा दादा व सदाशिव मल्हार उभयतां श्री॥ राजश्री भाऊसाहेब यांजकडे एक दोन दिवसानीं खलबतास येत असतात. चार सहा घटका खलबत होऊन जात आहेत. श्री॥ राजश्री भाऊसाहेब यांची मर्जी बहुत कठीण जाहली आहे ! बहुत काय लिहिणें कृपा लोभ असों दिला पाहिजे हे विज्ञापना.

सेवेशीं कृष्णाजी बापू शिरसा॥ नमस्कार विज्ञापना. माझे शरीरीं मूत्रपींडेचा उपद्रव आहे त्याजला औषध लोहभस्म घेत आहें. चार मास जाले. आहे प्रकृत तशी आहे. वडिलांचे आशीर्वादेंकरून आरोग्य होईल. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

नं. ३८२२. श्री. ( आषाढ शु० ७–११ जुलई. )

राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री गंगाधरराव स्वामीचे सेवेशीं.

पोष्य बाळाजी जनार्दन. सा॥ नमस्कार विनंती उपरी येथील कुशल जाणोन स्वकीय कुशल लिहित जावें. विशेष. जिन्नस पाठवाव-

---

१ ऐवज.

याचा आहे म्हणोन सांगोन पाठविलें त्याचें उत्तर ' आपलें घर आहे. जिन्नस पाठवावा. ' म्हणोन ( आपलें ) पत्र आलें. त्यावरून विश्वास आपल्यावर ठेवून जिन्नस पाठविला आहे. त्यास कोणी आपल्यास विपर्यास दाखवून गडबड करितील ती आपण ऐकणार नाहींच, परंतु सूचनार्थ लिहिलें आहे. रवाना छ० २६ जिल्हेज. बहुत काय लिहिणें लोभ असों दीजे हे विनंती.

पै. छ० ५ मोहरम. सन सबा तिसैन. आषाढ शुद्ध ७ इंदुवासर.

नं. ३८२३. श्री. ( आषाढ शु० १३–१७ जुलई. )

पै॥ छ० ११ मोहरम. सब्बा तिसैन. आषाढ.

विज्ञापना. स्वामींनीं स्वदस्तुरचें पत्र पाठविलें तें पावलें. त्यांतील मजकुराचीं उत्तरें विंतपशील—

१ मशीर उल्मुलुख याचा मजकूर—बोलणें चाललें आहे. रघोत्तमराव नबाबाकडील वकील यावयाची वाट पाहतात. खंडणीच्या ऐवजाचा फडशा व पुढील निभावणीची खातरजमा जाली पाहिजे. काय ठरतें पहावें.

१ चौकी पहाऱ्याचा मजकूर तर हुशारीस कमती नाहीं. खाशांजवळ कोणी बाहेरून येतो तो परवानगीशिवाय पोंहचत नाहीं. बंदोबस्त चांगला आहे. कारभार होणें तो सरकारच्या वाड्यांत होत असतो खासे नित्य तिसरे प्रहरां वाड्यांत जाऊन बसतात. एखादे दिवशीं शिंदे यांजकडील कारभारी आल्यास ते दिवशीं मात्र वाड्यांत जावयास बनत नाहीं खलबतामुळें.

१ गड कोट किल्यांचा मजकूर तर—अमुक स्थळ खचित लक्षांत आहे असें नाहीं. सर्वांची नजर महाडाकडे !

१ तोफखान्याच्या दरोग्यांचा मजकूर तर—माधवराव यांचे

---

१ परशुरामभाऊंच्या हुजुरून निळकंठ आपाजी पोंक्षे यांचें बाळासाहेबांस पत्र. यावर मिति व इंग्रजी तारीख पैवस्तीची घातली आहे.

घराण्यांतील स्नेही. दुसऱ्यांचा प्रकार बोलवत नाहीं. संधीयुक्त आहे.

१ टिपूकडील राजकारणाचा मजकूर तर—त्याजकडील वकील कोणी नाहीं. व कागदपत्रही येत नाहीं. त्यांचे मुरब्बी फडके आहेत.

१ धारवाड वगैरे सरंजामाच्या तालुक्यांत पोक्त सरंजाम राहिल्याशिवाय बंदोबस्त रहात नाहीं येविशीची सूचना केली, त्यास ऐवजाची वोढ. लोक पैसा दिल्याशिवाय निघत नाहीं. खासगत सरंजामी फौज पाठवावी तर येथील प्रसंगाचा भरंवसा येत नाहीं. व कोणतेंही सुचत नाहीं. शिबंदीचीं वगैरे देणीं बहुत तटलीं आहेत. गवगवा मोठा. मागील देण्यास कोणी पुसत नाहीं. अलीकडे सहा महिने फौजेस दरोबस्त पैसा नाहीं. तैशीच अवस्था पायदळाची. लोक बेजार जाले आहेत. कसा परिणाम लागेल म्हणोन यजमान चिंता वाहतात.

१ महाडाकडे शिंदे याजकडील पायदळ रवाना जालें तें सोनापुरीजवळ पोचलें. आणखी तरदूद रवानगीची होत आहे. सरकारच्या पायदळाची नेमणूक जाली आहे. महाडकरी याणीं पांच सहा हजार मावळे प्यादे ठेविलेची बातमी आहे. त्याणीं घाटाचा बंदोबस्त केला आहे. इकडील इलाजही त्यांस जेरीस आणावयाचा होत आहे. महाडकरी यांस हबशी याचा दम दिसतो. बातमीतही असेंच आहे.

१ मनास येईल तसे तर्क येथेंही लोक करितात. यजमानांच्या कानावरही आवाज येतात त्याचा तपशील कोटपावेतों लिहावा ! अनेक तर्क करितात.

१ बातमी राखितात. सावधतेविशी कमी नाहीं.

१ साष्टीच्या किल्याचा व इंग्रजांकडील बोलणें ( नानास ) एक किला व कांहीं जहागीर द्यावी येविशींचा मजकूर तर यांतून कोणतेंही नाहीं. उगी-

---

१ संदेहयुक्त.

च आवई कोणीं सांगितली असेल.

१ इंग्रजांचें लक्ष कोणीकडे याचा मजकूर तर——महाडाहून कारकून व माणसें मुंबईस गेलीं आहेत. इंग्रजाजवळ बोलणें मनसब्याचें पडलें आहे. त्यास इंग्रजानीं जाब दिला कीं, सर्व हकीगत कलकत्यास लिहिली आहे. तेथून हुकूम येईल तसें करूं. त्याजवरून कारकून गेले ते तेथेंच बसले आहेत. इंग्रजाची तऱ्हा निराळीच ! महाडाकडे लक्ष म्हणावें तरी नाहीं. इकडे खचित आहे म्हणावें तरी म्हणवत नाहीं ! त्यांच्या चित्तांत काय असेल तें असो.

१ शिंदे यांचा जमाव हिंदुस्थानांतून येण्याचा मजकूर तर——तेथें बोलण्यांत नाहीं. शिंदे याणीं पुण्याचे मुक्कामापैकीं कांहीं कांहीं सरंजाम चराईस वगैरे लाऊन दिला व कांहीं छाटिला असें आहे. त्यांच्या लष्करांत गवगवा देण्याचा फार. नित्य दंगे आहेत.

१ जुनराहून मंडळी निघाली. आजपावेतों जांबगावांस पावली असेल. शिंदे यांचे लष्करांत जे गृहस्थ आहेत त्यांसही जांबगांवास पाठवावयाची तयारी होत आहे. गृहस्थपणानें जातील असें नाहीं. त्यांचीं बोलणीं फार आहेत ! निदानचा पक्ष लाऊन देण्याचाच आहे. हे जांबगांवांस पोंचून बंदोबस्त जाल्यावांचून कोणाचीं लक्षें कोणीकडे याचा झाडा काढीत नाहींत. मग उपक्रम करितील.

१ पागे व पथके वगैरे लहान मोठे सरदार व शिपाई यांस रोजमरा नाहीं व नवें कलमही चालत नाहीं. लक्ष म्हणावें तर भरंवसा नाहीं. यजमान[1] बोलोन दाखवीत नाहींत. सर्वत्र तिकडील लक्षांत. कोठपावेतों निवडावें ? आज एकाएकीं कोणती गोष्ट केली असतां बंदावर याव-

१ बाजीरावसाहेब.

याची नाहीं. यामुळें तजविजेनेंच करणार.

१ परचुरे पुरंदराहून शिंद्याच्या गोटांत सरकारची सनद किल्यास जाऊन चौकीपहाऱ्याच्या बंदोबस्तानें आले आहेत. त्यांजकडे बोलणीं चालली आहेत. श्रा[१]द्धाशिवाय ताळा पडत नाहीं !

१ रंवैरखां यास आसरा टिपूचाच असल्यास न कळे. वरकड कोणाचा गुढघा नाहीं. तर्कांत बहुत येतें, परंतु तसें घडणार नाहीं.

सेवेशीं विदित होय हे विज्ञापना. स्वामींचें पत्र माघारें पाठविलें आहे. पावलियाचें ल्याहावें. हे विज्ञापना.

नं. ३८२४. श्रीगजानन. (आषाढ शु० १३–१७ जुलई.)

पै॥ छ० १७ मोहोरम. सब्बा तिसैन.

वि[२]ज्ञापना. तागायत छ० ११ मोहोरम. यस्थास्थित असे. विशेष. अलीकडे स्वामींकडून आशीर्वादपत्र येऊन वर्तमान कळत नाहीं. तर सदैव पत्रीं सांभाळ करावया आज्ञा केली पाहिजे. बाजारी वर्तमान श्री॥ राजश्री बाजीरावसाहेब यांस जांबगांवास जाण्याविषयीं राजश्री बाळोबातात्यानीं विनंती केली त्यांजवळ श्रीमंतानीं उत्तर केलें कीं, तुम्हांजवळ कांहीं बोलत नाहीं. वगैरे भाषण हलकें बहुत जाहलें. नंतर राजश्री दौलतराव बाबा शिंदे याणीं त्रिवर्ग शेणवी कारभारी यांस आज्ञा केली कीं, श्रीमंत हठनिग्रहास पडिलें. जात नाहींत. आमचा ऐवज करार आहे त्याप्रमाणें येत नाहीं. लेखक हस्तगत जाले नाहींत. लौकिकही वाईट जाहला. याचा विचार कसा करावयाचा हें विचारावें म्हणोन त्रिवर्गांस आज्ञा केली. त्रिवर्ग फडके यांच्या बागेंत आहेत. दररोज वडिलांकडे येऊन खलबत करीत आहेत. श्रीमंत जांबगांवांस जात तोंपावेतों पुण्याचे लोक नाहीं तें वर्तमान उठवितात ! परंतु निश्चय नाहीं. दुसरें–शिंदे ऐसें म्हणतात म्हणे,

---

१ हिरण्यश्राद्धाशिवाय. द्रव्यदंड पडल्याशिवाय. २ कारकून बाळाजी गणेश जोशी यांचें बाळासाहेबांस पत्र.

" श्रीमंत ( आपासाहेब ) राज्यास अधिकारी जाहले. यांणी दौलतीचा कारभार करावा. तुम्हांविशीं त्यांची तुमची खातरजमा पक्केपणाची करितों " ऐसें म्हणणें पडिलें आहे म्हणोन ऐकतों. हें एक वर्तमान आहे. सारांश ऐवज मागावयाची निकड दिसत आहे. शिंद्यांचें व त्रिवर्ग कारभारी यांचें कांहीं वैमनस्य आलें ऐसी वार्ता. अनेक प्रकारच्या वार्ता ! हे विज्ञप्ति.

नं. ३८२५ श्रीगणराज. ( आषाढ व० ३-२३ जुलई.)

पै॥ छ० १७ मोहोरम. सन सबा तिसैन. आषाढ.

विज्ञापना. इकडील वर्तमान तर श्रीमंत राजश्री अमृतराव रघुनाथ यांस जांबगांवांस नेलें. श्री॥ राजश्री बाजीरावसाहेब यांस आषाढ शु॥ त्रयोदशीस न्यावें हा बेत होता. परंतु घडला नाहीं. श्रीमंत जात नाहीं म्हणतात. खुद्द शिंद्यांचें आणि श्रीमंतांचें एकचित्त जाहलें, आणि शेणवी यांचें कांहीं दरम्यान वांकडें आलें, असेंही लोक बोलतात. महाडचे किल्यास गृहस्थ आहे त्याचें संधान राजश्री महादजी शिंदे यांची रक्षा केशरी म्हणोन उज्जनीस आहे तिजकडे जाहलें आणि तिजकडून दौलतराव शिंदे याजकडे जाहलें. एकूण महाडकर गृहस्थ व दौलतराव यांचें चित्त येक जाहलें! शिंद्यांकडील कारभारी यांचें व शिंद्यांचें वांकडें बिनखोट आलें असें बहुत बोलतात. खरें लटकें ईश्वर जाणे ! दिवस कठीण आले असेंही बोलतात. मागें जाहलें हें कांहींच नाहीं हा अर्थ ध्यानांत आणावा म्हणजे विदित होईल. इकडे पर्जन्य पुनर्वसु तिसरे चरणापासून थोडा थोडा पडतो. पुष्य निघाल्यापासोन विशेष लागत आहे. आज दोन दिवस जाहले, एक संतत अहोरात्र संततधारा लागली आहे. उघड नाहीं. सेवेशीं विदित होय हे विज्ञापना.

---

१ बाजीरावानीं. २ तुम्ही बाळोबा व परशुरामभाऊ वगैरेविषयीं. ३ सरदार नारायणराव गंगाधर यांचें गंगाधरराव बाळासाहेबांस पत्र. मावर मिति व इंग्रजी तारीख पैवस्तीची घातली आहे.

नं. ३८२६. श्री ( २४ जुलई. )

पै॥ छ० २० मोहोरम. मंगळवार. सबा तिसैन.

तीर्थस्वरूप राजश्री बाळासाहेब वडिलांचे सेवेशीं,

अपत्यें रामचंद्र श्रीधर काळे. शिरसा॥ नमस्कार विज्ञापना येथील कुशल तागायत आषाढ व॥ ४ पावेतों वडिलांचे आशीर्वादें-करून सुखरूप असें. विशेष. मी तासगांवाहून निघालों तो पुण्यास आषाढ शु॥ दशमीस पावलों. वडिलांची भेटी जाहली. येथें येऊन पावतांच पत्र ल्याहावें तर सर्व मजकूर समजले नव्हते. वडिलांची भेटी होऊन बहुत दिवस जाले होते. कारभारामुळें वडिलांस एक पळ-भरही रिकामपण नाहीं. यास्तव पत्र वडिलांस लिहिण्यास दिवसगत लागली. कळावें. इकडील वर्तमान तर मी पेशजी खराडीच्या मुका-माहून निघून आलों. नंतर शिंदे याणीं ती॥ राजश्री भाऊसाहेबांस[1] गांठून श्री थेऊर गणपतीच्या देवालयीं आण शपथ घेतली कीं, ' या उपरी जो विचार करणें तो उभयतानीं करावा. ' ऐसें ठरलें. राजश्री बाळोबातात्या पागनीस यांमध्यें व वडिलांमध्यें दुजाभाव कारभाराविशीं किमपि राहिला नाहीं. उभयतांची एकवाक्यता जाल्यानंतर मग पुढें श्रीमंत बाजीरावसाहेब यांचा विचार[3] जाहला. नंतर श्री॥ राजश्री चिमाजी आपाची स्थापना जाहली. हा सर्व मजकूर ( आपण तेथें ) ऐकल्याप्रों॥च आहे. सातारियाहून राजश्री नाना फडणीस वांईस आले. शिंदे यांचा एकच मुद्दा वडिलांपाशीं पडिला कीं, तुम्ही नाना-विशीं खटपट करूं नये. त्यांस याउपरी कारभारांत घ्यावयाचे नाहींत. तेव्हां वडील राजश्री बाळोबा तात्यापाशीं नानाविशीं बोलत येतच होते कीं, ' तुम्ही[2] सरकारचें काम नानाचे हातें घेत नाहीं तें न घेऊ. परंतु त्यांचे अब्रूस व त्यांचे पैक्यास हात लावूं नये. त्यांची सरंजामी फौज आहे ती व हजार गाडदी ऐसे त्यांजपाशीं रहावें. आणि त्याणीं स्नानसंध्या करून स्वस्थ रहावें. ' ऐशी रदबदली करितां तात्यानीं वडिलांचे

---

१ परशुरामभाऊंची. २ तुम्हास. ३ कैद करण्याची गोष्ट अमलांत आली.

मोहबतीवर दृष्टि देऊन वडिलांपाशीं उत्तर केलें कीं, " ज्यापक्षीं भाऊ ! तुम्ही नानास वांचवावें म्हणतां, त्याअर्थीं आम्ही याउपरी त्यांस उपद्रव किमपि करीत नाहीं. त्यांच्या ऐवजास अथवा त्यांचे अब्रूस व त्यांचे सरंजामास व त्यांचे फडणिशीस आम्हीं उपद्रव करीत नाहीं. मेणवली अथवा टोकें अथवा मिरज, तासगांव या चोहींतून नानास जेथें संतोष वाटेल तेथें रहावें. परंतु याउपरी त्याणीं राजकारण करणें अथवा कोणाशीं मनसबा करणें व कागदपत्र चालणें ऐसें घडूं नये. याप्रों जालें असतां आम्हांकडून दिक्कत किमपि पडावयाची नाहीं. " ऐशी खातरजमा वडिलानीं करून घेऊन वांईस नाना होते तेथें सांगोन पाठविलें. तें कांहीं त्यांचे चित्तास येईना ! सातारियास जी फौज नानापाशीं होती ती असावी ( असें त्यांचें म्हणणें पडलें. ) आणि राजकारणास कंटाळेनातसे झाले ! ' हें पुरणार नाहीं ' म्हणोन मग शिंदे याणीं व वडिलानीं महायात्रा योजिली, तेव्हां ( नाना ) निघून महाडास गेले ! याउपरी वडिलांचें व नानाचें एक चित्त नाहीं ही खातरजमा जाली. वांईपर्यंत नानाचें रक्षण करावें ऐसें मत वडिलांचें होतें. परंतु आतां अगदीं नाहीं. कोकणांत बसून पुण्यांत राजकारणें (नानाचीं) चाललीं आहेत. बापू लेले वगैरे मंडळीनें राजश्री बाळोबातात्यांपाशीं राजकारण लाविलें कीं, " बाजीरावसाहेब राज्यीं बसवावे आणि परशुरामभाऊंचें काम काढावें. ऐसें जाहलें असतां पन्नास लाख रुपयांची निशा करितों ! " ऐसें बोलणें लाविलें. यांत पुण्यांतील बहुतेक मातबर आहेत. केवळ बापूची किंमत इतका पैका देतों म्हणावयाची नाहीं. यांत रविवार[1] देखील आहेत. तेव्हां महाडें[2]ही आहेत. तात्यानीं सर्व मजकूर ऐकून घेऊन ' निशाचिट्टी आणून देणें. ' ऐसें म्हणतांच लेले यांणीं आपले नांवें व नारोबा नाईक भोकरे आहेत ( त्यांच्या नांवें ) ऐशी निशाचिट्टी उभयतानीं लिहून दिली. त्याच निशाचिठ्या तात्यांनीं वडिलांकडे पाठवून दिल्या. आणि सांगितलें

---

१ रविवार पेठेंत राहणारे बाबा फडके. २ महाडास राहणारे नाना.

कीं, चौकशी करून पारिपत्य करणें. ऐसें काल पावेतों जाहलें. हल्लीं चौकशी चालली आहे. बहुतकरून या उभयतांशिवाय दस्तऐवज दुसरे कोणाचे नाहींत. परंतु चौकशीमुळें काय होईल पहावें. रा॥ बाळोबातात्या आणि वडील एकरूप आहेत तेथें दुसऱ्याचेनें कांहीं व्हावयाचें नाहीं. शिंदे यांस पंचवीस लक्ष रुपये देऊं केले आहेत त्यांपैकीं कांहीं दहा पांच दिले. बाकी द्यावयाचे आहेत. परंतु ते कांहीं अडवीत नाहींत. "भाऊ जेव्हां देतील तेव्हां घेऊं" ऐशी निखालसता आहे. "जे आमचे राजकारणांत नाहींत त्यांचीं पारिपत्यें करून सर्व कारभार भाऊंचे हातीं देऊन मग भाऊंचा निरोप घेऊन हिंदुस्थानांत जाऊं" ऐसें कारभारी म्हणत आहेत. वडिलांचे पुण्येंकरून तात्या निःकपट वडिलांचे हातीं लागले! कळावें. याउपर जें होईल तें मागाहून लिहीन. बहुत काय लिहिणें. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

नं. ३८२७. (श्रावण–आगष्ट.)

अपत्यें नारायणानें दोनी कर जोडून शिरसाष्टांग नमस्कार विज्ञापना ता॥ छ० सफर मु॥ पुणें येथें वडिलांचे आशीर्वादें करून सुखरूप असों विशेष. वडिलीं छ० ३ सफरचें आशीर्वाद पत्र पाठविलें तें छ० ६ मिनहूस पावलें. लिहिला मजकूर कळला. सुंदरगज हत्ती कालच येऊन पावला. घोरपडे याजकडील स्वार पाठवून देतों म्हणोन लिहिलें तें कळलें. इकडील वर्तमान तर छ० ५ सफरीं बारा घटका दिवस आल्यानंतर रमण्यांत दक्षणेस प्रारंभ करावयास श्रीमंतांची स्वारी निघाली. मला बरोबर येणेंविशीं सरकारचें बोलावणें आलें होतें. स्वारीबरोबर गेलों. स्वारी पर्वतीस जाऊन पर्वतेश्वराचें दर्शन घेऊन रमण्याचे दरवाजांत गेले. बारा घटका दिवसानंतर प्रारंभ जाला. मग मला आज्ञा केली जे तुम्ही दुसरे दरवाज्यावर दक्षणा द्यावयास जावें. त्यावरून मी व चि॥ रा॥ महादेवराव दाजी येणेप्रमाणें जाऊन दक्षणेस प्रारंभ केला. नेमणुकेप्रों शास्त्री वैदिक पंडित वगैरे आले होते. नेमणुकीची याद व ब्राह्मणांस दक्षणा द्यावयाचे प्रतीची

याद होती त्याप्रों द्यावयास प्रारंभ केला. दोन तीन घटका दक्षणा दिली. उपरांतिक श्रीमंतांची स्वारी आली. अर्ध घटका बसोन दक्षणा दिली. उपरांतिक तिसरे दरवाज्यास स्वारी गेली. मला आज्ञा झाली जे दक्षणेस बसावें. उपरांतिक चार घटकेनें ती॥ रा॥ भाऊसाहेब आले. बरोबर सारे मुत्सद्दी होते. एक दोन घटका दक्षणा देत होते. उपरांतिक अय्या शास्त्री याचे बंधु वेदशास्त्रसंपन्न राजमान्य राजश्री यज्ञेश्वरशास्त्री आले नंतर शास्त्रीबावा दक्षणा द्यावयास संध्याकाळीं बसले. आम्ही संध्येस गोटास गेलों. संध्या करून चार घटका रात्रीस दरवाज्यावर आलों. पहाटेच्या चार घटका रात्र राहील तव पावेतों शास्त्रीबावाच दक्षणा देत होते. उपरांतिक वेदमूर्ति राजमान्य राजश्री भास्कर दीक्षित यांस दक्षणा द्यावयास बसविलें आणि पहाटेस स्नानाकारितां मी गोटांत गेलों. स्नान संध्या करून फिरोन चार घटका दिवसास गेलों तेव्हां चि॥ रा॥ दाजी दक्षणा देत होते. ते फराळास आपले गोटास गेले. मग मी दक्षणा द्यावयास बसलों. दहा बारा घटका दिवसास श्रीमंत आले. अर्ध घटका बसले होते. उपरांतिक स्वारी गेली. रात्रौ श्रीमंत रमण्यांतच राहिले होते. भोंवताल्या फौजा चौकीस होत्या. आम्हाकडील फौजसुद्धां राजश्री गणेश गोविंद आमचे दक्षणेच्या दरवाज्याबाहेर उभे होते. संध्याकाळीं दिवसास राजश्री दौलतराव शिंदे आले व राजश्री बापू होळकर व भोसले यांजकडील वकील आले होते. शिंदे याणीं घोड्यावर बसून रमण्यांतूनच ब्राह्मणास प्रदक्षिणा केली. श्रीमंतानीं रमण्यांतून पायउतारा एक व बाहेरून पायउतारा अनवाणी एक येणेंप्रों दोन प्रदक्षिणा केल्या आणि पर्वतीवर डेरा दिला होता तेथें ब्राह्मणांचा तमाशा पहात बसले. अस्तमानीं ब्राह्मण सारे झाले. उपरांतिक तोफांचे बार करविले. ब्राह्मण जाण्याचे वाटेवर हिलाल लाविले होते व चंद्रजोतीही बहुत लाविल्या. दोन तीन घटका रात्री ब्राह्मण सारे रमण्यांतून निघाल्यानंतर श्रीमंताची स्वारी निघाली. महतापा लावीत बुधवारांतून वाड्यांत आली. दक्षणा देणा-

-याच्या नेमणुकीची व यावयाचे नेमणुकीची याद सरकारांतून जाली होती तिच्या नकला पाठविल्या आहेत.

नं. ३८२८. ( श्रावण शु० ४-७ आगष्ट. )

सरदार नारायणराव गंगाधर पटवर्धन यांजकडून माधवराव गंगाधर यांस पत्र छ० ३ सफरचें—

" काल मशरीनमुलुक यांस सरकारचा निरोप जाला. बहुमान वस्त्रें व शिरपेंच कंठी जेगा हत्ती व घोडा येणेंप्रमाणें दिलें. त्यांकडील मंडळीस सहा असामींस वस्त्रें व शिरपेंच दर असामीस येक येणेंप्रमाणें दिलें. "

नं. ३८२९. श्री. ( श्राव० व० १०-२८ आगष्ट. )

पुं॥ अपत्यें साष्टांग नमस्कार विज्ञापना. मेणवलीचें ठाणें घालावयाकरितां आमचे फौजेस जावें म्हणून आज्ञा जाली. परवां त्रयोदशीस येथून कूच करावें अशी आज्ञा आहे. यास्तव सरकारचीं उंटें मिरजेस गेलीं तीं आणविलीं. येथून कूच झाल्यावर वडिलांस विनंती लिहून पाठवीन. मुख्य यजमान श्रेष्ठ व मानाजी शिंदे व हुजरातच्या लोकानीं मसलत मध्यें केली होती. नंतर त्यांचा बंदोबस्त तूर्त ईश्वरकृपेंकरून जाहला. मोटी गोष्ट जाहली. आठ चार दिवस अवकाश पडता तर त्यांची मसलत सिद्ध होत होती. हुजरात व पागे व मानकरी व फडके अद्याप कृत्रिम बुद्धीनेंच आहेत. दहा पांच पागे पहिल्यापासून आमचे यजमानांकडील लक्षांतच आहेत. वरकडांचें कसें होतें पहावें. शिंदे यांजकडील कंपू गारदौंडेजवळ भीमा उतरत आहेत. त्यापैकीं चार पलटणें घांटमाथां जाणार. मुख्य यजमानास जांबगांवास लावून द्यावयाचें, परंतु ते बहुत आग्रहास बसले. " येथून जागा सोडावयाची नाहीं. बलात्कारच होऊं लागल्यास ते समयीं प्राणास नाश करीन. " असें बोलत आहेत. कसें घडतें तें पहावें ! दूर जाणें होतें म्हणजे कांहीं स्वस्थ होईल तर न कळे.

---

१ सदरहु पत्र सवंत्र नसून हा पुरवणीचा एकच बंद सांपडलेला आहे. हें सरदार त्रिंबकराव आपानीं रघुनाथराव कुरुंदवाडकर यांस लिहिलेलें आहे.

नं. ३८३०. श्री. ( भाद्र० शु० ४–५ सप्टं. )

चिरंजीव राजश्री बळवंतराव व रामचंद्र आपा यांसी परशुराम रामचंद्र. आशीर्वाद. उपरी. श्रीमंत राजश्री बाजीरावसाहेब जांबगांवानजीक तीन कोसांवर पोंचले. समागमें सरकारांतून विठ्ठल शिवदेव यांचें पथक व नारो शंकर यांचें पथक हीं दोन पथकें दिलीं आहेत. याशिवाय शिंदे यांजकडील तीन पलटणें; बारा तोफा, पलटणांचें माणूस खरेंखुरें दोन अडीच हजार व फौज दोन अडीच हजार आहे. सरकारचीं पतकें स्वारी गंगापार जाल्यावर माघारीं यावयाचीं. रहावयाचें मकाण रेवातीरीं बडव्यांचें ठाणें आहे तें करारांत आलें आहे. जांबगांवच्या अलीकडे मुक्काम करून राहिले आहेत याचें कारण येथून निघते समयीं करार जाला आहे जे, ' पंधरा लक्षांची जहागीर खर्चाबद्दल द्यावी. त्याच्या सनदा पोंचल्यावर जांबगांवास जाऊन पुढें चालते व्हावें. ' त्यास झांशी तालुका अकरा लक्षांचा. त्यांत दोन लक्षांचा वसूल असेल नसेल ( ? ) अरुण वगैरे महाल चार लक्षांचे, यांच्या सनदा होत आहेत, तयार होऊन त्यांजकडे जावयास आठ चार रोज लागतील. रवाना छ० ३ रबिलावल. बहुत काय लिहिणें हे आशीर्वाद.

नं. ३८३१. ( भाद्र० व० १–१८ सप्टंबर. )

सरदार नारायणराव गंगाधर पटवर्धन यांजकडून माधवराव गंगाधर यांस पत्र छ० १६ रबिलावलचें—

" आम्हांस फौजेसह व सरकारांतून तीन पलटणें व गाडद व पागा दोन चार येणेंप्रमाणें सरंजामानिशीं मेणवलीकडे जाणेंविशीं आज्ञा जाली. त्याजवरून शिवापूरचे मुक्कामास आलों. नेमणुकेप्रमाणें सरंजाम आल्यानंतर घांट चढोन वर येतों. तुम्हीं कांठेवाडी सुतव्हीचा संग्रह केला आहे, तर आम्हांकरितां एक सुतव्ही लौकर पाठवावी. "

नं. ३८३२. श्रीगणपति. ( आश्विन शु० ८–९ आक्टो. )

चिरंजीव राजश्री बळवंतराव यांसीं प्रती परशुराम रामचंद्र. आशीर्वाद उपरी. आपण छ० १९ व छ० २८ रबिलावलचीं पत्रें खिजमतगाराबरोबर पाठविलीं तीं छ० ३ रबिलाखरीं पावलीं. त्यांतील मजकुराचीं उत्तरें बितपशील कलम.

१ " नबाब सावनूरकर यांस नेमणुकेप्रमाणें ऐवज महिन्याचे महिन्यास पावत नाहीं. त्यांची वोढ बहुत आहे. याचा बंदोबस्त केला पाहिजे. " म्हणोन लिहिलें तें कळलें. त्याजवरून राजश्री नारायणराव लिमये यांस पत्र लिहून......राव भिमाजी यांजवळ दिलें आहे. आणखी परभारें लिहून पाठवितों.

१ कर्नाटक महालचे वतनदारांविशीं व वे॥ राजश्री शामभटबावा यांसीं......त्याचें लिहिलें, ऐशियास अजमास पाहतां बेरीज दहा लक्षांची होईल. त्यांत सर......कारभार कसें होईल ?......बेगमीस नेमून दिलेंच आहे. कोणास नेमणूक नसेल त्यास करून दिली जाईल.

१ ती॥ मातुश्री काशीबाई काकी पुण्यास कधीं पावली म्हणोन लिहिलें, त्यास भाद्र॥ व॥ त्रयोदशीस येथें पावली. चि॥ राजश्री श्रीपतराव भाऊ यांचें कूच अद्याप नाहीं. दसऱ्यास जातों म्हणतात.

१ " पागेकडे गंगथडीहून चवाळीं आणाविणार. त्यास रहदारीचें दस्तक व बीडच्या कमाविसदारांस पत्र पाहिजे; " म्हणोन लिहिलें, त्यास पत्र व दस्तक पाटवून देतों.

१ चि॥ राजश्री रामचंद्रपंत आपा यांजकडील लखोटा पाठविला तो पावला. त्याचा जाब पाठविला आहे. त्याजकडे लावून द्यावा.

१ " बहादुरवाडीकरांनीं बहुतच आगळीक आरंभिली आहे. त्यांचा बंदोबस्त जाला पाहिजे. याजकरितां बाळाजीपंत भिडे

यांस फौजेसह आणवावें कीं कसें ? " म्हणून लिहिलें त्यास त्यांचें पारिपत्य जालेंच पाहिजे. आगळीक बहुत करितात. त्यापक्षीं भिडे यांस फौजेनिशीं आणवून बंदोबस्त करावा.

१ " खैरखां जांबोटीनजीक हजार पांचशें माणसांनिशीं आहे याप्रमाणें बातमी आली " म्हणून लिहिलें तें कळलें.

१ " डांकेचे जासूद उठले व एक जासूद हरवळीच्या घाटांत जखमी जाला. घाटास मेणवलीकडील चौकी बसली आहे. याचा बंदोबस्त व्हावा; " म्हणोन लिहिलेलें कळलें. त्याचा उद्योग होत आहे.

१ पर्जन्याचा मजकूर लिहिला तो कळला. हस्त नक्षत्र भरंवशाचें तें गेलें. ईश्वरइच्छा कळत नाहीं !

---

एकूण कलमें नऊ. रवाना छ० ७ रबिलाखर. बहुत काय लिहिणें हे आशीर्वाद.

नं. ३८३३. ( आश्विन शु० १२–१३ आक्टो. )

परशुरामभाऊंकडून बाळासाहेबांस पत्र छ० ११ रबिलाखरचें—

" करवीरकरांचे उद्देशानें सामानाची नेमणूक होऊन कांहीं सामान मुहूर्तानें बाहेर उतरलें. लवकरच सारें जमा होऊन चालूं लागेल. महाडाकडील बंदोबस्ताची तरतूद होत आहे. चि॥ राजश्री नारायणराव यांजकडे सामान वरचेवर जात आहे. पलटणें आजपावेतों त्यांजपाशीं पोचलीं असतील. त्यांस हुषारीविशीं लिहिलें जात आहे. त्यांचीं पत्रें वरचेवर बातमीचीं येत असतात.

नं. ३८३४. श्रीगणपति. (आश्विन शु० १२–१३ अक्टो.)

चि॥ राजश्री बळवंतराव व रामचंद्रपंत आपा यांसीं प्रति परशुराम रामचंद्र. आशीर्वाद उपरी. मानाजी फांकडा नबाबाकडे जावयाकरितां गेला त्याच्या पिच्छावर मशीराकडील जमीयत असतां तो

महादेवाचे घांटाने चढोन फाळक्याच्या पाडळीस जाऊन तेथील पांच चार घरच्या असाम्या धरून लुटालूट करून वांईस गेला अशी बातमी आली. अशांत करवीरकरही वांकडें पाऊल टाकावयास चुकणार नाहींत. याजकरितां त्यांच्या बंदोबस्तास फौजेची रवानगी लौकरच करितों. पौर्णिमा रविवारीं चालती होईल. तुम्ही बहुत खबरदारीनें असावें. बातमी चांगली राखावी. जाग्याचा बंदोबस्त शिरा असों द्यावा. लोक चहूंकडे पसरून उतरले असतील ते एके जागां जमवावे. हुशारीस व बातमी राखावयास आळस करूं नये. रवाना छ० ११ रबिलाखर. गुरुवार दहा घटका रात्र आवशीची. बहुत काय लिहिणें. सारांश येथून फौज सातान्यापावेतों जावयासीं आठ दहा दिवस लागतील तोंपावेतों सावध असावें. लोभ कीजे हे आशीर्वाद.

पै॥ छ० १८ रबिलाखर. सन सबा तिसैन आश्विन.

नं. ३८३५. श्रीगणपति. (आश्विन शु० १२–१३ अक्टो.)

चि॥ राजश्री बळवंतराव यांसीं आशीर्वाद उपरी. " राजश्री मोरोपंत दादा व रामचंद्रपंत बाबा फडके यांस वाड्यांतून काढून इचलकरंजीकरांच्या बागेंत बंदोबस्तानें ठेविल्याची खबर ऐकण्यांत आली. त्यास ते संभावित गृहस्थ व आप्त. त्यांजकडून वांकडी गोष्ट होणार नाहीं. क्षमेंत आणावे. शिंदे यांच्या हातीं त्यांस देऊं नये. बचावच करावा. " म्हणोन लिहिलें तें कळलें. ऐशियास आमचाही समज असाच होता कीं, यांजपासून वांकडें पाऊल पडणार नाहीं; परंतु कालदशेपुढें उपाय नाहीं ! यांस दुष्टबुद्धिप्राप्ति जाली ! आतां फंदफितुरांत ( आम्ही ) नाहीं म्हणतात ! निदर्शनास येईल व आलें असेल याचा विस्तार किती ल्याहावा ? मुलाजा आप्तपणा सबब. शिंदे यांचें बोलणें यांस आपल्या स्वाधीन करावें, त्यास हवालां करीत नाहीं. चाकणच्या किल्ल्यास आज रवानगी होत आहे. बचावाचीच गोष्ट मनांत आहे. ईश्वर इच्छेनें घडेल तें खरें ! रवाना छ० ११ रबिलाखर. बहुत काय लिहिणें हे आशीर्वाद.

पै॥ छ० १७ रबिलाखर. दोन तास रात्र. सन सबा तिसैन.

नं. ३८३६. श्रीगणपति. (आश्विन शु० १२–१३ अक्टो.)

चि॥ राजश्री बळवंतराव यांसीं प्रती परशुराम रामचंद्र. आशीर्वाद उपरी. आपण छ० ४ रबिलाखरचें पत्र पाठविलें तें छ० १० मिनहूस पावलें. फडके याणीं कारकुनाबरोबर आपणाकडे निरोप सांगोन पाठविल्याचा मजकूर लिहिला तो कळला. ऐशियास त्यांची रवानगी सरकारांतून आज छ० ११ रोजीं चाकणच्या किल्ल्यास होत आहे. शिंदे यांच्या स्वाधीन करीत नाहीं. कर्म करितात आणि आपण त्यांत नाहीं असें सांगून पाठवितात त्यास उपाय नाहीं! यांच्या आचाराची गोष्ट लोपली नाहीं! जगप्रसिद्ध जाहली! आपल्या ऐकण्यांत आलीच असेल. या प्रकरणीं अलाहिदा पुरवणी आपल्या हातची होती त्याचा जाब अलाहिदा पाठविला आहे. त्यांजकडील कारकून तेथें असल्यास दाखविला तरी चिंता नाहीं. रवाना छ० ११ रबिलाखर. आज चाकणेस गेले. बहुत काय लिहिणें हे आशीर्वाद.

पै॥ छ० १७ रबिलाखर. आश्विनमास. सन सबा तिसैन.
दोन तास रात्र.

नं. ३८३७. श्री. (आश्विन शु० १४–१५ आक्टो.)

चिरंजीव राजश्री बळवंतराव यांसीं आशीर्वाद. उपरी. मजकूर बितपशील कलमवार—

श्रीमंत राजश्री बाजीराव यांचा मुक्काम पारनेरास होता तेथून कूच जालें. जांबगांवास गेले. जागिरीच्या सनदा त्यांजपाशीं पोंचल्या. याउपर पुढें लवकरच जातील. कलम १.

धोंडोपंत गोखले यांस पंचवीस स्वारांनिशीं येथें यावयाकरितां लिहिलें आहे. कलम १.

मानाजी फांकडा वांईकडे गेला, पाडळीची खराबी केली. या मजकुराचें पत्र आपणाकडे रवाना करावयाकरितां चिरंजीव राजश्री नारायणराव यांजकडे

१ पत्र परशुरामभाऊचें.

पाटविलें आहे. ते पाठवून देतील करवीरकरांची नजर ठीक नाहीं. व त्याणीं लिहिलेंच असेल. यामुळें येथून फौजेची रवानगी
कलम १. लवकरच होत आहे. कलम १.

एकूण चार कलमें लिहिलीं आहेत त्याजवरून कळेल. रवाना छ० १३ रबिलाखर. बहुत काय लिहिणें. चिरंजीव रा॥ रामचंद्रपंत आपा यांस लखोटा पाठविला आहे. प्रविष्ट करावा. रवाना छ० मजकूर. बहुत काय लिहिणें हे आशीर्वाद.

नं. ३८३८. श्रीगणपति. (आश्विन शु० १४-१५ अक्टो.)

चि॥ राजश्री बळवंतराव यांसीं प्रती परशुराम रामचंद्र. आशीर्वाद उपरी. रविवारकरांप्रकरणीं पत्रें पावलीं नाहींत म्हणोन लिहिलें, त्यास डांकेवर पत्रें दिलीं होतीं. याशिवाय आणखी एक दोन रवानग्या पत्रें होतीं. सारींच गळाटलीं ! लाखोटे माघारे आले नाहींत व आपणाजवळही पोंचले नाहींत. मार्गीं चोरटे राऊत फिरतात त्यांच्या हातास लागले. असो. डांक साल्प्याच्या घाटास किंवा म्हसकोबाच्या घाटास बसवावी. रवाना छ० १३ रबिलाखर. बहुत काय लिहिणें हे आशीर्वाद.

पै॥ छ० १७ रबिलाखर. आश्विन मास. दोन तास रात्र सन सबा तिसैन.

नं. ३८३९. श्री. (आश्विन शु० १४-१५ अक्टो.)

पै॥ छ० १७ रबिलाखर. सन सबा तिसैन. आश्विन.

विज्ञापना. श्रावणमासीं अष्टमीचे दिवशीं हुजरात होळकर वगैरे फितूर झालेलें सविस्तर भाऊसाहेबानीं लिहिलेंच होतें. श्री॥ राजश्री बाजीरावसाहेबानीं ही फितूर करून जमाव करून निघून जावें असें केलें होतें तें शिंदे यांचे कारभारी यांस कळल्यावर युक्तीयुक्तीनें सारे फंद मोडून रवानगी केली. ते जांबगांवास जाऊन पोंचले. मानाजी फाकडा यानें नबाबाकडे जावें असें ठरून निघून गेला तो चांभार-

---

१ वकील विसाजी नारायण वाडदेकर याचें बाळासाहेबांस पत्र.

गोंदें याचे सुमारें जाऊन जमाव केला. ब्राह्मणांस धरून खंड घेऊं लागले. हें वर्तमान कळल्यावर इकडून मशीरुल्मुलुक याची फौज रवाना जाली हें वर्तमान कळतांच तिकडून निघून लांब लांब मजली करीत इंदापुराकडून येऊन फाळके यांचे पाडळीवर पडून तेथें एक दोन घरीं लुटून राजश्री अंताजीपंत लिमये यांस मुलांमाणसांसुद्धां धरून नेलें. मेणवलीस जाऊन दाखल जाले. नीळकंठराव रामचंद्र वीस घोड्यांनिशीं निघून गेले ते मेणवलीस पावले. हल्लीं मेणवलीस जमाव बराच होत चालिला आहे. त्याजवर येथून बैटाचें पलटण व तीन चार हजार फौज सरकारची व शिंदे यांजकडील कंपू रवाना होत आहे. रविवारीं येथून चालते होतील. श्री॥ राजश्री नारायणराव साहेब कापूरवोहोळावर आहेत सारा जमाव गेल्यावर पुढें जातील. इकडे कुडूच्या घाटानें तीन हजार फौज व पांच हजार गाडद ( महाडावर ) रवाना होत आहे. लोहगडाकडे कांहीं फौज पायदळ जात आहे. राजश्री बाबा फडके याणीं कोकणांतून ऐवज आणून फौजेस वांटला. फितूर पक्का करीत होते याजकरितां कैद जाले. त्यांस चाकणच्या किल्यांत नेऊन ठेविलें. याप्रों इकडील वर्तमान आहे स्वामीस कळावें. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

नं. ३८४०. श्री. ( आश्विन शु० १४–१५ अक्टो. )

पै॥ छ० १७ रबिलाखर. सन सबा तिसैन. आश्विन.

सेवेशीं सा॥ नमस्कार विज्ञापना. तागायत छ० १५ रबिलाखर इंदुवासर पावेतों मु॥ कापूरवोहोळ यथास्थित असे. विशेष. इकडील वर्तमान तरी—

१. राजश्री नाना फडणीस यांजकडे तीन कंपू इंग्रजांचे यावे असा करार जाहला आहे; पैकीं सांत पलटणें आलीं, म्हणोन बाजारी वर्तमान आहे.

---

१ कारकून शिलेदार बाबाजी विश्वनाथ चांफेकर यांचें बाळासाहेबांस पत्र.

१ मेणवलीचा जमाव सात आठ हजार फौज व खेरीज पायदळ याप्रमाणें जमाव जाहला आहे.

१. मानाजी शिंदे वगैरे मेणवलीस जमा जाहले. फौजेचा व पायदळाचा जमाव विशेष होत आहे. सबब पुण्याहून त्यांजवर फौजा रवाना हल्लीं जाहल्या.

१ शिंदे यांजकडील झाडून कंपू व चार हजार फौज.
१ होळकर याची तीन हजार फौज व पायदळ.
१ राजश्री हरबा आपा धायगुडे. दोन हजार फौज.
१ मेस्तर बेट. दोन पलटणें व सरकारी चार तोफा.
१ किरकोळी गारदी दोन हजार.
१ पागा चार.

---

येणेंप्रमाणें रवाना होत आहे. तूर्त बेटचीं पलटणें सोळाशें माणूस राजेवाडीचे मुकामीं आलें. पांडेश्वराजवळ करातीरीं आले असतील.

१. सालमजकुरीं मुत्सद्दी व सरंजामी किरकोळी यांजपासोन एकसाली ऐवज घेतात. मुत्सद्दी यांजकडे जातीचा वगैरे सरंजाम आहे त्याजवर एकसाली ऐवजाच्या वराता केल्या. हक्क रुसूम व दहक घेणार अशी बोलवा आहे. सरकारांत खर्चाची मोठी वोढ आहे.

१. मल्हारजी पवार वस्ती अमदाबाज नजीक घोडनदी कांहीं जमाव घेऊन लोहगडानजीक घाट उतरून नानाकडे गेले म्हणोन वर्तमान आहे.

१. महाडास राजश्री नानानीं दोन हजार बैल जमा केले आहेत. वाणी तिकडून आले ते सांगतात.

---

येणेप्रमाणें ऐकींव मजकूर कळला तो लिहिला आहे. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

नं. ३८४१. श्रीगजानन. (आश्विन शु० १४-१५ अक्टो.)

पै॥ छ० १७ रबिलाखर. सन सबां तिसैन. आश्विन.

विज्ञापना. छ० १३ रबिलाखर. यथास्थित असे. विशेष. अलीकडे वडिलांकडून आशीर्वादपत्र येऊन वर्तमान कळत नाहीं. इकडील वर्तमान दसऱ्याचे दिवशीं वडिलांस पांढरा पोषाख द्यावयास काढिला होता. तेव्हां श्रीमंतांनीं आज्ञा केली कीं, सफेत पोषाख द्यावयाचा नाहीं. भाऊंस रंगीत पोषाख द्यावयाचा. तेव्हां कारकून पोतनिशीकडील यांणीं विनंती केली कीं, एक पक्ष उणा जाल्या तागायत ( परशुराभाऊ ) रंगीत पोषाख बांधीत नाहींत. तेव्हां साहेबांची आज्ञा जाहली कीं, पांढरा कच्ची बुटी पोषाख, काढ बाहीर, व तांबडा पिवळा, हा रंगीन. यांस चिंता नाहीं. दसऱ्याच्या दिवशीं पांढरा बराणपुरी पोषाक भरमी काम वर केलेला, व ताडतोडीचा झगा, किनखाब व घोडा १ व घोडी १ निळी ऐसा सरंजाम दिला. पागा दौलतराव बिन सखोजी कांटे यास (व) बापूजीपंत बापट यास पागा काढिली होती त्याचे मोबदला, ऐशा दोन पागा दिल्या. व पालख्या श्री॥ राजश्री विठलराव बापू यांस व त्रिंबकपंत आपा व विष्णु महादेव गुरुजी महादजीपंत आत्यांचे, याजप्रों पालख्या दिल्या. दसऱ्याचे दिवशीं श्री॥ राजश्री आपा बळवंत व बाबासाहेब खवार्शींत होते. वडील एका अंबारींत पाठीमागें. ( त्यांच्यामागें ) अन्याबा मेहेंदळे होते. पंधरा अंबाऱ्या एकंदर होत्या. जरीपटका, माहीमरातब, नालकी, दोन चौघडे, पागा, फौज समेत मोठ्या समारंभानें स्वारी निघाली. शमीपूजन जाहलें तेथेंच होळकरानीं व शिंद्यांनीं नजराणा केला. सरबत्ती दोहींकडील बेमोताद जाहली. आठ दहा घटका रात्रीस स्वारी वाड्यांत दाखल जाहली. साहेबांची स्वारी पुढल्या आरसेमहालाच्या अलीकडील दिवाणखान्यांत बैठक

---

१ कारकून बाळाजी गणेश जोशी यांचें बाळासाहेबांस पत्र. २ परशुरामभाऊंस. ३ चिमाजीआपांनीं. ४ बायको मेल्यापासून. ५ आम्हीं देणार या पोषाखास ६. पालखीपदस्थांत पहिले दोघे पटवर्धन.

जाहली होती. हजुमा भारी होईल म्हणोन वडील दोन घटका चाफेखणांत बसले होते. उपरांत साहेबांजवळ गेले तों नजराणा होतच होता. नजर यजमानानीं दोन मोहोरा केल्या. ऐसा समारंभ चांगला जाहला. अतःपर घांटाखालीं मसलत लवकरच होईलसी दिसती. कळावें करितां विनंती लिहिली आहे. सेवेशीं विदित होय हे विज्ञप्ति.

नं. ३८४२. श्रीगणराज. ( आश्विन व० ५–२१ अक्टो. )

पै॥ छ० २१ रबिलाखर. सबा तिसैन. आश्विन.

पु॥ अपत्यें शिर सा॥ नमस्कार विज्ञापना. राजश्री नानाकडील दोन लक्ष रुपयांचें कापड व गोपाळजी गुंड याचें कापड व नक्त चिंचवडास आहे अशी बातमी समजल्यानंतर वडिलानीं राजश्री विसाजी नारायण वाडदेकर याजबरोबर पन्नास गाडद व पंचवीस स्वांर व शिंदे यांजकडील कारकून येक येणेंप्रमाणें रवाना केले ते दोन प्रहरानंतर चिंचवडास दाखल जाहले. कापडाचें व नक्तीचें ठिकाण लाविलें. कापडाचे गठे बांधोन पुण्यास आणावयाकरिता तयार जाले तों ही बातमी लोहगडास पोचली. तेथून सरंजाम दोनशें स्वार व तीनशें पायदळ जलदी करून चिंचवडास आले. हें वाडदेकर यांस समजलें. त्याणीं ज्या घरांत होते तेथील माडीवर चढोन दुसऱ्याचे घरांत जाऊन छपोन राहिले. लोहगडकर आले त्याणीं हत्यार चालविलें. पंचवीस माणूस इकडील जायां जखमी जालें. त्याणीं जलदी करून कापड व नक्त होतें तितकें घेऊन निघाले. ही बातमी पुण्यास समजलेनंतर दोन तीन पागा रवाना जाल्या. तेथें पोंचतात तों ते निघोन किल्यास गेले. विसाजी नारायण याची घोडी घेऊन गेले. यास पांच सहा दिवस होत आले. आणखी शिलेदार यांचीं पांच सहा घोडीं लोहगडकरी याणीं नेलीं. सेवेशीं विदित होय हे विज्ञापना.

---

१ सरदार नारायणराव गंगाधर पटवर्धन यांचें बाळासाहेबांस पत्र.

सेवेसीं बाबूराव शिवाजी व बाबाजी विश्वनाथ चांफेकर कृतानेक सा॥ नमस्कार विज्ञापना. पुण्याहून ( नानाकडे ) एक पाग्या निघोन गेला व नारोपंत चक्रदेव व मशीराची कांहीं फौज भोसले याजवर रवाना होणार असें ऐकतों. तहकीक बातमी एक दोन दिवशीं येतांच विनंती लिहितों. हे विज्ञापना.

नं. ३८४३. श्रीगणपति ( आश्विन व० ५–२१ अक्टो. )

चि॥ राजश्री बळवंतराव यांसी प्रति परशुराम रामचंद्र. आशीर्वाद उपरी. तासगावीं जमियत असावी म्हणोन पेशजी आपण लिहिलें होतें त्याजवरून पलटणांची व फौजेची नेमणूक केली आहे. त्यांपैकीं दोन पलटणें पुढें गेलीं. आजपावेतों निरेच्या किनाऱ्यास पोचलीं असतील. पलटणांचा कांहीं सरंजाम येथें राहिला आहे ता येऊन पोहोंचावयाकरितां एक दोन मुक्काम निरेवर होतील. दरमजल येतात. नि॥ राजश्री नारायणराव यांचा मुक्काम शिरवळच्या अलीकडे होता त्यांस कूच करून पलटणांस मिळावयाकरितां पत्र पाठविलें आहे. मागाहून जमीयतही दाखल होत्ये. मग जिकडील तिकडे फुटतील. तासगांवचे मैदानांत पलटणें व फौज पोंचण्यास उशीर लागावयाचा नाहीं. आपणांकडील खिजमतगार पत्रें घेऊन आले होते त्यांची रवानगी जाब देऊन केली आहे. पावेल. रवाना छ० १९ रबिलाखर. बहुत काय लिहिणें. लोभ कीजे. हे आशीर्वाद.

नं. ३८४४. श्री. ( आश्विन व० ११–२६ अक्टो. )

राजश्री बाळाजीपंत नाना गोसावी यांसीं–

सकळ गुणालंकरण अखंडित लक्ष्मी आलंकृत राजमान्य स्नेहांकित दौलतराव शिंदे, विनंति उपरी. येथील कुशल जाणोन स्वकीय कुशल लेखन करीत असलें पाहिजे. विशेष. पूर्वी आपलें आमचें पुण्याचे मुक्कामीं वचनप्रमाण होऊन परस्परें शपथ होऊन लिहिलें ही परस्परें दिलें. त्यावर आम्हांकडील कारभारी यानीं वर्तणूक वाईट करून श्रीमंतांशीं बेअदबी केली, व आमचे स्वच्छतेंत अंतर पाडून

मनस्वी वांकडी चाल धरिली. याजकारितां आम्हीं आपले कारभारी यांचा बंदोबस्त केला. त्यांचे करण्यामुळें परस्परें कांहीं संशय आले असतील ते सोडावे. आम्हांकडून आपलें वाईट होणार नाहीं, व कोणी करूं लागल्यास नाशियत करूं. पूर्वी कैलासवासी पाटीलबावांचें व आपलें वचनप्रमाण होऊन परस्परें लिहिलें दिलें. त्याजवर आपली आमची स्वच्छता होऊन अकृत्रिमपणें चाललें, त्याप्रमाणें चालवूं. यांत अंतर करणार नाहीं. येविषयीं साहेबांची उदी व बेलभंडार व पाटीलबावांची पायांची शपथ असे. रवाना छ० २४ रबिलाखर. सुरु सन सबां तिसैन मय्या व अलफ. बहुत काय लिहिणें लोभ कीजे हे विनंती.

नं. ३८४५. ( आश्वि० व० १२-२६ आक्टो. )

गोविंद शामराव याजकडून बाळासाहेबांस पत्र—(रवाना २५ रबिलाखर. सबां तिसैन. )

" आज पुण्याहून श्रीमंत राजश्री भाऊसाहेबांचें पत्र आलें कीं, शिंदे यानीं आपले कारभारी यांस कैद केलें. यास्तव श्री॥ रा॥ नारायणराव यांसी फौजसुद्धां माघारे पुण्यास येणें, ऐसें श्रीमंतांनीं लिहिलें आहे. व जासूद जबानी सांगतो कीं, श्री॥ रा॥ भाऊसाहेब यांजवर गर्दी जाली. कोणीकडे खासे निघून गेले हें कळत नाहीं. ऐसें वर्तमान वाईट आलें आहे. जासुदाचें म्हणणें कीं, शिंदे यानीं गर्दी केली. "

नं. ३८४६. श्रीगणपति. ( आश्विन व० १२-२७ आक्टो. )

नक्कल

चि॥ राजश्री नारायणराव व त्रिंबकराव[1] यांस आशीर्वाद. उपरी. तुम्हीं आहां तेथून कूच चिट्टी पावतांच करून माघारे येणें. शिंद्यांनीं आपले कारभारी कैद केले. याजकारितां तुम्हीं कूच करून येणें. मेस्तर बेट यास चिट्टी माघारे येणेंविशी लिहिली आहे

१ अनुक्रमें मिरजकर व कुरंदवाडकर.

त्यास पावती करणें. 'आपण कूच करून गेलों, तुम्हीं येणें,' म्हणोन त्यास चिठी पाठवून तुम्हीं त्याची वाट न पाहतां कूच करून लौकर येणें. रवाना छ० २५ रबिलाखर हे आशीर्वाद.

नं. ३८४७. श्री. ( आश्वि० व० १२—२७ आक्टो. )

पै॥ छ० २८ रा॥खर सन सब्बा तिसैन आश्वि० व० ३० दहा तास दिवस.

सेवेशी साष्टांग नमस्कार विज्ञापना ता॥ छ० २५ रा॥खर आवशीची प्रहर रात्र गुरुवार पावेतों मु॥ मौजे वालें यथास्थित असों वि॥ इकडील वर्तमान तरी—

१ दौलतराव शिंदे याणीं आपले कारभारी छ० २४ रा॥ खरीं रात्रीस कैद केले आवशीस.

१ छ० २५ रोजीं अरुणोदयास मसीराने आपली फौज तयार केली व होळकर तयार होऊन श्रीमंतांचे वाड्यांवर चालोन गेले. श्रीमंत रा॥ भाऊसाहेब आपले वाड्यांतून सरकारचे वाड्याजवळ जाऊन मुख्यास पाठीसी बांधलें आणि बरोबर बाबासाहेब जनोबा सुभेदार घेऊन निघाले. तेथें होळकराची चिकाटी बसली. तेथें दोन चार वार जाहले. तैसे मारीत पर्वतीजवळील तळ्यापासीं आले. एक वार भाऊसाहेबांचे घोड्यावर बापू होळकर याणें टाकला तो तुमचीवर लागला. तेव्हां हरबा आपास कळलें ते तयार होऊन गेले. कात्रजेचा घाट चढले. मार्गे होळकराची चिकाटी बसलीच होती. याप्रों तेथून जखम लागलेला शिलेदार आला तो सांगतो. श्रीमंत दाजीकडे मशीराची फौज गेली. गोट लुटला. खासे कोठें आहेत हें वर्तमान नाहीं. हरबा आपाचा गोट लुटला. याप्रों वर्तमान आलें. होळकराची भाऊसाहेबांवर चिकाटी मुख्य पाठीसीं कोणीकडे गेले हें वर्तमान अद्यापि आलें नाहीं. आजच तिकडे बातमीस पाठविले आहेत. येतांच लिहितों.

ईश्वरें मोठा घात केला. श्रीमंत तेथून निघाले त्या अर्थी पुण्याचे सुमारे जात नाहींत. मोरेश्वराकडे कूच करून जावें. नीरा-दक्षण तीरास रहावें अशी मसलत यजमानानीं केली आहे. नशीबांत जें येईल त्याप्रारखें करूं. स्वामीकडून माणसें आल्यास. या सुमारास यावीं म्हणजे पत्ता लागेल. बातमी खचित येतांच आम्हीही माणसें रवाना करितों.

---

सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना. पुण्यात बापूसाहेबाचे समाचारास रातोरात माणसें पा॥ आहेत तीं आल्यावर सविस्तर कळेल तें लिहितों हे विज्ञापना.

नं. ३८५८. श्रीगणराज. (आश्वि० व० १३–२८ आक्टो.)

पै॥ छ० २८ रबिलाखर. सन सबा तिसैन. आश्विन व० ३० रविवार.

अपत्यें नारायणानें दोनी कर जोडून शिर सा॥ नमस्कार विज्ञापना तागायत छ० २६ रबिलाखर. वडिलांचे आशीर्वादें करून सुखरूप असों. विशेष. काल आवशीचे चार घटका रात्रीस पुण्याहून वडिलांची चिठ्ठी येथें दाखल जाली तिची नकल करून पाठविली आहे. आम्ही आज पहाटेचे चार घटका रात्रीस कूच करून पुण्याचे रोखें गेलों. पुढें बातमी समजेल तसे जातों. पुण्यांत गर्दी जाली. वडील मुख्यांस घेऊन निघाले असें म्हणतात. पुढें जाऊं तों पावेतों बातमीही येईल. मशीर व शिंदे येक जाले. मशीराचा जमाव भारी. वडिलांची काय गत जाली हें नकळे ! ईश्वरें काय योजिलें नकळे ! सेवेशीं विदित होय हे विज्ञापना.

---

१ पत्र बाळासाहेबांस. २ परशुरामभाऊ चिमाजी आपास घेऊन.

नं. ३८४९ ( आश्विन. व० ३०-३० आक्टो. )

रामचंद्रपंत आपांकडून बाळासाहेबांस पत्र-( रवाना छ० २८ रबिलाखर सबा तिसैन. )

" पुण्याहून बाळाजीपंत [१]चिपरगी याचा गडी चिठी घेऊन आला तो तसाच आपणाकडे पाठविला आहे. सारांश वडील पुण्याहून श्रीमंतांस घेऊन गेले याप्रमाणें वर्तमान आहे. पुढील आज्ञा करावी. "

नं. ३८५०. श्रीगणराज. ( कार्तिक शु० १-३१ आक्टो. )

चिरंजीव राजश्री नारायणराव यांस आशीर्वाद उपरी. तुम्ही जासूद जोडी पुण्याकडे बातमीस पाठविली होती ते कात्रजेच्या घाटापासून माघारे आले. पलीकडे माणूस जाऊं देत नाहीं म्हणोन जासूद आज येथें आले तेच जासूद तुम्हांकडे पाठविले आहेत. रा। छ० २९ रा। खर हे आशीर्वाद.

नं. ३८५१. श्रीगणराज. ( कार्तिक. शु० १-३१ आक्टो. )

चिरंजीव राजश्री नारायणराव यांस आशीर्वाद उपरी.

खंडू व काशीराम जासूद तुम्हीं पुण्यास बातमीस पाठविले होते ते शुक्रवारीं सायंकाळ पर्यंत पुण्यांत होते. त्यांचे जबानीचें वर्तमान श्रीमंतसह वडील [२]दाभाड्याचे तळेगांवास पोहचल्याचें पुण्यांत बोलत होते म्हणून सांगतात. माणसें तासगावीं थकलीं म्हणोन राहिलीं. प्रातःकाळीं येथें आल्यावर विशेष असल्यास लिहून पाठवितों. रा। छ २९ रा। खर. चि॥ राजश्री आपाचे पत्र तासगांवाहून आतांच पांचवे तासीं रात्री आलें. उदईक जासूद आलेवर पुसोन सविस्तर लिहितों. हे आशीर्वाद.

छ० १ रा। खर सन सबा.

नं. ३८५२. श्रीगणराज. ( ३१ आक्टोबर. )

श्रियासह चिरंजीव राजश्री नारायणराव यांसीं प्रती सदाशिव नारायण. अनेक आशीर्वाद उपरी. पुण्याकडील वर्तमान आजच

---

१ चिठी बाळासाहेबांची. २ मंगळवेढेकर.

दीड प्रहर दिवसास ती॥ राजश्री बापाजीकडून मुद्दाम गडी आला. त्यांतील वर्तमान वडील घरींच आहेत. चवकी शिंद्यांची बसली. श्रीमंतांस घेऊन ती॥ राजश्री हरबा बाबा जात होते. परंतु निभावणी पडली नाहीं. शिंद्यांकडील फौजेची लगट होऊन विठलवाडीपासून माघारे आणिले. सरकारवाड्यांतील बंदोबस्त शिंद्यांकडील आहे. याप्रों वर्तमान खचित आलेलें लिहून पाठविलें आहे. षट्कर्णी होऊं नये. नवल विशेष तुम्हांकडील बातमी आली असेल ती लिहून पाठवावी. वडील पुण्यांत आहेत हें वर्तमान ठिकाणीं बहुतांस कळलें नाहीं याकरितां षट्कर्णी करूं नये. मिरजेस जाणें कधीं होईल तें अगोदर लिहून पाठवावें त्यासारखे निघोन येतों. रा॥ कार्तिक शु॥ १ प्रतिपदा. दोन प्रहर. बहुत काय लिहिणें लोभ कीजे हे आशीर्वाद.

ती॥ राजश्री यादवराव[1] नानास सा॥ नमस्कार. सविस्तर चि॥ राजश्री नारायणराव यांस लिहिलें आहे त्यावरून कळेल. सेवेशीं विदित होय हे विज्ञापना.

वे॥ राजश्री आबाभट यांस सा॥ नमस्कार. राजश्री आपा व बाबाजीपंत चांफेकर यांस नमस्कार लिहिला आहे त्यावरून कळेल. बहुत काय लिहिणें हे विनंति.

पै॥ छ० २९ रा॥खर सन सबा तिसैन.

नं. ३८५३. श्रीगणराज. ( कार्तिक शु० २-१ नोव्हें. )

चिरंजीव राजश्री नारायणराव यासीं प्रती गंगाधरराव गोविंद आशीर्वाद. उपरी येथील कुशल तागायत छ० ३० रबिलाखर भौमवासरपर्यंत यथास्थित असे. विशेष. तुम्हीं पत्र छ० २८ रबिलाखर रविवार आवशीचे प्रहर रात्रीचें पत्र शिंदेवाडी परगणे कासेगांव येथील मुक्कामचें पाठविलें ते आज प्रातःकाळींच पावलें. पुण्याकडील व तुम्ही मंगळवेढ्याकडे आल्याचें वगैरे व चिरंजीव रा॥ श्रीपतराव भाऊ

---

१ पादवाडकर.

व नारायण व विनायक तुम्हांजवळ आल्याचें लिहिलें तें सविस्तर कळलें. व कांहीं बाजारबुनगें तुमचें बारामतीकर व मानगांवकरानीं लुटल्याचें लिहिलें तेंही कळों आलें. तुम्ही जलदी करून मंगळवेढ्यांकडे आलां, मोठी गोष्ट जाली. तुम्हांकडे आज दोहों दिवसांखालीं सांडणीस्वाराबरोबर व संतू काळ्याबरोबर पत्रें पाठविलीं आहेत त्यांत तुम्ही आल्या मार्गेंच इकडे यावें याविशीं लिहिलें होतें. तीं पत्रें न पावलीं तरी याउपर पावतील. असो. सुरक्षित तुमचें येणें जालें हा मोठा लाभ आहे. अत:पर पत्र पावतांच निघोन इकडे सत्वर यावें. खंडू खिजमतगार व काशी जासूद तुम्ही पुण्यास वाल्यांचे मुक्कामाहून बातमीस पाठविले होते ते आज प्रातःकाळचे तास दिवसास आले. त्यांचे सांगण्यांत " दिव्याचे घाटानें गवताचे मिसें पुण्यास शुक्रवारीं गेलों. शनिवारीं प्रातःकाळीं निघोन येतांना महादेवाकडून आलों. विसाजी नारायण वाडदेकर यांचा कारकून शेणवी आहे तो भेटला. त्याचे सांगण्यांत " तीर्थस्वरूप राजश्री भाऊसाहेब व चिरंजीव राजश्री बाबा व दाजी श्रीमंतांस घेऊन तळेगांवपर्यंत पोंहोंचले. मागें फौजा आहेत. चक्रदेवाची चिठी फडके यांचें घरीं आली जे, मागें लागलों आहों, परंतु लांब गेले. चिं॥ रा॥ विठ्ठलराव बापू भावे यांचे घरीं आहेत. चि॥ रा॥ जनोबा सुभेदार, व विठ्ठलराव बापाजी, व गोपाळपंत सोनी, बाबूराव कागलकर, निळोपंत पोंक्षे, व जयरामपंत, हे सांपडले. राजश्री नानाचे वाड्यांत चौकींत आहेत. सरकारच्या वाड्यांत व शहरांत व बाहेर झाडून चौक्या मशीराच्या आहेत. " याप्रमाणें जबानी वाडदेकराचे कारकुनानें सांगितल्याचें व यानीं ऐकल्याचें सांगितलें. कळावें. चि॥ रा ॥ श्रीपतराव भाऊ नारायणरावसुद्धां निभावून आले ही मोठी गोष्ट जाली. ती॥ मातुश्री काशीकाकी व चि॥ सौ॥ लक्ष्मीबाई व आबा यांची खबर खंडूस विचारली. त्यास ठाऊक नाहीं. काल रात्रीही तुम्हांस लिहिलेंच आहे. मिरजेस येणें. करवीरकरांची कांहीं फौज चिकोडी तालुकेंत आहे व करवीरास आहे. शें दोनशें लोक आले ते चिपरी वगैरे स्थळीं आहेत. शिरोळ घ्यावें हा

उद्देश आहे. शिरोळची बळकटी बरीच आहे. तीनशें स्वार चारशें प्यादे तेथें आहेत. तुम्ही तेथें फार दिवस राहणें ठीक नाहीं. लौकर येणें. बहुत काय लिहिणें हे आशीर्वाद.

चि॥ रा॥ श्रीपतराव भाऊस आशीर्वाद. उपरी. ईश्वर इच्छेनुरूप होणें तें जहालें. वडील क्षेमरूप गेले. श्रीगजाननानें श्रीमंतांसह सुखरूप त्यांस ठेवावें म्हणजे जाहलें हे आशीर्वाद.

चि॥ रा॥ नारायणराव यांसीं आशीर्वाद.

नं. ३८५४. श्रीगणराज. ( कार्ति० शु० ३-१ नोव्हें. )

चिरंजीव राजश्री नारायणराव यांसीं आशीर्वाद. उपरी. तुम्ही प्रतिपदा इंदुवार दोन प्रहर दिवसाचें पत्र पाठविलें तें आज बुधवारीं सूर्योदयीं पावलें. मंगळवेढेस गेलों, उत्तम आहे. येथून पत्रें पाठविलींच आहेत. कालच निघालां असाल. अतःपर दिवसगत करूं नये. मिरजेस येणें. पुण्याहून आज केरू चि॥ रा॥ बापूकडून आला. वडील जुन्नरास श्रीमंतसह पोंहोंचले. फौज मागें घेऊन रा॥ बाबा फडके व आपाबळवंत व पानशे सखारामपंत वगैरे गेले आहेत. जुन्नरास घेरून उभे आहेत असें पुणेंत वर्तमान येतें म्हणून सांगितलें. रविवारीं दोन प्रहरीं तेथून निघाला. कागद पत्र नाहीं. ती॥ मातुश्री काशीबाई व चि॥ सौ॥ लक्ष्मीबाई व आबा सारीं चि॥ बापूजवळ आहेत. विठ्ठलराव बापाजी व महादेव-वासुदेवादाही आहे. वरकड जे जे सांपडले त्यांस कैदेंत ठेविलें. चि॥ रा॥ बाबूजवळचे घोड्यांची याद लिहून नेली, परंतु पहारा चौकी नाहीं म्हणतो. कळावें. श्रीइच्छेनुरूप घडेल तें खरें. रवाना छ० १ जमादिलावल. बुधवार. बहुत काय लिहिणें लोभ करावा हे आशीर्वाद. चि॥ रा॥ श्रीपतराव यांस ज्वर आला म्हणून लिहिलें, भागवटेचा आला असेल. गोळेचे घरीं कंटाळा वगैरे होल्या त्यांची यादी लिहून नेली. गोळेजवळून मुचलका ' श्रीपतराव यांची वस्तवानी आपलेजवळ असल्यास गुन्हेगार ' असा घेतला, असें जबानी

---

१ पत्र गंगाधरराव गोविंद यांचें.

सांगितलें. तुम्ही सावध होणें. लौकर येणें. तेथें रहाणें ठीक नाहीं. हे आशीर्वाद.

चि॥ रा॥ त्रिंबकराव आपा यांसी आशीर्वाद. तुमचा नमस्कार पोंहोंचला. तुमचा लखोटा चिरंजीवांकडें पाठविला. हे आशीर्वाद.

चि॥ रा॥ श्रीपतराव भाऊंस आशीर्वाद. उपरी ती॥ मातुश्रीबाई व चि॥ सौ॥ लक्ष्मीबाई व आवा पुण्यांत आमचे घरीं चिरंजीव बापूजवळ आहेत. हे आशीर्वाद.

राजश्री बळवंतरावजी व बाबूराव शिवाजी यांस नमस्कार विनंती. उपरी. पत्रीं लिहिलें तें कळलें. रावजी! तुमचा लखोटा कुरुंदवाडास[1] पाठविला. हे विनंती.

नं. ३८५५. श्रीगजानन. (कार्तिक शु० ५–४ नोवेंबर.)

छ० ३ जमादिलावल भृगुवासर. वडील व श्रीमंत जुन्नरास आहेत. श्रीमंत किल्लेवर आहेत. वडील खालीं आहेत. श्री॥ राजश्री नाना मेणवलीस आज येणार. श्री॥ राजश्री बाजीरावसाहेब जांबगावास आले. एक दोन रोजीं राजश्री आपाजीपंत सहस्रबुद्धे (त्यांजकडे) जाणार. बहिरोपंत मेहेंदळे किल्ल्यावर गेले. जनोबा सुभेदार, हरी विष्णु, वगैरे बेड्या घालून कैदेंत आहेत. आपल्याकडील वर्तमान कळत नाहीं. काळजी लागली आहे. सेवेसीं विदित होय हे विज्ञप्ति.

नं. ३८५६. श्री. (कार्तिक शु० ६—५ नोवेंबर.)

राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री गंगाधरराव स्वामीचे सेवेसीं.

पोष्य बाळाजी जनार्दन. सा॥ नमस्कार विनंती उपरी येथील कुशल जाणोन स्वकीय कुशल लिहीत जावें. विशेष. राजेश्री दौलतराव शिंदे[2] यांणीं आपले कारभारी शेणवी यांस कैद केलें. हें वर्तमान समजतांच राजश्री परशुरामपंतभाऊ श्री॥ राजश्री आपासाहेबांस घेऊन

---

१ कुरुंदवाडास तुमचे वडील रघुनाथराव यांजकडे. २ कारकून बाळाजी गणेश जोशी याचें सरदार नारायणराव गंगाधर पटवर्धन यांस पत्र.

निघाले. त्यांचे पाठलागास शिंदे, होळकर, रास्ते, व दौला व हुजरात वगैरे फौजा गेल्या. भाऊ श्रीमंतांसुद्धां जुन्नरास गेले. श्रीमंतांस किल्ल्यावर ठेवून आपण पांच सातशें स्वारांनिशीं खालीं आहेत. चि॥ राजश्री आपासीं समेटीचें बोलणें लाविलें आहे म्हणोन वातम्या आल्या आहेत. आम्ही येथून निघोन फौजसुद्धां पुरंदरानजीक जाण्याचा बेत केला आहे. तिकडून श्री॥ राजश्री बाजीरावसाहेबही लौकर येणार. इकडूनही भाऊंशीं समेट व्हावा हेंच मनांत आहे. आपल्याशीं जो घरोबा पूर्वीपासून चालत आला त्यांत दुसरा विचार नाहीं. रवाना छ० ४ जमादिलावल. बहुत काय लिहिणें लोभ असों दीजे. हे विनंती.

नं. ३८५७. श्री. ( कार्तिक शु. ६–५ नोव्हें. )

राजश्री बाळाजीपंत नाना गोसावी यांसी—

सकळ गुणालंकरण अखंडित लक्ष्मी आलंकृत स्नेहांकित दौलतराव शिंदे. दंडवत विनंति उपरी. येथील कुशल जाणोन स्वकीय कुशल लिहीत असावें. विशेष. आपल्या सूचनेप्रमाणें श्रीमंत राजश्री बाजीरावसाहेब यांची स्वारी पुण्यानजीक येईल. व आपलें येणें लवकरच झालें पाहिजे, यास्तव हसनखानभाई यांस व नबाब अजमल उमराव बहादुरांकडून राजे रघूत्तमराव यांस आपणाकडे पाठविलें आहे; तरी आपण कोणेविषयीं संशय न धरितां खातरजमेनें सत्वर पुण्यानजीक यावें. म्हणजे आम्हीं व अजमल उमराव बहादूर आपल्या भेटीस येऊन, घेऊन येऊं. याअर्थी नबाब महसूफ यानींही खातरजमेचें पत्र लिहिलें असे. निःसंशय यावयाचें करावें. रवाना छ० ४ जामादिलावल. बहुत काय लिहिणें लोभ कीजे हे विनंती.

नं. ३८५८. श्री. ( २३ डिसेंबर. )

पै॥ छ० २५ जमादिलाखर. सन सबा तिसैन.

सेवेशीं जनार्दन शिवाजी कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना. मार्गशीर्ष कृष्ण दशमीपावेतों स्वामींचे कृपेंकरून सेवकाचें वर्तमान

---

१ दौला अगर मेनुद्दौला म्हणजे मशीरुल्मुल्क. २ आपा बळवंत मेहंदळे यांशीं. ३ मेणवलीहून. ४ मशीरुल्मुल्क याजकडून.

यस्थास्थित असे. विशेष. स्वामींनीं पत्र पाठविलें तें पावलें. लिहिला मजकूर कळला. ' रा॥ बाबूराव शिवाजी यांस येणेंविशीं लिहिलें आहे, त्यास ते येऊन बोलून त्यांस लौकरच पाठवून देतों ' असें लिहिलें, व कित्तूर प्रकरणीं रा॥ आपाजी गोविंद याचा मजकूर लिहिला, त्यास तीर्थस्वरूप रा॥ दाजीबानीं निरोपाविशीं ( नानांस ) पुसलें. त्यास उत्तर जाहलें कीं, तुम्हीं जाऊं नये. जनार्दनपंतांसच त्यांजकडे पाठवून देतों. त्यावरून मीं विनंती केली. त्यावरून सांगितलें कीं, श्रीमंतांशीं आमचें बोलणें मिरजकरांप्रकरणीं जाहलें आहे. त्यास श्रीमंत संशय फार घेतात. त्यास पुन्हां मागती श्रीमंतांशीं बोलून तुमचे समक्ष एक वेळ बोलणें करूं. म्हणजे त्यांतील अर्थ तुम्हांस सारे समजतील. त्याप्रमाणें तुम्हीच मिरजेस जाऊन तेथील कितीएक श्रीमंतांचे मर्जीनुरूप खातरजमा करून घेऊन यावें म्हणजे पुढें जसें कर्तव्य तसें करितां येईल; म्हणोन सांगितलें. त्यावर मीं विनंती केली कीं, त्यांस येणेविशीं मिरजेहून आज्ञा जाहली आहे त्याप्रमाणें निरोप द्यावा. पुढें श्रीमंत ( व ) आपण आज्ञा करितील त्याप्रमाणें मी जाऊन बोलून येतों. तेव्हां उत्तर जाहलें कीं, अगोदर त्याणीं जाऊं नये. तुम्ही जाऊन श्रीमंतांकडील बोलणें बोलावें. असें उत्तर जाहलें. त्यास श्रीमंतांचें व नानांचे बोलणें जाहलेवर मला आज्ञा करितील तेव्हां मी येईन. त्यास राजश्री बाबाजीपंतास पाठविणेंची आज्ञा जाहल्यास पाठवून देतों. श्रीमंत नानांचे बोलण्यांतील भाव पेशजी सालगुदस्त श्रीमंत राजश्री भाऊनीं आम्हास आणशपथ दिली त्याजवरून श्रीमंतानीं खातरजमा करून त्यांवर विश्वास ठेविला त्याची अवस्था पुढें अशी जाहली ! तेव्हां पुढें फौजसुद्धां चाकरी घेणें त्यापेक्षां तशा तऱ्हेची खातरजमा जाहली पाहिजे; असा बोलणेंतील भाव दिसतो. राजश्री भिमाजी नारायण यास पाठवावयाविशीं श्रीमंत नानांचें पत्र गेलेंच आहे. त्यांजकडील बोलणार आहेत ते बोभाट करीत आहेत. त्यांस लौकर रवाना करावें. तालुके कित्तूरसंबंधानें राजश्री आपाजी गोविंद यांस माहितगारी नाहीं; येसाजी गोविंद माहीत. त्यांचे ठिकाण नाहीं; म्हणोन

लिहिलें, याविशीं अलाहिदा पुरवणीवरून कळेल. कित्तूर तालुक्यांत गडबड जाहली आहे. त्यास राजश्री धोंडोपंत गोखले त्या सरदेस आले आहेत त्यांस फौजेस निरोप देणें आणि हुजूर येणेंविशीं पत्र गेलें आहे. त्यास आपल्याकडील हजार राऊत देऊन बंदोबस्त करून यावा असें पत्र आलें आहे. करवीरकरांस फौज दूर करून ठिकाणास यावयाविशीं पत्रें गेलीं आहेत ते आतां करवीरास येतील. पेशजी मांडवगणास कारकून किंवा माणूस जाऊं नये येविशीं विनंती लिहिली होती. त्यावरून आज्ञा आली कीं, तुमचे पत्राचे पूर्वींच माणसें गेलीं होतीं. अतःपर जाणार नाहींत. त्यास कालच एक कारकून व एक माणूस गेला होता तो सांपडला. येथें धरून आणला आहे. त्याजपाशीं तीन चिठ्या सांपडल्या आहेत व दोन कारकून दुसरे तेथून गेले त्याजवरून पत्ता लावीत राऊत गेले आहेत. सांपडतील असें वाटतें. कारकून सांपडला तो कृष्णाजीपंत रिसबूड यांचा मेहुणा असें म्हणतो. कैदेंत आहे. मांडवगणाबाहेरून चारपांच कोसांवरून चौक्या आहेत, माणसें धरतात. त्यास पेशजी विनंती लिहिलीच आहे. अतःपर बंदोबस्त असावा. पचनीं पडे तें करावें. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

नं. ३८५९. श्रीगणराज. (कार्ति. शु. ९–९ नोव्हें.)

चिरंजीव राजश्री नारायणराव यांस आशीर्वाद. उपरी. आज बाळाजीपंत जोशी यांजकडून माणसें आलीं. श्रीमंतांस वडिलांनीं स्वाधीन केलें. वडील व सर्व बरोबर मंडळी रास्तेजवळ आहेत. तुम्हीं आज किल्ल्यांत न येणें. गोटांतच रहाणें. रवाना छ० ८ जमादिलावल. लढाई मोटी जाहली अशी बोलवा आहे. हे आशीर्वाद.

नं. ३८६०. श्रीगणराज. (कार्ति० ९–९ नोव्हें.)

चिरंजीव राजश्री नारायणराव यांसी आशीर्वाद. उपरी. बाबूराव म्हसकर व बाबाजी विश्वनाथ यांस राजश्री नानाकडे पाठविणार. त्यास त्यांबरोबर स्वार निसबत आपाजी दामोदर याजकडील पंधरा

१ चिठी गंगाधरराव यांची. २ चिठी गंगाधरराव यांची.

पाठवून देणें. व बाबाजीपंतास बसावयास तुम्हीं दिली होती ती घोडी मोतादृदारसुद्धां व स्वांर लिहिलेप्रमाणें व रा॥ बाबूराव म्हैसकर यांस अस्तमानीं येथें पाठविणें. रवाना छ० ८ जमादिलावल हे आशीर्वाद.

नं. ३८९१. श्रीगणराज. ( कार्ति० शु० ९–९ नोव्हें.)

चिरंजीव राजश्री नारायणराव यांसी आशीर्वाद. उपरी. छबिन्यास राऊत ठेवणेंविशीं राजश्री गणेश गोविंद यांस सांगितलें आहे. त्याप्रमाणें ढवळीवर छबिन्यास राऊत पाठवावे व श्रीमार्कंडेश्वरानजीकही छबिन्यास पाठवीत जाणें. दिवसासही पांच पांच राऊत असावे. रातबिरात गोटांतही हुशारी असावी. रवाना छ० जमादिलावल. आज स्वांर गेलेच असतील. ढवळीस ताकीद पाठविली आहे. पुण्याहून शुक्रवारचें पत्र प्यादे नऊ असामी आले त्यांजबरोबर चि॥ रा॥ बापूचें आलें. सुखरूप आहेत. हे आशीर्वाद.

नं. ३८९२. श्री. ( कार्तिक शु० ९–९ नोव्हेंबर )

सांडणीस्वरांबरोबर पत्र पाठविलें त्याची नक्कल.[1]

श्रीमंत राजश्री नाना स्वामीचे सेवेशीं. पोष्य गंगाधर गोविंद. सा॥ नमस्कार विनंती. येथील कुशल तागायत छ० ८ जमादिलावल पावेतों क्षेमरूप असों. विशेष. आपण छ० २९ रबिलाखरचें पत्र पाठविलें तें छ० ६ जमादिलावलीं प्रातःकाळचे सहा घटका दिवसास पावलें. पत्रीं लिहिलें जे, “ पुण्याकडील वर्तमान कळलेंच असेल. राजश्री नारायणराव फौजसुद्धां इकडे आहेत त्यांस लिहून पाठवून आम्हाकडे पाठवावे. आपला घरोबा पहिलेपासोन आहे त्यांत दुसरा प्रकार नाहीं. ” ऐशियास पुण्याकडील गडबड जाल्यावर चि॥ राजश्री नारायणराव निरेच्या सुमारें होते ते निघोन पंढरपूर मंगळवेढ्याकडून छ० ४ जमादिलावलीं मिरजेनजीक आले. लोक फौजेंतील कांहीं आपले घरास गेले आहेत. येतील. श्री॥ महाराज राजश्री छत्रपति करवीरवासी यानीं तमाम सरकारतालुका चिकोडी आदिकरून

---

१ चिठी गंगाधरराव यांची.

अंमल उठवून आपला बसविला. आमचे तालुकेंत सरंजामाचे रोखे मसालेचे जाहले आहेत. शिरोळ्यांत सरकारचें ठाणें होतें तेंही घेतलें. काल समडोळीजवळ वारणातीरीं मुक्काम होता. आज कूच करून अष्ट्यांकडे गेले असा प्रकार आहे. याचा बंदोबस्त व्हावा. आपणांकडील कागद घेऊन आलेलीं माणसें तेच दिवशीं कुरुंदवाडास चि॥ राजश्री रघुनाथराव दादाकडे गेलीं तीं आलीं नाहींत यास्तव अस्तमानपर्यंत मार्ग आज पाहोन हें पत्र सांडणीस्वाराबरोबर पाठविलें आहे. महाराजांकडील उपसर्ग न होय असा बंदोबस्त होऊन पत्र यावें म्हणजे आपले लिहिलेप्रमाणें चि॥ राजश्री नारायणराव यांस फौजसुद्धां पाठवितों. राजश्री बाबूराव शिवाजी म्हैसकर व बाबाजी विश्वनाथ यांस आजच ( आपणाकडे ) रवाना करितों. सेवेशीं येऊन विनंती करितील. आपली कृपा आहेच. बहुत काय लिहिणें. कृपा लोभ असों द्यावा हे विनंती.

नं. ३८६३. श्री. ( कार्ति० शु० ११–११ नोव्हें. )

पै॥ छ० १० जमादिलावल. सबा तिसैन.

विज्ञापना. मांडवगणांस अतःपर कारकून किंवा पत्र किंवा निरोप जाऊं नये व दुसरेकडेही कोठेंही जाऊं नये असा पक्का बंदोबस्त करावा. नाहींतर संशय मनास येऊन वांकडें होण्यास उशीर लागणार नाहीं. याजकरितां लोभ न धरितां बंदोबस्त राखावा. विसाजीपंत म्हणून कारकून मांडवगणास आपांनीं पाठविला होता. त्यास आणवावा असें नानानीं सांगितलें. त्यास पक्क्या बंदोबस्तानें पाठवून द्यावा. ह्यांसही निखालस वाटेल. दुसरें राजश्री आपाजी गोविंद यांणीं कित्तूरची मामलत केली, त्याचा वसूल घेतला, महालाची खराबी वगैरे केली, त्यांस आणावयास हुजरे व कारकून येत होते. त्यास पंधरा दिवसांत जावसाल त्यांचा कारकून आणून करितां म्हणोन करार करून सरकारच्या पत्राची नक्कल आपाजी गोविंद यांजकडे पाठविली.

१ कारकून वकील बाबूराव शिवाजी म्हैसकर यांचें गंगाधरराव यांस पत्र. २ रामचंद्रपंत आपानीं भाऊंकडे.

त्यास त्याचा जाबसाल जाहला पाहिजे, याजकरितां आपाजी गोविंद यांस अथवा खातरजमेचा फडशा करी असा कारकून त्यांचा पाठवून द्यावा म्हणजे ठराव करूं. सावकारांच्या वराता त्या वेळच्या पन्नास हजारांच्या त्यांवर आहेत त्यांचेंही बोलणें सरकारांत आहे. त्याचीही तोड काढली पाहिजे पत्राचीं उत्तरें जलद यावीं. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

नं. ३८६४. ( कार्तिक शु० १३–१३ नोव्हें.)

गंगाधरराव गोविंद यांजकडून नाना फडनवीस यांस पत्र छ० १२ जमाविलाबलचें.—

" श्री॥ राजश्री आपासाहेब यांस घेऊन ती॥ राजश्री भाऊ-साहेब जुन्नरास गेले आहेत. मागून सरकारच्या वगैरे फौजा पाठ-लागास गेल्या त्यांशीं समेटीचें बोलणें लागलें आहे. इकडून भाऊंशीं समेट व्हावा. हेंच मनांत आहे. आपल्याशीं जो घरोबा पूर्वीपासोन चालत आला त्यांत दुसरा विचार नाहीं. " असें कृपा करून लिहिलें, त्यांस पूर्वीपासोन आम्ही आपले. आपणच संरक्षण करीत आलां. पुढेंही कृपा करणार आपणच आहेत. राजमंडळचा उपद्रव बहुत होत आहे. तेरदाळ वगैरे अंमल त्यानीं आपला बसविला. येविशींचा बंदोबस्त केला पाहिजे. आपले पत्रापों चि॥ राजश्री नारायणराव यांची रवानगी फौजसुद्धां करितों. महाराज करवीरवासी अष्ट्यांचें मुक्कामीं आहेत. शहापूर प्रांतांतही सामानगडकरी यांचा उपद्रव होतो. गांव मारले गेले. याचा बंदोबस्त कृपा करून करावा. "

नं. ३८६५. श्री. ( कार्तिक व० ५–१९ नोवेंबर. )

पै॥ छ० २४ जमादिलावल सन सब्बा तिसैन.

सेवेशीं जनार्दन शिवाजी म्हैसकर कृतानेक सा॥ नमस्कार विज्ञापना तागायत छ० १८ जमादिलावल पावेतो मु॥ पुणें वर्तमान यथास्थित असे. विशेष. स्वामीनीं दोन पत्रें पाठविलीं तीं पावलीं. सविस्तर कळलें. ती॥ राजश्री दाजीबा व राजश्री बाबाजीपंत आले त्याणीही सविस्तर सांगितलें. श्रीमंतांचे पर्याय त्याणीं लिहिले आहेत

त्यावरून विदित होईल. श्री॥ राजश्री बापूसाहेबाकडील केरू खिजमतगार आपल्याकडे आला त्याणें कांहीं गैरवाका समजाविला म्हणोन कळलें. त्यास आजपर्यंत अशी गोष्ट केली नाहीं व पुढेंही घडणार नाहीं. खातरजमा असावी. केली असतां व्यभिचार घडणार नाहीं ही खातरजमा चित्तास आली त्यावरून आजपर्यंत असें कर्म केलें नाहीं. लहान माणसें, उगीच लबाडी सांगावी, तें मनांत यावें, हेंही अपूर्व आहे. इतका लोभ आम्ही धरीत नाहीं. ईश्वरी सत्ता व श्री॥ कैलासवासी नानांचा आशीर्वाद आहे तर कोठे ही शेर मिळेल. चिंता नाहीं. लहान माणसानें सांगितलें त्याजरून संशय मनांत आला त्यास कोणी इतबारी पाठवून चौकशी करून संशय ठेवूं नये. जरूर करावें. मशीरुल्मुलकाकडे मी गेलों तो श्री॥ नानांचे आज्ञेवरून सरकारकामाकरितां गेलों. आज पंधरा वर्षें येथें आहे परंतु आपल्याकडील कामांत किंवा जाबसालांत बोलिलों नाहीं. आपल्यासही ठाऊकच आहे. पुढेंही इच्छा नाहीं. ज्याचें दैव त्याचे बरोबर ! आजपर्यंत किती एक गोष्टी लोक सांगत होते, आम्ही ऐकत होतों. परंतु ही गोष्ट ऐकिल्यावरून अपूर्व दिसून आलें. आम्ही खोटें आणि खिजमतगार लहान माणसें सांगतील ते खरें असें जाहल्यास उपाय नाहीं. जरूर कोणी खातरजमेचा पाठवून चौकशी करवावी अथवा येथें आले आहेत त्यांवर येखत्यार असल्यास त्यांस पाठवून चौकशी करावी. मर्जी असल्यास श्रीमंत नानाची व मशीरुल्मुलुख याची रुजवात करून देतों. संशय मनांत टेवूं नये. मशीरुल्मुलुक गेलेवर खातरजमा होणार नाहीं. याजकरितां लिहिलें आहे. सत्वर याचा उद्योग करावा. आपली खातरजमा जाल्याशिवाय आम्हास चैन पडत नाहीं. पत्राचें उत्तर समर्पक पाठवावें. आपण रुजुवात न केली तर केरू येथें आल्यास मी पारिपत्य करितों. मग स्वामी म्हणतील आमचे माणसाचा बेआब केला ! याजकरितां विनंती लिहिली आहे. माणसें लहान आणि मोठीं कलागत लाऊन नाशास कारण करितात हें ठीक नाहीं. बहुत काय लिहिणें सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

नं. ३८६६ श्री. ( कार्तिक व० ५–१९ नोवेंबर. )

पै॥ छ० २४ जमादिलावल सन सब्बा तिसैन कार्तिक.

विज्ञापना बाजारी वर्तमान येथे ऐकतो जे, श्री॥ राजश्री बाजीरावसाहेबानीं शिंदे व होळकर व मशीरुल्मुलुक याजकडे सांगोन पाठविले जे, मला दौलत नलगे. आम्हांस त्रिवर्गास एके ठिकाणीं ठेवावे. तुम्ही खात्रेस येईल त्यास राज्यावर बसवावें. नाहीं तर भाऊस अगदीं राज्यांत ठेवूं नये, असें लिहिलें यावें. त्याजवरोन लिहिलीं पुसलीं जालीं असें लोक म्हणतात. वडील मांडवगणासच आहेत. हल्लीं चिंतोपंत, बाळाजीपंत, जयरामपंत यांस पुरशिसा सरकारांतून होत आहेत. चिमाजीआपानीं सांगोन पाठविलें जे जनोबा सुभेदार व हरीपंत सहस्रबुद्धे यांस मी आल्याशिवाय कोणीकडे पाठवूं नये. हरीपंतास पुसिलें, चिमाजीआपास तुम्ही पालखींत कसें घातलें ? त्याणीं लिहून दिलें, आधीं श्रीपतराव भाऊनीं हात घातला. मग मी गेलों. असें लोक बोलतात. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना.

नं. ३८६७. श्री. ( कार्तिक व० ६–२० नोव्हें. )

पै॥ छ० १९ जमादिलावल. सन सबा तिसैन.

विज्ञापना. वडील मांडवगणास रास्ते यांचे फौजेंत आहेत. रास्ते यांचे विद्यमानें बोलणें लागलें आहे. परंतु श्री॥ राजश्री नानांचे उत्तर जाले, जे 'श्रीमंतांची (व) शिंदे होळकर मशीर यांची गांठ पडल्यानंतर ठराव करूं.' याप्रमाणें बोलले. तिकडील सविस्तर त्याहावयाची आज्ञा जाली पाहिजे. आम्ही राजश्री आनंदराव दादांकडे जाऊन भेट घेतों म्हणजे सविस्तर समजेल. परंतु वडिलांविशीं (बाजीरावसाहेबांची) मर्जी कठीण दिसत्ये. स्वामींविशीं उत्तम आहे. सविस्तर मागाहून लिहितों. पेशजी सांडणीस्वाराबरोबर महारा-

---

१ कारकून वकील बाबूराव शिवाजी म्हैसकर याचें बाळासाहेबांस पत्र. २ कारकून वकील बाबूराव शिवाजी म्हैसकर याचें बाळासाहेबांस पत्र. ३ रास्ते.

जांस पत्र उपद्रव प्रांतास न करणेंविशीं ( नानाकडून ) गेलें आहे म्हणोन येथें ऐकिलें. त्यास ( सदरहू पत्र ) येऊन पावलेंच असेल. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना.

नं. ३८६८. श्री. ( कार्तिक व० ७–२१ नोवें. )

राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री गंगाधरराव स्वामीचे सेवेसीं.

पोष्य बाळाजी जनार्दन. सा॥ नमस्कार विनंती उपरी येथील कुशल जाणोन स्वकीय कुशल लिहीत असावें. विशेष. आमचा जिन्नस तेथें आहे तो इकडे आणावयाचा, याजकरितां वोझ्यास उंट व बराबर रखवालीस स्वार प्यादे देऊन मेणवलीस पोंचवून द्यावा. तेथून पोहों-चवून द्यावयाचा सरंजाम नसल्यास लिहून पाठवावें. येथून उंट व स्वार प्यादे पाठवून घेऊन येऊं. रवाना छ० २० जमादिलावल. बहुत काय लिहिणें. लोभ असों दीजे. हे विनंती.

नं. ३८६९. श्री. ( कार्तिक व० १४–२८ नोव्हें. )

श्रीमंत राजश्री बाळासाहेब स्वामीचे सेवेशीं.

विनंती सेवक बाळाजी गोविंद. मुक्काम कसबे ऐनापूर. कृतानेक सा॥ नमस्कार. विज्ञापना. तागायत छ० २७ जमादिलावल इंदुवार तीन प्रहर दिवसपावेतों यथास्थित असे. विशेष. स्वामींनीं काल प्यादे पाठविले ते एकूणतीस असामी येथें आले. राजमंडळकरांची फौज काल चुंदुरावर होती. आज पुढें येणार, यामुळें कृष्णातीरचीं खेडीं शिरगोपी, उगार वगैरे येथील गुळें येऊन भरलें होतें तेंही आवाईमुळें गडबडलें. गांवचे लोकही निघणार. गांव थोर, जमावही थोडका ! पेशजी दंग्यामुळें दहा वीस असामी जदीद[1] ठेविले व कदीम[2] मिळोन चाळीस असामी. काल सरकारांतून आलेले तीस. इतका मात्र जमाव आहे. फौज इकडे येत्ये किंवा कोणत्या रोखे होतात न कळे. सविस्तर विदित व्हावयाकरितां लिहिलें आहे. आज्ञा येईल त्याप्रमाणें लोकांस सांगतों. बहुत काय लिहिणें. सेवेशीं विदित होय हे विज्ञापना.

---

१ नवे. इंगामी. २ जुने कायमचे.

नं. ३८७०. श्री. ( कार्तिक व० ७—११ नोवेंबर. )

पै॥ छ० २४ जमादिलावल. सन सबां तिसैन. कार्तिक व० ११.

पुं॥ शिर सा॥ नमस्कार विज्ञापना ती॥ मातुश्री काशीकाकी-विशीं ( नानाजवळ ) विनंती केली. त्याजवरून आज्ञा जाली जे, 'काकींनीं मात्र जावें. श्रीपतरावाची स्त्री व पुत्रास निरोप द्यावयाचा नाहीं,' तेव्हां विनंती केली, 'श्रीपतराव भाऊ मिरजकरांकडील. याजकरितां बाळासाहेबानीं विनंती करावयास सांगितलें आहे.' तेव्हां उत्तर जालें जे, 'ते त्यांचे तर्फेचे खरे. परंतु अमदाबादचा सुभा त्याणीं केला. मामलतीचे बखेडे केले. याणीं फौज जमा केली याजमुळें महालीं फौज ठेवावी लागली. असे कितीयेक जाबसाल त्यांजकडे आहेत.' असें उत्तर जालें. त्याजवरून विनंती केली जे, 'मुलांमाणसांकडे काय आहे?' तेव्हां बोलले, 'आमचे पदरच्यांचे बायकांचे ( भाऊनीं ) काय विपत्य केले? त्यापक्षीं मातुश्रीस मात्र जाऊं द्यावी. वरकडांस निरोप व्हावयाचा नाहीं. याप्रमाणें उत्तर जालें. व ( श्रीपतराव ) भाऊनीं अनुष्ठान आपले बिऱ्हाडा करविलें ते ब्राह्मण आणोन चौकशी होत आहे. मातुश्रीबाईचें म्हणणें, 'यांस घेतल्याशिवाय मी जात नाहीं!' त्यास काय आज्ञा! हे विज्ञापना.

नं. ३८७१. श्री ( कार्तिक व० ७—२१ नोवेंबर. )

पै॥ छ० २४ जमादिलावल. सन सबां तिसैन. कार्तिक व० ११ भृगुवासर. पुं॥ सेवेशीं शिरसा॥ नमस्कार विज्ञापना. श्री॥ राजश्री नानांची भेट सासवडच्या मुक्कामीं जाल्याची विनंती सेवेशीं लिहिलीच आहे. त्याजवर या मुक्कामीं आल्यानंतर वेगळी ग.ठ पडून

१ कारकून वकील जनार्दन शिवाजी म्हैसकर यांचें पुण्याहून बाळासाहेबांस पत्र. २ अनुष्ठान नाना मरावे म्हणून! ३ कारकून वकील जनार्दन शिवाजी म्हैसकर यांचें पुण्याहून बाळासाहेबांस पत्र.

बोलणें जालें त्यांतील पर्याय पुरवण्या वेगळ्या वेगळ्या लिहिल्या आहेत त्याजवरून विदित होईल.

१ रहिमतपुराविशीं मानाजी शिंदे यांस रुबरू नानानीं सांगितलें जे, ' सोडचिट्टी देणें. ' त्याजवरून आज चार दिवस ' आज देतों, सकाळ देतों, ' म्हणतात. एक दोन दिवसांत घेऊन पाठवितों. कलम १

१ श्री॥ राजश्री नानानीं आज्ञा केली जे, ' नारायणराव यांस फौजसुद्धां लौकर पाठवावें म्हणोन ल्याहावें. ' त्याजवरून विनंती केली, ' सालमजकुरीं महालीं नापीक व करवीरामुळें प्रांत उध्वस्त व सालमजकुरीं छावणीसही फौज होती. याज-मुळें कर्जाचे पेचांत आहों. त्यास हजार रावतांनिशीं येणें-विशीं आज्ञा व्हावी. ' त्याजवरून उत्तर आलें जे, ' आमचे जिल्हाव्याची फौज येवढीच आहे. त्यास सारे फौजेनिशीं लौकर यावें असें ल्याहावें. ' म्हणोन आज्ञा जाली आहे. त्यास दोन हजार फौजेनिशीं तयारी होऊन रवानगी जाली पाहिजे.

१ श्री॥ राजश्री बाजीरावसाहेब खराडीवर आहेत. श्री॥ राजश्री आपासाहेब पुलाजवळ आहेत.

१ सोलापूरकरांस पत्र घेतलें तें परभारें मंगळवेढ्यांस पाठविलें. नकल पाठविली आहे. मिरजेस जाऊन मंगळवेढ्यास जाव-यास दिवसगत होते, याजकरितां जलद येथून पाठविलें.

१ श्री॥ राजश्री नानांची व शिंदे होळकर व मशीरन् मुलुकाची भेट छ० ११ जमादिलावलीं जाली. नाना येथून दीड कोस गेले. ते दीड कोस आले. पर्वतीजवळ भेटी जाल्या. तेच दिवशीं अस्तमानीं श्री॥ राजश्री चिमाजीआपाची व नानाची भेट जाली. आज इंदुवारीं श्री॥ राजश्री बाजीरावसाहेबांची व चिमाजीआपाची भेट होणार. भोंसले आज येथें येणार.

स्वामीस कळावें. सारे सरदार मिळणार त्याअर्थी श्री॥ राजश्री नारायणरावसाहेब लौकर आल्यास उत्तम आहे. नानानीं तीन वेळां सांगितलें, ' लौकर आणवावें. ' मीं विनंती केली, ' करवीरकरांचा बंदोबस्त जाल्याशिवाय येणार नाहीं. ' तेव्हां उत्तर जालें, ' बंदोबस्त जाला असेल. पत्रें गेलीं आहेत. ' त्यास श्रीमंतांची रवानगी लवकरच करावी.

सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

नं. ३८७२. श्री. ( कार्तिक व० ७–२१ नोवेंबर.)

पै॥ छ० २४ जमादिलावल. सबा तिसैन.

पु॥ शिरसा॥ नमस्कार विज्ञापना. श्री॥ राजश्री नानानीं आज्ञा केली जे, " श्री॥ राजश्री भाऊसाहेबांचे पदरचे कारकून वगैरे मिरजेंत व तुमचे महालांत असतील त्यांस बंदोबस्तानें असों द्यावें. तजावजा होऊं देऊं नये. त्यांचे चीजवस्तीसुद्धां जेव्हां आम्हीं म्हणों तेव्हां हवालीं करावें. " तेव्हां आम्हीं विनंती केली जे, " मुलांमाणसांकडे काय आहे ? येकजण त्यांचे पदरीं, त्याचा भाऊ यांचे पदरीं ! कोणी आप्तविषयी. असा प्रकार आहे. कृपा करणार आपणच आहेत. भाऊसाहेबानीं कारभार केला हा रामचंद्रपंतआपास ठाऊक नाहीं. तेव्हां त्यांजकडे काय दोष आहे ! " त्याजवरून उत्तर जालें, " ही रदबदल करूं नये. याप्रमाणें तुम्हीं ल्याहावें. " त्याजवरून विनंती लिहिली आहे. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

नं. ३८७३. श्री. ( कार्तिक व० १३–२७ नोवेंबर. )

पै॥ छ० १ जमादिलाखर सन सबा तिसैन. मार्गशीर्ष.

विज्ञापना. छ० २५ जमादिलावलीं मंदवारीं चौदा घटका दिवसास श्री॥ राजश्री बाजीरावसाहेब यांच्या व राजश्री नानांच्या

---

१ कारकून वकील जनार्दन शिवाजी म्हैसकर याचें पुण्याहून बाळासाहेबांस पत्र.
२ कारकून शिलेदार बाबाजी विश्वनाथ चांकेकर यांचें पुण्याहून बाळासाहेबांस पत्र.

भेटी जाहल्या. भेटीचा समारंभ हडपसरचे व वानवडीचे मध्यें जाहला. भेटीचा अनुक्रम—

१ प्रथम राजश्री नाना.
१ भोसले.
१ मशीर.
१ होळकर.
१ शिंदे.
१ मध्यें दरम्यान मानकरी.

—

येणेंप्रमाणें भेटी होऊन श्रीमंत माघारे गोटास गेले. हल्लीं मुक्काम मौजे खराडी व मुंढवेंनजीक आहे. राजश्री नानांचें कूच होऊन पुलानजीक मंदवारीं मुक्काम जाहला. श्रीमंतांजवळ चौकी-पहारेचे बंदोबस्तास शिंदे यांचीं पलटणें आहेत. आज राजश्री नाना इंदुवारीं मशीराचे डेरियास खलबताकरितां जाणार. श्री॥ राजश्री बाजीरावसाहेबांस वस्त्रेंही लवकरच होतील असें वाटतें. लौकर वस्त्रें होऊन वाडेंत जावयाची उत्कंठा आहे. राजश्री भिमाजी नारायण याजविशीं श्री॥ राजश्री नानानीं स्वामींस लि॥ आहे. त्यास तीं मुलेंमाणसें कोठें आहेत हें लिहिलें पाहिजे. नानांच्या पत्राचें उत्तर आम्हीं विनंती करूं म्हणोन ल्याहावें. व आम्हांस पुर्तेपणें समजे असें लिहिलें पाहिजे. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

नं. ३८७४. श्री. ( मार्ग. शु० २–१ दिसेंबर. )

श्रीमन्महाराज राजश्री छत्रपति स्वामीचे सेवेशीं.

विनंती सेवक प्रीतिराव चव्हाण हिंमत बहादूर ममलकतमदार कृतानेक सेवेशीं विज्ञापना. ता॥ छ १ माहे जमादिलाखरपर्यंत स्वामींचे कृपावलोकनेंकरून वृत्त यथास्थित असे. सेवेशीं विज्ञापना. स्वामींनीं कृपाळु होऊन आज्ञापत्र सादर जाहलें तें शिरसा वंदोन

सनाथ जाहलों तेथ आज्ञा जे, ' राजश्री चिंतामणिराव[1] व राजश्री रघुनाथराव[2] यांजकडील गांवगन्ना ठाणीं घातलीं असतील तीं हवालीं करून गांवगन्ना उपसर्ग न करणें ' ची आज्ञा, ( त्यास ) आज्ञेप्रमाणें ठाणीं घातलीं होतीं तीं हवाली त्यांजकडील कारकून आले होते त्यांचे हवालीं केलीं. वरकड गांवगन्ना उपसर्ग न करणेंविशीं फौजेस ताकीद आज्ञेप्रमाणें केली आहे. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

नं. ३८७५. श्री. ( मार्ग. शु० १५–१४ दिसें. )

पै॥ × छ० १४ जमादिलाखर. अस्तमान. सन सबा तिसैन गुरुवार.

विज्ञापना. शिंदे यांचें म्हणणे आहे जे, आमचे इतलच्यानें सर्व कारभार श्रीमंत राजश्री भाऊसाहेब याणीं केला. त्यास श्रीमंतांस वस्त्रें जाहलियावर आपण राजश्री भाऊसाहेबांस आणवून पूर्ववतप्रमाणें त्यांची उभारणी करून द्यावी; असें त्याचें म्हणणें बरें बळकटच आहे. ऐकिलें वर्तमान लिहिलें आहे. श्रीमंत राजश्री बाजीरावसाहेबांस वस्त्रें मार्गशीर्ष शु॥ २ व पंचमी व सप्तमी पौर्णिमेअलीकडे होणार असें बोलतात. व मुख्यांचा[3] आग्रह बहुत आहे जे ( भाऊंस ) पर्वतवासी करावें. सर्वांस वस्त्रहरण करावें. असेंही बोलतात. परंतु मुख्याची व कारभारी यांची गांठ पडोन बोलणीं होतील तेव्हां ठरेल तें खरें. शिंदे यांचें म्हणणें, आपलेमुळें बुडाले. त्यांजकडून ही मसलत होत नव्हती. आमचे सांगितल्यावरून केली आहे. त्यांस सरंजाम राही अशी खटपट करावी; असें म्हणणें आहे. मुख्याचा तर निकर्षच दिसतो. वडील पुण्यवान् आहेत. काय ईश्वर घडवील न कळे ! सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

---

१ मिरजकर २ कुरुंदवाडकर.

× पत्रावर मिति व इंग्रजी तारीख पैवस्तीची घातली आहे. ३ बाजीरावाचा.

नं. ३८७६. श्रीगणराज ( मार्ग. व० १–१५ दिसेंबर. )

पै॥ छ० १५ जमादिलाखर. सन सब्बा तिसैन. मार्गशीर्ष.

विज्ञापना करवीरकरांकडे कारकून गेला होता त्याचीं पत्रें आलीं त्यांतील अर्थ सर्वही ध्यानांत आलेच असतील. त्यास आतांही करवीरकरांचें ध्यान हेंच दिसतें जे, कांहीं निमित्य ठेऊन गळीं पडून ( आम्हास ) नेस्त नाबूद करावें ! हाच अर्थ ! दुसरें नाहीं. हा विचार पुण्यांत कोणाचे ध्यानांत यावयाचा तोही मजकूर वडिलीं लिहिलाच आहे ! तेव्हां श्रीगजानन काय करील तें खरें ! आज्ञेप्रों सावध आहों. बातमीही येत आहे. रवाना. छ० १५ जमादिलाखर विदित होय हे विज्ञापना.

नं. ३८७७. श्री. ( मार्ग. व० ३–१७ दिसें. )

छ० १८ जमादिलाखर. सन सब्बा तिसैन.

सेवेशीं बाळाजी गोविंद. मुक्काम कसबे ऐनापूर. कृतानेक सा॥ नमस्कार. विज्ञापना तागायत छ० १७ जमादिलाखर. भानुवार. तीन प्रहर दिवसपावेतों स्वामींचे कृपेंकरून वर्तमान यथास्थित असे. विशेष. स्वामींनीं पत्र पाठविलें तें पावलें. महाराजांकडील फौजेची बातमी पक्की राखून इकडे लिहिणें व महिपतराव फराटे यास कळवीत जाणें म्हणोन आज्ञा, त्यास काल तेरदाळचीं पत्रें घेऊन जासूद सेवेशीं आलेच आहेत. आज पहांटेस पत्र तेरदाळहून आलें त्यांतील मजकूर, शाहून फौज जमखंडीस गेली. जमखंडीस बसणार. जमखंडीची एक दोन खेडीं जाळलीं, आणि शूर्पाली गांव ब्राह्मणांचा यास्तव तेथें गुळ फार भरलें होतें. तोही गांव लुटला म्हणोन आवाई आहे. याप्रमाणें पत्र आलें. मागाहून येईल वर्तमान तें सेवेशीं लिहितों. बहुत काय लिहिणें सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

---

१ रघुनाथराव कुरुंदवाडकर यांचें बाळासाहेबांस पत्र.

नं. ३८७८. श्री. ( मार्ग. व० ४-१८ दिसें. )

श्रीमंत राजश्री आपासाहेब

स्वामीचे सेवेशीं.

विनंती सेवक सुबाजी महादेव. चरणांवर मस्तक ठेवून शिर-साष्टांग नमस्कार विज्ञापना. तारीख छ० १८ जमादिलाखर सोमवार अस्तमानपावेतों मुक्काम जमखिंडी येथें वर्तमान यथास्थित असे. विशेष. तिसरे प्रहरीं आम्हीं किल्याभोंवते जाऊन पाहून आलों. पूर्वेकडील तटास राजश्री प्रीतिराव चव्हाण व श्रीमंत राजश्री पंत अमात्य यांची फौज उतरली आहे. दक्षिणेकडे ईश्वराचें देऊळ आहे तेथें तोफा दोन लागू केल्या आहेत. आणि श्रीमंत राजश्री पंत विशाळगडकरी व सरकारचे खास बारदार ऐसा मोर्चा बसला आहे. गोळीचे टप्याचे आंत पश्चिमेकडे राजश्री नाना पाटणकर वगैरे लोकांचा मोर्चा आहे. उत्तरेकडे श्रीमन्महाराज राजश्री छत्रपति फौजसुद्धां उतरले आहेत. आंतील काल बोलणें लागलें होतें, परंतु ठराव जाहला नाहीं. राजश्री भास्करमामाचें बोलणें आहे कीं, " हत्यारांनिशीं व सामानानिशीं व आंत पन्नास पाऊणशें घोडे आहेत ते सारे घेऊन जाऊन ठाणें रिकामें करून देतों. " याप्रमाणें सोडून द्यावें म्हणून श्रीमंत महाराजांचे व राजश्री रत्नाकरपंत वगैरे सर्वांचे चित्तांत आहे. परंतु राजश्री प्रीतिराव चव्हाण यांचे मनास येत नाहीं. याजकरितां तट पडला आहे. तोफानीं भिंताड कांहीं पडत नाहीं. गोळ्या आंत जाऊन छेद मात्र पडतात. आंत रेकला लिंबाएवढ्या गोळ्याचा आहे. ते दोन्ही रात्रंदिवस टक्का लाविला आहे. मारणार चांगला आहे. दोनप्रहरीं गोलंदाजास ठार मारिलें होतें, परंतु चुकून तोफेवर गोळी पडली. श्रीमन्महाराज गोळीचा मार चुकवून किल्याचे दक्षिणेस जाऊन बसून असतात. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

नं. ३८७९. ( मार्ग. व० ५–१९ दिसें. )

पुण्याहून बाबाजीपंत चांफेकर यांजकडून मिरजेस बाळासाहेबांस पत्र.

( रवाना १९ जमादिलाखर. सबा तिसैन. )

" उभयतां बंधूंचें कसें आहे ? ज्येष्ठाचा भोळा प्रकार आहे. अगदीं पत्रीं जरब लिहितात हें काय ? " म्हणोन पत्रीं आज्ञा, त्यास उभयतां बंधु एकच आहेत. त्यांचीं खलबतें होतात निराळीं तीं आम्हांस कळत नाहींत. कनिष्ठाची चाल नानांजवळ चांगलीच आहे. नानांकडे पक्ष भारी दिसतो. "

नं. ३८८०. श्रीगणराज. ( मार्ग. व० ८–२१ दिसें. )

छ० २१ जमादिलाखर. बाजारी वर्तमान. ' श्रीमंत वडील यांस अज्ञातवासांत ठेवावें आणि श्रीमंत राजश्री आपासाहेबांस घेऊन राजश्री नानानीं कारभार करावा हें एक; दुसरें ' राजश्री नानांस अज्ञातवासांत ठेवावें. कारभार श्रीमंत अमृतरावसाहेबानींच करावा. ' तिसरें, ' राजश्री मोरोबादादांस काढावें. हें ओझें उचलतें कोण ? ' ऐशा नानाप्रकारच्या आवया आहेत. ' येणेंप्रमाणें जाहलें हें कांहींच नाहीं. आणखी अधिक होणार ' हें बोलतात. वडिलांस व बाळोबा तात्यांस सदर साणांस ( ? ) काढावें हें वर्तमान आहे. येणेंप्रमाणें बाजारी आफवा आहे. येणेंप्रमाणें सर्वांचे मुखीं. लखबाचा बंदोबस्त, वडिलांस कारागृहाची मुक्तता, ऐशी बाजारी वार्ता आहे. कारभाराचा हक ( ? ) राजश्री नानाचाच आहे. विदित होय हे विज्ञापना.

नं. ३८८१. तालीक.

विनंती उपरी. मिरजकरांकडून येथें बोलण्यास राजश्री बाबुराव म्हैसकर आहेत त्याणीं ती॥ राजश्री नानास विनंती केली कीं,

---

१ अमृतराव व बाजीराव. २ विठ्ठलराव पांडुरंग यांचें बाळासाहेबांस पत्र. ३ मूळ पत्र गंगाधर गोविंद भानु, विजयदुर्गचे माजी सुभेदार, व नाना फडणीस यांचे चुलत बंधु, यांनीं गंगाधरराव बाळासाहेब यांचे दिवाण नारो बाबाजी दामले यांस लिहिलें त्याची ही नक्कल.

' आम्हांस येणेंविशीं मिरजेहून पत्र आलें. मी जातों. बाबाजीपंत येथें आहेत. कामकाजाकरितां वरचेवर विनंती करितील.' तेव्हां (नानाचें) उत्तर जालें कीं, ' तुमचे बोलण्यावर आमची खातरजमा. पुढें श्रीमंतांसीं निखालसतेचीं बोलणीं बोलोन त्यांचे मनांतील संशय निवारण करून राजश्री गंगाधरराव यांस येथें आणोन कितेक कामकाजाची पैरवी करण्याची, तें सारें येकीकडे ठेऊन जातों म्हणतां हें काय ? या कारकुनाचे हातून काय होणें ? आमची तरी खातरजमा कशी पटेल ? श्रीमंतांची पुढें आम्हीं करणें ती कशी करावी ? ' तेव्हां बाबूराव याणीं विनंती केली कीं. ' मला येणेंविशीं आज्ञा आली त्यापक्षीं जाणें प्राप्त. ' तेव्हां कितीयेक जाबसाल त्यांस सांगोन गंगाधरराव यांस पत्र दिलें. आणि निरोप घेऊन ( बाबूराव ) बाहेर आल्यावर आम्ही उभयतां म्हैसकर यांस एकीकडे काढोन बहुतां प्रकारें पुसिलें कीं, ' अद्याप मिरजकर प्रकरणीं उभयतांची खातरजमा पटली नाहीं. व कितीयेक जाबसाल उलगडले नाहींत. असें असतां तुम्हांस आणविलें हें काय ? तुम्हांशिवाय नानाची खातरजमा पटत नाहीं, तेव्हां वेव्हारास वाईट पडेल. असें पुसिलें. त्याचीं उत्तरें जनार्दनपंत याणीं उदासीनतेचीं केलीं कीं, ' आज दहा महिने मिरजकरांचे इतल्याशिवाय ( नानांचें ) संधान राखिलें. याचें कारण कै॥ गोविंद हरी यांची दौलत बहुत दिवसांची बुडते. भाऊनीं राज्याचा लोभ धरून सर्वांशीं विरोध केला त्यापेक्षां हें शेवटास जात नाहीं. भाऊ बुडतात. त्यांजबरोबर मिरजकर बुडतात. आम्ही त्यांचे पदरीं तीन पिढ्या चाकरी केली असें असतां आम्हांस समजोन त्यांचें अकल्याण होऊं नये याजकरितां नानाशीं संधान राखिलें. असें असतां चौघांचे सांगणेंवरून बाबाजीपंतानीं लिहिलें कीं, ' मला सोडून बाबूराव दरबारास जाऊन बोलत असतात. ' असे गैरवाके समजोन आमचा कारकून बाळासाहेबानीं किल्ल्याबाहेर घातला. व मनस्वी बोलतात. येण्याविषयीं पत्र आलें त्यापेक्षां जाणें प्राप्त. आजपर्यंत त्यांस न कळत आम्हीं सरपोस राखोन चालविलें, आणि आतां उघडें पडल्यास आमचा इलाज

काय ? कल्याण जालें असतां मिरजकरांचे होईल. आंतील अर्थ नानास समजले असतां आम्ही खोटें बोललों ही मात्र फजीती होणार. असो. इतके दिवस जालें तें जालें. अतःपर होणार तें होऊं ' म्हणोन सांगितलें. त्यास येविशींची माहितगारी गंगाधरराव यांस नसेल. परंतु आम्हांस पुरती आहे. महाडास असतां करवीरकर. यांचा (व नानाचा) तह जाला त्यांत पटवर्धनांच्या सरंजामाच्या जप्तीचें कलम लिहिणें पडलें. तेव्हां जनार्दनपंतांस नानानीं सांगोन पाठविलें कीं, मिरजकर व कुरुंदवाडकर यांचा सरंजाम जप्त करावा किंवा कसें, याचें कलम लिहून द्यावें लागतें. तेव्हां जनार्दनपंताकडून उत्तर आलें कीं, उभयतां स्वामीचे लक्षाशिवाय नाहींत. सरंजामाची जप्ती होऊं नये. त्यावर गोविंदराव पिंगळे यांजकडे सांगोन पाठवोन मागती जनार्दनपंताची शपथ घेतला. आणि तहांतील कलम दूर केलें. हें आषाढमासीं जालें. त्याजवर श्रावणमासीं अष्टमीचें राजकारण जालें. तेव्हांही राजश्री नारायणराव यांस 'वाड्यांत जाऊं नये, आजचा दिवस अवघड आहे,' म्हणोन जनार्दनपंत यानीं इशारा केला. पुढें नारायणराव यांस भाऊनीं मेणवलीस रवाना केलें. समागमें हजार दीड हजार सरंजाम होता. बजाबा शिरवळकर व मानाजी शिंदे दहा हजार पावेतों नानांचा जमाव होता. त्यांस येऊन गांठ घालोन नाश करणेंस अगाध नव्हतें. तेव्हांही जनार्दनपंतांचा निरोप नानाकडे आला कीं, ते आपले लक्षाखेरीज नाहींत. त्यांचे वाटेस न जाणेंविशीं मेणवलीस उभयतांस पत्रें पाठवून (जनार्दनपंतानीं) बंदोबस्त केला. त्याचा प्रत्यय पहावयाकरितां बजाबानीं कारकून पाठविला तो अटकेंत नारायणराव यानीं ठेविला ! तेव्हां व्यत्यास आला. हें समजोन (जनार्दनपंतानीं) नानांकडे सांगोन पाठविलें कीं, कारकून (यानें) चौघांदेखत येऊन पुसिलें म्हणोन (अटकेंत) ठेविला ! त्याजवर मेस्तर बेठ गेला तो नानाचे संधानांत हें जनार्दनपंतास ठाऊक होतें. तेव्हां नारायणराव यांस इशारा केला कीं, तीन कोसांचे अंतरें रहात जावें. पुढें परशुरामपंतभाऊ निघोन गेलेवर हे फौजसह निघोन जातील, नानाकडे सांगोन पाठविलें त्यांत व्यत्यास पडोन सरपोस

बाहेर पडेल, याजकरितां महाडास पत्र पाठविलें कीं, मिरजेस व कुरुंदवाडास नारायणराव व त्रिंबकराव यांजबद्दलचीं खातरजमेची पत्रें पाठवावीं. त्याप्रों नानानीं पाठविलीं तों अगोदरच नारायणराव निघोन गेले ! याचा शब्द नाना अद्याप लावतात कीं, आमचे लक्षांत असें असतां गेले कसे ? याचें उत्तर जनार्दनपंत करीत असतात कीं, स्वामीं-कडील तो खातरजमाच होती. परंतु शिंदे यांचे भयामुळें निघोन गेले. लेकुरपणा केला. असें समजावतात. पुढें नाना वरते आल्यावर बाबूराव व बाबाजीपंत आले यांची ( व नानाची ) भेट करवून बोलणें करविलें. उपरांतिक उभयतानीं जनार्दनपंतास सांगितलें कीं, बाळा-साहेब यानीं सांगितलें कीं; ' मी पाहिजे तशीं भाऊंस पत्रें लिहिलीं आहेत. भाऊंचे रुमाल सांपडले असल्यास झाडून कागद सांपडले असा-तील. ' तेव्हां लागलेच यानीं जाऊन नानासीं विनंती केली कीं, येक गोष्ट आम्हांस समजवावयाची आहे. आम्हीं समजोन उमजोन केली. आतां आपणापासीं सांगतों. तेव्हां सांगा म्हणोन आज्ञा जाली. तेव्हां सांगितलें कीं, तुमचा जिन्नस आम्हापासीं होता त्याजविशीं बाळोबा व भाऊंचें मागणें नेहमीं होतें. न द्यावा तर दोने मुलें व पथक पुण्यांत. नाश करितील. द्यावा तर आपणाजवळ जन्माचा स्नेह वडिलार्जित आहे तो बुडतो. पुढें विरुद्ध पडतें ! तेव्हां बाळोबास जें प्रिय तसे तुमचे व श्रीमंतांच्या बरे वाईटाचे कागद लिहीत गेलों. कसेंही करून दिवस घालविले. ते कागद भाऊंचे जप्तींत आले असतील. ते दृष्टीस पडले असतां संशय नसल्यास उत्पन्न होईल. त्यास ही गोष्ट मनांत आणावयाची नाहीं. आम्हीं समजोनच तुमच्या विषयाकरितां हा वेव्हार केला. ' असें सांगोन वचन घेतलें. याप्रों गंगाधरराव यांसही कळविलें. पुढें ते कागद हस्तगत

---

१ द्रव्याची ठेव. पहा नं. ३८२२. २ नारायणराव व विठ्ठलराव.

करून घ्यावे या पैरवीत आहेत. नानानीं पाहिले नाहींत. श्रीमंतांचे मनांत बहुत वांकडें. ' कुरुंदवाडकर न पुसतां शिंदे यांच्या घरीं गेले. मिरजकर तो ते व परशुरामभाऊ येकच. ' अशी समजूत होऊन वांकडें फार आहे. त्याविशीं निखालसता नानांचे हातून करावी. हे पैरवी करीत असतां चौघांचे सांगितलेवरून म्हैसकर यांसींच वांकडे-पणा दाखवून कारकून घालविला ही गोष्ट चांगली न केली. पुर्ते-पणें चौकशी करून दुरंदेशा मनांत आणोन करणें तसें करावयाचें होतें. जनार्दनपंतानीं अंग काढून वेगळे जाले असतां आजपावेतों सरपोस राखिला तो उघड होऊन नाशास कारण होतें, असें समजोन त्यास सांगितलें कीं, पंधरा दिवस तुम्हीं पल्ला सोडूं नये. आम्ही त्यांस सुचवितों. इतकें असोन ते चौघांचे बुद्धीस लागल्यास होणार तें होऊ ! अशास तुम्ही त्यांस चार गोष्टी सांगोन उभयतांची खातर-जमा करून चालत आहे तसें चालवावें. नाहीं तर दस्तऐवज पाहिजे तसे सांपडले आहेत ! महाडाहून नानानीं कागद गंगाधरराव यांस लिहिले ते देखील भाऊंचे पत्रांत मजकूर लिहिले आहेत. त्यास ही गोष्ट वाईट. दुसरा कोणीही आला असतां नानाची खातरजमा होणार नाहीं. ( नानाची ) प्रकृत माहीत आहे. आम्ही आप्त[1]. समजली गोष्ट कल्याणाची ल्याहावी. अतःपर त्यांची इच्छा. बाबूराव यांस आठ दिवस रहावीत होतों. परंतु ते न रहात. जातोंच म्हणतात. ' या कामा-विशीं गरज नाहीं. हें विश्वासाचें काम. फजीती जाल्यास आमची व्हावी ! हे उभयतां श्रीमंत आहेत. आम्हीं गरीबानीं या कामांत पडूं नये. ' असें स्पष्ट म्हणतात. तेही निघोन मिरजेस येणार. त्यास इतका मजकूर गंगाधरराव यांस एकांतीं ते व तुम्ही असे बसून कळे

---

१ गंगाधर गोविंद भानु यांचे पुत्र रामकृष्णपंत यांस गंगाधरराव बाळासाहेब यांची कन्या सखूबाई दिली होती.

समजवावें. अथवा हें पत्र दाखवावें. बाळाजीपंत व दिनकरपंत पटवर्धन गंगाधरराव यांजविशीं श्रीमंतांशीं विरुद्ध सांगतच आहेत. चिंतामणराव यांचा पक्ष त्यांस आहे. इतकें कच्चें समजावें म्हणोन विस्तारें लिहिलें आहे. पत्र पाहून माघारें पाठवावें. हा मजकूर मीं लिहिला असें दुसऱ्यास सांगों नये. तुम्हांस शपथ आहे. राजश्री गंगाधरराव यांस चांगलें उमजवावें. तुम्ही तर सांगणार चांगले आहां. भाऊंकडील मंडळी मनस्वी जनार्दनपंताविशीं सांगत असेल, त्यास तुमचे कल्याणाकरितां जशी नानाची व श्रीमंतांची मर्जी असेल तसें बोलणें प्राप्त आहे. हें मनांत आणावयाचें नाहीं. हा समय बहुत कठिण आला आहे. समजोन करणें तें करावें. लोभ करावा हे विनंती.

समाप्त.

# ऐतिहासिक-लेख-संग्रहांतील

## विषयानुक्रम.

**भाग पहिला**—सन १७६० जानेवारी ते १७६३ मेपर्यंत. नानासाहेब पेशव्यांच्या कारकीर्दीची अखेर—माधवरावास पेशवाईचीं वस्त्रें—मोंगलांची पुण्यावर स्वारी—लढाया व तह—माधवराव व राघोबादादा यांमध्यें वितुष्ट—घोडनदीची लढाई—समेट—राघोबाची पटवर्धन वगैरे सरदारांवर गैरमर्जी—मिरजेचा वेढा—मोंगलांची पुण्यावर दुसरी स्वारी—पुण्याचा विध्वंस—पेशव्यांची मोंगलाईवर स्वारी. डे. अ. पृ. ४८०.

**भाग दुसरा**—सन १७६३ मे ते १७६४ डिसेंबरपर्यंत. राक्षसभुवनाची लढाई—मोंगलांशीं तह—हैदरअल्लीचें अमोवेधक चरित्र—पेशव्यांची हैदरअल्लीवर पहिली स्वारी—रटेहळ्ळी, अनवटी, हाविरी येथील लढाया—सावनूरचें रक्षण—धारवाडचा वेढा. डे. अ. पृ. ४८०.

**भाग तिसरा**—सन १७६४ डिसेंबर ते १७६९ ऑक्टोबरपर्यंत. अनंतपूर व बिदनूर येथील लढाया—हैदरअल्लीशीं तह—भोसल्यावर पहिली स्वारी—तोतयाप्रकरणाचा उद्भव—राघोबाची गोहद वगैरे उत्तरप्रांतीं स्वारी—पेशव्यांची हैदरअल्लीवर दुसरी स्वारी—शिरें, मदगिरी, चेनरायदुर्ग येथील लढाया—तह—माधवराव व राघोबा यांची आनंदवल्लीस भेट—धोडपची स्वारी व राघोबास कैद—भोसल्यावर दुसरी स्वारी. डे. अ. पृ. ४८०.

**भाग चवथा**—सन १७६९ ऑक्टोबर ते १७७३ ऑगस्टपर्यंत. भोसल्यांशीं तह—हैदरअल्लीवर तिसरी स्वारी—कोल्हार, बाळापूर, नंदीदुर्ग वगैरे ठिकाणीं लढाया—हैदराचा गोपाळरावावर छापा—निजगलचा वेढा—पेशवे देशीं येतात—गोपाळरावाचा मृत्यु—त्रिंबकराव मामाचे पराक्रम—मोतीतलावाची लढाई—श्रीरंगपट्टणाचा वेढा—तह—बिनीवाल्यांची फत्तरगडावर स्वारी—जाटांशीं लढाई—बादशहाची स्थापना—दिल्लीची लढाई—रोहिल्यांवर सूड—पेशव्यांचा आजार व त्यांतील अनेक हृदयद्रावक प्रसंग—मृत्यु—रमाबाईचें सहगमन—नारायणरावाची पेशवाईवर स्थापना—छोटी कारकीर्द व खून. डे. अ. पृ. ६००.

**भाग पांचवा**—स. १७७३ ऑगस्ट ते १७७६ जुलईपर्यंत. बारभाईचें कारस्थान—निजामअल्लीशीं लढाई व भेट—गंगाबाईची स्थापना—कासेगांवची लढाई—राघोबाचा पाठलाग—समेटाची खटपट व राघोबाचें पलायन—गुजराथची मोहीम—इंग्रजांशीं लढाया—पुरंदरचा तह—कोळ्यांचा दंगा—प्रतिनिधींचा दंगा—कोल्हापूरकराशीं लढाया—तोतयांच्या बंडाची सुरुवात. डे. अ. पृ. ६००.

**भाग सहावा**—१७७६ ऑगस्ट ते स. १७७८ एप्रिलपर्यंत. तोतयाच्या बंडाचा बीमोड—परशुरामभाऊंची कोल्हापुरावर मोहीम—पांडुरंगरावाची धारवाडप्रांतीं स्वारी—सावशीची लढाई व सैन्याची वाताहत—परशुरामभाऊ कुमकेस जातात—त्यांच्या गमिनी हालचाली—पाळेगारांचें पारिपत्य—भाऊ व हरिपंत यांची धारवाडप्रांतीं छावणी—हैदरअल्लीवर पांचवी स्वारी—महादजी शिंद्यांची कोल्हापुरावर स्वारी—मोरोबादादाचें कारस्थान—उभारणी व बलटी—कर्नाटकच्या फौजा देशीं परत येतात. डे. अ. पृ. ६००.

**भाग सातवा**—सन १७७८ एप्रिल ते १७८४ एप्रिलपर्यंत. मोरोबादादाचें कारस्थान (द्वैतैराध) व पारिपत्य-दरबारची इळमळ-परशुरामभाऊ स्वारीस निघतात-बेरड बंडखोरांचा दंगा-भाऊची मुरापुगावर स्वारी-इंग्रजांची पुण्यावर स्वारी-पराजय व वडगांवचा तह-करवीरकरांचा बंदोबस्त-कित्तूरकरांचें पारिपत्य-इंग्रजांशीं तिसरा विघाड-इंग्रज गुजराथ व्यापितात-वसई व कल्याण घेतात-पुण्यावर चालून येतात-पटवर्धनांशीं निकरानें लढतात-रसदेची लूट व पीछेहाट-सालबाईचा तह-स्वस्थतेचीं दोन वर्षें-काशीयात्रा-करवीरकरांचा पुन्हां बंदोबस्त व तह. डे. अ. पृ. ६१०.

**भाग आठवा**—स. १७८४ मेपासून १७९१ फेब्रुवारीअखेरपर्यंत-मराठे व मोंगल यांच्या यादगीर येथें भेटी-टिपूचा नरगुंदास वेढा-नरगुंदकरांची मर्दुमी-परशुरामभाऊ कुमकेस येतात-झटापटी-तह-टिपू दंगा करून नरगुंद व कित्तूर घेतो-टिपूवर पहिली मोहीम-होळकर व बेहरे कित्तूर प्रांतीं येतात-मराठे व मोंगलांच्या पुनः भेटी-बदामी-अदवानी-टिपू मराठे व मोंगल यांस छापे घालून हैराण करितो-तह-स्वस्थतेचीं पुनः तीन वर्षें-पेशवे नाशिकास जातात-परभू ग्रामण्यप्रकरण पुन्हां उद्भवतें-सोनार व वेदोक्त-टिपूवर दुसरी मोहीम-मराठे, मोंगल व इंग्रज एकत्र होतात-परशुरामभाऊंचा धारवाडास वेढा-निकराच्या लढाया-इंग्रजांची मर्दुमी-बानेऱ्या, पेठ, रेवणी, व खंदक यांवर हल्ले.

**भाग नववा**—स. १७९१ मार्च ते १७९६ नोव्हेंबरपर्यंत-धारवाड काबीज होतें-म्हैसूर राज्यावर स्वारी-चांकी नबाबाचा पराजय-इंग्रजांची श्रीरंगपट्टणावर स्वारी व पीछेहाट-इंग्रजी व मराठी लष्करांच्या भेटी-इंग्रजांचा पट्टणास वेढा-घाशीराम कोतवाल-पाटीलबावा देशीं येतात-श्रीमंतांची कृष्णास्नानार्थ स्वारी-सातान्यास महाराजांची भेट-टिपूशीं तह-पाटीलबावांचा पुण्यास मुक्काम-वकीलमुतलखी-नानाशीं वैमनस्य-सचिव प्रकरण-गायकवाडांची सरदारी-पाटीलबावांचा मृत्यु-अळत्याची लढाई-करवीरकरांवर मोहीम-खड्यांची स्वारी-खड्यांची लढाई-सवाई रावसाहेबांचा मृत्यु-बाजीरावसाहेब पुण्यास येतात-शिंद्यांचं प्राबल्य-नाना सातान्यास जातात-शेणवी कारभारी व पटवर्धन सरदार यांचा मिलाफ-चिमाजीआप्पाची स्थापना व छोटी कारकीर्द-नाना वाईस जातात-महाडाकडे पळतात-महाडचें कारस्थान-शेणवी व पटवर्धन यांचा पाडाव-परशुरामभाऊंस कैद. डे. अ. पृष्ठें ६०० किंमत ३ रुपये.